


अनुवादक
संपादक

सेतुमाधवराव पगडी

मोगल दरबारची बातमीपत्रे

खंड दुसरा

: अनुवादक । संपादक :

सेतुमाधवराव पगडी

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

मोगल दरबारची बातमी पत्रे

खंड दुसरा

: अनुवादक संपादक :

सेतुमाधवराव पगडी

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

प्रथमावृत्ती : जानेवारी १९८३

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

मुद्रक : **सौ. कांता नलावडे**
शिल्पा आर्टस्,
सी./ ४ दीप अपार्टमेंट,
छेडा नगर, मुंबई ८९

किंमत ३० रुपये

निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने सुप्रसिद्ध इतिहासकार श्री. सेतुमाधवराव पगडी यांनी भाषांतरित केलेल्या 'मोगल दरबारची बातमीपत्रे' खंड–१ या पुस्तकाचे प्रकाशन ऑगस्ट १९७८ ला केले. या पुस्तकाचा भाग–२ रा मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

मुंबई
दिनांक १४ जानेवारी १९८३
२४ पौष शके १९०४

सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

प्रस्तावना : १

१७०१ च्या जानेवारीत औरंगजेब मिरजेंत आहे आणि १७०२ च्या अखेरीस तो सिंहगडच्या पायथ्याशी आहे. या दोन वर्षांच्या काळातील त्याच्या हालचाली लक्षांत घेणे आवश्यक आहे. बातमीपत्रांतील काही नावे नीट लागत नाहीत. बातमीपत्रांतील पानेही मागेपुढे झाली आहेत. त्यामुळे क्वचित काही गावांबद्दल तारखांबद्दल घोटाळा होण्याचा संभव आहे. हे सर्व जमेस धरूनहि औरंगजेबाची हालचाल पुढीलप्रमाणे.

१७०१

जानेवारी १७०१ बादशहा मिरजेंत धनाजी जाधवाचा औरंगजेबाच्या छावणीवर हल्ला.

दोन मार्च– मिरजेहून प्रयाण.

पाच मार्च– आतिग्रे हातकणंगले तालुका.

सहा मार्च– पंचगंगेवर मुक्काम.

सात मार्च– कोल्हापूर.

आठ मार्च– पंचगंगेवर.

नऊ मार्च– पन्हाळगडच्या पायथ्याशी.

एक जून– पन्हाळगडजवळच्या छावणीतून प्रयाण. पवनगडसमोर मुक्काम.

तीन जून– बादशहाचा बेदारबख्ताच्या तळापुढे मुक्काम.

पाच जून– अडीच कोस प्रवास. तियार (वाठार, नेवापूर (?) मुक्काम.

सहा जून– सव्वादोन कोसाचा प्रवास. मौजे ननज (?) मुक्काम.

सात जून– सव्वाचार कोसाचा प्रवास. औरंगजेब कृष्णापार.

दहा जून– कृष्णा काठाहून कूच. अडीच कोस प्रवास. कुंडल (तासगांव तालुका, सांगली जिल्हा) येथे मुक्काम.

अकरा जून– सव्वादोन कोस. विरळा नदी पार.

तेरा जून– अडीच कोसाचा प्रवास. वाडा परेळी (पडाळी तासगांव तालुका (?) येथे मुक्काम.

चौदा जून– सव्वादोन कोसाचा प्रवास. रौतगाव (विटे, खानापूर तालुका, सांगली जिल्हा) येथे मुक्काम.

पंधरा जून– सव्वादोन कोसाचा प्रवास, भूषणगड जवळी (खटावल तालुका) हमपूर (वनपूर ?) येथे मुक्काम.

सोळा जून– अडीच कोसाचा प्रबास, अनमोडा (वडूजजवळ दाळमोडी ?) येथे मुक्काम.

सतरा जून– सव्वादोन कोसाचा प्रवास. मौजे कुडोळी (कुरोळी, खटावजवळ) येथे मुक्काम.

अठरा जून– दोन कोसाचा प्रवास. खटावजवळ मुक्काम.

पंचवीस जून– सव्वादोन कोसाचा प्रवास, वर्धनगडजवळ मुक्काम (खत गुण ?)

सहा नोव्हेंबर– खतगणहून कूच, पावणे दोन कोसाचा प्रवास व मुक्काम एकांब्याजवळ

दहा नोव्हेंबर– एकांब्याहून कूच. सव्वादोन कोसाचा प्रवास करून रहमतपुराजवळ (कोरेगांव तालुका, सातारा जिल्हा) मुक्काम.

बारा नोव्हेंबर– रहमत पुराहून कूच, तीन कोसाचा प्रवास, मूरज ताडगांव येथे मुक्काम (कोरेगांव तालुका)

तेरा नोव्हेंबर–पावणे दोन कोसाचा प्रवास, मुक्काम मसूर (कऱ्हाड तालुका)

चौदा नोव्हेंबर–तीन कोसाचा प्रवास, कऱ्हाडच्या मशिदीत नमाज, मुक्काम कऱ्हाड.

सतरा नोव्हेंबर– पावणेदोन कोसाचा प्रवास, मौजे नौला (?) येथे मुक्काम.

मध्ये एकदा निघून बादशहा बत्तीस शिराळयाला पोहोचले. तारीख दिली नाही, पानें मागे पुढे झाली आहेत.

तेवीस नोव्हेंबर– पावणे दोन कोसाचा प्रवास, मौजे सातगांव (हाटेगाव) येथे मुक्काम.

चोवीस नोव्हेंबर– पावणे तीन कोस प्रवास, मलकापूरच्या (कोल्हापूर जिल्हा) अलीकडे पंचगंगेवर (वारणा) मुक्काम.

सव्वीस नोव्हेंबर– दीड कोसाचा प्रवास, मलकापूर (जिल्हा कोल्हापूर) जवळ मुक्काम.

चार डिसेंबर– मलकापूरहून कूच, दीड कोस प्रवास. बडवाळ (मलकापूर व अंबाघाट यांच्या मध्ये) येथें मुक्काम.

सात डिसेंबर– वडवाळहून कूच, पावणे दोन कोसाचा प्रवास. येळूजाई (येळवण जुगारे) येथे मुक्काम. १७०१ अखेर पर्यंत औरंगजेबाचा मुक्काम येळवण जुगारेला. (तेथूनच पावनखिंडची चढ लागते. ते पठार विशाळगडपर्यंत गेले आहे.

१७०२

सोळा जानेवारी १७०२– औरंगजेब येळवण जुगारेहून निघून विशाळगडच्या समोर अर्ध्या मैलावर मूर्लीमूठ येथे छावणी करतो.

दहा जून– विशाळगड घेतल्यावर औरंगजेब तेथून निघतो. सव्वा तीन कोसाचा प्रवास करून अंबाघाटाच्या अलीकडे मुक्काम.

सोळा जून– अंबाघाटा अलीकडील मुक्कामावरून कूच, दीड कोसाचा प्रवास, ओढ्याच्या काठी मुक्काम. ओढ्याचे नाव करोधी असे दिले आहे. (नकाशात काजळी, काडवी, कावडी अशी नांवे आहेत.)

चोवीस जून– सव्वा दोन कोसाचा प्रवास, मलकापूर जवळ मुक्काम.

चार जुलै– पावसामुळे बादशहा अडकला होता. चार जुलैला हत्तीवरून ओढा पार व मुक्काम.

अकरा जुलै– बादशहाचे कूच, सव्वा दोन कोसाचा प्रवास व मुक्काम. पन्हाळगडच्या अलीकडे अडीच कोस (सुमारे दहा मैल).

सतरा जुलै– सव्वा दोन कोसाचा प्रवास, पन्हाळगडच्या प्रवेशद्वारापासून दीड कोसावर मुक्काम.

तेवीस जुलै– पावणेतीन कोसाचा प्रवास बानसगाव (पारगाव) अगर (मानपडाळे) येथे मुक्काम.

सत्तावीस जुलै– अडीच कोसाचा प्रवास, वडगांवच्या अलीकडे दीड कोसावर वाठार येथे मुक्काम.

तीस जुलै– पावणे दोन कोसाचा प्रवास, वारणे काठी वळगांव येथे मुक्काम. एक महिना वीस दिवस.

सहा ते एकोणीस सप्टेंबर– औरंगजेबाचा प्रवास, कृष्णेच्या दिशेने. अखबारातची पाने गहाळ झाली आहेत. त्यामुळे मुक्कामांची नांवे मिळत नाहीत.

एकोणीस सप्टेंबर– मिरजेजवळ, औरंगजेब कृष्णा ओलांडतो, कृष्णे कांठी मुक्काम.

पंचवीस सप्टेंबर– कृष्णाकांठावरून दीड कोसाचा प्रवास, मिरजेच्या इदग्याजवळ मुक्काम

सत्तावीस सप्टेंबर– पावणे दोन कोसाचा प्रवास, मालेगांवला मुक्काम.

एकोणतीस सप्टेंबर– साडे तीन कोसाचा प्रवास, खिळणा परनाळा (धुळगांव ?) येथे मुक्काम.

दोन ऑक्टोबर– तीन कोसाचा प्रवास करून खेडगांव (कन्हेरगांव ?) येथे मुक्काम.

तीन ऑक्टोबर– सव्वाकोसाचा प्रवास करून बबूलीगांव (भोलेगांव) येथे मुक्काम

पांच ऑक्टोबर– पावणे दोन कोसाच्यावर प्रवास आणि डफळापूर (जत तालुका, सांगली जिल्हा) येथे मुक्काम.

सहा ऑक्टोबर– अडीच कोसाचा प्रवास, मौजे प्रतापपूर येथे मुक्काम.

सात ऑक्टोबर– अडीच कोसाचा प्रवास जूझारपूर (सांगोला तालुका, जिल्हा सोलापूर) येथे मुक्काम.

नऊ ऑक्टोबर– पावणे दोन कोसाचा प्रवास व ओढयाच्या पलीकडे मुक्काम.

बारा ऑक्टोबर– अडीच कोसाचा प्रवास याकूतपूर येथे मुक्काम.

तेरा ऑक्टोबर– सव्वादोन कोसाचा प्रवास करून मौजे वांगी येथे मुक्काम.

चौदा ऑक्टोबर– औरंगजेब माण नदी ओलांडून मुक्काम करतो प्रवास दोन कोसाचा. माझऱ्याजवळ (नाझरे ?) मुक्काम.

अठरा ऑक्टोबर– दोन कोसाचा प्रवास भाळवणी (तालुका पंढरपूर) येथे मुक्काम

वीस ऑक्टोबर– पावणेतीन कोसाचा प्रवास करून वेळापूर (तालुके माळशिरस जि. सोलापूर) येथे मुक्काम.

चोवीस ऑक्टोबर– सव्वादोन कोसाचा प्रवास असदनगर अकलूज येथे (सोलापूर जिल्हा) मुक्काम.

अठ्ठावीस ऑक्टोबर– पाऊण कोसाचा प्रवास करून औरंगजेब नीरा नदी ओलांडतो. नदीच्या पलीकडच्या काठावर मुक्काम. (बावडा, इंदापूर तालुका पुणे जिल्हा).

एकतीस ऑक्टोबर– तीन कोसाचा प्रवास बाभुळगांव येथे मुक्काम.

एक नोव्हेंबर– पावणेदोन कोसाचा प्रवास आणि इंदापूरला मुक्काम.

तीन नोव्हेंबर– तीन कोसाचा प्रवास व कळठण (इंदापूर तालुका) येथे मुक्काम

पांच नोव्हेंबर– पावणे दोन कोसाचा प्रवास अजोटी (इंदापूर तालुका, पुणे जिल्हा) येथे मुक्काम. दीर्घ आजारानंतर बख्शी उल्मुरक बहरामंद खान याचा मृत्यु बख्शीउलमुल्क मीर बख्शी म्हणून जुल्फिकारखान याची नेमणूक.

सात नोव्हेंबर– आज अजोटीहून निघून बादशहांनी दोन पावणे दोन कोसाचा प्रवास केला. मौजे पळसदेव येथे भीमा नदी आलांडली. नदीच्या पलीकडच्या काठावर मुक्काम.

नऊ नोव्हेंबर– पळसदेव जवळील मुक्कामावरून निघून सव्वा दोन कोसाचा प्रवास जिंती (करमाळा तालुका सोलापूर जिल्हा) येथे मुक्काम.

दहा नोव्हेंबर– जिंतीहून कूच, अडीच कोसाचा प्रवास, भीमेच्या कांठावर खेड (कर्जत तालुका, नगर जिल्हा) येथे मुक्काम.

तेरा नोव्हेंबर– खेडहून कूच, पावणे तीन कोसाचा प्रवास पेडगांव उर्फ बहादूरगड जवळ मुक्काम. दीड महिन्याच्यावर पेडगांव येथे औरंगजेबाचा मुक्काम.

दोन डिसेंबर– बहादूरगडाहून कूच, सव्वा कोसाचा प्रवास, दिलेरखानगडपाशी मुक्काम (हे गांव बहुतेक कवठे असावे).

आठ डिसेंबर– औरंगजेब घोड नदी ओलांडतो. अडीच कोसाचा प्रवास मुक्काम कांडली (तांदळी, शिरूर तालुका, पुणे जिल्हा)

तेरा डिसेंबर– औरंगजेबाचे कूच, पावणे तीन कोसाचा प्रवास, शिरसगांव (तालुके शिरुर, पुणे जिल्हा) येथे मुक्काम.

चौदा डिसेंबर– शिरसगांवाहून कूच, तीन कोसाचा प्रवास, नान्हरे (एके ठिकाणी घारुर असे लिहिले आहे.) येथे मुक्काम.

सोळा डिसेंबर– सव्वादोन कोसाचा प्रवास, ओढा पार दहिवडी येथे मुक्काम

एकोणीस डिसेंबर– पावणे तीन कोसाचा प्रवास, नंदगांव (निमगांव महाळुंगी) येथे मुक्काम.

एकवीस डिसेंबर– निमगांवहून कूच, सव्वादोन कोसाचा प्रवास, कोरेगांव (शिरुर तालुका) येथे मुक्काम.

बावीस डिसेंबर– कोरेगांवहून कूच, तीन कोसाला थोडा कमी असा प्रवास लोहगांव जवळ मुक्काम (पुण्याजवळ).

सव्वीस डिसेंबर–, लोहगांवहून कूच, दोन कोसाचा प्रवास, पुण्याजवळ मुक्काम

अठ्ठावीस डिसेंबर– औरंगजेबाचा नातू (काम बख्शाचा मुलगा) सुलतान मुहियुस्सुअत याचा अल्पवयात मृत्यु. औरंगजेबाचे कूच. तीन कोसाचा प्रवास वडगावला मुक्काम.

एकोणतीस डिसेंबर– सव्वा कोसाचा प्रवास कोरगाव (कोंढवे असावे) जवळ मुक्काम.

तीस डिसेंबर– दोन कोसाचा प्रवास. सिंहगडाच्या पायथ्याशी मुक्काम.

महाराणी ताराबाई

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाशी सामना देण्याची जबाबदारी महाराणी ताराबाईंवर पडली. मोगल दरबारच्या बातमीपत्रात ताराबाईंच्या हालचालींच्या त्रोटक नोंदी आहेत. पण मोगल मराठा संघर्षात युद्धाची सूत्रे संपूर्णपणे ताराबाईच चालवीत होत्या याची ग्वाही या मोहिमांतून हजर असलेले मोगलांचे इतिहासकार देतात.

खाफीखान म्हणतो–

'राजारामाची बायको ताराबाई हिने विलक्षण धामधूम (तुगयान म्हणजे पूर) उडविली. त्यात तिचे, सैन्याचे नेतृत्वाचे आणि मोहिमांच्या व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने प्रकट झाले. त्यामुळे मराठ्यांचे आक्रमण आणि त्यांची धामधूम दिवसेंदिवस वाढतच गेली.

भीमसेन सक्सेना– राजारामाच्या मृत्यूनंतर त्याच्या अल्पवयी मुलाला त्याच्याजागी गादीवर बसविण्यात आले, पण सगळा कारभार त्याच्या आईच्या हातात आला. तिने इतकी उत्तम व्यवस्था केली की मराठे सरदार तिच्या आज्ञेशिवाय काही करीत नसत. (तिच्या आज्ञेबाहेर नसत) ताराबाईंची जी थोडीबहुत पत्रे उपलब्ध आहेत त्यावरून त्यांचा निर्धार, योजना चातुर्य आणि जिद्द ही शब्दाशब्दातून आढळते. 'औरंगजेबाला तरी ठेचगा द्यावा अशी उमेद धरता ...या उपरी औरंगजेब आला आहे तरी त्याचा हिसाब न धरता स्वामीची जागा जतन करणे. स्वामी ऊर्जित हरबाब करतील. दिलासा असो देणे' कबिला बाड मारून हमेशा गोटावर हल्ले करावे.' अशी स्फूर्तिदायक वाक्ये म्हणजे मराठी भाषेचे अलंकार होत. दिल्ली झाली दीनवाणी, दिल्लीशाचे गेले पाणी, ताराबाई रामराणी, भद्रकाली कोपली हे समकालीन साहित्यांतील उद्‌गार.

दक्षिण भारतात मराठ्यांचा प्रतिकार करण्यासाठी औरंगजेबाने निर निराळ्या सुभ्यांवर अधिकारी नेमले. ते आपापल्या परीने मराठ्यांशी लढत होते

सुभे औरंगाबाद– नजाबतखान सुभेदार तैमूरलंगाचा रास्त वंशज. तैमूरच्या वंशांतील मिर्जा सुलेमान मिर्जा इब्राहीम, मिर्जा शाहरुख, मुहंमदशुजानजाबतखान आणि मुहंमद इसहाक नजाबतखान अशी परंपरा आहे.

याचा मुलगा बहरोजखान हा बागलाण (सुभे खानदेश) चा फौजदार होता. नजाबतखान सुभेदार याचा मृत्यु डिसेंबर १७०१ मध्ये झाला.

सुभे खानदेश

सुभेदार मोतिकदखान हा जानेवारी १७०१ मध्ये मक्केच्या यात्रेवर गेल्यावर औरंगजेबाने खानदेशच्या सुभेदारीवर सद्रुद्दीन याची नेमणूक केली.

सुभे वऱ्हाड

या काळात सुभे वऱ्हाडवर गोवळकोंड्याचा माजी सरदार असीमदीनखान हा सुभेदार म्हणून काम करीत होता. हा तामीळनाडमध्ये कांजीवरमचा (कांची) फौजदार असताना संताजी घोरपडे याने त्याला कैद करून आणि नंतर जबर खंडणी घेऊन सोडून दिले (१६९३) हे प्रसिद्ध आहे.

सुभे नांदेडबीदर

येथें औरंगजेबाचा मामेभाऊ (शायस्ताखानाचा मुलगा) खुदाबंदाखान हा सुभेदार होता.

सुभे हैद्राबाद

हैद्राबादचा सुभेदार जानसियारखान (औरंगजेबाची बायको दिलरस बानू ही याची मावस बहीण) हा १७०० मध्ये मरण पावला. हैद्राबादची सुभेदारी औरंगजेबाचा मुलगा कामबख्श याजकडे देण्यात आली. पण त्याने आपल्या बापाची छावणी कधीच सोडली नाही. सुभ्याचा प्रत्यक्ष कारभार जानसियारखान याचा मुलगा रुस्तम दिलखान याजकडे होता.

हैद्राबाद कर्नाटक

हा प्रांत (बव्हंशाने आजचा तामीळनाड) जुल्फिकारखानाकडे होता. पण बादशाहाने त्याला उत्तरेत बोलावून घेतल्यामुळे त्याचा दुय्यम दाऊदखान पन्नी हा तडफदार अधिकारी गोवळकोंडा कर्नाटकचा फौजदार म्हणून काम करू लागला.

सुभे विजापूर

या सुभ्यावर सुभेदार म्हणून लुत्फुल्लाखान काम करीत होता. शहाजहान कालीन मुख्यमंत्री सादुल्लाखान याचा हा मुलगा. भावी निजामुल्मुल्काचा मामा.

विजापूर कर्नाटक

मामूरखान हा विजापूर कर्नाटकचा फौजदार. गोवळकोंडा कर्नाटक व विजापूर कर्नाटक या प्रांतांच्या अधिकाऱ्यांना फौजदार म्हणत असले तरी त्यांचा दर्जा सुभेदाराप्रमाणेच होता. गोवळकोंडा व विजापूर येथील सुभेदारांच्या ते आधीन नसत.

फौजदार

मोगल काळांतील बरेच जिल्हे (त्यांना सरकार म्हणत) आजच्या जिल्ह्यांहून काहीसे मोठेच म्हणावे लागतील. जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांना फौजदार म्हणत. या फौजदारांचे प्रमुख काम जिल्ह्याचे संरक्षण हे असे. प्रस्तुत काळात हे काम शर्थीने करणाऱ्यांमध्ये कल्याण–भिवंडीचा फौजदार मातबरखान, बागलाणचा फौजदार बहरोजखान, दंडराजपुरी जंजिऱ्याचा सिद्दीयाकूब, तामीळनाडचा दाऊदखान पन्नी, सातारा कऱ्हाडचा यासीनखान ही नांवे तडफदार व कार्यक्षम म्हणून बातमी पत्रातून पुन्हा पुन्हा येतात.

जुने सेनापती

१६८० पासून औरंगजेबाच्या प्रभावळीत असणारे अनेक मोगल सेनापती वारले होते. सदुल्लाखान (पहिला) रणमस्तखान पन्नी, हसनखान, दिलेरखान, ख्वाजा आबिद चिनकुलीजखान, बहादुरखान खानजहान, कासिमखान, मुखलिस खान बख्शी, शेखनिजाम मुकरबखान अशी अनेक नांवे बातमीपत्रांतून गळली आहेत. या काळातील सेनापतींमध्ये औरंगजेबाचा नातू बेदारबख्त, मावसभाऊ जुल्फिकारखान, बायकोच्या मावसभावाची मुले तरबियतखान, कामयाबखान, रुस्तमदिलखान (हैद्राबादचा सुभेदार), बायकोच्या मावस बहिणीचा मुलगा मतलबखान, एका मावशीचा नवरा मुख्यमंत्री असदखान, त्याचा जावई बख्शी· बहरामंदखान, मामेभाऊ खुदाबंदाखान, त्याचा पुतण्या आणि शायस्ताखानाचा नातू मुहंमद सालेह ही नांवे येतात.

विवाह संबंध नसलेले पण मध्य आशियातील तुर्कस्थानातून रास्त आल्यामुळे बादशहाच्या अत्यंत विश्वासास पात्र झालेले घराणे म्हणजे गलजउद्दिन फिरोजजंग याचे होय. याचा चुलतभाऊ मुहंमद अमीनखान हा १७२१–२२ आणि अमीनखानाचा मुलगा कमरुद्दीन हा १७४८ पर्यंत मोगल साम्राज्याचे मुख्य प्रधान होता. फीरोजजंगाचा मुलगा मीर कमरुद्दीन निजामुल्मुल्क, हैद्राबादच्या निजाम

घराण्याचा संस्थापक. फीरोजजंगाचे दोन सावत्र भाऊ हमिदखान व अब्दुल रहिम-खान हेही लढायांतून भाग घेत. या सर्वांची नांवे बातमीपत्रांतून येतात.

औरंगजेब तुर्क, त्याच्या दरबारांतील प्रमुख अधिकारी हे त्याचे जवळचे नातेवाईक. काबुलचा सुभेदार त्याचा मोठा मुलगा मुअज्जम. मुअज्जमचा मोठा मुलगा मुइजुद्दीन हा मुलतानचा सुभेदार. मुअज्जमचा दुसरा मुलगा अजीमुश्शान हा बंगाल आणि (नंतर) ओरिसाचा (पण) सुभेदार. औरंगजेबाचा दुसरा मुलगा आज्जम हा गुजराथचा सुभेदार.

औरंगजेबाच्या कडक नियंत्रणाखाली पण स्वतंत्र मोहिमा करणारे असे तीनच. नातू–वेदारबख्त, जुल्फिकारखान आणि गाजिउद्दिन फीरोज जंग.

भारतीय मुसलमानांत शेखनिजामच्या (संभाजीराजांना धरले म्हणून) मुलांवर औरंगजेबाची कृपा असे. पण त्यांना स्वतंत्र मोहिमा नव्हत्या. कोकणात मातबरखान आणि जंजिऱ्याचा सिद्दी, कऱ्हाडचा फौजदार शिवकालीन हसनखान रोहिल्याचा मुलगा यासीनखान, दक्षिण भारतात दाऊदखान पन्नी (पठाण) हे आपापल्या क्षेत्रात काम करीत.

रजपूत सरदार– मिर्जा राजा जयसिंग किंवा जसवंतसिंग याजप्रमाणे कोणत्याही रजपूत राजाकडे स्वतंत्र मोहीम देण्यांत आली नाही. जयपूरचा सवाई जयसिंग, बिकानेरचा राजा सरुपसिंग आणि नंतर सुरतसिंग, ओदर्याचा राजा उदितसिंग (अवधूतसिंग) हे औरंगजेबाच्या छावणीत. कोटयाचा रामसिंग व दतियाचा राव दलपतबुंदेला हे जुल्फिकारखानाच्या छावणीत दुय्यम दर्जाचे अधिकारी म्हणून वावरत.

मराठे सरदार– मराठे सरदारांची तीच स्थिति होती. कान्होजी शिर्के जुल्फिकारखानाबरोबर, रावमानसिंग जाधव (शिंदेखेडकर) फलटणचे निंबाळकर (महादजीचे भाऊ व मुले) सहवाशी डफळे अशी काही नांवे आढळतात

ठाणी रक्षण करणाऱ्यांत कांही अधिक मराठे आढळतात. बहिर्जी पांढरे कासेगांव, कृष्णराव–खटाव, निजामराव–कडूस, आवजी आढळराव–खानापूर, शंकराजी–बत्तीस शिराळे, पदाजी घाटगे, बुधपांचे गांव पिराजी घाटगे, कागल, इत्यादींची नावे बातमीपत्रांतून येतात.

किल्लेदारांमध्ये एक दोन मराठे व दहा पाच रजपूत या पलीकडे नावे जात नाहीत. जी आहेत तीही प्रत्यक्ष युद्ध क्षेत्रांतील. सेनापतसिंग–पाली, शिवसिंग रायगड, अटलसिंग–लोहगड, खानचंद–बुंदेला–पुरंदर, रामचंद बुंदेला–परळी,

सुरतसिंग–वसंतगड, सकलाल राठोड–सातारा, रावतमल झाला. पन्हाळगड उदितसिंग–विशालगड.

युद्धभूमीच्या मागे पण रसद आणि खजिना यांच्या वाटेवर असलेले दौलताबाद, अहमदनगर शिवनेरी, परंडा सोलापूर, नळदुर्ग औसा उद्गिर, कांधार; नाशिक, नगर भागातील पेडगांव पट्टा, त्र्यंबक, साल्हेर, मुल्हेर इत्यादी किल्यांवर रजपूत किल्लेदार दिसत नाहीत.

औरंजेबाची धोरणे ही अशी होती

हा लढा तुर्कांचा एतद्देशियांच्या विरुद्ध. धर्माचा वापर, प्रचाराचे प्रभावी शस्त्र म्हणून. पण जिहादच्या आरोळीचा परिणामही होईनासा झाला. मोगल सैन्याला उत्तर भारतांतून रिक्रूट मिळेनासे झाले.

मराठे सरदार

अनेक मराठे सरदार आपापल्या क्षेत्रांतून मोगलांशी निकराने झुंजत होते. परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, रामचंद्र पंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधी, शंकराजी नारायण सचिव, मल्हार दादाजी बर्वे, केसोभिमल, यांची नावे बातमी पत्रांतून येतात. धनाजी जाधव हा तर सरसेनापती होता. त्याच्या हालचाली प्रभावी आणि तडफदार असत. जुल्फिकारखानाला त्याने अक्षरशः हजारो मैल पायपीट करण्यास लावले. वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान व नांदेडचा सुभेदार खुदाबंदाखान हे त्याच्या भीतीने घरातून बाहेर येईनात. ब्रह्मपुरी येथे आणि खुद्द मिरज येथे बादशहाच्या छावणीवर त्याने धाडसी आक्रमणे केली आणि मोगलांची तारांबळ उडवून दिली.

राणोजी घोरपडे

राणोजीच्या नेत्रदीपक यशाकडे इतिहासकारांचे जावे तसे लक्ष गेले नाही. संताजी घोरपडे याचा हा मुलगा. १७०१ व १७०२ ही वर्षे याने गाजवून सोडली. मलकापूर येथे बादशहाच्या सैन्याच्या पिछाडीवर त्याचा धाडसी हल्ला आणि साताऱ्याच्या किल्ल्याला त्याने दिलेला शह या त्याच्या दोन मोठ्या कामगिऱ्या. दुर्दैवाने कर्नाटकात बेडर जमातीची एक गढी घेण्याच्या प्रयत्नात तो गोळा लागून ठार झाला (१७०२) मराठ्यांची ही हानी संताजीच्या मृत्यूइतकीच जबरदस्त ठरली.

विदर्भात परसोजी भोसले, खानदेशात व वऱ्हाडात नेमाजी शिंदे, बागलाणांत खंडोजी दाभाडे, कोंकणांत कान्होजी आंग्रे, कर्नाटक व दक्षिण कोंकण या प्रांतांत बहिर्जी हिंदूराव घोरपडे अशी प्रमुख नावे आपल्याला आढळतात.

बातमीपत्रांचे स्वरुप

अप्रिय घटना सौम्य करून देण्याची पद्धत बातमीपत्रांतून आढळली तरी बादशहाचे शौर्य, निर्धार, सहनशक्ति ही वैशिष्ट्ये उत्तम प्रकारे दिसून येतात. असे वाटते की बातमीपत्रे इतरत्र न आढळणारा तपशील मोकळेपणाने देतात. उदाहरणार्थ मराठ्यांचा मिरजेच्या आणि मलकापूरच्या छावण्यांवर हल्ला, मुहंमद अमीनखान (भावी पंतप्रधान) याची मराठ्यांनी केलेली फजिती. विशाळगडावरून परतताना मोगलांचे झालेले विलक्षण हाल बातमीपत्रांतून पहावे. पावसामुळे औरंगजेब हा रात्रभर आपल्या शय्यागृहात भिजत पडला होता. तंबूचे कपडे फाटून गेले होते, हत्तीवरून उतरून तो मेण्यात बसत असतांना अंगारी पडून मेणा मोडला आणि योगायोगाने औरंगजेब वाचला. (परमेश्वर कृपेने क्षेम झाले असे फारसीतून उद्गार आहेत) मयताच्या कफनाला पैसे द्या म्हणून याचना करणारे शिपाई, मराठ्यांशी लढा म्हणता पण दिमतीस दिलेला एकही सरदार मला येऊन मिळाला नाही. प्राण कंठाशी आले आहेत अशी आर्त हाक मारणारा रुहुल्लाखान ओढ्यात हत्ती घसरल्यामुळे हजारो अश्रफ्या वाहून गेल्या आणि त्यांची शोधाशोध सुरू झाली. हे बारीक सारीख तपशील बातमीपत्रांतून मिळतात. इतरत्र मिळत नाहीत.

पन्हाळगड आणि विशाळगड या किल्ल्यांच्या वेढ्याच्या दैनंदिन्या प्रभावी आहेत. मोगल सरदारांच्या नेमणुका, त्यांचे चौकी पाहारे आणि ठाणी, शस्त्रास्त्रांचा आणि दारूगोळ्याचा पुरवठा याचे बारीक सारीक तपशीलही बातमी पत्रांतून सुटले नाहीत. मोगलांची प्रचंड तयारी पाहता पन्हाळगडच्या किल्लेदाराने त्यांना सहा महिने थोपवून धरले. पावसाळा तोंडावर आल्यामुळे (पैसा भरून) किल्ला घेण्याची मोगलांना घाई करावी लागली. (मोसमे बरसात असा. हगी मसलहतबूद, पावसाळा आहे. जे केले तेंच योग्य होते असे शद्ब आहेत.) विशाळगडचा वेढा परशुराम पंतांनी सहामहिनें लढविला तो इतक्या दमदारपणें की मोगलांनीहि तोंडात बोटे घातली. परशुरामपंताच्या आयुष्यांतील हा सोन्याचा क्षण (फायनेस्ट अवर) म्हणावयास हवा.

बातमी पत्रांतील मोगल सैन्याची हालचाल, दरबारांतील खलबते, रात्रदिवसाच्या मोर्च्यांतील चकमकी, सरदारांचे हेवेदावे, साम्राज्यांतील घडामोडी इत्यादींचे लहानसहान तपशील मिळतात.

पण तेवढ्याने भागत नाही. काही घटनांचा उल्लेख न करणंच बातमी पत्रांच्या लेखकांना योग्य वाटले असावे. अशावेळी पन्हाळगडच्या वेढ्यासंबंधी (सुरवातीस भीमसेन सक्सेना वेढ्यात हजर होता.) साकी मुसीदखान (औरंग-, जेबाचा लेखक व पुढे चरित्रकार) इंग्लंडचा राजदूत सर विलियम नॉरिस (हा वेढ्यांत हजर होता) आणि इतिहासकार खाफीखान याचा जीवश्चकंठश्चमित्र व आश्रायदाता मुहंमद मुरादखान यांचे अनुभव हे अतिशय मोलाचे ठरतात.

मुरादखान यानें पन्हाळगडच्या वेढ्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. खाफीखानानें मुरादखानापासून घेतलेली माहिती बातमीपत्रांत आढळत नाही. मोगल सरदारांचे हेवेदावे औरंगजेबाचे गुजरातच्या सुभेदाराराला पत्र आणि पैसा देऊन पन्हाळगड घेतला ही माहिती आपल्याला खाफीखानामुळे उपलब्ध झाली. पन्हाळगडासमोरील मोगलसैन्यांतील भोंगळपणा आणि भ्रष्टाचार हे सर विलियम नॉरिसच्या दैनंदिनीमुळे आपल्याला समजतात. विशाळगडासंबंधी साकी मुसीदखान याची साक्ष महत्वाची आहे. या वेढ्यांत तो औरंगजेबाबरोबर होता.

मासिसल उमरा (मोगल साम्राज्याचा चरित्रकोश) हा ग्रंथ अठराव्याशतकाच्या मध्यांत लिहिला गेला. त्यांतील कांही नोंदी १७८५ पर्यंत पूर्ण झाल्या. हा ग्रंथ शहानवाजखान आणि त्याचा मुलगा अब्दुल्हे समसामद्दौला या दोघांनी मिळून पूर्ण केला. शहानवाजखान हा वऱ्हाडचा दिवान. निजामाच्या जवळपास वावरणारा. त्याचा जन्म जरी इ. स. १७०० चा आणि तो दक्षिणेंत १७१५ मध्यें आला तरी त्याचे काका, आजोबा आणि चुलत भाऊ हे दक्षिणेत मोठ्या पदावर होते. मोगल मराठा संघर्षात भाग घेतलेल्या अनेक व्यक्ती हयात होत्या आणि त्यांची व शहानवाजखान यांची ओळख होती. त्यांपैकी काही व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे १) निमामु-ए मुल्क आणि त्यांचे काका हामिदखान व अब्दु-रहीमखान २) इतिहासकार खाफीखान ३) मुहंमद मुरादखान याची मुले जव्वाद आणि इजर ४) संगमनेरचा बख्शी फखरुद्दीन मामूरी ५) अमानत खान उर्फ मुबारिज खान सुभेदार, संघर्षकाळात संगमनेरचा फौजदार, ६) तुर्कताजखान आणि त्याचा मुलगा ७) मुहतशमखान आणि त्याचा मुलगा ८) मतलबखानाची मुले' ९) सय्यद बंधू पैकी हुसेन अलीखान सुभेदार, १०) चंद्रसेन जाधव.

ही यादी पन्नासपर्यंत सहज जाऊ शकेल. शहानवाजखानाने काढलेल्या व्यक्तिरेखा मोठ्या हृद्य आहेत. एकच उदाहरण सांगतो. औरंगजेबाच्या प्रभावळीत मुहतशमखान नांवाची एक वल्ली होती. त्याचा बाप हा अजमेरच्या लढाईत

औरंगजेबाच्या जागेवर हत्तीवर आपण होऊन बसला आणि मारला गेला. आपल्यासाठी त्याने आपला जीव दिला म्हणून औरंगजेबाने त्याचा मुलगा मुहतशमखान याला शेवटपर्यंत चांगले वागविले. मुहतशमखान हा अत्यंत निष्क्रिय माणूस. जन्मभर त्याने कांही नांव घेण्यासारखी कामगिरी केली नाही. शहानवाजखान म्हणतो ' तारुण्यात त्याने कांही गरम औषधे सेवन केली होती. हिवाळ्यातहि तो घामाघूम होत असे. त्याला नेहमी पंखा लागे खाणेपिणे आणि स्त्री संभोग याशिवाय त्याला दुसरा व्यवसाय नव्हता. त्याच्या पौरुषाच्या कथा मोगल छावणीत सर्वतोमुखी असत. विशाळगडहून परततांना मराठ्यांनी त्याचे सर्वस्व लुटले. बसण्यास घोडा नसल्यामुळे मुहतशमखान हातात काठी घेऊन चिखलातून वाट काढीत चालला आहे. त्याच्या पाठोपाठ त्याच्या बुरखाधारी बायका चिखलातून घसरत पडत चालल्या आहेत. असे उद्बोधक चित्र शहानवाजखान याने रेखाटले आहे. असा मजकूर बातमी पत्रांतून आढळणार नाही.

हालचालींचा तक्ता

१७०१ व १७०२ या वर्षांतील मोगल आणि मराठे यांच्या हालचालीचा तक्ता पुढे दिला आहे.

१७०१

जानेवारी

१) बादशहा मिरजेत. तीन जानेवारी, मीरबख्शी मुखलिस खान याचा मिरजेत मृत्यु.

२) गोविंद व इतर मराठे सरदार यांच्या हैद्राबाद कर्नाटकांतील हालचाली. दाऊदखान त्यांच्यावर चालून जातो.

३) खानदेशच्या सुभेदारीवर सद्रुद्दीन याची नेमणूक.

४) बादशहाचा कृष्णाकाठी मुक्काम.

५) अलाहाबादच्या सुभेदाराने एक हजार बंदूकी पाठविल्या.

६) नांदेड सुभ्यांत सुभेदार खुदाबंदाखान व नागोजी हटकर यांच्या चकमकीत नागोजी ठार.

७) छावणी जवळ तुर्कताजखान व मराठे यांच्या चकमकी.

८) मराठे मिरजेची वाट अडवितात. ख्वाजाखान त्यांच्यावर रवाना.

९) धनाजी जाधवाचा ब्रह्मपुरी जवळ तळ, जवळच राणोजी घोरपडेचा तळ.

१०) काही आणण्यासाठी मुहमंद अमीन खानाच्या बरोबर ३८०० तीन हजार आठशे स्वार व मतलबखाना बरोबर २२८५ दोन हजार दोनशे पंच्याऐंशी.

११) धनाजी कुडची जवळ रसदेवर हल्ला.

१२) अनाजी या मराठा सरदाराचा बालकोंडा (आंध्रप्रदेश निजामाबाद जिल्हा) प्रांतावर हल्ला. मोगल फौजदार पळून जातो.

१३) लष्करापासून दोन तीन कोसावर गस्त घालण्यासाठी सहुल्लाखानबरोबर ४०००, मुहमंद अमीनखानाबरोबर तीन हजार स्वार, व मतलबखान याजबरोबर दोन हजार स्वार रवाना, धनाजी जाधवाविरुद्ध नऊ हजार स्वार. हमीदुद्दीनखान याच्या नेतृत्वाखाली. (प्रत्यक्षात ८७७० स्वार तेवीस जानेवारी. मराठ्यांचा छावणीवर हल्ला. घनघोर युद्ध. पंचवीस जानेवारी शम्सुद्दीन (कंधारचा किल्लेदार ठार.)

एकोणतीस जानेवारी– युद्धांत कमगिरी बजाविल्याबद्दल हमीसुद्दीन खान आदींचा गौरव.

चिकोडीजवळ जुल्फिकारखान व धनाजी यांचे युद्ध.

फेब्रुवारी

चार फेब्रुवारी– धनाजी जाधव चिकोडीत. कृष्णाजी मल्हार हा पन्हाळगड भागांत मुहंमद अमीन खान. त्याजविरुद्ध बरोबर चार हजार सहाशे स्वार रवाना. व तोफखान्याचा सरंजाम.

रामचंद्र पंत अमात्य व दादोमल्हार हे पांच हजार सैन्य घेऊन कोंकणांत दंडराजपुरीच्या विरुद्ध.

बारा फेब्रुवारी–गाजिउद्दीन फीरोजजंग हा ब्रम्हपुरीच्या तळाजवळ (रक्षक म्हणून)

चौदा फेब्रुवारी– धनाजी जाधव कऱ्हाडजवळ मोगलांची वाट अडवितो. कृष्णा मल्हार व शाहनिंबाळकर यांचा खटावला वेढा. अमीनखान बरोबर ३३८४ स्वार व मतलबखानाबरोबर दोनहजार चारशे चौतीस २४३४ स्वार असे सैन्य देऊन त्या भागांत पाठविण्यात आले.

अठरा फेब्रुवारी– साताऱ्याच्या तोफा मिरजेत.

पंचवीस फेब्रुवारी– रामचंद्रपंत याचा पन्हाळगडांत रसद पोहोचविण्याचा प्रयत्न बरोबर दोन हजार पायदळ व बंदूकची. जुल्फिकारखानशी युद्ध. दुसऱ्या दिवशी मराठ्यांचा तरवियतखानाच्या मोर्च्यावर हल्ला.

धारुर (मराठवाडा) येथे मराठ्यांच्या वाढत्या हालचाली.

बादशहा बरोबर किती सैन्य असावे याची कल्पना पुढील नोंदीवरून यावी.

२८ फेब्रुवारी

एकंदर सैन्य अठरा हजार भरले. कूच करते वेळी (पन्हाळगडच्या दिशेने) शहाजादा कामबख्श उजव्या फळीला, बहरामंदखान डाव्या फळीला, रुहुल्लाखान आघाडीला, हमीदुद्दीनखान पिछाडीला, मुहंमद अमीनखान टेहेळणीवर.

मार्च १७०१

दोन मार्च– बादशहा मिरजेहून रवाना.

चार मार्च– मराठ्यांचे कर्नाटकांतील सहकारी, गुलबर्ग्याचे बेडर याच्या विरुद्ध गाजिउद्दीन फीरोजजंग रवाना. चीन कुलीजखान (भावी निजा-मुल्मुल्क) मिरजेत रसद घेऊन. पाच मार्च परसोजी भोसले वऱ्हाडांत अचलपूरपासून पांच कोसावर हल्ले.

चीन कुलीजखान हा बादशहाला भेटतो.

सात मार्च– बादशहा कोल्हापूर येथे शहाजादा बेदारबख्त औरंगजेबाला भेटतो. पिराजी घाटगे कागलकर बादशहाच्या भेटीस.

आठ मार्च– बादशहा पंचगंगेवर (प्रमाण) जुल्फिकारखानाची भेट.

नऊ मार्च– बादशहा पन्हाळगडच्या पायथ्याशी.

दहा मार्च– कान्होजी शिर्के बादशहाला भेटतो. गणोजी शिर्के (पाच हजारी) याच्या मन्सबीत वाढ.

बारा मार्च– छावणी पासून दीड कोसावर मराठ्यांची धामधूम.

चौदा मार्च– कट्टी आणण्यासाठी बहरामदखान व हमीदूद्दीन खान यांजबरोबर प्रत्येकी पाच हजार स्वार देण्यात आले.

पंधरा मार्च– धनाजी जाधवविरुद्ध मोहिमेवर जुल्फिकार खानाची मिरजेकडे रवानगी. त्याच्या जागी चीन कुलीज खान पन्हाळगडच्या मोर्च्यावर.

सोळा मार्च– वऱ्हाडचा सुभेदार अलीमदनिखान याचे आणि मराठे व गोंड राजे बख्तबलंद, व नवलसिंग यांच्याशी युद्ध.

एकोणीस मार्च– धनाजी जाधव सोलापूरकडे. जुल्फिकारखान त्याच्या पाठीवर

चोवीस मार्च– मोगलांच्या काफिल्यावर डफळावर (जत तालुका सांगली जिल्हा) जवळ सटवाजी डफळे यांचा हल्ला.

एप्रील पन्हाळगडचा वेढा चालू

दोन एप्रिल- नांदेड सुभ्यात मराठा सरदार नारोजी याची धामधूम. कल्याणीच्या फौजदाराचा भाऊ मराठ्यांच्या कैदेत.

सात एप्रिल- मराठे रतनगडचा किल्ला (नाशिक भागात) घेतात. किल्लेदार अतीकुद्दीन मराठ्यांच्या कैदेत.

अठरा एप्रिल- कऱ्हाडचा ठाणेदार यासीनखान आणि चांदराव (पाटणकर?) यांचे युद्ध.

वीस एप्रिल- राणोजी घोरपडे वीस हजार सैन्यासहित चिकोडी ऐनापूरकडून पन्हाळ्याच्या दिशेने शहाजादा बेदारबख्त सोळा हजार स्वारासहित त्याच्या विरुद्ध रवाना.

एकवीस एप्रिल- बुंदेल खंडात युद्धे

धनाजी जाधवाची हालचाल

धनाजी जाधव वऱ्हाडच्या दिशेने. जुल्फिकारखान त्याच्या मागोमाग. धनाजी पुरंदर भागात. लढाई धनाजी कोंडाण्याकडे.

एकोणतीस एप्रिल- पेडगाव प्रांतात मराठा सरदार नागोजी याचा धुमाकूळ दौंडचा ठाणेदार मानसिंग याजबरोबर लढाई.

तीस एप्रिल- सत्रसाल राठोड याचा मुलगा पृथ्वीसिंह हा पन्हाळगडच्या मोहरा बुरुजासमोर गोळा लागून ठार. मराठ्यांच्या पालीच्या ठाण्याला वेढा. चीन कुलीजखान अडीच हजार स्वारानिशी त्याच्या विरुद्ध रवाना.

राणोजी घोडपड्याविरुद्ध बेदारबख्ताची रवानगी. बरोबर बावीस हजार स्वार.

संगमनेर भागात धनाजीचा सरदार दादोमल्हार याचा धुमाकूळ. लढाई दादोमल्हार बर्वे ठार अशी बातमी (?)

मे १७०१

सात मे- बागलाणात मराठे व मोहनसिंग जमीनदार यांची धुमाकूळ.

अकरा मे- लक्ष्मेश्वरजवळ राणोजी घोरपडे व शहाजादा बेदार बख्त यांचे प्रखर युद्ध. बहिर्जीचा मुलगा मुरारजी (?) ठार.

सोळा मे– वाई प्रांतात मोगलांच्या रसदेवर शंकराजी नारायण सचिव याचा हल्ला. सियादतखान याचा भूदरगड भागात हल्ला.

तेवीस मे– पन्हाळगड मोगलांच्या ताब्यात.

तीस मे – पिराजी घाटगे कागलकर याला पन्हाळगडची देशमुखी.

जून १७०१

१ जून– बादशहा पन्हाळगडाहून रवाना. बेदारबख्ताला पन्हाळगडाच्या पायथ्याशी नेमले. त्याच्या बरोबर सतरा हजार स्वारांचे सैन्य दिले.

चार जून – बेदारबख्ताला रायबाग हुक्केरीकडे जाण्यास निरोप, त्याच्याबरोबरचे सैन्य १७२७५ (सतरा हजार दोनशे पंचाहत्तर) स्वार. प्रत्यक्षात यादी १७१४० ची भरली. बादशहानी आज्ञा केली की चौदा हजार स्वार देण्यात यावेत.

पांच जून – हणमंतराव (निंबाळकर ?) याचा खटाव भागात धुमाकूळ. फतेहुल्ला खान त्याच्या विरुद्ध रवाना.

आठ जून – मराठे छावणीत घुसून उंट व तोफखान्याचे बैल पळवितात. लोकांचे सामान लुटतात. शागीर्द पेशाचे सात हजार रुपये लूटतात.

नऊ जून – लष्करातील उंट व बैल चरण्यासाठी लष्करा बाहेर पाठवू नयेत अशी आज्ञा.

बारा जून – चरण्यासाठी छावणी बाहेर गेलेल्या उंट व बैल यावर मराठ्यांचा हल्ला, विरळा नदीच्या कांठी बादशहाचा मुक्काम.

तेरा जून – फतेहुल्लाखान वर्धनगडच्या खालच्या वाड्याला जाळतो. मराठ्यांशी चकमक.

चौदा जून – बादशहा विटे येथे. कामबख्शाच्या अंतः पुरांतील स्त्रियांचे सामान लादलेले वीस उंट मराठे पळवून नेतात. लष्करातील बुणग्याच्या माणसांना पुढे जाऊ देऊ नका अशी आज्ञा. भूम परगण्यात. (उस्मानाबाद जिल्हा, मराठवाडा)

पधरा जून– मराठ्यांच्या पुरंदर भागात छावण्या, जुल्फिकारखान ब्रम्हपुरीला, मराठ्यांच्या छावण्या काढून लावाव्यात अशी त्याला आज्ञा. मोगल रतनगडचा किल्ला पुन्हा जिंकून घेतात.

अठरा जून – बादशहा खटावजवळ, नांदगिरी किल्ल्याजवळ फतेहुल्लाखान, कृष्णराव खटावकर व पदाजी घाटगे हे मोगलांचे सरदार आणि मराठे यांच्या चकमकी.

वीस जून – मराठे वर्धनगड सोडून देतात. नांव सादिकगड ठेवलं. बहरामंदखान

व फतेहुल्लाखान यांना चंदनवंदन किल्ल्याविरूध्द रवाना. बहरामंदखाना बरोबर सहा हजार दोनशे स्वार.

चोवीस जून – मराठ्यांचा म्हसवड येथे कृष्णराव खटावकरांच्या रसदेवर हल्ला चीन कुलीजखान त्यांच्या विरुध्द रवाना.

पंचवीस जून – बादशहा वर्धनगडजवळ.

तीस जून – चरण्यासाठी छावणीतून गेलेल्या उंट व बैल यावर ताथवडे येथे मराठ्यांचा हल्ला. श्याऐंशी (८६) उंट पळविले. भूपाळगडापाशी शहाजी (निंबाळकर) व चीन कुलीजखान यांचे युध्द.

जुलै १७०१

एकवीस जुलै – फीरोजजंग ब्रम्हपुरीच्या तळावर काम करील, पंतप्रधान असदखान त्याला तळाचा ताबा देऊन बादशहाला येऊन मिळेल अशी आज्ञा. बुधपांचेगांवचा ठाणेदार पदाजी घाटगे याजकडे कोंडाणा ते पांचेगाव मार्गरक्षणाचे काम.

बावीस जुलै – शाहू निंबाळकर मोठ्या सैन्यासहित डफळापूर भागात, त्याच्याविरुध्द चीनकुलीजखान याची नेमणूक. महादेवाच्या डोंगराजवळ मराठ्यांचा रसदेवर हल्ला.

सत्तावीस जुलै – मराठे भानोळी भागात. सियादतखानाची त्यांच्या विरुध्द नेमणूक. बरोबर दोन हजार चारशे पन्नास स्वार (२४५०). शिवाय तोफखान्याचा सरंजाम. छावणीपासून ब्रह्मपुरीपर्यंतच्या मार्गाचे रक्षण मुहंमद अमीनखान याजकडे. बारामती ठाण्याच्या वाटेवर मान येथे मराठ्यांचा रसदेवर हल्ला. यासीनखानाचा मुलगा अब्दुलरऊफ याच्याशी युध्द.

अठ्ठावीस जुलै – गुजराथचा सुभेदार शुजाअतखान याचा मृत्यु. राजपुत्र आज्जम याची गुजरातच्या सुभेदारीवर नेमणूक. मामूदखानाच्या जागेवर विजापूर कर्नाटकचा फौजदार म्हणून चीन कुलीजखान (भावी निजमुल्मुल्का) याची नेमणूक.

एकोणतीस जुलै – मुख्य प्रधान असदखान हा ब्रह्मपुरीच्या तळावरुन येऊन बादशहाला भेटतो. तळावर फिरोजजंग.

एकतीस जुलै – चंदनवंदनचा वेढा. धनाजी जाधव, हणमंतराव वगैरे सरदार चंदनवंदन प्रांतात. बहरामंदखानाच्या मदतीस मतरुबखान. तोफखान्याचा सरंजाम व सैन्य घेऊन बरोबर दोन हजार दोनशे स्वार (२२००).

ऑगस्ट १७०१

तीन ऑगस्ट – जुल्फिकारखान चंदनवंदन प्रांतात, धनाजी जाधव कोंडाण्याकडे.

सहा ऑगस्ट –परंडयाजवळ खान फिरोजजंग आणि मराठे (छावणी घातलेले) यांचे युध्द. दादजी (?) हा मराठा सरदार मारला गेला.

सात ऑगस्ट –जुल्फिकारखान बहरामंदखान भेट चंदनवंदन जवळ. नंतर धनाजी जाधवच्या पाठलागावर जुल्फिकारखान पुरंदर भागाकडे रवाना.

चौदा ऑगस्ट – मराठे विजापूर शहराच्या आसापूर वेशीपर्यंत चालून येतात व लुटालूट करतात.

महाराणी ताराबाई बद्दल माहिती

राजाराम ह्याची बायको हिने धनाजी जाधव, दादो मल्हार, हणमंतराव वगैरे सरदारांना पत्रे पाठविली. तिने दीड हजार पायदळ त्वरीत सरदारांकडे पाठवून लिहीले की या पायदळ सैन्यापैकी पाचशे माणसे तुम्ही आपल्याकडे ठेवा व बाकीची माणसे कोंडाणा. राजगड वगैरे चार किल्ल्यांवर पाठवावी. राजारामाच्या बायकोने सरदाराना लिहिले की हजरत (औरंगजेब) हे पेशावर सर्वत्र ताबा मिळवून आहेत व मिळवीत आहेत. तुम्ही सर्वांनी एकदा खेळणा (विशाळगड) किल्ल्यावर यावे म्हणजे काही मसलत ठरविता येईल. काही मराठे सरदार या गोष्टीस अनुकूल तर काही प्रतिकूल आहेत. त्यांचे आपसात मतभेद आहेत.'

एकवीस ऑगस्ट – विजापूर कर्नाटकच्या फौजदारीवर निघण्यापूर्वी चीनकुलीजखान बादशहाचा निरोप घेतो.

पंचवीस ऑगस्ट – चंदनगड मोगलांच्या ताब्यात.

तीस ऑगस्ट – सटवाजी डफळे बादशहाला भेटतो.

१७०१ सप्टेंबर

एक सप्टेंबर – बंगालमधून आलेले सत्तावन्न हत्ती छावणीत दाखल. बहरामंद खानाच्या मदतीसाठी सहा हजार आठशे (६८००) स्वार व सुजानसिंग (बीकानेरचा) इत्यादी सरदार रवाना.

तीन सप्टेंबर – महिमान गडाकडे मराठ्यांच्या हालचाली.

अकरा सप्टेंबर– नजाबतखान (औरंगाबादचा सुभेदार याचा पुतण्या व जळगाव, खानदेशचा ठाणेदार नजीबखान हा उत्तरभारतातील खजिन्याबरोबरच छावणीत. मोती मदखान ही पदवी.)

बावीस सप्टेंबर– बादशहाने पुढील नेमणूका केल्या. फिरोजजंगाकडे ब्रम्हपुरीची व्यवस्था, मार्गाचे रक्षण, आणि विजापुरची, त्याचा मेव्हणा लुत्फुल्लाखान याला विजापूरच्या सुभेदारी वरुन औरंगाबादच्या सुभेदारीवर.

औरंगाबादचा सुभेदार नजाबतखान याची खानदेशावर बदली.

सत्तावीस सप्टेंबर – वंदनगडच्या कुमकेखाली धनाजी जाधवाचे आगमन. मदत पाठवा म्हणून बख्शी बहरामंदखान याची विनंती.

अठ्ठावीस सप्टेंबर – बहरामंदखानाच्या मदतीला मतलबखान. खानाबरोबर ३३४० तीन हजार तीनशे चाळीस स्वार.

ऑक्टोबर १७०१

१ ऑक्टोबर – शहाजादा बेदारबख्त सामानगड जिंकून घेतो.
विजापूर–कर्नाटकचा फौजदार याजकडे अधोनीची पण फौजदारी देण्यात आली.

दोन ऑक्टोबर – वंदनगडच्या किल्ल्याखाली चकमकी.

चार ऑक्टोबर – धनाजी जाधव वर्धनगडजवळ. बेदारबख्त हा भूदरगड किल्ल्यास वेढा घालतो. धनाजी जाधव याचा बहरामंदखानाच्या सैन्यावर हल्ला. एकीकडे बहरामंदखान, फत्तेहुल्लाखान, जुल्फिकारखान तर दुसरीकडे धनाजी जाधव यांचे हातघाईचे युध्द. ही लढाई वंदनगडजवळ झाली.

सात ऑक्टोबर – वंदनगड मोगलांच्या ताब्यात. गिरजोजी किल्लेदार किल्ला सोडून देतो. किल्ल्याचे नाव मफतूहगड, चंदनचे मिफताहगड, वंदनगडचा नवीन किल्लेदार सुरतसिंग गौड.

एकतीस ऑक्टोबर – धनाजी जाधव फलटण भागात, त्याचा पाठलाग करण्याची जुल्फिकारखानास आज्ञा.

नोव्हेंबर १७०१

दोन नोव्हेंबर – फलटणकर निंबाळकर बादशहाला भेटतात.

सहा नोव्हेंबर – वर्धनगडावरून बादशहा विशाळगडच्या दिशेने रवाना.

तेरा नोव्हेंबर – मराठा सरदार मकाजी याच्या भानोळी, भाळवणी (पंढरपूर प्रांत) भागात हालचाली.

सतरा नोव्हेंबर – मराठी सैन्याची खानदेशात धामधूम. महाराणी ताराबाई सिंहगडावर.

चौदा नोव्हेंबर – राजारामाची बायको या महिन्याच्या चोवीस तारखेस (२४ नोव्हेंबर) खेळण्यावरुन (विशाळगड) उतरुन कोंडाण्याच्या (सिंहगड) दिशेने गेली.

तेवीस नोव्हेंबरची बातमी

विशाळगड खाली मराठे व बेदारबख्त यांची जबरदस्त चकमक. खानेआलम पायउतार. मतलबखानावर इतराजी.

पंचवीस नोव्हेंबर– संताजीचा मुलगा राणोजी घोरपडे आंब्याचे ठाणे उध्वस्त करतो आणि मिरजेकडे जातो.

सत्तावीस नोव्हेंबर – बादशहा मलकापूरजवळ, शहाजादा बेदारबख्त बादशहाला भेटतो.

मराठे खानदेशात – मराठेबऱ्हाणपूरच्या अलीकडे बारा कोसावर. एदलाबाद वगैरे पेठा रामचंद्रपंताचा निकटचा आप्त अंताजी (आपदेव) हा इस्माईलखान मका याच्या हाती कैद. त्याची छावणीत रवानगी.

डिसेंबर १७०१

दोन डिसेंबर – बऱ्हाणपूरची बातमी

"मराठ्यांचे सैन्य येथे आले. त्यांनी बऱ्हाणपूरला चहूकडून वेढले आहे. शहरातील एकही मनुष्य बाहेर पडू शकत नाही."

चार डिसेंबर–सवाई जयसिंग बादशहास भेटतो.

सहा डिसेंबर – राणोजी घोरपडे याचा हल्ला. मलकापूर येथे मोगल सैन्याच्या पिछाडीवर राणोजी घोरपडे याचा जबरदस्त हल्ला.

सात डिसेंबर– बादशहाच्या छावणीपासून अर्ध्या कोसावर मोगल व मराठे यांच्या चकमकी.

नऊ डिसेंबर – फिरोजजंगाची आई खिजरुनिसा हिचा ब्रम्हपुरी येथे मृत्यू.

दहा डिसेंबर – अकरा डिसेंबर – विशाळगडच्या बाहेर मोगल आणि मराठे यांच्या चकमकी.

धनाजी जाधव व रामचंद्रपंत पंधरा हजार स्वारांसहीत दंडराजपुरी प्रांतात. शिद्दी याकूब बरोबर युध्द.

विशाळगड जिंकण्याची कामगिरी कामबख्शाकडे. बरोबर बारा हजार स्वार. जुल्फिकारखानाला बोलावणे धाडले.

बारा डिसेंबर– खानदेशचा सुभेदार नजाबतखान याचा मृत्यू. मोर्च्यासाठी तरबियतखानाबरोबर तीन हजार स्वार व मुहंमद अमीनखान याजबरोबर तीन हजार स्वार.

पंधराडिसेंबर– पारनेर (अहमदनगर जिल्हा) भागात केरोजी पवार आणि त्याचे चार हजार स्वार धनाजी जाधवला मिळण्याच्या विचारात.

१६ डिसेंबर– खानदेशच्या सुभेदारीवर आणि बागलाणच्या फौजदारीवर नजाबतखानाचा मुलगा बहरोजखान याची नेमणूक.

अठरा डिसेंबर – अंताजी आपदेव याचा वध.

एकोणीस डिसेंबर – विशाळगडच्या बाहेर असदखान. फतेहुल्लाखान व मराठे यांच्या चकमकी

राणोजी घोरपडे

२३ डिसेंबर– बातमी, राणोजी हा कऱ्हाड भागात धामधूम करीत आहे. धान्याची रसद त्याने घेतली आहे. मुहंमद अमीनखान याची त्याच्या विरुध्द रवानगी.

२४ डिसेंबरची १७०१ बातमी

राणोजी घोरपडे हा औरंगजेबाच्या छावणीपासून चार कोसावर मलकापूरच्या दिशेने चालून आला. मलकापूरचा ठाणेदार जमशीदखान विजापुरी याच्या वर हल्ला. प्रखर युध्द. जमशीदखानाच्या कुमकेला सवाई जयसिंग, अवधूतसिंग (उदितसिंग) मुहंमद अमीनखान.

सव्वीस डिसेंबरची बातमी

काल रात्रीची बातमी–राणोजी घोरपडे याने बादशाहीच्या छावणीपासून एक कोसावर वंजाऱ्याचे बैल लुटून नेले.

सत्तावीस डिसेंबरची बातमी

विशाळगडच्या अलीकडे एका टेकडीच्या ताब्यासाठी प्रखर चकमक

एकोणतीस डिसेंबरची बातमी

मुहंमद अमीनखान व राणोजी घोरपडे यांचे कासेगांव जवळ युध्द (कासे गांव पंढरपुरापासून चार मैलावर)

एकतीस डिसेंबर १७०१ ची बातमी

कऱ्हाडचा ठाणेदार यासीनखान याजकडून ' राणोजी याने दहा हजार सैन्या सहित चाल करून येऊन बादशहापूर जाळून फस्त केले. यानंतर त्याने दोन किल्ल्यांमधील गढीला वेढा घातला. तेथील किल्लेदार (साताऱ्याचा) समसाल हा तोफांचा मारा करीत आहे.'

मुहंमद अमीनखानाची रवानगी. १७०१ च्या शेवटच्या दोन चार महिन्यात राणोजी घोरपड्याच्या पराक्रमाने मोगल हादरुन गेले.

१७०२

एक जानेवारीची बातमी –साताऱ्याचा फौजदार यासीनखान व राणोजी यांचे साताऱ्याजवळ युध्द, राणोजी वाईकडे.
दोन जानेवारी – विशाळगड किल्ल्यातून गोळ्यांचा वर्षाव.

पाच जानेवारीची बातमी

मराठ्यांचे सैन्य तेरदळच्या भागात, मोगलांचा मन्सबदार एकोजी (अख रोजी मुधोळकर) घोरपडे यांचे मराठ्यांबरोबर युद्ध.

सात जानेवारीची बातमी

राणोजी विरुद्ध मुहंमद अमीनखान याची रवानगी, त्याच्या बरोबर पांच हजार एकशे चौऱ्याण्णव स्वार देण्यात आले.

फीरोजजंगाचा भाऊ हामिदखान याची आणि मराठे यांच्या भूम व चौसाळा (उस्मानाबाद व बीड हे जिल्हे मराठवाडा) येथे लढाया.

वीस जानेवारीची बातमी

विशाळगडजवळ माचाळ येथे मराठे व मुहंमद अमीनखान यांचे, युध्द मतलब खान त्याच्या कुमकेला.

२६ जानेवारीची बातमी

राणोजी घोरपडे पराडा(बार्शीजवळ)भागात. फीरोजजंगाचा सरदार नाहर-खान याच्याशी युध्द.

२९ जानेवारीची बातमी

विशाळगडच्या कोंकणी दरवाज्याजवळ मराठे व अमीनखान यांचे युध्द· फत्तेहुल्लाखानाच्या मोर्चात किल्ल्यावरुन तोफांचा मारा. अनेक जण जखमी

३१ जानेवारीची बातमी

शेरदखान (व्याघ्रमुख) तोफ कोल्हापूराहून पन्हाळगडच्या मोर्च्यांत.
यमाजी निंबाळकर ब्रह्मपुरी भागात. हमिदखानाबरोबर युध्द.
विजापूर प्रांतात मराठ्यांच्या हालचाली.

फेब्रुवारी १७०२

अेक फेब्रुवारी – विशाळगडच्या मुख्य दरवाजा समोरील खंदकावर निकराच्या चकमकी.

चौदा फेब्रुवारी–कोंकणी दरवाज्याजवळ सवाई जयसिंग व मराठे यांची लढाई.

पंधरा फेब्रुवारी– मोगल सेनापती फतेहुल्लाखान जबर जखमी. राणोजी घोरपडे विजापूर प्रांतात. मुजाहिदखानाबरोबर युध्दे. विशाळगड किल्ल्यासमोर मराठ्यांचा ख्वाजाखानाच्या मोर्च्यावर हल्ला. निकराची लढाई. संगमनेर प्रांतात नेमाजी शिंदे. संगमनेरचा ठाणेदार मुबारिजखान याच्या बरोबर युध्द. राणोजी घोरपडे, धारुर (मराठवाडा) प्रांतात. रुहूल्लापूर लुटून फस्त. फौजदार औरंगखान याची मनसब कमी करावी अशी आज्ञा.

मार्च १७०२

एक मार्च– उत्तर भारताचा खजिना दक्षिणच्या वाटेवर.

दोन मार्च– कोकणी दरवाज्यासमोर कोतरी गांवावर (शिपोशीजवळ लांजे तालुका, रत्नागिरी जिल्हा) मोगलांचा हल्ला. निकराचे युद्ध. महंमद अमीन खान, ख्वाजाखान, राव मानसिंग जाधव वगैरेंची कामगिरी.

पाच मार्च– पगारवाटपासाठी छावणीतील सावकारांकडून पाच लाख रुपये कर्ज उकळण्याची बादशहाची इच्छा. सावकारांची छावणी सोडून जाण्याची धमकी. खजिना येण्याची वाट पाहाण्याचा निर्णय.

सात मार्च– अकोला (जि. अहमदनगर) येथे मराठे व मातबरखान यांची लढाई.

आठ मार्च– शहाजादा बेदारबख्त याची विशाळगडच्या कोंकणी दरवाज्याच्या दिशेने रवानगी.

चौदा मार्च– महंमद अमीनखान बहादूर याचा भाऊ नजाबतखान व मराठे यांच्यात घाटाखाली कोकणात युध्द. महंमद अमीनखान याजबरोबर देण्यासाठी सहा हजार स्वारांची यादी तयार.

अठरा मार्च– जंजिऱ्याचा सिद्दी याकूब खानाचे चार हजारांचे सैन्य विशाळगडच्या वेढ्यात.

२१ मार्च १७०२ ची बातमी

राणोजी घोरपडे याचा मृत्यू

संताजीचा मुलगा राणोजी घोरपडे याने वाकिणखेडा तालुक्यातील (बेडरांचा प्रदेश, भीमा काठ, सुरपूर तालुका, गुलबर्गा जिल्हा, कर्नाटक), चंदनगडीला

वेढा घातला होता. तो स्वार होऊन निघाला. बेडरांशी त्याचे युद्ध झाले. त्यात त्याला बंदुकीची गोळी लागली. तो मरण पावला. (राणोजीच्या मृत्यूने मराठ्यांची जबर हानी झाली. त्याने आपल्या बापाचे, संताजीचे नाव राखले)

२२ मार्च– शेरदहान तोफ बेदारबख्तच्या (कोंकणी दरवाज्याच्या, मोर्च्यात.)
फतेहुल्ला- खानाच्या मोर्च्याची पाहणी.

खानदेशात मराठे– हसन अलिखान कैद

मराठ्यांचे बारा हजार स्वारांचे सैन्य (सरदार नेमाजी शिंदे) सुल्तानपूर नंदुरबार भागात मोगलांबरोबर युध्द. मोगल अधिकारी हसनअलीखान जखमी व कैद. मोगलांचा सरंजाम गारद.

संगमनेर भागात युध्द

मराठ्यांचे तीन हजार सैन्य. अमानतखाना बरोबर युध्द. मराठा सरदार माणकोजी ठार.

२३ मार्चची बातमी

विशाळगड बावीस मार्च रोजी मराठ्यांचा फतेहुल्लाखानच्या मोर्च्यावर हल्ला

मे १७०२

एक मे – परशुरामपंतांचा मुतालीक, यमाजी याची बेदारबख्ताबरोबर बोलणी.

सात मे– बेदारबख्ताचे पत्र ' परशुरामपंत हा सगळ्या उपद्रवाचे मुळ आहे. गड्डा आहे (मायायेफसाद) मी खेळण्यावर (विशाळगड) हल्ला करतो.
मराठे जोधन (जुंन्नरजवळ)चा किल्ला घेतात, किल्लेदार कैद.

नऊ मे– बेदारबख्ताचा विशाळगडच्या रेवणीवर (प्रवेशद्वाराचे संरक्षण करणारा तट व बुरुज) हल्ला, निकराचे युध्द. मोगल सरदार खानेआलम, मुनव्वरखान, सर्फराजखान, राजा जयसिंग व जमशीदखान, रेवणीच्या बुरुजावर मोगलांचा ताबा.

बारा मे– धनाजी जाधव व दादो मल्हार हे सुपे लुटून कोंडाण्याकडे जातात.

चौदा मे– शहाजादा बेदारबख्त हा मोर्च्यातून येऊन बादशहाला भेटतो.

सोळा मे– जखमेतून बरा होऊन फतेहुल्लाखान (घाटावरील मोर्च्याचा सेनापती) बादशहाला भेटतो.

सतरा मे– उत्तर भारताचा खजिना ब्रह्मपुरीत. उत्तर भारतातून हत्ती. पण ब्रह्मपुरीत

अेकवीस मे– धनाजी जाधव कोंडाण्याकडे, जुल्फिकारखान शिरवळला.

खान देशात मराठे

मराठ्यांचे दहा हजाराचे सैन्य केशव (केसोत्रिमल ?) याच्या नेतृत्वाखाली सुलतानपूर नंदुरबार भागात.

२३ मे–बादशहाचा कौल व अभयपत्र परशुरामपंताकडे (यमाजीच्या द्वारे)

२९ मे ची बातमी

धनाजी जाधव व रामचंद्र (अमात्य) हे रंभाजी निंबाळकराला बरोबर घेऊन तरबेज सैन्य बरोबर. संभाजी निंबाळकर व दादोमल्हार हे पुरंदर भागात, दादोमल्हाराच्या पाठलागावर जुल्फिकारखान जेजुरी येथे. धनाजी जाधव प्रताप गडावर महाराणी ताराबाईपाशी.

३० मे ची बातमी –परशुरामपंत अभय पत्राचा स्वीकार करतो.

माहुली भागात मराठे

मराठा सरदार खंडेराव याच्या बरोबर मोगलांचे युध्द. मोगलांची कुमकेची मागणी

औसा उस्मानाबाद जिल्हा

मराठा सरदार कृष्णा मल्हार रसद लुटतो. बरोबर पाच हजार सैन्य.

जून १७०२

तीन जून –विशालगड मोगलांच्या ताब्यात, झेंडा चढविला.

सहा जूनची बातमी

किल्ला बेदारबख्ताच्या पूर्ण ताब्यात. परतीच्या वेळचे मोगल सैन्य चाळीस हजार स्वार.

आठ जून– बादशहा विशाळगडचा किल्ला पहातो. किल्ल्याचे नाव सकरअलना ठेवले.

दहा जून– बादशहाचा परतीचा प्रवास. सव्वातीन कोसाची मजल, अंबाघाटच्या अलीकडे मुक्काम.

बारा जून– बेदारबख्तास मिरजेकडे जाण्यास निरोप

१६ जून– अंबाघाटाहून पुढे कूच दीड कोसाची मजल.

१८ जून – पाऊस. ओझी वहाणारे बैल नाहीत, सरंजाम ठिकठिकाणी अडकलेला, मोंगलाचे विलक्षण हाल.

२० जून – मलकापूरच्या अलीकडे मुक्काम. पावसाचा सतत वर्षाव, ओढयांना पूर.

२१ जूनची बातमी

राजारामाची बायको हिने धनाजी जाधवला पुढीलप्रमाणे पत्र लिहिले– 'जासुदांना त्यांचा पगार बाकीचे दोनशे होन द्यावे व आमच्याकडे एक लाख रुपये पाठवावे' धनाजी जाधवने उत्तरात लिहिले की 'रामचंद्रपंत येताच रक्कम पाठवून देईन.'

बावीस जून– औरंगजेबाची तक्रार. माझ्या शयन गृहाच्या तणावा मजबूत बांधल्या नाहीत. आमच्या अंगावर पाऊस पडतो. (बाराने रहमत बर नाबदौलत मी उफताद)

चोवीस जून– विशाळगडचा किल्लेदार जाबतारखान. किल्ल्याबाहेर पडलेला सरंजाम त्याच्या हवाली करण्याची आज्ञा.

पंचवीस जून – ओढयाच्या काठी मुक्काम. पावसामुळे कामकाज बंद. ओढयाला विलक्षण पूर. औरंगजेब ओढयाच्या काठावर अडकला.

२८ जूनची बातमी

'लष्करात महागाई अतिशय आहे. धान्य मिळत नाही. धान्याचा भाव रुपयाला दीड शेर व सरपणाचा भाव रुपायाला चार शेर आहे. हे सुध्दा खटपट करूनही मिळत नाही. लष्करातील घोडे व गुरेढोरे मरत आहेत.

२९ जूनची बातमी

'काल रात्री फकीर लोकांनी बादशहाच्या निवासस्थानाजवळ खैरात द्या, खैरात द्या म्हणून ओरड केली. बादशहा म्हणाले, 'हा कामयाबखान असली कसली गस्त घालीत आहे. त्याची मनसब पन्नास स्वारांनी कमी करण्यात आली.'

अेका अधिकाऱ्याचे गाऱ्हाणे

'माझी उपासमार चालली आहे. माझ्या घरातील एक माणूस मरून पडले आहे. माझ्यापाशी पैसाअडका नाही. सरकारकडून मला पाच महिन्याचा पगार येणें आहे. मला कांही रक्कम मिळावी म्हणजे मी मृतमाणसासाठी एक कफन घेईन. बादशहांनी त्याला दहा–बारा होन दिले.

जुलै १७०२

चार जुलै– औरंगजेबाला अपघात.

बादशहा हत्तीवरून ओढा ओलांडतो. ' बादशहा हत्तीवरून उतरून मेण्यात स्वार झाला. त्याचवेळी हत्तीवरील सामान मेण्यावर येऊन आदळले. मेणा मोडला पण बादशहा सुखरुप राहिला. (खैर गुजस्त सुखरुप निभावले)

सहा जुलै – दुसऱ्या ओढयाच्या काठी मुक्काम, पावसाचा सतत वर्षाव.

आठ जुलै – पावसाचे पाणी बादशहाच्या तंबूत पडत असल्याची तक्रार. तंबू कसू लागले की चिध्या होतात तरबियतखान व फतेहुल्लाखान यांचा निरोप ' पावसामुळे आमचे व स्वारांचे सर्व घोडे जाया झाले आहेत. महागाई भयंकर आहे.'

९ जुलैची बातमी

' हत्ती ओढा ओलांडीत असता तीन हजार एक अश्रपया अंबारीतून खाली पाण्यात पडल्या.'

दहा जुलै– मोगल अधिकारी सियादत खान याचे घर चोरानी (मराठ्यांना चोर म्हणावे ही बादशहाची आज्ञा) लुटून धुवून नेले.

अकरा जुलै– बादशहा दुसऱ्या ओढयाच्या काठावरील मुक्कामावरून हलतो. सव्वादोन कोसाचा प्रवास. अजमेरचा सुभेदार सय्यद अब्दुल्ला (सय्यद बंधूचा बाप) याचा मृत्यू. मुलगा हसन अलीखान त्याच्या जागी.

तेरा जुलै– बादशहाचा मुक्काम पन्हाळगडच्या अलीकडे चार कोसावर, राव मानसिंग जाधव (शिदखेडकर) अंबाघाटच्या ठाणेदारीवर.

पंधरा जुलै– बंगालचे हत्ती बादशाही छावणीत.

सोळा जुलै– पाण्यातून अश्रपया काढून लपवून ठेवल्याबद्दल फकीराना अटक.

दावतमल झाला पन्हाळगडचा फौजदार–इखलासखान कोल्हापूरचा ठाणेदार

अठरा जुलै– भीमा नदीला मोठा पूर. बादशाही बाजाराचा व्यवस्थापक इमामुद्दीन याच्याबद्दल ' घाटाच्या (अंबाघाट) अलिकडे चोरांनी (मराठ्यांनी) त्याच्यावर हल्ला केला. आणि सरंजाम लुटला. इमामुद्दीनची बहीण ही पायी चालत लष्करात आली आहे.

कहुल्लाखानाचा निरोप ' माझ्या फौजेत ज्याना म्हणून तैनात केले त्या पैकी कोणीहि हजर नाही. त्याला डोके फोडून घ्यावेसे वाटले (जान दादनबसर)

एकोणीस जुलै– पन्हाळगडच्या अलीकडे दीड कोसावर मुक्काम. तरबियतखानाचा निरोप ' मी लष्कराच्या पिछाडीला आहे. लष्करचे सैनिक व लष्करचा सगळा सरंजाम, वाहने व वाहतूकीची साधने नसल्यामुळे मागे पडून आहेत. चोरांनी (मराठ्यांनी) उच्छाद मांडला आहे. (फसाद

बरखाकडे) आणि बादशहा तर मजल दर मजल करीत पुढे चालले आहेत 'काय आज्ञा' बादशहाची आज्ञा 'आम्ही येथे तीन दिवस मुक्काम करणार आहोत.'

वीस जुलै– भीमेच्या पलिकडे छावणी घालण्याचा मराठ्यांचा बेत. त्यांच्या, विरुध्द फीरोजजंग याचा भाऊ मुजाहिदखान याची रवानगी.

गंगापूर (औरंगाबाद जिल्हा) प्रांतात मराठा सरदार लोणजी (?) याच्या हालचाली. फौजदार अमानतखान याजबरोबर चकमकी

३० जुलै– बादशहा वडगांव (हातकणंगले तालुका, कोल्हापूर जिल्हा) पोहोचले. विशाळगडच्या परिसरात मोगल आणि मराठे यांच्या चकमकी. विशाळगडचा किल्लेदार जाबताखान याचा वृत्तांत.

ऑगस्ट १७०२

सहा ऑगस्ट– अंबाघाटात पडून राहिलेला सरंजाम आणवून घेण्यासाठी हत्ती रवाना. पिछाडीचा सरदार तरबियतखान याला हुजुरात बोलावणे.

सात ऑगस्ट– भूषणगड (सातारा जिल्हा) व धाराशिव (उस्मानाबाद, मराठवाडा) येथे मराठ्यांच्या छावण्या. मोगल पथकांची त्यांच्याविरुध्द रवानगी.

नऊ ऑगस्ट– अंबाघाटात पडून राहिलेला सरंजाम आणण्यासाठी मुहंमद कासम व राव मानसिंग जाधव रवाना.

दहा ऑगस्ट– काबुलचे घोडे बादशहाच्या छावणीत.

सप्टेंबर १७०२

सतरा सप्टेंबरची बातमी

'हणमंतराव व इतर मराठे सरदार बारामती व शिरवळ भागात. मुहंमद अमीनखान बहादुर हा खटाव येथून त्यांच्यावर चालून गेला. निकराची लढाई झाली.'

गाजिउद्दीन फीरोजजंग, विजापूरचा सुभेदार याच्याकडे विजापूर कर्नाटकची फौजदारी पण देण्यात आली.

एकोणीस सप्टेंबर– बादशहा कृष्णा ओलांडतो.

विजापूर कर्नाटकच्या ऐवजी वऱ्हाडची सुभेदारी (अलीमर्दानखानाऐवजी) फीराजजंगाकडे देण्यात आली.

एकवीस सप्टेंबर– मराठ्यांचे दहा हजार सैन्य भालकी जवळ (उदगीर प्रांतात) छावणी घालून आहे.

तेवीस सप्टेंबर– छावणीतील तोफखान्याचे बैल व काही बंजारी यांना मराठयांनी पळवून नेले.

पंचवीस सप्टेंबर– बादशहाद्वारे मिरजेवरून पुढील नेमणूका करण्यात आल्या.

१) औरंगाबादचा सुभेदार लुत्फुल्लाखान नांदेड बिदरच्या सुभेदारीवर

२) नांदेड बिदरचा सुभेदार खुदाबंदाखान विजापूर कर्नाटकच्या फौजदारीवर

३) विजापूर कर्नाटकचा फौजदार चीन कुलीजखान, विजापूरच्या सुभेदारीवर पुढे त्याला अधोनीची फौजदारी पण देण्यात आली.

तीस सप्टेंबर– शहाजादा बेदारबख्त याच्याकडे औरंगाबादची सुभेदारी देण्यात आली. खान फीरोजजंग याजकडे वऱ्हाडच्या सुभेदारी बरोबरच ब्रम्हपुरीच्या तळाचे व मार्गरक्षणाचे काम देण्यात आले.

एकवीस सप्टेंबर– रोजी नांदेड बिदरचा नियुक्त सुभेदार लुत्फुल्लाखान याचा मृत्यू.

ऑक्टोबर १७०२

तीन ऑक्टोबर– खान फीरोजजंग याजकडे वऱ्हाडच्या जोडीने नांदेडचा सुभा

पाच ऑक्टोबर–मराठयांचा मोंगल छावणीत प्रवेश. चकमकी. बादशहाचा प्रवास चालू.

तेरा ऑक्टोबर– हरकाऱ्यांची बातमी – जुल्फिकारखान हा कोंडाण्याखालच्या वाडया जाळतो

अठरा ऑक्टोबर– वऱ्हाडवर फीरोजजंगाचा नायब खरअंदाजखान

चोवीस ऑक्टोबर– बादशहा अकलूजजवळ.

अठ्ठावीस ऑक्टोबर– बादशहा नीरा ओलांडतो.

एकोणतीस ऑक्टोबर–परंडयाजवळ मराठा सरदार राघो याची मोगलांशी लढाई.

एकतीस ऑक्टोबर– मराठे छावणीपासून बारा कोसावर. छावणीच्या पिछाडीवर हल्ला करण्याचा बेत. मोगलांशी चकमकी.

नोव्हेंबर १७०२

एक नोव्हेंबर– आपल्या (इस्लाम) धर्मांचे महत्व वाढावे ही बादशहाची इच्छा. मुख्य काजीचा सल्ला 'हिंदूनी मुसलमान नोकर बाळगू नयेत.' त्याप्रमाणे आज्ञापत्रे पाठविण्यात आली.

दोन नोव्हेंबर– धनाजी जाधव व इतर सरदार पेडगांव भागात.

तीन नोव्हेंबर– जुल्फिकारखानाचे पत्र. कोंडाणा किल्ला ताब्यात घ्यावा अशी आज्ञा झाली. पण धनाजी जाधव रामचंद्र (पंतअमात्य) इत्यादि सरदार हे प्रचंड सैन्य घेऊन तयारी निशी उभे आहेत. किल्लाही मजबूत आहे. मी आशा करतो की पाच हजार बंदूकांची, बेलदार, तबरदार (कुऱ्हाडी-वाले) यांना माझ्या पाशी तैनात करण्यात येईल. तरबियतखान व फत्तेहुल्लाखान यांना माझ्यापाशी तैनात करण्यात यावे. खर्चासाठी एक लाख रुपये देण्यात यावे.'

बादशहाचे उत्तर 'किल्ला असा आहे.' तसा आहे, अवघड आहे अशी कल्पना आहे. तो तसाच राहाणार आहे. तुम्ही मात्र तयारीत असावे. पेडगांवला पोहोचल्यावर तुम्हाला कोंडाण्याकडे जाण्यासाठी निरोप देण्यात येईल.'

शहाजादा बेदारबख्त औरंगाबादच्या वाटेवर. पंढरपूर जवळ भीमा ओलांडतो. विशाळगड वरील तोफा मागविण्याची आज्ञा.

पाच नोव्हेंबर – बक्षी उत्सुक बहरामंदखान (बख्शी) याचा मृत्यु. मीरबख्शी म्हणून जुल्फिकारखान याची नेमणूक.

सात नोव्हेंबर – बादशहा भीमा ओलांडतो.

तेरा नोव्हेंबर – बादशहा पेडगांव येथे.

सतरा नोव्हेंबर – नळदुर्ग प्रदेशात मोगल आणि मराठे यांच्या चकमकी. फतेहुल्लाखान याची विशाळगडकडे रवानगी. बरोबर दोन हजार सातशे बत्तीस स्वार.

सूर्याजी पिसाळ मुसलमान होतो. औरंगाबाद ते मोगल छावणी या मार्गाचे रक्षण करण्यास मुगलखान व राव मानसिंग जाधव बरोबर पांच हजार स्वार.

वीस नोव्हेंबर – रामचंद्र (पंत अमात्य) कोंडाण्यावर, धनाजी जाधव पेडगांव भागात.

पंचवीस नोव्हेंबर – छावणीजवळ मोगल व मराठे यांच्या चकमकी. छावणीतील हत्ती पळवून नेण्याचा मराठ्यांचा प्रयत्न.

मुहंमद अमीनखानाबरोबर पाच हजार स्वारांचे पथक.

अठ्ठाविस नोहेंबर– महमद अमीनखान बहादूर याच्या सैन्यावर मराठ्यांचा निकराचा हल्ला अब्दुस्समदखान जखमी, ख्वाजाखान जखमी व कैद, महमद अमीनखान कसाबसा सुटून आला. मोगल सरंजाम गारद. हिंदुराव घोरपडे तळकोकणात. फोंड्याचा किल्ला मराठ्यांच्या हाती. फौजदार हसन कुलीखान कैद.

डिसेंबर १७०२

दोन डिसेंबर – बादशहा पेडगावहून निघतो.

चार डिसेंबर– मराठे छावणी भोवती घिरट्या घालतात. त्यांच्या पारिपत्यासाठी सरफराजखानाबरोबर चार हजार तीनशे बहात्तर स्वार.

पाच डिसेंबर– बहिर्जी हिंदूराव घोरपडे पाच हजार सैन्यासहित हुक्केरीला वेढा घालतो.

आठ डिसेंबर– बादशहा घोडनदी ओलांडतो. हरकऱ्यांची बातमी जुल्फिकार खान हा काल बारामतीला पोहोचला. मराठ्यांच्या पाठलागावर राजगडकडे जाण्याचा विचार.

बारा डिसेंबरची बातमी

'जुल्फिकारखान हा काल बहादुरगडला आला. आपली बहीण (बख्शी बहरामंदखान याची विधवा) हिची भेट. नंतर सुज्याकडे रवाना.

चौदा डिसेंबर– मराठ्यांचे वीस हजाराचे सैन्य पुणे (सुपे) भागात.

एकोणीस डिसेंबर– मराठ्यांचे सैन्य खटाव प्रांतात. फतेहुल्लाखान याजबरोबर युध्द.

खानदेशाची बातमी ' मराठ्यांचे पंधरा हजार स्वारांचे सैन्य खानदेश बागलाणाकडे सुभेदार नजाबतखान याजबरोबर चकमकी.

एकवीस डिसेंबर – मोगलांचा मौजे शिवगावावर हल्ला. निमगाव (शिरुर तालुका पुणे जिल्हा) पासून सात कोस. मराठ्यांचे अधिकारी बाळाजी(बाळाजी विश्वनाथ तर नव्हे. तसे असले तर दोन वर्षाच्या बाजीरावाला औरंगजेबाची अल्पकाळ कैद भोगावी लागली असेल काय ?) व नरसोजी यांचे कबिले धरले.

बावीस डिसेंबर – बादशहा लोहगावांत (पुण्याजवळ) मराठ्यांचे शिवगावातील गुरेढोरे, कबिले परत करण्याची आज्ञा

मराठे मौजे बिलनगांव जवळ मोगलांची रसद (गोण्यांनी लादलेले एक हजार बैल) पूर्णपणे लुटतात.

खटाव जवळ चंद्रसेन जाधव आणि बहिर्जी हिंदूराव घोरपडे फतेहुल्लाखानाची वाट अडवितात

चोवीस डिसेंबर – जुल्फिकारखान सिंहगडच्या पायथ्याची खडी उध्वस्त करतो आणि पन्हाळगडकडे रवाना होतो.

सव्वीस डिसेंबर – बादशहाचा मुक्काम पुण्याला.

सत्तावीस डिसेंबर– विशाळगडचा किल्लेदार जाबताखान याचा वृत्तांत.

'मराठ्यांचे एकोणीस हजार स्वारांचे सैन्य या भागात पसरले आहे. किल्ल्यात सरंजाम नाही.'

अठ्ठावीस डिसेंबरची बातमी– 'कालरात्री हमीदुद्दीन व तरबियतखान यांच्या मराठ्यांशी सिंहगडच्या परिसरात चकमकी.

'काल बादशहांचा नातू व कामबख्शाचा मुलगा सुलतान मुहियुस्सुन्नत हा वारला. पुण्यात शेखजलाल याच्या दर्ग्यापाशी त्याचे दफन करण्यात आले. बादशहाचा मुक्काम वडगाव जवळ.

एकतीस डिसेंबर– कोंडाण्याच्या पायथ्याशी मुक्काम. मोर्चे बंदी सुरु.

१७०२ च्या अखेरीस औरंगजेब सिंहगडच्या पायथ्याशी येऊन पोहोचला. औरंगाबादेस नातू बेदारबख्त, वऱ्हाड व नांदेड या सुभ्यावर गजिउद्दीन फीरोजजंग (भावी निजामुल्मुल्काचा बाप) गोवळकोंड्यावर रुस्तुमदिलखान (नामधारी सुभेदार राजपुत्र खानदेश) आणि विजापूर सुभ्यावर चीन कुलीजखान (निजामुल्मुल्क), खानदेशावर नजाबतखान (तैमूरलंगाचा रास्त वंशज) असे सुभेदार आहेत. विजापूर कर्नाटकचा फौजदार शायिस्तखानाचा मुलगा खुदाबंदाखान आहे. तर हैद्राबाद कर्नाटकवर जुल्फिकारखानाचा नायब फौजदार म्हणून जुल्फिकारखानातर्फे दाऊतखान पन्नी हा आहे.

औरंगजेबाजवळ मुख्य प्रधान असदखान, मावस बहिणीचा नातू रुहुल्लाखान अधिकारी हमीदुद्दीनखान (याने पुढे औरंगजेबाच्या आठवणी लिहून काढल्या.) इत्यादी मंडळी आहेत. बख्शी बहरामंदखानाच्या मृत्यूनंतर त्या जागेवर (मीरबख्शी) जुल्फिकारखानाची नेमणूक झाली. पण तो सतत मराठ्यांच्या पाठलागावर आहे.

औरंगजेबाच्या छावणीत त्याच्या नेतृत्वाखाली लढणारे अनेक अधिकारी या दोन वर्षांच्या काळात आढळतात. ही माणसे सांगितलेल्या मोहीमांवर जात, घासदाणा, लाकूड फाटा, रसद आणीत, मार्गाने रक्षण करीत, खजिने सुरक्षितपणे आणीत आणि मोर्च्यात भाग घेत. काही नावे पुढे दिली आहेत–

१) निजामुल्मुल्काचा चुलत चुलता मुहंमद अमीनखान आणि त्याचा भाऊ. मुहंमद अमीनखान हा पुढे (१७२०–१७२१) मोगल साम्राज्याचा मुख्य प्रधान झाला.

२) मुनीमखान– हा पुढे बहादुर शहाचा मुख्य प्रधान झाला.

३) तरबियतखान– तोफखान्याचा प्रमुख
४) कामयाबखान– तरबियतखानाचा भाऊ
५) निजामुल्मुल्क चीन कुलीजखान.
६) मतलबखान–तरबियतखानाचा चुलतभाऊ व आतेभाऊ
७) फत्तेहुल्लाखान विशाळगडच्या वेढ्यात प्रमुख
८) मुगलखान– मार्गरक्षक छावणीच्या बाहेर स्वतंत्र सैन्ये असणारे प्रमुख सरदार तिघे दिसतात.

१) जुल्फिकारखान, दक्षिण भारतातील मोहिमा सांभाळण्यासाठी याच्या हाताखाली जे सरदार देण्यात आले त्यांच्या सैनिकांची व जुल्फिकारखानाच्या सैनिकांची बेरीज एके ठिकाणी नोंदली आहे. त्यावरुन त्या सैन्यात तेहतीस हजार सैनिक असावेत. या सैन्यातील प्रमुख सरदारांत राव दलपत बुंदेला कान्होजी शिर्के, इतिहासकार भीमसेन रार्मासग हाडा, दाऊदखान पन्नी दिसतात.

दुसरे भक्कम सैन्य गजिउद्दीन फीरोजजंग याचे दिसते. त्याचा तळ प्रथम ब्रम्हपुरी आणि नंतर नांदेड भागात होता. त्याच्या सैन्यात त्याचे भाऊबंद अशी तुर्क मंडळी प्रमुख दिसतात. या सैन्याच्या बळाचे तपशील आढळले नाहीत.

तिसरे सैन्य शहाजादा बेदारबख्त यांचे. हे पंधरा ते वीस हजाराचे असावे. याच्या सैन्यात असलेल्या सरदारात शेख निजामची (संभाजी राजांना धरणारा) मुले, सवाई जयसिंग हे होते.

मोगलांचे दक्षिणेतील सैन्य एकंदरीत पाहता एक लाख आणि दीड लाख या मध्ये असावे. औरंगजेबाची छावणी म्हणजे नुसती लष्करी छावणी नव्हे. राज्यव्यवहाराची सर्व खाती तेथे असत. प्रमुख केंद्रीय अधिकारी तेथे असत. प्रमुख छावणीतील सैनिकांची मोजदाद संपूर्ण केलेली क्वचितच आढळते. त्याला कारण म्हणजे मोगल सैन्यातील सरंजामी पध्दत.

प्रत्येक सरदाराची (मन्सबदार) स्वतःची पथके असत. एखाद्या मोहिमेवर एखाद्या प्रमुख सरदारास पाठवायचे झाल्यास तो सरदार, त्याच्या हाताखालील सरदार आणि त्यांची पथके यांची मोजदाद करून सैन्य सिद्ध करीत. या प्रकाराला तूमार म्हणत. अशा सैन्यांतील स्वारांच्या संख्यांचे अनेक उल्लेख बातमी पत्रांतून आढळतात.

औरंगजेब जेव्हा विशाळगडाहून परत निघाला तेव्हा त्याच्या बरोबर असलेल्या स्वारांची संख्या चाळीस हजार होती असा बातमी पत्रांत उल्लेख आहे.

घटना, त्यांच्या तारखा औरंगजेबाच्या आणि मराठे सरदारांच्या हालचाली या समजून घेण्यासाठी बातमी पत्रांचा उपयोग होतो. पण लांबच्या बातम्यांचे तपशील इतर साधनांतून शोधावे लागतात.

औरंगजेबाचा चरित्रकार साकी मुस्तैदखान हा औरंगजेबाबरोबर त्याच्या मोहिमांतून हजर होता. त्याचे औरंगजेब चरित्र प्रत्यक्ष पाहिलेल्या हकीकतीवर आधारले आहे. ते अधिकृत समजले पाहिजे.

भीमसेन सक्सेना हा जुल्फिकारखानाच्या सैन्यात असून मराठ्यांच्यावरील मोहिमांतून हजर होता. जुल्फिकारखान हा मराठ्यांच्या पाठलागावर पश्चिम-महाराष्ट्र, वऱ्हाड, मराठवाडा, कर्नाटक असे सर्वत्र हिंडत होता. भीमसेन त्याच्या सैन्यात असल्यामुळे या मोहिमांचे जे आणि जितके तपशील त्याच्या आत्मचरित्रात आढळतात ते बातमी पत्रांत नाहीत. उलट बातमी पत्रातील पन्हाळगड, विशाळ-गड वेढ्याचे तारीखवार तपशील, लहान मोठे सरदार यासीनखान, जंजिऱ्याचा सिद्दी नजाबतखान, इत्यादींचे तपशील वरील ग्रंथात आढळत नाहीत. राणोजी घोरपडे याचा पराक्रम बातमी पत्रावरूनच बाहेर आला आहे.

तिसरा साधन ग्रंथ म्हणजे खाफीखान हा इतिहासकार होय. १६८३ मध्ये हा रामसेजच्या वेढ्यात हजर होता. १६८२–८३ मध्ये हा रायगडच्या पायथ्याशी अब्दुरज्जाकचा सहाय्यक म्हणून काम पाहात होता. पुढे तो गुजरातेत गेला. औरंग-जेबाने आपल्या कुटुंबांतील माणसासारखा वाढविला. मुरादखान हा खाफीखान याचा जीवश्च कंठश्च मित्र आणि आश्रयदाता. मुरादखानाने बादशहाच्या चाक-रीत अनेक कामगिऱ्या केल्या. शहाजादा मुअज्जमच्या कोंकणच्या मोहिमेत (१६८३), गोवळ कोंड्यावरील मोहिमेंत (१६८५), गोवळकोंड्यात राजदूत दोड्डेरीला संताजीच्या कचाट्यात, यादगीर, पेडगांव येथे किल्लेदार, पवनार येथे फौजदार आणि १७०१ मध्ये गुजरातेत गोध्र्याचा फौजदार अशा विविध काम-गिऱ्या त्याने बजावल्या. मोगल दरबारातील अनेक अंतस्थ प्रकरणे केवळ त्याच्या मुळेच खाफीखानाला समजली. बहादुरखानाने मराठ्यांना लिहिलेले गुप्त पत्र, (१६८५), दोड्डेरी येथील मोगलांची फजिती (१६९५) पन्हाळगडातील हेवेदावे आणि जबर रक्कम भरुन किल्ला घेण्याची मोगलांवर आलेली पाळी इत्यादी गोष्टी खाफीखानाने मोकळेपणाने लिहिल्या आहेत. अर्थात याला आधार मुराद-खानच. याबाबतीत खाफीखान विश्वसनीय समजावा. पण विशाळगडाबद्दल त्याने

केलेली वर्णने बरीचशी साकी मुस्तैदखानाच्या पुस्तकातून घेतलेली दिसतात. ती ऐकीव आहेत. अर्थात त्याच्या मित्रांत अनेक हजर माणसे होती. दक्षिण भारतातील घडामोडींबद्दल मनुचीचे आत्मचरित्र विश्वासार्ह आहे. पण छावणीतील त्याच्या बातम्या ऐकीव आहेत. मनुची हा त्या काळी मद्रास व पाँडेचरी येथे राहात होता हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याची माहिती काळजीपूर्वक तपासून घ्यावी लागते. विलियम नॉरिसची डायरी पन्हाळगडसंबंधी उपयुक्त आहे.

तत्कालीन पत्रव्यवहारही उपलब्ध झाला आहे. कल्याणचा ठाणेदार मातबरखान याची पत्रे उपलब्ध आहेत. खुद्द औरंगजेबाची पत्रे उपलब्ध आहेत.

बातमी पत्राबरोबरची साधने ही लक्षात घ्यावी लागतील.

उदाहरणे

खाफीखान

पन्हाळगडचा वेढा रेंगाळू लागला तशी औरंगजेबाला मनुष्य बळाची आवश्यकता वाटू लागली. त्याने गुजरातचा सुभेदार शुजाअतखान याच्याकडे नवीन सैनिकांची मागणी केली. त्याने बादशहाला लिहून पाठविले की, 'अहमदाबादचे लोक मोहिमेवर येण्यास तयार नाहीत.' या मोबदल्यात शुजाअतखानाने दोन लाख रुपये पाठविले. यावर औरंगजेबाने कडक पत्र पाठविले. ते बाहेर आले याचे श्रेय खाफीखान आणि मुरादखान यांचे. पत्रांतील मजकूर थोडक्यात असा–

औरंगजेबाचे पत्र

'या वेळी मी जिहाद करीत आहे आणि दुष्ट काफरांचा नायनाट करण्याकरिता अखंड परिश्रम करीत आहे. धर्माचा अभिमान असणाऱ्या प्रत्येक मुसलमानाने यावेळी जिहादीत गुंतलेल्या इस्लामच्या बादशहाला मदत केली पाहिजे.'

या उलट मुरादखानाने गोऱ्याहून बादशहाला पुढील पत्र लिहिले–

'यावेळी बादशहा जिहाद करीत आहेत. काफरांचे किल्ले जिंकून घेण्याकरिता ते कटिबद्ध झाले आहेत आणि आपण सुखाने काळ कंठावा हे आपल्याला आवडत नाही. ... मला आपल्याजवळ नेमण्यात आले तर... मी आपल्या सेवेत हजर होईन. शक्य तितकी माणसेही मी आपल्या बरोबर घेऊन येईन आणि जिहाद करण्याचे पुण्य अंशतः तरी मला लाभेल.'

परवानगी मिळाली आणि मुरादखान हा पन्हाळगडला पोहोचला.

वेढ्यातील एक प्रसंग

मुरादखानाने पन्हाळगडालगतची एक टेकडी घेतली आणि तो तेथे ठाण मांडून बसला. त्याने मदत मागितली. मातब्बर मोगल सरदार हमीदुद्दीनखान

रुहुल्लाखान यांनी त्याला निरोप पाठविला की 'आम्ही तुझ्या हाताखाली काम करावे आणि आतापर्यन्त तरबियतखान आणि इतर उमदे सरदार यांनी जी कामगिरी केली आहे ती सर्व मातीत मिळून जावी अशी तुझी इच्छा आहे काय ?'

खाफीखान म्हणतो 'बादशहाची दक्षिणेची मोहीम जी इतकी लांबली त्य.चे मुख्य कारण म्हणजे सरदारांतील मतभेद आणि त्यांच्यातील एकीचा अभाव हे होय.'

औरंगजेबाचे मुरादखानापाशी उद्गार,– 'शौर्य आणि साहस दाखविण्यात तू काही कमी केले नाहीस. पण तुझी कामगिरी उठून दिसावी अशी आमच्या उमद्या सरदारांची इच्छा नव्हती.'

हमीदुद्दीनखानापाशी उद्गार– 'खानजमान उर्फ शेखनिजाम याने त्या दुष्ट संभाजीला मुलामाणसांसहीत पकडून उत्कृष्ट कामगिरी केली. त्याच्यावर कृपा करून मी गुणग्राहकता दाखवावी असे आमच्या निकटवर्ती अमीर उमरावांच्या मनात नव्हते. श्रम साहसाची कामे करून त्या सरदाराच्या (शेखनिजाम) घराण्याने तैमूर घराण्याला ऋणी करून ठेवले आहे. त्याचप्रमाणे मुहमंद मुरादखानाचे शौर्य आणि साहसही सफल व्हावे असे तरबियतखानाला वाटत नाही. तुला मी सच्चा समजतो. तू पण तरबियतखानाप्रमाणे अदुरदृष्टीचा झाला आहेस.'

खाफीखान म्हणतो 'शहाजादा कामबख्श आणि तरबियतखान यांजकडून किल्लेदाराने भक्कम रक्कम घेतली आणि...किल्ले खाली करून दिले.'

बातमी पत्रांत हे सापडणार नाही.

खाफीखानाची पुढील सूचक वाक्ये बातमी पत्रात आढळणार नाहीत. खाफीखान म्हणतो–

'शहाजादाने कबूल केले त्यापेक्षा जास्त रक्कम तो किल्लेदाराला (विशाळगडच्या) देईना. पण जी गोष्ट जाहीर झाली ती ही की शहाजादा (बेदारबख्त) आणि त्याचे कारभारी यांनी गुप्तपणे किल्लेदाराला भली मोठी रक्कम दिली.'

'बादशहा हा दयाळू, धोरणी आणि सर्वांची काळजी वाळगणारा होता. चौकशीवरून त्याला कळून आले ते हे की, अनेक किल्ल्यांना बादशाही सरदार वेढे घालीत, शौर्य गाजवीत, आणि किल्ल्यातील शिबंदीला जेरीस आणीत. शेवटी किल्लेदाराला भक्कम रक्कम देऊन ते किल्ले आपल्या ताब्यात घेत. किती रक्कम किल्लेदाराला देण्यात आली याचीही बातमी हरकाऱ्यांच्या द्वारे बादशहाला लागे. पुष्कळ वेळा असे होई की बादशहा तितकीच रक्कम वेढा घालणाऱ्या मोगल सरदाराला बक्षिस म्हणून देई.' यावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

आणखी एक वर्णन

मार्च १७०२ मध्ये मराठ्यांनी खान देशात हल्ले चढवून नंदुरबारचा फौजदार हसन अलीखान यास जखमी करून कैद केले. बातमी पत्रात अगदी त्रोटक

हकीकत आली आहे. पण खाफीखान हा बऱ्हाणपूरच्या घटनेच्या वेळी खानदेशला असलेल्या गुजरातेत. पुढे १७१८ मध्ये तो चोपड्याला (खानदेश) कलेक्टर आहे.

त्याने वरील घटनेची दिलेली हकीकत मोठी धमाल उडविणारी आहे. तो म्हणतो–

' मराठ्यांनी कैद्यांकडून (हसन अलीखान) खंडणी म्हणून दोन लाख रुपयांची मागणी केली. हसन अलीखानने आपल्या जहागिरीतून काही रक्कम उभी केली. थाळनेरमध्ये त्याची काही मालमत्ता होती. तीतून त्याने काही रक्कम जमविली. काही रक्कम जडजवाहीर, अलंकार इत्यादींतून उभी केली. पण सगळे करून एक लाख आठ हजार रुपयेच जमले. उरलेली रक्कम कर्ज म्हणून द्यावी म्हणून हसन अलीखानाने नंदुरबारचे श्रीमंत सराफ सावकार यांची विनवणी केली. पण लोक कबूल झाले नाहीत. नंदुरबाराचे लोक मराठ्यांना कधीच चौथाई देत नसत. ते फौजदारांचा आश्रय घेत आणि मराठ्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करीत. यामुळे मराठे नंदुरबारच्या लोकांवर चिडलेले होते. आता हसन अलीखानालाही त्यांची चीड आली. निरुपाय होऊन त्याने मराठ्यांशी अंतस्थ रीतीने खलबते केली. असे ठरले की मराठ्यांनी एक दोन दिवसांकरीता नंदुरबारला वेढा घालण्याचे सोंग करावे. हसन अलीखानाने प्रतिकाराचे सोंग करावे, मारामारीचा आव आणावा आणि मग शहराचे दरवाजे उघडावे. मराठ्यांनी रयतेला त्रास देऊ नये पण गावातील शेठ, सावकार, धनिक माणसे, व्यापारी इत्यादींना पकडावे. त्यांच्याकडून खंडणीची उरलेली बाकी उकळून घ्यावी आणि आपली मुक्तता करावी. त्याप्रमाणे घडले. ऐंशी हजार रुपयांऐवजी मराठ्यांच्या हाती एक लाख चाळीस हजार रुपये पडले. हसन अलीखानाने स्वतःकरीता तीस हजार रुपये गोळा केले.

ही बातमी बादशहाला कळली. तो फार रागावला. तो म्हणाला 'आपल्यात लढण्याचे बळ नव्हते तर व्यर्थ लढण्यात काय हंशील होते.'

औरंगजेबकालीन वातावरण समजण्यासाठी खाफीखान हा संपूर्णपणे वाचणे अत्यंत आवश्यक आहे. मराठ्यांचे वाढते बळ, महाराणी ताराबाई यांचे कर्तुत्व, मराठ्यांचा मुक्त संचार, चौथाईची वसूली, मराठ्यांचे अधिकारी, त्यांच्या छावण्या, औरंगजेबकालीन अधिकारी, मुल्ला मौलवी, साधुसंत इत्यादींचा समाज या सर्वांचे मोकळे आणि अप्रतिम चित्रण खाफीखानाच्या ग्रंथात आहे. खाफीखान सत्तेपासून दूर आहे. १७३४ मध्ये मोकळेपणाने लिहीत आहे हे विशेष आहे.

साकी मुस्तेदखान

औरंगजेब चरित्राचा (मासिरे आलमगिरी) लेखक, औरंगजेबाचा लेखक आणि निकटवर्ती. हा औरंगजेबाच्या बरोबर दक्षिणेच्या मोहिमेत आहे. विशाळ-

गडहून परतताना मोगलांचे झालेले हाल याने स्वतः पाहिले आहेत आणि भोगले आहेत. त्यामुळे त्याची वर्णने विश्वसनीय समजली पाहिजेत. बातमी पत्रांच्या मानाने वर्णने अलंकारिक शैलीची वाटतात. औरंगजेबाबद्दलचा अभिमान चरित्राच्या पाना पानावर दिसून येतो. पण वस्तुस्थिती लपविण्याचा साकी मुस्तैदखान प्रयत्न करीत नाही. मात्र तो औरंगजेबाच्या निर्धारावर भर देतो. काही उदाहरणे पहा–

'पण, पण त्या भयंकर पावसाचे मी कसे वर्णन करु. दहा दहा आणि वीस वीस दिवस अहोरात्र पावसाचा वर्षाव होत असे. कुणाला डोळे उघडण्याची अगर डोके वर काढण्याची सोय नव्हती...सामान वाहून नेणाऱ्या जनावरांची स्थिती काय वर्णावी... वाटेत एक ओढा लागला. त्याने बादशहाला तर वाट दिली. पण बाकीच्या सैन्याला गिळण्यासाठी त्याने आपला जबडा उघडला. या ठिकाणी सैन्याला बराच काळपर्यंत मुक्काम करावा लागला. ज्यांना बुडून मरायचे होते ते मेले. ज्यांच्या नशीबात वाचणे होते ते वाचले. (दुसऱ्या मुक्कामावरही) तोच ओढा पुन्हा समोर आला आणि त्याने सर्वांना अक्षरशः निराधार करुन सोडले... तो प्रलयकाळच म्हणावा लागेल. लष्करात धान्याची महर्गता काय वर्णावी ! धान्याचा भाव रुपयाला एक शेर असा झाला. गवत आणि सरपण तर मुळीच मिळेना. पावसाचा शरवर्षाव तर निराधार सैनिकांच्या जिवाला त्रस्त करुन सोडीत होता. थंड आणि झोंबणारे वारे तर माणसे आणि जनावरे यांचे प्राण हरण करीत होते. सैन्यातील लोकांचे सर्व सामान नष्ट झाले होते.

बादशहाने ओढा ओलांडला (४ जुलै १७०२) आणि तेथून एक कोस पुढे जाऊन त्याने मुक्काम केला. पण बादशहाला रहाण्यास न्याय कचेरीचा एक लहान तंबू लाभला. शहाजादे आणि इतर अमीर उमराव यांना तर आपापल्या तंबूत उभे राहाण्यासही जागा नव्हती. बादशहा म्हणजे सहनशक्तीचा पर्वत आणि हिंमतीचा दर्याच. ते पुष्कळदा म्हणत 'थोडा पाऊस पडत आहे आणि थोडा वारा वहात आहे. लोकांनी काय म्हणून इतके हातपाय गाळावे.'

कृष्णा ओलांडण्याचे वर्णन

'ती काय नदी होती! छे, प्रलयकाळचे तुफानच ते! नदीची प्रत्येक लाट म्हणजे प्राणसंकटच. मोगल सैनिकांची संख्याही नदीच्या लाटांपेक्षाही अधिक. नावांतून लष्कराने नदी ओलांडण्यास सुरुवात केली. एकेका नावेत माणसे तरी किती भरावीत. ती काय नाव होती. छे, तो एक नरक होता. एक शवपेटिका आणि त्यात हजार मुडदे अशी स्थिती होती.

खाफीखानाचे भाष्य

'लोकांचे जे हाल झाले ते मी कसे लिहू. घोडयांची निकामी झालेली शिखरे आणि मेलेल्या माणसांचे सामान पेटवून लोक थंडीचे निवारण करू लागले. ओढयाच्या काठावर पावला पावलावर माणसे आणि जनावरे मरुन पडली होती. त्याची इतकी दुर्गंधी सुटली होती की जिवंत माणसांना जीव नकोसा झाला.

कविता–तो पहा उपासमार होऊन पडला आहे. तो कोण आहे कळत नाही. तो पहा, त्याचे प्राण कंठाशी आले आहेत. त्याच्याकरीता कोणी अश्रू ढाळीत नाही.

नदी (कृष्णा) ओलांडून झाली (मिरजेजवळ, सप्टेंबर १७०२). नदी पोहून जाताना किंवा नावा बुडाल्यामुळे किंवा लाटांच्या माऱ्यांमुळे किती माणसे त्या नरभक्षक नदीला बळी पडली याची मोजदाद करण्याची बुद्धी आणि हिंमत कुणात आहे.'

खाफीखानाचा निष्कर्ष

सूज्ञ जाणतातच की परमेश्वराचा कोप झाला तर पापी लोकांना शिक्षा देण्यासाठी तो दर्याच्या रूपाने वाहू लागतो. त्याच्या कोपाला तुफान वादळाची जोड मिळते. त्याचा प्रतिकार माणसे कसा बरे करू शकतील ? स्वार्थी, अप्पलपोटे आणि परमेश्वराकडे लक्ष न देणारे पापी याना दैवाने त्या प्रदेशात ओढून नेले आणि त्यांची वित्त, अन्न इत्यादीची भयंकर हानी केल्याशिवाय त्यांना बाहेर काढले नाही. या मोहिमेसंबंधी मोगल इतिहासकारांचे हे विचार !

पण औरंगजेबावर दृष्टि केंद्रित केल्यामुळे दक्षिण सुभ्यात मराठे व मोगल यांचे ठिकठिकाणी निकराचे संग्राम होत होते. मराठे आपला जम बसवीत होते. मोगलांची मन्सबदारी यंत्रणा खिळखिळी होत होती. या गोष्टीकडे मुस्तैद खानाचे दुर्लक्ष झाले आहे. पण खाफीखान व भीमसेन सक्सेना या समकालीन लेखकांमुळे ती उणीव दूर झाली आहे.

(भीमसेन सक्सेना तारीखदिल्कशा)

भीमसेन सक्सेना हा दक्षिणच्या मोगल सुभेदारांच्या तैनातीतील अधिकारी. आपल्या आत्मचरित्रात त्याने शहाजादा मुअज्जम, मिर्झाराजा जयसिंग, जसवंतसिंग, शिवाजी महाराज, संभाजीराजे, दाऊदखान कुरेशी, महाबतखान, बहादुरखान, दिलेरखान (या सर्वांना त्याने जवळून पाहिले होते) इत्यादींची वर्णने दिली आहेत. १६८५ नंतर तो नळदुर्ग व परंडा, या किल्ल्यांचा निरीक्षक

(इन्स्पेक्टर) म्हणून काम करीत होता. १६९० मध्ये त्याने दतियाचा राजा राव दलपत बुंदेला याची चिटणीशी पत्करली. राव दलपत हा जुल्फिकारखानाच्या सैन्यातील एक मातब्बर अधिकारी, त्यामुळे जुल्फिखानाबरोबर भीमसेन हा जिंजीत, त्यापूर्वी पन्हाळयाच्या वेढयात, मराठयांच्या पाठलागात विदर्भ, मराठवाडा इत्यादी भागात होता. औरंगजेबाचा मृत्यू झाल्यावर भीमसेन हा राव दलपत बरोबर उत्तरेत गेला. जाजाऊच्या लढाईत राव दलपत मारला गेला आणि भीमसेन जखमी झाला (१७०७) त्यानंतर तो सेवानिवृत्त झाला.

भीमसेनची सगळी हयात दक्षिणेत गेली. त्याचे निरीक्षण मोठे मार्मिक आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर तो लिहीत होता. सत्तेच्या स्थानापासून तोही दूर होता पण निरीक्षण करण्यास आवश्यक तितका त्याचा राजकारणाचा अभ्यास आहे. जुल्फिकारखानाच्या सैन्याबरोबर तो वऱ्हाडात गेला होता. त्या मोहिमेचा तपशील आपल्याला बातमी पत्रांत मिळत नाही. १७०१ च्या अखेरीची व १७०२ च्या सुरवातीची ही मोहीम आहे. भीमसेन म्हणतो '(वऱ्हाडातील मोहीम) परंडा, चारठाणा इत्यादि ठिकाणी आमची मराठयांशी युध्दे झाली. तेथून लोणारवरून आम्ही वऱ्हाडात दाखल झालो. खानदेश आणि वऱ्हाड येथे मराठे पसरले होते ते त्या भागांतील जमीनदारांना मिळाले. त्या सर्वांची मिळून जवळ जवळ साठ हजार फौज तयार झाली. वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान हा मराठयांच्या भीतीने एलिचपुरातून बाहेर निघेना. तो येऊन मोंगल सैन्यात दाखल झाला खरा पण आपल्याला जाऊ द्यावे म्हणून तो रोज जुल्फिकारखानाची विनवणी करी. शेवटी नांदेडजवळ पोहोचल्यावर त्याला एलिचपुरास जाण्याची परवानगी मिळाली.

त्याच दिवशी नांदेडचा फौजदार (सुभेदार) खुदाबंदाखान (शायस्ताखानाचा मुलगा) हा जुल्फिकारखानाच्या (त्याचा मेहुणा) स्वागतासाठी आला. पण नांदेड जिल्हा सोडून तो बाहेर येईना. जुल्फिकारखानाच्या बरोबर राहून त्याच्याशी सहकार्य करावे तेही केले नाही. या सुमारास नर्मदेच्या दक्षिणेस, दख्खन, खानदेश, वऱ्हाड, कोकण या प्रांतांतील परगण्यांतून आणि खेडयांतून सारांश सर्वत्र मराठे हे टोळ आणि मुंग्या याप्रमाणे पसरले होते. भीमसेन म्हणतो, प्रजेविषयी बादशहाचे विचार चांगले असले तर असंतोष निर्माण होणे शक्य नाही.'

बादशहाने जहागिरदारांना तनखा म्हणजे सरंजाम म्हणून ज्याप्रमाणे तालुके लावून दिले आहेत त्याचप्रमाणे मराठ्यांनीही सगळा प्रांत आपल्या सरदारांना सरंजाम म्हणून वाटून दिला आहे. मराठे प्रत्येक परगण्यातून आणि

प्रत्येक स्थळातून मन मानेल तशी रक्कम घेतात. त्यांनी ठिकठिकाणच्या वाटा बंद पाडल्या. लूटमार करून ते संपन्न बनले. मी तर ऐकले आहे की बादशहाला आयुरारोग्य लाभावे म्हणून मराठे दर आठवड्यास देवाची प्रार्थना करून आपापसात प्रसाद आणि दक्षिणा वाटीत. धान्य कमालीचे महाग झाले. विशेषत: बादशहाच्या लष्करात तर उपासमारीने अनेक माणसे नष्ट झाली. लष्करांत परिस्थिती सर्व प्रकारे विचित्र झाली आणि अनावस्था प्रसंग ओढवला.

भावी निजामुल्मुल्काचा चुलत चुलता मुहंमद अमीनखान (हा १७२१ मध्ये मोगल साम्राज्याचा मुख्य प्रधान झाला.) याचा मुलगा मुहंमद फाजिल कमरुद्दीन हाही १७२४ ते १७४८ मुख्य वजीर होता. हा फाजिलही (जन्म १६८८) औरंगजेबाच्या छावणीत होता.) याजवर नोव्हेंबर १७०२ मध्ये मराठ्यांनी हल्ला केला. बातमी पत्रांत लढाईचा तपशील दिला आहे तर भीमसेनने अमीनखानाच्या फजितीचा तपशील दिला आहे. तो पुढीलप्रमाणे–

'बादशाही फौजेतील हत्ती चरण्यासाठी रानात नेण्यास आले होते. बादशाही छावणीपासून दोन कोसावरून मराठ्यांनी हत्तींना पळविले. ते परत आणण्याच्या कामावर मुहंमद अमीनखान, बहादूर तुराणी सदरुस्सुदूर (मुख्य न्यायाधीश) यांची बादशहाने नेमणूक केली. मराठ्यांनी मुहंमद अमीनखान याजवर मोठा कठीण प्रसंग आणला. त्यांनी अमीनखानाचे हत्ती, घोडे आणि इतर सरंजाम हे लुटून नेले, फार काय मुहंमद अमीनखान यास आपली शस्त्रे आणि अंगावरचे कपडेही काढून मराठ्यांच्या हवाली करावे लागले. तेथून निघून तो एकटाच एका खेड्यात पोहोचला. तेथील पाटलाने त्याला बैलगाडीत बसवून चांभारगोंद्याचा फौजदार इबादल्ला जोरकाशी याजकडे पोहोचते केले. त्याने मुहंमद अमीनखान यास कपडेलत्ते आणि इतर सामुग्री देऊन बादशहाकडे पाठविले.

धनाजी जाधवाच्या हालचाली

जुल्फिकारखानाचे मुख्य काम धनाजीचा पाठलाग हे असल्यामुळे त्याच्या सैन्यातील भीमसेन याच्या ग्रंथात धनाजीचे अनेक उल्लेख येतात. बातमी पत्रात ते तपशील आलेले आहेत असे नाही. भीमसेनने केलेले उल्लेख थोडक्यात असे–

१७०१

जानेवारी– धनाजी जाधवांचा बादशहाच्या छावणीवर हल्ला (मिरजजवळ) जुल्फिकारखानाबरोबर लढाई.

फेब्रुवारी-मार्च– धनाजी ब्रह्मपुरीच्या तळापाशी. १७०१ अखेरीस जुल्फिकार खानाबरोबर धावती युद्धे (विदर्भ व मराठवाडा या प्रांतात).

१७०२

१७०२ एप्रिल पर्यंत युध्दे चालू.

जून– धनाजी कोंडाण्यात. जुल्फिकारखान सासवडजवळ.

डिसेंबर– धनाजी व फतेहूल्लाखान यांच्या रहमतपुराजवळ लढाया. धनाजी विजापूर प्रांतात सुभेदार चीन कुलीजखानाच्या पाठलागावर. चीन कुलीजखान हा मुग्द्लच्या किल्ल्यात आश्रय घेतो. जुल्फिकारखान धनाजीच्या मागे. धनाजी गुलबर्गा प्रांताकडे.

मातबरखान (कल्याण, भिवंडी व नाशिकचा फौजदार) याची पत्रेही कोकणच्या घटनांवर चांगलाच प्रकाश टाकतात. जंजिऱ्याच्या शिद्याचा उपयोग औरंगजेबाने कोकणात मराठ्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने करुन घेतला. एक वेळ विशाळगडची किल्लेदारी जंजिरेकर याकूतखानाला द्यावी असा विचार औरंगजेबाच्या मनात आला होता. पण महाराष्ट्राच्या सुदैवाने किल्लेदार म्हणून उदितसिंग (अर्ध्याचा अवधूतसिंग) याची नेमणूक झाली आणि मराठ्यांनी १७०७ मध्येच तो किल्ला परत मिळविला नाही तर रायगडाप्रमाणेच विशाळगड मराठ्यांच्या हाती येण्यासाठी ब्रह्मांड लोटले असते. शिद्दी याने संबंध कोकणची देशमुखी आपल्या नावाने करुन मिळावी म्हणून औरंगजेबापाशी फार खटपट केली, पण औरंगजेबाने ती फेटाळून लावली.' शिद्याला कोकणातून काढावा असाही विचार औरंगजेबाच्या मनात घोळत असावा. पण खाफीखानाच्या म्हणण्याप्रमाणे याकूतखानाने आपल्या वारसांना सांगून ठेवले होते की 'काही करा. पण कोकणला चिकटून रहा. शिद्दी याने कोकणात मराठ्यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. विशाळगडच्या वेढ्यात मोगलांतर्फे त्याचे चार पाच हजार सैन्य गुंतले होते. याकूतखान हा स्वत: औरंगजेबाच्या भेटीला गेला नाही. हाताखालील अधिकाऱ्यांपाशी रदबदली करुन तो कोकणला चिकटून राहिला. जंजिरकरांना नगण्य करण्यासाठी पेशव्यांना प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागली

पोर्तुगीज साधने

दक्षिण कोकण आणि बेळगाव या भागातील मराठ्यांच्या पराक्रमामुळे मोगलांची बाजू घसरत चालली. या कामगिरीत सिंहाचा वाटा बहिर्जी हिंदूराव घोरपडे (संताजीचा भाऊ) याचा आहे. पोर्तुगिजांचा पत्रव्यवहार पाहता ते मराठ्यांशी स्नेहसंबंध स्थापित करण्यासाठी उत्सुक झालेले दिसतात. चौदा डिसेंबरचे पत्र हिंदूराव घोरपडे यांना लिहिले आहे. त्यात पोर्तुगीज व्हाईसराय म्हणतो, 'आपल्या पत्रात आपण काही विजय मिळविले आहेत अशी बातमी आहे. ती बातमी वाचून आम्हाला आनंद झाला.' आपल्या बादशहाला लिहिलेल्या पत्रात

(सहा जानेवारी १७०३) व्हाईसराय म्हणतो ' मराठ्यांनी अलीकडे मोगलांनी त्यांचा जो मुलुख जिकला होता तो परत घेण्याचा सपाटा सुरु केला आहे. त्यांनी फोंड्यास वेढा घातला. शहर लवकरच पडले. ...गड (हा) पुरवठ्याच्या अभावी लवकरच शरण येण्याची चिन्हे दिसत आहेत... मराठ्यांचे सध्या उत्कर्षाचे दिवस असल्याने त्यांना दुखविणे फायद्याचे नाही.'

वरचे पत्र एक उदाहरण म्हणून दिले. तमीळनाडमध्ये वेलोरचा किल्ला मराठ्यांकडे होता. तो १४ ऑगस्ट १७०२ मध्ये मोगलांनी घेतला. यानंतर मराठ्यांचे लक्ष उत्तरेवर केन्द्रित होऊ लागले.

इंग्रजी रेकार्डस्मध्ये आपल्याला अनेक तपशील मिळतात. मुंबई, मद्रास, या ठिकाणचे दप्तरखाते यादृष्टीने फार उपयुक्त आहे. इंग्लंडचा राजदूत सर विलियम नॉरिस हा पन्हाळगडच्या वेढ्यात हजर होता. त्याच्या दैनंदिनीतून मोगल छावणींतील गोंधळ, भ्रष्टाचार, युध्द यंत्रणातील शिथिलता इत्यादींची कल्पना येते. मागे म्हटल्याप्रमाणे दक्षिण भारतातील धडामोडी संबंधी मनुचीचे आत्मचरित्र हे मोलाचे साधन आहे.

मराठी साधने

त्या मानाने मराठी साधने संख्येने कमी पडतात. जेधे, शकावली, ताराबाई कालीन पत्रे, काही बखरी ही आपली साधने. पण ती संख्येने थोडी असली तरी त्या साधनांतून मराठ्यांची जिद्द जाणवल्याशिवाय राहात नाही. काही पत्रे पहा.

महाराणी ताराबाई यांची पत्रे–

१

' विठोजी केसरकर नामजाद किल्ले पावनगड यांसी आज्ञा केली ऐसीजे– तुम्ही हमेशा कस्त करून गनिमास नतिजा पावविता. एक दोन वेळ मोर्चा मारिला. औरंगाजेबाला तरी ठेचगा द्यावा अशी उमेद धरता...या उपरी औरंगजेब आला आहे तरी त्याचा हिसाब न धरता स्वामीची जागा जतन करणे–स्वामी ऊर्जित हरबाव करतील. दिलासा असा देणे.' (बारा मार्च १७०१)

२

असेच विठोजीला या पूर्वीचे पाच फेब्रुवारीचे पत्र– ' किल्ले पावनगडास गनिमाने येऊन परिघ घातला. तेथील मजबुती असली पाहिजे याजकरिता तुम्हास किल्ले मजकुरास नामजाद पाठविले. त्यास तुम्ही तेथे गेलियापासून रात्रंदिवस अलंग नौबद चौकी पहारा करीता. स्वामीकार्यात अंतर करीत नाही म्हणून वर्तमान

राजश्री बाळोजी इंगळे, मुद्राधारी यांनी हुजूर लिहिले. त्यावरुन विदित झाले-ऐसियास तुम्ही स्वामी कार्याचे एकनिष्ठ मर्दाने सेवा करीतच आहा. किल्ले मजकुरास कस्त करुन गनिमास नतिजा पावविता. ये गोष्टीने तुमचा मजुरा झाला पुढेहि येच रीतीने हुषारी खबरदार पाहून गनिमास ठेचा देणे....

३

प्रतापराव मोरे यांसी आज्ञा केली ऐसी जे– तुम्ही व राजश्री सताजी पांढरे फौजेनिशी मलकापुरानजीक औरंगजेबाची चौकी होती ते मारली...औरंगजेब विशाळगडास बिलगला याजकरीता त्याचे कबिलाबाड मारून हमेशा गोटावर हल्ले करावे तरीच तो बलकुबल राहतो...तो विशाळगडचा ख्याल सोडी तुम्हा लोकांच्या कीर्ति होऊन स्वामी समाधान पावेत ऐसी गोष्टी करणे.'

मराठ्यांचा निर्धार दाखविण्यास वरील उदाहरणे पुरावीत.

औरंगजेबाची धोरणे

१७०१ व १७०२ या दोन वर्षांतील पत्रव्यवहारांतून औरंगजेबाच्या अ-दूर दृष्टीच्या धोरणात फरक पडल्याचे जाणवत नाही. मराठ्यांचे किल्ले घेतले की ही मोहीम संपेल ही त्याची खुळी समजूत. पण मराठे एकीकडे बादशाही छावणीवर हल्ले करुन वेढ्यात अडथळे आणीत तर दुसरीकडे दक्षिणेत निर्बंध संचार करीत. त्यांच्या युद्धतंत्रासमोर मोगल हेकीस आले. कर्नाटकातील बेडर जमातीशी युति (धनाजी जाधव, राणोजी घोरपडे, बहिर्जी हिंदूराव घोरपडे व वाकिणखेड्याचा (गुलबर्गा जिल्हा, कर्नाटक) पिडनाईक हा बेडर सरदार (बेरड नव्हे) ही बादशहाला अस्वस्थ करणारी घटना होती. फीरोजजंग व जुल्फिकारखान यांच्या चकमकी बेडर आणि मराठे या दोघांशीही सतत चालू होत्या.

विदर्भात चंद्रपूरचे गोंडराजे पूर्णपणे मोगलांच्या आहारी गेले होते. पण नागपूर देवगडचे गोंडराजे हे मराठ्यांच्या बरोबर मिळून विदर्भात मोगलांशी निकराचा सामना देत होते.

मराठ्यांच्या ब्रह्मपुरीजवळच्या सतत आक्रमणामुळे औरंगजेबाचे कबिले असलेल्या त्या तळाला धोका आहे हे त्याने ओळखले. ब्रह्मपुरीच्या तळाचे काम मुख्यप्रधान असदखान याजकडे देण्यात आले होते. ते काम समाधानकारक रीतीने त्याच्याकडून पार पडेना. तेव्हा औरंगजेबाने असदखानाला आपल्याकडे बोलावून घेतले आणि ब्रह्मपुरीच्या तळावर गाजिउद्दीन फीरोजजंग याची नेमणूक केली.

फीरोजजंग हा मध्य आशियातील बुखारा येथून आलेला. त्याचा बाप गोवळकोंड्याच्या वेढ्यात ठार झाला होता (१६८७). फीरोजजंग, त्याचे भाऊ

हामिदखान, अब्दुलरहीम, चुलतभाऊ महंमद अमिनखान (मोगल साम्राज्याचा मुख्यप्रधान १७०२–२१), मुहंमद अमिनखानाचा मुलगा फाजिल कमरुद्दीनखान (मोगल साम्राज्याचा मुख्यप्रधान १७२४–१७४८) हे सर्वजण औरंगजेबाच्या मोहीमांतून लढत होते. फिरोजजंगाचा मुलगा मीर कमरुद्दीन हाच पुढे मोगल साम्राज्याचा मुख्य प्रधान बनला. (१९२२–१७२४). १७२४ मध्ये निजाम घराण्याची स्थापना करणारा निजामुल्मुल्क तो हाच.

१७०२ च्या अखेरीस फीरोजजंगाकडे वऱ्हाड व नांदेड या दोन प्रांतांच्या सुभेदाऱ्या देण्यात आल्या. निजामुल्मुल्काकडे (भावी) विजापूरची सुभेदारी देण्यात आली.

ब्रम्हपुरीचा कबिला हलवून औरंगाबादेस पाठवावा असेही औरंगजेबाचे मनात आले. बातमी पत्रावरुन त्याने याबद्दल पूर्ण व्यवस्था केली होती पण सिंहगडच्या वाटेवर पेडगाव येथे मुक्काम केल्यावर त्याने तो बेत टाकून दिला.

औरंगजेबाच्या छावणीतील यंत्रणा बरीचशी शिथील असावी. सैनिकांना महिनो महिने पगार मिळत नसे. उत्तरेकडून येणाऱ्या खजिन्यावरच औरंगजेबाचा भर असे. तीस वीस महिन्यांची बाकी असलेल्यांना तीन चार महिन्याचे पगार देऊन समजूत काढण्यात येई. विशाळगडावरुन परतताना मोगल सैन्याचे जे विलक्षण हाल झाले ते पहाता औरंगजेबाला आपले सैन्य आणि तेही कसेबसे, पन्हाळपापर्यंत आणीपर्यंत किती कष्ट पडले याची कल्पना येईल. बातमी पत्रांतील वर्णने या बाबतीत तपशिलांनी भरली आहेत. औरंगजेबाचा निर्धार आणि जिद्द मात्र या सर्व गोंधळातून उठून दिसतात.

मराठे पावसाळा तोंडावर येईपर्यंत किल्ला लढवीत आणि मग जबर रकमा घेऊन किल्ले मोगलांच्या हवाली करीत. अशा किल्ल्यांतून मोगल फार काळ टिकणे शक्य नाही याची त्यांना खात्री असे. किल्ले हल्ला करुन घेणे कष्टाचे काम. पावसाळा सुरु होणार अशा वेळी रक्कम भरुन किल्ले घेण्याची घाई मोगलांना होई. औरंगजेबाला हे सगळे माहित होते. पण तो नामानिराळा होता असे दाखवून त्याची प्रतिष्ठा सांभाळण्याची बातमीपत्र लेखकांची केविलवाणी धडपड आपल्याला दिसते. सातारा, परळीला शहाजादा आज्जम, पन्हाळगडला तरबियतखान व विशाळगडला शहाजादा बेदारबख्त हे अशा प्रकरणात मध्यस्थ होते.

सुंभ जळला तरी

१७०२ मध्ये विशाळगडच्या तेवढ्यात गुंतलेल्या बादशहाचे गुजरातच्या अधिकाऱ्यांना आदेश.

सोमनाथ

'सोमनाथाचे मंदिर सोरठ सरकारात समुद्रात किंवा समुद्राच्या काठावर आहे, आमच्या राज्यकारभाराच्या सुरुवातीस ते उध्वस्त झाले व मुर्तिपूजा होत नव्हती, सध्या काय परिस्थिती आहे माहीत नाही. जर मूर्तिपूजक तेथे पुन्हा पूजा करण्यात मग्न असले तर त्या मंदिराचा हर प्रकारे विध्वंस करावा. त्या इमारतीची नांवनिशाणी राहू नये. त्याना (मूर्तिपूजकांना) तेथून हाकलून लावावे.'

द्वारका

गुजरातचा सुभेदार शहाजादा आज्जम याला बादशहाचा चिटणीस इनायतुल्ला याचे पत्र

'असे म्हणतात की सोरठमध्ये आणखी एक मोठे मंदिर आहे. ते उध्वस्त करण्यासंबंधी आपल्याला लिहिण्याची मला आज्ञा झाली आहे.'

ही दोन उदाहरणे औरंगजेबाच्या पत्रव्यवहारातून दिली. बातमी पत्रांतून आणखी उदाहरणे सापडतात. पन्हाळगड हाती आल्यावर तेथील मंदिराची मोडतोड औरंगजेबाच्या आज्ञेने झाली. यापुढे हिंदूंच्या हाताखाली (घरी) नोकर म्हणून मुसलमानानी काम करु नये आणि हिंदूनी मुसलमान नोकर ठेवू नये अशी आज्ञा जाहीर करण्यात आली. मराठ्यांशी सततची युध्दे म्हणजे मोगल साम्राज्यावर केवढे संकट पण वरील प्रकारचे आदेश काढण्यात औरंगजेब गुंतला होता. अशा धोरणाने आपल्या साम्राज्याच्या चिंधड्या उडत आहेत हे त्याला दिसत नव्हते असे नाही. पण मग वेड कशाला म्हणायचे ?

अनुवादाविषयी

मागील खंडाप्रमाणे अनुवादासाठी जो मजकूर घेतला आहे तो शक्य तितका व्यापक घेतला आहे. मोगल–मराठा संघर्षामुळे बुंदेले, रजपूत, शिख इत्यादींवरचे, मोगलांचे दडपण कमी झाले आणि त्या प्रमाणात त्यांना आपले स्वातंत्र्य संग्राम यशस्वीपणे रेटता आले. त्यामुळे बातमी पत्रांत त्यांच्यासंबंधी जो मजकूर आला, आहे तो आवर्जून दिला आहे.

उदयपूरच्या महाराण्याचे उरले सुरले स्वातंत्र्य नष्ट करण्यासाठी मोगल टपून बसलेले असत. त्या संदर्भातील मजकूरही अनुवादात दिला आहे.

दक्षिण भारतात तामीळनाडमध्ये मराठ्यांची सत्ता नाहीशी झाली. तंजावर मदुरा इत्यादी ठिकाणचे राजे मोगलांचे मांडलिक बनले. अर्काटच्या नवाबांचा हा पूर्वरंग होय. तसेच श्रीरंगपट्टणचे राजे मोगलांच्या आहारी गेले. मध्य

कर्नाटकात मात्र मोगल–मराठा संघर्ष जोरात चालू होता. त्यामुळे अनुवादात दक्षिण भारतातील मराठोत्तर घडामोडी वगळल्या नाहीत.

फारशी मजकूर हाताने लिहिताना (आपल्या मोडीप्रमाणे) अनुस्वार किंवा टिंबे देण्याच्या बाबतीत फारच गलथानपणा करतात. त्यामुळे स्थळे शोधून काढताना फार काळजी घ्यावी लागते. कोरगांव, कोरेगांव, खेड, कन्नड, पुरंदर पुनाधर, पन्हाळा–परनाळा, सातारा–सतारा, खेळणा–खिळणा, कोल्हापूर–खोलापूर अशी किती उदाहरणे सांगावीत. काही गावांची नावे बदलली आहेत अगर शोध घेऊनही नकाशात आढळली नाहीत. महाराष्ट्रात औरंगजेब जितका भटकला तितका कोणीच बादशहा फिरला नसेल. १६३६ ते १६४३ आणि १६५३ ते ५८ तो औरंगाबादेस सुभेदार होता. १६८२ पासून १७०७ पर्यंत पाच सहा वर्षे सोडता तो महाराष्ट्रातच फिरत आहे. औरंगाबाद, नगर, सोलापूर, सातारा, सांगली, पुणे इत्यादी जिल्ह्यांतून त्याचे भ्रमण चालू होते. बातमीपत्रात अनेक खेडी शहरे, नद्या, ओढे, डोंगर इत्यादींचे उल्लेख येतात. त्यांपैकी बरीच स्थळे शोधून काढली. त्यासाठी मलाही औरंगजेबाच्या मार्गावरून फिरावे लागले. मिरज, हातकणंगले, कोल्हापूर, पन्हाळगड, वारणा, इस्लामपूर, वडूज, खटाव, पुसेगांव, बुधपांचेगाव, कोरेगाव, रहिमतपूर, औंध, मलकापूर, अंबाघाट, गजापूर, विशाळगड, इंदापूर अकलूज, दौंड, पेडगांव, कोरेगांव, पुणे इत्यादीस्थळे नजरेखालून घातली. हा अनुभवही मोठा प्रत्ययकारी होता.

इतके करूनही काही स्थळांचा शोध लागला नाही. विशाळगड जवळ ज्या ओढ्याने मोगल सैन्याचे शेकडो बळी घेतले त्याचे नांव नीट कळले नाही. कजळी, कवडी, कडवी, अशी दोन तीन नावे समोर आली. एकच ओढा दोनदा आडवा आला असा त्यावेळी हजर असलेला साकी मुस्तैदखान म्हणतो. याचा शोध लागला पाहिजे. विशाळगड ते पन्हाळगडचा औरंगजेबाचा परतीचा प्रवास म्हणजे मोगलांचे पानिपत आहे आणि मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द म्हणजे महाराष्ट्राचे महाभारत आहे. यातील स्थळांचा, घटनांचा व व्यक्तींचा शोध इकडे इतिहास संशोधकांनी आपले लक्ष वळविण्यास हवे.

या दुसऱ्या खंडाचे अनुवाद व संपादन हे या प्रयत्नातून आकारास आले आहे.

पन्हाळगडच्या वाटेवर : २

जानेवारी १७०१

एक जानेवारी– बादशहा आज खानगाव (मालगाव?) हून निघाले. ते मुर्तजाबाद मिरज जवळ पोहचले तसे फख्खरखान याने तोफांना सरबत्ती दिली. बादशहानी सव्वातीन कोसाचा प्रवास केला.

बादशहानी आज्ञा केली की दिवंगत जगदेवराव जाधव यांचा मुलगा राव मानसिंग व मरहूम खान जमान फतेह जंग यांचा मुलगा शेख अब्दुल्लतीफखान यांना यलबरश खानापाशी तैनात करण्यात यावे.

दोन जानेवारी–साताऱ्याचा माजी किल्लेदार दिवंगत सुभानजी याचा मुलगा बापाजी (बाबाजी?) याला दोन हजार जात व पाचशे स्वार अशी मन्सब देण्यात आली.

पालीगडचा किल्लेदार पर्तसिंग (सेनापत सिंग) याने पुढीलप्रमाणे विनंती लिहून पाठविली की 'लोहगडच्या जवळ मराठ्यांचे तिकोणा आदी दोन किल्ले आहेत. तेथील किल्लेदारांनी आपण किल्ला हवाली करू म्हणून बोली लावली आहे. आज्ञा असेल तर मी लोहगडला जाईन. माझा नायब व फतेहसिंगाचा मुलगा कमालसिंग याला पालीगडच्या किल्लेदारीवर नेमण्यात यावे.'

विनंती मान्य करण्यात आली. कमालसिंगला दीडशे जात व शंभर स्वार अशी मन्सब आहे.

आजमतारागड (सातारा) येथून तोफा आणण्यासाठी यलबरशखान याला बरोबर सैन्य देऊन पाठविण्यात आले. त्याने पुढीलप्रमाणे विनंती केली–

१) पगार बाकीबद्दल काही रक्कम देण्यात यावी. दहा हजार रुपये द्यावे अशी आज्ञा झाली.

२) माझ्या सहकाऱ्यांसाठी दोन घोडे देण्यात यावे. विनंती मान्य करण्यात आली.

३) माझ्या सहकाऱ्यांना खर्चासाठी काही रक्कम देण्यात यावी. दीड हजार रुपये द्यावेत अशी आज्ञा झाली.

तीन जानेवारी– बादशहांना कळविण्यात आले की 'बादशहाच्या निवासस्थानात व छावणीतील बाजारात पिण्याच्या पाण्याचा भाव एका पिशवीला (भिस्तीची पखाल) एक रुपया असा आहे. पाण्याची अतिशय टंचाई आहे.' बादशहानी हमीदुद्दीनखान बहादुर याला बोलावून सांगितले 'कृष्णा नदीच्या काठी निवासस्थानासाठी योग्य जागा पाहूनया आणि येथून काय अंतर आहे हेही पाहून या.' त्याने पाहून येऊन विनंती केली की 'येथून अर्धा कोस व सहा साखळ्या अशा अंतरावर कृष्णेच्या कांठी जागा पाहिली आहे.' बादशहा म्हणाले 'उद्या हुकुम देईन.'

दिवस जाण्यास दोन घटिका राहिल्या होत्या. बादशहाना कळविण्यात आले की 'बक्षी उलमुल्क मुखलिसखान (चार हजारी जात व एक हजार चारशे स्वार अशी मन्सब असलेला) हा मरण पावला.

बादशहांनी आज्ञा केली की 'रुहुल्लाखान, मुनीमखान वगैरे कारभाऱ्यांनी जाऊन मुखलिसखान मरहूम याची मालमत्ता ताब्यात घ्यावी.' त्याप्रमाणे अंमल बजावणी करण्यात आली. यानंतर फजाइलखान व कजिउल्कजात (मुख्य काजी) मुहंमद अकरम, शेख नूरुल्हक मुहतसिब (सार्वजनिक नीतिमत्तेवर इहतिसाब म्हणजे देखरेख ठेवणारा अधिकारी), मतलबखान वगैरे यानी मुखलिस खानाच्या जनाज्याची (अंत्ययात्रा) तयारी केली. जनाजा बादशहासमोर आणण्यात आला. तेथे नमाज पढल्यावर मिरज येथे शहाशम्सुद्दीन याचा दर्गा आहे तेथे दफन करण्याची आज्ञा झाली, त्याप्रमाणे करण्यात आले. कबरीभोवती बाग व पक्क्या चार भिंती उभ्या करण्याची बादशहांनी आज्ञा केली.

असरच्या नमाजानंतर बादशहांनी डफळापूरचा ठाणेदार इमामुल्ला याला हुजुरात बोलाविले. त्याला एक तलवार बक्षिस देऊन डफळापूरला जाण्यास त्याला निरोप दिला.

मुर्तजाबाद मिरज येथील किल्लेदार व फौजदार मुफख्खरखान याने विनंती केली की 'छावणीतील माणसे माझ्या फौजदारीत असलेल्या खेड्यांतून जबर-दस्तीने उंट घेऊन त्यांच्यावर आपले सामान भरवून त्यांना नेतात.' बादशहांनी

हातघाईची लढाई चालू आहे. यात उभय पक्षात काही जण ठार अगर जखमी झाले आहेत.'

मुहंमद अमीन खान यास कळले की मराठे हे छावणीतील गुरे ढोरे लुटून नेत आहेत. तो तडक त्यांच्यावर चालून गेला. चकमक झाली. कांही बैल सोडवून घेण्यात आले. गुर्जदारांचा दारोगा सियादतखान हा गुर्जदारांसहित मुहंमद अमीन खानाच्या मदतीसाठी धावला. मीर आतिश (दारुगोळयाचा प्रमुख) याचा नायब फजले अलीखान हा तोफखाना घेऊन जागेवर पोहोचला. मराठे हल्ला करीत त्या वेळी हे लोक बंदुकी, शुतरनाळ, बाण इकडून उडवीत आणि पुन्हा बार. भरवून ठेवीत.

संध्याकाळी बादशहांना कळविण्यात आले की अद्याप युद्ध चालू आहे. रात्रीचा एक प्रहर झाला असता बातमी आली. की 'युद्ध करीत हमीदुद्दीनखान बहादुर हा दीड कोसपर्यंत गनिमांचा पाठलाग करीत गेला. तिकडचे एक खेडे त्याने घेतले. चोरानी (मराठ्यांनी) दोन तीन कोसावर तळ दिला होता. तिकडे ते जाऊ पाहात आहेत.' बादशहानी आज्ञा केली की 'अलाहाबादचा सुभेदार सिपाहदारखान याने एक हजार सैनिक पाठविले होते, त्यांना बाण व दारुगोळा देऊन हमीदुद्दीन खानाकडे पाठवा. त्याने तेथे मोर्चे बांधून राहावे.'

रात्रीच्या दोन घटका झाल्या असता हिदायत केश हा बहरामदंखानाकडून आला. त्याने बादशहांना सांगितले की बहरामदंखानाची विनंती पुढीलप्रमाणे आहे– 'मी हत्तीखान्याच्या बाजूने स्वतःच्या पथकासहित उभा आहे काय आज्ञा?' बादशहानी आज्ञा केली की खिदमतराय, बेलदारांचा दारोगा याने बेलदारांना घेऊन हत्तीखान्यापाशी तळ द्यावा. बक्षी बहरामंदखान याने आपले नोकर शिपाई यांना तेथे ठेवावे व स्वतः आपल्या तंबूस परतावे.'

बादशहाना कळविण्यात आले की मुहंमद अमीनखान याने दोन घोडे व शस्त्रे शमशेरबेग याने दोन घोडे व दोन चोरांची (मराठ्यांची) डोकी, फसीहबेगने एक घोडा, कौल तुर्क याने एक घोडा अशी लूट मिळविली आहे. ती त्यांना माफ करण्यात (त्यांना देण्यात) यावी अशी आज्ञा झाली. हमीदुद्दीनखानाच्या सैन्यांतील इसमाना वाटण्यासाठी दोनहजार अश्रफ्या देण्यात आल्या.

वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याने पुढीलप्रमाणे विनंती पत्र पाठविले.–

आपल्या आज्ञेप्रमाणे मी माझा मुलगा अलीरजा याला पथकांसुहित एलिचपूर मध्ये ठेवले. मी स्वतः इस्लामगड उर्फ देवगडकडे रवाना झालो. तेथील बंदोबस्ता. साठी मी खान फीरोजजंग याजकडून पथके मागविली. ती त्याने दिली नाही.

त्यामुळे मी चार हजार स्वार व दोन हजार पायदळ बाळगले आहेत त्यांच्या. पगारासाठी इकडे मिळणाऱ्या पेशकश (खंडणी) मधून एक लाख रुपये देण्याची कृपा व्हावी.

बादशहांनी विनंती मान्य केली नाही. त म्हणाले 'अलीमर्दानखानला सहा हजार जात व पाच हजार स्वार अशी मन्सब आहे.'

चोविस जानेवारी– आज शुक्रवार, बादशहाना मध्यरात्री कळविण्यात आले की 'आज्ञेप्रमाणे बक्षी उल्मुल्क बहरामदंखान, रुहुल्लाखान व मुहंमद अमीनखान हे आपल्या सैन्यासहित छावणी पासून पाव कोसावर तळ देऊन तयार आहेत. यार अलीबेग हा संध्याकाळ पासून सकाळ पर्यंत गुलालबार मधील शामियान्यात राहिला आहे.'

बादशहांनी तहव्वुरखानाला आज्ञा केली की 'दोनशे बाण, एक धनुष्य व दोन हजार अश्रफ्या हमीदुद्दीनखान बहादुर यांजपाशी पोहोचवून परत या.

सकाळी हरकाऱ्यांकडून कळले की धनाजी जाधव वगैरे सरदार आपल्या तळावरुन स्वार होऊन निघाले. ते दोन कोस पुढे निघून गेले. हमीदुद्दीनखान बहादुर त्यांचा पाठलाग करीत आहे.

पंचविस जानेवारी– सकाळी हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असें 'हमीदुद्दीनखान बहादुर हा मराठ्यांच्या तळावर (बुणग्यावर) चालून गेला त्याने तळ लुटला. मराठ्यांनी तळ पाठीशी घेऊन युद्ध केले. बाणा. बंदुकी, तलवारी इत्यादींची हातघाईची लढाई झाली. शत्रूचे अनेक लोक ठार अगर जखमी झाले. कंधार (नांदेड जिल्हा, मराठवाडा) चा किल्लेदार शम्शुद्दीन मुहंमदखान याला नऊशे जात व सहाशे स्वार अशी मन्सब असून तो हमीदुद्दीन खानाच्या फौजेत तैनात होता. तो या लढाईत मारला गेला. मोगलांचे इतरही काही जण जखमी झाले. अद्याप युद्ध चालू आहे. ते स्थळ बादशाही छावणीपासून अकरा कोसावर आहे.'

दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा मन्सूरखान हा शहाजादा बेदार बख्त याच्या फौजेत तैनात होता. त्याला हुजुरांत बोलावून घ्यावे अशी आज्ञा झाली.

हफ्तचौकी (बादशहाच्या भोवतालच्या सात चौक्या, हुजराती प्रमाणे) चा अमीन रशीदखान याने बादशहांना कळविले की 'हमीदुद्दीनखान बहादूर, मुनीम खान वगैरे अधिकारी शौर्याची शर्थ करीत आहेत.'

बादशहांनी बक्षी उलमुल्क बहरामंदखान याला आज्ञा केली की 'तुम्ही बादशाही छावणी भोवती फिरा. आणि सर्व काही पाहून छावणी भोवती खंदक तयार करा.

सव्वीस जानेवारी– हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'धनाजी जाधव वगैरे सरदारांची रायबाग हुक्केरीकडे हमीदुद्दीनखान बहादुर याजबरोबर पुन्हा लढाई झाली. लढाई हातघाईची झाली. शत्रूचे अनेक लोक ठार अगर जखमी झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रूचा पराजय होऊन त्याने पलायन केले. हमीदुद्दीनखान एक कोसपर्यंत त्यांचा पाठलाग करीत आहे. त्याला हवी आहे तोफखान्याची सामग्री.'

बादशहा म्हणाले 'आफरीन बाद, धन्य धन्य, वाहवा, शत्रु सैन्याला छान चोपून काढले.'

बादशहांनी खाशाचा भोजनाचा भाग व फळफळावळे हमीदुद्दीन खानाकडे व ख्वाजाबेग व इतर गुर्जबर्दार यांच्या द्वारे पाठविली.

अब्दुस्समदखान याने तोफखान्याची सामग्री हमीदुद्दीनखान याजकडे पोहोचवावी अशी आज्ञा केली. बादशहा बक्षी रुहुल्लाखान याला म्हणाले 'यलबरशखानाला लिहा, आज्जमतारागड (सातारा) वरून तोफखान्याची सामग्री त्याने लवकर हुजुरात आणावी.'

कंधारचा किल्लेदार शम्सुद्दीनखान हा मेला होता. त्याच्या जागी त्याचा मुलगा गुलाम कादरी याला कंधार (नांदेड जिल्हा, मराठवाडा) चा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले. शम्सुद्दीनच्या (तो लढाईत मारला गेला) इतर मुलांचे काय हुद्दे आहेत, कळवावे म्हणून आज्ञा झाली.

सत्तावीस जानेवारी– काल दिवस मावळण्यास सहा घटिका राहिल्या असता बादशहांना कळविण्यात आले की 'धनाजी जाधवाच्या मदतीस तीन चार हजाराचे पायदळ सैन्य येऊन पोहोचले. धनाजी जाधव परत फिरला. त्याने पुन्हा हमीदुद्दीनखान बहादुर याजवर हल्ला चढविला. चहूकडून शत्रू बाण व बंदुकी यांचा मारा करीत आहे. हमीदुद्दीन खानाबरोबर असलेला दारुगोळा संपला आहे. दारुगोळा, धान्य व कुमक पाठविल्यास बरे.'

बादशहांनी दिवसाच्या अखेरीस मुहंमद अमीनखान, मतलबखान व फजलेअलीखान यांना बोलाविले. मुहंमद अमीनखान यास तलवार, मंतरलेत (म्हणजे प्रार्थना पढून) कापड, मतलबखान व फजलेअलीखान यास एकेक धनुष्य अशा

बस्त्रे दिल्या आणि त्यांच्यासाठी कुशलतेची प्रार्थना (फातेहा नीयते खैर) पढून त्यांना हमीदुद्दीन खानाच्या कुमकेस पाठविले. त्यांच्या बरोबर पुढील सामग्री देण्यात आली. दोन हजार अश्रफ्या, दहा हजार रुपये, पन्नास मण सरब व दारु (बारुद), बाण व धान्य चारशे (मण?).

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान व रहुल्लाखान याना आपल्या सैन्यासहित छावणी भोवती गस्त घालीत राहावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

कंधारचा मृत किल्लेदार शम्सुद्दीनखान याचा मुलगा गुलाम कादरी याला कंधारचा किल्लेदार व फौजदार नेमण्यात आले होते. त्याला तीनशे जात व शंभर-स्वार अशी मन्सब होती. तीत दोनशे जात व दोनशे स्वार अशी भर घालण्यात आली. शम्सुद्दीनखानाचा भाऊ नसीरुल्ला याला तीनशे जात व पन्नास स्वार अशी मन्सब होती. तीत शंभर जात व पन्नास स्वार अशी भर घालण्यात आली.

फजले अलीखान याने विनंती केली की मला बाणांचे वीस भाते सरकारातून देण्यात यावेत. विनंती मान्य करण्यात आली.

अठ्ठाविस जानेवारी– हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते हे– 'मुहंमद अमीनखान वगैरे आपापली पथके घेऊन रातोरात निघाले. रात्रीच्या चार घटका राहिल्या असता ते हमीदुद्दीनखान बहादुर याला मिळाले. पण अमीन-खान तेथे जाऊन पोहोचण्यापूर्वीच धनाजी जाधव हा तेथून पळून गेला होता.'

मन्सूर खान हा शहाजादा बेदारबख्ताच्या छावणीतून येऊन भेटला. तो आणि त्याचा मुलगा मुहंमद जफर यानी बादशहाना नजरा दिल्या. नुस्रतजंग जुल्फिकार खान याच्या नांवे आज्ञा पत्र (हस्बुल हुकूम) सादर करण्यात आले. व ते पोहोचविण्यासाठी हमीद बेग गुर्जबर्दार याच्याकडे देण्यात आले.

वसंतगडचा किल्लेदार सूरतसिंग याला बदलण्यात आले. नौरसतारागड (परळी) चा किल्लेदार रावतमल झाला याच्याचकडे वसंतगडचा किल्ला पण देण्यात आला.

कंधार (नांदेड जिल्हा, मराठवाडा) चा किल्लेदार व फौजदार दिवंगत शम्सुद्दीन मुहंमदखान याचा मुलगा गुलाम काद्री याला खिलतीची वस्त्रे देऊन त्याच्याकडे एक घोडा पाठविण्याची आज्ञा करण्यात आली.

अेकोणतीस जानेवारी– दिवसाचा एक प्रहर व दोन घटिका झाल्या असता बादशहा दिवाणे खासमध्ये येऊन बसले. हमीदुद्दीनखान बहादुर हा धनाजी जाधवाच्या पारिपत्यासाठी गेला होता. कामगिरी बजावून तो परत

याचा मुलगा राणोजी हा मौजे जकजूती (?) येथे तळ देऊन आहे. धनाजीशी लढण्याचा त्याचा बेत आहे.

माळव्यातील जमीनदार व फौजदार यांनी तेथील सुभेदार मुखतारखान याला जाऊन मिळावे अशी आज्ञा झाली होती. देवळियाचा जमीनदार याने आपण आजारी असल्याचे निमित्त केले. तो स्वतःही बाहेर पडेना अगर पथकेही पाठवीना अशी तक्रार गुर्जबर्दार यांनी केली. बादशहांनी आज्ञा केली की 'यापुढे असे करु नये. नाहीतर बादशहाचा कोप ओढवून घ्याल.'

गढी दहीवाडी (दहीवडी) चा जमीनदार सादतमंद याला हुजुरात आणण्यासाठी ख्वाजा मिर्जा गुर्जबर्दार याची नेमणूक करण्यात आली.

सतरा जानेवारी– आज शुक्रवार, कचेऱ्यांचे काम बंद होते, बहरामंदखान व मतलबखान हे गस्त घालण्यास व शिकार करण्यास गेले होते. त्यांनी चिकारा, चित्रपक्षी व इतर पक्ष्यांची शिकार केली.

अठरा जानेवारी– अंबरचा राजा जयसिंग (सवाई जयसिंग) हा हुजुरात येण्यास विलंब लावीत आहेत अशी तक्रार आल्यावरुन तो दोन महिन्यांत आलाच पाहिजे अशा अर्थाचा मुचलका त्याच्या वकिलाकडून घेण्यात आला.'

बादशहांनी बहुल्लाखानास आज्ञा केली की 'आम्ही जेव्हा तळावरून कूच करु तेव्हा लागतील तेवढीच ओझ्याची जनावरे बरोबर ठेवा. बाकीची चरविण्या· इतर ठिकाणी पाठवा.'

बादशहांना कळविण्यात आले की 'मीर आतिश (दारुगोळ्याचा प्रमुख) तरबियत खान याने पन्हाळगडच्या टेकडीवर मोठी तोफ चढविली असून तो किल्याच्या दरवाजावर मारा करीत आहे. किल्ल्याची भिंत (तट) पडली तर मोर्चे पुढे नेता येतील.'

मुहंमद अमीनखान व मतलबखान यांनी पाळीपाळीने कही आणण्यास जावे. त्यांच्याबरोबर देण्यात येणाऱ्या पथकातील सैनिकांची यादी (तूमार) तयार करण्यात यावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

बुऱ्हाणपूर (खानदेश) चा सुभेदार सद्रुद्दीन मुहंमदखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली

एकोणीस जानेवारी– आज्जमतरागड (सातारा) चा फौजदार यासीनखान याने पुढीलप्रमाणे कळविले 'पाईने विलायत (पुणे प्रान्त) मधून वीस

हजार बैल धान्याच्या गोण्या लादलेले आले आहेत. ते कऱ्हाडपर्यंत पोहोचविले आहेत. आज्ञा होत असेल तर माझा मुलगा अब्दुलरऊफ याला येथील फौजदारीवर माझा नायब म्हणून ठेवीन व स्वतः रसदेचे बैल हुजुरात पोहोचवीन.'

बादशहानी आज्ञा केली ' रसद कऱ्हाडचा ठाणेदार किशनराव (कृष्णराव) याच्या हवाली करा. तो ती हुजुरात पोहोचवील.'

मरहूम हबशखान याचा मुलगा शेख तय्यब हा बादशहापाशी रुजू झाला. त्याचे वय नव्वद वर्षांचे होते. त्याच्याकडे पाहून बादशहा म्हणाले ' याच्या मन्सबीत वाढ हवी असल्यास द्या.' यार अलीबेग याने विनंती केली की त्याला एक गांव इनाम म्हणून देण्यात यावा. विनंती मान्य करण्यात आली.

मुहंमद अमीनखानाच्या बरोबर कही आणण्यासाठी म्हणून जाण्यासाठी नेमलेल्या स्वारांची संख्या तीन हजार आठशे व मतलब खानाबरोबरच्या स्वारांची संख्या दोन हजार दोनशे पंचाऐंशी भरली. ती यादी बक्षी उलमुल्क बहरामंदखान याने बादशहा समोर ठेवली.

वीस जानेवारी– नळदुर्गचा फौजदार इल्तिफातखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

कल्बेअलीने विनंती केली की ' आज्ञेप्रमाणे मरहूम मुखलिसखान याच्या कुटुंबियांना मी तळावर (ब्रह्मपुरी) घेऊन जाईन, पण वाटेत चोर (मराठे) पसरले आहेत. माझ्यापाशी लहान पथक आहे, दुसऱ्या कुणाची तरी नेमणूक व्हावी' मुनीमखानाचा मुलगा महंमद काजम याने जावे अशी आज्ञा झाली.

एकवीस जानेवारी– हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की बंजारी लोक धान्याच्या गोण्या बैलावर लादून आणीत होते उस्मान पुऱ्याजवळ मौजे कोर्ची (कुडची ?) येथे धनाजी जाधव याने त्यांना घेरले असून युद्ध चालू आहे. कुमक व्हावी.'

बादशहा म्हणाले ' बहरामंदखानाने चौकशी करून वृत्तांत सादर करावा.

बादशहांना कळविण्यात आले की ' अनाजी वगैरे (मराठे) सरदार किल्ले बलकोंडा (बालकोंडा, जिल्हे निजामाबाद, आंध्र प्रदेश, त्याकाळी सुभे नांदेड बिदर(?) च्या परिसरात पसरले. तेथील फौजदार मीरहसन हा त्यांच्यावर चालून गेला. पण शत्रूचे सैन्य अधिक. त्यांनी त्याचा पराजय केला. तो निसटून बाळकोंडा किल्ल्यात आश्रयासाठी आला.' दुसरा फौजदार नेमावा अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की 'मुहंमद अमीन खान व मतलब खान यांनी आपल्या पथकासहीत दोन कोस पर्यंत गस्त करीत जावे. करावलांनी (टेहेळयांनी) चहूकडे लक्ष ठेवावे.'

बावीस जानेवारी– काल छावणीतील गंजाचा (बाजाराचा) करोडी सय्यद इमामुद्दीन याने कळविले की 'येथून सात कोसावर बंडखोर (मराठे) पसरले असून त्यांनी रसदेचे बैल आणणाऱ्या बंजाऱ्यांना घेरले आहे. चकमकी चालू आहेत. बंजाऱ्यांना मदत व्हावी बादशहांनी आज्ञा केली की 'चौकशी करा. हेरांनी वरील प्रमाणे बातमी आणली असेल तर शत्रूचें पारिपत्य करण्यासाठी सैन्य पाठविता येईल.'

दिवसाच्या शेवटी हरकाऱ्यांनी कळविले की 'धनाजी जाधव वगैरेंनी उस्मानपूर पासून तीन कोसावर तळ दिला आहे. बादशाही छावणीपासून ते दूर गेले आहेत. आपले जडबाजारबुणगे भूषणगडकडे पाठवावे व स्वतः छावणी भोवती घिरटया घालीत पन्हाळगडाकडे जावे असा त्यांचा बेत आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की 'रुहुल्लाखान, मुहंमद अमीन खान, मतलबखान वगैरेंनी उद्या सकाळी लष्करापासून दोन तीन कोसावर गस्त घालण्यासाठी जावे. तेथे बंडखोर (मराठे) आढळले तर त्यांचे पारिपत्य करावे.' बादशहांनी बहरामंद खान बक्षी याला सांगितले की 'रुहुल्लाखानाबरोबर चार हजार, मुहंमदअमीन खानाबरोबर तीन हजार व मतलबखान याजबरोबर दोन हजार अशा स्वारांच्या सैन्याची तयारी (तुमार, मस्टर रोल) करा.'

त्याप्रमाणे रुहुल्लाखान वगैरे आज रवाना झाले. बादशहा बक्षी उल्मुल्क बहरामंदखान यास म्हणाले 'धनाजी जाधवाच्या पारिपत्यासाठी नऊ हजार स्वारांची फौज तयार करा. ती हमीदुद्दीनखान बहादुर याजबरोबर देऊ'

तेवीस जानेवारी– नजाबत खानाचा मुलगा व बागलाण्याचा फौजदार बहरावरखान याला सुलतानपूर नंदुरबारची फौजदारी देण्यात आली. तेथील माजी फौजदार व सय्यद अब्दुल्लाखानाचा मुलगा हसनअलीखान याला होशंगाबादचा फौजदार म्हणून नेमण्यात आले.

आज सकाळी हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे 'बादशहा छावणी पासून आठ कोसावर मोजे लकन (?) हे स्थळ आहे. चोरांचा (मराठ्यांचा) सरदार धनाजी याने आपल्या सैन्याची एक तुकडी व बुणगे ही कोल्हापूरकडे पाठविली. दुसरी तुकडी तडफदार घोडयांची असून ती बादशाही छावणीभोवती घिरटया घालीत आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की हमीदुद्दीन याने फौजेसहित तयार राहावे. बक्षी उल्मुल्क याने आठ हजार सातशे सत्तर स्वार तयार केले. हमीदुद्दीनच्या फौजेवर मुनीमखान याची बक्षी व वाकनीस म्हणून नेमणूक केली आणि ही व्यवस्था बादशहाच्या नजरेस आणली.

तो पर्यंत हरकाऱ्यांच्या बातम्यांवरून हमीदुद्दीनखान बहादूर याने बादशहांना कळविले की हलकट शत्रूचे सैन्य बादशाही छावणी पासून तीन कोसावर आले आहे.

यार अलीबेग याने विनंती केली की 'प्रथम मुनीमखानाला आज्ञा व्हावी की त्याने सैन्य घेऊन छावणीच्या बाहेर ठाण मांडून राहावे. हमीदुद्दीनखान याच्या सहकाऱ्यांना त्याच्या बरोबर जाण्यास निरोप देण्यात यावा.' बादशहानी विनंती मान्य केली. नुस्रतखान हा हमीदुद्दीनखानाच्या फौजेत तैनात होता. त्याला अंमल-बजावणी अधिकाऱ्याकरवी मुनीमखानाकडे पोहोचवावे अशी आज्ञा झाली.

स्वतः हमीदुद्दीनखान याला बादशहांनी दोन प्रहरी निरोप दिला. त्याला एक तलवार देण्यात आली. निरोपाच्या वेळी बादशहा फातेहा (प्रार्थना) पढले.

हमीदुद्दीनखान सैन्य घेऊन कृष्णेच्या काठावर पोहोचला. तेथून त्याने मुहमद आरिफ कौल याजबरोबर बादशहाकडे पुढील निरोप पाठविला– 'शत्रूचे सैन्य छावणीपासून एक कोसावर आले आहे. छावणीपासून इतक्या जवळ लढाई करण्यासंबंधी आपली काय आज्ञा आहे!' बादशहांनी आज्ञा केली की 'युद्ध करा.'

त्याप्रमाणे युद्धाला तोंड लागले. तीर व तफग बाण व बंदुकी यांचा वापर होऊ लागला.

या सुमारास बादशहास कळविण्यात आले की काफरांचे (मराठ्यांचे) सैन्य संख्येने अधिक आहे.

बादशहांनी आज्ञा केली की 'बहरामंदखान, अर्शदखान, व इनायतुल्लाखान यांनीही युद्धास जावे.' रुहुल्लाखान यास आज्ञा झाली की 'तुम्ही व सफशिकन खान यांनी पथके घेऊन उजव्या फळीबद्दल सावधानता बाळगावी.'

इतक्यात बातमी आली की 'मतलबखान व मराठे यांच्यात युद्ध चालले आहे. मराठ्यांचे सैन्य मोठे आहे. ते चारी बाजूंनी मतलबखानावर चालून गेले आहेत.' पुन्हा बातमी आली की 'मरहूम खान जहान याची पथके मतलबखानाच्या मदतीला धाऊन गेली आहेत. मराठे तिकडून हटले असून ते आता हमीदुद्दीन खानाशी युद्ध करीत आहेत. यात मुनीमखान, हाफिज अंबरी, राजा अवधूतसिंग (ओर्छ्याचा राजा) राजा सुजानसिंग (बीकानेरचा राजा) यात गुंतले असून

आज्ञा केली की 'करावलांना (टेहळे) ताकीद करा. असे कोणीही उंट घेऊन आले तर त्यांना ताब्यात घेण्यात येईल.

नगारखान्याचा दारोगा खिदमत तलबखान याने छावणीत कर्णे वाजवीत जावे अशी आज्ञा करण्यात आली.

चार जानेवारी– काल रात्री रुहुल्लाखान याने येऊन मुखलिसखानाच्या मालमत्तेचा तपशील दिला तो असा – बावीस हजार बासष्ठ रुपये व चार अश्रफ्या नगद, छप्पन्न घोडे त्यापैकी सतरा घोडे सरकारात आहेत, बाकी नळदुर्ग येथे सहा हत्ती, पोशाख वगैरे औरंगाबाद, दिल्ली, बंगाल इत्यादी ठिकाणी. मुखलिस खानाची मालमत्ता असल्यास ताब्यात घ्यावी अशी पत्रे लिहिण्याची आज्ञा झाली.

मुखलिसखानाचा मुलगा मुहंमद हसन याला पाचशे जात अशी मन्सब होती. तीत दोनशेची वाढ करण्यात येऊन त्याला नळदुर्गहून बोलावून घेण्यात आले.

पाच जानेवारी– मुखलिसखानाचे कुटुंबीय, अनुयायी व नोकरवर्ग यांना वर्षासने, जहागिरी, नोकऱ्या इत्यादी देऊन त्यांची सोय करण्यात आली.

बतावल (?) चा जमीनदार कान्होजी याने बहरामंद खानाच्या द्वारे पुढील विनंती केली–

१) शिवाजीने माझ्या वडिलांना ठार मारून माझी जमीनदारी बळकाविली. मी हुजुरात आलो. माझ्या नांवे जमीनदारी होऊन फर्मान मिळावा. आज्ञा झाली की पन्हाळा फत्ते झाल्यावर जमीनदारीचा फर्मान देण्यात येईल.

२) माझी एक लाख चार हजार रुपये उत्पन्नाची जहागीर तीस वर्षे झाली, मला मिळाली नाही. मला असलेली जहागीरी निकृष्ट आहे. मला परगणे बवादा (?) जहागिरीत देण्यात यावा. आज्ञा झाली की अर्शदखान दिवाण खालसाच्या द्वारे अर्ज करावा.

३) बरसन पराना (?) चे ठाणे माझ्या जमीनदारीला लागून आहे. तेथे मराठे (गनीम, बंडखोर) येऊन तळ देतात. तेथील ठाणेदारी मला द्यावी म्हणजे मी त्यांचे व्यवस्थित पारिपत्य करीन. विनंती मान्य झाली नाही.

सहा जानेवारी– अब्दुलरमूलखान याला अभणीची ठाणेदारी व डफळापूर पर्यंतच्या मार्गाचे रक्षण करण्याची कामगिरी देण्यात आली. त्याला निरोप देण्यात आला.

बादशहांनी सफशिकनखान याच्या प्रकृतीची विचारपूस करून निरोप धाडला की 'येथील हवापाणी चालत नसल्यास रजा घेऊन औरंगाबाद अगर बुऱ्हाणपूर येथे जावे. त्याने सांगितले की हयातभर येथेच आपल्या सेवेत राहावे ही इच्छा आहे. बादशहांनी विनंती मान्य केली.

हैद्राबाद– कर्नाटकचा फौजदार आणि जुल्फिकारखानाचा नायब दाऊदखान (पन्नी) याने विनंती लिहून पाठविली की गोविंद आदि मराठ्यांचे सरदार या प्रदेशांत फिरत होते. मी त्यांच्यावर चालून गेलो. गोविंद वगैरे सरदार मारले गेले एक मनुष्य कैद झाला. लुटीत सहा हत्ती व चाळीस घोडे हाती लागले, काही कृपा (बक्षीस वगैरे) व्हावी.' विनंती मान्य करण्यात आली.

यलबरश खानाच्या ऐवजी मरहूम अईजखान याचा नातू शमशेरबेग याची करावल म्हणून नेमणूक करण्यात आली.

सात जानेवारी– बऱ्हाणपूर (खानदेश) चा सुभेदार मोतिकदरखान याने मक्केच्या यात्रेस जाण्याची परवानगी मागितली. त्याच्या जागेवर अहदींचा मीरबक्षी सद्रुदीन याची खानदेशचा सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. सद्रुद्दीनच्या जागेवर सफशिकनखान व त्याच्या जागेवर (मीर तुजक) मतलबखान अशा नेमणुका करण्यात आल्या.

आठ जानेवारी– मतलब खानाच्या ऐवजी मीर तुजक (शिष्टाचाराचा अधिकारी) म्हणून इंदापूरचा ठाणेदार मुगलखान याची नेमणूक करण्यात आली. इंदापूरवर आपला एक कारभारी ठेवून त्याने हुजुरात यावे अशी आज्ञा करण्यात आली.

बक्षी म्हणून रुहुल्लाखान खानसामान याची नेमणूक करण्यात आली.

नऊ जानेवारी– आज बादशहा मुर्तजाबाद मिरज किल्ल्याजवळील आपल्या निवासस्थानाहून निघाले. अर्ध्या कोसाचा प्रवास तख्तेखावर करून ते कृष्णाकाठच्या मुक्कामावर आले. रुहुल्लाखान याची मुखलिस खानाच्या जागी दुय्यम बक्षी म्हणून नेमणूक करण्यात आली.

शम्सुद्दीन मुहंमदखान (कंधारचा किल्लेदार) कल्बेअली व इतर शिपाई वगैरे साडेसातशे माणसे यांनी तळावर (ब्रम्हपुरी) जावे. फत्ते उल्लाखान येईपर्यंत तेथे राहावे. तो आल्या नंतर मुखलिसखानाचा मुलगा मुहंमद हसन यास घेऊन हजुरात यावे अशी आज्ञा झाली.

दहा जानेवारी– शुक्रवार, कचेऱ्यांचे काम बंद ठेवण्यात आले.

अकरा जानेवारी– अलाहाबादचा सुभेदार सिपाहदारखान याने एक हजार बंदूकची भरती करून पाठविले होते. त्यांना तोफखान्यात घ्यावे अशी आज्ञा तोफखान्याचा नायब दारोगा फजले अलीखान यास देण्यात आली

तोफखाना कृष्णानदीच्या पलीकडच्या काठावर लावण्यात यावा अशी आज्ञा करण्यात आली.

फतेउल्लाखान याला हुजुरात ताबडतोब बोलावून घेण्यात यावे अशी आज्ञा मुल्तफतखान याला देण्यात आली.

हुजुरातील म्हशी कोरड्या झाल्या असतील त्यांना औरंगाबादेस पाठविण्यात यावे अशी आज्ञा करण्यात आली.

राव दलपत बुंदेला याचा मुलगा रामचंद्र याने विनंती केल्यावरून त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

बारा जानेवारी– औंध (औंढा ?) चा किल्लेदार व फौजदार शेख मुहंमद माह याने त्याला जुळी मुले झाल्याबद्दल नऊ अश्रफया व विनंती पत्र पाठविले. बादशहांनी एका मुलाचे नांव अहमद माह व दुसऱ्याचे हामिद माह असे ठेवले.

अहमदाबाद (गुजरात) या सुभेदार शुजाअतखान याने कळविले कीं 'आज्ञे प्रमाणे माझा मुलगा नजरअली हा तिकडे येण्यासाठी निघाला असून तो लवकरच तेथे येऊन पोहोंचेल.'

तेरा जानेवारी– मुहंमदाबाद बीदरचा सुभेदार खुदाबंदाखान याने बंडखोर नागोजी हटकर (?) याचे डोके कापून पाठविले. त्या बरोबर एक ढाल व अकरा अश्रफया पाठविल्या.

संगमनेरचा फौजदार रजातलबखान याने डाळिंबाच्या दहा करंड्या पाठविल्या . त्या पैकी आठ गोड डाळिंबाच्या व दोन आंबट गोड डाळिंबाच्या होत्या.

बादशहांनी आज्ञा केली की ख्वाजाखान याने पथके घेऊन उंट चरविण्यासाठी उजव्या दिशेने जात राहावे.

खालील इसमांकडे आज आज्ञापत्रे रवाना करण्यात आली–

१) जुम्दतुल्मुल्क असदखान (मुख्य प्रधान) (२) वऱ्हाडचा सुभेदार अली

मर्दानखान (३) बदामीचा फौजदार उल्फत खान (४) नागोजी माने.

मुर्तजाबाद मिरज येथील किल्लेदार व फौजदार मुफख्खर खान यांचा मुलगा जुहरल्ला खान याने विनंती केली कीं 'छावणीतील माणसे मिरजेकडे येतात. छावणीत चोऱ्यामाऱ्या होतात. छावणींतील अधिकारी मला त्रास देतात. छावण्यांतील चोऱ्यामाऱ्यांचा मी बंदोबस्त करणे अशक्य आहे'

बादशहांनी आज्ञा केली कीं 'छावणींतील अधिकाऱ्यांनी त्याला त्रास देऊ नये. चोरीचा माल जर त्याच्या इलाख्यात सापडला तर त्याचा पत्ता लावावा.'

चौदा जानेवारी– 'शबे कद्र' या सणाची रात्र. बादशहांनी रात्रभर जागरण केले. म्हणून कचेऱ्यांचे कामकाज झाले नाही.

हरकाऱ्यांच्या कडून कळले ते असे– 'तुर्कताजखान व हुसेन सय्यद हे गस्त घालण्यासाठी म्हणून छावणीपासून दोन कोसावर गेले होते. चोरांचे (मराठ्यांचे) जवळ जवळ तीनशे स्वार छावणीतील उंट व गुरेढोरे लुटावी म्हणून आले होते. तुर्कताजखानाला ही बातमी कळताच तो त्यांच्यावर चालून गेला. शत्रूचा सनाजी (संताजी ?) नावाचा सरदार होता. तो व इतर दोन बंडखोराना पकडण्यात आले. शत्रूपैकी तीन माणसे ठार झाली. नऊ घोडे, भाले वगैरे शस्त्रेही लुटीत मिळाली.'

बादशहा म्हणाले, 'सेवा मान्य झाली.' संध्याकाळी बादशहांना कळविण्यात आले की. 'मुर्तजाबाद मिरजे जवळच्या डोंगरात बंडखोरांचे (मराठ्यांचे) दोनशे स्वार जमले असून ते रस्त्यावरील वाहतुकीवर आक्रमण करीत आहेत.' बादशहानी आज्ञा केली की, ख्वाजाखान याने पथके बरोबर घेऊन त्यांचे पारिपत्य करावे. आज्ञे प्रमाणे ख्वाजाखान रातोरात रवाना झाला.

पंधरा जानेवारी– 'ख्वाजा अंबर नायब नाझर याने शहाजहानाबाद (दिल्ली) येथून कळविले की चितबाडा मोहल्ल्यात एका सावकाराच्या घरावर दरोडा पडला. त्याचे सर्वस्व लुटले गेले. त्याचा मुलगा मारला गेला.' अशा गोष्टी नित्याच्याच झाल्या आहेत.' तेथील सुभेदाराला ताकीद पत्रे लिहावीत अशी आज्ञा झाली.

सोळा जानेवारी– हरकाऱ्यांकडून कळले ते असे–

धनाजी जाधव हा मोठे सैन्य घेऊन परंड्याहून निघाला. तो ब्रह्मपुरीजवळ मौजे बिछवल (?) येथे तळ देऊन राहिला आहे. नरकवासी संताजी (घोरपडे)

आला तो व त्याचे पुढील सहकारी यांना पुढील प्रमाणे बढत्या देण्यात आल्या.

हमीदुद्दीनखान बहादुर – मूळ अडीच हजार जात व चवदाशे स्वार
बढती – पाचशे जात व शंभर स्वार.

मुहंमद अमीनखान – अडीच हजार जात व आठशे स्वार
बढती – पाचशे जात.

मतलबखान – (दोन हजार व पाचशेस्वार) खिलतीची वस्त्रे
फजले अलीखान खिलतीची वस्त्रे

राजा अवधूतसिंग – बुंदेला दोन हजार जात व अडीच हजार स्वार
बढती – पांचशे जात.

इखलासखान मियाना अफगाण – चार हजार जात व चार हजार स्वार,
बढती – एक हजार जात.

ख्वाजाखान – एक हजार जात व तीनशे स्वार,
बढती – शंभर स्वार.

सय्यदखान – सातशे जात व दीडशे स्वार,
बढती – शंभर स्वार.

तुर्कताजखान – सातशे जात, शंभर स्वार,
बढती – शंभर जात व पन्नास स्वार.

मुनीमखान हमीदुद्दीनच्या फौजेतील बक्षी व वाकनीस – सातशे स्वार जात व दोनशे स्वार
बढती – दोनशे जात, पन्नास स्वार.

मरहूम अन्वरखान याचा मुलगा मुहंमद अतहर – चारशे जात व सत्तर स्वार
बढती – तीस स्वार व खान ही पदवी.

अन्वरखानाचा दुसरा मुलगा मुहंमद मुनव्वर – तीनशे जात व वीस स्वार
बढती – तीस स्वार.

मतलबखानाचा मुलगा असदुल्ला – तीनशे जात, तीस स्वार,
बढती– शंभर जात.

मतलबखानाचा दुसरा मुलगा अबू तालिब – दोनशे जात,
बढती – पन्नास.

मरहूम अवरखान याचा नातू शमशीरबेग – तीनशे जात व पन्नास स्वार,
बढती – शंभर जात.

बादशहाच्या कारकिर्दीचे पंचेचाळिसावे वर्ष सुरू झाले. बक्षीउल्मुल्क बहरामंदखान, रुहुल्लाखान मुल्तफतखान वगैरे प्रमुख अमीरानी बादशहाना या निमित्ताने अभिनंदन पूर्वक तसलीमात (कुर्निसातचा एक प्रकार) केले.

अेकतीस जानेवारी– छावणींतून काफिला व हत्तीखाना हा मुहंमद अमीन खानाबरोबर तळावर (ब्रह्मपुरी) पोहोचविण्याचे ठरले होते. पण अमीनखानाच्या ऐवजी राजा अवधूतसिंग (ओछर्याचा राजा), राव सुजाणसिंग (बिकानेरचा राजा), मुहंमद काजिम यांची पथके व नरकवासी (जहन्नमी) संभाचा मुलगा राजा शाहू याची पथके यांनी हे काम पार पाडावे अशी आज्ञा झाली. आज्ञेप्रमाणे मुहंमद अमीनखान हा मिरज गांवाहून परत बादशहाकडे आला.

फेब्रुवारी १७०१

एक फेब्रुवारी– फीरोजगड (यादगीर, गुलबर्गा जिल्हा) चा किल्लेदार व फौजदार मुफख्खरखान (हा पूर्वी मिरजेचा किल्लेदार होता) याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. त्याचा मुलगा जुहरुल्ला याला मुर्तजाबाद मिरजची फौजदारी देण्यात आली. अब्दुलकय्यूम याला मुर्तजाबाद मिरजची किल्लेदारी देण्यात आली.

जुल्फिकारखान याने लिहून पाठविले की 'मी धनाजी जाधवावर चालून गेलो. चिकोडी (बेळगांव जिल्हा) च्या पलीकडे सहा कोसावर युद्ध झाले आपल्या कृपेने अनेकांना ठार अगर जखमी करण्यात आले. शत्रूचा पराजय झाला शत्रू पळून गेला.' बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.'

तीन फेब्रुवारी– शहाजादा बेदारबख्त व जुल्फिकारखान यांच्याकडे बादशहाची फर्माने रवाना झाली. बादशहांनी बेदारबख्ताकडे पांच डाळिंबे व चार नाशपात्या व जुल्फिकारखानाकडे चार डाळिंबे व तीन नाशपात्या अशी फळे पाठविली.

धनाजी जाधवाच्या पारिपत्यासाठी जुल्फिकारखाना बरोबर सुभानजी वगैरे सरदार तैनात होते. त्यांना पुढील प्रमाणे बक्षिसे–बढत्या देण्यात आल्या–

सुभानजी	एक कटयार
गोरखोजी	खिलतीची वस्त्रे
रणदूलाखान	कटयार
सुल्तानसिंग राठोड	जमदाड (खंजीर)

राव दलपत बुंदेल्याची मुले भारतीसिंग पृथ्वीसिंग व मिथी मन्सबीत वाढ

निजामुद्दीन ख्वेशगीचा मुलगा हसन–मन्सबीत वाढ

खिजरची मुले इब्राहीम व आदज्जम–मन्सबीत वाढ

चार फेब्रुवारी– गोरखोजी हा जुल्फिकारखानापाशी तैनात होता. त्याला दीड हजार जात व बाराशे स्वार अशी मन्सब होती. त्याला शंभर स्वार अशी बढती देण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार इल्तिफातखान बहादुर याने मरहूम मुखलिस खान याचा मुलगा मीरहसन यास हुजुरात आणावे व कलबे अलीने नळदुर्गला जावे.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे–

' धनाजी जाधवाने कृष्णा मल्हार बरोबर दहा हजार स्वार देऊन त्याला राजमार्गावर (शाहराह, हायवे) पाठविले आहे. तो स्वतः चिकोडीच्या बाजूस राहिला आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की मुहंमद अमीन खान याच्याबरोबर सैन्य देण्यात येईल त्याचा तपशील (तूमार, मस्टर रोल) तयार करण्यात यावा.

बादशहांना कळविण्यात आले की सय्यद अलीचा मुलगा मुहंमद रजा हा बादशहाच्या जल्लमध्ये (निकट) एक सेवक होता. त्याने वेडाच्या भरात सय्यद मुजाहिदचा मुलगा सय्यद इसहाक याला कटयारीने ठार मारले. सय्यद इसहाकला पांचशे जात व ऐंशी स्वार अशी मन्सब होती. बादशहानी मुहंमद रजाच्या नोकरीची व दर्जाची चौकशी करण्याची आज्ञा केली.

पाच फेब्रुवारी– बक्षी उल्मुल्क बहरामदखान हा आजारी होता. तो बरा होऊन बादशहांना भेटला.

बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याने मुहंमद अमीनखान याजबरोबर पाठविण्यात येणाऱ्या सैन्याचा तपशील सांगितला. या सैन्यात राजा अवधूतसिंग, मिर्जा सद्रुद्दीन मुहंमद खान, ख्वाजाखान, राव सुजाणसिंग वगैरे अधिकारी असून सैन्य बळ चार हजार सहाशे स्वारांचे होते. बादशहाने मुहंमद अमीन खानाला या सैन्यासहित पन्हाळगडाच्या दिशेने जाऊन कृष्णा मल्हार याचे पारिपत्य करावे म्हणून निरोप दिला. बादशहा या वेळी फातेहा खैर ही प्रार्थना पढले. अमीनखानाबरोबर खालील प्रमाणे तोफखान्याचा सरंजाम द्यावा अशी आज्ञा झाली–

पांचशे प्यादे, बाण दोनशे, शुतरनाळ पाच, सरब दारू पंधरा, बेलदार पन्नास, पाणी वाहणारे पाच, कुऱ्हाडी चालविणारे तीस.

बादशहांना कळविण्यात आले की 'नरकवासी रामा (राजाराम) याचा पेशकार (कारभारी) रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) व दादो मल्हार हे पांच हजार सैन्य घेऊन दंड राजपुरीचा किल्लेदार व फौजदार सिद्दी याकूतखान याच्यावर चालू गेले आहेत. सिद्दीने युद्धाची तयारी केली आहे. कल्याण भिवंडीचा ठाणेदार मातबरखान याची कुमक आपल्याला मिळावी अशी त्याने विनंती केली आहे. रुहुल्लाखानाने मातबरखानाला या संबंधी लिहावे अशी आज्ञा झाली.

संगमनेरचा फौजदार रजातलबखान याने विनंती पत्र व डाळिंबाची करंडी पाठविली.

वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याने विनंती पत्र पाठविले ते बादशहांनी नजरेखालून घातले.

सहा फेब्रुवारी– (रमजान) आज कचेऱ्या बंद होत्या.

सात फेब्रुवारी– इखलासखान मियाना याने विनंती केली की परगणे नौस (नेवासा ?) मला तनखा जहागीर म्हणून देण्यात आला आहे. तेथील फौजदारी पण मला देण्यात यावी. विनंती मान्य करण्यात आली. त्याने मदत म्हणून दोन हत्ती मागितले. त्याला एक हत्ती देण्यात यावा अशी आज्ञा झाली.

हरकऱ्यांच्या तोंडून कळले की, 'धनाजी जाधव हा चिकोडी जवळ होता. त्याला कळले की जुल्फिकारखान बहादुर हा पन्हाळगडाहून कोल्हापुरापर्यंत पोहोचला आहे. हे ऐकून त्याने चिकोडीहून पळून जाण्याची तयारी केली. तो कुणीकडे जाणार हे कळले नाही. मुहंमद अमीनखान हा कृष्णा मल्हार वगैरे सरदारांच्या पाठलागावर त्याच दिशेने गेला. मुहंमद अमीन खानापाशी सैन्य फार थोडे आहे. मिर्जा सद्रुद्दीन मुहंमदखान, मीर नुरुल्ला व यक्काताजखान हे आजारी असल्यामुळे मुहंमद अमीनखान याजपाशी पोहोंचले नाहीत. बादशहांनी आज्ञा केली की मतलबखान व फजले अलीखान यांनी मुहंमद अमीनखानाच्या साहाय्यास जावे.

आठ फेब्रुवारी– मरहूम अमीरखान (काबुलचा माजी सुभेदार) याचा मुलगा मुहंमद इब्राहीम याला रहमतखान ही पदवी देण्यात आली.

मतलबखान व फजले अलीखान हे पथके घेऊन मुहंमद अमीन खानाच्या कुमकेसाठी म्हणून छावणीपासून तीन कोस पुढे गेले होते. बादशहाच्या आज्ञेने ते तेथून परत आले. त्यांना दिवाणे खासमध्ये बोलाण्यात आले. बादशहांनी आज्ञा केली की 'मुहंमद अमीन खान याने आपले सैन्य घेऊन शाही हत्तीखाना मुर्तजाबाद मिरजेच्या पुढे दोन तीन मजला पर्यंत पोहोचवावा. पण वाटेत गनिमांची (मराठ्यांची) धामधूम फार असल्यास त्याने (अमीन खान) शाही हत्तीखाना थेट तळापर्यंत (ब्रह्मपुरी) पोहोचवावा.

सुभे मुहंमदाबाद (नांदेड बीदर)चा सुभेदार व रामगीर (आता करीमनगर जिल्हा आंध्र प्रदेश गोदावरीचे दक्षिण तीर) चा फौजदार खुदाबंदाखान (शायिस्ताखानाचा मुलगा) याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

दहा फेब्रुवारी– (रमजान उपवासाचा महिना) आज कचेऱ्या बंद होत्या.

अकरा फेब्रुवारी– दिल्ली येथे मुहंमद अमीनखान (दिवंगत बक्षी व सुभेदार) याचा वाडा होता तो मुखलिसखान बक्षी याला राहण्यासाठी दिला होता. तोही (मिरजेत) वारला. तो वाडा आपल्याला मिळावा म्हणून गाजिउद्दीनखान बहादुर (शहाबुद्दीन, फीरोज जंग, भावी निजामु-ल्मुल्काचा बाप) याने विनंती केली. त्याला तो फक्त राहाण्यासाठी देण्यात यावा म्हणून आज्ञा झाली. (सरदारांचे वाडे त्यांच्या मृत्यू नंतर मालकीचे होत.)

बारा फेब्रुवारी– खान फीरोजजंग (निजामुल्मुल्काचा बाप) हा तळाजवळ (ब्रह्मपुरी) पोहोचला आहे असे बादशहांना कळविण्यात आले.

पवनारच्या बातम्यावरुन पुढीलप्रमाणे कळले–

अलाहदाद हा देवगड (नागपूर प्रांत) चा पूर्वीचा जामीनदार त्याला काढून टाकण्यात आले होते. तो येथून (पवनार) पळून निगून बख्त याजकडे देवगड उर्फ इस्लामगड येथे गेला. निगून बख्ताने त्याला तेथे ठेवले आहे.' वऱ्हाडचा सुभे-दार अलीमर्दान खान याला त्याचे (अलाहदाद) पारिपत्य करावे म्हणून लिहि-ण्यात यावे अशी आज्ञा झाली

काल रुहुल्लाखानाने विनंती केली की 'पन्हाळगड जिंकून घेण्यासाठी कूच करावे असे ठरले आहे. ओझी वाहाणारे व इतर यांना रकमा द्याव्या लागतील या संबंधी काय आज्ञा?' बादशहा म्हणाले 'याचे उत्तर या महिन्याच्या पंचवीस तारखेला (बावीस फेब्रुवारी १७०१) देऊ.'

ख्वाजा सिद्दीक हा बादशहाना कॉफी पाजीत असे, त्याला बक्षीस देण्यात आले.

तेरा फेब्रुवारी– आज कचेऱ्या (न्यायालय व दिवाण) बंद होत्या.

चौदा फेब्रुवारी– बादशहांच्या छावणी पासून (मिरजेजवळ कृष्णा काठी) पन्हाळगड किती अंतरावर आहे हे पाहून येण्यासाठी बादशहानी उस्मानखान करावल व असदुल्ला खुशमंजिल (मजला सुचविणारा) यांना पाठविले होते. त्यांनी काल येऊन विनंती केली की ' छावणी पासून पन्हाळगडाचे अंतर चौदा कोसाचे आहे. या मार्गावर पाच मजला सुचविण्यात आल्या आहेत. असदुल्ला हा जुल्फिकार खानाकडे

त्याच्या सरदारांना द्यावयाची खिलतीची वस्त्रे, खंजीर इत्यादी वस्तू पोहोचवून आला होता. त्याने येताना जुल्फिकार खानाचे विनंतिपत्र (अर्जदाश्त) आणले होते. ते आपल्या समोर ठेवण्यात यावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

आज सकाळी बादशहा हमीदुद्दीनखान बहादुरला म्हणाले 'तुम्ही जाऊन येथून शम्सुद्दीनच्या दर्याचे अंतर किती व किल्ल्याच्या व मिरजेच्या तटबंदीचे अंतर किती हे मोजून या.' त्याने मोजणी करुन येऊन सांगितले की बादशाही छावणी (कृष्णा कांठावरील) पासून शम्सुद्दीनचा दर्गा एका कोसाला अर्धा पाव कमी या अंतरावर आहे व शहराच्या तटबंदीचे अंतर एक कोस व अर्धा पाव असे आहे.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी मिळाली–

'यलबरशखान हा आज्जमतारागड (सातारा) हून तोफा वगैरे आणण्यासाठी गेला होता. तो तेथून तोफा वगैरे सरंजाम घेऊन कऱ्हाड पर्यंत पोहोचला. हे ऐकून धनाजी जाधव वगैरे सरदार यांनी येऊन वाट अडविली आहे. मराठयांचे सरदार कृष्णा मल्हार व शाहू निंबाळकर यांनी खटावला वेढा घातला असून तेथील ठाणेदार कृष्णराव हा त्यांच्याशी लढत आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की, मुहंमद अमीनखान व मतलबखान हे त्या भागात असतील तर त्यांनी गनिमांचे पारिपत्य करावे. नसल्यास त्यांनी खटाव व एलेगांव पर्यंत गस्त करुन यावे.' अमीन खानाबरोबर तीन हजार तीनशे चौऱ्यांऐंशी व मतलबखाना बरोबर दोन हजार चारशे चौतीस स्वार तैनात करण्यात आले.

पंधरा फेब्रुवारी– बादशहांना कळविण्यात आले की अकबराबाद (आग्रा) चा सुभेदार एतिकादखान याचा मुलगा मुहंमद सालेह हा आज्ञेप्रमाणे पथके घेऊन छावणी जवळ आला आहे. छावणीत येण्याची आज्ञा व्हावी. परवानगी देण्यात आली.

सोलापुराहून सरब व बारुद (बंदुकीची दारु) ही मागविण्यात आली होती. ती आणण्यासाठी संरक्षक पथक (बंदुका) हवे होते. फजेउल्लाखानाने तो सरंजाम आपल्याबरोबर आणावा अशी आज्ञा झाली.

कोल्हापुरचा ठाणेदार रणबाजखान याने लिहून पाठवले की 'माझ्यापाशी यावेळी दोनशे स्वार व दोनशे पायदळांचे असे लढवय्ये सैनिक आहेत. आज्ञा होत असेल तर गनिमांच्या पारिपत्यासाठी मतलब खानाला जाऊन मिळेन.' बादशहांनी आज्ञा केली की 'तुम्ही स्वतःच्या ठाण्याबद्दल (कोल्हापूर) सावधगिरी बाळगा.'

गाळणा (मालेगाव तालुका, नाशिक जिल्हा) येथील बातम्यांवरून समजले की येथून बदललेला किल्लेदार मुहंमद वारिस हा नवीन नेमलेला किल्लेदार

अबुल्कासिम याला किल्ल्याचा ताबा देत नाही. आज्ञा झाली की, ' किल्ला हवाली करण्यास त्याला लिहिण्यात यावे. त्याला शंभर जात व पन्नास स्वार अशी मन्सब होती. ती काढून घ्यावी असा हुकूम देण्यात आला.

सोळा फेब्रुवारी– छावणीचा नायब कोतवाल मुहंमद अमीन याला पुढीलप्रमाणे आज्ञा झाली– ' पन्हाळ गडाकडे सैन्य कूच करू लागेल त्यावेळी कुणीही आपले कबिले (बायका माणसे) बरोबर बाळगता कामा नये अशा अर्थाची दवंडी द्या.'

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले ' या महिन्याच्या पंचवीस तारखेस (बावीस फेब्रुवारी १७०१) सुल्तान बुलंद अख्तर (राजपुत्र अकबर याचा मुलगा) याचे लग्न अब्दुल्हादी याच्या मुलीशी ठरले आहे. लग्नाच्या सामानाची तयारी करा.'

यलबरशखान याने लिहून पाठविले की ' मी सातान्याहून तोफा वगैरे सरंजाम घेऊन छावणी पासून सहा कोसावर आलो आहे. धनाजी जाधव हा या मार्गावर होता तो मच्छींद्रगडकडे गेला. मुहंमद अमीन खान, मतलबखान व फजले अली हे येऊन मला मिळाले.'

हरकान्यांच्या तोंडून कळले की ' कृष्णा मल्हार हा खटावकडे गेला होता. तो पळून गेला.'

बादशहांनी मीर दिलेर वगैरे दोन गुर्जबर्दार नेमले. त्यांना आज्ञा झाली की ' अंमलबजावणीचे अधिकारी नेमून विजापुराहून धान्य रसद वगैरे मागवून ते शहाजादा बेदार बख्त याच्या छावणीत पोहोचवा.'

सतरा फेब्रुवारी– आज कचेऱ्या बंद होत्या.

अठरा फेब्रुवारी– यलबरसखान, मुहंमद अमीनखान, मतलबखान, फजलेअलीखान वगैरे सरदार हे आज्जमतारागड (सातारा) येथून तोफखाना आदी सरंजाम घेऊन आले. ते बादशहांना भेटले.

जुल्फिकारखान व त्याचे सरदार यांच्याकडे खिलतीची वस्त्रे व फर्माने वगैरे घेऊन असदुल्ला गेला होता, त्याला जुल्फिकारखान, राव दलपत बुंदेला, रामसिंग हाडा, सुलतानसिंग, कान्होजी (शिर्के) व गोरखोजी या सरदारांनी बक्षिसी दिली. ती त्याला माफ करण्यात आली.

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'दौलताबादेच्या किल्ल्यातून दोन हजार मण सरब व दोन हजार मण बाण मागवून घ्या.'

रुहुल्लाखानाने विनंती केली की, 'यलबरशखान हा आजारी आहे.' बादशहा म्हणाले 'बाजार बुणग्यांचे रक्षण करण्यासाठी मी त्याला मुर्तंजाबाद मिरज येथे ठेवीन.'

मरहूम बक्षी मुखलिसखान याची कबर मिरज येथे होती. तिच्या व्यवस्थेसाठी बादशहांनी मिरज प्रांतातील बिलची (?) हे गाव दिले. त्याच्या सनदा तयार होईपर्यंत मुजाविरांना (सेवेकरी) दोनशे रुपये देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

एकोणीस फेब्रुवारी– बादशहांनी जाहीर केले की पन्हाळगड जिंकून घेण्यासाठी येथून शाबान महिन्याच्या चार तारखेस (तीन म चं १७०१) आपण कूच करु.

आज्जमताराग़ड (सातारा) किल्ल्यावरुन मोठ्या तोफा आणण्यात आल्या होत्या. त्यापैकी दोन मोठ्या तोफा पन्हाळगडाच्या वेढ्यात असलेल्या तरबियतखानाकडे पोहोचत्या कराव्या अशी आज्ञा झाली.

बादशहांना कळविण्यात आले की 'खान फीरोजजंग गजिउद्दीनखान याच्या पाशी तैनात असलेले रुस्तमखान, गालिबखान वगैरे सरदार अहमदनगरकडे असलेल्या आपल्या जहागिरीकडे गेले आहेत.' ते का गेले याची चौकशी करण्यात यावी अशी आज्ञा करण्यात आली.

मुर्तंजाबाद मिरजेचा किल्लेदार याने शहराच्या तटबंदीची (शहर पनाह) दुरुस्ती (डागडुजी) करावी अशी आज्ञा झाली.

रजातलबखान (संगमनेरचा फौजदार) याने डाळिंबाच्या दोन करंड्या पाठविल्या. त्या बादशहा समोर ठेवण्यात आल्या.

हकीम हाजकखान याने यलबरशखानावर उपचार करावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

वीस फेब्रुवारी– आज बादशहांनी दिवाणात बसून काम केले नाही. मतलबखान करावलबेगी हा पुढील मजलेशी चौकशी करुन आला. तो म्हणाला, 'मी साखळ्यांनी मोजणी करून आलो आहे. पुढची मजल येथून दीड कोसावर आहे.'

एकवीस फेब्रुवारी– बेलदारांचा प्रमुख खिदमतराय याने बेलदार घेऊन पन्हाळगडच्या मोर्चावर तरबियतखानाकडे जावे अशी बादशहांनी आज्ञा केली. माळव्याचा सुभेदार मुखतारखान (औरंगजेबाची बायको

दिलरसबानू हिच्या मावस भावाचा मुलगा, शहाजादा बेदारबख्ताचा सासरा व शहाजादा आज्जम याचा व्याही) याचा मुलगा सय्यद मुहंमद याला खान ही पदवी देण्यात आली.

बावीस फेब्रुवारी– कुणीही आपले कबिले बरोबर ठेवू नयेत अशी आज्ञा झाली होती. बहरामंदखान, रुहुल्लाखान, मतलबखान, हकीम हाजकखान यांच्या संबंधितां सबंधी काय आज्ञा म्हणून विचारण्यात आले. बादशहा म्हणाले ' त्यांना आपले संबंधित बरोबर ठेवता येतील.'

मुर्तजाबाद मिरजेचा किल्लेदार अब्दुलकय्यूम याने विनंती पत्र पाठविले की, ' किल्ल्यात सामग्री सरंजाम नाही. किल्ल्यामध्ये दीड हजार बाण (रॉकेटसारखे) सरब, बारुत, (दारु) ही तोफखान्याची सामग्री होती ती जाया झाली आहे.' बादशहांनी आज्ञा केली की दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा मन्सूरखान याने किल्ल्याला तोफखान्याचा (वरील) सरंजाम पुरवावा.

तेवीस फेब्रुवारी– राजा अवधुत सिंग, राव सुजानसिंग व मुहंमद काजिम हे हत्ती-खाना पोहोचविण्यासाठी तळावर (ब्रम्हपुरी) गेले होते, ते येऊन बादशहांना भेटले.

इंदापूरचा ठाणेदार मुगलखान याला छावणीतील शिष्टाचार अधिकारी क्रमांक दोन (मीर तुजक दुय्यम) या जागेवर नेमण्यात आले.

अकबराबाद (आग्रा) चा सुभेदार एतिकादखान याचा मुलगा मुहंमद सालेह हा काल बादशहांना भेटला. त्याने बादशाही सैन्याबरोबर राहावे अशी आज्ञा झाली.

अबदालबेग तोपचीबाशी याला पन्हाळगडाच्या मोर्च्यावर तोफा पोहोच-विण्याच्या कामावर नेमण्यात आले होते. त्याला खान हा खिताब देण्यात आला.

राजपुत्र अकबर याचा मुलगा सुल्तान बुलंद अख्तर याचे अब्दुल्हादीच्या मुलीशी लग्न ठरले होते. बादशहांनी काल काजी मुहंमद अकरमकडे पांचशे-रुपये व इतर काही वस्तू पाठविल्या. काजी अकरम, शेख नूरुल्हक, मुहंमद गौस व मुहंमद आकिल यानी रात्री यावे अशी बादशहांनी आज्ञा केली. त्याप्रमाणे ते बादशहाकडे आले. लग्न विधीसाठी बादशहांनी शेख नुरुल्हक याला वकील व मुहंमद गौस आणि मुहंमद आकिल यांना साक्षीदार म्हणून नेमले. यानंतर आज्ञे प्रमाणे काजी अकरम हा गेला. त्याने निका पढविला. मिहर म्हणून तीस हजार रुपये वधूला निश्चित करण्यात आले. सुलतान बुलंद अख्तर याने काजीला पागोट व पांचशे रुपये दिले.

चौवीस फेब्रुवारी – पेशखाना (आघाडीचे तंबू) शव्वालच्या दोन तारखेस (एक मार्च १७०१) रवाना करावे. आपण तीन तारखेस कूच करु असे बादशहानी फराशखान्याचा दारोगा शर्फुद्दीन यास सांगितले.

बादशहानी बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याची आठवण काढली. तो आज कचेरीत आला नाही असे कळविण्यात आले.

दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा मन्सूर खान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

पंचवीस फेब्रुवारी– मुल्तफतखान, अजहरखान व खिलतखान्याचा दारोगा मुहंमद हुसेन यांना सैन्याबरोबर (पन्हाळगडाकडे जाताना) आपली संबंधीत (बायका माणसे इत्यादी) माणसे घेण्याची परवानगी देण्यात आली.

हकीम हाजिकखान याने आपली संबंधीत माणसे मिरजेच्या किल्ल्यात ठेवावी आणि किल्लेदाराने त्यांना आडकाठी करु नये अशी आज्ञा करण्यात आली.

बादशहांना कळविण्यात आले ते असे:–

'नरकवासी रामा (राजाराम) याचा कारभारी रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) हा धान्याची रसद, दोन हजार पायदळ ' बंदूकची बरोबर घेऊन पन्हाळगडापाशी आला. जुल्फिकारखान बहादूर याने त्वरा करुन त्याच्याशी युद्द केले. शत्रूपैकी अनेक जण मारले गेले. धान्याची रसद लुटण्यात आली. शत्रूपैकी काहीजण पळून किल्ल्यात गेले.'

दुसऱ्या दिवशी शत्रू तरबियतखानाच्या मोर्च्यावर चालून आला. तरबियत खानानेही त्याचे पारिपत्य करुन आपले मार्चे कायम राखले.

धारुर (बीड जिल्हा, मराठवाडा च्या बातम्यांवरुन कळले की ' गनीम या प्रांतात पसरले आहेत. ते परगण्या परगण्यांतून चौथ वसूल करीत आहेत. रस्ते बंद पडले आहेत.' तेथील सुभेदाराला गनिमांचे पारिपत्य करा म्हणून लिहावे अशी आज्ञा झाली.

जुन्नर (शिवनेरी)चा किल्लेदार नसरुल्लाखान याने एक हजार मावळ्यांचे पथक उभे केले होते. त्याचा खर्च संगमनेरचा फौजदार रजातलबखान याच्याकडून देववावा व मावळ्यांना बादशाही छावणीत घेऊन यावे अशी आज्ञा झाली.

सव्वीस फेब्रुवारी–चीनकिलीच खानाला बोलावून घ्यावे अशी आज्ञा करण्यात आली.

सुभानजी (साताऱ्याचा माजी किल्लेदार) याचा मुलगा बाबाजी याच्या पथकातील खालील लोकांना मन्सबी देण्यात आल्या–

रामाजी–पाचशे जात व शंभर स्वार, जगदेव–तीनशे जात व पन्नास स्वार, राजसिंग–अडीचशे जात व वीस स्वार.

माळव्याचा सुभेदार मुखतारखान याने पुढीलप्रमाणे कळविले–'माझा मुलगा इफ्तिकारखान हा राव गोपाळसिंग याच्या पारिपत्यासाठी गेला होता. प्रांतातील फौजदार व जमीनदार यांचे कारभारी यांनी त्यांच्याशी सहकार्य केले. पण इफ्तिकारखान बुंदीला पोहोचला त्यावेळी राव बुधसिंग (बुंदीचा राजा) याचा कारभारी काही त्याला येऊन मिळाला नाही. राव गोपाळसिंग हा पळून उदय पुरच्या जमीनदाराच्या (महाराणा) मुलूखात गेला.'

बादशहांनी राव बुधसिंग याची मन्सब दोनशे स्वारांनी कमी केली.

नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारा अधिकारी (मुहतसिब) शेख नुरुल्हक याने सांगितले की 'राजा अवधूतसिंग (ओर्छाचा राजा) व राव सुजाणसिंग (बिकानेरचा राजा) यांच्या छावणीत धर्माला निषिद्ध असणाऱ्या गोष्टी (बिद्दत) (नाचगाणी मदिरा पान इत्यादी) सर्रास चालू आहेत.' या गोष्टी थांबविण्यासाठी हमीदुद्दीखान व फजलेअलीखान यांना पाठविण्यात आले. कोणी उद्धटपणे वागल्यास त्याचे पारिपत्य करावे अशी आज्ञा झाली. त्याप्रमाणे अंमलबजावणी करुन हमीदुद्दीन परत आला. त्याने कळविले की कोणाही रजपुताने प्रतिकार केला नाही.

बादशहानी आज्ञा केली की पाच हजारी मन्सबदार सोडून कोणीही ध्वज उभे करु नये.

राव मानसिंग (जाधव) याने मुजऱ्यासाठी दिवाणे खास मध्ये येत जावे अशी बादशहानी आज्ञा केली.

सत्तावीस फेब्रुवारी– (तीस रमजान) बादशहांनी नवीन महिन्याचा चंद्र पाहिला. तोफांना सरबत्ती देण्यात आली. बादशहाजादा कामबक्ष त्याचा मुलगा सुल्तान बुलंद अख्तर हे ईद मुबारकसाठी हजर झाले.

अठ्ठावीस फेब्रुवारी– आज रमजानच्या ईदेचा दिवस, कचेऱ्या बंद होत्या. ईद मुबारकच्या अर्ज्या राजपुत्र, राजकन्या, अधिकारी इत्यादींच्या कडून आल्या. बादशहा बहरामदखानाला म्हणाले, 'आमच्या बरोबर जे सैन्य राहील ते तयार करा आणि त्याची यादी (तूमार, मस्टर रोल) दाखवा.' बहरामंद खानाने तपशील दिला. एकंदर सैन्य अठरा हजार भरले. बादशहाने सैन्याची रचना पुढीलप्रमाणे केली–

बादशहाजादा कामबक्ष उजव्या फळीला, बहरामंदखान डाव्या फळीला रुहुल्लाखान आघाडीला, हमीदुद्दीन खान बहादूर पिछाडीला, मुहमंद अमीनखान टेहेळणीवर.

एक मार्च–पुढील अधिकाऱ्यांना सैन्याबरोबर आपले कबिले बाळगण्याची परवानगी देण्यात आली– मतलबखान, सियादतखान, इखलासखान, ख्वाजाखान, सफशिकनखान, गुलाम मुहमंद, राजाशाहू, बख्तावरखान, अब्दुर्रहमान.

बादशहांना कळविण्यात आले कीं ' गाजिउद्दिनखान (फीरोजजंग) हा तळापासून (ब्रह्मपुरी) तीन कोसावर पोहोचला. तो हुजुरात येत आहे.'

कऱ्हाडचा ठाणेदार यासीनखान याने लिहून कळविले की ' मछींद्रगडचा किल्लेदार व फौजदार नेमत याने स्वार व प्यादे बाळगली आहेत. कऱ्हाडची खेडी लुटण्यासाठी त्याने स्वार व प्यादी पाठविली. ते लोक गुरेढोरे घेऊन जात आहेत. अशाने रयत आबाद होणार नाही.' यावर यासंबंधी संबंधित अधिकाऱ्याला लिहावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

दोन मार्च–आज बादशहा सहा घटिका दिवस वर आला असता मिरजेहून निघाले. दीड कोस व पंधरा साखळ्या अंतर कापून ते मुक्कामावर दाखल झाले. हा प्रवास त्यांनी तख्तेखावरून केला. या मुक्कामी मिरजेचा किल्लेदार अब्दुल्कय्यूम याला परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला. (हा मुक्काम कोणत्या खेड्यावर झाला हे अखबारामध्ये दिले नाही.)

तीन मार्च– आज बादशहा तख्तेखावर स्वार होऊन निघाले. साडेतीन कोसाचा मार्ग पार करून ते मुक्कामाला पोहोचले. (येथेही खेड्याचे नाव देण्यात आले नाही.) मतलबखानाने म्हटले ' उद्याची मजल अडीच कोसाची होईल.' बादशहा म्हणाले ' पुढे पाठवायचे तंबू रवाना करा.

मुर्तजाबाद मिरजेचा फौजदार जहीरुद्दीन (जहूरुल्ला पाहिजे) याने विनंती लिहून पाठविली की 'माझ्या जहागिरीत पायमल्ली (सैन्याच्या हालहालीमुळे पिकांची नासाडी) झाली आहे. माझ्या सैनिकांचा पगार देणे मला शक्य होत नाही. खजिन्यातून मोबदल्याची रक्कम देण्यात यावी अशी बादशहांनी आज्ञा केली'

छावणीचा नायक कोतवाल मुहंमद अमीन याने कळविले की ' छावणीतील अनेक माणसे आपले कबिले घेऊन सैन्याबरोबर येत आहेत. काय आज्ञा ?' बादशहा म्हणाले 'त्यांच्या वाटेला जाऊ नका.'

रुहुल्लाखान हा सैन्याच्या आघाडीला होता. त्याला बाण, सरब व बारुत (बंदुकीची दारू) ही पुरविण्यात यावी अशी आज्ञा झाली.

चार मार्च–शहाजादा बेदारबख्त व जुल्फिकारखान हे पन्हाळगडच्या वेढ्यात गुंतले होते. त्यांनी लिहून पाठविले की 'आपण या भागात जवळ आला आहात. आपल्या भेटीस यावे म्हणतो. काय आज्ञा ?' बादशहांनी आज्ञा केली की 'शनिवारी येऊन भेटा'

हमीदुद्दीन खान बहादुर याने लिहून पाठविले की 'सैन्यातील लोकांचे सामान येथे चहुकडे पसरले आहे. ओझी वाहून नेण्याची साधने मिळत नाहीत.' बादशहा म्हणाले. 'कर्णे वाजवा. आज येथेच मुक्काम होईल.'

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'तयार रहा. पन्हाळगडापाशी आमच्या निवासस्थानाची जागा निवडण्यासाठी मी तुम्हाला पाठवीत आहे.'

चीन कुलीजखान याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले 'गाजिउद्दीनखान बहादुर (माझे वडील) हे बंडखोरांचे पारिपत्य करण्यासाठी गुलबर्ग्याकडे रवाना झाले आहेत. मी हुजुरात येत आहे. मी मुर्तजाबाद मिरजेपर्यंत पोहोचलो आहे. माझ्याबरोबर धान्य वगैरे रसद आहे.' त्याला छावणीत येण्यासाठी दस्तक (परवानगीचा कागद) देण्यात यावे अशी आज्ञा झाली. मन्सूरखानाने चीन कुलीजखानाकडे खाशाच्या उपयोगाची फळफळावळे पाठवावी अशी आज्ञा झाली.

नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार इख्तिफातखान याने पुढीलप्रमाणे लिहिले–'तोफांचा सरंजाम घेऊन मी हुजुरात यावे अशी आज्ञा झाली आहे. पण या बाबतीत पंतप्रधान जुम्दतुल्मुल्क यांच्या दप्तरातून अद्याप हुकूम आला नाही. बादशहा म्हणाले 'त्याला (इख्तिफातखानाला) लिहा, आपला नायब नळदुर्गला ठेवून त्याने हुजुरात यावे.'

खालील मंडळींच्या मन्सबीत वाढ करण्यात आली–

खवाशांचा दारोगा–मुल्तफतखान, तनख्याचा दिवाण-इनाय तुल्लाखान, ख्वाजाखान, दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा (अधिकारी) मन्सूरखान, घोड्यांना डाग देण्याच्या खात्याचा अधिकारी रशीदखान.

पाच मार्च–आज बादशहा तख्तेखावर स्वार झाले. अडीच कोस व पंधरा साखळ्या (जरीब) अंतर कापून ते अखरेश गावाजवळच्या मुक्कामावर पोहोचले. (अटिग्रे, हातकणंगले तालुका, कोल्हापूर जिल्हा).

काल संध्याकाळी मतलबखान याने कळविले की 'येथे रानात एक वाघ आहे.' आज्ञा झाली की 'बादशहाजादा मुहंमद कामबक्ष याने शिकारीला जावे. रुहुल्लाखान व मतलबखान व इतर माणसेही बरोबर असावी.' कामबक्ष याने

जाऊन हाका करविला. वाघ ओढयाच्या काठाकाठाने निघून पळून गेला. याच सुमारास वलीबेगचा पुतण्या मुहंमद फाजिल हा शिकार पाहाण्यासाठी म्हणून वाटेत उभा होता. वाघ जवळ आलेला पाहून त्याने तलवारीने त्याला मारले. स्वतः मुहंमद फाजिल वाला जखमा झाल्या. कामबक्षाने वाघ आणून बादशहाना दाखविला.

वऱ्हाड सुभ्याहून आलेल्या बातम्यांवरून पुढीलप्रमाणे कळले– ' गनिमांचा सरदार परसोजी भोसले हा सैन्य घेऊन एलिचपूर (अचलपूर) पासून पांच कोसावर आला. पवा (?) येथे किशनरावची जहागीर होती. त्या जहागिरीवर त्यांनी हल्ला केला. अनेक माणसांना मारले व गांव लुटले. तेथील अधिकाऱ्याने (आमिल) तीन दिवस त्यांचा प्रतिकार केला. पण त्याला कुमक आली नाही. शेवटी निरुपाय होऊन त्याने गनिमांना पंचवीस हजार रुपये देण्याचे कबूल केले.'

यावर रुहूल्लाखानाने वऱ्हाडच्या सुभेदाराला ताकीदपत्रे लिहावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) हा येऊन बादशहाना भेटला खान फीरोजजंगच्या तोफखान्याचा प्रमुख मिर्जाबेगखान व हसन अलीखान हेही बादशहाला भेटले. लाहोरचा (बदललेला) नायब सुभेदार मोतिमदखान हाही येऊन बादशहांना भेटला.

सहा मार्च– बादशहाचा मुक्काम पंचगंगेवर होता. आज बादशहांनी कचेरीचे काम केले नाही. उद्या शहाजादा बेदारबख्त भेटण्यास येईल तेव्हा बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याने त्याला सामोरे जावे अशी आज्ञा झाली.

सात मार्च– आज बादशहा तख्तेखावर स्वार झाले. सव्वातीन कोसाचा प्रवास करून ते कोल्हापूरजवळ पोहोचले. बादशहा शर्फुद्दीन (फराशखान्याचा मुश्रफ) याला म्हणाले ' शहाजादे बेदारबख्त येत आहेत. दौलतखान्याच्या समोर त्यांच्यासाठी तंबू उभा करा.' बक्षी उल्मुल्क बहरामंदखान हा दौलतखान्यापासून (बादशहाचे निवासस्थान) एक कोस सामोरा गेला आणि बेदारबख्ताना भेटला. त्याने बेदारबख्ताला नऊ मोहरा व एतिकादखानाचा (आग्र्याचा सुभेदार) मुलगा सालेह याने पांच मोहरा नजर म्हणून शहाजाद्या समोर ठेवल्या. मुहंमद बेदारबख्त हा दिवाणे खासच्या जाळीपर्यंत आला. बादशहांनी आज्ञा केली की शहाजादे व बक्षी बहरामंदखान यांनी आत यावे. शहाजादा बेदारबख्त याने नजर म्हणून एक हजार मोहरा व

निसार (ओवाळणी) म्हणून दोन हजार रुपये बादशहा समोर ठेवले. शहाजादा बादशहाच्या पाया पडला तसे बादशहांनी त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हटले 'आफरीन बाद, शाबास, तुम्ही खूप झटला. खूब तरदुद नमूदे' यानंतर बहरामंदखानाला निरोप देण्यात आला. बादशहांनी पन्हाळगडच्या वेढयाची व मोर्च्यांची चौकशी केली. नंतर शहाजाद्याला निरोप देण्यात आला. शहाजाद्यासाठी खास खिलतीची वस्त्रे, भोजनाची सात ताटे (काब, विविध पक्वानांच्या मोठ्या रिकिबी) व फळफळांवळाची पाच ताटे पाठविण्यात आली.

मोतिमदखानाला दक्षिणच्या सुभ्याची दिवाणगिरी देण्यात आली.

सात मार्च– बादशहांना स्वारीत खालील मंडळी भेटली–

कागलचा ठाणेदार पिराजी (घाटगे), कोल्हापुरचा ठाणेदार रणबाऊखान मीर मुईज.

आठ मार्च–आज बादशहा कोल्हापुराहून निघाले. ते गुलालबारेच्या दरवाजापर्यंत आले. त्यांनी शहाजादा बेदारबख्त याला निरोप दिला. अडीच कोसाचा प्रवास करुन ते पंचगंगेच्या काठावर मुक्कामाला आले.

सकाळी बादशहा झोपेतून जागे झाले. त्यांना कळविण्यात आले की जुल्फिकारखान बहादूर नुस्रत जंग हे पालखीतून भेटण्यास आले आहेत. बादशहा नमाजासाठी म्हणून मशीदीत आले तेथे जुल्फिकारखान, रुहुल्लाखान व बहरामंदखान हे त्यांना भेटले. जुल्फिकारखान यांनी नजर म्हणून एक हजार मोहरा व निसार (ओवाळणी) म्हणून दोन हजार रुपये बादशहा समोर ठेवले. बादशहानी जुल्फिकारखानाच्या पाठीवर आपले दोन्ही हात ठेवले खिलतीची वस्त्रे दिली फळफळावळ दिली आणि निरोप दिला. बादशहाच्या आज्ञेप्रमाणे रुहुल्लाखान व हमीदुद्दीनखान बहादूर हे पुढे जाऊन बादशहाच्या निवासस्थानाची (दौलतखाना) व मोक्याची जागा पाहून आले. पेशखाना (आघाडीचे तंबू) पुढे पाठवावे अशी आज्ञा झाली.

काल संध्याकाळी शहाजादा बेदारबख्त हा येऊन बादशहांना भेटला. काल रात्री बादशहा यांनी रुहुल्लाखान व हमीदुद्दीनखान बहाद्दूर यांना बोलावून म्हटले 'कुचच्या वेळी बहरामंदखान याने मागे पिछाडीला रहावे आणि त्याच्याऐवजी रुहुल्लाखानाने उजव्या फळीला असावे. चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) हा येऊन बादशहाला भेटला. आज हमीदुद्दीनखान बहादुरच्या ऐवजी चंदावल (पिछाडी) तुम्हीच सांभाळा असे बादशहा त्याला म्हणाले. एतिकादखान

(आग्र्याचा सुभेदार) याचा मुलगा मुहंमद सालेह याने आपल्या बापाची पथके बादशहांच्या समोर उभी केली.

नऊ मार्च– आज बादशहा तख्तेखावर स्वार होऊन पंचगंगेवरून निघाले. दीड कोसाचा प्रवास करून ते पन्हाळगडाजवळ दाखल झाले.

वाटेत शहाजादा बेदारबख्त त्यांना भेटला. बादशहा म्हणाले, 'तुम्ही व जुल्फिकारखान यांनी आपल्या फौजानिशी पलीकडच्या बाजूला तळ द्यावा.'

शेख हिदायतकेश व उस्मानखान करावल यांना बादशहा म्हणाले 'तुम्ही जाऊन तरबियतखानाचे मोर्चे पाहून या.'

रुहुल्लाखान याला बादशहा म्हणाले 'तरबियतखानाच्या मोर्चाजवळ खाने आलम याने तळ दिला आहे. त्याच्या ऐवजी तुम्ही तळ द्या.'

खाने आलम व त्याचे भाऊ मुनव्वरखान, इख्तिसास खान हे बादशहांना भेटले. फरीदखानही भेटला.

दहा मार्च– बादशहा रुहुल्लाखान व मतलबखान यांना म्हणाले 'पन्हाळगडच्या वेढ्यासाठी म्हणून कोठे कोठे ठाणी बसवायची त्या जागा पाहून या. तरबियतखान मुबारकखान, मुहंमद अस्करी, मुहंमद इसहाक ही मंडळी मोर्चातून येऊन भेटली.

जुल्फिकारखानापाशी तैनात असलेली पुढील मंडळी येऊन बादशहांना भेटली–राव दलपत बुंदेला, त्याची मुले भारतीसिंग व नरहरसिंग, राव कान्होजी शिर्के, त्याचा मुलगा मांधाता, जैनुलाबिदीन बक्षी, अब्दुलकादर.

कर्नाटकचा नायब फौजदार दाऊदखान याच्या लिहिण्यावरून त्याच्यापाशी तैनात असलेल्या पुढील मंडळींच्या मन्सबी वाढविण्यात आल्या–

गणू शिर्के (गणोजी शिर्के) याला जात पाच हजार व स्वार एक हजार अशी मन्सब होती. तीत दोनशे स्वारांची भर घालण्यात आली. त्याला खिलतीची वस्त्रे पाठवावी अशी आज्ञा झाली. माधवसिंग यास दोन हजार जात व हजार स्वार अशी मन्सब नव्याने देण्यात आली.

राजा अनूपसिंग याचा मुलगा रुद्रसिंह याला चारशे जात व दीडशे स्वार अशी मन्सब होती. तो वारला अशी बातमी आली.

अकरा मार्च– आज्ञेप्रमाणे शहाजादा बेदारबख्त हा येऊन बादशहाला भेटला. एका घटकेनंतर त्याला आपल्या तंबूकडे परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला. माझ्या तंबूपासून बेदारबख्ताच्या तंबूपर्यंत काय अंतर आहे हे मला कळवा असे बादशहा शेख हिदायतकेश याला म्हणाले.

चीन कुलीजखान, राजा अवधूतसिंग वगैरेंची ठाणी पन्हाळगडाच्या भोवती बसविण्यासाठी रहुल्लाखान व मतलबखान याना आज्ञा करण्यात आली होती. ती कामगिरी बजावून ते परत आले.

बादशहानी आज्ञा केली की या भागातील रमणे (जनावरे चरण्यासाठी जंगल) व शिकारगाह (शिकारीच्या जागा) यांचे रक्षण करण्यात यावे.

छावणी भोवती भिंत बांधण्यासाठी म्हणून बेलदार व शक्का (पाणी वाहणारे) यांनी हमीदुद्दीनखान खान बहादुर याजपाशी रुजू व्हावे अशी आज्ञा झाली.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'एक बाई किल्ल्यावरुन तरबियत खानाच्या मोर्च्यात आली. तरबियत खानाने तिला हुजूरात पाठविली आहे.' बादशहा म्हणाले 'हमीदुद्दीनखान बहादूर यांनी तिच्यापाशी चौकशी करावी. तिने सांगितले ' मी शहाजादा बेदारबख्तच्या छावणीवरुन येत होते. गनिमांनी (मराठे) मला कैद करुन किल्ल्यात नेले. किल्ल्यात पाण्याचा साठा भरपूर आहे. धान्यही भरपूर आहे. किल्ल्यात सुमारे चारशे माणसे आहेत किल्ल्याची एका बाजूची तटबंदी लहान आहे,' तिला सोडून द्यावी अशी बादशहानी आज्ञा केली.

खानजमान फतेहजंग (शेख निजाम मुकर्रब खान) याचा मुलगा शेखलतीफ याची मन्सब काढून घेण्यात आली होती. ती फिरुन बहाल करण्यात आली.

बारा मार्च– आज जुल्फिकारखान हा येऊन बादशहांना भेटला. रामसिंग हाडा, राव कान्होजी (शिर्के) बेदारबख्ताचा दिवाण मीर अब्दुर्रहीम, सुभे दख्खनचा दिवाण मोतमिदखान इत्यादी मंडळी येऊन बादशहांना भेटली.

मरहूमखान जहान बहादूर (बहादूरखान) याची बहीण हाजीखानम हिने ब्रह्मपुरीहुन शहाजहानाबाद (दिल्ली) परतण्याची इच्छा दाखविली. नुस्रतखान व अबुल्फतहखान यानी तिला औरंगाबादेपर्यंत न्यावी. तेथून हाजी मुहंमद हाशम याने तिला दिल्लीपर्यन्त न्यावी अशी आज्ञा झाली.

माळव्याचा सुभेदार मुखतारखान याला खर्वजे पाठविण्याची व त्यासाठी जरूर पडल्यास गडी माणसे नेमण्याची आज्ञा झाली.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे ' शत्रूचे सैनिक बादशाही छावणीपासून दीड कोसावर आले. त्यांनी खेडी उध्वस्त केली व गुरेढोरे लुटून नेली. टेहळणी (करावली) करण्यासाठी छावणींतून कोणी जात नाही.' बादशहांनी यावर करावल (टेहेळे) पुढील प्रमाणे नेमले–आघाडीला ख्वाजाखान, उजव्या फळीला शमशेरबेग, डाव्या फळीला मुहंमदशरीफ व पिछाडीला हैदरखान.

विजापुरी कर्नाटक कडून पुढील बातमी कळली.

'कोलारचे महाल व परगणे यांचे फौजदार मामूरखान यांचा नायब जमाल हा आपल्या मुलाबरोबर आपल्या परगण्याच्या दौऱ्यावर गेला होता. देवनहल्लीचा जमीनदार त्याच्यावर चाल करून आला. दोन घटिका युध्द झाले. त्यांत जमाल आणि त्याचा मुलगा हे मारले गेले. जमालला दीड हजार जात व तीनशे स्वार अशी मन्सब होती. (त्याचा मुलगा) मुहंमद इब्राहीम यास दोनशेवीस जात व वीस स्वार अशी मन्सब होती.

बहरामंदखान याने विचारले 'मोर्च्यांच्या पुढे करावल (आघाडीचे टेहळे) कुणाला नेमावे. बादशहा म्हणाले, रुहूल्लाखान हे मोर्च्यांच्या मागे आहेत. त्यांना करावलीवर नेमा.'

तेरा मार्च– आज शुक्रवार. कचेऱ्या बंद होत्या. आज शहाजादा बेदारबख्त हा येऊन बादशहांना भेटून गेला.

चौदा मार्च– आज मुहतशिमखान, कबचाकखान (तरबियतखानाच्या तैनातीत) इत्यादींनी बादशहाची भेट घेतली.

बहरामंदखान व हमीदुद्दीनखान यांनी कही (रसद, लाकूडफाटा, गवत इत्यादी) आणण्यासाठी जावे. त्यांच्याबरोबर पाच पाच हजार स्वारांची सैन्ये देण्यात यावी अशी आज्ञा झाली.

मुर्तजाबाद मिरज येथील तळाचा (बुणगे इत्यादी) व्यवस्थापक यलबरश-खान हा दोन हजार जात व सहाशे स्वार अशी मन्सब बाळगून होता. तो वारला. बादशहांनी त्याच्याऐवजी मुगलखान याची नेमणूक केली. त्याला एक तलवार बक्षीस देण्यात येऊन त्याला मिरजेकडे जाण्यास निरोप देण्यात आला. यलबरश खानाच्या पथकातील, मुहंमद अमीन, दिलावर बेग, हाजीबेग, अल्लायारबेग त्यादींच्या मन्सबी वाढविण्यात आल्या.

शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेतील तोफखान्याची सध्या काय स्थिति आहे याची माहिती कळवावी म्हणून बादशहांनी आज्ञा केली.

'तरबियतखान याने विनंती केली म'ल्या मार्च्यात तैनात केलेले सैनिक माझ्याकडे पाठविण्यात यावेत.' आज्ञा झाली की दोनशे सैनिकांनी चौक्या चौक्यातून जावे (आपापल्या जागा घ्याव्या).

पंध्ररा मार्च– आज जुल्फिकारखान हा बादशहाचा निरोप घेण्यासाठी आला. बादशहांनी त्याच्या पाठीवर हात ठेवला. जुल्फिकारखानाला पाच

अंगठ्या, पाच घोडे बक्षीस म्हणून दिले. बादशहा जुल्फिकारखानाच्या सुरक्षिततेचा फातेहा पढले. धनाजी जाधवाचे पारिपत्य करण्यासाठी, जुल्फिकारखानाला मिरजेकडे जाण्यास निरोप देण्यात आला. जुल्फिकारखानास सहा हजार जात व सहा हजार स्वार अशी मन्सब होती. तीत एक हजार स्वारांची वाढ करण्यात आली. बादशहा जुल्फिकारखानाला 'म्हणाले शत्रू (धनाजी जाधव) जाईल तेथे तुम्ही जा व त्याचे चांगले पारिपत्य करा.' जुल्फिकारखानाचे सहकारी राव दलपत बुंदेला, रावसिंग हाडा, व राव कान्होजी (शिर्के) यांनाही बादशहांना निरोप दिला.

बादशहांनी आज्ञा केली की चीनकुलीजखान याने जुल्फिकारखानाच्या जागी आपला तळ द्यावा व तंबू उभारावा. इखलासखान याजबरोबर तीनशे, ख्वाजाखान याजबरोबर दोनशे बंदूकची तैनात करण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

जुल्फिकारखानाच्या फौजेत तैनात असलेला रणदूलाखान हा आज येऊन बादशहांना भेटला.

बादशहांना कळविण्यात आले की फतेउल्लाखान, नजरअलीखान, ख्वाजा मंजूर व मुहंमद मुरादखान (सुप्रसिध्द इतिहासकार खाफीखान हा याच्याच पदरी होता.) हे खजिना घेऊन तळावर (मिरजेच्या) पोहोचले आहेत.

सोळा मार्च– पन्हाळा किल्ल्यावर भडिमार करण्यासाठी दोन नळघाची तोफ (दो जरब) चीनकुलीजखानाकडे पाठवावी अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की फौजेची मदत असल्याशिवाय लष्करातून कोणीही कही (गवत, लाकूड फाटा, धान्य) आणण्यासाठी छावणीच्या बाहेर जाऊ नये.

ख्वाजाखान यास वेढघाच्या कामातून काढून हमीदुद्दीन खानापाशी तैनात करण्यात यावे अशी आज्ञा झाली.

वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले.–

'बख्तबुलंद हा जामगडचा जमीनदार नवलसिंग व मराठे यांना घेऊन चार हजार स्वार व बारा हजार पायदळ अशा सैन्यासहित माझ्यावर चालून आला. लढाईत मी शत्रूचा पराजय केला. नवलसिंग मारला गेला. बख्तबुलंद जखमी झाला. शत्रूपैकी अनेक लोक ठार झाले. माझी सुमारे दोनशे माणसे ठार झाली. मोठा जय मिळाला.' बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.' अलीमर्दानखानाकडे फर्मान व खिलतीची वस्त्रे पाठवावी अशी आज्ञा झाली.

अलीमर्दानखानाने पुढीलप्रमाणे विनंतीपत्र पाठविले. 'चांद्याचा जमीनदार राजा बीरसिंग याच्याकडून पेशकश (खंडणी) घ्यावी, राजा बीरसिंग यास हुजूरात पाठवावे व तो येत नसल्यास त्याला कैद करुन पाठवावे अशी आज्ञा झाली होती. मी युक्तीने त्याला कैद केला आहे. काय आज्ञा ?' त्याला हुजूरात पाठवावे अशी आज्ञा झाली.

सतरा मार्च– जुल्फिकार खानाच्या फौजेत अद्याप बाण (रॉकेट सारखे शस्त्र) पोहोचले नसल्याचे कळविण्यात आले. नुस्रतखान मीर तुझक याने मुद्दाम सजावली (अंमल बजावणीचा अधिकारी) नेमून बाण पोहोचविण्याची व्यवस्था करावी.

जुल्फिकारखानाने विनंती लिहून पाठविली की 'खर्चास मदत म्हणून काही रक्कम मिळावी' त्याला एक लाख रुपये देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

बादशहांना कळविण्यात आले की 'कोल्हापूर भागात गवत चारा भरपूर आहे. पण शत्रू (मराठे) त्याला आग लावून नष्ट करण्याच्या विचारात आहेत. त्याचे रक्षण करण्यासाठी कुणाला तरी आज्ञा व्हावी.' बादशहांनी आज्ञा केली की 'कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान याला गवत चाऱ्याचे रक्षण करण्यासाठी लिहिण्यात यावे.'

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले. 'शमशेर बेगचे मोगल सैनिक हे करावली (टेहळणी) साठी गेले होते. शत्रूची दोन माणसे त्यांनी कैद केली. एक घोडीही धरली.' त्यांना कोतवालाच्या हवाली करावे अशी आज्ञा करण्यात आली. फजाईलखान यास एक हत्ती (सहा हजार रुपये किमतीचा) बक्षीस म्हणून द्यावा अशी आज्ञा झाली.

अठरा मार्च– छावणींतील माणसे एक एक करुन छावणीतून ये जा करतात असे कळले. त्यांना गटागटाने आणीत जावे अशी आज्ञा झाली.

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान हा काही आणण्यासाठी गेला आहे असे कळविण्यात आले. तरबियतखानाच्या मोर्चाचा वाकनीस म्हणून मुहंमद खलील व चीनकुलीजखानाच्या मोर्चाचा वाकनीस म्हणून ख्वाजा ऐवज यांच्या नेमणुका करण्यात आल्या.

फीरोजगड (यादगीर) चा किल्लेदार व फौजदार समंदरखान, गाळण्याचा (आता नाशिक जिल्ह्यात) किल्लेदार व फौजदार सय्यद शहामतखान, बसवापट्टणचा किल्लेदार व फौजदार ऐवजखान, तोरगलचा किल्लेदार व फौजदार रामसिंग यांची पत्रे हुजुरात आली.

एकोणीस मार्च– मुनिमखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली मी खान नुस्रतजंग याच्या सैन्याबरोबर एक मजल गेलो. शत्रू (धनाजी जाधव) मुर्तजाबाद मिरजेजवळ चार कोसावर होते. त्यांच्या विरुद्ध जुल्फिकारखान याची नेमणूक झाली, असे कळल्याबर धनाजी जाधव हा इतर सहकाऱ्यांच्याबरोबर सोलापूरच्या दिशेने निघून गेला. जुल्फिकारखान याने दोन मजला मारून त्याचा पाठलाग चालविला आहे. राव दलपत बुंदेला याने मला एक यादी दिली. नुस्रतजंग जुल्फिकारखान याच्या सांगण्याप्रमाणे राव दलपतच्या पथकातील सैनिकांची संख्या नऊशे पंधरा होती. मी पण पथकाची तपासणी केली. संख्या बरोबर आहे.' यादी फजाइलखानाकडे चौकशीसाठी व वृत्तांत कळविण्यासाठी देण्यात यावी अशी आज्ञा झाली.

तरबियतखानाच्या मोर्चात मरहूम खानजहान याच्या पथकांतील माणसांना तैनात करण्यात आले. मन्सूरखानाने कोकणी दरवाजाच्या बाजूने तळ द्यावा व मन्सूरखानाच्या पूर्वीच्या जागेवर ख्वाजाखान याने जाऊन खबरदारी बाळगावी अशी आज्ञा करण्यात आली.

नुकताच मुसलमान झालेला हैबतुल्ला याने मुजऱ्यासाठी कचेरीत येत जावे अशी आज्ञा झाली.

इखलासखान मियाना याने काही विनंत्या केल्या होत्या. त्या बादशहांनी मान्य केल्या नाहीत.

वीस मार्च – आज शुक्रवार. आज कचेऱ्यांचे कामकाज झाले नाही.

एकवीस मार्च– पन्हाळगडला मोर्चे लावण्यासाठी मुहंमद अमीनखान याजकडे एक तोफ पाठवावी अशी आज्ञा झाली.

मीरतुजक (शिष्टाचार खात्याचा प्रमुख) नुस्रतखान याला आज्ञा झाली की ' दिवाणे खास होतो त्यादिवशी माणसे बेशिस्तीने उभी राहतात. त्यांना शिस्त लावण्याची व्यवस्था करा.'

कागलचा ठाणेदार पिराजी (घाटगे) याला दीड हजार जात आणि आठशे स्वार अशी मन्सब होती. तीत बादशहांनी शंभर स्वारांची वाढ केली.

शमशेरबेग याने मुहमंद अमीन खानाच्या तंबूपाशी तळ द्यावा आणि तेथून टेहेळणीला जात जावे अशी आज्ञा झाली.

बावीस मार्च– आज बादशहांना कळविण्यात आले की ' शहाजादा बेदारबख्त याच्या खास स्वारीतील तुर्की घोडा हा पन्हाळगड किल्ल्यावरून

वरून आलेल्या एका गोळयाने जाया झाला.' बादशहांनी शहाजाद्याला चार तुर्की घोडे दिले. सरकारी तबेल्याचा (पागा) मुश्रफ (अधिकारी) अब्दुस्सलाम याने घोडे शहाजाद्यांच्या तंबूवर पोहोचवावे अशी आज्ञा झाली.

बादशहांना कळविण्यात आले की, रात्री पन्हाळगडातून शत्रू (मराठे) बाहेर पडले. ते मन्सूरखानाच्या मोर्चाच्या बाजूने आले. मन्सूरखान आपल्या सहकाऱ्यांसहीत त्वरेने धावला. शत्रू पळून किल्ल्यात निघून गेले.'

बादशहा मतलबखान, सरकारखान व उस्मानखान करावल यांना म्हणाले 'पन्हाळगडचे मोर्चे पाहण्यासाठी मी मन्सूर खानाच्या मोर्च्याकडे जाईन. तुम्ही)ते आधी) पाहून या.' त्याप्रमाणे ते मोर्चे पाहून आले. ते म्हणाले 'आपल्या निवासस्थानापासून (दौलतखान) मन्सूरखानाचा मोर्चा, शहाजादा बेदारबख्ताच्या. तळाच्या वाटेने सहा कोसावर व मुहंमद अमीनखानाच्या तळाच्या वाटेने दोन कोसावर आहे. पण वाटेत पाण्याची टंचाई फार आहे. काय आज्ञा?' हे ऐकून बादशहा गप्प बसले. नव मुस्लिम हैबतुल्ला याच्यासाठी एक तलवार व एक खंजीर काढून ठेवण्याची आज्ञा झाली.

तेवीस मार्च– बादशहांना कळविण्यात आले की हमीदुद्दीनखान हा कही आणण्यासाठी गेला आहे.'

तरबियत खानाच्या पायाला आजार झाला आहे असे कळविण्यात आले हकीम मुहंमद तकी यांनी औषधोपचार करावा अशी आज्ञा झाली.

तळावर (ब्रम्हपुरी व मिरज) आता गनिमांची वर्दळ नाही. इस्माईलखान मका याने हुजूरात यावे अशी आज्ञा झाली.

मुहतसिब (नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारा अधिकारी, सेन्सार ऑफ मॉरल्स) याच्याशी वीस अहदी (स्वार) व पन्नास प्यादे तैनात करण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान याने पुढील प्रमाणे विनंत्या केल्या–

१) सय्यद शहा मुहंमद ह्या पूर्वी मराठ्यांकडे होता. तो शहाजादा मुहंमद बेदारबख्त याने दिलेल्या कौलास अनुसरुन मराठ्यांना सोडून शहाजाद्याकडे आला, शहाजाद्यांनी त्याला खिलतीची वस्त्रे दिली आणि त्याला पांच हजार जात व दोन हजार स्वार अशी मन्सब मिळावी अशी शिफारस केली. तीस अनुसरुन आज्ञा व्हावी.

यावर बादशहांनी आज्ञा केली की सय्यद शहा मुहंमद याला माझ्यासमोर आणण्यात यावे.

२) चिकोडीचा जमीनदार देवण्णा (?) हा बंडखोर होता. तो आता शरण आला आहे. त्याची विनंती आहे की इकडे ठाणे कायम करावे. मी सहकार्य करीन.

त्याला माझ्यासमोर आणण्यात यावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

३) आणखी काही विनंती करणे आहे, तर एकांतात अर्ज करीन. बादशहांनी आज्ञा केली की 'जे काही सांगावयाचे ते शहाजादे बेदारबख्त यांना सांगा. ते मला कळवतील.'

चोवीस मार्च– कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान याला पन्हाळगडच्या मोर्च्यात ख्वाजाखानाच्या पथकाबरोबर तैनात करण्यात आले. बादशहांना कळविण्यात आले की अंबरचा जमीनदार राजा जयसिंग हा रमजानच्या चोवीस तारखेस (एकवीस फेब्रुवारी १७०१) हुजुरात येण्यास निघाला आहे.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे. 'ब्रह्मपुरीच्या तळावरून प्रवाशांचा काफिला बादशाही छावणीकडे येत होता. त्यांच्याबरोबर बलुची सैनिक होते. काफिला डफळापूरच्या अलीकडे आला, सटवाजी डफळे हा सैन्य घेऊन त्यांच्यावर चालून आला. बलुच्यांपैकी अनेक माणसे ठार अगर जखमी झाली. याच सुमारास मुगलखानाचे मुगल सैनिक मुर्तजाबाद मिरजेहून त्या स्थळी पोहोचले. शत्रू पळून गेले. बलूची सैनिक व काफिला हे मुर्तजाबाद मिरजेला पोहोचले आहेत.'

पंचवीस मार्च– हमीदुद्दीनखान बहादुर हा कही आणण्यासाठी गेला आहे. त्याने बारसिंगाची शिकार करून शिकार बादशहाकडे पाठविली.

गाजिउद्दीनखान बहादुर याने (ब्रह्मपुरीहून) लिहून पाठविले की 'माझ्या पाशी तैनात करण्यात आलेली बरीच माणसे औरंगाबादेस निघून गेली आहेत. येथे कितीतरी कामे करावयाची आहेत. पण आज दोन वर्षे झाली ती माणसे काही परत आली नाहीत.' बादशहांनी आज्ञा केली की 'एक अंमलबजावणी अधिकारी नेमून त्यांना (तळावर) पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात यावी.'

तरबियतखानाच्या मोर्च्याचा वाकनीस हाजी मुहंमद अली याने आपल्याला आठवड्यातून दोन वेळा मुजऱ्यासाठी येण्याची परवानगी असावी अशी विनंती केली. विनंती मान्य करण्यात आली.

सव्वीस मार्च– खालशाचा दिवाण अरशदखान याच्याकडे मोतीमदखानाच्या ऐवजी विजापूर व हैदराबाद या सुभ्यांची पण दिवाणगिरी देण्यात आली.

सय्यद मुहसिनचा मुलगा व मरहूम एतिमादखान याचा जावई अहसनखान याला कल्याणीचा किल्लेदार व फौजदार म्हणून नेमण्यात आले होते. त्याला पाचशे जात व शंभर स्वार अशी मन्सब होती. तीत शंभर स्वारांची वाढ करण्यात आली. हमीदुद्दीन खान बहादुर हा कही आणण्यासाठी गेला होता तो येऊन बादशहांना भेटला. बक्षी उल्मुल्क बहरामंदखान यांनी शनिवारी कही आणण्यासाठी जावे अशी आज्ञा झाली.

सत्तावीस मार्च– आज शुक्रवार. बादशहांनी दोन्ही कचेऱ्या स्थगित ठेवल्या.

अठ्ठावीस मार्च– काल मतलबखान, रुहुल्लाखान व हमीदुद्दीनखान बहादुर यांना बादशहांनी आज्ञा केली की 'तुम्ही जाऊन ठाणी बसवा व पन्हाळघाचा (परिसर) किल्ला पाहून या. मी किल्ला पाहाण्यासाठी जाईन.' आज्ञेप्रमाणे ते शहाजादा बेदारबख्ताच्या तळावरुन मन्सूर खानाच्या मोर्चापर्यंत गेले. परत येऊन ते म्हणाले 'वाटेत पाण्याची टंचाई कमालीची आहे.' हे ऐकून बादशहा गप्प बसले.

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान हा कही आणण्यासाठी गेला असल्याचे कळविण्यात आले.

रुहुल्लाखान, मतलबखान व हमीदुद्दीनखान यानी पन्हाळघाच्या भोवती एतिकादखानाचा मुलगा मुहंमद सालेह व ख्वाजा मुहंमद रणबाजखान यांची ठाणी बसविली. मुहंमद सालेह याने विनंती केली की 'पन्हाळगडच्या भोवती माझे ठाणे बसविण्यात आले आहे. इतरांच्याप्रमाणे माझ्यापाशी बंदूकची तैनात करण्यात यावेत.' बादशहांनी आज्ञा केली की 'तुमच्याबरोबर पथक आहे ते पुरे आहे.'

एकोणतीस मार्च– बादशहांना कळविण्यात आले की 'कोल्हापूरच्या देवहऱ्यात (देव्हारा, महालक्ष्मीचे देऊळ तर नसेल, कोल्हापूर तालुक्यात देवळे, दिंडनेर्ली, दोनवडे व दोनावाडी ही गावे आहेत. पण फारसीतील देवहरा या नावाशी जुळत नाहीत) खजिना पुरलेला आहे.' बादशहांनी रणबाजखान (कोल्हापूरचा ठाणेदार) याला निरोप देताना आज्ञा केली की देवहरा उध्वस्त करा, पाडून टाका (मिसमार नमूदे) आणि खजिना काढून सरकारात दाखल करा.'

काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली 'शत्रूचे (मराठे) सैनिक, दारुगोळा बरोबर घेऊन खेळणा (विशाळगड) किल्ल्याच्या दिशेकडून येतात आणि चीनकुलीजखान बहादुर (भावी निजामुल्मुल्क) यांच्या ठाण्यातून पन्हाळगडात जातात.'

बादशहांनी चीनकुलीजखानाला बोलावणे पाठविले. बादशहा त्याला म्हणाले 'इतकी गफलत कशी काय झाली, (ई कदर तगाफुल चराशुदा), तुम्ही रात्रीच्या वेळी खबरदारी बाळगली पाहिजे.'

मुर्तजाबाद मिरजेचा रक्षक मुगलखान याने लिहून पाठविले की 'शत्रूचे (मराठ्यांचे) सैन्य या भागात पसरले आहे. बादशहांनी एखाद्या पथकाची तैनाती इकडे करावी.' बादशहांनी यावर पुढीलप्रमाणे आज्ञा केली – 'एक गुर्जबर्दार–कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान याच्यापाशी तैनात करा. त्याने रणबाजखानाला मिरजेला मुगलखानापाशी पोहोचवावे. मग उभयतांनी गनिमांचे पारिपत्य करावे.'

फतेउल्लाखान वगैरे मंडळी खजिना घेऊन मुर्तजाबाद मिरजेपर्यंत आली आहेत असे बादशहांना कळविण्यात आले.

मुहंमद अमीनखान याजपाशी रायसिंगचा मुलगा अनूपसिंग हा तैनात होता. तो जागेवर हजर नाही असे कळले. त्याला चारशे जात व दीडशे स्वार अशी मन्सब होती. त्याची जहागीर काढून घ्यावी अशी आज्ञा झाली.

एतिकादखानाचा मुलगा मुहंमद सालेह याच्याकडे पन्हाळगडाभोवतीचे एक ठाणे होते. त्याने विनंती केली की 'माझ्या ठाण्याभोवती भिंत (अहाता, कंपौंड) बांधून देण्यासाठी बेलदार व शक्का (पाणी वाहाणारे) नेमावे तसेच हशमाची (पायदळ पथके) माणसेही नेमावीत.' बादशहांनी आज्ञा केली की 'हमीदुद्दीन खान बहादुर 'हे अहाता' (घेर, भिंत, कुंपण) बांधून देतील व मतलबखान हे हशमाची माणसे पुरवतील.'

इखलासखान मियाना याने खालीलप्रमाणे विनंती लिहून पाठविली.

१) माझे ठाणे अगदी मध्यावर (शत्रूच्या माऱ्यात) आहे. पांचशे बंदूकची माझ्यापाशी तैनात करण्यात यावेत. विनंती मान्य करण्यात आली.

२) ठाण्याच्या भोवती अहाता बांधण्यासाठी बेलदार व शक्का हे नेमण्यात यावेत. आज्ञा झाली की 'हमीदुद्दीनखान बहादुर यांनी अहाता तयार करुन द्यावा.'

फराशखान्याचा मुश्रक शर्फुद्दीन याने विनंती केली की 'मक्केच्या यात्रेस जाण्याची इच्छा आहे' बादशहा म्हणाले 'यात्रेचा मोसम आला की परवानगी देण्यात येईल.'

जुल्फिकारखान बहादूर याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले, 'मदालोदी (?) हा पांचशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब असलेला, माझ्या परवानगीने औरंगाबादेस औषधोपचारासाठी गेला. पण हुजुरात त्याची नोंद फरारी म्हणून झाली आहे. त्याची मन्सब बहाल करण्यात यावी.' विनंती मान्य करण्यात आली.

एकतीस मार्च– काल रात्री बादशहांनी आज्ञा केली की 'उद्या पवनगड व पन्हाळगड पहाण्यासाठी मी जाईन. हप्ता चौकीच्या अधिकाऱ्यांनी हजर रहावे. मतलबखान व फजलेअलीखान यांनी जाऊन वाटेवर बंदुकची उभे करावे.'

दिवसाचा एक प्रहर झाला असता बादशहा आपल्या निवासस्थानातून निघाले. ते तख्तेखात बसले होते. ते इकलासखान मियाना याच्या मोर्चाकडे आले वाटेत शहाजादा बेदारबख्त हा त्यांना भेटला. शहाजाद्याने त्यांना मुजरा केला. बादशहांनी त्याला जवळ बोलविले. स्मित हास्य केले आणि त्याला काही गोष्टी सांगितल्या. बादशहा मोर्च्याजवळ आले तसे त्यांनी तोफखान्याचा नायब (नायबमीर अतिश) फजलेअलीखान यास म्हटले. 'माझ्या बरोबर बादशहाजादा कामबक्ष व त्याचा मुलगा, शहाजाहा बेदारबख्त, बक्षी उल्मुल्क बहरामंदखान, रुहुल्लाखान, मतलबखान. व मुल्तफतखान हे राहतील. इतर कुणालाही यात येऊ देवू नका.'

यानंतर बादशहा इखलासखान मियाना याच्या ठाण्यावरुन पुढे गेले. त्यांनी पवनगड व पन्हाळगडचा परिसर पाहिला. यानंतर ते परत फिरले. जाऊन येऊन त्यांनी दोन कोसाचा प्रवास केला.

बादशहांनी मुहंमद गुर्जबर्दार याला निरोप देऊन आज्ञा केली की 'माळवा सुभ्याचा खजिना हुजूरात घेऊन या.'

फतेउल्लाखानाच्या कारभाऱ्याने (वकील) विनंती केली की 'फतेउल्लाखान हे खजिना घेऊन छावणीपाशी आले आहेत. त्यांना आत येण्याची परवानगी (दस्तक–पासपोर्ट) देण्यात यावी' विनंती मान्य करण्यात आली.

पन्हाळगडासमोर : ३

एप्रिल १७०१

दोन एप्रिल– आज बादशहांनी दिवाणे खासमध्ये कामकाज पाहिले. बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'चीनकुलीजखानाची पथके पन्हाळगडाच्या भोवती तळ देऊन होती. ही पथके गस्त घालण्यासाठी खेळणा किल्ल्याच्या (विशाळगड) दिशेने गेली. तेथे गनिमांशी (मराठ्यांशी) चकमक झाली. काही गनीम मारले गेले व काही जखमी झाले. सहा गनिमांची डोकी कापली, चार गनीम कैद करण्यात आले. सात घोड्या पकडण्यात आल्या. हाती लागलेली गुरेढोरे सातशे आहेत.' बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.'

सुभे मुहंमदाबाद(नांदेड बीदर)येथील बातम्यावरून कळले ते असे– 'नारो चोर (मराठा सरदार नारोजी, मराठ्यांचा उल्लेख सरकारी कागदपत्रांत चोर असा करावा अशी बादशहाची आज्ञा होती.) हा मोठे सैन्य घेऊन आला. कल्याणी सरकार, परगणे प्रतापपूर, मौजे नारायणपूर याला त्याने वेढा घातला. कल्याणीचा किल्लेदार व फौजदार मुहंमद हुसेन याने त्याच्या पारिपत्यासाठी आपला धाकटा भाऊ मुहंमद हादी यास पाठविले, लढाई झाली. उभय पक्षांचे अनेक लोक ठार अगर जखमी झाले. गनिमांनी मुहंमद हादीला कैद करून नेले. त्याला अडीचशे जात व तीस स्वार अशी मन्सब होती.

सुभे विजापूर येथून पुढीलप्रमाणे बातमी आली–' मरहूम खान जमान फतेहजंग (संभाजी राजाना धरणारा शेखनिजाम मुकर्रबखान) याचा मुलगा शेख अब्दुल्लतीफ हा फकिरी वस्त्रात पोहोचला आहे. त्याच्या बरोबर पन्नास स्वार आहेत.'

बादशहांनी आज्ञा की 'त्याची तैनाती हैद्राबाद सुभ्यात झाली आहे. त्याने तिकडे रवाना व्हावे.'

बंडखोर गंगा (हा गंगाजी कोण ?) याने समशेरगडला वेढा घातला अशी बातमी आली. विजापूरच्या सुभेदाराने किल्लेदाला मदत करावी अशीं बादशहांनी आज्ञा केली.

ख्वाजा मुहंमद याचे ठाणे पन्हाळगडच्या जवळ होते. त्याने विनंती लिहून पाठविली 'मला मुजऱ्यासाठी येण्याची परवानगी असावी' आठवडयातून एकदा येत जा अशी आज्ञा झाली.

तीन एप्रिल– (सहाजिलकाद) आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

चार एप्रिल– गोध्रा (गुजरात) येथील फौजदार मुहंमद (सुप्रसिद्ध इतिहासकार खाफीखान हा याच्याच पदरी होता) हा येऊन बादशहांना भेटला. त्याला सातशे जात व पांचशे स्वार अशी मन्सब होती. त्या त्या पैकी चारशे स्वार दुघोडी (पगारासाठी एक घोडयाला दोन समजणे) होते. त्याच्या मन्सबीत दोनशे जात व शंभर स्वार अशी वाढ करण्यात आली.

इंग्रजांचा वकील आला असून त्याने आपल्या बरोबर आपल्या सत्ताधीशांची पेशकश (मोगल हे पेशकश म्हणजे खंडणीदाखल असा शब्द प्रयोग करीत) आणली आहे व तो छावणी जवळ आला आहे. त्याला आत येण्याची परवानगी असावी. त्याची विनंती मान्य करण्यात आली. (इंग्लंडचा राजा तिसरा विलियम याचा वकील सर वीलियम नॉरिस याच्या डायऱ्यांवरून पन्हाळगडाच्या वेढयावर चांगलाच प्रकाश पडतो.)

बहरामंदखान हा आजारी होता. तो बरा होऊन बादशहांना भेटला. बादशहांनी त्याच्यावर कृपा दाखवून सरकारी कामकाज संपण्यापूर्वीच त्याला आपल्या तंबूकडे जाण्यास परवानगी दिली. फजाइलखान मुन्शी हा बादशहाच्या आज्ञेने शहाजादा बेदारबख्त याच्या तळावर गेला. फतेउल्लाखान व नजरअलीखान (नजरअलीखान हा गुजरातचा सुभेदार शुजाअतखान याचा दत्तक मुलगा) यांनी उद्या दिवाणे खासमधे भेटावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

मरहूम बख्शी मुखलिसखान याचा मुलगा मुहंमद हुसेन याचे स्वागत रुहुल्लाखानाचा मुलगा मुहंमद खलील याने करावे अशी आज्ञा झाली.

इटावा (उत्तर प्रदेशात) येथील फौजदार खैर अंदेशखान याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले–

'दुष्ट सचसाल (छत्रसाल) याचे कबिले कालंजरच्या किल्ल्यात आहेत. त्यांना पकडण्यासाठी मी सैन्याची तुकडी पाठवीत आहे. त्या भागातील ठाणेदार व फौजदार यांनी माझ्याशी सहकार्य करावे अशा आज्ञा त्यांना देण्यात याव्या.'

बादशहांनी आज्ञा केली की या संबंधी अलाहाबाद सुभ्याचा सुभेदार सिपहदार-खान याला लिहिण्यात यावे.

ज्या दिवशी पवनगडच्या पायथ्याशी ख्वाजा मुहंमद ठाणेदार याची (मराठ्यांशी) शत्रूशी चकमक झाली त्या दिवशी त्याच परिसरात असलेला ठाणेदार इखलासखान हा ख्वाजा मुहंमदच्या कुमकेला गेला नाही. शहाजादा बेदारबख्ताच्या लिहिण्यावरुन बादशहांनी ठाण्यांची व्यवस्था पुढीलप्रमाणे केली– इखलासखान याच्या ठाण्यावर मुहंमद सालेह आणि मुहंमद सालेहच्या जागी नजर अलीखान. इखलासखान यास हुजुरता बोलावून घेण्यात आले.

काल बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'बादशाही लष्करातील माणसे, शेळी–मेंढरी–बकरी अशी पन्हाळगडच्या पायथ्याशी मन्सूरखानाच्या मोर्च्याच्या काठाकाठाने चालली होती. किल्ल्यातून मराठे बाहेर पडले. त्यांनी लुटालूट केली. मन्सूरखान त्या स्थळी धावून गेला. बंदुकी, बाण इत्यादींचा (उभय पक्षाकडून) वापर झाला. चकमकीत शत्रूची काही माणसे ठार झाली आपले (मोगलांचे) बरेच लोक ठार झाले.'

पांच एप्रिल– नजरअलीखान, त्याचा मुलगा मुहंमदरिजा इत्यादी (अहमदाबादेहून आलेली) माणसे बादशहांना भेटली.

बादशहाच्या आज्ञेप्रमाणे फतेउल्लाखान याने खुजस्ता बुनियादेहून (औरंगाबाद) खजिना आणला होता. फतेउल्लाखान हा येऊन बादशहांना भेटला. बादशहा त्याला म्हणाले 'पन्हाळगडला चहूकडून वेढा पडला आहे. तो तुम्ही बारकाईने पहा.' फतेउल्लाखान म्हणाला 'दोन हरकारे माझ्यापाशी तैनात करण्यात यावेत.' विनंती मान्य करण्यात आली.

अर्शदखानाची मुले मीर हुसेन व मुहंमद हैदर व जावई मीर महमूद हे येऊन बादशहांना भेटले.

बादशहाजादा मुहंमद मुअज्जम बहादुरशहा याने (काबुल) तीस बहिरी ससाणे वगैरे (बाज जुर्रा, मादी व नर ससाणे) पाठविले होते. वाटेत उन्हामुळे एकोणीस मेले. तरबियतखानाने उरलेले पक्षी आपल्या समोर आणावे अशी आज्ञा झाली.

सहा एप्रिल– मरहूम मुखलिसखान बक्षी याचा मुलगा मुहंमद हुसेन हा सुतकात बसला होता. बादशहांनी त्याला बोलावून त्याचे सांत्वन केले. त्याला मन्सब देण्यात आली.

नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार इल्तिफातखान हा येऊन बादशहांना भेटला.

सात एप्रिल – गुजरातचा सुभेदार शुजाअतखान याने अठरा कच्छी घोडे पाठविले. त्याचा मुलगा नजर अलीखान याने आपल्या तर्फे दोन घोडे दिले.

मुखलिसखान मरहूम याचा एक हत्ती व साठ घोडे नळदुर्गाहून आणण्यात आले बादशहा म्हणाले 'हत्ती मला दाखवा. साठ घोड्यांपैकी वीस सरकारात बाकीचे मुखलिसखानाचा मुलगा मुहंमद हुसेन याजकडे असू द्या.' मुहंमद हुसेन यास सशस्त्र व पालखीत बसून गुलालबारेत येण्याची परवानगी देण्यात आली.

अन्वा (आता मध्यप्रदेशात) येथील फौजदार शेर अफगनखान याने आसारे मुबारक (प्रेषिताची स्मृतिचिन्हे) पाठविली होती. बादशहा ती पाहून फातेहा पढले. बादशाही छावणीत प्रेषितांच्या काही स्मृतिचिन्हांचे स्थळ होते. (औरंगजेब मधून मधून तेथे प्रदक्षिणा घालण्यास व प्रार्थना पढण्यास जात असे) तेथे ही नव्याने आलेली चिन्हे ठेवावीत अशी बादशहांनी आज्ञा केली.

अब्दुर्रहमानखान हा मक्केच्या यात्रेला गेला होता. येताना त्याने जमजमचे पाणी, मेणबत्ती, इत्यादी वस्तू आणल्या. त्या त्याने बादशहांना दिल्या.

मुरादाबादेचा (आता उत्तर प्रदेशात) फौजदार मुहंमद यारखान याने पुढील प्रमाणे कळविले- 'आपली आज्ञा झाली होती की मी येथे माझा मुलगा अज्मतुल्ला याला आपला नायब म्हणून ठेवावे व स्वतः पांचशे स्वार घेऊन हुजूरात यावे. वाटखर्चासाठी काही रक्कम मिळावी.' बादशहानी आज्ञा केली की त्याला माळव्याच्या खजिन्यातून पाच हजार रुपये देण्यात यावे.

बादशहांना कळविण्यात आले की, 'गनिमांनी (मराठ्यांनी) रतनगडचा किल्ला ताब्यात घेतला आहे. तेथील किल्लेदार अतीकुद्दीन हा त्यांच्या कैदेत सापडला आहे. त्याला चारशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी त्याची मन्सब काढून घेतली.

आठ एप्रिल- सादुल्लाखान (शहाजहानचा वजीर) याचा मुलगा हिफजुल्लाखान हा ठठ्ठा (सिंध) चा सुभेदार होता. त्याची लाहोरच्या सुभेदारीवर नेमणूक करण्यात आली. (हिफजुल्लाखान हा भावी निजामुल्मुल्काचा मामा. त्याचा मुलगा मुतबसिलखान याला निजामुल्मुल्काची मुलगी दिली होती. तिचा मुलगा म्हणजेच फ्रेंचांना निजाम दरबारात प्रवेश करुन देणारा मुजफ्फरजंग होय.) हिफजुल्लाखानाच्या जागेवर खानाजादखान उर्फ सईदखान याची नेमणूक झाली.

पवनगडच्या पायथ्याशी असलेला ठाणेदार नजर अलीखान याने मुजऱ्यासाठी न्याय कचेरीत येत जावे तसेच दुसरा ठाणेदार मुहंमद सालेह याने आठवड्यातून एकदा मुजऱ्यासाठी येत जावे अशी आज्ञा झाली.

शुजाअतखान याजकडून आलेल्या एकतीस घोड्यांपैकी दहा घोडे बादशहांना दाखविण्यात आले. घोडे पाहून बादशहा खुश झाले.

गोध्र्याचा फौजदार मुहंमद मुरादखान याने विनंती केली की 'आपल्या आज्ञेप्रमाणे मी माझे पथक घेऊन आलो आहे. मला खर्चास काही रक्कम मिळावी.' त्याला दोन हजार रुपये देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'धनाजी जाधव हा मोठे सैन्य घेऊन अष्टी-परगण्यात गेला (आता बीड जिल्हा, मराठवाडा) तेथे त्याने चौथाई वसूल केली. नंतर तो अहमदनगरच्या दिशेने गेला नुस्रत जंग जुल्फिकारखान हा परंड्याच्या पलीकडे वीस कोसाच्या अंतरावर आहे.'

नऊ एप्रिल– रतनगड गनिमांच्या (मराठ्यांच्या) ताब्यात गेला होता. जुन्नर (शिवनेरी) हून दोन हजार मावळे प्यादे (पायदळ) बादशाही छावणीत बोलावण्यात आले होते. त्यांना छावणीत न पाठविता रतनगड जिंकून घेण्यासाठी रवाना करण्यात यावे. यासाठी एक अंमलबजावणी अधिकारी नेमण्यात यावा अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की 'खुदामानचा मुलगा खालिक भान याच्या बरोबर तीनशे उंट द्यावे. त्याने जंगलांत जाऊन झाडे तोडून मोर्च्यांच्या कामासाठी घेऊन यावी. त्याच्या बरोबर संरक्षक पथके देण्यात यावी.'

हाजक मुहंमदखान हा वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याजपाशी तैनात होता. तो हुजुरात आला होता. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

दहा एप्रिल– आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या. बक्षी उल्मुल्क बहरामंदखान व मतलबखान हे आज्ञेप्रमाणे कही (रसद, लाकूडफाटा, गवत चारा इत्यादी) आणण्यासाठी गेले आहेत असे बादशहांना कळविण्यात आले.

अकरा एप्रिल– बादशहांनी आज फतेउल्लाखानाला बोलावून घेतले. त्यांनी त्याला काही सूचना दिल्या. त्या सूचना फतेउल्लाखानाने शहाजादा बेदार-बख्त याच्याकडे पोहोचवाव्या अशी आज्ञा झाली.

दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा (प्रमुख अधिकारी) मन्सूरखान याने आज्ञेप्रमाणे पन्हाळगड व पवनगड यांचा नकाशा दुरुस्त करून बादशहा समोर ठेवला.

गाजीउद्दीनखान बहादुर फीरोजजंग (भावी निजामुल्मुल्काचा बाप) याने खालीलप्रमाणे लिहून पाठविले–

'माझ्यापाशी जे अधिकारी तैनात करण्यात आले आहेत त्यांच्यापाशी नियमाप्रमाणे असणारी पथके पुरेशा संख्येत नाहीत ' बादशहांनी आज्ञा केली की शेख सादुल्लाखान याने फिरोजजंगाच्या फौजेत जाऊन प्रत्यक्षात किती सैन्य, किती पथके आणि किती सैनिक आहेत हे पाहावे.'

सुरतबंदरचा मुत्सद्दी दियानतखान याने नऊ अरबी घोडे बादशहाकडे पाठविले.

बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान व महंमद अमीनखान यांच्या रिसाल्यातील माणसांना तनखा जहागिरी (नगद पगाराच्या ऐवजी) द्यावा. हे त्यांना मान्य नसेल तर त्यांना बडतर्फ करण्यात यावे अशी आज्ञा झाली.

हैद्राबादी कौलार (पथके) च्या इसमांनाही (नगदीच्या ऐवजी) जहागिरी देण्यात याव्या अशी आज्ञा झाली.

काल रात्री पन्हाळगडाच्या वेढ्यात असलेला ठाणेदार ख्वाजा मुहंमद (कामबक्षाचा मीरबक्षी) याने खालील प्रमाणे लिहून पाठविले–

'आज्ञेप्रमाणे मी पवनगडच्या पायथ्याशी माझे ठाणे कायम केले होते. किल्ल्यातून सुमारे सातशे गनीम (मराठे) माझ्या ठाण्यावर चालून आले. युद्ध चालू आहे, शत्रूचे सैन्यबळ मोठे आहे. माझ्यापाशी माणसे कमी आहेत. मला कुमक मिळावी.' बादशहांनी तोफखान्याचा नायब (नायब मीर आतिश) फजले अलीखान यास पाठविले. फजले अलीखान तेथे पोहोचला. चकमकीत शत्रूपैकी अनेक ठार अगर जखमी झाले. शत्रूचा पराजय होऊन ते किल्ल्यात पळून गेले. फजले अली हुजरात आला. त्याने सांगितले की बेलदार व शक्का यांची आवश्यकता आहे. हमीदुद्दीन खानाने ती व्यवस्था करावी अशी आज्ञा झाली.

तरबियत खानाच्या पायाला आजार झाला होता. तो बरा होऊन येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी त्याच्यापाशी मोर्च्याची चौकशी केली. त्याने परिस्थिती कळविली. कचेरीच्या वेळेच्या एक घटिका आधी बादशहांनी त्याला मोर्च्याकडे जाण्यासाठी निरोप दिला.

सरअफराजखान हा बेदारबख्तापाशी तैनात होता. मोर्च्यावरून तो, त्याचा मुलगा सय्यद अब्दुलकादर, भाऊ सय्यद महमूद हे येऊन बादशहांना भेटले.

मरहूम सरबराहखान याचा मुलगा जमाल हा मोर्च्यावरुन येऊन बादशहांना भेटला. तरबियतखानाच्या मोर्च्यावर आठशे बेलदार पाठवावे अशी आज्ञा झाली होती. ते अद्याप पोहोचले नव्हते. सरबराहखानाच्या मुलाने त्यांना मोर्च्यावर पोहोचवावे अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की 'मी जेथे माझा तख्तेखा उभा करून किल्ला पाहिला तेथे पवनगडच्या ठाण्यावर असलेल्या हैद्राबादी व खानजहान मरहूमच्या पथकांनी आपले ठाणे बसवावे.'

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान आजारी आहे असे कळले.

जुल्फिकारखानाच्या लिहिण्यावरून अफगाण बहारचा मुलगा अहमद आणि

इतर अधिकारी यांना मन्सबी देण्यात आल्या.

बारा एप्रिल– शहाजादा बेदारबख्त हा मोर्च्यातून हुजुरात आला. तो बादशहांना म्हणाला 'आपल्या आज्ञेप्रमाणे मी व फतेउल्लाखान पन्हाळगडच्या पायथ्यापाशी गेलो. तिकडे मोर्चे तयार करीत होते. तेथेच एक विहीर खणली. आम्ही तेथे मोर्चे कायम करणार आहोत.

बादशहांना कळविण्यात आले की काल रात्री हकीम हामिद याच्या घरी चोरी झाली. मुहंमद अमीन कोतवाल याने चोरलेली मालमत्ता मिळवून द्यावी अशी आज्ञा झाली. गाजिउद्दीन फीरोजजंग यांच्यापाशी तैनात असलेले फरजाम खान, राजा उत्तमराम व ठठ्ठाचा सुभेदार खानाजादखान यांची पत्रे हुजुरात आली.'

भूपत हजारी याचा भाऊ नीलकंठ हा मोर्च्यातून आला. त्याने बादशहास मुजरा केला. त्याने मुजऱ्यासाठी कचेरीत येत जावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

तेरा एप्रिल– बादशांनी आज फतेउल्लाखानाला पन्हाळगडचे मोर्चे बांधण्याच्या कामाकडे जाण्यास निरोप दिला. यावेळी बादशहांनी त्याला खिलतीची वस्त्रे दिली आणि त्याच्या सुरक्षिततेसाठी ते फातेहा (प्रार्थना) पढले. फतेउल्ला खानाला चीन कुलीजखान बहादुरच्या मोर्च्याकडे पाठविण्यात आले. मुनीमखानाला त्याच्या बरोबर देण्यात आले. मोर्च्यासाठी लागणाऱ्या सामान सुमानाची व्यवस्था रुहुल्लाखानाने करुन द्यावी अशी आज्ञा झाली.

मरहूम मुखलिसखान याच्या मालमत्तेपैकी वीस घोडे सरकारात घेतले होते त्यांना जोडून आणखी सहा घोडे घेण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

बादशहांना कळविण्यात आले की 'रात्री पन्हाळगडातून माणसे बाहेर आली. ती तरबियत खानाच्या मोर्च्यावर चालून गेली. आपली दोन माणसे जखमी झाली. आपल्या लोकांनी गनीमांचे पारिपत्य केले. ते पळून किल्ल्यात गेले.

काल रात्री बादशहांनी आज्ञा केली की आरिफ जरीब कश (साखळीने मोजणी करणारा) याला बेदारबख्ताकडे पाठविण्यात यावे. दिवाणे खासचा नझिर सुहेल याजपाशी वीस बंदूकची तैनात करण्यात यावे अशी आज्ञा झाली.

चौदा एप्रिल– काल रात्री बादशहा फजले अलीखान नायब मीर आतिश याला म्हणाले 'बंदूकच्यांचे पहारे बसवा. मी उद्या मन्सूर खानाचे मोर्चे पाहण्यासाठी जात आहे. आज एक प्रहर दिवस आला असता बादशहा तख्तेखावर स्वार होऊन निघाले. बादशहा बरोबर बादशहाजादा मुहंमद कामबक्ष, शहाजादा मुहंमद बेदारबख्त, बक्षी उलमुल्क बहरामंदखान, रुहुल्लाखान व काजी मुहंमद अकरम हे होते.

बादशहा हे डोंगरावर मन्सूरखानाच्या मोर्च्यापाशी गेले. तेथे त्यांनी तख्तेरवा थांबविला. बादशहांनी किल्ला पाहिला. यावेळी मन्सूरखान येऊन बादशहांना भेटला. त्याने वेढ्याची वस्तुस्थिती सांगितली. राव सुजाणसिंग (बीकानेरचा राजा) हा त्यानंतर बादशहांना भेटला. बादशहांनी मन्सूरखानाच्या डेऱ्याजवळ कनाती उभ्या करविल्या बादशहा तेथे प्रार्थना पढले. यानंतर त्यांनी बेदारबख्ताला त्याच्या तंबूकडे जाण्यास निरोप दिला. मग दिवसाचे दोन प्रहर व चार घटिका झाल्या तेव्हा बादशहा आपल्या निवासस्थानाला परत आले. एकंदर प्रवास साडेतीन कोसाचा झाला. आज बादशहांना भेटणाऱ्या मंडळींत राजा अवधूतसिंग (ओछर्याचा राजा) व निळकंठ (भूपत हजारीचा भाऊ) हे होते.

मुनीमखानाने बादशहांना विनंती केली की 'सटवाजी डफळे याने मला लिहिले आहे. तो म्हणतो 'मी गनिमांची (मराठ्यांची) सोबत सोडून बादशहाची चाकरी करावी म्हणतो. बादशहांनी आज्ञा केली तर झटून पन्हाळगड बादशहाच्या ताब्यात आणून देईन.'

बादशहांनी आज्ञा केली की 'त्याने आमच्याकडे अर्ज करावा.'

बादशहांनी आज्ञा केली की ख्वाजा मूसा याला ब्रह्मपुरीहून शहाजहानाबाद (दिल्ली) ला पाठवावे आणि तेथील सुभेदार मुहंमद यारखान याने त्याला नजर कैदेत ठेवावे.

पंधरा एप्रिल– हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की धनाजी जाधव वगैरे सरदारांनी नरकवासी रामा (राजाराम) याचा मुलगा शिवाजी याला गादीवर बसविले होते. तो वारला.

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'विजापुराहून नावा मागवा. कृष्णा व पंचगंगा या नद्यांमध्ये त्यांना सोडा. त्यासाठी एक विशेष अधिकारी नेमा.'

पदमसिंगाचा नातू साहेबसिंग याला पाचशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब होती. त्याला खान फीरोजजंगाच्या फौजेत तैनात करण्यात आले.

सोळा एप्रिल– फतेउल्लाखानाने विनंती लिहून पाठविली की 'हुजुरात असलेले दीडशे मराठे माझ्याकडे तैनात करण्यात यावेत' बादशहा म्हणाले 'आपल्यापाशी मराठे किती आहेत हे कळवा'

लालराम याजकडे जोधपूरची ठाणेदारी होती. तेथून त्याची बदली काबुलला करण्यात आली. पण तो तिकडे न जाता बादशहाकडे आला. त्याला चारशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी त्याच्या मन्सबीत वाढ केली.

सतरा एप्रील– दिवसाच्या चार घटका राहिल्या असता बादशहांना कळविण्यात आले की 'आबदारखान्यातून (पाणी साठवून ठेवण्याची जागा) एक

कहार दिवाणे खासमध्ये पाणी घेऊन येत होता. त्याच्या अंगावर वीज पडली. तो जळून मेला. एका शिपायाच्या घरावरही वीज पडली आणि त्याचा घोडा जळून मेला.

अठरा एप्रिल– नीलकंठ हजारी याची तैनाती फतेउल्लाखानाच्या मोर्च्यात करण्यात आली. त्याला एक शाल बक्षीस देण्यात आली. कऱ्हाडचा ठाणेदार व फौजदार यासीनखान याने पुढीलप्रमाणे कळविले–

'चांदजी (चांदजी पाटणकर तर नव्हे ?) वगैरे जमीनदारांनी उपद्रवाचा हेतू मनात धरून सैन्याची जमवाजमव केली होती. मला हे कळताच मी त्यांच्यावर त्वरेने चालून गेलो. शत्रूंपैकी अनेक जण ठार झाले. शत्रूचा मी पराजय केला. एक हत्ती व इतर मालमत्ता हाती आली आहे. आज्ञा होत असेल तर हत्ती घेऊन आपल्या हुजूरात येईन ' या संबंधी यार अलीबेग याने यासीनखानाला लिहावे अशी आज्ञा झाली.

दिवाणे खासमध्ये वीज पडली म्हणून निसार (ओवाळणी) म्हणून बहरामंद खान व रुहुल्लाखान यांनी बादशहांना रकमा नजर म्हणून दिल्या.

एकोणीस एप्रिल– काल रात्री वीज पडल्याबद्दल निसार म्हणून शहाजादा बेदारबख्त याने पाचशे अश्रफ्या बादशहासमोर ठेवल्या.

आजमतारागड (सातारा) व कऱ्हाड येथील फौजदार याने कळविले की 'खोलानाईक वगैरे वंजारी बारा हजार बैलांवर धान्य लादून अहमदनगर व बहादुरगड येथून येत आहेत, आज्ञा होत असेल तर मी येथे आपला नायब ठेवून रसद घेऊन छावणीत येईन. विनंती मान्य करण्यात आली.

वीस एप्रिल – काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे– ' नरकवासी संता (संताजी घोरपडे) याचा मुलगा राणोजी हा वीस हजार स्वार घेऊन चिकोडी व ऐनापूर येथून पन्हाळगडच्या इरादाने निघाला आहे.' बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

' शहाजादा मुहंमद बेदारबख्त यांनी नजरअलीखान, खाने आलम इत्यादी सरदार व सोळा हजार स्वार बरोबर घेऊन राणोजीच्या पारिपत्यासाठी जावे. मतलबखान याने सैन्य घेऊन बेदारबख्ताच्या तळाची काळजी घ्यावी. अशीच सावधगिरी चीन कुलीजखान व फतेउल्लाखान यांनी बाळगावी.'

बादशहांना कळविण्यात आले की ' फतेउल्लाखान याचे खुशहालबेग वगैरे सहा मोगल अनुयायी यांनी बहिर्जी नावाचा मराठ्यांचा एक नोकर पकडला आणि तीन घोड्या ताब्यात घेतल्या आहेत.' बादशहांनी आज्ञा केली की

बहिर्जीला नायब कोतवालाच्या हवाली करण्यात यावे आणि घोडया गाजींना (पकडणाऱ्या सैनिकांना) देण्यात याव्या.'

एकवीस एप्रिल– बादशहांना पुढील हकीकत कळविण्यात आली–

'छावणीतील गुरेढोरे चरण्यासाठी म्हणून पवनगडच्या पायथ्याशी असलेल्या मुहंमद मुरादखान याच्या मोर्चाकडे गेली होती. काही गनीम पन्हाळगडातून बाहेर पडले. त्यांनी गुरेढोरे वळवून नेली. ही बातमी कळताच मुहंमद मुरादखान आणि बलूची सैनिक हे किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचले. गनिमांशी झटापट झाली, गनिमांनी दगडधोंडे, बंदुकी यांचा वापर केला. किल्ल्यावरून त्यांनी मोठी तोफही चालविली. उभय पक्षांचे लोक जखमी झाले. यानंतर मुहंमद मुरादखान, ख्वाजा मुहंमद यांनी बादशहाजादा मुहंमद कामबक्ष यांची पथके बरोबर घेऊन हल्ला चढविला. ते पवनगडच्या दरवाजासमोर पोहोचले. किल्ल्याच्याखाली असलेल्या पेठेतील घरे त्यांनी जाळली व तेथे ठाणे कायम केले.'

ही बातमी बादशहाना कळली. त्यांनी आज्ञा केली की 'हमीदुद्दीनखान बहादुर व बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान यांनी मुहंमद मुरादखानाच्या मदतीला जावे' ते त्याप्रमाणे गेले.

रात्री त्यांनी बादशहांना पत्र धाडले. त्यात मजकूर असा होता की 'पन्हाळगड व पवनगड यांच्यामध्ये ठाणे कायम झाले आहे. पण दोन्ही किल्ल्यांवरुन गोळीबार होत आहे. ठाणे कायम ठेवणे शक्य होत नाही.'

बादशहांनी आज्ञा केली की, 'अशी परिस्थिति असेल तर ठाणे काढून घेऊन परत या.' आज्ञेप्रमाणे हमीदुद्दीनखान व रुहुल्लाखान हे मध्यरात्री परत आले.

माळवा सुभ्यातील बातम्यांवरून कळले की 'सत्रसाल (छत्रसाल) बंडखोर हा आंघोळीसाठी (तीर्थात स्नान) म्हणून धामोनी (सागरपासून पंचवीस मैलावर) भागात सडया स्वारीने गेला. फौजदार खैर अंदेशखान हा त्वरेने तेथे पोहोचला. बंडखोर (छत्रसाल) याला ठार मारण्यात आले. (ही बातमी खोटी आहे, दुसरा कोणीतरी सरदार मारला गेला असावा.)

बादशहांना कळविण्यात आले ते असे– 'धनाजी जाधव हा वऱ्हाडच्या सुभ्याच्या दिशेने गेला. जुल्फिकारखान बहादूर नुस्रत जंग याने त्याचा पाठलाग केला. धनाजी जाधव फिरून पुरंदर भागात आला. जुल्फिकारखान त्याच्या मागोमाग गेला. तेथे लढाई झाली. शत्रूची (मराठे) चारशे माणसे ठार झाली.

धनाजी जाधव हा पळून कोंडाण्याकडे गेला. खान नुस्रतजंग जुल्फिकारखान त्याच्या पाठलागावर आहे.'

बादशहानी मन्सूरखानाला तरबियतखानाकडे जाण्यासाठी निरोप दिला. बादशहा म्हणाले ' तुम्ही दोघे एकत्र होऊन सरकारी कामात मेहनत करा.'

एक विशेष अधिकारी नेमून दुर्जनसिंग याला गाजीउद्दीन खानाच्या फौजेत पोहचविण्यात यावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

बत्तीस एप्रिल– हमीदुद्दीनखान बहादुर याने मरहूम मुखलिसखान याच्या मालमत्तेपैकी सहा हत्ती बादशहांना दाखविले. ते सरकारात घेऊन त्यांची निगा राखावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

बादशहांना कळविण्यात आले की ' आज्ञेप्रमाणे फजले अलीखान हा बाण व तोफखान्याचा सरंजाम फतेउल्लाखानाच्या मोर्चात पोहोचवून आला आहे.' बादशहा म्हणाले, ' फजले अलीखान याचा मुलगा फैजअली याने तरबियतखानाच्या मोर्चातील तोफ नेऊन ती फतेउल्लाखानाच्या मोर्चात पोहोचवावी आणि हुजरात यावे.'

सरब व बारुद (बंदुकीची दारु) मुर्तजाबाद मिरजेहून बोलावून घेण्यात यावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

दूबदियाल (पंजाब)चा जमीनदार राजा बख्तावर याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

तेवीस एप्रिल– शहाजादा बेदारबख्त हा नरकवासी संता (संताजी घोरपडे) याचा मुलगा राणोजी याच्या पाठलागावर गेला होता. पन्हाळ गडापासून बारा कोसावर मौजे सालगांव (?) येथे तो पोहोचला. तेथे त्याला कळले की राणोजी हा पळून गेला आहे. शहाजादा परत येऊन बादशहांना भेटला. कचेरीचे काम सुरु करण्यापूर्वी बादशहांनी त्याला आपल्या तंबूकडे जाण्यासाठी निरोप दिला.

नजरअलीखान मुहंमद मुरादखान, मुहंमदबेगखान व कमालबेगखान या अधिकाऱ्यांबरोबर अहमदाबादेहून पथके आली होती. त्यांची पाहणी करण्यात यावी अशी आज्ञा झाली.

दख्खनच्या हशमासाठी पगाराचे म्हणून पंचवीस हजार रुपये मन्सूरखानाकडे पाठवावे अशी आज्ञा झाली.

आज्ञेप्रमाणे हमीदुद्दीनखान बहादुर हा तरबियतखानाचे मोर्चे पाहण्यास गेला होता. त्याने परत येऊन म्हटले ' तरबियतखान हा चोख कामगिरी बजावीत

आहे. त्याने सुरुंग तयार केला आहे.' बादशहा म्हणाले शनिवारी सुरुंग उडविण्यात यावा. हफ्त (सात) चौकीचे सैनिक अधिकारी यांनी तरबियतखानापाशी हजर राहावे.

चोवीस एप्रिल–शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

पंचवीस एप्रिल – आज बादशहांनी बादशहाजादा मुहंमद कामबक्ष, शहाजादा बेदारबख्त, बक्षी उलमुल्क बहरामंदखान व रुहुल्लाखान, चीनकुलीजखान (भावी निजामुल्मुल्क), हमीदुद्दीनखान मुहंमद अमीननखान, मतलबखान, मुहंमद मुरादखान व नजरअलीखान वगैरे सरदारांना गोळीबारापासून रक्षण व्हावे म्हणून तावीजी (ताईत) दिल्या.

अवधचा सुभेदार जबरदस्तखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

जुल्फिकारखान याने विनंती लिहून पाठविली की इस्माईलखान मका याला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे. विनंती मान्य करण्यात आली. इस्माईलखान यास पांच हजार जात व चार हजार स्वार अशी मन्सब होती.

बादशहांनी नुस्रतखान व भास्करराव यांना आज्ञा केली की राव मानसिंग (जाधव) याच्या पथकांची पाहणी करून वृत्तांत सादर करावा.

सव्वीस एप्रिल–कऱ्हाडचा ठाणेदार व आजमतारागड (सातारा)चा फौजदार हा येऊन बादशहाना भेटला. 'तुम्ही तरबियतखानाच्या मोर्च्यावर जा' अशी बादशहांनी आज्ञा केली.

मरहमतखान व फजलेअलीखान यांना गोळीबारापासून रक्षण म्हणून ताविजी (ताईत) देण्यात आल्या.

मीर आतिश (दारूगोळ्याचा प्रमुख) तरबियतखान हा मोर्च्यातून बादशहाकडे आला. त्याने मोर्च्यातील हकीकत कळविली. बादशहांनी त्याला एक तलवार बक्षीस दिली आणि सुखरुपतेचा फतेहा पढून मोर्च्यावरुन हल्ला चढावण्यासाठी त्याला निरोप दिला. बादशहा म्हणाले, 'शुमाराब खुदा सुपर्दम, तुम्हाला मी परमेश्वराच्या हवाली करतो.' राव मानसिंग (जाधव) हा हुजुरात आला, त्याने मुजरा केला. बादशहांनी त्याला तरबियतखानाच्या मोर्च्यावर जाण्यासाठी निरोप दिला.

ठठ्ठा (सिंध) येथील बातम्यांवरुन कळले की सुभेदार हिफजुल्लाखान याची नेमणूक लाहोरचा नायब सुभेदार म्हणून झाली होती, तो मरण पावला.

कोचाजी (गोजाजी?) राव (राऊत) हा खान फीरोजजंग याच्या सैन्यात

तैनात होता. त्याला तीन हजार जात व सतराशे स्वार अशी मन्सब होती. तो मरण पावला.

जुल्फिकारखान नुस्रत जंग याच्या सैन्यात गोविंदराव तैनात होता. त्याला एक हजार जात व आठशे स्वार अशी मन्सब होती. तो मरण पावला.

सत्तावीस एप्रील– आज्ञेप्रमाणे मन्सूरखान हा पन्हाळगडच्या मोर्च्यातून येऊन भेटला. बादशहांनी त्याच्या ठाण्याची हकिकत विचारली. मन्सूर खानाने तपशील सांगितला. बादशहा त्याला म्हणाले ' आठवड्यातून दोनदा मुजऱ्यासाठी येत चला.'

सय्यद शहा मुहंमद हा गनिमांची (मराठ्यांची) सोबत सोडून हुजुरात आला बादशहांनी त्याला खिलतीची वस्त्रे दिली. बादशहा म्हणाले 'पन्हाळगडचे प्रकरण निकालात निघाल्यावर तुम्हाला मन्सब देण्यात येईल.'

गुर्जबर्दाराचा दारोगा सियादतखान हा राजा जयसिंग (भावी सवाई जय-सिंग) याला आणण्यासाठी गेला होता. तो अद्याप परतला नव्हता. बांधाचा राजा बीरसिंग हा ही आला नव्हता. बादशहांनी संबंधीत गुर्जबर्दारांच्या मन्सबी कमी केल्या.

अठ्ठावीस एप्रिल– बाहशहांनी कऱ्हाडचा ठाणेदार यासीतखान यास एक हत्ती बक्षीस देऊन कऱ्हाडकडे जाण्यासाठी निरोप दिला.

सुल्तानपूर व नंदुरबार येथील फौजदार इल्तिफातखान याला सुखरुपतेचा फातेहा (प्रार्थना) पढून निरोप दिला. बादशहा त्याला म्हणाले, ' नळदुर्ग येथील तुमच्या नायबाला लिहा की त्याने नळदुर्ग किल्ला अब्बासखानाच्या हवाली करावा.'

एकोणतीस एप्रिल– बादशहा शर्फुद्दीनला म्हणाले ' आसार मुबारक (पैगंबराची स्मृतिचिन्हे) पर्यंत कनाती लावा. उद्या मी तेथे प्रदक्षिणेसाठी जात आहे.'

बादशहा चीनकुलीजखानाला (भावी निजामुल्मुल्क) म्हणाले ' तयार रहा, राणोजी (घोरपडे) च्या पारिपत्यासाठी मी तुम्हाला ऐनापूरकडे पाठवीत आहे.'

बहादुरगड येथील बातम्यांवरून पुढीलप्रमाणे कळले– ' नागोजी नावाचा सरदार हा एक हजार स्वार घेऊन या भागात आला. त्याने माणिक दौंडला वेढा घातला. वंजाऱ्याचे बैल लुटून तो गुरेढोरे घेऊन जाऊ लागला. तेथील ठाणेदार मानसिंग याने त्याच्यावर हल्ला करून त्याला पराजित केले. शत्रूचे अनेक लोक ठार झाले.' बादशहा म्हणाले ' सेवा मान्य झाली.'

मरहूम फतेहजंगखान याचा जावई वलीबेग हा रायरी (रायगड) येथे तैनात होता. त्याला सातशे जात व चारशे स्वार अशी मन्सब होती. तो मरण पावला असे बादशहांना कळविण्यात आले.

तीस एप्रिल– आज दारोग्याने (अधिकारी) खजिन्यातून सोन्याची कड्यांनी भरलेली दहा ताटे बादशहासमोर आणली. बादशहा म्हणाले 'हल्ल्याच्या दिवशी बंदूकची व हजारीचे सैनिक यांना बक्षिसे म्हणून कडी देण्यात येतील.'

बादशहांनी आज्ञा केली की हजारींच्याबरोबर सरदारांनी दहा उंट, पाच कहार व दोन अराबे (गाड्या) हे फतेउल्लाखानाच्या मोर्च्यावर पाठवावे.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'छत्रसाल राठोड याचा मुलगा हतीसिंग हा पन्हाळगडच्या मोहरा बुरुजाच्या समोर होता. बादशाही सैन्यांतील फिरंगी गोलंदाजांनी तोफ उडविली. तोफेच्या गोळ्याने तो ठार झाला.'

काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली– 'गनिमांनी (मराठ्यांनी) पालीच्या ठाण्याला वेढा घातला. सोपाजी वंजारी हा धान्याची रसद आणीत होता. त्याच्यावर ते तुटून पडले. बादशहांनी चीन कुलीजखान बहादूर याला अडीच हजार स्वार देऊन गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी निरोप दिला. चीनकुलीजखान याने आणखी काही पथकांची मागणी केली. बादशहांनी मागणी मान्य करुन इकलासखान मियाना याना पथकासहित रवाना केले.

काल संध्याकाळच्या सुमारास बादशहांनी बाजारचा व्यवस्थापक सय्यद इमामुद्दीन याला पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'विजापूरपासून मणूरपर्यंत रसदेच्या ये जाची व्यवस्था करा. त्यासाठी मुद्दाम माणसे नेमा. इमामुद्दीन बरोबर पुढील प्रमाणे माणसे द्या– मन्सबदार दीडशे, अहदीची माणसे पन्नास व बंदुकची शंभर. सय्यद इमादुद्दीन बरोबर सैनिकांचे पगार देण्यासाठी म्हणून पन्नास हजार रुपये देण्यात आले. विजापुरच्या खजिन्यातून दहा हजार रुपये देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

दहीवाड्याचा (दहीवाडीचा) ठाणेदार सय्यद नूरखान याला खिलतीची वस्त्रे देण्यात येऊन निरोप देण्यात आला.

आपण आसार मुबारक (पैगंबरांची स्मृतीचिन्हे) ला उद्या प्रदक्षिणा घालणार आहोत असे काल बादशहानी सांगितले होते. तो बेत रद्द करण्यात आला.

बादशहांनी आज्ञा केली होती की 'चीन कुलीजखान बहादूर याने नजर अलीखान वगैरे अधिकारी आणि पाच हजार दोनशे स्वार बरोबर घेऊन राणोजी (घोरपडे) च्या पारिपत्यासाठी ऐनापुराकडे जावे' हा हुकूम मागे घेण्यात आला.

वरील कामासाठी (राणोजीच्या पारिपत्यासाठी) बादशहांनी शहाजादा बेदारबख्त याची नेमणूक करुन त्याला निरोप दिला. त्याच्या बरोबर बावीस हजार स्वार देण्यात आले. पुढील अधिकारी शहाजाद्या बरोबर देण्यात आले. राजा अवधूतसिंग बुंदेला (ओछर्याचा राजा), राव मानसिंग जाधव, इखलासखान मियाना इस्माईल खान मका वगैरे. शहाजाद्या बरोबर तोफखान्याचा पुढील सरंजाम देण्यात आला–पाचशे प्यादे, बाणदल दोनशे, रेहेकले तीस, सरब पंधरा मण, बारुद (दारु) सात मण.

संगमनेरच्या बातम्यांवरून पुढीलप्रमाणे कळले–

'धनाजी जाधव हा चारशे स्वारांसहित कोंडाण्यात होता. त्याने दादो-मल्हार याजबरोबर पंधरा हजार स्वार देऊन मोगल इलाखे लुटण्यासाठी पाठविले. त्याने येऊन या स्थळाला वेढा घातला. येथील (संगमनेर) फौजदार रजातलब-खान याने त्याच्याशी युध्द केले. गोळागोळी झाली. शत्रू (दादो मल्हार) आणि त्याची चौदा माणसे ठार झाली.' बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.'

आजमतारागड (सातारा) चा फौजदार यासीनखान याने पुढीलप्रमाणे विनंती लिहून पाठविली–

१) माझ्या अधिकारात सहा ठाणी देण्यात आली आहेत. प्रत्येक ठाण्याच्या रक्षणासाठी दोन हजारी, तीन हजारी मन्सबदार हवा. कऱ्हाड तर उपद्रव करणाऱ्यांचे (गनिमांचे मराठ्यांचे, मिस्कीने मुकाहीर) आगर आहे. आजमतारागडच्या फौजदारीची अट घालून मला पांचशे स्वारांच्या मन्सबीची बढती देण्यात आली आहे. ती अट काढून घेण्यात यावी व स्वारांच्या संख्येत सूट मिळावी' यावर बादशहांनी आज्ञा केली की 'वाट पहा, उमेदवार बाशद, उमेद बाळगून रहा.'

२) कऱ्हाडच्या ठाण्यासाठी पांच रेहेकले (तोफा) देण्यात येतील अशी आज्ञा झाली होती. अद्याप मिळाले नाहीत. देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

३) नगाऱ्याचा मान मिळावा. विनंती मान्य करण्यात आली.

एक मे– बादशहाजादा कामबक्ष याने आज आसारे मुबारकला प्रदक्षिणा घातली व तेथे एक हजार रुपये भेटीदाखल दिले.

मे १७०१

शहाजादा बेदारबख्त हा निरोप घेण्यासाठी दिवाणे खासमध्ये आला आहे असे बादशाहना कळविण्यात आले. बादशहा म्हणाले 'हुजुरात येण्याची जरूर नाही. राणोजीच्या पारिपत्यासाठी त्याने मुर्तजाबाद मिरजेच्या दिशेने जावे.' शहाजाद्याने आज्ञा अंमलात आणली. मतलबखानाने बेदारबख्ताच्या छावणीच्या तळाची काळजी घ्यावी अशी आज्ञा केली.

दोन मे– सफशिकनखान याची लाहोरचा नायब सुभेदार म्हणून नेमणूक झाली होती. त्याने बादशहाचा निरोप घेतला. तो छावणीत अहंदीचा मीरबख्शी होता. त्याच्या जागी बेदारबख्ताचा बक्षी नेकनामखान याची नेमणूक करण्यात आली.

फजले अलीखान याने सांगितले की मुर्तजाबाद मिरजेहून पाचशं मण सरब व बारुद (दारु) ही आली होती. ती फतेउल्लाखानाच्या मोर्च्यावर पाठविली. सोलापुराहून सरब व बारुद आलेली आहे ती दुरुस्त करावी लागेल. त्यासाठी एक हजार रुपये देण्यात यावेत अशी बादशहांनी आज्ञा केली.

तीन मे– चीन कुलीजखान हा येऊन बादशहांना भेटला. सफशिकनखानाच्या जागी बादशहांनी त्याची कौरबेगी म्हणून नेमणूक केली.

बादशहाच्या छावणीपासून ऐनापूर हे चोवीस कोसावर व तेथून पुढे पातवार (?) हे तीन कोसावर आहे असे बादशहांना कळविण्यात आले.

इंग्रजांच्या राजाने बारा तोफा भेट म्हणून पाठविल्या (पेशकश) होत्या त्या फजले अलीखानाने बादशहासमोर आणल्या. बादशहांनी आज्ञा केली की त्यापैकी तीन तोफा फतेउल्लाखानाच्या मोर्च्यावर पाठविण्यात याव्या.

सकाळी बादशहांनी हमीदुद्दीन खान व फजले अलीखान यांना तरबियत खानाच्या मोर्च्याकडे पाठविले.

बसालतखान याने तळकोकणचा नकाशा पाठविला होता. तो बादशहांनी पाहिला.

चार मे– काल बादशहांनी सरकारखान, करावलखान, मस्तअली, फतेह दौलत, मुहंमद आरिफ व सादम कौल यांना तरबियतखानाकडे पाठवून त्याने किल्ल्यावर हल्ला करावा म्हणून आज्ञा केली तरबियतखान व हमीदुद्दीनखान यांच्यासाठी बक्षिसे म्हणून ढाली पाठविण्यात आल्या. खवाशांचा दारोगा मुल्तफतखान याने जाऊन तरबियत खानाचे मोर्चे पाहून यावे अशी आज्ञा झाली.

आज सकाळी बादशहांना कळविण्यात आले ते असे– ‘ आज्ञेप्रमाणे तरबियत खान व हमीदुद्दीन खानबहादुर यांनी किल्ल्यावर हल्ला चढविला. किल्ल्याचा एक बुरुज तोफांच्यामुळे ढासळला होता. तरबियतखान व हमीदुद्दीनखान यांचे सैनिक त्या बुरुजाच्या पायथ्याशी जाऊन पोहोचले. मराठ्यांनी तोफा व बंदुकी व बाण इत्यादीचा भडिमार केला. त्यामुळे काही मोगल सैनिक ठार झाले व काहीजण जखमी झाले. अद्याप आपले लोक तेथे स्थिर झाले नाहीत. मुहंमद मुरादखान व कामबक्षाचा बक्षी ख्वाजा मुहंमद यांनी हल्ला चढविला. टेकडीच्यावर आणि

पन्हाळगड व पवनगड यांच्या दरम्यान, ते मागे पोहोचले होते, तेथेच पुन्हा पोहोचले. त्यांनी तेथे तळ दिला. युध्द चालू आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की ' त्या ठिकाणी मोर्चा कायम करण्यासाठी मुहंमद अमीन नायब कोतवाल याने एक हजार सैनिक मुहंमद मुरादखान याजकडे पाठवावे.'

संध्याकाळच्या सुमारास पाऊस पडू लागला. बादशहानी आज्ञा केली की मुहंमद मुरादखान याने (आपले ठाणे हलवून) तेथून निघून यावे.'

पाच मे– शर्फुद्दीन हा राजाशाहू यांचा दिवाण होता. त्या जागेवर मीरहुसेन याची नेमणूक करण्यात येऊन त्याला (मीर हुसेनला) एक बालाबंद (अलंकार) बक्षीस म्हणून देण्यात आला.

बादशहांनी आज्ञा केली की ' अहमदाबाद (गुजरात) च्या खजिन्यातून एक लाख रुपये सुभे औरंगाबादच्या खर्चासाठी म्हणून देण्यात यावेत.'

वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याने चांद्याचा जमीनदार राजा बीरसिंग याच्याकडून खंडणी (पेशकश) घेऊन ती रक्कम हुजुरात पाठवावी असे हुकूम पाठविण्याची आज्ञा झाली.

वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याने पुढीलप्रमाणे वृत्तांत लिहून कळविला–

' मी निगूनबख्ताचे (गोंडराजा) पारिपत्य केले व बंडखोर नबाबसिंग याला ठार मारले. खोलापूर येथून ते लोक खोडी (घोडी?) व दर्यापूर येथे आले. मला बातमी मिळाली की निगूनबख्ताबरोबर ते (बंडखोर–मराठे) त्या भागात पसरले आहेत. मी आपला मुलगा अलीरजाखान याला सैन्य देऊन त्यांच्याबर पाठविले. युध्द झाले. शत्रुचा पराजय झाला. त्यांच्यापैकी बरेच लोक मारले गेले. आमच्यापैकी काही माणसे कामी आली व काही जखमी झाली. अलीरजाखान हा शत्रूच्या पाठलागावर आहे.'

गुलबर्ग्याचा किल्लेदार व फौजदार कामयाबखान हा तोफखान्याबरोबर हुजूरात आला होता. त्याने बादशहांना कळविले की ' राणोजी (घोरपडे) हा आमच्यावर चालून आला होता. युध्द झाले. मी त्याचा पराजय केला.' बादशहा म्हणाले ' सेवा मान्य झाली.'

बादशहाजादा मुहंमद मुअज्जम याचा बादशाही छावणीतील वकील (गुमास्ता, कारभारी, मध्यस्थ) म्हणून सफशिकनखान हा काम करीत असे– (तो लाहोरच्या नायब सुभेदारीवर गेल्यामुळे) त्याच्या जागेवर मुनीमखान (हा पुढे बहादुरशहाचा पंतप्रधान झाला) याची नेमणूक करण्यात आली.

सहा मे– आज ईदुज्जुहाच्या निमित्त कचेऱ्या बंद होत्या.

सात मे– राजपुत्रांनी व अमीर उमरावांनी ईदुज्जुहानिमित्त बादशहाचे अभिनंदन (ईद मुबारक) केले.

संगमनेरचा फौजदार रजातलबखान हा संगमनेरचा बंदोबस्त उत्तम रीतीने राखीत आहे असे कळले. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

हमीदुद्दीनखान या सरदाराला पाच हजार जात व पाच हजार स्वार अशी मन्सब होती. तो जुल्फिकारखानाच्या फौजेत तैनात होता. तो एक महिन्यापासून आपला जहागीर परगणा रावनी (?) येथे जाऊन बसला आहे असे कळले. त्याची मन्सब एक हजार जात व पाचशे स्वार अशी कमी करण्यात आली.

शहाजादा बेदारबख्ताच्या फौजेत सय्यद मुर्तजा हा तैनात होता. त्याला अडीच हजार जात व एक हजार स्वार अशी मन्सब होती. आजाराच्या सबबी वर तो अद्याप बेदारबख्ताला मिळाला नाही असे कळले. त्याची मन्सब काढून घेण्यात आली.

बागलाण्याचा फौजदार बहरोजखान याने बादशहाकडे खालीलप्रमाणे विनंती पत्र पाठविले–

'औरास (?) चा जमीनदार मोहनसिंग हा मराठ्यांशी मिळून बादशाही मुलूख लूटीत असे. मी त्याचे पारिपत्य केले. त्याच्या जमीनदारीत मी ठाणी बसविली व त्याच्यावर एक लाख रुपयांची पेशकश (खंडणी) कायम केली. सुल्तानपूर व नंदुरबार येथील फौजदारीत मी नियमाहून अधिक सैनिक बाळगले आणि त्या इलाख्याचा उत्तम बंदोबस्त केला. आता माझ्या जागेवर तेथे फौजदार म्हणून इल्तिफातखान याची नेमणूक झाली आहे. मला सैनिकांच्या पगार बाकीचे देणे फार वाढले आहे. पूर्वीप्रमाणेच सुल्तानपूर व नंदुरबार येथील फौजदारी माझ्याकडेच राहू द्यावी.'

बादशहांनी विनंती मान्य केली व आज्ञा केली की 'इल्तिफातखान यास दुसरीकडे फौजदार म्हणून नेमण्यात यावे आणि बहरावरखानाचा हुद्दा (मन्सब-मरातब इत्यादी) काय आहे हे कळविण्यात यावे.'

नौकांचा प्रमुख नुस्रतखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली– 'मसूरी (मसूर ?) च्या ठाण्यात दहा नावा आहेत. त्यापैकी यासीनखानाकडे पाच नावा देण्यात आल्या आहेत. हुजुरात नावांची आवश्यकता आहे. यासीनखानाला आज्ञा करण्यात यावी की इतर फौजदारांप्रमाणे त्याने नदीपार करण्यासाठी टोकरे

(गोल टोपलीवजा नावा) यांची व्यवस्था करून घ्यावी.' विनंती मान्य करण्यात आली.

आठ मे– आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या. पन्हाळगडच्या पलिकडे बादशहाच्या निवासस्थानासाठी योग्य जागा पाहाण्यासाठी हमीदुद्दीनखान बहादूर वगैरे माणसे गेली होती. त्यांनी येऊन सांगितले की 'येथून एका वाटेने ती जागा पावणेदोन कोस आहे तर दुसऱ्या वाटेने सव्वा कोस, आहे. मागे शहाजादा मुइजुद्दीन याने पन्हाळगडला वेढा घातला होता त्यावेळी तेथे त्याने आपल्या तंबू दिला होता.' तीच जागा बादशहांनी निवडली. ते म्हणाले 'उद्या बक्षी उल्मुल्क बहरामंदखान रुहुल्लाखान व हमीदुद्दीनखान बहादुर यांनी जाऊन ती जागा पाहून यावी.'

नऊ मे– आज्ञेप्रमाणे बहारामंदखान वगैरे सरदार ती जागा पाहून आले. ते म्हणाले, 'जागा चांगली आहे पण तेथील पाणी जरा वेगळे वाटते. तेथे जवळच एक ओढा वाहतो. लहान सहान विहिरी बांधता येतील.'

बादशहा म्हणाले 'आम्ही येथून जिल्हज सत्रा तारखेस (चौदा मे) तिकडे जाण्यासाठी निघू.'

फतेउल्लाखानाने लाकडी फळीवर आपल्या मोर्च्याचा नकाशा काढला होता. तो बादशहांनी पाहिला. नकाशा बादशहाजादा कामबक्ष याच्या हवाली करण्यात यावा अशी आज्ञा झाली.

फतेउल्लाखान याच्या मोर्च्यासाठी लाकडाची आवश्यकता होती. लाकडे आणण्यासाठी चीन कुलीजखान यान आपली संरक्षक पथके (बदर्का) द्यावी अशी आज्ञा झाली.

अकरा मे– काल रात्री हेरांनी खालील बातमी आणली–

'गदगचा फौजदार शेरखान हा रसद आणीत होता. राणोजी (घोरपडे) हा मोठे सैन्य घेऊन शेरखानावर चालून आला. ही बातमी ऐकताच शहाजादा बेदारबख्त हा त्वरेने निघाला. त्याने पंचवीस कोसांची दौड केली. त्यामुळे एक हत्ती व काही घोडे वाटेत मागे राहिले. विजापूर प्रांतात लक्ष्मेश्वर जवळ युध्द झाले. या युध्दात नरकवासी संताजी (घोरपडे) चा पुतण्या व बहिर्जीचा मुलगा मुरारजी (या नावाचा बोध होत नाही. बहिर्जीचा मुलगा सिधोजी घोरपडे. सिधोजीला भुजंगराव, मुरारराव व दौलतराव अशी तीन मुले होती. या पैकी भुजंगराव हा अल्पवयात मेला असे घोरपडयांच्या इतिहासात म्हटले आहे. तो

भुजंगराव या लढाईत मारला गेला असावा. मुरारराव म्हणजे पुढे प्रसिद्धीस आलेला मुरारराव घोरपडे होय.) हा मारला गेला. काही बायकाही पकडण्यात आल्या. शत्रूपैकी अनेकजण ठार झाले. शत्रूचा पराजय झाला. मोगलांकडीलही बरेच लोक ठार झाले.' बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.'

बादशहांनी आज्ञा केली की 'चीन कुलीजखान याजकडे पाचशे प्यादे, दोनशे बाण, दहा शुतरनाळ, दहा मण सरब, दहा मण बारूद व दहा गोलंदाज हे देण्यात यावे.' त्याचप्रमाणे बाजारचा व्यवस्थापक सय्यद इमामुद्दीन याजकडे एक मण सरब, दोन मण बारुद व ऐंशी बाण देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

रुहुल्लाखानाच्या विनंतीवरुन इल्तिफातखानाला सुल्तानपूर नंदुरबारच्या फौजदारीवरच ठेवण्यात यावे अशी आज्ञा झाली.

बारा मे– शहाजादा बेदारबख्त याचा वाकनीस हा बेदारबख्ताने राणोजी (घोरपडे) याजवर विजय मिळविला याचा वृत्तांत घेऊन आला. याशिवाय त्याने बहिर्जीचा मुलगा मुरारजी याचे डोके कापून आणलं होते. ते बादशहांना दाखविले. डोके कोतवालाकडे देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

गुलबर्ग्याचा किल्लेदार कामयाबखान हा येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी त्याची मन्सब वाढविली आणि म्हणाले 'तुमचे भाऊ तरबियतखान (मोर्च्यावर) याना जाऊन भेटा.'

बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान हा आज्ञेप्रमाणे तरबियतखानाचे मोर्चे पाहून आला. त्याने तेथील हकीकत बादशहांना सांगितली.

चीन कुलीजखानाने लिहून पाठविले की 'शत्रूपाशी सैन्य मोठे आहे. मदतीसाठी आणखी पथके पाठवावी.' बादशहांनी सियादतखान यास चीन कुलीजखानाच्या मदतीसाठी पाठविले.

मुंद्या (?) नावाची तोफ तळावरुन बादशाही छावणीत आली होती. ती फतेहल्लाखानाच्या मोर्च्यावर पोहोचवावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

पन्हाळगडावर हल्ला करावा म्हणून बादशहांनी एक ढाल हमीदुद्दीनखान बहादुरला आणि दुसरी ढाल तरबियतखान याला दिली होती. ढाली परत घ्याव्या अशी आज्ञा झाली.

तेरा मे– पन्हाळगडापासून तीन कोसावर जेथे मागे शहाजादा मुइजुद्दीन याने छावणी केली होती तेथेच बादशहांना मुक्काम करावयाचा होता. पूर्वी सतरा तारखेस (चवदा मे) तिकडे जावे असे ठरले होते. आता सतराच्या ऐवजी एकोणीसला जाऊ अशी बादशहांनी आज्ञा केली.

सियादत खान यास चीन कुलीजखानाच्या मदतीस जाण्यासाठी निरोप देण्यात आला. त्याच्याबरोबर अठराशे सत्तर स्वार देण्याची व्यवस्था झाली. त्याच्याबरोबर खालील अधिकाऱ्यांना पाठविण्यात यावे अशी आज्ञा झाली.–

१) तूर्कंजातखान २) सय्यद रहीम ३) रणबाजखान ४) ख्वाजा अब्दुस्सत्तार ५) सय्यद नूर ६) ख्वाजा आलम ७) कागलचा ठाणेदार पिराजी (घाटगे), याशिवाय प्यादे, सरब बारुद सात मण वीस शेर, बाणदार पाच व बाण (रॉकेट) दोनशे.

काल रात्री दिवाणे खासचा दारोगा हमीदुद्दीनखान बहादुर याने सांगितले की रुहुल्लाखान याने इस्माईलखान यास आणले आहे. इस्माईलखान हा निरोप घेण्यासाठी आला आहे. त्याच्यापाशी दोन समशेरी व कमरेला बांधलेली धूप (तलवारीचा एक प्रकार) आहे. बादशहांनी आज्ञा केली. की कमरेची धूप काढून ठेवून त्याने यावे. त्याप्रमाणे त्याने येऊन बादशहाना मुजरा केला. बादशहा त्याला म्हणाले 'तुम्ही रातोरात जाऊन चीन कुलीजखानाला मिळावे.' त्याला शंभर रुपयाची एक कटयार बक्षीस म्हणून देण्यात आली,

चौदा मे– आज शहाजादा बेदारबख्त हा येऊन बादशहांना भेटला. बादशहा त्याला म्हणाले ' आफरीनबाद, शाबास, गनिमांचे (राणोजी घोरपडे) खूप पारिपत्य केलेत.' बेदारबख्त म्हणाला ' हे सर्व आपल्या कृपेमुळे माझ्या हाताने घडून आले. बेदारबख्त याला पंधरा हजार जात व दहा हजार स्वार अशी मन्सब होती. तीत दोन हजार स्वारांची वाढ करण्यात आली. दहा हजार रुपयांचा शिरपेच, एक हत्ती, नऊ घोडे अशी बक्षिसे त्याला देण्यात आली.

बेदारबख्ताबरोबर राणोजीवरील मोहिमेत खालील अधिकारी होते ते येऊन बादशहांना भेटले.

१) खाने आलम (शेखनिजाम मुकर्रबखान याचा मुलगा) २) मुनव्वरखान ३) इख्तिसासखान (खाने आलमचे भाऊ) ४) फरीदखान ५) अब्दुल्कादर (खाने आलमचा भाऊ) ६) अवधूतसिंग (ओर्च्याचा राजा), ७) राव मानसिंग (जाधव) ८) राव सुजाणसिंह (बीकानेरचा राजा) ९) गदगचा फौजदार शेरखान १०) बेदारबख्ताच्या फौजेचा दिवाण अब्दुर्रहीम.

अब्दुर्रहमानखान हा आज्ञेप्रमाणे तरबियतखानाचे मोर्चे पाहून आला. तो म्हणाला ' तरबियतखानाने विनंती केली आहे की, ' मी झटून प्रयत्न करीत आहे. आपण आपले हलणे एक आठवडाभर स्थगित करावे. मी किल्ला आपल्या ताब्यात आणीन' बादशहांनी विनंती मान्य केली.

ते अब्दुर्रहमानखानाला म्हणाले 'तुम्ही स्वतः डोळ्यांनी तेथील परिस्थिति पाहिली आहे ना ?' अब्दुर्रहमानखान म्हणाला 'होय, तरबियतखानाने खूप श्रम घेतले आहेत. सुमारे पन्नास माणसे बुरुजातून आत गेली असून हल्ला करण्याचा मार्ग दुरुस्त करीत आहेत.'

फजले अलीखान याने कळविले की 'पन्नास लोखंडी गोळे तयार झाले आहेत.' ते फतेउल्लाखानाच्या मोर्च्यात पाठवावे अशी आज्ञा झाली.

पंधरा मे– तरबियतखान याने लिहून पाठविले की 'मोर्च्यात पाच हजार रुपये हवे आहेत.' फतेह दौलत कौल याने ती रक्कम (खजिन्यातून) मोर्च्यावर पोहोचवावी अशी आज्ञा झाली.

सोळा मे– सरफराजखान हा शहाजादा बेदारबख्त याजपाशी तैनात होता. तो येऊन बादशहांना भेटला.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे–

'धान्याची रसद ही पाईन विलायत (पुणे वाई प्रांत) मधून बादशाही छावणीत येत होती. मराठ्यांचा सरदार बनू (?) शंकरजी (शंकराजी नारायण सचिव?) हा चार हजार स्वार घेऊन चालून आला. वंजारी व तेथील ठाणेदार नाहरखान याचे सैनिक (मराठ्यांशी) लढत आहेत.'

बादशहा म्हणाले 'चीन कुलीजखान कुठे आहे ?' चीन कुलीजखान हा पुरंदरगडाकडे गेला असे कळविण्यात आले. बादशहांनी आज्ञा केली की 'चीन कुलीजखानाने त्वरेने जाऊन गनिमांचे पारिपत्य करावे व रसद छावणीत आणावी.'

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली–

'गुर्जबर्दारांचा दारोगा सियादतखान हा मराठ्यांचे कबिले धरण्यासाठी म्हणून भूदरगड (कोल्हापूर जिल्हा) भागात गेला होता. तेथे खंडोजी त्याच्यावर चालून आला. युद्ध झाले. शत्रूचे अनेक लोक ठार झाले. तीनशे गुरेढोरे हाती लागली. किल्ल्याखालील पेठांना आगी लावण्यात आल्या. शत्रूचा पराजय झाला. सियादतखान अद्याप शत्रूचा पाठलाग करीत आहे.' बादशहांनी आज्ञा केली की 'सियादतखानाला परत येण्यासाठी लिहिण्यात यावे.'

बादशहांना खालीलप्रमाणे कळविण्यात आले–

'तरबियतखान हा मोर्च्याच्या कामी अतिशय झटत आहे. त्याचा भाऊ कामयाबखान हा बुरुजाच्या आत जाऊन बसला आहे आणि तेथून तो हल्ला चढवीत आहे.'

पन्हाळगडचा किल्लेदार त्र्यंबकजी याने जीवाच्या भीतीने आपली माणसे तरबियतखानाकडे पाठविली आणि मागणी केली की 'बादशहांनी मला प्राणाचे अभय द्यावे व मला पांच हजारी मन्सब द्यावी. मी किल्ला बादशहाच्या ताब्यात देईन.'

हे कळताच तरबियातखानाने आपल्या भावाला सांगून धाडले की 'तुम्ही किल्ल्यात घुसू नका.' तरबियतखानाने सगळा वृत्तांत बादशहाकडे लिहून पाठविला. बादशहांनी शहाजादा बेदारबख्त याला हूजुरात बोलविले. बादशहा शहाजाद्याला म्हणाले 'तुम्ही जे ठरवाल ते मी मान्य करीन. किल्लेदाराच्या मागण्यांबद्दल फजाइलखान याने वृत्तांत सादर करावा.'

अठरा मे– मुहंमद रजा व मुहंमद अकी हे मध्य आशियातून येऊन बादशहाना भेटले. त्यांना खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

खानजमान फतेहजंग (शेखनिजाम मुकर्रबखान, संभाजीराजांना कैद करणारा) याच्या मुलांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

एकोणीस मे– सकाळी आज्ञेप्रमाणे उस्मानखान कराबल व कामबक्षाच्या तोफखान्याचा दारोगा मिर्जा मुहंमद यांनी पन्हाळगडचा किल्लेदार त्र्यंबकजी याचा कारभारी रामाजी याला बादशहाजादा कामबक्ष याजकडे नेले. कामबक्षाने किल्लेदाराच्या मागण्या बादशहासमोर ठेवल्या. बादशहा कामबक्षाला म्हणाले, 'तुम्ही ठरवाल ते आम्ही मान्य करू.' कारभाऱ्याला (रामाजी) आपण भेटाल काय असे कामबक्षाने विचारले. 'बादशहा म्हणाले 'त्या गोष्टीची आवश्यककता नाही. तुम्ही त्यांचे समाधान करा आणि तरबियतखानाकडे पाठवा. त्याला योग्य वाटल्यास तो त्यांना खिलतीची वस्त्रे व घोडे देऊन किल्लेदाराकडे पाठवील.'

विजापुरी कर्नाटकचा फौजदार मामूरखान याच्या नावाने आज्ञापत्रे पाठविण्यात आली.

मुहंमद मुरादखान याने आणलेल्या पथकांची पाहणी रशीदखान दारोगा याने करावी अशी आज्ञा झाली.

बदामी येथील बातम्यांवरुन पुढील हकीकत कळली– 'हालीहाळ (जालीहाळ) चा जमीनदार बनवारी हा मोठे सैन्य घेऊन या भागात आला आणि त्याने लुटालूट केली. तेथील किल्लेदार शरायफखान हा शत्रूचे पारिपत्य करण्यासाठी गेला.

शत्रूने त्याला घेरले आहे.' बादशहा म्हणाले हमीदुद्दीनखान विजापूरी याला लिहा. त्वरीत जाऊन गनिमांचे पारिपत्य करुन त्याने हुजूरात यावे.'

वीस मे – बादशहाजादा मुहंमद कामबक्ष याने बादशहांना सांगितले की, 'किल्ल्यातील माणसे बाहेर पडत आहेत. पण बरीच माणसे बाहेर येऊ शकत नाहीत.' बादशहा म्हणाले 'सैफुल्ला याने बंदुकच्यांना घेऊन किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर जाऊन तळ द्यावा. बाहेर पडणाऱ्या कुणालाही काहीही उपसर्ग होता कामा नये.'

खिदमतराय याने बादशहाच्या निवासस्थानापासून पन्हाळगडापर्यंतचा रस्ता नीट करवावा अशी आज्ञा झाली.

चीन कुलीजखान हा येऊन बादशहाना भेटला.

एकवीस मे– औरंगाबादेहून आंबे आले, ते बादशहापुढे ठेवण्यात आले. बादशहा खुश झाले.

काल तरबियतखानाने लिहून पाठविले की 'पन्हाळगडचा किल्लेदार त्र्यंबकजी याची विनंती आहे की मला तीन दिवसांची मुदत द्यावी. मी शनिवारी किल्ल्यातून खाली उतरेन.' बादशहांनी विनंती मान्य केली.

रायबाग हुक्केरीचा नकाशा तयार करुन आणा अशी काल बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याला आज्ञा झाली होती. त्याप्रमाणे रुहुल्लाखानाने नकाशा बादशहांच्या समोर ठेवला आणि म्हटले 'छावणीसाठी ती जागा चांगली आहे.' बादशहा म्हणाले 'पावसाळ्यात आमची छावणी कृष्णेच्या पलीकडे राहील.'

बावीस मे– तरबियत खानाने उस्मानखान करावल याच्या बरोबर बादशहासाठी एक पत्र पाठविले होते. त्यात पुढील मजकूर होता– 'त्र्यंबकजी किल्लेदार पन्हाळगड याची विनंती आहे की 'रामा (राजाराम) याने किल्ल्यात दोन हजार खंडी धान्य ठेवले होते. याशिवाय मी आणि माझी माणसे यांच्यापाशीही धान्य आहे. सबंध धान्याची किंमत वीस हजार रुपये होईल. विनंती अशी की धान्याची किंमत म्हणून आम्हाला वीस हजार रुपये देण्यात यावेत किंवा धान्य बाहेर नेऊन विकण्याची आम्हाला परवानगी देण्यात यावी.'

बादशहांनी विनंती मान्य केली नाही. ते उस्मान खानावर चिडले. ते म्हणाले 'उस्मानखानाला दिवाणे खासमध्ये येऊ देऊ नका. त्याचा हुद्दा व मन्सब ही काय आहेत हे मला कळवा.

बादशहा ख्वाजा हाफिज मुहंमद महली याला म्हणाले 'तुम्ही हमीदुद्दीन खानापाशी जा. त्याला म्हणावे 'मुद्दाम अधिकारी पाठवून किल्लेदाराला किल्लयाच्या बाहेर काढा. किल्लयांतून निघण्यासाठी बारबरदारी (ओझी वाहाणारी माणसे, जनावरे इत्यादी) चे जे सामान लागेल त्याची व्यवस्था करुन द्या. किल्ला मोकळा करुन घ्या.'

बादशहा फजलखानाला म्हणाले, 'किलाशिकन तोफ फतेउल्लाखानाच्या मोर्च्यावर पाठवा. त्याला म्हणावे 'तुम्ही आपले काम (हल्लयाच्या तयारीचे) चालू ठेवा.'

तेवीस मे– काल रात्री बादशहांनी ख्वाजा मंजूरकडे एक हजार रुपये देऊन ते फतेउल्लाखानाकडे पोहोचवावे अशी आज्ञा केली. मशाइख नूरुल्हक मुहतसिब (सार्वजनिक नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारा अधिकारी) याने पुढीलप्रमाणे कळविले–

अबदालखान, करावलखान व खिदमतराय यांच्या बाजारात (बादशाही छावणीत) दारुच्या भट्टया आणि इतर निषिद्ध व्यवहार चालू होते. मी ते दूर केले. अबदालबेगचा पुतण्या अल्लाह् यारबेग आणि इतर इसमांनी फार दांडगाई केली.'

बादशहांनी अबदालखान, करावलखान व खिदमतराय यांच्या मन्सबीत घट केली.

चोवीस मे– तरबियतखानाच्या पत्रावरून कळले की, काल दिवस मावळण्याच्या सुमारास पन्हाळगडच्या दरवाज्यावर बादशहाजादा कामबक्ष याचा झेंडा चढविण्यात आला. कामयाबखान हा तोफखान्याची माणसे घेऊन तेथे पोहोचला असून दरवाजावर तळ देऊन आहे. किल्लेदार म्हणतो, 'रविवारी मुहूर्त चांगला आहे. त्या दिवशी मी किल्ल्यातून खाली येईन.'

बादशहांनी मान्यता दिली.

किल्लेदार व त्याची माणसे यांना किल्ल्यांतून खाली आणण्यासाठी सकाळी हमीदुद्दीनखान बहादुर हा तरबियतखानाकडे गेला होता. त्याने परत येऊन कळविले की, 'किल्ल्यातून तीनशे माणसे सामानसुमान घेऊन तरबियतखानाच्या मोर्च्यावर पोहोचली आहेत. त्यांचे म्हणणे असे की 'जीवाच्या भीतीमुळे आम्ही किल्ल्यातून बाहेर पडू शकत नाही. आम्ही बाहेर पडलो की फतेउल्लाखान आम्हाला ठार मारील.'

बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर यास परत पाठविले. ते त्याला म्हणाले 'तुम्ही जा. त्या माणसांचे समाधान करा. त्यांना म्हणावे 'किल्ल्यातून बाहेर पडा.

आणि तुम्हाला जिकडे जावेसे वाटेल तिकडे जा. बादशाही सैनिकांनी कुणालाही त्रास देता कामा नये.'

बादशहांनी फराशखान्याचा मुश्रफ शर्फुद्दीनला म्हटले, 'तुम्ही फतेउल्ला खानाकडे जा. त्याला म्हणावे तुझ्या बाजूच्या दरवाजातून किल्ल्यातील माणसे बाहेर पडू लागली तर त्यांना त्रास देऊ नका. तोफा चालवू नका.'

बादशहांनी आज्ञा केली की 'अडीच हजार बंदूकची मन्सूरखानाबरोबर पन्हाळगड व पवनगड येथे तैनात करण्यात यावे. रीतसर किल्लेदार नेमला जाई-पर्यंत त्यांनी किल्ल्याची खबरदारी बाळगावी.'

सियादतखानाने मुहंमद मुरादखान याने बरोबर आणलेले सैनिक बादशहा समोर आणले. त्यास सहाशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब देण्यात आली होती. बादशहांनी मुरादखानाबरोबर आलेल्या इतर माणसांच्या मन्सबी कमी केल्या. ते म्हणाले 'ही माणसे मन्सबींना पात्र नाहीत.'

पंचवीस मे– तरबियतखान मीर आतिश याने बादशहाकडे पत्र पाठविले होते पत्रातील मजकूर खालीलप्रमाणे होता–

'पन्हाळगडचा किल्लेदार त्र्यंबकजी हा आपली शिबंदी घेऊन किल्लयाखाली उतरला. त्याने मन्सब मान्य केली नाही. तो खेळणा (विशालगड) किल्लयाकडे निघून गेला.'

आज्ञेप्रमाणे मन्सूरखान व कामयाबखान वगैरे तोफखान्यातील माणसे किल्लयावर गेली. बादशहांनी नगारखान्याचा दारोगा खिदमत तलबखान याला आज्ञा केली की 'किल्ला फत्ते झाल्याबद्दल बादशहाजादा कामबक्ष याच्या नौबती वाजविण्यात याव्या.' त्याप्रमाणे करण्यात आले. नगारे वाजविणाऱ्यांना बादशहांनी वीस हजार दाम (सुमारे पाचशे रुपये) बक्षीस म्हणून दिले.

तरबियतखानाचा मुलगा मुहंमद इसहाक याने किल्ले फत्ते झाल्याचे प्रतिक म्हणून सोन्याच्या दोन किल्ल्या बादशहाजादा कामबक्ष याच्या मध्यस्थीने बाद-शहांना दिल्या. बादशहांनी त्याला खिलतीची वस्त्रे दिली आणि आज्ञा केली की पन्हाळगडचा उल्लेख यापुढे शहादुर्ग म्हणून करण्यात यावा.

बादशहा यांनी बयूतात (सरकारी मालमत्तेचा अधिकारी) फजाइलखान याला म्हटले– 'तुम्ही मीर सामानच्या कचेरीचा दारोगा अलीरजा याला बरोबर घेऊन किल्ल्यात जा आणि तेथे असलेली रसद वगैरे सामग्री सरकारात जप्त करा.'

पुढील मंडळींनी पन्हाळगड फत्ते झाल्याबद्दल बादशहांना नजरा दिल्या-
१) बादशहाजादा कामबक्ष २) शहाजादा बेदारबख्त ३) सुल्तान मुहियुस्सुन्नत (कामबक्षाचा मुलगा), ४) बक्षी बहरामंदखान ५) बक्षी रुहुल्लाखान ६) मीरखान

७) मुनीमखान) ८) इनायतुल्लाखान ९) मुहंमद अमीनखान सदर (न्यायाधीश), १०) फजले अलीखान ११) मुल्तफतखान १२) अकीदतखात कोही १३) एतिकादखानाचा मुलगा मुहंमद सालेह (शायिस्ताखानाचा नातू).

बादशहा म्हणाले 'मी किल्ला पाहाण्यास उद्या जाईन.' सरकारखान, करावलखान व असदुल्ला यांना पुढील मुक्कामासाठी योग्य जागा निवडावी म्हणून पाठविण्यात आले.

सुल्तान बुलंद अख्तर (बंडखोर राजपुत्र अकबर याचा मुलगा) याने किल्ला पाहाण्याची इच्छा दाखविली. विनंती मान्य करण्यात आली. शाकिरखान याला त्याच्या बरोबर देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

एतिकादखानाचा मुलगा मुहंमद सालेह (शायिस्ताखानाचा नातू) हा फतेहपूर सिक्रीचा फौजदार होता. तो आतापर्यंत बादशहाच्या छावणीत होता. आता त्याच्या मन्सबीत वाढ करुन त्याला फतेपूरकडे जाण्यास निरोप देण्यात आला.

औरंगाबादेचा सुभेदार नजाबत खान याने विनंतीपत्र लिहिले ते रुहुल्लाखानाने बादशहाला सांगितले. नजाबतखानाने पत्रात लिहिले होते 'माझा मुलगा बहरोजखान हा बागलाण्याच्या फौजदार आहे. तो बादशाही कामगिरी झटून पार पाडीत आहे.' त्याला दीड हजार जात व अठराशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी त्याच्या मन्सबीतील स्वारांत भर घालून त्याला झेंड्याचा मान दिला.

सव्वीस मे– आज बादशहा पन्हाळगडचा किल्ला पाहाण्यास गेले. ते तख्तेखांवर स्वार होते. ते किल्ल्याजवळ पोहोचले. तरबियतखानाने त्यांना सात घोडे नजर केले. घोडे पाहून बादशहांनी ते ख्वाजा हमीदुद्दीनखान बहादुर याच्या हवाली केले. बादशहा किल्ल्यात गेले तसे त्यांच्या आज्ञेने तरबियतखानाने सर्व तोफांना सरबत्ती दिली.

बादशहा बक्षी बहरामंदखान याला म्हणाले 'तुम्ही आमच्या निवास स्थानावर जाऊन खबरदारी बाळगा.'

शहाजादा बेदारबख्त हा येऊन बादशहांना भेटला. यानंतर बादशहा किल्ल्याच्या मशिदीत जाऊन प्रार्थना पढले. नंतर ते दुसऱ्या मशिदींतही जाऊन प्रार्थना पढले. यानंतर ते परतले. एकंदर प्रवास अडीच कोसाचा झाला.

फतेउल्लाखानाने किल्ल्याच्या आत पर्यंत मोर्चे नेले होते. तो येऊन बादशहांना भेटला. बादशहा त्याला म्हणाले 'शाबास, आफरीन बाद, खूप झटलात. मोर्चे थेट किल्ल्यापर्यंत नेले.' फतेउल्लाखानाने बादशहांना मुजरा केला.

बादशहा निवासस्थानाकडे परतत असताना पुढील मंडळींनी त्यांना विविध प्रकारच्या वस्तू, रोख रकमा अशा भेटी दिल्या. १) बहरामंदखान २) रुहुल्लाखान

३) तह्व्वुरखान ४) कामयाबखान ५) मतलबखान ६) शेख अब्दुल्कादर ७) मुहंमद अमीन ८) मुहंमद मुईन ९) बाकरखान १०) राव जगदेवराव जाधव याचा मुलगा राव मानसिंग जाधव याने मऊ मोहरा भेट म्हणून पुढे केल्या. बादशहाने त्याला माफ केले. मोहरा घेतल्या नाहींत ११) बहादुर १२) अर्शद. खानाचा नातू मीर मुहंमद १३) किरकिराकखान्याचा अधिकारी हसनकुलीखान १४) सिद्दीहिल्लाखान १५) मुहंमद अकबर (राजपुत्र)चा दूध भाऊ इस्किदार-बेग १६) मुइजुद्दीन १७) मुहंमद मिहदी १८) नुस्रतखान १९) मुहतशमखान

बादशहांनी आज्ञा केली की 'रुहुल्लाखान, फजाइल खान व कामयाबखान यांनी किल्ल्यात राहावे.'

मोर्च्याच्या कामात असताना तरबियतखानाने तोफखान्यातील मिरबाशी व इतर अधिकारी व माणसे यांना खिलतीची वस्त्रे दिली. पण मोर्च्याचा वाकनीस मुहंमद अली याने ती घेतली नाहींत. ती त्याने घ्यावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

बादशहा पुढील मुक्कामासाठी निघणार होते. त्यावेळी सैन्याची व अधिकाऱ्यांची योजना खालीलप्रमाणे असावी असे ठरले.

उजवी फळी–कामबक्ष, डावी फळी–बहरामंदखान, बेदारबख्त–हरावल (आघाडी), तरबियतखान–पुढे (पेश) रुहुल्लाखान–अल्तमश–चीनकुलीजखान चंदावल (पिछाडी) मुहंमदखान व फतेउल्लाखान यांच्या दोन वेगळ्या तुकड्या.

सत्तावीस मे – सियादतखान हा गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी गेला होता. तो येऊन बादशहांना भेटला.

काल फतेउल्लाखानाने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले.

'मी प्रयत्नाची शिकस्त करुन माझे मोर्चे थेट पन्हाळ्याच्या किल्ल्यापर्यंत नेले होते. एका आठवड्यांत मी किल्ल्यावर हल्ला करणार होतो. पण तितक्यात तरबियतखानाच्या मध्यस्थीने बादशहापर्यंत सल्ल्याची बोलणी पोहोचली. माझी सगळी मेहनत वाया गेली.'

बादशहा बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान यास म्हणाले 'तुम्ही उद्या जाऊन फतेउल्लाखान याचे समाधान करा. त्याला म्हणावे 'सर्वच या मोहिमेत झटले आहेत. पावसाळ्याचा मोसम आहे. जे करावे लागले तेच योग्य होते. (मौसमे-बरसात अस्त. हमी मसलिहत बूद.)

बादशहांनी आज्ञा केली की मुनीमखान आणि त्याचा मुलगा यांनी चीन कुलीजखान व इस्माइलखान मका यांच्या गोटाची काळजी घ्यावी.

अठ्ठावीस मे– बादशहांच्या पुढील मुक्कामाची जागा पाहून मतलबखान आला. त्याने सांगितले की पावणे तीन कोसाची मजल आहे. बादशहा म्हणाले, 'उद्या आघाडीचे तंबू रवाना करा'

बादशहांनी फतेउल्लाखानाला खान बहादूर व काजी मुहंमद अकरम याला खान या पदव्या दिल्या. तरबियतखान, हमीदुद्दीन खान बहादुर, व कामयाब खान यांना बक्षिसे देण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की शहादुर्ग (पन्हाळगड) याचा उल्लेख शहाबेनी-दुर्ग असा करण्यात यावा.

शहाजादा बेदारबख्त हा येऊन बादशहांना भेटला. बादशहा त्याला म्हणाले, 'तयार रहा. मी तुम्हाला मलकापूर कडे पाठवीत आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की शहा बेनीदुर्ग (पन्हाळगड) च्या भोवतालचे ठाणेदारांना हुजुरात बोलावून घ्यावे व त्यांना चौकी पाहाऱ्यावर नेमावे.

बादशहा फतेउल्लाखानाला म्हणाले '(पावसाळ्यासाठी) आम्ही छावणी कोठे करावी तुम्ही ठरवून सांगा. तेथेच छावणी करु.'

फतेउल्लाखान म्हणाला 'हुजुरांनी ब्रह्मपुरीला छावणी केली तर उत्तमच, तसे नसल्यास खटावला छावणी घालावी. म्हणजे पावसाळ्यात किल्ले चंदनवंदन व नांदगिरी हे जिंकून घेता येतील.

बादशहा म्हणाले 'आम्ही खटावपाशी छावणी देऊ.'

इंग्रज सत्ताधीशांचा वकील सर वीलियम नॉरिस हा आपल्या सहकाऱ्यांसह हुजुरात आला. त्याने पन्हाळगड विजयाबद्दल बादशहांना तीनशे अश्रफ्या रुहुल्ला-खानाच्या मध्यस्थीने भेट म्हणून दिल्या. रुहुल्लाखान हा बादशहाना म्हणाला,

'इंग्रज वकीलाची विनंती आहे की 'पन्हाळगड विजयाबद्दल मी माझ्या तळावर उत्सव करु इच्छितो. आज्ञा असेल तर तोफा उडवीन म्हणतो.' विनंती मान्य करण्यात आली. सर वीलियम नॉरिस याला एक घोडा व त्याचे सहकारी यांना खिलतीची वस्त्रे देण्यात आली. त्यांची नावे अबरोवेल (?) नॉरिस, मिस्टर टॉमस (?) नौल्स (?) मिस्टर मिल (?) मिस्टर हिल (?)

'आम्ही खटावला जाणार आहोत' तर तेथे चारापाण्याची काय सोय आहे आणि येथून कऱ्हाड मार्गे खटावचे काय अंतर आहे 'याची चौकशी करुनकळवावे' अशी आज्ञा झाली. बादशहांना कळविण्यात आले की 'येथून कऱ्हाड सोळा कोसा-वर व तेथून पुढे सतरा कोसावर खटाव आहे.

बादशहांनी आज्ञा केली की, 'बेलदारांचा दारोगा खिदमतराय याने किल्ल्यात जाऊन तेथील देऊळ पाडून यावे'

खान फिरोजजंग याने पुढीलप्रमाणे बातमी पाठविली— 'ममाजीचा (?) मेहुणा मंगलजी व नरकवासी संताजी (घोरपडे) याचा पुतण्या संभाजी (?) हे

अहिरगी गावाजवळ गोळा झाले होते. मीरवफा हा त्यांच्यावर चालून गेला. युद्ध झाले. दोघा शत्रूंना (मंगलजी व संभाजी) यांना पकडून कैदेत टाकण्यात आले.' मीरवफाने शत्रूच्या दोन तलवारी बादशहांना नजर केल्या. त्याला बक्षीस व खिलतीची वस्त्रे देण्यात आली. मर्दानगडचा किल्लेदार प्रतापसिंग याने बादशहाचा निरोप घेतला. मछींद्रगडचा किल्लेदार मुहंमद रुस्तम याला मन्सबीत वाढ देण्यात आली. खटावचे बाबाजी देशमुख वगैरे दोन इसमांना खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

रायचूरच्या बातमीवरुन कळले की 'येथील किल्लेदार व फौजदार समंदर खान याला एक हजार जात व बाराशे स्वार अशी मन्सब होती. तो मरण पावला.

एकोणतीस मे– पन्हाळगडला शहाबेनी दुर्ग असे नांव द्यावे अशी यापूर्वी बादशहांनी आज्ञा केली होती. पण आता यापुढे पन्हाळगडचा उल्लेख बेनीशहा-दुर्ग असा करावा अशी आज्ञा झाली.

तीस मे– बादशहाजादा मुहंमद कामबक्ष हा आजारी होता. तो (बरा होऊन) येऊन बादशहांना भेटला. तरबियतखानाने पुढीलप्रमाणे विनंती केली– 'आवजी आढळराव हा पन्हाळगडच्या मोर्च्यात माझ्यापाशी तैनात होता. वेढयात त्याने कसून मेहनत केली आहे. त्याला खानापूरच्या ठाणेदारीवरुन बदलले त्यावेळी त्याची मन्सब कमी करण्यात आली होती. ती बहाल व्हावी.' विनंती मान्य करण्यात आली. आवजी आढळराव यास दीड हजार जात व सहाशे स्वार अशी मन्सब होती. तीत पाचशे जात व तीनशे स्वार अशी भर घालण्यात आली.

रायचूर उर्फ फीरोजनगरचा किल्लेदार समंदरखान हा मरण पावला होता. त्याच्या जागेवर उदगीरचा किल्लेदार व फौजदार कासिमखान याची नेमणूक करण्यात आली. त्याला तीनशे जात व अडीचशे स्वार अशी मन्सब होती. तीत शंभर जात व साडेतीनशे स्वार अशी भर घालण्यात आली.

खटावकडे रवाना होताना सैन्य व अधिकारी याची संख्या (तुमार व रचना) कशी राहील याचा तपशील बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याने बादशहा समोर ठेवला. उजवी फळी– कामबक्ष, डावी फळी बहरामंदखान, चीनकुलीजखान चंदा-वल (पिछाडी), रुहुल्लाखान–इल्तमश मध्याची आघाडी, तरबियतखान. पुढे पाठिंबा देणारी फौज (फौजेतरह) उजवीफळी मुहंमद अमीनखान, डावी फळी फतेउल्ला-खान, फौजेचे करावल (टेहेळे) पुढीलप्रमाणे– ख्वाजाखान–आघाडी, अईजखान मरहूम याचा नातू शमशेरबेग उजवी फळी, मुहंमद शरीफ डावी फळी, खुस्रोखान पिछाडी.

रावतमाल झाला हा परळी उर्फ नवरसतारा येथे किल्लेदार होता. त्याच्या ऐवजी राव दलपत बुंदेला याचा मुलगा रामचंद याला किल्लेदार म्हणून नेमण्यात आले. त्याला तीनशे जात व दोनशे पन्नास स्वार अशी मन्सब होती. तीत तीनशे स्वारांची वाढ करण्यात आली.

ग्वाल्हेरचा किल्लेदार मुहंमद फाजिल मरण पावला. त्याच्या जागेवर नगारखान्याचा दारोगा खिदमत तलबखान याची नेमणूक झाली.

रायचूरच किल्लेदार समंदरखान हा मरण पावला होता. त्याची मुले मुहंमद अफरोज व मुहंमद बहरोज यांपैकी मोठ्याला मन्सबीत बढती व धाकट्याला नव्याने मन्सब देण्यात आली.

सत्रसाल (छत्रसाल) राठोड याचा मुलगा व हटीसिंग हा पन्हाळगढच्या वेढ्यात कामी आला होता. त्याचा मुलगा वैरीशाल याला तीनशे जात व पन्नास स्वार अशी मन्सब करण्यात आली. करीसिंग (केसरीसिंग. सत्रसालचा दुसरा मुलगा) याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

परळीचा किल्लेदार रावतमल झाला याला पन्हाळगडचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.

बादशहांनी मागे मुफ्तखर खानाचा मुलगा जहूरुल्ला (मिरजेचा फौजदार) याला उदगीरचा फौजदार हुसामुद्दीन खान याचा नायब म्हणून नेमले होते. आता त्याला रास्त फौजदार म्हणून नेमण्यात आले. हुसामुद्दीन खान उर्फ अब्दुल्कयूम किल्लेदार व फौजदार उदगीर याची फौजदारी काढून घेण्यात आली. त्यामुळे त्याची मन्सब कमी करण्यात आली. (किल्लेदारी राहिली.)

बयूतात (सरकारी मालमत्तेचा अधिकारी) फजाइलखान हा (मालमत्ता जप्त करण्यासाठी) पन्हाळगड व पवनगड या किल्ल्यात गेला होता. तो येऊन बादशहांना भेटला.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान याने गनिमांच्या लुटीत एक हत्ती मिळविला होता. तो स्वतःपाशी ठेवून बसला आहे. बादशहांनी आज्ञा की 'हत्ती मागवून घ्या.'

पिराजी (घाटगे ?) याला बेनीशहा दुर्ग (पन्हाळगड) चा देशमुख म्हणून नेमण्यात आले. त्याला एक शाल देण्यात आली. कोल्हापूरच्या देशमुखांपैकी आबाजी व आणखी एक इसम यांना शाली देण्यात आल्या. कोल्हापूरचा देशपांडे श्यामजी याला एक शाल व दुशालही देण्यात आली.

एकतीस मे– यलबरशखानाचा भाऊ ख्वाजाकुली याला खान ही पदवी देण्यात आली व त्याला बहरामंदखानापाशी तैनात करण्यात आले.

अब्दुलखालिक हा मध्य आशियातून येऊन बादशहाला भेटला. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

फतेल्लाखान हा बहरामंदखानाच्या फौजेत तैनात झाला होता. त्याच्या विनंतीवरून त्याच्या पथकाच्या पगारासाठी म्हणून त्याला दोन हजार अश्रफ्या देण्यात आल्या. फौजेच्या दिवाणांनी पथकात किती सैनिक आहेत याची पाहणी करावी अशी आज्ञा झाली.

भाड्याचे उंट काढून टाकावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

पवनगडच्या रानात एक अस्वल निघाले असून शहाजादा बेदारबख्त याने त्याला चहूकडून घेरले आहे असे कळले. बादशहांनी तिकडे मतलबखान करावल व इतर इसम यांना पाठविले.

पन्हाळगडचा किल्लेदार रावतमल झाला याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

सकाळी फराशखान्याचा मुश्रफ याने विचारले 'पेशखान्याचे तंबू पुढे पाठविण्यासंबंधी काय आज्ञा?' बादशहा म्हणाले, 'पाठवा.'

एक जून, १७०१

आज बादशहा आपल्या तख्तेखावर स्वार होऊन खटावच्या दिशेने निघाले. दीड कोसाचा प्रवास करून ते पवनगडासमोरील आपल्या निवास स्थानात दाखल झाले. ते निवास स्थानाजवळ आले त्यावेळी शहाजादा बेदारबख्त त्यांना येऊन भेटला. बहरामंदखान याने पागोट्याच्या कापडाचे नऊ ठाण भेट म्हणून दिले. इंग्रज वकीलाने यावेळी तोफांचे बार केले. त्याने दोन लहान बंदुका भेट म्हणून दिल्या. बादशहांनी त्या पाहिल्या. त्या बंदुका त्यांनी रुहुल्लाखानाची मुहंमद खलील वगैरे मुले यांना बक्षीस म्हणून दिल्या. बादशहांनी शहाजादा बेदारबख्त याला आपल्या तंबूकडे जाण्यास निरोप दिला.

बादशहा बहरामंदखानाला म्हणाले 'शहाजादा बेदारबख्त यांना आम्ही येथेच सोडू. ते पन्हाळगडच्या पायथ्याशी राहतील. त्यांच्याबरोबर सतरा हजार स्वारांचे सैन्य (तूमार) राहील अशी व्यवस्था करा.'

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'दक्षिणी रयतेची माणसे पन्हाळगडावर आहेत. मराठ्यांचे हेर माहिती मिळविण्यासाठी त्यांच्याकडे ये– जा ठेवतात.' बादशहांनी आज्ञा केली की 'मन्सूरखानाने त्यांना किल्ल्याबाहेर काढावे.'

पन्हाळगडचा बक्षी व वाकनीस म्हणून खैरुल्ला याची नेमणूक करण्यात आली.

रायचूरच्या किल्ल्यावर नजफकुली याची किल्लेदार व फौजदार म्हणून नेमणूक करण्यात आली. कासिमखान (उदगिरचा किल्लेदार) याची त्या जागेवर नेमणूक करण्यात आली होती ती स्थगित करण्यात आली.

दोन जून– बादशहांनी कामबक्ष याला अठरा हजार रुपये किंमतीचा रणजित नावाचा हत्ती बक्षीस म्हणून दिला.

पन्हाळगडचा माजी किल्लेदार त्र्यंबकजी याचा वकील अप्पाजी यास खिलतीची वस्त्रे व घोडाही देण्यात आला.

मन्सूरखान याला बादशहांनी आज्ञा केली की 'पन्हाळगडचा नवीन किल्लेदार नेमून येईपर्यंत तुम्ही किल्ल्याबद्दल सावधगिरी बाळगा.'

मीर आतिश (दारुगोळा यांचा प्रमुख) तरबियतखान याने विनंती केली की 'पन्हाळगडच्या हशमाचा पगार थकला आहे,' तीस हजार रुपये काम चलाऊ म्हणून देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

पन्हाळगडावर असलेली पूर्वीची सामुग्री जप्त करण्यात आली तिचा तपशील–

हुक्का आतिशी (रॉकेट सारखे) साठ, तलवारी पन्नास, भाले साठ, लाकडी पालख्या वीस, सरब व बारुद दोनशे सत्तावन मण, ढाली चार, धान्य सत्तर मण, लोखंडी गोळे तीनशे.

कीरखान्याचा दारोगा तहव्वुरखान व कोयल (कोप्पळ का आंध्रातील कोइलकोंडा) चा जमीनदार वेंकट याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

बादशहांना कळविण्यात आले की 'उद्याच्या मजलेत टेकड्या, खडक पुष्कळ आहेत. गाड्यांची वाट नाही.' बादशहा म्हणाले 'आम्ही याच वाटेने जाऊ. गाड्या उजवीकडील रस्त्याने येतील. बरोबर मुहंमद अमीनखान व ख्वाजा मुहंमद याची पथके राहू द्या.'

तीन जून– बादशहा आज सकाळी तख्तेखावर बसून पवनगडजवळून निघाले. त्यांनी घाट ओलांडला तसे बेदारबख्ताने येऊन त्यांची भेट घेतली. बादशहा त्याला म्हणाले 'तयार रहा. उद्या गुरुवारी मी तुम्हाला निरोप देणार आहे.' बादशहांनी आज पावणेतीन कोसाचा प्रवास केला आणि ते बेदारबख्ताच्या तळाच्या अलीकडील निवासस्थानात दाखल झाले. बादशहा म्हणाले 'पुढील मजलाच्या चार कोसाच्या दोन मजला करा. आम्ही येथून शुक्रवारी, परवा निघू.'

बादशहा बहरामंदखानाला म्हणाले 'खाने आलम, (मुकर्रबरखान शेख-निजाम याचा मुलगा) वगैरेंनी बेदारबख्ताबरोबर जावे.

बेदारबख्ताच्या फौजेत तैनात असलेला मीरान हा चार हजारी मन्सबदार (चार हजार जात व चार हजार स्वार) मरण पावला. त्याच्या मुलाला सुतकातून उठवून हुजुरात (सांत्वनासाठी) आणावे अशी मियानाखान यास आज्ञा झाली.

चार जून– आज शहाजादा बेदारबख्त व त्यांचा मुलगा बेदारदिल हे येऊन बादशहांना भेटले. बादशहांनी बेदारबख्ताला गनिमांच्या पारिपत्यासाठी गदग रायबाग हुक्केरीकडे जाण्यासाठी निरोप दिला. बादशहाच्या आज्ञेने बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याने बेदारबख्ताबरोबर देण्यात येणाऱ्या सैन्याचा तपशील दिला होता. एकूण स्वारांची संख्या सतरा हजार दोनशे पंचाहत्तर स्वार भरली. बेदारबख्त यांच्या बरोबर जाणारे सरदार म्हणजे सरफराज़खान, खानेआलम; मुनव्वरखान, शेरखान, रणबाज वगैरे यांची नावे देण्यात आली होती.

पवनगडचे नाव बदलून यापुढे किल्ल्याचा उल्लेख रसूलगड असा करावा अशी आज्ञा झाली.

कोइल (कोईलकोंडा) चा जमीनदार वेंकट हा तरबियत खानापाशी तैनात होता. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

अब्दुर्रज्जाकचा भाऊ अब्दुलअली हा विलायतेहून (मध्य आशियातून) आला होता. त्याला सातशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब देण्यात आली.

मुरादाबादचा फौजदार मुहंमद यारखान याचा नायब अज्मतुल्ला हा बादशहाच्या छावणीत दाखल झाला, त्याची नेमणूक सैन्याच्या इल्तमश–(नजीकची आघाडी) वर करावी अशी आज्ञा झाली.

राव मानसिंग जाधव याला चीनक़ुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) याच्या सैन्याच्या चंदावलीवर (पिछाडीवर) नेमण्यात आले.

बहरामंदखानाने बादशहांना कळविले की शहाजादा बेदारबख्ताच्या सैन्याचा तुमार (मस्टररोल) सतरा हजार एकशे चाळीस स्वार असा आहे बादशहांनी आज्ञा केली की शहाजाद्याबरोबर चौदा हजार स्वार देण्यात यावेत.

पाच जून– आज बादशहा तख्तेखावर स्वार होऊन निघाले. अडीच कोस प्रवास करुन ते तिपार (नेबापूर, पन्हाळघाजवळ) या खेड्याजवळील आपल्या निवासस्थानात दाखल झाले. काल रात्री बादशहा हे नगारखान्याचा दारोगा मुहंमद अमीन याला म्हणाले 'उद्या मुहरमचा दहावा दिवस आहे नौबती वाजवाव्या.'

खान फीरोजजंग याच्या सैन्यात फरजामखान हा तैनात होता. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

बादशहांना कळविण्यात आले की 'हणमंतराव (मराठा सरदार) हा मोठे सैन्य घेऊन खटाव भागात हालचाली करीत आहे.' बादशहांनी फतेउल्ला खानाला सैन्य बरोबर देऊन त्याच्या (हणमंतरावाच्या) पारिपत्यासाठी पाठविले.

त्याच्याबरोबर रजवीखान वगैरे देण्यात आले. अंबरचा राजा जयसिंग हा अंबरहून रवाना झाल्याचे बादशहांना कळविण्यात आले.

सहा जून– आज बादशहा तिपार (?) या मुक्कामाहून निघाले. सव्वा दोन कोसाचा प्रवास करून ते मौजे ननज (?) या गावी पोहोचले (आणखी एके ठिकाणी गावाचे नाव सेनीगांव असे दिले आहे.) बादशहांनी विचारले, 'येथून कृष्णेचा उतार किती लांब आहे?' कळविण्यात आले की दोन मजला होतील. एक मजल सव्वादोन कोसाची व दुसरी मजल सव्वाचार कोसाची.

बदी उज्जमान गुर्जबर्दार हा नावा आणण्यासाठी ब्रह्मपुरीला गेला होता. त्याने बीस मजला पार करून नावा आणल्या. त्या कृष्णा नदीच्या उतारावर ठेवाव्या अशी आज्ञा झाली.

सात जून– बादशहा आपल्या नजया (?) या गावाच्या मुक्कामाहून निघाले. ते कृष्णा नदीच्या काठावर पोहोचले. ते नावेत बसले. नावेत त्यांच्याबरोबर बादशहाजादा कामबक्ष, बक्षी उलमुल्क बहरामंदखान, रुहुल्लाखान, मुल्तफतखान व नावांचा प्रमुख नुस्रतखान हे होते. बादशहांनी नदी ओलांडली. एकूण सव्वाचार कोसाचा प्रवास करून त्यांनी कृष्णेच्या पलीकडे तळ दिला. बादशहा म्हणाले की, 'आम्ही येथे दोन मुक्काम करु. उद्याची सव्वा कोसाची व परवाची सव्वादोन कोसांची मजल एका मजलेत उरकू.' मुहरम असल्यामुळे अनाथ मुलांना शंभर रुपये व काही सोने चांदी देण्यात यावे म्हणून शेख सैफुल्ला याला रक्कम व वस्तू देण्यात आल्या.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे,–'त्र्यंबकजी हा मराठ्यांच्या तर्फे पन्हाळागडचा किल्लेदार होता. पन्हाळगड मोगलांनी घेतल्यानंतर तो नरकवासी रामा (राजाराम) याचा कारभारी रामचंद्र (रामचंद्र पंत अमात्य) याला भेटण्यासाठी खेळणा (विशाळगड) किल्ल्यावर गेला. रामचंद्रपंताने त्र्यंबकजीला म्हटले 'तुम्ही निमक हराम झालात. किल्ला मोगलांच्या हवाली केला', त्र्यंबकजी म्हणाला 'सोरा दारु इत्यादी सामुग्री कमी पडू लागली. तुम्हीही आमची वास्तपुस्त केली नाही. त्यामुळे किल्ला मोगलांना द्यावा लागला.' यावर रामचंद्रपंताने त्याला कैदेत टाकले.

आठ जून – फीरोजनगर उर्फ यादगीर (गुलबर्गा जिल्हा) चा किल्लेदार व फौजदार मुहमद शरीफ याला मुर्तजाबाद मिरजेचा किल्लेदार म्हणून

नेमण्यात आले. तो येऊन बादशहांना भेटला. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली व त्याला मिरजेच्या किल्लेदारी व फौजदारीवर जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

फतेउल्लाखान बहादुर हा काफरांचा (मराठ्यांचा) मोड करण्यासाठी खटावकडे गेला होता. त्याला अडीच हजार जात व सहाशे स्वार अशी मन्सब होती. तीन दोनशे स्वारांची वाढ करण्यात आली. रजवीखानाच्या मन्सबीतही शंभर स्वारांची वाढ करण्यात आली.

मुरादाबादेचा फौजदार मुहंमद यारखान याचा नायब अजमतुल्ला हा आज्ञेप्रमाणे छावणीत येऊन दाखल झाला होता. त्याच्याही मन्सबीत वाढ करण्यात आली.

काल चोरांनी (मराठ्यांनी) छावणीत मागील बाजूने प्रवेश केला. त्यांनी इब्राहीम व इतर माणसे यांचे सामान लुटले. त्यांनी तोफखान्याचे बैल पळविले. शागिर्द पेशांचे सात हजार रुपये लुटले. या शिवाय ते छावणींतील उंट पळवून घेऊन गेले.

बादशहांनी मुहंमद अमीनखान व कामयाबखान यांना त्यांच्या पारिपत्या-साठी पाठविले.

फतेउल्लाखान बहादूर हा खटावकडे गेला होता. त्याच्या सहकाऱ्याना पगार बाकीबद्दल एक हजार अश्रफ्या देण्यात याव्या अशी आज्ञा झाली. फतेउल्ला-खानापाशी तैनात करण्यात आलेली बरीच माणसे त्याच्यापाशी पोहोचली नव्हती. मुद्दाम अधिकारी या कामासाठी नेमण्यात येऊन त्यांना फत्तेउल्लाखाना-पाशी पोहोचवावे अशी आज्ञा झाली.

रावतमल झाला याची नेमणूक पन्हाळगडच्या किल्लेदारीवर झाली होती. तो अद्याप तेथे पोहोचला नव्हता. मुद्दाम अधिकारी या कामासाठी नेमून रावत-मलला पन्हाळगडावर व रामचंद (दलपत बुंदेल्याचा मुलगा) याला किलीदे फतह (वसंतगड) वर पोहोचवावे अशी आज्ञा झाली.

कोल्हापूरचा परगणा खालसा शरीफा (खास बादशहाचा) मध्ये घेण्यात यावा व तेथे अमीन व फौजदार म्हणून अर्शदखानाने कुणाचे तरी नाव सुचवावे अशी आज्ञा झाली.

जुल्फिकारखानाच्या फौजेतील बातम्यांवरून कळले की महंमुदखानाच्या बिरादरीचे पुढील लोक त्याच्या सैन्यात हजर नाहीत–अब्दुरहमान, एक हजार जात व पाचशे स्वार, शेख मुजाहिद, चारशे जात व दोनशे स्वार, अलावलचा

मुलगा अब्दुल-रहीम, तीनशे जात व दोनशे स्वार. त्यांच्या जहागिरी काढून घेण्यात याव्यात अशी आज्ञा झाली.

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

शुजाअतखान (गुजरातचा सुभेदार) याचा दत्तक मुलगा नजर अली याने शंभर बर्कंदाज व पाचशे बहेलिये याना घेऊन पन्हाळगडच्या पायथ्याशी राहावे. जमाल कौल याने शंभर बेलदार, पन्नास पाथरवट व पाचशे शक्के (पाणी वाहाणारे) यांना बरोबर घेऊन, मन्सूरखानाच्या सल्लामसलतीने किल्ल्यात आवार (अहाता, कंपौंड, भिंतीचे आवार) तयार करावे. किल्ल्यातील तोफा आवारात ठेवून त्यांचे संरक्षण करावे.

शहाजादा बेदारबख्त याने आपल्या विनंतीपत्रात खालीलप्रमाणे मागण्या केल्या–

१) तैनात करण्यात आलेले लोक हजर नसले तर सैनिकांच्या यादीतून त्यांची नावे काढून टाकण्याची आज्ञा व्हावी. आज्ञा झाली की बेदारबख्ताच्या फौजेचा तपशील (सैन्यबळ इत्यादी) फौजेच्या बक्षीने कळवावा असे त्यास (बक्षीला) लिहावे.

२) पन्हाळगडच्या परिसराची फौजदारी (कोल्हापूरपर्यंत) निसारखान (रणबाजखान?) च्या ऐवजी सरफराजखानाच्या भावाला देण्यात यावी. विनंती मान्य झाली नाही.

३) माझ्या सैन्याच्या हरावलीला सरफराजखान व दोन्ही फळ्यांना व मुनव्वरखान व खाने आलम हे आहेत. पिछाडीसाठी कोणी नाही. इस्माईलखान मखा किंवा राजा अवधूतसिंग (ओछर्याचा राजा) यांना पिछाडीवर नेमण्यात यावे. आज्ञा झाली की येथेही कामे आहेत. जमशीदखान बिजापुरी याला पिछाडीवर (चंदावल) नेमावे.

पन्हाळगडाच्या दुरुस्तीसाठी जमाल कौल याला जे काम सांगितले होते त्याचा तपशील असा–

तरबियतखान व फतेउल्लाखान यांनी सुरुंग खणले होते ते भरून काढणे. किल्ल्याची डागडुजी करणे.

किल्ल्याच्या भोवती कमरकोट तयार करणे, कमरकोटमध्ये दहा दहा साखळ्यांवर बुरुज तयार करणे.

मरहूम किफायतखान याचा मुलगा मुहंमद इब्राहीम याने पुढीलप्रमाणे विनंती केली– 'मी स्वारीत आपल्याबरोबर होतो. माझी माणसे व सामानसुमान

यांना वाटेत मराठ्यांनी लुटून नेले. त्यात माझे सामानसुमान व नगद रक्कम मिळून सात हजार रुपये होतात. माझ्या तैनातीत शागीर्दपेशा होते. त्यांच्या पगाराचे सात हजार रुपये होते. तेही लुटण्यात आले.'

बादशहांनी आज्ञा केली की, 'मुहंमद अमीनखान, कामयाबखान व तरबियतखान यांनी गनिमांच्या मागे जावे. मुहंमद अमीनखानाने एकीकडून व कामयाबखानाने दुसरीकडून गनिमांचा पाठलाग करावा व गनीम सापडतील तेथे त्यांना ठार मारावे.'

नऊ जून– आज बादशहांनी कृष्णेच्या कांठानजीक दरबारचे (न्यायालय) काम पाहिले. बादशहांनी खालीलप्रमाणे हुकूम दिले–

१) बादशहाजादा मुहंमद कामबक्ष याच्या पथकांनी लष्कराच्या उजव्या-बाजूने बाहेर जावे आणि लष्कराच्या बाहेर संध्याकाळपर्यंत सावधगिरीने राहावे. लष्करातील हत्ती उंट बैल इत्यादी जनावरांना चरण्यासाठी पुढे जाऊ देऊ नये.

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याने आपली पथके घेऊन लष्करच्या डाव्या बाजूने छावणीबाहेर जावे. संध्याकाळपर्यंत तेथे त्याने तयारीने राहावे आणि जनावरांना चरण्यासाठी पुढे जाऊ देऊ नये-

बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याने पथके घेऊन छावणीच्या मागे जावे व चंदावल (पिछाडीची) पथके येईपर्यंत छावणीच्या बाहेर मागील बाजूस राहावे.

मीर आतिश (तोफखान्याचा प्रमुख) तरबियतखान याने छावणीच्या बाहेर समोरच्या दिशेने जाऊन संध्याकाळपर्यंत तयारीने राहावे.

आज्ञा झाली की रणबाजखान याने पंचवीस नावा मुर्तजाबाद मिरजेपर्यंत पोहोचवून यावे.

उस्मानखान करावल व इश्रतबेग खुशमंजिल हे छावणीपासून खटावपर्यंत मजला निश्चित करण्यासाठी गेले होते. त्यांनी येऊन सांगितले की आम्ही सुमारे तीन तीन कोसाच्या सात मजला ठरविल्या आहेत. बादशहांनी आज्ञा केली की 'सुमारे दोन कोस भरतील अशा मजला आखाव्या.'

सरफराजखान हा बेदारबख्ताच्या फौजेत तैनात होता. त्याने पुढीलप्रमाणे विनंतीपत्र पाठविले– 'माझा भाऊ सय्यद अफजल हा आजारी होता. यामुळे तो बेदारबख्ताच्या फौजेत पोहोचू शकला नाही. त्याची जहागीर काढून घेण्यात आली आहे. ती पूर्ववत बहाल करण्यात यावी.' विनंती मान्य करण्यात आली. सय्यद अफजल याला एक हजार जात व नऊशे स्वार अशी मन्सब होती.

दिलेरखान विजापुरीचा मुलगा अब्दुलफताह याला एक हजार जात व दोनशे स्वार अशी मन्सब देण्यात आली.

काल रात्री बादशहांना कळविण्यात आले की चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी मुहंमद अमीनखान गेला होता. पण त्यांचा (मराठ्यांचा) पत्ता लागला नाही. त्यामुळे तो परत आला. सकाळी बादशहांनी त्याला पुन्हा गस्त घालण्यासाठी जावे म्हणून आज्ञा केली. त्याप्रमाणे तो गेला.

इनायतुल्ला हा अंजराई (नाशिक जिल्हा) चा किल्लेदार होता. तो मरण पावला. त्याच्या जागी किल्लेदारीवर त्याचा मुलगा फंजलुल्ला याची नेमणूक करण्यात आली. त्याचा भाऊ मुरादअली याची मन्सब वाढविण्यात आली.

बंदीछूर जातीचे आंबे बादशहाकडे पाठविण्यात आले. त्यापैकी तीस आंबे शहाजादा बेदारबख्त यास, चार आंबे बक्षी उल्मुल्क बहरामंदखान यास, तीन तीन आंबे रुहुल्लाखान व इतर उमराव यांस बादशहांनी दिले.

कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान यांनी मराठ्यांचा एक हत्ती लुटला होता, तो हुजुरात पाठविला.

बंगालहून हत्ती व काबुलहून घोडे हुजुरात येत आहेत असे बादशहांना कळविण्यात आले.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे–'चोरांनी (मराठ्यांनी) वाटेत रेहेकल्यांचे (लहान तोफा) गाड्यांचे बैल लुटून नेले होते. कामयाबखान याने पाठलाग करून बैल सोडवून आणले आहेत.'

छावणीचा नायब कोतवाल मुहंमद अमीन याला बादशहांनी आज्ञा केली की 'लष्करातील उंट व बैल यांना चरण्यासाठी बाहेर पाठवू नये. कोणी पाठविलेच तर जनावरे जप्त करावी. टेहेळणीच्या पथकांनी कूच व मुक्काम या वेळी छावणीच्या भोवती एक कोसभर गस्त घालीत असावे'.

काल दिवस मावळण्यास एक प्रहर राहिला असता बादशहांनी रुहुल्लाखानास खालीलप्रमाणे आज्ञा केली–

'तुम्ही कृष्णेच्या पलीकडे जा. मागील मजलेच्या मध्यात थांबा. लष्करचे सगळे बुणगे नदीपार होईल तसे तुम्ही रात्री परत या.'

सकाळी मुहंमद अमीन याला मराठ्यांचा पत्ता लागला. त्याने लिहिले 'दोन चोर (मराठे) धरले. त्यांच्याकडून कळले की मराठ्यांनी मुहंमद इब्राहीमच्या माणसाना लुटले. ती लूट त्यांनी एका गढीत ठेवली आहे. यावर काय आज्ञा? बादशहानी आज्ञा केली की 'गढीला वेढा घाला.'

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'मर्दानगड (वर्धनगड)च्या किल्लेदाराचा वकील फतेउल्लाखानापाशी आला. त्याने सांगितले की 'किल्लेदाराला प्राणाचे अभय मिळत असेल तर तो मोगलांना किल्ला देण्यास तयार आहे.' फतेउल्लाखानाने विनंती मान्य केली

दहा जून– आज बादशहा मुक्कामावरून निघाले. मुहंमद अमांनखान यास त्यानी सांगितले 'तुम्ही पुढील मजलेच्या दरम्यान राहून उजवीकडे व डावीकडे खबरदारी बाळगावी. लष्करचे बुणगे रवाना करण्याची व्यवस्था करावी.'

अडीच कोसाचा प्रवास करून बादशहा मौजे कुंडल (तासगाव तालुका, सांगली जिल्हा) येथे मुक्कामाला आल. मुहंमद मुरादखान याने वाटेत लष्करच्या मागे राहावे व रात्री छावणीत यावे अशी आज्ञा झाली. चीन कुलीजखान हा पिछाडीला (चंदावल) होता. बहिर्जी (पांढरे) वगैरेंना त्याच्यापाशी तैनात करण्यात आले. मुरादाबादचा अज्मतुल्ला याने मन्सबीची विनती केली. त्याच्या दोनशे स्वारांची (पैकी पन्नास चिलखतधारी) पाहाणी करण्यात यावी अशी आज्ञा झाली.

पऱ्हाळगडाहून परत, खटावजवळ छावणी : ४

जून १७०१

अकरा जून– आज बादशहा आपल्या मुक्कामावरून निघाले. सव्वादोन कोसाची मजल मारून त्यांनी एरला (विरळा) नदी ओलांडली व नदीच्या पलीकडे मुक्काम केला.

नावांचा प्रमुख नुस्रतखान याला बादशहांनी आज्ञा केली की 'दोन तीन नावा एरला नदीत ठेवाव्या. म्हणजे बाजार बुणग्यांना नदी पार करता येईल.'

बादशहा म्हणाले, 'पेशखाना (पुढे पाठविण्याचे तंबू) पुढे पाठवू नका. उद्या येथेच मुक्काम राहील.'

बादशहाजादा आज्जमच्या फौजेतील बातम्यांवरुन कळले की आज्जम हा बुऱ्हाणपुराहून उज्जैनकडे रवाना झाला आहे.

बारा जून– हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असें– 'छावणींतील बैल व उंट हे चरण्यासाठी छावणीच्या बाहेर गेले होते. चोरांनीं (मराठ्यांनी) हल्ला करून त्यांना वळवून नेले. याचवेळी बक्षी उल्मुल्क बहरामंद खान याने त्वरा केली. त्यांचा पाठलाग करून त्याने बैल व उंट सोडविले. चकमकीत एक शत्रू ठार झाला व दोन माद्या घोड्या मोगलांच्या हाती लागल्या.

तेरा जून– बादशहा आज मुक्कामाहून निघाले. ते अडीच कोसाचा प्रवास करून वाडा परेळी (? पडाळी, तासगाव तालुका) येथे मुक्कामाला आले.

फजले अलीखान याने एक समशेर व कॉफीचे दहा पेले व बशा या वस्तू बादशहांना नज़र केल्या. बादशहांनी त्यापैकी सहा पेले बादशहाजादा कामबक्ष

याला दिले. किल्ले बेनीशहा दुर्ग व रसूलगड (पन्हाळगड व पावनगड) येथील गलूरखान्याच्या (धार्मिक) अर्चासाठी रोजीना दोन रुपये चालू करावे अशी आज्ञा झाली.

औरंगाबादेचा बांधकाम प्रमुख (मेमार) शुक्रुल्ला याला बोलावून घ्यावे. बेनीशहादुर्ग किल्ल्यातील (पन्हाळगड) मशिदीची दुरुस्ती करण्यासाठी त्याला पाठवायचे आहे अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली होती की, कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान याने हुजुरातून नावा घेऊन मिरजेला कृष्णेच्या उतारात पोहोचवाव्या. रणबाजखानाने आज्ञा मान्य केली नाही. त्याला सातशे जात व पांचशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी रणबाजखानाला बडतर्फ केले.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे—'फतेउल्लाखान हा वर्धनगडच्या वाड्या जाळण्यासाठी गेला होता. किल्यातील मराठे बाहेर पडले. बाण बंदुका यांचा या युध्दात वापर झाला. शत्रूपैकी बरेच लोक ठार झाले व कित्येक जखमी झाले. शत्रूची चाळीस माणसे कैद झाली. बाकीचे लोक पळून किल्यात गेले. किल्ल्याखालच्या वाड्या जाळण्यात आल्या. दोन हजार गुरेढोरे धरण्यात आली. फतेउल्लाखानाच्या पथकातील काही मोगल ठार झाले.'

बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.' बादशहाच्या आज्ञेने खानाजादखान (मुल्तफतखान) याच्या शिक्क्याचे पत्र फतेउल्लाखानाकडे पाठविण्यात आले.

चौदा जून— बादशहा पडाळीहून निघून रीतगांव (विटे, खानापूर तालुका, सांगली जिल्हा)ला आले. त्यांनी सव्वादोन कोसाचा प्रवास केला.

अब्दुलमजीदखान याला एक हजार जात व सातशे स्वार अशी मन्सब होती. तो शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेत तैनात होता. बादशहांनी त्याची नेमणूक कोल्हापूरच्या ठाणेदारीवर केली. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

काल हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे— 'बादशहाजादा कामबक्ष यांच्या ताजसुल्तान इत्यादी अंतःपुरांतील स्त्रियांचे सामान वीस उंटांवर पेशखान्याबरोबर (पुढे पाठविण्याचे तंबू वगैरे) पाठविण्यात येत होते. मराठ्यांनी ते वाटेत लुटून नेले. बादशहांनी आज्ञा केली की 'ख्वाजा मुहंमद याने हफ्त चौकीची माणसे बरोबर घेऊन त्यांचा पाठलाग करावा, मराठ्यांचे सडकून पारिपत्य करावे आणि उंट व सामान सोडवून आणावे.'

बादशहाना कळविण्यात आले की 'हुजुरांसाठी फुलांच्या करंड्या येत होत्या. भूम परगणा (उस्मानाबाद जिल्हा, मराठवाडा) हा इज्जतखान याच्या फौजदारी

अंमलात होता. भूम परगण्यात फुलांची एक करंडी लुटली गेली. एकच करंडी बादशहाकडे पाठविण्यात आली. इज्जतखान यास सातशे जात व सातशे स्वार अशी मन्सब होती. त्याला शिक्षा म्हणून बादशहांनी त्याची मन्सब पन्नास स्वारांनी कमी केली.

प्रवासात बादशहांनी शेख हिदायतकेश याला विचारले, 'खटावपासून ब्रह्मपुरीचा तळ किती लांब आहे?' त्याने सांगितले, 'साखळीने बत्तीस कोस. त्याच्या मजला होतात अकरा.' बादशहांनी छावणीतील नायब कोतवाल मुहंमद अमीन यास आज्ञा केली की दिवस चार घटका राहिला की लष्करातील बुणग्याच्या माणसांना. छावणीच्या पुढे जाऊ देऊ नका.'

पंधरा जून– आज बादशहा रीतगांवाहून (बिटे) निघाले. ते सव्वा दोन कोसाचा प्रवास करून भूषणगडजवळील हमपूर (इरला नदीच्या काठावरील बनपूर असावे) येथे मुक्कामाला आले.

मतलबखानाने कळविले की उद्याची मजल दोन कोसाची आहे. बादशहा म्हणाले 'पेशखान्याचे तंबू पुढे पाठवा. आम्ही गुरुवारी खटाव व वर्धनगड यांच्या दरम्यान छावसाठी जाऊ. सरकारी कारखाने (निरनिराळी खाती–उंटखाना, हत्तीखाना इत्यादी) सुरक्षित स्थितीत आणावे अशी फजलेअलीखान यास आज्ञा झाली.

मुनीमखान याचा मुलगा मुहंमद काजम यास फतेउल्लाखानाकडे पाठविण्यात आले. त्याच्याबरोबर पुढील पथके देण्यात आली–सुर्खपोश (लाल डगले वाले) ऐंशी सैनिक, खडगसेन हजारी आणि त्याच्या बिरादरीचे, पांचशे सैनिक, रिसाल्याचे सैनिक.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की, 'चंदनवंदन (मराठयांचे किल्ले)च्या किल्ल्यात रसद पोहोचते ती पांचे गांवच्या वाटेने' बादशहांनी आज्ञा केली की अन्वरबेग गुर्जबर्दार याने जाऊन त्या भागातील फौजदारांना ताकीद करावी की चंदनवंदन किल्ल्यात रसद जाता कामा नये.'

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'मराठयांनी पुरंदरच्या आसपास छावण्या घातल्या आहेत.'

खान बहादुर नुस्रतजंग (जुल्फिकारखान) हा तळावर (ब्रह्मपुरी) होता, त्याने पुरंदरकडे जावे, मराठयांचे पारिपत्य करावे आणि त्यांना तिकडे छावणी करू देऊ नये अशी त्याला आज्ञा करण्यात अली.

ऐवज बेग गुर्जबर्दार याला खान ही पदवी देण्यात आली.

मरहूम लोदीखान याचा मुलगा वलीदादखान हा औंध पट्टयाचा किल्लेदार होता. त्याने पुढीलप्रमाणे विनंतीपत्र पाठविले– 'मी मराठयांच्याकडून रतनगडचा किल्ला घेतला आहे.' बादशहांनी स्वतः पत्र वाचून म्हटले 'सेवा मान्य झाली.' वलीदादखानाच्या मन्सबीत वाढ करण्यात आली व त्याला लोदीखान ही पदवी देण्यात आली.

सोळा जून– बादशहा आज रीतगाव (बनपुरी पाहिजे) हून निघाले. त्यांनी अडीच कोसाचा प्रवास केला व ते अनमोडा (? वडूजजवळ दाळमोडी) या गावी मुक्कामाला आले.

मुरादाबादचा फौजदार मुहंमद यारखान याचा नायब अजमतुल्ला छावणीत होता. फातेहा खैर (खुशालीची प्रार्थना) पढून बादशहांनी त्याला फतेउल्ला खानाच्या फौजेत तैनात होण्यासाठी जाण्यास निरोप दिला.

मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम याला बादशहांनी बोलविले. त्याला एक तलवार देऊन बादशहा त्याला म्हणाले 'फतेउल्लाखान बहादुर सांगतील तेच करा.' मुहंमद काजमबरोबर हमीदुद्दीनखान बहादुर व यलबरसखान यांच्या पथकांतील माणसे देण्यात आली.

बादशहांनी मीर आतिश तरबियतखान याला आज्ञा केली की 'दोन मजलांच्या मध्ये रोज चौकी पहारे बसवावे म्हणजे बुणग्याची माणसे सुरक्षितपणे जाऊ शकतील. तरबियतखानाने याची काळजी घ्यावी.'

सतरा जून– आज बादशहा मुक्कामाहून निघाले. सव्वादोन कोसाचा प्रवास करुन ते मौजे कडोली (कुरोळी, खटावजवळ) बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले, 'मरहूम बजीरखान याचा मुलगा सय्यद मुहंमद हा बुऱ्हाणपूर येथे आहे. त्याला पुढीलप्रमाणे लिहा. 'अंबरचा राजा (सवाई जयसिंग) येत आहे. तो बुऱ्हाणपूरला आला की त्याला तुम्ही हुजुरात आणावे. अंबरच्या राजालाही लवकर येण्याविषयी लिहावे.'

गोध्र्याचा फौजदार मुहंमद मुरादखान याने बादशहा प्रवासात असताना त्यांना एक घोडा व इतर वस्तू नजर केल्या. बादशहांनी त्याला घोडा परत दिला. (सुप्रसिध्द इतिहासकार खाफीखान हा मुरादखानाचा आश्रित होता.)

अठरा जून– आज बादशहा आपल्या मुक्कामाहून निघाले (कुरोळी) दोन कोसाचा प्रवास करुन ते खटाव जवळ मुक्कामाला आले. फतेहुल्लाखान हा येऊन बादशहांना भेटला. त्याने सांगितले 'मी, मुहंमद काजम, कृष्णराव (खटावकर) व पदाजी, (बुधपाचगावचा ठाणेदार) आज्ञेप्रमाणे

निघालो. नांदगिरीला आम्ही पोहोचलो. किल्ल्यातून मराठे बाहेर पडले. बाण बंदुकांची लढाई झाली. शत्रूपैकी अनेक जण ठार अगर जखमी झाले. आमचेही लोक ठार अगर जखमी झाले. शेवटी मराठे पळून किल्ल्यात गेले. किल्ल्याच्या वाड्यांना आगी लावण्यात आल्या. बारा घोड्या व दोनशे गुरेढोरे हाती लागली.'

बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.' कृष्णराव (खटावचा ठाणेदार) याने दोन मोहरा, पदाजीने (बुधपाचगावचा ठाणेदार) चार मोहरा, व मुहंमद काजम याने नऊ मोहरा बादशहांना नजर केल्या.

मतलबखान हा बादशहांना म्हणाला, 'आपल्या आज्ञेप्रमाणे खटावच्या जवळपास आपल्या राहाण्यास योग्य अशी जागा पाहाण्याठी मी गेलो होतो. दोन कोस फिरुन आलो. पण योग्य जागा सापडली नाही. माझ्या बरोबर फतेउल्लाखानाच्या पथकातील माणसे होती.' हे ऐकून बादशहा गप्प बसले.

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'तुम्ही उद्या वर्धनगडला जाऊन. किल्ल्याची चहूकडून टेहेळणी करून या.'

बादशहांनी बहिर्जी पांढरे यास आज्ञा केली की 'तुम्ही मुर्तजाबाद मिरजेला जाऊन रसद घेऊन हुजुरात या.'

एकोणीस जून– बादशहांनी रुहुल्लाखान, फतेउल्लाखान बहादुर व मतलबखान यांना आज्ञा केली होती की 'तुम्ही जाऊन आमच्या निवासासाठी योग्य जागा पाहून यावे.' त्याप्रमाणे ते जाऊन आले. त्यांनी दोन जागा पाहिल्या. एक जागा तीन कोसावर व दुसरी जागा चार कोसावर होती.

वीस जून– हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'रात्रीच्या सुमारास वर्धनगड किल्ल्यातील मराठे हे किल्ला सोडून निघून गेले आहेत.' बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'मन्सूरखानाचा मुलगा मुहंमद काजम याने किल्ल्यावर (वर्धनगड) जाऊन सावधगिरी बाळगावी. मुनीम खान, मुहंमदगुल व शेख हिदायतकेश यांनीही किल्ल्यात जावे. खानसामाच्या कचेरीचा दारोगा अलीरजा व फजाइलखानाचा कारकून मुहंमद खलील यांनी वर्धनगड किल्ल्यातील मालमत्ता जमा करण्यासाठी जावे.'

आज बादशहांचा मुक्काम खटावजवळ होता.

आज न्यायदानाचे काम सुरू करण्यापूर्वी बादशहा फजाइलखानाला म्हणाले 'तुम्ही बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याच्या तंबूवर जा. त्याला सांगा 'तुम्हाला व फतेउल्लाखान याला चंदनवंदनचे किल्ले घेण्यासाठी पाठविणार आहे. या आणि निरोप घेऊन जा.' त्याप्रमाणे बहरामंदखान आला. त्याला किल्ले घेण्यासाठी जाण्याचा निरोप देण्यात आला. बादशहांनी आज्ञा केली की 'बक्षी उल्मुल्क बहरामंदखान, फतेउल्लाखान, नाहरखान, (वाई प्रांताचा फौजदार) व यासीनखान (सातारा प्रांताचा फौजदार) यांच्याबरोबर जे सैन्य देण्यात येईल त्याचा तपशील (तूमार) तयार करावा.'

फतेउल्लाखानाने विनंती केली की 'छावणीत धान्याची महागाई फारच आहे. गंज (बाजार)चा क्रोरी (व्यवस्थापक) सय्यद इमामुद्दीन याची व्यवस्था अगदीच निकृष्ठ आहे. त्या जागेवर इतर कुणाची तरी नेमणूक करावी. बादशहांनी त्याची विनंती मान्य करुन म्हटले 'तुम्ही नांव सुचवा.'

एकवीस जून– बहरामंदखान याला एक हत्ती (नऊ हजार रुपये किंमतीचा) व एक हत्तीण (चार हजार रुपयं किंमतीची), मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम यास पन्नास मोहरांचा एक घोडा अशा वस्तू देण्यात आल्या.

मरहूम मुखलिसखान याच्या काही वस्तू (दीडशे चिलखते, हत्तीची सहा आसने, घोडयांच्या सहा खोगिरी) नळदुर्ग येथे होत्या. मुखलिसखान याचा मुलगा मुहंमद हुसेन याने त्या हुजुरात दाखल करण्यास मान्यता दाखविली. बादशहांनी विनंती मान्य करुन आज्ञा केली की, 'नळदुर्गचा किल्लेदार अब्बासखान याने त्या वस्तूंचे चांगले संरक्षण करावे.'

फतेउल्लाखान याने विनंती केली की 'चंदनवंदन व नांदगिरी येथील किल्लेदारानी आपण किल्ले बादशहाच्या हवाली करतो अशा अर्थाचे बोलणे लावले आहे.' बादशहानी मान्यता देऊन आज्ञा केली की '(किल्लेदार व इतर यांचे) समाधान करुन किल्ले ताब्यात घ्या.'

राजा अवधूतसिंग याचा मुलगा सुलतानसिंग याला चारशे (जात) व तीनशे स्वार अशी मन्सब देण्यात आली.

सय्यदमुजफ्फर याला गंज (बाजार) क्रमांक दोनचा दारोगा (व्यवस्थापक) नेमण्यात आले. सुभे हैद्राबाद व विजापूर येथील रसद या गंजात येत जाईल अशी बादशहांनी आज्ञा केली.

मतलबखानाने छावणीला योग्य अशी जागा पाहून यावे अशी आज्ञा झाली.

बावीस जून– रुहुल्लाखान याने कळविले की बहरामंदखान याच्या बरोबर सहा हजार दोनशे स्वार देण्यात येतील, त्याचा तपशील (तूमार) तयार केला आहे.

इखलासखान मियाना याला एक घोडा व शंभर मोहरा देण्यात आल्या. त्याला बहरामंदखानाबरोबर तैनात करण्यात आले. बहरामंदखानाच्या फौजेत दिवाण व तोफखान्याचा दारोगा म्हणून फजले अलिखान व बक्षी व वाकनीस म्हणून मुहंमद अमीन यांच्या नेमणुका करण्यात आल्या. सईदखानाचा मुलगा मुहमंद सईद याला बहरामंदखानाबरोबर तैनात करण्यात आले.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे– 'चंदनवंदन व नांदगिरीचे किल्लेदार यांनी आपले कबिले व संबंधित माणसे यांना किल्ल्याच्या बाहेर काढून स्वस्थळी रवाना केले आहे.'

मीरे सामानच्या खात्याचा दारोगा (व्यवस्थापक) अली रज हा वर्धनगड किल्ल्यातील मालमत्ता जप्त करण्यासाठी गेला होता. त्याने सांगितले की 'किल्ल्यात सहाशे पंचाहत्तर मण (पक्के) धान्य, चाळीस मण सोरा व दारु, सहा मोठया तोफा व जंबूरक आढळल्या. त्या सरकारात जमा करण्यात आल्या आहेत.

बादशहानी वर्धनगड किल्ल्याच्याचे नाव सादिकगड असे ठेवले.

रुहुल्लाखानाला छावणीसाठी जागा पाहून येण्यासाठी पाठविण्यात आले होते. त्याने येऊन सांगितले की 'येथून दीड कोसावर छावणीसाठी जागा चांगली आहे, पण तेथे पाण्याची टंचाई आहे.' बादशहा म्हणाले 'पुन्हा जाऊन दुसरी जागा पहा.'

तेवीस जून– काल हमीदुद्दीनखान बहादुर व फत्तेहुल्लाखान बहादुर हे खटावच्या पलीकडे छावणीसाठी जागा पाहून आले. त्यांनी लिहून पाठविले की 'छावणी योग्य जागा नाही.' बादशहा म्हणाले 'मतलबखान व कामयाबखान यानी जागा निवडली होती तिकडे पेशखान्याचे (पुढे पाठवायचे तंबू) उभे करा.'

अर्षदखानाचा जावई मीर महमूद याला बहरामंदखानाचा फौजेचा दिवाण म्हणून नेमण्यात आले.

मुहतशिमखानाच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

फजले अलीखानाने पुढीलप्रमाणे विनंती केली– 'मला बहरामंदखानाच्या फौजेचा दारोगा, वाकनीस व बक्षी म्हणून नेमण्यात आले आहे. फतेउल्ला

खानाला बहरामंदखानाच्या फौजेंत तैनात करण्यात आले आहे. माझे व फते-उल्लाखानाचे पटत नाही.' बादशहांनी फऊलेअलीखानाची मन्सब कमी केली व त्याने आपल्याबरोबर छावणीत राहावे अशी आज्ञा केली.

अर्शदखानाने विनंती केली की रणबाजखान (कोल्हापूरचा ठाणेदार) याला बडतर्फ करण्यात आले आहे. तो निरपराधी आहे. त्याची मन्सब बहाल करण्यात यावी. बादशहांनी विनंती मान्य केली आणि आज्ञा केली की ' रणबाज खानाने बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) च्या तोफा हुजुरांत घेऊन याव्या.

चोवीस जून– रहीमचा मुलगा रुस्तम याला मछींद्रगडची किल्लेदारी देण्यात आली. प्रतापसिंग यास सादिकगड उर्फ वर्धनगडचा किल्लेदार नेमण्यात आले.

मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम याला बहरामंदखानच्या फौजेचा बक्षी, वाकनीस व तोफखान्याचा दारोगा म्हणून नेमण्यात आले.

शेख हिदायतकेश याने बादशहांना कळविले की ' लष्करांत धान्याचा भाव रुपायाला चार शेर असा आहे.'

पण फतेउल्लाखानाने सांगितले की ' रुपायाला अडीच शेरप्रमाणेहि धान्य मिळत नाही. आपल्याला जे सांगण्यात येत आहे ते वस्तुस्थितीच्या विरुद्ध आहे.' हे ऐकून बादशहा गप्प बसले.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की ' किशनराव (कृष्णराव, खटावचा ठाणेदार) हा रसद (धान्य वगैरे) आणण्यासाठी मुर्तजाबाद मिरजेकडे गेला आहे. रसद घेऊन येत असताना मराठे हे महादेवाच्या डोंगरांतून चाल करून गेले व म्हसवड येथे त्यांनी किशनरावला घेरले आहे.' त्याचे पारिपत्य करण्या-करण्यासाठी बादशहांनी चीन कुलीजखाना याला पाठविले. मुहंमद मुरादखान (सुप्रसिद्ध इतिहासकार खाफीखान हा याच्या पदरी होता) याने चीन कुलीज खानाबरोबर जावे अशी आज्ञा झाली.

पंचवीस जून– बादशहा आज सकाळी खटांव जवळील आपल्या मुक्कामावरुन निघाले. सव्वादोन कोसाचा प्रवास करुन ते वर्धनगडजवळील आपल्या मुक्कामाला आले. बादशहाजादा आज्जम, शहाजादा मुईजुद्दीन (भावी जहांदारशहा) (मुलतानचा सुभेदार) व शहाजादा अजीमुश्शान (बंगालचा सुभेदार यांना ना पत्रे पाठविण्यात आली. उदयपुरीबेगम ही ब्रह्मपुरीच्या छावणीत होती. तिच्याकडे बंदीझूद (?) जातीचा आंब्याची करंडी पाठविण्यात आली.

सव्वीस जून– आज कचेऱ्या बंद होत्या.

एकोणतीस जून– आज्जमच्या सैन्याचा बक्षी जलालुद्दीनखान याने पुढीलप्रमाणे लिहिले 'बादशहाजादा आज्जम यांनी नर्मदा ओलांडली. पण आपण दक्षिणेत आहात तोपर्यंत मी काही नर्मदा ओलांडीत नाही. यामुळे मी बुऱ्हाणपुरात थांबलो आहे.' बादशहांनी त्याला हुजुरांत यावे अशी आज्ञा केली.

रुहुल्लाखानाने विनंती केली' मी की जाळीच्या दरवाज्या समोरच्या शामियान्यांत बसून काम करतो. पावसाच्या मोसमामुळे दप्तरच्या कागद पत्रांची नासाडी होत आहे. गुलालबारेत 'एक तंबू उभा करुन तेथे काम करण्याची आज्ञा व्हावी. अशा अर्थाचा हुकुम शरफुद्दीन खानाला देण्यात यावा.'

विनंति मान्य करण्यात आली.

औंध पट्ट्याचा किल्लेदार याकुतखान याने रतनगड किल्ल्याच्या सोन्याच्या किल्ल्या पाठविल्या. बादशहांनी त्याला अल्लाहदाद खान ही पदवी दिली.

रायचूरचा किल्लेदार व मरहूम जहांगीर कुलीखानाचा मुलगा नजफकुली याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. त्याला जहांगीर कुली अशी पदवी देण्यांत आली.

तीस जून– बादशहांना कळविण्यात आले की, 'छावणीतील उंट व बैल हे चरण्यासाठी तथवाड्याकडे गेले होते. त्यांच्यावर हल्ला करून मराठ्यांनी श्याहैंशी उंट पळवून नेले.' उंटांचा दारोगा गुलालखान याची मन्सब पन्नास स्वारांनी कमी करण्यात आली.

चीन कुलीजखान याने लिहून कळविले की, 'मराठ्यांचा सरदार शहाजी (निंबाळकर?) याने बादशाही मुलुखातून गुरेढोरे लुटली व ती घेऊन तो भूपाळगडापाशी पोहोचला. मी त्याचा पाठलाग केला. युद्धात शत्रूचा पराजय केला. शत्रूपैकी अनेक जण ठार झाले. सातशे घोडया, पाचहजार गुरेढोरे, भाले. वगैरे शस्त्रे ही लूट आम्हाला मिळाली.' बादशहा म्हणाले, 'सेवा मान्य झाली.'

बहरामंदखान चंदनवंदनकडे रवाना झाली. त्याला रवाना करवून मुनीमखान परत आला. तो म्हणाला, 'सैनिकांचा पगार बाकी आहे.' वीस हजार रुपये देण्यात यावेत अशी बादशहानी आज्ञा केली.

वर्धनगडच्या वाटा व परिसर नीट करण्यासाठी वीस बेलदार, पाच पाथरवट, व तीस कहार नेमण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

गंजदुय्यम (दुसऱ्या क्रमांकाचा धान्य बाजार) चा दारोगा सय्यद मुजफ्फर यांच्यापाशी दहा मनसबदार, दहा अहदी (शिलेदारासारखे) व पन्नास पायदळ शिपाई नेमण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

एकवीस जुलै– बादशहांनी आज्ञा की 'गाजिउद्दीन बहादुर (भावी निजामुल्मुल्काचा बाप) हा तळावर (ब्रह्मपुरी) आला की पंतप्रधान असदखान याने आपली पथके घेऊन हुजुरांत यावे. ब्रह्मपुरी येथे सरबराहखान कोतवाल याला राहू द्यावे.'

तरबियत खानाला आज्ञा झाली की 'गाजिउद्दीन खानाच्या सैन्यातून पांच हजार पायदळ सैनिक व पांचशे बंदूकची (बर्कंदाज) हुजुरात बोलावून घ्या.

बादशहांनी आज्ञा केली की 'बुधपांचे गांवचा ठाणेदार बदाजी (पदाजी) हा बहरामंदखानाच्या फौजेत तैनात आहे.

त्याने कोंडाण्याच्या ठाण्यापासून पांचेगांवच्या ठाण्याच्या हद्दीपर्यंत येणाऱ्या जाणाऱ्या काफल्यांच्या (रसद आदिंची) रक्षणाची व्यवस्था करावी.

बावीस जुलै– जुल्फिकारखान याने आपण धनाजी जाधवाचे पारिपत्य कसे केले ही हकीकत तांगणारे पत्र पाठविले होते. ते बादशहांना दाखविण्यात आले.

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याच्या फौजेच्या खर्चासाठी म्हणून दहा हजार रुपये अज्मतुल्लाकडे देण्यात आले. ही रक्कम बहरामंदखानाच्या फौजेत द्यावी अशी आज्ञा करण्यात आली.

करावल (आघाडीचे टेहेळणी पथक) च्या उजव्या फळीला कबचाकखान व डाव्या फळीला शमशेरबेग यांची नेमणूक करण्यात आली.

डफळापूरचा (जत तालुका, सांगली जिल्हा) ठाणेदार अमानुल्लाखान याने पुढील प्रमाणे लिहिले– 'शाहू (शहाजी असावा) निंबाळकर हा मोठे सैन्य घेऊन या भागात आला होता. आता छावणी करण्यासाठी म्हणून तो भूपाळगडकडे गेला आहे. हुजुरांकडून फौज तैनात झाली तर त्याचे पारिपत्य करता येईल. बादशहा म्हणाले मराठे सरदारांच्या पारिपत्याचे काम चीनकुलीज खानाकडे (भावी निजामुल्मुल्क) देण्यात आले आहे. अमानुल्लाखान याने पण चीनकुलीज खानाकडे जावे.

साताऱ्याचा फौजदार यासीनखान याजपाशी कादरदादखान हा तैनात होता. त्याने खालील प्रमाणे लिहून पाठविले–

'सोंधा नाईक वंजारा हा तीन हजार बैलावर रसदेच्या गोण्या लादून येत होता. देबार या गावाजवळ मराठ्यांनी त्याला कोंडले. हे कळल्यावर मी धावलो. गनिमांचे पारिपत्य केले. रसद सोडवून मी जबलुल इस्लाम (महादेवाचा डोंगर) च्या ठाण्यावर पोहोचती केली. मी आता रसद घेऊन मौजे फुलवाडी (?) ला

पोहोचलो आहे. भेटीची आज्ञा व्हावी. परवानगी देण्यात आली. त्याला सातशे जात व सहाशे स्वार अशी मन्सब आहे.

तेवीस जुलै– आज कादरदादखान हा येऊन बादशहांना भेटला. आणलेल्या रसदेपैकी रसद लादलेले एक हजार बैल बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याच्या छावणीत पोहोचवावे अशी त्याला आज्ञा करण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की गोलंदाजांचा प्रमुख महमूद याला व तोफांना नामगीर किल्ल्याहून रुहुल्लाखानाच्या पथकांचे सरंक्षण घेऊन बक्षीउल्मुल्क बहरामंदखान याच्या छावणीत पोहोचविण्यात याव्या.

कोयल (?) चा जमीनदार वेंकट याची मन्सब ही बहरामंदखानाच्या शिफारशीने वाढविण्यात आली.

खेळणा (विशाळगड) व पन्हाळगड यांच्या मध्ये शिराळ्याचा परगणा आहे. तेथील रयतेने पुढील तक्रार केली. 'गनीमांचे (मराठ्यांचे) सैनिक हे सोरा बंदुकीची दारु इत्यादीची ने आण करण्यासाठी आम्हाला वेठ बेगारीस धरतात. शंकराजीला या भागाची माहिती आहे. त्याला येथे ठाणेदार म्हणून नेमण्यात यावे.' विनंती मान्द करण्यात आली. शंकराजीला पांच हजार जात व तीन हजार स्वार अशी मन्सब आहे.

बादशहांना कळविण्यात आले की 'मरहूम अन्वरखान याचा मुलगा अजहरखान याच्या घरात चोरी झाली. चोरांनी सर्व मालमत्ता लुटून नेली.' बादशहांनी आज्ञा केली की नायब कोतवाल मुहंमद अमीन याने जाऊन चौकशी करावी.

चोवीस जुलै– आज़ कचेऱ्या बंद होत्या बादशहांनी आज्ञा केली की आज सफर महिन्याची अठ्ठावीस तारीख आहे. ती एकोणतीस समजावी.

सव्वीस जुलै– बादशहा म्हणाले 'विजापुरी कर्नाटकच्या फौजदारीवर मामूरखान आहे. त्याला बदलून त्याच्या ऐवजी तेथे चीन कुलीजखान याला नेमणार आहोत. त्याचा सध्याचा हुद्दा कळवा.'

बादशहांनी आज्ञा केली की, '(पंतप्रधान)असदखान यांच्या सैन्यापैकी तेराशे अडतीस स्वार व खिदमतगारखान (नाझर), सरबराहखान कोतवाल, हकीम मुहंमद शफी, मुहंमद हसन, मुरीदखान वगैरे अधिकारी यांनी ब्रह्मपुरीच्या तळावर बेगमजिऊ (जीनतुन्निसाबेगम) यांच्या तैनातीत असावे.'

दीना वंजारा याला खिलतीची वस्त्रे व एक घोडा या वस्तू देण्यात आल्या.

मरहूम मुखलिसखान यांच्या कुटुंबियांना औरंगाबादेस पाठविण्यात यावे अशी आज्ञा झाली.

मरहूम फतेहजंगखान याचा नातू कादरदादखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

सत्तावीस जुलै–बक्षी उलमुल्क लहुल्लाखान याने बादशहांना पुढील प्रमाणे कळविले–

'गाजिउद्दीनखान बहादूर फीरोज जंग याने कळविले, आहे की, सियादनखान याला रजा देण्यात यावी. तो माझ्याकडे येईल. त्याला काही गोष्टी सांगायच्या आहेत. तो मला भेटून परत जाईल.'

बादशहांनी विनंती मान्य केली नाही.

मीर आतिश (दारूगोळ्यांचा प्रमुख) तरबियतखान याने विनंती केली की, 'जुम्दतुल्मुल्क असदखान (पंतप्रधान) हे जवळ येऊन पोहोचले आहेत. आज्ञा होत असेल तर त्यांच्या स्वागतासाठी जाईन.' विनंती मान्य करण्यात आली.

दिवंगत राजा भीमसिंग याचा मुलगा अर्जुनसिंग याने आपली पथके हुजुरात आणली होती. रशीदखान याने त्यांची पहाणी करावी अशी आज्ञा झाली.

बादशहाजादा आज्जम याने लिहिले की, 'मरहूम हसनअलीखान याचा मुलगा हसनअली हा माझ्यापाशी तैनात आहे. त्याला जहागिरीतून उत्पन्न येईनासे झाले आहे. त्याची जहागीर हिंदुस्थानात (उत्तर भारतात) आहे. एक वर्षासाठी मला माझ्या जहागिरीवर जाऊ देण्यात यावे अशी त्याची विनंती आहे' त्याची रजा मान्य करण्यात आली.

बादशहांना कळविण्यात आले की 'मराठे हे भानोळी भागात पसरले आहेत.' त्यांच्या पारिपत्यासाठी बादशहांनी सियादतखान याची योजना केली. त्याच्या बरोबर दोन हजार चारशे पन्नास स्वार देण्यात आले. पुढील अधिकारी त्याच्या बरोबर तैनात करण्यात आले. तुर्कताजखान, मुहंमद लतीफ,मुहंमद अमीन. हतीसिंग, खटावचा ठाणेदार किशनराव, जोरावरसिंग, शमशेर बेग वगैरे, सियादतखानाबरोबर तोफखान्याचा पुढील सरंजाम देण्यात आला–

वहेलिये दोनशे माणसे, बर्कंदाज (बंदूकची) दोनशे, अहदी शिलेदारासारखे शंभर, बाण शंभर, बाणदार चार, शुतरनाळ पांच.

मुहंमद अमीनखान सदर (न्यायाधीश) याला छावणीपासून ब्रह्मपुरीच्या तळापर्यंतच्या मार्गाचे रक्षक (राहदार) म्हणून नेमण्यात आले. या जागेवर चीनकुलीजखान होता. बादशहांनी मुहंमद अमीन खानाला म्हसवडकडे जाण्यास निरोप देताना त्याला म्हटले 'चीन कुलीजखानाची फौज तुमच्यापाशी तैनात राहील. चीन कुलीज खानाला म्हणावे की 'हुजुरात या तुम्हाला विजापूर कर्नाटकच्या फौजदारीवर पाठवीत आहे. तेथे गनिमांचे पारिपत्य करणे आहे.'

यसीनखान (सातान्याचा फौजदार) याचा मुलगा अब्दुरऊफ याने खालील प्रमाणे लिहिले–

' आपल्या आज्ञे प्रमाणे मी रसदेचे आठ हजार बैल नीरा नदीच्या काठावरुन घेऊन हुजुरात येत होतो. बारामती ठाण्याच्या वाटेत मान या गावाजवळ मराठे चालून आले. बाण व बंदुकीची लढाई झाली. शत्रूंना ठार करण्यात आले. त्यांचा पराजय झाला.' बादशहा म्हणाले ' सेवा मान्य झाली. तुम्ही हुजुरात या.'

अठ्ठावीस जुलै– काल रात्री अहमदाबादेच्या बातम्यांवरुन कळले की ' अहमदाबादेचा सुभेदार व जोधपूरचा फौजदार शुजाअतखान हा मरण पावला. अहमदाबादेची सुभेदारी पण बादशहाजादा मुहंमद आज्जम याला देण्यात आली.' मरहूम रुहुल्लाखान (औरंगजेबाच्या मावस बहिणीचा मुलगा) याचा मुलगा बाकरखान याला सियादतखान (अर्जी पेश करणाऱ्यांचा प्रमुख) याचा नायब म्हणून नेमण्यात आले.

दीना नाईक बंजारा हा बादशहांना भेटला. बादशहानी त्यांनी त्याला खिलतीची वस्त्रे व घोडा व वीस मोहरा देऊन रसद आणण्यासाठी म्हणून निरोप दिला, एक गुर्जबर्दार त्याच्याबरोबर देण्यात आला. दीना नाईक याला कोणी उपसर्ग करू नये अशा अर्थाचा दिवाणाचा परवाना (हुकुम) त्याला देण्यात आला.

चीन कुलीजखान याची नेमणूक विजापूर कर्नाटकच्या फौजदारीवर झाली होती. त्याने खालील प्रमाणे विनंती केली– .

१) वीस शेरी गोळ्याच्या दोन तोफा, व दोन रेहकले (लहान तोफा) सोरा, व दारू बाण वगैरे ही अधोनीच्या किल्ल्यातून मला मिळावी. याबाबतीत मन्सूरखानाने वृत्त सादर करावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

२) मी गनिमांविरुद्ध मोहिमेवर जाईन तेव्हा माझे कबिले व बुणगे किल्ल्यात ठेवीन. किल्यात माझा एक नायब ठेवण्याची परवानगी असावी. विनंती मान्य करण्यात आली.

३) मन्सबीच्या अटीत सूट मिळावी. विनंती मान्य करण्यात आली.

४) मीर मुहमद फारूख व अब्दुल अजीम यांना माझ्यापाशी तैनात करण्यात यावे.

५) एक कोटीदाम (एक रुपया सुमारे चाळीस दाम) देण्यात यावेत. दिवाण यावेत. दिवाण हे सहामाही तनखा देत असतात. आज्ञा झाली मरहूम कासिमखान (माजी फौजदार) याच्या वेळची पद्धत चालू ठेवावी.

इस्माईलखान मका याला माझ्या पाशी तैनात करण्यास यावे. विनंती मान्य करण्यात आली.

एकोणतीस जुलै– बादशहांनी आज्ञा केली होती की बक्षी उत्मुल्क रुहल्लाखान व मरहूम अमीरखान (काबुलचा माजी सुभेदार) रुहुल्लाखान याचा काका) याची मुले यांनी पुढे जाऊन (पंतप्रधान) असदखान याचे स्वागत करावे. त्याप्रमाणे करण्यात आले. असदखान हा येऊन बादशहाना भेटला. त्याने एक हजार अश्रफ्या व चार हजार रुपये नजर व निसार (ओवाळून टाकणे) म्हणून दिले. बादशहांनी अश्रफ्या घेतल्या व रुपये परत केले. असदखानाला बादशहांनी आपल्या उजव्या बाजूला उभे केले. त्याला खास खिलतीची वस्त्रे व बालाबंदही देण्यात आली. थोडया वेळाने असदखान हा बादशाहाचा निरोप घेऊन आपल्या तंबूकडे गेला. त्याचे पुढील सहकारी हे येऊन बादशहांना भेटले–असदखानाचे नातू मुहंमद सालेह व मुहंमद काजम अबुल्फ तहखान, कामानचा जमीनदल जीतसिंग व त्याचा भाऊ हतीसिंग, बाकीबेग, निजामुद्दीन अहंमद, जियाउद्दीनखान, तानोसीचा बदललेला ठाणेदार जफरखान, अब्दुल्हादी, परवरिशखान.

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले, 'तुम्ही इटाव्याचा फौजदार खैर अंदेशखान याला लिहा. सुरुंग तयार करणारी दोनशे माणसे नोकरीवर घेऊन इकडे आणावी.

तीस जुलै–हमीदुद्दीनखान विजापुरी याने लिहून कळविले की, 'बदामी भागातील रोसनगड (?) किल्ला' मी तेथील बंडखोर देसायांकडून जिंकून घेतला आहे' बादशहा म्हणाले, 'मजुरा झाला. सेवा मान्य झाली.'

फजले अलीखान याने बादशहांना कळविले की, 'बाजारात सात शेरानेही धान्य विकले जात नाही व बंजारी तर पुष्कळ धान्य आणतात. पण गंजचा व्यवस्थापक सय्यद इमामुद्दीनखान हा पाच शेरांच्या हिशेबाने धान्याची विक्री करवतो. बाजारही तो एक घटिकाच उघडा ठेवतो.' त्याला पाचशे जात व शंभर स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी शंभर स्वारांनी त्याची मन्सब कमी केली.

एकतीस जुलै– बादशहाजादा मुहंमद कामबक्ष हा हैद्राबादचा सुभेदार होता. पण तो छावणीत बादशाहापाशी राही. हैद्राबादेत त्याचा नायब म्हणून रुस्तमदिलखान (माजी सुभेदाराचा मुलगा) काम करी. त्याने कामबक्षाकडे एक हत्ती, दोन घोडे, एक ढाल, एक तलवार इत्यादी वस्तू पेशकश (खंडणी दाखल भेट) म्हणून पाठविल्या. कामबक्षाने बादशहांना म्हटले 'आज्ञा असेल तर घेतो' परवानगी देण्यात आली कामबक्षाने तसलीमात (कुर्निसात) केली.

बहरामंदखानाने पुढील प्रमाणे लिहून पाठविले– 'चंदन वंदन किल्लयाचा वेढा चालू आहे. किल्लया भोवती वीस कोसाच्या टापूत धनाजी जाधव हणमंत-

राव (निंबाळकर) वगैरे मराठे सरदार मोठी सैन्ये घेऊन हालचाली करीत आहेत. चंदन वंदन किल्लयांना मदत (उपराळा) करावी असा त्यांचा बेत आहे. दोनशे धनुष्ये व बाणांचे दोनशे भाते पाठवावे.'

तहव्वुरखाने वरील वस्तू पाठवाव्या अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की, 'बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याला मदत पोहचविण्यासाठी पुढीलप्रमाणे व्यवस्था करा– मतलबखानाबरोबर सैन्य देण्यात यावे. दोन हजार दोनशे स्वारांची यादी (तूमार) तयार करण्यात यावी. मतलबखानाबरोबर ख्वाजाखान, मुहंमद कामयाबखान, ख्वाजा मुहंमद वगैरे अधिकारी राहतील. पांचशे पायदळ सैनिक, दोनशे बाण (रॉकेट), पांच शुतरनाळ (उंटावरील हलक्या तोफा), चार बाण फेकणारे, सोरा, व बंदुकीची दारु इत्यादि सामग्र मतलबखानाबरोबर पाठविण्यात यावी.'

असदखानाच्या बरोबर असलेले अजीजुल्लाखान, अबुल्फतहखान, नुस्रतखान यक्कातानखान, जगतसिंग वगैरेनी हुजुरात येत जावे अशी आज्ञा देण्यात आली.

हैद्राबाद कर्नाटकचा दिवाण मुहंमद सईद याने त्रिचनापल्लीच्या जमीनदाराकडून (राजाकडून) तीन लाख रुपये खंडणीचे घेऊन सरकारात भरले. तिकडील कामे त्यांच्याचकडे सोपविण्यात यावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'अकबरपूरच्या उताऱ्याच्या (नर्मदेवरील) दारोग्याला लिहा 'सौदागरांचे घोडे हुजुरांत येत आहेत ते सगळेच्या सगळे हुजुरांत आले पाहिजेत. पांगळा किंवा गहाळ होता कामा नये.'

ऑगष्ट १७०१

एक ऑगस्ट–आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

दोन ऑगस्ट – सियादतखान हा गनिमांचे (मराठ्यांचे) पारिपत्य करण्यासाठी गेला होता. तो परत येऊन बादशहाना भेटला.

वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याने लिहून पाठविले की 'चांद्याच्या राजाकडून आलेले एक लाख रुपये माझ्यापाशी आहेत.' आज्ञा झाली की 'रक्कम हुजुरांत पाठविण्यात यावी.

अलीमर्दानखानाने गोंडांचा प्रमुख बख्तबुलंद याचा काका नवल शहा याचे डोके कापून पाठविले होते. ते बादशहांना दाखविण्यात आले.

तीन ऑगष्ट – दिवंगत राजा भीम याचा मुलगा अर्जुनसिंग याच्या बरोबर अजमीरचा सुभेदार सय्यद अब्दुल्लाखान याने दोनशे स्वार हुजुरात पाठविले होते अर्जुनसिंगाने मतलबखानाला जाऊन मिळावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की, धनाजी जाधवला कळले की नुसरत-जंग (जुल्फिकारखान) हा येऊन पोहोचला आहे. हे ऐकून तो पळून कोंडण्याकडे (सिंहगड) निघून गेला आहे.'

बादशहांनी मतलबखान (मीर तुजुक शिष्टाचाराचा अधिकारी) याला बहराम दखानाच्या कुमकेस चंदन बंदनकडे जाण्यासाठी निरोप दिला. यावेळी मतलब-खाच्या सहकाऱ्यांना पुढीलप्रमाणे बक्षिसे देण्यात आली. मतलब खानाचा मुलगा असदुल्ला यास शंभर मोहराच्या किमतीचा घोडा, कामयाबखान (तरबियतखानाचा सख्खा भाऊ व मतलबखानाचा मामेभाऊ) याला एक खंजीर कामबक्षाचा बक्षी ख्वाजा मुहंमद यास खिलतीची वस्त्रे.

मतलबखान हा छावणीत बहरामंदखानाच्या गैर हजेरीत त्याचा नायब म्हणून काम पाहात होता. आता तो चंदनवंदनकडे जाऊ लागला. त्याने बादशहांना विचारले, 'बहरामंदखानाची मोहर (शिक्का) कुणापाशी देऊ ?' बहरामंदखानाच्या बायकोकडे द्या अशी बादशहानी आज्ञा केली.

बादशहांनी कहारांचा दारोगा गुलालखान याला बोलावू पाठविले. तो आल्यावर बादशहा त्याला म्हणाले, 'तुमचे शंभर कहार मतलबखानाबरोबर पाठवा. ते हजर नसतील तर इतर कारखान्यांतून (खात्यातून) गोळा करून पाठवा.'

काबुलहून पांचशे घोडे पाठविण्यात आले असून ते औरंगाबादेपर्यंत आले आहेत असे बादशहाना कळविण्यात आले. एका गुर्जबर्दाराने जाऊन घोडे हुजुरात आणावे अशी आज्ञा झाली.

मतलबखान (चंदनवंदनच्या) मोहिमेवरून परत येईपर्यंत त्याचे मीर तुजुकीचे काम मुनीमखानाने करावे अशी आज्ञा झाली.

चार ऑगस्ट– चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) याची नेमणूक विजापूर कर्नाटकचा फौजदार म्हणून झाली होती. तो येऊन बादशहांना भेटला.

काल बादशहांना कळविण्यात आले की खालसा शरीफा (क्राउनलँड्स) चा दिवाण अर्शदखान हा मरण पावला. त्याचे काम तनख्याचा दिवाण इनायतुल्ला खान याच्याकडे सोपविण्यात आले.

परळीचा किल्लेदार रामचंद (राव दलपत बुंदेला याचा मुलगा) याने आपल्या पुढील मागण्या लिहून कळविल्या–

१) किल्ल्यात सामग्री नाही. बयूतात खात्याने व्यवस्था करून द्यावी' अशी आज्ञा झाली.

२) किल्ल्याच्या भोवती दोन कोसपर्यंत माझी फौजदारी नियमाप्रमाणे असायला पाहिजे, पण यासीनखान (साताऱ्याचा फौजदार) ताबा देत नाही. आज्ञा झाली की ताबा देण्याविषयी यासीनखानाला लिहिण्यात यावे.

३) फतेउल्लाखानाचा मोर्चा होता तिकडील बाजूची किल्ल्याची भित मोडकळीस आली आहे. तिच्या दुरुस्तीसाठी तीन हजार रुपये यासीनखानापाशी देण्यात आले होते. ते त्याच्यापाशीच आहेत. आज्ञा झाली की, यासीनखानाला लिहून रामचंदाकडे रक्कम द्यायला लावावी.

४) शिबंदीची पगारबाकी फार वाढली आहे. आज्ञा झाली की, तपशीलवार वृत्तांत पाठवावा.

पाच ऑगस्ट– वजीहुद्दीनखान याला एक हजार जात व सातशे स्वार अशी मन्सब होती. शिबंदीसाठी म्हणून त्याला एक लाख रुपये मिळत. त्याच्याकडे बीड (मराठवाडा) व शेवगांव येथील फौजदारी आणि भूम (उस्मानाबाद जिल्हा) पासून शहागड (औरंगाबाद जिल्हा) या मार्गाचे रक्षण ही कामे होती. (राहदारी म्हणजे मार्गाचे रक्षण)

वजीहुद्दीनच्या जागेवर मुहंमद मुरादखान (सुप्रसिद्ध इतिहासकार खाफीखान हा मुरादखानाच्या पदरीं होता) याची नेमणूक करण्यात आली. मुरादखानाला नऊशे जात व तीनशे स्वार अशी मन्सब होती. तीत सातशे स्वार व शिबंदीसाठी एक लाख रुपये अशी भर घालण्यात आली.

वजीहुद्दीन याने अहमदनगरच्या संरक्षणासाठी जावे अशी आज्ञा देण्यात आली.

मरहूम अर्शदखान याची खाजगी मालमत्ता त्याचा मुलगा मुहंमद हुसेन व इतर कुटुंबीय यांना देऊन टाकण्यात यावी अशी आज्ञा झाली.

इंद्रसिंग दोन हजार जात व एक हजार स्वार व बहादुरसिंग, एक हजार जात व पाचशे स्वार व दलसिंग, एक हजार जात व चारशे स्वार असे मन्सबदार यांनी बादशहाजादा आज्जम याजपाशी तैनात राहावे अशी आज्ञा झाली.

बीदर सुभ्याचा सुभेदार खुदाबंदाखान (शाहिस्ताखानाचा मुलगा व औरंगजेबाचा मामेभाऊ) याला आज्ञापत्र पाठविण्यात आले. (फर्मान)

सहा ऑगस्ट– आज बादशहांनी पैगंबराचे अवशेष (वापरायच्या वस्तू,) इत्यादी आसारशरीफ) छावणीत जेथे ठेवले होते त्या स्थळाला भेट दिली. प्रदक्षिणा, प्रार्थना व कुराण पठण इत्यादी कार्यक्रमानंतर बादशहा परत आपल्या निवासस्थानी आले. अवशेष स्थळाकडे जाताना दोन्ही बाजूने कनाती उभारल्या होत्या. बादशहा मेण्यातून गेले.

खान फीरोजजंग (भावी निजामुलमुल्काचा बाप) याच्या फौजेतून पुढील वृत्त कळते.

'आज्ञेप्रमाणे खान फीरोजजंग याने आपले बुणगे सोलापुरात ठेवले व तो चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी त्वरेने रवाना झाला. परंड्याच्या पलीकडे त्याचे चोरांशी (मराठ्यांशी) युद्ध झाले. शत्रूपैकी अनेक जण ठार अगर जखमी झाले. शत्रू पराजय पाऊन पळाले. त्यांचे पारिपत्य करून खान फीरोजजंग हा तळाकडे (ब्रह्मपुरी) रवाना झाला.'

बादशहा म्हणाले ' मुजरा झाला. सेवा मान्य झाली.'

सात ऑगस्ट– हरकाऱ्यांच्या तोंडून खालीलप्रमाणे कळले–

'धनाजी जाधव आदी सरदारांच्या पारिपत्यासाठी जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग हा आज्जमगड (पुरंदर) हून रवाना झाला. तो बक्षी उलमुल्क बहरामंदखानाजवळ आला. त्याने बहरामंदखानाची भेट घेतली. ते दोघे एक रात्र बहरामंदखानाच्या छावणीत होते. त्यानंतर जुल्फिकारखान हा मराठ्यांच्या पाठलागावर रवाना झाला.

आठ ऑगस्ट– काल ख्वाजा मसूद याने खालील हकीकत बादशहांना सांगितली–

'बुधपांचेगाव येथील बागांची देखरेख करण्यासाठी मी गेलो होतो. मरहूम अमीरखान याचा मुलगा अबुल्हसन हा पन्नास माणसे बरोबर घेऊन बागा पाहण्यासाठी आला. तेथे त्याने मदिरापान केले. त्याच्या हत्तीने बागांतील झाडांची नासधूस केली. माझ्या नोकरांनी त्यांना मना केले. पण ते न ऐकता त्यांनी मारामारी केली. त्यात चार पाच माणसे जखमी झाली. आमच्याकडचा एक मनुष्य मरण पावला. तो (अबुल्हसन) मलाही मारणार होता. पण परमेश्वराच्या कृपेने मी वाचलो.'

अबुल्हसनला सातशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी ती दोनशे जात व शंभर स्वार अशी कमी केली. अमीरखानाच्या मुलांनी दिवाणे खास मध्ये मुजऱ्यासाठी येता कामा नये अशी आज्ञा झाली. अबुल्हसनचा हत्ती व दोन घोडे हे सरकारात जप्त करण्यात आले.

नऊ ऑगस्ट– मरहूम अर्शदखान याचा मुलगा मुहंमद हुसेन याला बीदर सुभ्याचा दिवाण म्हणून नेमण्यात आले. त्याला किफायतखान ही पदवी देण्यात आली.

अर्शदखानाच्या मालमत्तेने भरलेले साठ उंट तळावर (ब्रह्मपुरी) पोहोचले आहेत असे बादशहाला कळविण्यात आले, ते सर्व सरकारात जप्त करण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

मतलबखान हा बक्षी उलमुल्क बहरामंदखानाकडे गेला होता. त्याला हुजुरात बोलावून घ्यावे अशी आज्ञा झाली.

सटवाजी डफळे (जत, सांगली जिल्हा) याने न्याय कचेरीचा दारोगा मुनीमखान याच्याद्वारे पुढीलप्रमाणे अर्ज पाठविला–

'स्वार्थी लोकांच्या सांगण्यावरुन मी आपली सेवा सोडून दिली होती. आता त्याची शिक्षा मला मिळाली. माझे अपराध माफ करावे. मला अभयपत्र व पंजा (हाताचा ठसा उमटविलेले अभयपत्र) पाठवावे म्हणजे मी निःशंकपणे येऊन बादशाही कामासाठी मनःपूर्वक झटेन.

बादशहांनी त्याची विनंती मान्य केली व आज्ञा केली की रामजी व गोविंद राव हरकारे यांनी सटवाजीला आणण्यासाठी इंडीकडे जावे.

दहा ऑगस्ट– गजिउद्दीनखान बहादुर याने मराठ्यांशी झालेल्या लढाईची तपशीलवार हकीकत लिहून पाठविली. ती त्याने मरहूम मुजाहिदखान याचा मुलगा अब्दुल्लाबेग कोका व इतर मन्सबदार (अधिकारी) यांच्याबरोबर पाठविली. पत्रातील मजकूर खालील प्रमाणे होता–

'दादजी वगैरे मराठे सरदार काटीव बार्शीच्या परिसरात छावणी घालून होते. मी त्यांच्या पारिपत्यासाठी चालून गेलो. युध्द झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रू सरदार (दादजी व तीन इतर सरदार व अनेक शत्रू) यांना ठार मारण्यात आले. शत्रू सैन्यातील अनेक माणसे जखमी झाली. झेंडे, तीन अब्दागिऱ्या, नगारे इत्यादी लूट आमच्या हाती पडली. तीन सरदारांची डोकी कापण्यात आली. ती व इतर लुटलेले सामान हुजुरात पाठवित आहे.'

बादशहांनी सामान नजरे खालून घातले. ते म्हणाले 'सेवा मान्य झाली.'

राव दलपत बुंदेला, नुस्रतगड उर्फ जिंजी येथील किल्लेदार सरुपसिंग खानदेश सुभ्यातील रावेरचा फौजदार सय्यद इस्माईल व शिवणपेठ (?) चा ठाणेदार सिकंदरचा मुलगा अमानुल्ला यांची विनंतीपत्रे बादशहाकडे आली.

अकरा ऑगस्ट– शहाजादा बेदारबख्त याने पत्र पाठविले होते ते त्याचा वकील सुलतान नजर याने बादशहासमोर ठेवले.

बादशहांना कळविण्यात आले की बक्षी उल्मुल्क बहरामंद खान हा आजारी आहे. मतलबखान हा आज्ञेप्रमाणे हुजुरात येण्यास निघाला होता. त्याला हे कळताच तो तीन कोसावरुन माघारी वळून बहरामंद खानाकडे गेला. हकीम (वैद्य) हाजखान याने जाऊन बहरामंदखानावर औषधोपचार करावा अशी आज्ञा झाली. तीन घोडे त्याला देण्यात यावेत अशीही आज्ञा झाली.

बादशहा इनायतुल्लाखानाला म्हणाले 'आता जुम्लतुल्मुल्क मदारुलमहाम (असदखान) हे येथे छावणीत आले आहेत. ब्रम्हपुरीच्या छावणीतील कारखाने (खाती) सांभाळण्यासाठी नाव सुचवा.'

खान फीरोजजंग याने पुढील प्रमाणे लिहून पाठविले – ' मी (ब्रह्मपुरीच्या तळाकडे येताना) खुदाबंदाखानाच्या बीदर सुभ्यातून आलो. खुदाबंदाखान याने आपल्या सुभ्याची व्यवस्था उत्तम राखली आहे. त्याची विनंती अशी आहे की– ' माझा मुलगा मुहंमद याला मन्सब मिळावी व माझ्यावरही काही कृपा व्हावी. ' बादशहा म्हणाले ' इन्शाल्लाहो ताला, परमेश्वर इच्छील तर....'

बारा ऑगस्ट– बादशहांना कळविण्यात आले की जुल्फिकारखान बहादुर नुस्रत-जंग हा बहरामंदखानाला भेटून मराठ्यांच्या पाठलागावर गेला. बहरामंदखान आजारातून बरा झाला असेही बादशहांना कळविण्यात आले.

तेरा ऑगस्ट– खान फीरोजजंग याने लिहून पाठविले की ' मराठ्यांशी झालेल्या युद्धात हामिदखान (फीरोजजंगाचा सावत्र भाऊ) वगैरेंनी उत्कृष्ट कामगिरी बजाविली. कृपा होईल अशी आशा बाळगून आहेत.' त्यांचे हुद्दे काय आहेत ते कळवावेत अशी बादशहांनी आज्ञा केली.

चौदा ऑगस्ट– विजापूरच्या बातम्यांवरून कळले की ' चोरांची (मराठ्यांची) पथके विजापूरच्या आलापूर वेशीवर चालून आली. त्यांनी कापडाचे व्यापारी यांना लुटले. लुटीचा माल व गुरे ढोरे घेऊन ते निघून गेले.' विजापूरच्या सुभेदाराला या बाबतीत लिहावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

इस्लामाबाद उर्फ मथुरा येथून पुढीलप्रमाणे बातमी आली –' मरहूम खानजहान बहादुर याचा मुलगा मुहंमद शफी हा दिल्ली शहाजहानाबादचा सुभेदार मुहंमद यारखान याजपाशी तैनात आहे. तो मथुरेला आला. तो येथील कठडा जुम्मामशीद येथील व इतर ठिकाणची माणसे यांच्यावर जुलूम जबरदस्ती करीत आहे.'

आज्ञा झाली की शहाजहानाबाद दिल्लीच्या सुभेदाराला लिहावे की मुहंमदशफी यास जुलूम करु देऊ नये. त्याला आपल्याकडे (दिल्लीला) बोलावून घ्यावे. तुर्कताजखान याने मुर्तजाबाद मिरज येथून तोफा आणाव्या अशी आज्ञा झाली होती. त्याने पुढीलप्रमाणे विनंती केली– १) तोफ ओढण्यासाठी हत्ती देण्यात यावा. विनंती मान्य करण्यात आली. २) सियादतखानाच्या पथकाची माणसे माझ्यापाशी तैनात आहेत. त्यांची पगार बाकी देण्यात यावी. एक महिन्याचा पगार देण्यात यावा अशी आज्ञा करण्यात आली.

पंधरा ऑगस्ट– बादशहा तरबियतखान याला म्हणाले 'बहरामंदखान बरा झाला आहे. हकीम हाजिकखान याला आता हुजुरात येण्यासाठी लिहा.'

सोळा ऑगस्ट– तुर्कताजखानाने विनंती केली की 'खटावचा ठाणेदार किशनराव यास माझ्यापाशी तैनात करण्यात यावे.' विनंती मान्य करण्यात आली.

मुहतशमखानाचा मुलगा मुहंमदजान व इनायतुल्लाखानाचा जावई मुहंमद नईम यांनी तळावर (ब्रम्हपुरी) रहावे अशी आज्ञा झाली.

तळावर (ब्रम्हपुरी) जाऊन हत्ती व खजिना हुजुरात घेऊन यावे अशी मुहंमद अमीनखान यास आज्ञा करण्यात आली.

सतरा ऑगस्ट – मतलबखान, कामयाबखान, हकीम हाजिकखान, बिंद्राबन (मतलबखानाच्या बरोबर होता) हे बहरामंदखानाकडून येऊन बादशहांना भेटले. बादशहांनी हकीम हाजिकखानाला एक हत्ती बक्षीस दिला. त्याची किंमत पाच हजार रुपये होती.)

यार अलीबेग याने खालील प्रमाणे कळविले–

मरहुम अमीरखान याची मुले मुहंमद इसहाक व मुहंमद अली हे बादशहाचा निरोप घेऊन दिल्लीकडे रवाना झाले. वाटेत त्यांनी मदिरापान करुन लोकांवर जुलुम केला.'

बादशहांनी आज्ञा केली की त्यांच्या मन्सबी काढून घेण्यात याव्या. मुहंमद इसहाकला तीन हजार व मुहंमद अली यास दोन हजार असे वर्षासन देण्यात यावे

असदखान जुम्लतुल्मुल्क (मुख्यप्रधान) याने खालीलप्रमाणे लिहून पाठविले.

मरहुम खानजहान याचा मुलगा नुस्रतखान हा तळावर (ब्रह्मपुरी) तैनात आहे. त्याने एका जवाहिऱ्याला मारहाण करुन आपल्या वाड्यात कैद करुन ठेवले आहे. त्या जवाहिऱ्याला माझ्याकडे पाठविण्याविषयी मी त्याला सांगून पाठविले. तो ऐकत नाही.'

बादशहांनी आज्ञा केली की नुस्रतखान व जवाहिऱ्या यांना हुजुरात हजर करण्यात यावे.

अठरा ऑगस्ट– मुहतशमखानाच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. इस्लामखान मरहूम (औरंगाबादचा माजी सुभेदार) याचा मुलगा अब्दुर्रहमानखान याला बक्षी क्रमांक तीन म्हणून नेमण्यात आले.

बहरामंदखानाकडे सोरा व बारुत (बंदुकीची दारु) पोहोचविण्यासाठी जाण्यास मुनीमखान यास निरोप देण्यात आला.

खान फीरोजजंग याला फर्मान, खिलतीची वस्त्रे व नीमास्तीन (बादशहाच्या अंगावरचे वस्त्र) हे जिन्नस देण्यासाठी म्हणून फीरोजजंगाच्या पथकातील अब्दूल्ला बेग मन्सबदार याच्या हवाली करण्यात आले.

अंबरचा राजा जयसिंग हा या महिन्याच्या (रबिलावल) नऊ तारखेस (तीन ऑगस्ट १७०१) बुऱ्हाणपुरास येऊन दाखल झाला असे तेथील बातम्यांवरुन कळले.

एकोणीस ऑगस्ट– दियानतरामचा मुलगा अनूपराम याला तिसरा बक्षी अब्दुर्रहमान याचा कारकून म्हणून नेमण्यात आले.

बुधपाचेगांवच ठाणेदार पदाजी (बुधाजी ?) हा कण्हेरच्या (?) ठाण्यात बसून आहे. त्याने मुनीम खानाच्याबरोबर (बहरामंदखानाकडे) जावे अशी आज्ञा झाली. बादशहा यार अलीबेग यास म्हणाले ' सातान्याचा फौजदार यासीनखान वगैरेना लिहा. त्यानी बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याजपाशी (चंदनवंदनच्या मोहिमेवर) राहिले पाहिजे.'

बादशहा फजाईलखान यास म्हणाले ' तुम्ही शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादुर यास पुढीलप्रमाणे लिहा– ' तुम्ही सैन्यासहीत जाऊन समानगड (कोल्हापूर जिल्हा) ला वेढा घालावा आणि किल्ला ताब्यात आणावा.'

चीन कुलीजखान याजकडे कौरबेगीचा हुद्दा होता, त्या जागेवर अजीजुल्ला खान याची नेमणूक करण्यात आली. हरकाऱ्यांच्या तोंडून खालीलप्रमाणे कळले–

' नरकवासी रामा (राजाराम) याची बायको (ताराबाई) हिने धनाजी जाधव, दादो मल्हार, हणमंतराव वगैरे सरदारांना पत्रे पाठविली, तिने दीड हजार पायदळ वरील सरदारांकडे पाठवून लिहिले की, या पायदळ सैन्यापैकी पाचशे माणसे तुम्ही आपल्याकडे ठेवा व बाकीची माणसे कोंडाणा, राजगड वगैरे चार किल्ल्यांवर पाठवावी.'

ताराबाईने सरदारांना लिहिले की ' हजरत (औरंगजेब) हे आमच्या देशावर सर्वत्र तावा मिळवून आहेत व मिळवीत आहेत. तुम्ही सर्वांनी एकदा खेळणा (विशाळगड) किल्ल्यावर यावे म्हणजे काही मसलत ठरविता येईल. काही मराठे सरदार या गोष्टीस अनुकूल तर काही प्रतिकूल आहेत. त्यांचे आपसात मतभेद आहेत.'

वीस ऑगस्ट– मरहूम रुहुल्लाखान (मृत्यू १६९१–९२) याचा मुलगा बाकरखान याला रोजीनदारांचा (रोजच्यांना पगार अगर वेतन देण्यात येईल) दारोगा म्हणून नेमण्यात आले.

चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) याला विजापूर कर्नाटकच्या फौजदारीवर जाण्यासाठी उद्या निरोप द्यावयाचा होता. त्याला देण्यासाठी खिलतीची वस्त्रे व एक खंजीर या वस्तू वेगळ्या काढून ठेवण्यात याव्या अशी आज्ञा झाली.

एकवीस ऑगस्ट–चीन कुलीजखान बहादूर याला विजापूर कर्नाटकच्या फौजदारीवर जाण्यासाठी आज निरोप देण्यात आला. त्याला चार हजार जात आणि तीन हजार दोनशे स्वार अशी मन्सब होती. तीत आठशे स्वारांची वाढ करण्यात आली. बादशहांनी त्याला फातेहा खैर (कुशल रहावे म्हणून करण्याची प्रार्थना) पढून जाण्यासाठी निरोप दिला.

बांधोचा राजा नरसिंग (वीरसिंग) याचा भाऊ राजा नेकनाम (हा मुसलमान झाला होता) त्याला बादशहांनी कुराणाची एक प्रत बक्षीस म्हणून दिली.

यार अलीबेग याचे खालीलप्रमाणे कळविले–

राजा जयसिंग (अंबरचा राजा) याने पुढीलप्रमाणे लिहिले आहे– 'मी नियमापेक्षाही अधिक सैन्य बरोबर आणीत आहे. महागाईमुळे सैनिक परागंदा होतात. काही (रकमेची) कृपा व्हावी.'

बादशहांनी आज्ञा केली की 'जयसिंगाने हुजुरात यावे.'

बावीस ऑगस्ट–आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

तेवीस ऑगस्ट–सत्रसाल राठोड (छत्रसाल बुंदेला नव्हे) याला दीड हजार जात व आठशे स्वार अशी मन्सब होती. वैरीसाल यास तीनशे जात व शंभर स्वार अशी मन्सब असून तो विजापूर कर्नाटकचा माजी फौजदार मामूरखान याजपाशी तैनात होता. वरील दोघांना चीनकुलीज खानापाशी तैनात करण्यात आले.

हरकाऱ्यांच्या तोंडून खालीलप्रमाणे कळले–

'चंदन वंदन किल्ल्यातील मराठे हे तहाची बोलणी करण्यासाठी बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याजपाशी रुजू झाले आहेत. मोगल अधिकाऱ्यांचीही त्यांच्यापाशी ये जा आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की हिंदुस्थानातून (उत्तर भारतातून) खजिना येत आहे. त्यापैकी दोन लाख रुपये खान फीरोजजंग यास व दोन लाख रुपये नुसरत जंग (जुल्फिकारखान) यास देण्यात यावेत.

चोवीस ऑगस्ट– बादशहांना कळविण्यात आले ते असे– ' चंदनवंदन किल्ल्यातील, एक मातबर माणूस नाहरखान ऱ्या मध्यस्थीने बक्षी उलमल्क बहरामंद खानाला भेटला. उद्या किल्ला ताब्यात येईल.'

बादशहांना खालीलप्रमाणे कळविण्यात आले–

' मुनीमखानाचा कारभारी रामजी हा डफळापूर येथे सटवाजी डफळे याला भेटला. सटवाजी डफळे याची इच्छा हुजुरात येण्याची आहे. पण गनीम (मराठ) हे चहुबाजूनी त्याच्या भोवती गर्दी करीत आहेत. त्याला ते वाटेतून घऊन जाण्याचा विचार करीत आहेत.'

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले, 'तुम्ही मुहंमद अमीनखानाला लिहा त्याला म्हणावे तुम्ही स्वत: जाऊन सटवाजी डफळे यास घेऊन या.'

खानाजादखान उर्फ मुल्तफतखान याचा मुलगा अबुल्खैर यास बादशहानी , गुलिस्तान ' पुस्तक बक्षीस दिले.

ताथवड किल्ल्यानजीक सरकारी उंट चोरीस गेले होते त्याबद्दल चौकशी करण्यासाठी मरहूम ख्वाजा अब्दुर्रहीमखान याचा मुलगा मुहंमद अमीन यास आज्ञा करण्यात आली.

नुस्रतजंग जुल्फिकारखान याच्या सैन्यात श्रीपत हा सरदार तैनात होता. त्याने खालील प्रमाणे विनंती केली–

१) मला पूर्वीपासून तीनशे स्वारांची मन्सब आहे, तीत वाढ झाली नाही त्याच्या मन्सबीत पाचशे जात अशी वाढ करण्यात यावी अशी आज्ञा झाली–

२) नुस्रतजंग (जुल्फिकारखान) यांनी माझा भाऊ श्रीनिवास यास सातशे जात व चारशे स्वार अशी मन्सब द्यावी अशी शिफारस केली आहे, ती मान्य व्हावी. अशी आज्ञा झाली की त्याने (श्रीनिवास) हुजुरात यावे.

३) मला मन्सब देण्याच्या वेळी मौजे बिळगाव (वसूल पाच लाख दाम सुमारे सात हजार रुपये) मला इनाम म्हणून देण्यात आले होते. आता ते माझ्या वरील बाकीत वळते करून घेत आहेत. तसे न करता बिळगावचा वसूल इनाम म्हणून समजण्यात यावा. बादशहांनी विनंती मान्य केली नाही.

४) कर्नाटकातील जहागिरीतून मला काहीच उत्पन्न येत नाही. जुन्या बादशाही मुलुखात जहागीर मिळावी.

मोतिमदखान याने याबद्दल चौकशी करून वृत्तांत सादर करावा अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की दौलतखान्या (बादशहाचे निवासस्थान) च्या डाव्या अंगाला ज्या जागी चीन कुलीजखान येऊन उतरत असे ती जागा जुम्लतुल्मुल्क असदखान (मुख्य प्रधान) याच्या राहाण्यासाठी म्हणून ठरविण्यात यावी.

पंचवीस ऑगस्ट - दिवंगत राजा भीम याचा मुलगा अर्जुनसिंग हा हुजुरात येऊन भेटला. अजमीरचा सुभेदार अब्दुलाखान याने दोनशे सैनिकांचे पथक त्याच्याबरोबर पाठविले होते. बादशहांनी अर्जुनसिंगाचा मन्सब वाढविली.

संगमनेरच्या फौजदाराच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी शेख सादुल्ला गेला होता. त्याने हुजुरात परत यावे अशी आज्ञा झाली.

बादशहा तरबियतखान याला म्हणाले ' तयार व्हा. मी तुम्हाला कोंडाण्याचा किल्ला घेण्यासाठी पाठविणार आहे.'

एकोणतीस ऑगस्ट– रात्री दोन घटका झाल्यानंतर मुनीमखान हा बादशहांना भेटला. तो बहरामंदखानाकडून आला होता. बहरामंदखानाने बादशहांना एक पत्र व चंदनगड किल्ल्याच्या सोन्याच्या किल्ल्या पाठविल्या होत्या, त्या मुनीमखानाने बादशहापुढे ठेवल्या. मुनीम खानाने बादशहाला सांगितले की 'आपले लोक किल्ल्यावर गेले आहेत. बहरामंदखानाचा झेंडाही किल्ल्यावर लागला आहे. किल्ल्याच्या बंदोबस्ताबद्दल खबरदारी बाळगण्यात येत आहे.'

बादशहा मुनीमखानाला म्हणाले ' मुहंमद अमीनखान याने सटवाजी डफळे याला छावणीच्याजवळ आणले आहे. तुम्ही रातोरात जाऊन सटवाजीचे समाधान करून त्याला हुजुरात आणावे ' त्याप्रमाणे करण्यात आले.

तीस ऑगस्ट- सटवाजी डफळे याला बादशहासमोर आणण्यात आले त्याचे हात बांधलेले होते. बादशहा म्हणाले–'त्याचे हात मोकळे करा. मी त्याचे अपराध माफ केले आहेत.'

सटवाजीला खिलतीची वस्त्रे व एक खंजीर या वस्तू बक्षीस म्हणून देण्यात आल्या. सटवाजीला सहा हजार जात व सहा हजार स्वार अशी मन्सब होती, ती पुन्हा बहाल करण्यात आली. बादशहांनी दरबारात (अदालत–दिवाणे आम असावे) त्याला डाव्या बाजूस असलेल्या मन्सबदारात उभे केले. यानंतर सट-वाजीचे नातू तानाजी (तानोजी) हसन व शेख बदी यांना खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

सय्यद इमामुद्दीन हा गंज (बाजार) चा दारोगा होता. त्याला सय्यद गजनफरच्या जागी दुय्यम गंजाची दारोगागिरीपण देण्यात आली.

किल्ले चंदनगडचे नाव मिफताहगड असे ठेवावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

एकतीस ऑगस्ट– मरहूम रुहुल्लाखान याचा भाऊ अजीजुल्लाखान हा तळावरुन (ब्रह्मपुरी) येऊन बादशहांना भेटला.

जळगांव (खानदेश) चा ठाणेदार नजीबखान हा खजिन्याबरोबर आला होता, तो बादशहांना भेटला.

सटवाजी डफळे याला बादशहांनी पाच हजार रुपये बक्षीस (इनाम) म्हणून दिले. त्याने मुजऱ्यासाठी दिवाणे खासमध्ये येत जावे अशी त्याला आज्ञा करण्यात आली.

सय्यद लष्करखान याचा मुलगा सय्यद वजीहुद्दीन याला पवनार (वर्धा जिल्हा)ची फौजदारी व चांदा वगैरे स्थळांकडून येणाऱ्या खंडणीची वसूली ही कामे देण्यात आली. ती कामे यापूर्वी वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याजकडे देण्यात आली होती.

सप्टेंबर १९०१

एक सप्टेंबर– बंगालच्या जमीनदारांकडून खंडणीदाखल चौऱ्याऐंशी हत्ती पाठविण्यात आले होते. त्यापैकी तीस हत्ती वाटेत मेले. सत्तावन्न हत्ती हुजुरात पोहोचले. हत्तीखान्याचा दारोगा हमीदुद्दीन खान बहादुर याच्या विनंतीवरुन बादशहांनी सहा हत्ती नजरेखालून घातले.

बक्षी उल्मुल्क बहरामंदखानाने अधिक सैन्य पाठवावे अशी विनंती लिहून पाठविली.

बादशहांनी बक्षी अब्दुर्रहमानखान याला स्वारांची पथके व त्यांचा तपशील (तूमार) तयार करण्याची आज्ञा केली. अब्दुर्रहमानखान याने बहरामंदखान याजकडे पाठविण्यासाठी सहा हजार आठशे स्वार यांची तपशीलवार व्यवस्था (तूमार) केली. बहरामंदखानाकडे राव सुजानसिंग (बीकानेरचा राजा) याला तैनात करण्यात यावे अशी आज्ञा झाली. सियादतखान (तळावरुन ब्रम्हपुरीच्या) तोफा आणाव्या व (ब्रह्मपुरीला) खान फीरोजजंग याची गाठ घ्यावी अशी आज्ञा करून बादशहांनी फातेहार खैर (कुशलतेची प्रार्थना) पढून त्याला ब्रह्मपुरीकडे जाण्यास निरोप दिला.

दोन सप्टेंबर– आज नुघ्रतजंग जुल्फिकारखान व बक्षी उलमुल्क बहरामंद खान यांच्या नावे बाहशहांची फर्माने (आज्ञापत्र) पाठविण्यात आली.

मुअज्जमची मुले शहाजादा अजीम (अजीममुश्शान) याच्यासाठी पांचशे मोहरा किमतीचा एक अरबी घोडा व शहाजादा रफीउल्कद्र याच्यासाठी चारशे मोहरा किमतीचा एक अरबी घोडा निवडावा व आपल्याला दाखविण्यात यावा अशी आज्ञा झाली.

तीन सप्टेंबर– मरहूम सिद्दी खैरियतखान याचा मुलगा सिद्दी दाऊद हा तळावरुन (ब्रम्हपुरी) येऊन बादशहांना भेटला.

मुद्दाम गुर्जबर्दार नेमून कऱ्हाड वगैरेचा ठाणेदार यासीनखान यास बक्षी उलमुल्क बहरामंदखान याजकडे पोहोचवावे अशी आज्ञा झाली.

खान फिरोजंग याच्या आईसाठी म्हणून बादशहांनी तीनशे रुपयांच्या तीन रत्नखचित अंगठ्या व एक चादर या वस्तू सियादतखान याजबरोबर पाठविल्या. सियादतखान याजकडे अर्जीमुकररचा दारोगा (दुसऱ्यांदा अर्ज बादशहासमोर ठेवणारा अधिकारी) हा हुद्दा होता. सियादत खानाच्या गैरहजेरीत त्याचा नायब म्हणून रुहुल्लाखानाचा भाऊ बाकरखान याने काम व्हावे अशी आज्ञा झाली.

बहरामंदखानाच्या सैनिकांना द्यावयाची पगाराची रक्कम (खजिना) सुजानसिंगाने आपल्या बरोबर न्यावी अशी आज्ञा झाली.

बादशहांना कळविण्यात आले की 'शंभर मराठे स्वार महिमान गडाभोवती पसरले आहेत.' मुहंमद अमीनखान याने जाऊन त्यांचे पारिपत्य करावे अशी आज्ञा झाली.

चार सप्टेंबर – बक्षी उलमुल्क बहरामंद खान याने पुढीलप्रमाणे विनंती लिहून पाठविली–'येथील हवापाणी मला मानवत नाही. या शिवाय फतेहुल्लाखानाबरोबर माझे जमत नाही. माझ्या ऐवजी (सेनापती म्हणून) इतर कुणाची तरी नेमणूक करण्यात यावी.'

बादशहांनी विनंती मान्य केली. बहरामंद खानाच्या ऐवजी रुहुल्लाखानाची (यालाच संताजीने दोड्डेरीच्या गढीत कोंडला होता) नेमणूक करण्यात आली. खानाच्या हाताखालचे सैन्य रुहुल्लाखानाकडे देण्यात आले. रुहुल्लाखानाला चंदनगडचा किल्ला घेण्यासाठी पाठविण्यात आले.

पाच सप्टेंबर – काल बादशहांनी रुहुल्लाखानाला निरोप दिला होता. आज ती नेमणूक त्यांनी रद्द केली. त्यांनी आज्ञा केली की 'बहरामंदखानानेच चंदनगडचा किल्ला लवकर जिंकून घ्यावा.' बहरामंदखानाच्या

बायकोला मतलबखानाने बहरामंदखानाकडे पोहोचवावी अशी आज्ञा झाली. हकीम हाजिकखान याने जाऊन बहरामंदखान याचा इलाज करावा अशी बादशहांनी आज्ञा केली.

सहा सप्टेंबर – गुजरातचा माजी सुभेदार शुजाअतखान मरहूम याचा मुलगा नजरअलीखान याची मन्सब वाढवून त्याला अहमदाबादेकडे पाठविण्यात आले.

रामगीर (सुभे बीदर, आता जिल्हे करीमनगर, आंध्र प्रदेश) ची अमीनी व फौजदारी पूर्वी सुभेबीदरचा सुभेदार खुदाबंदाखान याजकडे होती. त्याऐवजी त्या जागेवर दलपतचा मुलगा गजपत याची नेमणूक करण्यात आली.

तरबियतखान मीर आतिश (दारुगोळयाचा प्रमुख) याचा भाऊ कामयाबखान हा गुलबर्ग्याचा किल्लेदार व फौजदार होता. त्या जागेवर त्याच्या ऐवजी कासिमखान याची नेमणूक करण्यात आली.

परंड्याचा किल्लेदार व फौजदार इज्जतखान याची मन्सब शंभर जात व पन्नास स्वार अशी कमी करण्यात आली.

दहा सप्टेंबर – अहमदनगरचा बक्षी व वाकनीस इब्राहीम बेग हा आज्ञेप्रमाणे हुजुरात आला आहे असे हाफिज अंबर महली याने कळविले. लाकडाची इमारत तो उभी करीत असे. बादशहा म्हणाले 'दिवाणे-खासांच्या जवळ अशी एक इमारत उभी करून दाखव.'

श्रीरंगपट्टणचा जमीनदार (राजा) जयदेवराव याचे कल्याण पंडित वगैरे तीन वकील भेटले. त्यांना खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

अकरा सप्टेंबर– नजाबतखानाचा पुतण्या व जळगाव (खानदेश)चा ठाणेदार नजीबखान हा छावणीत होता. त्याला मोतिमदखान ही पदवी देण्यात आली. त्याला सातशे जात व चारशे स्वार अशी मन्सब होती.

सिद्दी मिफताह याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. त्याच्याबरोबर अकराशे स्वार देण्यात येऊन अहमदनगरच्या रक्षणासाठी त्याला पाठविण्यात आले.

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याचा नायब मतलबखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली. 'आपल्या आज्ञेप्रमाणे हुजुरातून नावा खान–नुस्रतजंग (जुल्फिकार-खान) याच्या सैन्यात पोहोचविण्यात येत आहेत. संरक्षक पथकासंबंधी (बदर्का) काय आज्ञा?'

बादशहांनी आज्ञा केली की ' पंचवीस स्वार व पन्नास बर्कंदाज (बंदूकची) हे जाहिदबेग गुर्जबर्दार याजबरोबर नावांचे रक्षण करतील. नावा बक्षी बहरामंद-खानाच्या फौजेत पोहोचविण्यात याव्या. तेथून संग्रामखान याने खान नुस्रतजंग (जुल्फिकारखान) याजकडे पोहोचवाव्या.

खान फीरोजजंग हा ब्रह्मपुरीच्या तळावर होता. यक्काताजखान यास त्याज-पाशी तैनात करण्यात आले. त्याला एक हजार जात व चारशे स्वार अशी मन्सब होती.

खान नुस्रतजंत जुल्फिकारखान याच्या फौजेतील बातम्यांवरून कळले की, दादप्रभू हा पाच हजार जात व दोन हजार स्वार अशी मन्सब बाळगणारा येथील फौजेत होता. तो तेथून निघून आपल्या जहागिरीत जाऊन बसला आहे.' त्याची मन्सब हजार जात व एक हजार स्वार अशी कमी करण्यात आली.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली.–

' धनाजी जाधव व दादोमल्हार हे पाच हजार स्वार बरोबर घेऊन निघाले. नीरा नदीच्या पलीकडे चिंचोणी (?) गावाजवळ नरकवासी रामा (राजाराम) याचा सरदार हणमंतराव याजबरोबर त्यांचे युध्द झाले. हणमंतराव पळाला. पण धनाजी जाधव याने त्याला जिवंत पकडले आणि त्याचे घोडे वगैरे मालमत्ता आपल्या ताब्यात घेतली.

बारा सप्टेंबर– आज शुक्रवार कचेऱ्या बंद होत्या.

तेरा सप्टेंबर– उदयपूरचा जमीनदार (महाराणा) अमरसिंग याजकडे पाठ-विण्यासाठी खिलतीची वस्त्रे व खंजीर ही काढून ठेवावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

बादशहा हे तरबियतखान मीर आतिश (दारु गोळयाचा व्यवस्थापक) याला म्हणाले ' तयार व्हा. मी तुम्हाला कोंडाण्याला वेढा घालण्यासाठी सोमवारी पाठवीत आहे.' रुहुल्लाखान याला बादशहांनी आज्ञा केली की ' तरबियत खान याजबरोबर पाठविण्यासाठी दोन हजार दोनशे नव्वद स्वारांचा तूमार (यादी, मस्टररोल) तयार करा.

फजाइलखान याने बादशहाला पुढीलप्रमाणे कळविले–

' माझा भाऊ सय्यद मुहंमद हा बुऱ्हाणपूर सुभ्यात आहे. त्याच्या पत्रावरुन कळते की अंबरचा राजा जयसिंग (सवाई जयसिंग) हा बुऱ्हाणपुरात एक महिन्यापासून येऊन बसला आहे. त्याचा मेघराज नावाचा वकील आपल्या छावणीत आहे. त्याने जयसिंगाला कळविले आहे ते असे ' मी तुमची तैनाती

उत्तर भारतात होईल असे करून तसा हुकूम मिळवून पाठवून देईन. तुम्ही बुऱ्हाणपुरातच रहा. हुजुरात येऊ नका' यामुळे जयसिंग हुजुरात येत नाही.

बादशहांनी छावणीचा कोतवाल मुहंमद अमीन याला आज्ञा केली की 'वकील (मेघराज) याला लष्करातून बाहेर घालवून द्या.' राजा जयसिंग याची मन्सब व हुद्दाही काय आहेत याची चौकशी करून कळवावे अशी बक्षींना आज्ञा देण्यात आली.

शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेतील बातम्यांवरून कळले की नरकवासी संता (संताजी घोरपडे) याचा मुलगा राणोजी व राणोजीचा काका बहिर्जी हे हुजुरांच्या चाकरीत येऊ इच्छितात असे कळल्यावर शहाजाद्यांनी त्यांना आणण्यासाठी चिकोडीचा जमीनदार देवप्पा (?) यास त्यांच्याकडे पाठविले आहे.

चौदा सप्टेंबर– जयसिंग यास दीड हजार जात, एक हजार स्वार दुघोडी व पन्नास लाख दाम इनाम असा हुद्दा होता. बादशहांनी त्याच्यावर रुष्ट होऊन त्याची जात मन्सब पाचशेनी कमी केली.

अहमदनगरचा बख्शी व वाकनीस मुहंमद इब्राहीम याने लाकडी बंगला तयार करून आणला होता. तो दिवाणेखासच्या समोर उभा करण्यात आला होता. कचेरीचे काम संपल्यावर बादशहा तख्तेखांवर बसून त्या ठिकाणी गेले. त्याने बंगल्याच्या चहूबाजूने हिंडून त्याची पाहणी केली. त्यांना बंगला आवडला. ते म्हणाले बादशहांना योग्य असा बंगला तयार करण्यात आला आहे, छान आहे. मुहंमद इब्राहीमला खिलतीची वस्त्रे देण्यात यावी व त्याचा हुद्दा काय आहे कळवावे अशी आज्ञा झाली.

सटवाजी डफळेची मुले व नातू यांना पुढीलप्रमाणे मन्सबी देण्यात आल्या– सटवाजीचा मोठा मुलगा जानोजी याला दीड हजार जात व एक हजार स्वार.

सटवाजी डफळे याचा नातू व शेखबुढ्ढाचा मुलगा मुहंमद हसन याला पाचशे जात व दोनशे स्वार.

सटवाजी डफळे याच्या जहागिरीची व्यवस्था पाहाण्यासाठी शेख शुकल्ला याला पाठविण्यात आले.

बेनीशहा दुर्ग (पन्हाळगड) वरून कडक बिजली तोफ रेहेकले व तोफांची सामग्री छावणीत आणण्यासाठी यक्काताजखान वगैरे गेले होते. तोफांची सामुग्री मुर्तजाबाद मिरज येथे होती. तोफा व सामुग्री घेऊन ते हुजूरात आले व बादशहांना भेटले.

पंधरा सप्टेंबर– अहमदनगरचा बक्षी व वाकनीस इब्राहीमबेग याची नेमणूक मछली बंदरचा दारोगा म्हणून करण्यात आली. त्याच्या मुलाला अहमदनगरची बक्षीगिरी व वाकनिशी देण्यात आली. इब्राहीमबेग याने तयार केलेला बंगला त्याने ब्रम्हपुरीच्या तळावर नेऊन नबाब-जीनतुन्निसा बेगम यांना दाखवावा अशी त्याला करण्यात आली.

तरबियतखान हजर आहे असे बादशहांना कळविण्यात आले. ते म्हणाले, मी गुरुवारी त्याला निरोप देईल.'

बादशहांनी कबचाकखान याला तरबियतखानाबरोबर मोहिमेवर जाण्यासाठी निरोप दिला. शंभर अश्रफ्यांच्या वजनाची एक अश्रफी व शंभर रुपये वजनाचा एक रुपया त्याला बक्षीस म्हणून देण्यात आला.

अदालतीचा दारोगा मुनीमखान याला तरबियतखानाचा नायब म्हणून नेमण्यात आले.

बादशहांनी आज्ञा केली की 'खान फीरोजजंग याच्या फौजेतून बेलदार, तरबदार (कुऱ्हाडींनी जंगल तोडणारे) भिस्ती वगैरे माणसे याना हुजूरांत बोलावून घेण्यात यावे.

सादतमंदखान याला तीन हजार जात व दोन हजार स्वार अशी मन्सब होती. त्याला तरबियतखानाबरोबर तैनात करण्यात आले.

सोळा सप्टेंबर– मच्छींद्रगडचा बदललेला किल्लेदार नेमत, दिवंगत राजा भीम याचा मुलगा अर्जुनसिंग इत्यादी मंडळी आज बादशहांना भेटली.

बुऱ्हाणपूर (खानदेश) चा सुभेदार सद्रुद्दीन मुहंमदखान याला फर्मान पाठविण्यात आले. गुर्जबर्दार मिर्जाबेग याला आज्ञा झाली की त्याने राजा जयसिंग याला बुऱ्हाणपुराहून हुजुरांत आणावे.

कर्नाटकातील बालाघाटचा बदललेला फौजदार बख्तमंदखान याला हुजुरात बोलावण्यात आले होते. तो अद्याप आला नव्हता. त्याला चार हजार जात व बावीसशे स्वार अशी मन्सब होती. त्याची मन्सब हजार जात व हजार स्वार अशी कमी करण्यात आली. त्याला खान नुस्रतजंग जुल्फिकारखान याच्या फौजेत तैनात करण्यात आले.

बादशहांना कळविण्यात आले की जुम्लतुल्मुल्क असदखान (मुख्य प्रधान) हे आज्ञेप्रमाणे बुधपांचेगावच्या बागांची पाहणी करण्यासाठी गेले आहेत.

सतरा सप्टेंबर–औंधपट्टयाचा किल्लेदार व फौजदार व मरहूम लोदीखान याचा मुलगा वलीदादखान याला लोदीखान ही पदवी देण्यात आली.

राजा जयसिंग याच्या बुऱ्हाणपूर व लाहोर येथील हवेल्या सरकारात

घण्यात याव्यात व त्याला देण्यात येणाऱ्या पन्नास लाख दाम इनामातून तीस लाख कमी करण्यात यावेत अशी आज्ञा झाली. हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे–

'चंदनगड (वंदन गड) च्या किल्लेदाराने बख्शीउल्मुल्क बहरामंदखान याच्याकडे बोलणे लावले की 'माझे अपराध माफ होत असतील तर मी किल्ला हवाली करीन.' हे मान्य करून बहरामंदखानाने त्याला सांगून पाठविले की 'तुम्ही आपली माणसे किल्ल्यातून बाहेर काढा.'

अठरा सप्टेंबर–लोदीखान उर्फ रहमत याला सरताजखान व बसवापट्टणचा बदललेला किल्लेदार खुदादादखान याला बलीदादखान या पदव्या देण्यात आल्या.

एकोणीस सप्टेंबर– शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

वीस सप्टेंबर– नाहरखान (बहरामंदखानापाशी तैनात) याने बादशहाना पुढील प्रमाणे लिहिले– 'मंडनगडच्या (वंदनगड) किल्ल्यातील गनिमांच्या काबिल्याचा तपास करून मी कबिले धरले. आता बक्षी बहरामंदखान म्हणत आहेत की 'कबिले माझ्या हवाली करा' यावर काय आज्ञा ?' बादशहांनी आज्ञा केली की खानाला (नाहरखान) हुजुरांत बोलावून घ्यावे.

बक्षीउल्मुल्क बहरमंदखान याने बादशहांना पुढीलप्रमाणे पत्र लिहिले–

वंदनगडच्या किल्लेदाराने किल्ला (आमच्या) ताब्यात देण्याचा करार केला होता. पण तो आता पुन्हा लढू लागला आहे. बादशहाजादा कामबक्ष याच्या फौजेतील बक्षी ख्वाजा मुहंमद याच्या हाताला गोळीची जखम झाली आहे लढाई चालू आहे. बारुद (बंदुकीची दारु), सोरा वगैरे तोफखान्याला लागणाऱ्या सामुग्रीची आवश्यकता आहे.' बादशहांनी वीस मण दारु व चाळीस मण सोरा मुहंमद मासूम याजबरोबर देऊन त्याला आज्ञा केली की या वस्तू तुम्ही कन्हर(?) चा ठाणेदार बदाजी (पदाजी) याजपाशी पाहोचवा. तो तेथून बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याजकडे पोहोचवील.'

बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) च्या हशमाचा (पायदळ शिबंदी) पगार फारच थकला आहे.' पगारादाखल तीस हजार रुपये देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

एकवीस सप्टेंबर– काल रात्र बादशहांनी बक्षी उल्मुक रुहुल्लाखान याला बोलावून त्याच्याशी खलबते केली.

बादशहाच्या आज्ञेप्रमाणे नाहरखान हा आपली मुले व नातवंडे यांच्यासहित बहरामंदखान याच्या फौजेतून येऊन बादशहांना भेटला. रणबाजखान, संग्रामखान

मूर्तजा, शहाब व बुऱ्हाण ही नाहरखानाची मुले नातवंडे बादशहांना भेटली.

बावीस सप्टेंबर– बादशहांनी आपल्या अधिकाऱ्यांच्या खालील प्रमाणे नेमणुका केल्या–

१) ब्रह्मपुरीच्या तळाचा व्यवस्थापक गाजिउद्दीनखान बहादुर याजकडे बिजापूरची सुभेदारी व ब्रह्मपुरीपासून औरंगाबादेपर्यंतच्या मार्गाचे रक्षण.

२) विजापूरचा सुभेदार लुत्फुल्लाखान याची औरंगाबादेचा सुभेदार म्हणून नेमणूक.

३) गाजिउद्दीन फीरोजजंग याचा भाऊ हामिदखान याची बीडचा फौजदार म्हणून नेमणूक

४) बीडचा फौजदार मुहंमद मुरादखान (सुप्रसिद्ध इतिहासकार खाफीखान याला मुरादखानाचा आश्रय होता) याची गाजिउद्दीनखान बहादुर याचा नायब म्हणून विजापूर सुभ्यावर नेमणूक.

५) औरंगाबादेचा सुभेदार नजाबतखान याची बुऱ्हाणपूर (खानदेश) चा सुभेदार म्हणून नेमणूक

६) खानदेशचा सुभेदार मिर्जा सद्रुद्दीन मुहंमदखान याची बंगाल सुभ्यात तैनाती.

मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम हा आजारी म्हणून बहरामंदखानाच्या फौजेतून छावणीत आला. बादशहांनी त्याची मन्सब पन्नास स्वारांनी कमी केली. हकीम हाजिकखान याने मुनीमखान व त्याचा मुलगा यांचा औषधोपचार करावा अशी आज्ञा झाली.

दौलताबादेहून आलेल्या बातम्यांवरून कळले की 'अबुल्हसन हैदराबादी येथे कैदेत होता. तो मरण पावला.'

बादशहांनी छावणीचा कोतवाल मुहंमद अमीन याला पुढीलप्रमाणे आज्ञा केली– ' लष्करात पुढील प्रमाणे दवंडी द्या. ' लष्करांतील कोण्याही माणसाने आपले कुटुंबीय (बायका माणसे) आपल्याबरोबर बाळगू नये व बरोबर घेऊन चालू नये. त्यांना एक तर तळावर (ब्रह्मपुरी) पाठवावे किंवा इतर कोठेतरी पाठवावे.'

तेवीस सप्टेंबर – सीयुम (तिसरा) बक्षी अब्दुल रहमानखान हा आजारी होता. तो बरा होऊन बादशहांना भेटला.

यलंगतोशखान बहादुर (हा औरंगजेबाचा दासी पुत्र होता असा प्रवाद होता) हा दिल्लीत होता. त्याने पुढीलप्रमाणे विनंती लिहून पाठविली–

'येथील सुभेदार मुहंमद यारखान हा फकिरीबाण्याचा साधू मनुष्य आहे. आपली परवानगी असेल तर त्याला भेटण्यासाठी मी अधूनमधून किल्ल्यात जाईन.' परवानगी देण्यात आली.

इनायतुल्लाखान याने बादशहांना सांगितले 'मी माझ्या बायका माणसांना तळावर (ब्रह्मपुरी) पाठवीन म्हणतो.' बादशहा म्हणाले 'मर्जी तुमची'.

मन्सूरखान याचा मुलगा मुहंमद काजम याला बहरामंदखान बक्षी याच्या तोफखान्याचा दारोगा म्हणून नेमण्यात आले.

बादशहांनी नायब कोतवाल मुहंमद अमीन याला बोलावून सांगितले 'आम्ही कूच करु तो गाडी रस्ता नसणार. तुम्ही लष्करातील माणसांना ताकीद करा त्यांनी आपली बायका माणसे तळावर (ब्रह्मपुरी) अगर अन्यत्र पाठवावीत.'

चोवीस सप्टेंबर – उदयपुरच्या राण्याचा वकील जगरुप हा बादशहांना भेटला. बादशहांनी जुम्लतुल्मुल्क असदखान याला विचारले 'हे वकील कायस्थ आहेत काय ? हे पूर्वीपासून वकील आहेत काय?' असदखानाने हो म्हणून सांगितले. जगरुपला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

गाजिउद्दीन फीरोजजंग सुभेदार विजापूर, लुत्फुल्लाखान, सुभेदार औरंगाजाबाद, नजाबत खान सुभेदार बुऱ्हाणपूर (खानदेश) यांच्या नावांनी नेमणुकींची फर्माने, बढतीचे हुकूम व खिलतीची वस्त्रे पाठविण्यात आली. मुहंमद मुराद खान यास विजापूर येथे गाजिउद्दीन फीरोजजंग याचा नायब म्हणून नेमण्यात आले. सद्रुद्दीन मुहंमदखान (खानदेशचा माजी सुभेदार) याला बंगालमधे अकबर नगर राजमहालच्या फौजदारीवर पाठविण्यात आले.

अब्दुस्समदखान याने छावणी भोवती गस्त घालून चोरांची (मराठ्यांची) दबा धरुन बसण्याची स्थळे शोधावी आणि त्यांचे पारिपत्य करावे अशी आज्ञा देण्यात आली.

पंचवीस सप्टेंबर– सक्के (पाणी वाहाणारे भिस्ती), तबरदार (लाकूड तोडे) व बेल्दार (बांधकाम करणारे) यांना जमादिलावल महिन्यापर्यंतची पगार बाकी देण्यात यावी अशी आज्ञा झाली.

एकोजी वगैरे सरदार विजापूर (सुभ्यात) लुत्फुल्लाखान याजपाशी तैनात होते. ते पूर्वीप्रमाणे विजापूरच्या नव्या सुभेदाराचा (गाजिउद्दीन फीरोजजंग) नायब याजपाशी राहावेत अशी आज्ञा झाली.

बादशहा मतलबखान यास म्हणाले 'तयार व्हा. खेळणा (विशाळगड) (किल्ल्याचा मार्ग) पाहून येण्यासाठी मी तुम्हाला पाठवीत आहे.'

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे- 'चोर (मराठे) सियादतखानाच्या गोटाच्या पलीकडे आले, ते बैल व उंट पळवून नेत आहेत.' बादशहांनी आज्ञा केली की 'मुहंमद अमीनखान याने जाऊन त्याचे पारिपत्य करावे.' आज्ञेप्रमाणे मुहंमद अमीन खान हा त्वरेने निघाला. मराठे पळून गेले. अमीनखानाने गुरेढोरे सोडवून मालकांना परत दिली.

खटावचा ठाणेदार कृष्णराव याने पांच कैदी आणले होते. त्यांना ठार मारण्यात यावे अशी मुहंमद अमीन नायब कोतवाल याला.

सव्वीस सप्टेंबर– शुक्रवार–कचेऱ्या बंद होत्या.

सत्तावीस सप्टेंबर– बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याने पुढीलप्रमाणे विनंती लिहून पाठविली– 'वंदनगडच्या कुमकेसाठी धनाजी जाधव हा मोठे सैन्य घेऊन आला आहे. युद्ध करण्याचा त्याचा बेत दिसतो. माझ्याजवळ फार थोडे सैन्य आहे. आपण आणखी पथके पाठवाल अशी आशा आहे.'

बादशहा म्हणाले 'मतलबखान याने तयार व्हावे. बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याची कुमक करण्यासाठी त्याला पाठवीत आहे. अर्जुनसिंग वगैरेंचे एक हजार स्वार तयार करून मतलबखानाबरोबर देण्यात यावे.'

रुहुल्लाखानाने बादशहाचा पुढील हुकूम जुल्फिकारखानाला कळविला– 'तुमचे सरदार नियमाप्रमाणे पथके बाळगीत नाहीत असे आमच्या कानावर आले आहे. तुम्ही त्यांना ताकीद करावी. नियमाप्रमाणे त्यानी आपल्या पथकातून सैनिक बाळगावे. त्यांनी तुमचे म्हणणे ऐकले नाही तर त्यांची जहागीर त्यांच्या सैनिकांच्या संख्येच्या प्रमाणात कमी करण्यात येईल.'

अब्दालखान याने छावणीतून एक तोफ घेऊन ती वंदनगड किल्ल्यानवळ फतेउल्लाखानाकडे पोहोचवावी अशी आज्ञा झाली.

अठ्ठावीस सप्टेंबर– बहरामंदखानाकडे मदतीला म्हणून जाण्यापूर्वी मतलबखान हा बादशहांना भेटण्यासाठी आला. बादशहांनी त्याला काही सूचना दिल्या. त्याच्या बरोबर तीन हजार चारशे चाळीस स्वार देण्यात आले.

बहरामंदखान याने आपली बायका माणसे मिफतहगड किल्ल्यात पाठविली की तेथील किल्लेदार किशोरसिंग याने किल्ल्यातून निघावे असा आदेश असदखानाने द्यावा अशी आज्ञा करण्यात आली.

ऑक्टोबर १७०१

एक ऑक्टोबर– हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे 'शहाजादा मुहंमद बेदार बख्त याने सामानगड किल्लयाला वेढा घातला होता. तो त्याने आता जिंकून घेतला आहे.'

विजापूर कर्नाटकचा फौजदार चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) याला अधोनीची (आता कर्नूल जिल्हा, आंध्र प्रदेश) पण फौजदारी देण्यात आली.

मुकर्रमखान याने मक्केच्या यात्रेला जाण्याची परवानगी मागितली. विनंती मान्य करण्यात आली.

दोन ऑक्टोबर– शायस्ताखानाचा नातू आणि अबूनस्रखानाचा मुलगा अबुल खैर हा बादशहांना भेटला.

युसुफचा मुलगा नेमत याला सामानगडच्या किल्लेदारीवर नेमण्यात आले. त्याला अडीचशे जात व दीडशे स्वार अशी मन्सब होती, तीत पन्नास जात व पन्नास स्वार अशी वाढ करण्यात आली.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली– 'वंदनगडच्या किल्लेदाराने यापूर्वी जिवाचे अभय मिळाल्यास किल्ला सोडतो असे बोलणे लावले होते. पण यासीनखानाच्या चिथावणीने त्याने पुन्हा लढण्यास सुरुवात केली. आता फतेउल्लाखानाचे मोर्चे किल्लयाच्या दरवाज्यापर्यंत सरकले, हे पाहून तो पेचात सापडला. जिवाच्या भीतीने त्याने बक्षी उल्मुक बहरामंदखान यांच्याकडे सांगून पाठविले की 'पाईने विलायतचा देशमुख सूर्याजी (पिसाळ) व इतर माणसे या किल्ल्यात कैदेत आहेत. त्यांना येथेच ठेवून मी किल्ला सोडून देतो.'

आपले अधिकारी आज उद्या किल्ल्यात प्रवेश करणार आहेत.

बादशहांनी नायब कोतवाल मुहंमद अमीन याला आज्ञा केली की 'लष्करांतील बायका माणसांना तळावर (ब्रह्मपुरी) पाठविण्यात यावे.'

तीन ऑक्टोबर– शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

चार ऑक्टोबर– बादशहांनी हिदायत केशला विचारले 'येथून खेळण्याचे (विशाळगडचे) काय अंतर आहे?' त्याने सांगितले 'चाळीस कोस.' बादशहा म्हणाले 'मतलबखान व उस्मानखान करावल यांनी येथून कऱ्हाडाबादपर्यंत मजला ठरवून यावे.'

मतलबखान, सय्यदखान, अर्जुनसिंग, मुकर्रमखान, अबुल्खैर ही मंडळी बादशहाला भेटली.

बादशहा मुहंमद अमीनखान याला म्हणाले 'तुम्ही खान फीरोजंग याला लिहा. त्याला म्हणावे, 'लष्करातून (बायका पोरांचा) काफिला (समूह) तिकडे (ब्रह्मपुरीकडे येत आहे.) तो घेण्यासाठी हामिदखान (फीरोजजंग याचा भाऊ) याला म्हसवडला पाठवा.' मुहंमद अमीनखान याला बादशहांनी आज्ञा केली 'तुम्ही तयार व्हा. अंतःपुरातील स्त्रीया व लष्करातील बायका माणसे यांना तुम्हाला म्हसवडपर्यंत पोहचवावे लागेल. या महिन्याच्या एकवीस तारखेस (जमादिलावल) सोमवारी (तेरा ऑक्टोबर १७०१) ही सर्व माणसे निघतील.'

बादशहांनी रुहुल्लाखानाला विचारले 'ओझी वाहाण्यासाठी जनावरे आहेत ना?' त्याने सांगितले 'नाही.' यावर आज्ञा झाली की उंट, बैल वगैरे विकत घ्या.

काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'धनाजी जाधव हा मोठे सैन्य घेऊन पुन्हा वर्धनगडकडे आला आहे.

बादशहांना कळविण्यात आले की 'शहाजादा मुहंमद बेदारबख्त याने भूदरगड (कोल्हापूर जिल्हा) किल्ल्याला वेढा घातला आहे.

पाच ऑक्टोबर– सियादतखान हाजीख्वाजा दानिश, ख्वाजाखान, तुर्कताजखान ख्वाजा मुहंमद लुत्फ, सादुल्लाबेग, मुहंमद अमीन, सिद्दी बलालखान ही मंडळी फीरोजजंगाकडे गेली होती. ती येऊन बादशहांना भेटली.

मतलबखानाचे सहकारी अब्दुस्समदखान, जफरखान आणि बाकी बेग हेही बादशहाला भेटले.

कल्याण भिवंडीचा ठाणेदार मातबरखान व दंडराजपुरीचा किल्लेदार सिद्दी याकूत यांच्या नावे फर्माने पाठविण्यात आली.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे–

काल धनाजी जाधव याने बख्शी उलमुल्क बहरामंदखान याच्या फौजेवर रात्री छापा घालण्याचा बेत केला होता. बहरामंदखान व फतेउल्लाखान हे हे सावध झाले. याच वेळी जुल्फिकारखान नुस्रत जंग हा तेथे येऊन पोहोचला. शत्रू बरोबर हात घाईची लढाई झाली. शत्रूची अनेक माणसे ठार झाली. शत्रूचा पराजय झाला. जुल्फिकारखानाची बरीच माणसे ठार अगर जखमी झाली.'

बादशहा म्हणाले 'आफरीन बाद शाबास, शत्रूचे चांगले पारिपत्य केले.'

तळावरुन (ब्रह्मपुरी) घोडे हुजुरात आणून घ्यावे अशी हमीदुद्दीनखान बहादुर याला आज्ञा करण्यात आली.

सहा ऑक्टोबर– आज कचेऱ्या बंद होत्या.

सात ऑक्टोबर– काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे– 'वंदनगडचा मराठा किल्लेदार गिरजोजी हा आपली माणसे घेऊन किल्ल्यावरुन खाली उतरला (पन्हाळगडच्या किल्लेदाराप्रमाणे) आणि स्वतःच्या गावाकडे निघून गेला. बादशहाचे अधिकारी किल्ल्यात दाखल झाले.

बेदारबख्ताच्या फौजेत तैनात असलेला सरमस्त बैरागी मन्सबदार हा वारला. त्याला चार हजार जात व दोन हजार स्वार अशी मन्सब होती.

वंदनगड किल्ल्याचे नांव मफतूहगड असे ठेवण्यात यावे अशी आज्ञा झाली. तेथील किल्लेदारीवर सूरतसिंग गौड याची नेमणूक करण्यात आली.

बहरामंदखान याने वंदनगडबद्दल सोन्याच्या किल्ल्या पाठविल्या, त्या बादशहासमोर ठेवण्यात आल्या. बहरामंदखानाला फर्मान तयार करण्यात यावे अशी आज्ञा झाली. बादशहांनी आज्ञा केली की जमादिसानी महिन्याच्या दहा तारखेस (१ नोव्हेंबर १७०१) आम्ही खेळणा (विशाळगड) जिंकून घेण्यासाठी येथून निघणार आहोत.

ख्वाजा अब्दुल्ला बर्कंदाज याला वंदनगड व इतर तीन किल्ल्यांच्या तोफखान्याचा दारोगा म्हणून नेमण्यात आले.

बादशहा हे रुहुल्लाखानाला म्हणाले, 'आपला हत्तीखाना परंडा परगण्यात आहे तो हुजुरात आणवून घ्या.'

आठ ऑक्टोबर– अब्दुल्ला याची (वंदनगड) मफतूहगड व इतर तीन अशा चार किल्ल्यांच्या तोफखान्याचा दारोगा (अधिकारी) म्हणून नेमणूक करण्यात आली.

नुस्रतखान (बहापूरखान खानजहान याचा मुलगा) याला ब्रह्मपुरीच्या तळावरुन बोलावण्यात आले होते. तो येण्यास राजी नव्हता. पण आपण खान फीरोजजंग याच्या सैन्यात तैनात होण्यास राजी आहोत असे म्हणतो अशा अर्थाचा निरोप त्याला बोलावून आणण्यास गेलेला सजावल (अमंलबजावणीचा अधिकारी) याने पाठविला. नुसरतखान याला एक हजार जात व चारशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी त्याची मन्सब काढून घेतली व त्याला दहा हजार रुपयांचे वर्षासन द्यावे अशी आज्ञा केली.

तीरअंदाजखान हा खान फीरोजजंग याच्या सैन्यात तैनात होता. बादशहांनी त्याला विजापूरच्या सुभ्यावर खान फीरोजजंग याचा नायब म्हणून नेमले. तसेच मुहंमद मुरादखान (इतिहासकार खाफीखान याचा आश्रयदाता) याला पवनार (वर्धा जिल्हा) वगैरे परगण्याची फौजदारी देण्यात आली.

पाईने विलायत (वाई प्रांत) चा ठाणेदार नाहरखान व त्याचे सहकारी यांना फीरोजजंगापाशी तैनात करण्यात आले.

चांद्याचा जमीनदार बीरसिंग याला सजावल (अंमलबजावणीचा अधिकारी) याने हुजुरात आणले नव्हते. सजावलची मन्सब कमी करण्यात आली.

नऊ ऑक्टोबर– आज बादशहांनी न्यायदानाचे काम केले नाही. त्यांनी बख्शी रुहुल्लाखान याजबरोबर खलबते केली.

ख्वाजा दौलत हा बादशहांना भेटला. बादशहा म्हणाले 'तुम्ही आजारी आहात.' तो म्हणाला 'आपले चरण दृष्टीस पडले आणि मी बरा झालो.' बादशहा म्हणाले 'तुम्ही बरे होईपर्यंत गुलाल बारमध्ये पालखीतून येत जावे'

जुल्फिकारखान बहादुर नुस्रत जंग याने लिहून पाठविले की 'धनाजी जाधवाशी झालेल्या लढायात राव दलपत बुंदेला (इतिहासकार भीमसेन सक्सेना याचा आश्रयदाता) व इतर यांनी चांगली कामगिरी बजाविली. त्यांच्यावर कृपा व्हावी' राव दलपत याला अडीच हजार जात व एक हजार स्वार अशी मन्सब होती. तीत दोनशे स्वारांची वाढ करण्यात आली. रामसिंग हाडा याची मन्सब वाढविण्यात येऊन त्याला नगाऱ्याचा मान देण्यात आला. त्याला वीस लाख दाम (सुमारे चाळीस हजार रुपये) बक्षीस म्हणून देण्यात आले.

दंडराजपुरीचा फौजदार सिद्दी याकूतखान याजकडे एक गुर्जबर्दार पाठवावा अशी आज्ञा झाली. रुस्तमखान विजापूर याचा मुलगा गालिबखान याच्या हुद्याबद्दल चौकशी व्हावी अशी आज्ञा झाली.

दहा ऑक्टोबर– आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या

अकरा ऑक्टोबर– तोफखान्याचा प्रमुख तरबियतखान हा आजारी होता. हकीम हाजकखान याने त्याचा इलाज करावा अशी आज्ञा झाली.

अंबरचा राजा जयसिंग (सवाई जयसिंग) हा बीड येथे पोहोचला (सात ऑक्टोबर १७०१) असून तो मजल दर मजल करीत हुजुरात येत आहे असे कळले.

तीस ऑक्टोबर– मफतूहगड (वंदनगड) च्या किल्लेदारीवर सूरतसिंग गौड याची नेमणूक करण्यात आली. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात येऊन त्याला निरोप देण्यात आला.

गाजिउद्दीन फीरोज जंग याने (ब्रह्मपुरीहून) खर्बुजाच्या बिया बादशहाकडे पाठविल्या.

बादशहांना कळविण्यात आले की, 'उद्या जुल्फिकारखान याचे मरहूम इस्लामखान याच्या मुलीशी लग्न ठरले आहे. नौबती वाजविण्याबाबत काय आज्ञा?' बादशहा म्हणाले, 'आजचा मुहुर्त चांगला आहे. लग्न आज रात्री उरकून घ्या व नौबती वाजवा. वधूसाठी गुलालबारमध्ये आमच्या निवासस्थानाजवळ एक तंबू उभा करा. बादशहाजादा कामबक्ष याची बायको आरामबानू हिने वधूपाशी जाऊन सर्व व्यवस्था पाहावी. नुस्रतजंग जुल्फिकारखान याने नौबती वाजवीत हुजुरात यावे. त्याच्याबरोबर त्याचा बाप जुम्लतुल्मुल्क असदखान (मुख्य प्रधान) याने असावे.

एकतीस ऑक्टोबर– ठरल्याप्रमाणे काल रात्री जुल्फिकारखान हा असदखान व बख्शी उल्मुल्क बहरामंदखान यांना बरोबर घेऊन नौबती वाजवीत हुजुरात आला. बादशहांनी त्याला मोत्याचा सेहरा (मुंडावळ) व इतर अलंकार दिले. बादशहा म्हणाले 'मुंडावळ कपाळाला बांधा' जुल्फिकारखान म्हणाला 'मुंडावळीचे स्थगित करावे.' बादशहांनी विनंती मान्य केली. निका पढण्याच्या प्रसंगी शेख नुरुल्हक मुहतसिब (सार्वजनिक नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारा अधिकारी) हा वकील, मुहंमद गौस व मुहंमद आकिल हे साक्षीदार होते. काजी मुहंमद अकरमखान हा निका पढला. वधू ताहिराखानम हिला दोन लाख रुपये मिहर मान्य करण्यात आले. बादशहांनी वधूवरांना मुल्यवान अलंकार दिले व आपल्या तंबूवर जाण्यास जुल्फिकारखानाला निरोप दिला.

धनाजी जाधव हा फलटण भागात संचार करीत आहे असे कळले. जुल्फिकारखानाने सोमवारी त्याच्यावर चालून जावे अशी आज्ञा केली.

बादशहा हे ख्वाजा दानिश याला म्हणाले 'तयार राहा. छावणीतील माणसांच्या कुटुंबियांना (कबिले) ब्रम्हपुरीच्या तळावर तुम्ही नेऊन पोहोचवावे.'

नोव्हेंबर १७०१

एक नोव्हेंबर– बादशहांनी दोन फर्माने पाठविली. एक महादजी (निंबाळकर) ची मुले बजाजी वगैरेच्या नांवे व दुसरे मुधोजीची मुले जगदेव वगैरेच्या नांवेही फर्माने देताना बादशहा म्हणाले 'मुनीमखान व सटवाजी डफळे यांनी वरील मंडळींचे समाधान करुन त्यांना हुजुरात आणावे.'

दोन नोव्हेंबर– आज्ञेप्रमाणे मुनीमखान महादजी व मुधोजी यांच्या मुलांना बुधपांचेगांवहून घेऊन आला. भेटणारी मंडळी पुढीलप्रमाणे.

संभाजीचा मेहुणा महादजी यांची मुले (दत्तक, मुधोजीची मुले) १) बजाजी २) मालोजी.

माधोजीची (मुधोजी ?) मुले १) कलदेवराव (जगदेवराव) २) फिरंगोजी (वणगोजी) यानी नजरा दिल्या. बादशहांनी त्यांना खिलतीची वस्त्रे व बक्षिसे दिली. (फिरंगोजी (वणगोजी) हा मुधोजीचा दुसरा मुलगा बजाजी)

बादशहानी आज्ञा केली की जमाल कौल याने बेलदार व दगड फोडणारे याना बरोबर घेऊन जाऊन घाटाचा रस्ता दुरुस्त करावा.

तीन नोव्हेंबर– शुक्रवार, कचेऱ्या बंद

चार नोव्हेंबर– बजाजी (महादजी निंबाळकराचा मुलगा) याला एक हत्ती देण्यात आला. मालोजीराव, जगदेवराव व फिरंगोजी (वणगोजी उर्फ बनाजी) यांना प्रत्येकी एकेक घोडा देण्यात आला.

मतलबखान करावल बेगी याला एक हत्तीण देण्यात आली. बादशहा म्हणाले 'तयार रहा. तुम्हाला खेळण्याकडे (विशाळगड) पाठवित आहे.' बहरामंदखान यास आज्ञा झाली की मतलबखानाबरोबर राजा जयसिंग व दोन हजार स्वार देण्यात यावे धनाजी जाधवावर चालून जाण्यासाठी जुल्फिकारखानाला निरोप देण्यात आला.

बादशहांनी आज्ञा केली की 'आम्ही गुरुवारी निघू. आघाडीचे तंबू बुधवारी पाठवा.' छावणीचा नायब कोतवाल मुहंमद अमीन याला आज्ञा झाली की 'दवंडी द्या. छावणीतील माणसांनी आपले कबिले ब्रम्हपुरीला पाठविण्यासाठी ख्वाजा दानिशकडे पाठवावे. मोठ्या तोफा अबदालखान तोपची याच्याबरोबर पुढे पाठवाव्या अशी आज्ञा झाली.

पांच नोव्हेंबर – बादशहांनी नायब कोतवाल मुहंमद अमीन याला आज्ञा केली की 'तुम्ही उद्या पुढे जाऊन घाटाच्या रस्त्यावर बसा. लष्करातील कबिल्यातील बायका पोरांना जाऊ देवू नका.' वाटेत बादशहाच्या विश्रांतीसाठी एक शामियाना उभा करावा अशी आज्ञा झाली. फतेउल्लाखान बहादुर याने आघाडीच्या तंबूची काळजी घ्यावी अशी आज्ञा झाली.

सहा नोव्हेंबर – आज एक प्रहर दिवस आला असता बादशहा तख्तेखांवर स्वार झाले. पाऊणे दोन कोसाची मजल मारुन ते घाट पार झाले आणि आपल्या निवासस्थानात दाखल झाले.

विशाळगडच्या वाटेवर : ५

नोव्हेंबर १७०१

सहा नोव्हेंबर – आज सकाळी बादशहा सादिकगड (वर्धनगड, खटाव) जवळील आपल्या मुक्कामाहून निघून पावणे दोन कोसाची मजल मारुन आणि घाट ओलांडून आपल्या मुक्कामावर पोहोचले. बादशहाजादा कामबक्ष याने एक बंदुक व तलवार या वस्तू नजर केल्या. बादशहांनी बंदुक पाहून ती तरबियत खान (दारु गोळयाचा प्रमुख) याजकडे दिली. बादशहांनी तलवार म्यानेतून काढून पाहिली, ती त्यांनी खानाजादखान याला दिली. पुढील मंडळींनी बादशहांना नजरा व भेटी दिल्या– मुहंमद अमीनखान सदर (न्यायाधीश, १७२१ मध्ये हा पंतप्रधान झाला. भावी निजामुल्मुल्काचा चुलत चुलता) अजीजुल्लाखान (बादशहाच्या मावस बहिणीचा मुलगा व मरहूम बक्षी रुहुल्लाखान याचा भाऊ) फतेउल्लाखान बहादुर (याने वर्धन गड जिंकून घेतला), सिद्दी बिलाल खान, कामयाबखान (औरंगजेबाच्या बायकोच्या– दिलरसबानूच्या मावस भावाचा मुलगा व तरबियतखान–दारुगोळचाचा प्रमुख, याचा भाऊ), खिदमतगुजारखान, जैनुद्दीन अलीखान, कल्बेअली, आका नसीर, सियादतखान, अमानुल्ला खान, कामबक्षाचा अधिकारी फतेउल्लाखान, असदखान (पंतप्रधान).

बादशहाच्या आज्ञेने सुलतान बुलंद अख्तर (बंडखोर राजपुत्र अकबर याचा मुलगा) याचा तंबू बादशहाच्या गुलाल बारमध्ये (निवासस्थान) उभा करण्यात आला.

दहा नोव्हेंबर – आज बादशहा एकांब्याहून (कोरेगाव तालुका, सातारा जिल्हा) निघाले. ते तख्तेखांवर स्वार होते. सव्वादोन कोसाची मजल मारुन ते रहमतपुरा जवळ (कोरेगाव तालुका) आपल्या मुक्कामास आले. वाटेवर पुढील मंडळी त्यांना भेटली–मुघलखानाचा मुलगा बहरामंद, मतलबखानाचा मुलगा असदखान, फतेउल्ला खानाच्या पथकातील दोन इसम.

काल बादशहा हे नायब कोतवाल याला म्हणाले 'उद्या लष्कर हलेल त्या वेळी छावणीतील लोकानी पांगलेल्या अवस्थेत लष्कराच्या बाहेर जाऊ नये अशी ताकीद करा. बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान हे आघाडीची पथके बरोबर घेऊन येतील. त्यांना हरकत करु नका ते पुढील मजलेकडे जातील.'

अकरा नोव्हेंबर– सटवाजी डफळे याला त्याची हलाखी पाहून दोन हजार रुपये देण्यात आले.

मरहूम खान जहान यांचा मुलगा नुसरतखान याची पदवी काढून घेण्यात आली. त्याला छावणीच्या बाहेर जाऊ देऊ नये अशी नायब कोतवाल याला आज्ञा करण्यात आली.

दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा मन्सूरखान याने विनंती केली की बर्क-दाजांमैकी (बंदूकची) अनेकापाशी घोडे नाहीत. तीस घोडे देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

आग्र्याच्या सुभेदाराकडे फर्मान पाठविण्यात आले होते. फर्मान नेणाऱ्या गुर्जबर्दाराने आग्र्याहून खजिना आणावा अशी आज्ञा करण्यात आली.

बारा नोव्हेंबर– आज बादशहा सकाळी रहमतपुराहून निघाले. ते तीन कोस व नऊ साखळी अशी मजल मारुन मरजे ताडगांव (कोरेगाव तालुका) जवळ मुक्कामाला पोहोचले.

कामयाबखान हा चंदावल (पिछाडी) च्या सैन्यात होता. त्याला तरबियत खानाचा (भाऊ) नायब म्हणून नेमण्यात आले त्या जागेवर मन्सूरखान यास बदलण्यात आले. शेतीची नासाडी होऊ नये याची काळजी घेण्याचे काम कामयाब खान याजकडे देण्यात आले.

रात्री बादशहांनी बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान याला बोलावून म्हटले ' तुम्ही करावलांना (टेहेळे) आज्ञा करा त्यांनी चहूकडे टेहेळणी करून येत जावे.

तेरा नोव्हेंबर– आज ताडगांवावरील आपल्या मुक्कामावरुन निघून बादशहा यांनी पावणे दोन कोसाचा प्रवास केला. ते मसूर (कऱ्हाड तालुका, सातारा जिल्हा) ला येऊन पोहोचले.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की मकार्जी हा (मराठा सरदार) दोन हजार स्वारांचे सैन्य घेऊन भानोळीच्या परिसरात धामधूम करीत आहे.

चौदा नोव्हेंबर– आज बादशहा पुढील मुक्कामावर जाण्यासाठी स्वार झाले. ते हमीदुद्दीनखान बहादुर यास म्हणाले 'तुम्ही कऱ्हाडच्या मशिदीवर जा. तेथे कनाती लावा. मी तेथे नमाज पढीन.' त्याप्रमाणे करण्यात आले. बादशहा हे कऱ्हाडच्या मशिदीपाशी आले. आज्ञेप्रमाणे चार मुसलमान कहरांनी (पालखी वाहाणाऱ्यांनी) बादशहाचे तख्तेखां (वाहन) मशीदीत नेले. बादशहा तेथे नमाज पढले. थोडा वेळ विश्रांती घेऊन ते कृष्णेच्या अलिकडे (कृष्णा ओलांडून) कऱ्हाडला मुक्कामाला आले. मसूरहून त्यांचा एकंदर प्रवास तीन कोसाचा झाला.

पुढील मंडळी बादशहांना भेटली– १) कऱ्हाडचा ठाणेदार यासीनखान व व त्याचे सहकारी २) यासीनखानाचा मुलगा अब्दुर्रऊफ ३) कऱ्हाडचा बक्षी व वाकनीस अब्दुल्ला ४) कऱ्हाडचा देशमुख शिवाजी.

बादशहा म्हणाले– 'उद्या आघाडीचे तंबू पाठवा. मलकापूरपर्यंत (विशाळगडच्या वाटेवर, कोल्हापूर जिल्हा) आठ मजला नेमल्या आहेत.'

सतरा नोव्हेंबर– आज बादशहा मुक्कामाहून निघाले, ते पावणे दोन कोसाची मजल मारून नौला येथे मुक्कमाला आले.

रयतेच्या शेताची पायमल्ली होऊ नये म्हणून बादशहांनी छावणीतील पुढीलप्रमाणे अधिकारी नेमले–

लष्करच्या डाव्या फळीकडे गुलाम मुहंमदच्या ऐवजी इनायतुल्लाचा मुलगा जियाउल्ला व व्यवस्थापक मुहंमद शाह.

उजव्या फळीकडे शेख हिदायत केश, व्यवस्थापक गुलाम मुहंमद

खानदेश सुभ्यातील बातम्यांवरून कळले की–

'मराठे हे प्रदेश उध्वस्त करण्यासाठी या भागात पसरले आहेत.' बादशहांनी आज्ञा केली की 'एक गुर्जबर्दार बागलाणचा फौजदार व नजाबतखानाचा मुलगा बहादुरखान (बहरोजखान?) याजकडे पाठवा व त्याला गनिमांचे पारिपत्य करण्यास लावा.'

अठरा नोव्हेंबर– शहाजादा बेदारबख्त याला पत्रे पाठविण्यात आली.

वीस नोव्हेंबर– आज कचेऱ्या बंद होत्या.

एकवीस नोव्हेंबर– बेदारबख्ताच्या तैनातीत असलेला सरदार जमशेटखान (विजापूर राज्यातील माजी सरदार) व त्याची मुले इब्राहीम व अहमद ही बादशहाना भेटली.

हरकाऱ्यांच्या तोंडून बादशहांना कळले की 'मतलबखान व राजा जयसिंग हे खेळणा (विशालगड) किल्ल्याकडे चालले आहेत. ते अवरगांव (बोरगांव ?) ला पोहोचले आहेत.'

बादशहांना कळविण्यात आले की 'आज्ञेप्रमाणे मुजाहिदखान याने ब्रम्हपुरीतून रसद व तोफा या घेतल्या असून तो हुजुरात येण्यास निघाला आहे.'

बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) चा किल्लेदार व फौजदार रावतमल झाला याने भेटीस येण्याची परवानगी मागितली. पुढील मुक्कामावर येऊन भेटा अशी आज्ञा झाली.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की राजारामाची बायको (ताराबाई) या महिन्याच्या चोवीस तारखेस (चौदा नोव्हेंबर १७०१) खेळण्यावरून (विशाळगड) उतरून कोंडाण्याच्या (सिंहगड) दिशेने गेली.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की आज्ञेप्रमाणे शहाजादा बेदारबख्ताने आपले बाजार बुणगे कोल्हापूरात ठेवले आणि तो स्वतः अठ्ठावीस तारखेस (एकोणीस नोव्हेंबर १७०१) खेळण्याकडे (विशाळगड) रवाना झाला.

फतेउल्लाखान बहादुर यास दोनशे बेलदार बरोबर घेऊन पुढील रस्ता नीट करावा अशी आज्ञा झाली.

बावीस नोव्हेंबर– शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

तेवीस नोव्हेंबर – आज सकाळी बादशहा शिराळे (बत्तीस शिराळे) या मुक्कामाहून निघाले. पावणेदोन कोसाची मजल मारुन ते मौजे सातगाव (हाटेगाव) येथे पोहचले. पुढील रस्ता नीट करण्यात यावा अशी त्यांनी फतेउल्लाखान बहादूर यास आज्ञा केली.

खान फिरोजजंग याचा भाऊ मुजाहिदखान याने ब्रम्हपुरीच्या तळावरुन तोफा आणल्या होत्या. तो वाटेत भेटला.

बादशहांना कळविण्यात आले की आज्ञेप्रमाणे बेदारबख्त हा खेळण्याच्या (विशाळगड) परिसरात पोहचला असून त्याने किल्ल्याची टेहेळणी (पाहणी) केली आहे.

राजा जयसिंग याच्या वकीलाने यार अलीबेग याच्या मध्यस्थीने विनंती केली की 'धान्याची महर्गता व इतर गोष्टी यामुळे जयसिंग त्रासात आहेत. काही कृपा व्हावी.'

बादशहांनी स्वहस्ते आज्ञा लिहिली की 'राजा जयसिंग दोन तीन वर्षे आपल्या देशात (वतन, जहागीर) राहून आला आहे. त्याला कसला त्रास आला आहे ? वकील हा लटपटया (मन्सुबाबाज) आहे. त्याला छावणीतून हाकलून द्या. व दुसरा वकील नेमा म्हणून राजा जयसिंगाला लिहा.'

बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) चा किल्लेदार रावतमल झाला हा येऊन बादशहांना भेटून गेला. मतलबखानाचा सहकारी अमानुल्लाखान हाही बादशहाला भेटला.

शहाजादा मुहंमद बेदारबख्त याच्या फौजेतून खालील हकीकत कळविण्यात आली–

'शहाजादा बेदारबख्त, मतलबखान, खाने आलम वगैरे मोगल पथके विशाळ गडला गेली. त्यांनी खेळण्याच्या (विशाळगड) पायथ्याशी असलेल्या वाडया जाळल्या. यावर किल्ल्यातून चोर (मराठे) बाहेर पडले. त्यांनी मोगल फौजेतील सुमारे तीस उंट पळविले. त्यानंतर ते खानेआलमवर तुटून पडले. खाने आलम हा घोडयावरुन खाली उतरला. बाण, बंदुका व इतर शस्त्रे यांची हातघाईची लढाई झाली. अनेक मराठे मारले गेले. अगर जखमी झाले. मोगलांचेही अनेक लोक ठार अगर जखमी झाले. खाने आलम याचा घोडा जखमी झाला. मराठे पराजित होऊन किल्ल्यात निघून गेले.'

बादशहा रागावून म्हणाले 'चोर (मराठे) इतक्या संख्येने होते तर मतलबखानाने शहाजादा बेदारबख्त याला किल्ल्याकडे न्यावेच कशाला.' मतलबखानाला दोन हजार जात व पाचशे स्वार अशी मन्सब होती. बादशहाने त्यापैकी पांचशे जात व शंभर स्वार अशी मन्सब कमी केली व त्याला मीरतुजुक (शिष्टाचार पालनाचा अधिकारी) च्या जागेवरून काढून त्याच्या जागी तरबियतखान याची नेमणूक केली.

शहाजादा बेदारबख्त याने लिहिले की 'मी जवळ आलो आहे. परवानगी असेल तर भेटण्यास येतो. बादशहांनी आज्ञा केली ' उद्या या.'

पाईने विलायत (वाई प्रांत) चा ठाणेदार इस्माईलखान मका याने खालीलप्रमाणे लिहून कळविले–

' राजारामाचा कारभारी रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) याने अंताजी नावाचा आपला सरदार वंदनगडकडे पाठविला होता. अंताजी हा वंदनगडच्या किल्लेदाराना (नेमलेले व बदललेले) घेऊन चालला होता. ही बातमी मला कळताच त्यांच्यावर तुटून पडलो. शत्रूपैकी अनेकाना ठार केले. अनेकांना जिवंत पकडले.' बादशहा म्हणाले ' मजुरा झाला.' बादशहांनी त्याच्याकडे दहा

हजार रुपये पाठविले. यातून त्याने एक हजार मावळे प्यादे नोकरीवर घेऊन त्याना हुजुरात पाठवावे अशी आज्ञा झाली.

चोवीस नोव्हेंबर– आज बादशहा सातगाव (हाटेगाव) हून निघाले. पावणेतीन कोसाची मजल मारून ते मलकापूर (कोल्हापूर जिल्हा) च्या अलिकडे आपल्या मुक्कामावर दाखल झाले. मतलबखानाचे सहकारी उस्मान करावल, सिद्दी बिलालखान व ख्वाजाखान यांनी बादशहाची गाठ घेतली.

बादशहांनी रुहुल्लाखानाला पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'अडीच हजार स्वार हमीदुद्दीनखान बहादुरपाशी व दीड हजार स्वार फतेउल्लाखान बहादुर याजपाशी देण्याची व्यवस्था करा.

बादशहा हे हमीदुद्दीन व फतेउल्ला याना म्हणाले, 'तयार रहा. खेळणा किल्ल्याभोवती मोर्चे कायम करण्याच्या जागा पाहाण्यासाठी तुम्हाला पाठवित आहे.'

पंचवीस नोव्हेंबर– बादशहांनी जुम्लतुल्मुल्क असदखान (मुख्य प्रधान) बख्शी उल्मुल्क बहरामंदखान व मन्सूरखान यांना आज्ञा केली की गुरुवारी शहाजादा बेदारबख्त भेटीस येत आहेत. तुम्ही पुढे जाऊन त्यांचे स्वागत करा.'

हरकऱ्यांच्या तोंडून कळले ते असे–

'नरकवासी संता (संताजी घोरपडे) याचा मुलगा राणोजी हा मोठे सैन्य घेऊन आला. त्याने आंबे (या गावचे) ठाणे उध्वस्त केले. तेथील लोकांची मालमत्ता लुटून नेली. नंतर तो मुर्तुजाबाद मिरजेकडे निघून गेला.'

रजब महिना म्हणून गरीब गुरीबांना दहा हजार रुपये देण्यात यावेत अशी बादशहाने आज्ञा केली.

मलकापूरच्या पुढे जाऊन मजला ठरविणे व बादशहाच्या निवासस्थानाची निवड करणे यासंबंधी काय आज्ञा, असे तरबियत खानाने विचारता बादशहा म्हणाले 'तूर्त आम्ही काही दिवस मलकापूरलाच मुक्काम करु'

सव्वीस नोव्हेंबर – आज पंचगंगेच्या (वारणा असावे) जवळील आपल्या मुक्का-वरुन बादशहा निघाले. दीड कोसाचा प्रवास करुन ते मलकापूर जवळ आपल्या मुक्कामावर आले.

आज्ञेप्रमाणे फतेहुल्लाखान बहादुर हा खेळणा किल्ल्याभोवती फिरुन मोर्च्यांच्या जागा ठरवून आला. त्याने बादशहाला आपला वृत्तांत सादर केला.

सत्तावीस नोव्हेंबर – आज शहाजादा बेदारबख्त बादशहांना भेटण्यास आला. बादशहा शय्यागृहात होते. तेथेच त्यांनी त्याला बोलावणे पाठविले. बेदारबख्ताने एक हजार अश्रफ्या व दोन हजार रुपये निसार (ओवाळणी) म्हणून त्यांच्या समोर ठेवले. बादशहांनी ममतेने त्याच्या पाठीवर हात ठेवला. बेदारबख्ताचा मुलगा सुल्तान बेदार दिल हाही बापाबरोबर येऊन बादशहाला भेटला. यानंतर त्यांना बक्षिसे देण्यात येऊन स्वतःच्या तंबूकडे जाण्यास निरोप देण्यात आला. भोजनाची नऊ व फळफळावळाची तीन ताटे त्यांच्याकडे पाठवावी अशी आज्ञा झाली.

काल रुहुल्लाखानाला आज्ञा देण्यात आली की 'तुम्ही खेळण्याकडे जा, आमच्या राहाण्यास योग्य जागा पहा, मोर्च्यांच्या जागा पहा आणि मजला नेमा आणि मग या. त्याच्या बरोबर सरफराजखान, राजा जयसिंग, हमीदुद्दीनखान बहादुर व फतेउल्लाखान बहादुरहे देण्यात आले.

बादशहांना कळविण्यात आले की मराठे हे बऱ्हाणपूरच्या अलीकडे बारा कोसावर पोहोचले असून त्यांनी एदलाबाद वगैरे पेठा उध्वस्त केल्या आहेत.

अठ्ठावीस नोव्हेंबर– शुक्रवार. कचेऱ्या बंद.

एकोणतीस नोव्हेंबर– पावसामुळे न्यायदानाचे काम झाले नाही.

बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान वगैरे खेळण्याजवळील जागा निवडण्यासाठी गेले होते. ते परत आले. हमीदुद्दीनखान बहादूर याने सांगितले 'रुहुल्लाखान हे घाटाच्या माथ्यावर (कतल) होते. मी, फतेउल्लाखान व मुनीम खान अशा तिघानी घाटमाथ्याखाली (हीच ती गजापूरची खिंड) आपल्या वास्तव्यासाठी जागा निवडली. ती येथून (मलकापुराहून) सव्वातीन कोसावर आहे. येथून त्याच्या दोन मजला होतात. तेथून खेळणा सव्वादोन कोसावर आहे. यावर काय आज्ञा ?' बादशहा म्हणाले 'फतेउल्लाखान बहादूर हे रस्ता नीट करुन, सांगतील त्यावेळी आम्ही निघू.

तीस नोव्हेंबर– बादशहांना कळविण्यात आले की शहाजाहा बेदारबख्त याच्या भेटीच्या वेळी राजा जयसिंग याने फक्त दहा अश्रफ्या नजर म्हणून दिल्या. बादशहांनी आज्ञा केली की 'त्याने एक हजार रुपये बेदारबख्ताला नजर म्हणून द्यावे.'

अजीमुल्ला (यसावल सशस्त्र संरक्षक यांचा प्रमुख) याला खान फीरोजजंगाच्या फौजेत तैनात करण्यात आले. फीरोजजंगाच्या फौजेतील रुस्तुमखान व

दिलेरखान वगैरेंना बोलावण्यात यावे व त्यांनी वाटेत ठाणी बसवावी अशी आज्ञा झाली

पाईने विलायत (वाई प्रांत) चा ठाणेदार इस्माईलखान मका याने रामचंद्र पंताच्या ख्वेश (निकटचा आप्त) अंताजी याला जिवंत पकडले होते. मुहंमद अमीनखान याने जाऊन अंताजीला हुजुरात घेऊन यावे अशी आज्ञा झाली.

मरहूम शायिस्ताखान याचा मुलगा अबुल्खैर याने वाटेत बादशहांना मुजरा केला. बादशहा म्हणाले, 'याने असे काय पागोटे बांधले आहे ?' मतलबखानाने सांगितले की 'उन्हात खराब झाले आहे. ते हिरवे किमखाबच.' बादशहांनी त्याला उत्तम रंगाचे दोन ठाण किमखाब देण्याची आज्ञा केली.

डिसेंबर १७०१

एक डिसेंबर– फीरोजजंगाच्या सैन्यात तैनात असलेला खुशखबरखान याला शंभर रुपयांचा एक खंजीर देण्यात आला. बेदारबख्ताच्या सैन्यात तैनात असलेला रहीमुर्रहमानखान हा येऊन बादशहाला भेटला.

माळवा सुभ्याच्या बातमीवरून खालील हकीकत कळली–

'बादशहाजादा मुहंमद आज्जमशहा (औरंगजेबाचा दुसरा मुलगा) याची गुजरातच्या सुभेदारीवर नेमणूक झाली होती. तो तिकडे चालला होता. येथील (माळव्यातील) बदललेला सुभेदार हे मुखतारखान वगैरे आज्जमशहाला पोहोचविण्यासाठी तीन मजलांपर्यंत गेले.'

ही बातमी ऐकून बादशहा रागावले. ते म्हणाले 'आमच्या आज्ञेशिवाय मुखतारखान हा बादशहाजादा आज्जम याला पोहोचवायला गेलाच कसा?' मुखतारखानाची नेमणूक आग्र्याच्या सुभेदारीवर झाली होती; त्याची मन्सब कमी करण्यात आली. इफ्तिखारखान याचीही मन्सब कमी करण्यात आली.

दोन डिसेंबर– अंताजीला आणण्यासाठी म्हणून मुहंमद अमीन सद्र याला पाईन घाटाकडे इस्माईल खान मका ठाणेदार याजकडे जाण्यास निरोप देण्यात आला. त्याच्याबरोबर बाकीबेग व नेमतखान यांना पाठविण्यात आले.

चंदनगडचा हवालदार (किलेदार) अंकोजी याला दोन हजार जात व एक हजार स्वार अशी मन्सब होती. त्यात पाचशेची वाढ करण्यात आली व अडीच हजार रुपये खर्चासाठी म्हणून त्याला देण्यात आले.

वंदनगडचा हवालदार फिरंगोजी (फलटणकर) याला दीड हजार रुपये देण्यात आले.

बुऱ्हाणपूरच्या बातम्यांवरून पुढील हकीकत कळली–

मराठ्यांचे सैन्य येथे आले. त्यांनी बऱ्हाणपुरला चहूकडून वेढले आहे. शहरातील एकही मनुष्य बाहेर जाऊ शकत नाही.'

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–' खान फिरोजजंग याला लिहा. आपले सैन्य लवकर बऱ्हाणपूरला पाठवून मराठ्यांचे पारिपत्य करावे.'

तीन डिसेंबर– काल रात्री फतेउल्लाखान याने कळविले की 'पुढील मार्ग नीट केला आहे.' बादशहा म्हणाले 'पेशखाना (आघाडीचे तंबू) उद्या पाठवा. आम्ही गुरुवारी निघू. कूच करताना आमच्या मागे एक मजलेवर असदखान (मुख्य प्रधान) व त्याच्या मागे एक मजलेवर तरबियतखान व राजा जयसिंग यांनी राहावे.'

मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम याच्या पथकांतील लोक चंदनगडच्या मोहिमेत कामी आले होते. त्यांच्या ऐवजी कोण नेमले आहेत ती दाखवा अशी बादशहाची आज्ञा झाली.

बीजागडच्या बातम्यांवरून पुढील हकीकत कळली–' येथे एक देऊळ असून हिंदू येथे जमून मूर्तीपूजा करीत आहेत.' बादशहाने आज्ञा केली की 'या संबंधी बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान यानी तेथील सुभेदाराला लिहावे.'

खाने आलम् व त्याचे भाऊबंद व पथके यांना मुर्तजाबाद मिरजेपासून बत्तीस शिराळ्या पर्यंत, यासीन खानाला तेथून पन्हाळ्याच्या किल्ल्यापर्यंत व जमशीद खान याला तेथून हुजुरांच्या छावणीपर्यंत मार्गरक्षक म्हणून नेमण्यात आले.

चार डिसेंबर – आज बादशहा तख्तेखांवर स्वार होऊन मलकापूरहून निघाले. दीड कोस मार्ग आक्रमून ते वडवाळ (मलकापूर व आंबाघाटच्या मध्ये) ला पोहोचले. वाटेत खालील मंडळींनी त्यांना नजरा (पेशकश) दिल्या.

बेदार बख्ताच्या सैन्यात तैनात असलेला राजा जयसिंग अठरा मोहरा, पन्हाळ्यापासून बादशहाच्या छावणी पर्यंतचा मार्गरक्षक जमशीदखान पांच मोहरा.

बादशहांनी फातेहा नियते खैर (कुशल होवो या अर्थाची) प्रार्थना पढून जमशेद खानाला निरोप दिला.

बेदारबख्तासाठी तीन घोडे राखून ठेवण्यात आले होते. ते हमीदुद्दीन खानाने बादशहाला दाखविले.

मुर्तजाबाद मिरजेचा राहदार (मार्गरक्षक) याने शनिवारी जाण्यास (मिरजेकडे) निघावे अशी आज्ञा झाली. गनिमांचे (मराठ्यांचे) पारिपत्य करावे म्हणून पुढील मंडळीना आज्ञा पत्रे धाडण्यात आली.

१) खान फीरोज जंग २) खानदेशाचा सुभेदार नजाबतखान ३) बागलाणचा फौजदार (नजाबत खानाचा मुलगा) बहरोजखान

बादशहा मतलबखानाला म्हणाले 'आजचा रस्ता चांगला होता' 'मतलब खान म्हणाला 'या पुढील रस्ता फार उंच निच आहे' बादशहा म्हणाले 'फतेउल्ला-खानाने तो नीट करावा. आम्ही येथे उद्या मुक्काम करणार आहोत.'

सहा डिसेंबर – कौलार पथकाचा दारोगा मुनीमखान याने बिनंती केली की माझ्या पथकातील बऱ्याच माणसांना आर्थिक हलाखीमुळे बसण्यास घोडे नाहीत.' त्यांच्यात वीस घोडे देण्यात यावे अशी आज्ञा झाली,

बेदारबख्ताच्या फौजेत तैनात असलेला सरअफराजखान व त्याची दोन मुले अब्दुलकादर व असदुल्ला हे येऊन बादशहांना भेटले.

अमानुल्लाने आज्ञेप्रमाणे चौकीच्या फळघावर खेळणा किल्ल्याचा नकाशा काढला होता. बादशहांनी तो पाहिला त्यांनी कचेरीतून (दिवाण) बोलावून घेतले. बादशहा त्याला माहिती विचारीत गेले आणि तो त्या जागा नकाशात दाखवीत गेला.

बादशहाजादा कामबख्श याने एक बारा सिंगा मारुन आणला होता. बादशहांनी तो त्यालाच देऊन टाकला.

पाईने विलायत (वाई प्रांत) च्या मावळे शिपायांना पगार म्हणून आठ हजार रुपये देण्यात आले.

मुहंमद अमीनखान याने लिहून पाठविले की, 'माझ्या पथकांतील इसमांची पगार बाकी फार थकली आहे. त्यांची स्थिती हलाखीची आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की त्यांचा एक दोन महिन्याचा पगार किती होतो याची चौकशी इनायतुल्लाखान याने करावी.'

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की राजारामाची बायको ही खेळण्यातून (विशाळगड) निघून प्रथम संदावल (शेडवळ, शिरवळ) किल्ल्याला गेली. तेथून ती कोंडाणा गडाकडे (सिंहगड) गेली आहे.

सात डिसेंबर– आज बादशहा वडवाळहून निघाले. पावणे दोन कोसाची मजल मारून ते येळवण जुगारे येथे पोहचले.

काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून खालील हकीकत कळली–

'नरकवासी संता (संताजी घोरपडे) याचा मुलगा राणोजी हा चार हजार स्वारांचे सैन्य घेऊन मलकापूरकडे मोगलांच्या पिछाडीच्या मजलेवर आला. त्याने वंजाऱ्यांचे बैल पळवून नेले. ही बातमी कळताच जुम्लतुलमुल्क असदखान

(मुख्यप्रधान) याने पिछाडीचा सेनापती तरबियतखान, राजा जयसिंग व व असदखानाचा जमादार सय्यद मुजफ्फर याना गनिमांच्या पारिपत्यासाठी नेमले. ते गनिमांवर (मराठयांवर) चालून गेले. लढाई झाली. शत्रूपैकी अनेकांना ठार अगर जखमी करण्यात आले. सय्यद मुजफ्फरचा भाऊ हाही जखमी झाला. पराभव पावून शत्रू बत्तीस शिराळयाकडे निघून गेला. बादशहांनी आज्ञा केली की हमीदुद्दीनखान बहादुर याने पिछाडीला जाऊन असदखान (मुख्य प्रधान) याची जागा घ्यावी. असदखानाने हुजुरात यावे.

बादशहांनी शहाजादा बेदारबख्त याला एक बंदूक बक्षीस दिली. बादशहांनी त्याला राणोजी (घोरपडे) याच्या पारिपत्यासाठी पाठविले. निरोप देताना बादशहांनी त्याच्या पाठीवर हात ठेवला व त्याच्या कपाळाचा मुका घेतला. बादशहांनी बेदारबख्ताचे कुशल व्हावे म्हणून प्रार्थना केली (फातेहा नियते खैर) बेदारबख्ताने तस्लीमात (अभिवादन, मुजरे) केले.

खाने आलम व त्याचे भाऊ हे बेदारबख्ताच्या फौजेत तैनात होते. ते बादशहांना भेटले. खाने आलमकडे मिरजेच्या मार्गाचे रक्षण करण्याचे काम देण्यात आले होते. खाने आलम व त्याचे भाऊ मुनव्वरखान, इखलासखान, फरीदखान व अमीनखान यांनी बादशहांना नजरा दिल्या.

सात डिसेंबर– काल रात्री बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'मराठे सरदार किल्ल्यावरून (विशाळगड) खाली उतरले. ते बादशहाच्या छावणीपासून अर्ध्या कोसावर असलेल्या घाटमाथ्यावर (खिड) आले. तेथे त्यांनी शिंगे कर्णे वाजविले व गोळीबार केला. ही खबर लागताच घाटमाथ्यावर (कतल, कातळ) फतेउल्लाखान बहादुर होता, तो त्यांच्या पाठलागावर गेला. चोर (मराठे) पळून गेले.

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली – 'उद्या बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान, हमीदुद्दीनखान व मतलबखान यांनी छावणीतून घाटमाथ्यापर्यंतचे अंतर साखळीने मोजावे व घाटमाथ्यापर्यंत गस्त घालून यावे.

शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेचा बक्षी व वाकनीस इनायतखान याला त्याच्या हुद्यावरून काढून टाकण्यात आले होते. त्याची खान ही पदवीही काढून घेण्यात आली.

जमशीदखान याने हमीदुद्दीनच्या द्वारे विनंती केली की 'मार्गाचे रक्षण करण्याच्या कामावर माझी नेमणूक करण्यात आली आहे. या प्रांतात चोरांची मराठयांची) वर्दळ फार आहे. तोफखान्याचा सरंजाम देण्यात यावा.' विनंती मान्य करण्यात आली.

दोनशे बंदूकीची, पन्नास बाण, दोन बाणदार इसम, सोरा व बंदुकीची दारु पंधरा मण (?) हे बादशहाकडून जमशेदखानाला देण्यात आले. बेदारबख्ताच्या फौजेतून त्याला शंभर बेलदार आणि पंधरा सक्का (पाणी वाहाणारे) देण्यात आले.

बादशहांना कळविण्यात आले की ' राणोजी (घोरपडे) याचे पारिपत्य करुन तरबियतखान, राजा जयसिंग व राजा अवधूत सिंग हे असदखानापाशी आले. सय्यदखानाने त्यांना प्रत्येकी एकेक तलवार बक्षीस दिली.'

इनायतुल्लाखान याने बादशहाने म्हटले ' खान फिरोजजंग यांनी मला पुढीलप्रमाणे पत्र पाठविले आहे. त्यात ते असे म्हणतात-

' मी आतापर्यन्त पाच लाख बैलांवर गोण्या लादून ब्रह्मपुरीच्या तळावरुन बादशाही छावणीत धान्य पाठविले व पाठवित आहे. पण ऐकतो की बादशाही छावणीत धान्याचा भाव रुपयाचा पाच शेर आहे आणि माझ्या येथे (ब्रह्मपुरीच्या तळावर) तेरा चौदा शेर आहे. छावणीत महागाई का व्हावी कळत नाही.'

बादशहानी छावणीतील बाजाराचे अधिकारी सय्यद इमादुद्दीनखान (गंज-बाजार-चा करोडी-अधिकारी) व ख्वाजा मुहंमदशहा अमीन गंज (बाजारचा देखरेख अधिकारी) यांच्या मन्सबो, शिक्षा म्हणून कमी केल्या.

आठ डिसेंबर- आज कचेऱ्या बंद होत्या.

नऊ डिसेंबर – आज पुढील मंडळींनी बादशहाची भेट घेतली-

१) असदखान (मुख्यप्रधान) हा पिछाडीला होता. तो बादशहांना भेटला. २) राजा जयसिंग ३) तरबियतखान (चंदावल म्हणजे पिछाडीचा सेनापती) ४) दक्षिणच्या सुभ्याचा दिवाण मोतेमदखान.

सरकारी बाजाराच्या व्यवस्थेवर इमामुद्दीन खानाच्या ऐवजी मस्त अली, व ख्वाजा मुहंमद शहाच्या ऐवजी इनायतुल्ला खानाचा मुलगा जियाउल्ला याच्या नेमणूका करण्यात आल्या.

मरहूम एतिमादखान यांचा मुलगा मुहंमद मुहसिन याला बेदारबख्ताच्या फौजेचा बक्षी व वाकनीस म्हणून नेमण्यात आले.

बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान, हमीदुद्दीन खानबहादुर व मतलबखान हे आज्ञे-प्रमाणे छावणीचा घेर साखळीने मोजून नकाशा तयार करुन घेऊन आले.

बादशहांनी आज्ञा केली की बक्षी उलमुल्क यांचा तळ लांब आहे. जवळ आणा बाजार व सैनिकांचे तळही जवळ आणा.

दिवाणेखासचा मोठा तंबू उभा करावा अशी आज्ञा झाली. (आस्पक-मोठा तंबू) फतेउल्लाखान बहादूरच्या पदरी असलेले बेलदार व तबरदार (कुऱ्हाडी चालविणारे) यांना चार महिन्याची पगार बाकी द्यावी अशी आज्ञा झाली.

खान फिरोज जंग याच्या सैन्यातील (ब्रम्हपुरीचा तळ) बातम्यांवरुन समजले की खान फिरोज जंग याची आई खिजरुन्निसा ही वारली. फिरोजजंग व त्याचा भाऊ हमिदखान बहादूर यांच्यासाठी खिलतीची (शोक वस्त्रे) वस्त्रे काढून ठेवावी अशी आज्ञा झाली.

राजा जयसिंग याला बेदारबख्ताच्या फौजेत तैनात करावे व त्याच्या ऐवजी सरअफराजखान याला हुजुरात बोलावून घ्यावे अशी आज्ञा झाली.

दहा डिसेंबर– बादशहा हे बादशहाजादा (राजपुत्र) कामबक्ष याला म्हणाले 'तयार रहा. तुमच्याबरोबर सैन्य देऊन खेळणा (विशाळगड) जिंकण्यासाठी तुम्हाला पाठवीत आहे.'

बादशहा बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याला म्हणाले 'आमच्याबरोबर एकंदर सैन्य (हुजुरात) किती आहे हे मला लिहून द्या.'

असदखान याने बादशहांना सांगितले की 'राणोजीशी (घोरपडे) झालेल्या युद्धात सय्यद मुजफ्फर जमादार याने उत्कृष्ठ कामगिरी केली. तो शिपाई गडी असून कामाचा आहे.' बादशहा म्हणाले त्याला भेटीला आणा.' सय्यद मुजफ्फर हा बादशहाला भेटला. बादशहांनी त्याला खिलतीची वस्त्रे दिली.

बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर याला म्हटले 'तुम्ही कुतल (घाटमाथा, खिंड) वर जा. आम्ही तेथे थांबण्यास योग्य अशी जागा निवडा. मी तेथे जाऊन किल्ला (विशाळगड) पाहीन.'

बादशहा असदखानाला (मुख्य प्रधान) म्हणाले 'तुम्ही आमच्या निवास-स्थानाच्या डावीकडच्या दिशेने उतरावे.'

बादशहा ख्वाजा मसूद व ख्वाजा इज्जत यांना म्हणाले, 'तुम्ही येथून खेळण्याच्या डोंगरापर्यंत जा व वाटेतील जंगलझाडी पाहून या.'

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की– 'राणू (राणोजी घोरपडे) हा पराभव पावून मुर्तजाबाद मिरजेच्या दिशेने गेला.

अकरा डिसेंबर– बादशहांनी शहाजादा कामबक्ष याला धनुष्यबाण व फतेउल्लाखान बहादुर व मुखलिसखानाचा मुलगा मुहंमद हुसेन यांना अंगठ्या बक्षीस दिल्या.

नेकनामखान यास कामबक्षाच्या फौजेचा बक्षी व वाकनीस म्हणून नेमण्यात आले.

काल संध्याकाळी बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'चोर (मराठे) हे खेळणागड (विशाळगड) च्या बाहेर पडले. ते कतल (कातळ, घाटमाथा, खिड) वर चालून आले. ही बातमी कळताच फतेउल्लाखान बहादुर त्वरेने त्यांच्यावर चालून गेला. युद्ध झाले. शत्रूपैकी अनेकजण जखमी झाले. खिडीच्या अलीकडे पाण्याचा ओढा होता. तो फतेउल्लाखान याने आपल्या ताब्यांत घेतला. चोर (मराठे) 'पराभव पावून किल्ल्यात निघून गेले.'

फीरोजजंगाकडे त्याच्या आईच्या मृत्युबाबत शोकवस्त्रे पाठविण्यात आली.

तरबियतखानाने विनंती केली की राजा जयसिंग हा शिपाईगडी असून कामाचा मनुष्य आहे. त्याला बेदारबख्तापाशी तैनात करण्याची आज्ञा झाली आहे ती रद्द करुन त्याला हुजुरात ठेवून घ्यावे. विनंती मान्य करण्यात आली.

दंडराजपुरीच्या किल्ल्यातून पुढील बातमी आली–'धनाजी जाधव व रामचंद्रपंत हे पंधरा हजार स्वाराचे सैन्य घेऊन त्या प्रांतात (दंडराजपुरी) चाल करुन गेले. ही बातमी लागताच येथील फौजदार सिद्दी याकूतखान हा त्यांच्यावर चालून गेला. एक दिवस युद्ध झाले. शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. शत्रू पराभव पावून पळून गेला.'

बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.' सिद्दी याकूत खानाकडे फर्मान व खिलतीची वस्त्रे पाठवावी अशी आज्ञा झाली.

आज्ञेप्रमाणे हमीदुद्दीनखान बहादुर हा बादशहानी उभे राहून खेळणा किल्ला पाहता यावा अशी जागा निवडून आला.

बादशहाजादा कामबक्ष याच्या बरोबर देण्यात येणाऱ्या सैन्याचा तपशील बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याने सादर केला. यात फतेउल्लाखान बहादुर, हमीदुद्दीनखान बहादुर, रुहुल्लाखान व मुनीमखान वगैरे (त्यांची पथके) होते. सैन्यातील स्वारांची संख्या बारा हजार भरली.

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'तुम्ही जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग यांना लवकर हुजुरात येण्याबद्दल लिहा.'

बारा डिसेंबर– काल बादशहांनी आज्ञा केली की, 'सात हजारी मन्सबदारापासून एक हजारी मन्सबदारांपर्यन्तच्या पथकांतील बेलदार, सक्का (पाणी वाहणारे) व इतर इसम यांनी मोर्चेबंदीच्या कामात झटावे.

काल बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान हा आज्ञेप्रमाणे खेळण्याजवळचा घाटमाथा (कतल खिड) पाहून आला. बादशहानी आज्ञा केली की तरबियतखान (दारु-गोळ्याचा अधिकारी) हमीदुद्दीनखान व ख्वाजा मंजूर यांनी खेळण्याच्या खिडीचे मोर्चे पाहावे व बादशहास राहाण्यास योग्य अशी जागा निवडावी व नंतर परत यावे अशी आज्ञा करण्यात आली.

त्याप्रमाणे ते लोक जाऊन जागा पाहून आले. ते म्हणाले ' किल्ल्यापासून पाऊण कोसावर गजापूर खेडे आहे. पण जागा (निवासस्थानास) योग्य नाही. बादशहा गप्प राहिले.

तेरा डिसेंबर– बादशहाजादा कामबक्ष याने खेळण्याचा नकाशा तयार करविला, तो त्याने बादशहाला दाखविला.

बादशहांना कळविण्यात आले की ' मुहंमद अमीनखान याने आज्ञेप्रमाणे चोरांचा (मराठ्यांचा) सरदार अंताजी याला पाईने विलायत (वाई प्रांत)चा ठाणेदार इस्माईलखान मका याजपासून हुजुरात आणले आहे. अंताजीला लष्क-रच्या कोतवालाच्या हवाली करण्यात यावे आणि त्याला कैदेत ठेवण्यात यावे अशी आज्ञा करण्यात आली.

बुऱ्हाणपूरच्या बातम्यांवरून कळले की ' येथील (खानदेश) सुभेदार नजा-बतखान हा मरण पावला. त्याला अडीच हजार जात व दीड हजार स्वार अशी मन्सब होती.' बादशहांनी आज्ञा केली की नजाबतखानाचा मुलगा व बागलाण वगैरेचा फौजदार बहरोजखान व सय्यद हसन अलीखान यांचा दर्जा (मन्सब मरातब वगैरे) काय आहे हे कळविण्यात यावे.

शहाजादा बेदारबख्त, जेबुन्निसा बेगम (दिल्ली येथे) इस्माईलखान मका, खान फीरोजजंग इत्यादींना आज्ञापत्रे पाठविण्यात आली.

चौदा डिसेंबर– फतेउल्लाखान बहादुर याचा भाचा मुहंमद रफी याला एक घोडा बक्षीस देण्यात आला.

ख्वाजा फैजुल्ला हा मध्य आशियातून नुकताच आला होता. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

बादशहाच्या आज्ञेप्रमाणे तरबियतखान याने अंबा घाटाची पाहणी करून नकाशा तयार करविला होता. तो त्याने बादशहांना दाखविला. बादशहा ज्या ज्या स्थळांची माहिती विचारीत होते ती तो सांगत गेला. बादशहा त्याला म्हणाले ' तयार रहा. खेळण्याला तिकडच्या दिशेने (कोकण) जिंकून घेण्यासाठी मी तुम्हाला पाठवीत आहे.'

बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याने तरबियतखानाबरोबर तीन हजार स्वारांचे सैन्य द्यावे व त्याला कुमक म्हणून मुहंमद अमीनखान याच्याबरोबर तीन हजार स्वारांचे सैन्य तयार करून द्यावे अशी आज्ञा झाली.

रुहुल्लाखानाने अंबा घाटापासून खेळणा किल्ल्याभोवती ठाणी बसवावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

मरहूम खान जहान याचा मुलगा मुहंमद शफी हा दिल्लीहून येत होता. तो येताच (ब्रह्मपुरीला) त्याला हुजुरात आणावे अशी आज्ञा करण्यात आली.

बादशहा रुहुल्लाखान मीरेसामान याला म्हणाले 'आम्ही आता इकडे तळच दिला आहे. उंट गाड्या वगैरे भाड्यानी घेतल्या आहेत, त्या आता बंद करा.'

रोजच्या बाजार भावावर देखरेख ठेवणारा व्यवस्थापक शेख हिदायत केश याला बादशहा म्हणाले 'तुम्ही रोजच्या बाजारभावाची यादी हुजुरात पाठवीत नाही.' हिदायतकेश म्हणाला 'गंज (बाजार) चा करोडी (अधिकारी) रोजची यादी देत नाही.' यावर बादशहा चिडून म्हणाले 'रोजच्या रोज याद्या हुजुरात आल्या पाहिजेत.'

पंधरा डिसेंबर – आज बादशहा तख्तेखांवर स्वार होऊन निघाले. वाटेत त्यांना एक बाग लागली. ती पाहून येण्यास त्यांनी बादशहाजादा कामबक्ष यास सांगितले. त्यानंतर एकंदर सव्वादोन कोसाची मजल मारुन ते मल्कापूर खुर्द जवळ पोहोचले. (येथे तारीख व स्थळ यांचा काही घोटाळा झालेला दिसतो. कदाचित हा मागील तारखेचा मजकूर असावा)

खान नुस्रतजंग याचा चाकर अब्दुल्लाबेग हा बादशहांना भेटला. भेटणाऱ्या इतर मंडळींत पिछाडी (चंदावल) चा सरदार तरबियतखान, मतलबखानाचा मुलगा असदुल्ला खान, बादशहाजादा कामबक्ष व टेहेळणी पथकाचे इसम होते.

बादशहांनी आज्ञा केली की 'सिकंदरखान विजापुरी (विजापूरचा माजी बादशहा) याची मुले व राजा शाहू यांच्या बरोबर असलेली पन्नास माणसे यांची छावणी बरोबर येण्यास हरकत नाही.'

फतेहुल्लाखान याने वाटेत विनंती केली की मकाहीर (मराठे) हे बादशाही छावणी भोवती घिरट्या घालीत असतात. पुढच्या मुक्कामावर तंबू पाठवायच्या वेळी ते आक्रमण करतात (हात मारतात.) बादशहा म्हणाले 'नायब कोतवाल मुहंमद अमीन याने पेशखान्याच्या (पुढील मुक्कामावर तंबू पाठविणारी माणसे) माणसांना वेगळे वेगळे जाऊ देऊ नये.'

पालनेर (पारनेर, अहमद नगर जिल्हा) येथील बातम्यांवरुन कळले की 'या भागातील केरोजी पवार वगैरे चार उपद्रवी इसमांनी चार हजार स्वारांचे सैन्य उभे केले असून ते धनाजी जाधवाला जाऊन मिळण्याच्या विचारात आहेत.' बादशहांनी आज्ञा केली की, 'या बाबतीत त्या भागातील फौजदार व जहागिरदार यांना ताकीदपत्रे लिहिण्यात यावी.'

मरहूम खानजमान फतेहजंग (मुकर्रबखान) याची मुले खानेआलम (पांच हजार जात, चार हजार स्वार) मुनव्वरखान (चार हजार जात व दोन हजार स्वार), इख्तिसासखान (तीन हजार जात व तेराशे स्वार) यांच्या मन्सबी वाढविण्यात आल्या.

बसवापट्टण (कर्नाटक) चा किल्लेदार ऐवजखान हा मरण पावला. त्याच्या जागी त्याचा मुलगा मुहंमदशफी याची नेमणूक करण्यात आली

कन्हाडचा ठाणेदार यासीनखान वगैरेना बोलावून बादशहांनी आज्ञा केली की 'छावणीतील पाचशे घोडे तळावर (ब्रह्मपुरी) पोहोचवून या.

बक्षी उल्मुल्क बहरामंदखान व मतलबखान हे अंबा घाट पाहून हुजुरात आले.

सोळा डिसेंबर– जुम्लतुल्मुल्क असदखान (मुख्य प्रधान) हा आज्ञेप्रमाणे खेळण्याचा (विशाळगड) डोंगर (कतल) पाहून आला. त्याने बादशहाला वृत्तांत सादर केला.

बुऱ्हाणपूर खानदेशचा सुभेदार नजाबतखान हा मरण पावला. त्याच्या जागी त्याचा मुलगा व बागलाणचा फौजदार बहरोजखान याची सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. मात्र त्याच्याकडे बागलाणची फौजदारी पण ठेवण्यात आली. मात्र सुल्तानपूर नंदुरबार येथील फौजदारीवर बहरोजखानाच्या जागी सय्यद हसन अलीखान यास नेमण्यात आले

दंडराजपुरी (कोकण) भागात मराठ्यांची वर्दळ आहे. घाट बंद करण्यात यावा. मराठे तिकडे पसरले तर त्यांचे पारिपत्य करण्यात यावे, अशा अर्थाचा हुकूम दंडराजपुरीचा फौजदार सिद्दी याकूतखान याला देण्यात यावा अशी बादशहांनी आज्ञा केली.

मुहंमदाबाद बीदरचा सुभेदार खुदाबंदाखान याने पुढीलप्रमाणे कळविले– 'हटकर बंडखोर हे पाथरी भागात पसरले होते. मी त्वरेने त्यांच्यावर चालून गेलो. त्यांच्यापैकी अनेकांना ठार करण्यात आले. मी हटकरांचा पराजय केला.' बादशहा म्हणाले 'मजुरा झाला. सेवा मान्य झाली.'

खानदेशचा सुभेदार नजाबतखान याने मृत्यूपूर्वी लिहिले होते की 'सैनिकांच्या पगाराचे मोठे कर्ज माझ्या डोक्यावर आहे. पायदळाची सामग्री माझ्या मुलाकडे ठेवण्यात यावी. म्हणजे ती बिकून तो कर्ज फेडू शकेल. विनंती मान्य करण्यात आली.

सतरा डिसेंबर – बादशहांनी फतेहुल्लाखान बहादूर याला विचारले 'खेळणागडची बाट व वाटेवरचे जंगलही अद्याप साफ करण्यात आली नाहीत काय? तो म्हणाला साफ झाली आहेत. शुक्रवारी मुहूर्त चांगला आहे. त्या दिवशी मोर्चे कायम करावे म्हणतो. बादशहाजादा कामबक्ष यांना निरोप द्यावा. ते येऊन डोंगराच्या पायथ्याशी तळ देतील.' बादशहांनी विनंती मान्य केली.

अठरा डिसेंबर – मुनीम खानाने पुढील प्रमाणे विनंती केली–

१) मुखलीस खानाच्या पथकांतील लोकांचा पगार फार थकला आहे. तो द्यावा. यावर रुहुल्लाखानाने चौकशी करुन वृत्तांत सादर करावा अशी आज्ञा झाली.

२) माझा मुलगा मुहंमद काजम हा जहागीर नसल्यामुळे विपन्नावस्थेत आहे. त्याला मोतमिद खानाने तनखा देत जावा अशी आज्ञा झाली.

३) विपन्नावस्थेमुळे पथकांतील इसमांपाशी घोडे राहिले नाहीत. वीस घोडे देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

छावणीचा कोतवाल मुहंमद अमीनखान याला बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

'मराठा सरदार अंताजी (रामचंद्रपंत अमात्य यांचा आप्त) हा कोतवालीत कैदेत आहे. त्याचा वध करण्यात यावा.'

शेरदहान तोफ व इंग्रजांनी दिलेल्या लहान तोफा या बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) वरून आणवून घ्याव्या अशी तरबियतखानाला आज्ञा देण्यात आली. (या तारखेस बादशहा सव्वादोन कोसाची मजल मारून बत्तीस शिराळयाला पोहोचले अशी नोंद आहे. येथेही तारीख व स्थळ यांचा घोटाळा झाला आहे. मागच्या महिन्याची ही तारीख असावी.)

मुहंमद बेदारबख्ताच्या फौजेत तैनात असलेला शंकराजी अहीरराव हा बादशहाला भेटला.

जमशीदखान हा जवळ येऊन पोहोंचला असे कळविण्यात आले. त्याला छावणीत येण्याची परवानगी देण्यात आली.

एकोणीस डिसेंबर– कालरात्री बादशहांनी आज्ञा केली की, 'जुम्लतुल्मुल्क असद खान (मुख्यप्रधान) यांनी उद्या खेळणा (विशाळगड) गडच्या समोरअसलेले फतेहुल्लाखानाचे मोर्चे पाहून यावे.' त्याप्रमाणे असद-खान हा आज घाटमाथ्याच्या पलीकडे गेला. किल्ल्यांतून चोर (मराठे) बाहेर पडले. त्यांची व फतेहुल्लाखानबहादुर यांची लढाई झाली. बाणबंदुक त्यांचा वापर झाला. शत्रू पैकी अनेकजण जखमी झाले. चोर (मराठे) पराजय पाऊन किल्ल्यात परत गेले. असदखान व फतेहुल्लाखान बहादुर यांनी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली वाडी जाळली. असदखान हा संध्याकाळच्या सुमारास आपल्या तळावर परतला. ही बातमी बादशहाना कळली.

बादशहानी आज्ञा केली की 'फतेहुल्लाखान बहादुर, हमीदुद्दीनखान बहादुर, तरबियतखान व मुहंमद अमीनखान यांनी तयार राहावे. उद्या त्यांना खेळणागड (विशाळगड) च्या मोर्च्यांकडे जावे लागेल.

बावीस डिसेंबर– किल्ले खेळणागड (विशाळगड) ला मोर्चे लावण्यासाठी म्हणून आज बादशहांनी फतेहुल्लाखानाला निरोप दिला. यावेळी बादशहा फातेहा खैर (सर्व कुशल असो अशा अर्थाची प्रार्थना) पढले. फतेहुल्लाखान व त्याचे सहकारी यांना पुढीलप्रमाणे बक्षिसे देण्यात आली.

फतेहुल्लाखान– एक धनुष्यबाण, मुनीमखान– रत्नजडित अंगठी, सिद्दी-बिलालखान– तलवार, सिद्दीयाकूत– तलवार, नेमतखान– रत्नजडित खंजीर, मीर मुहंमद शरीफ–धनुष्यबाण, मीर अहंमद–खंजीर इमामबेग व अब्दुलगफार–प्रत्येकी एक खंजीर. फतेहुल्लाखानाचा मेहुणा मीर इस्माईल याला अजमरखान ही पदवी देण्यात आली. त्यालाही धनुष्यबाण देण्यात येऊन त्याला फतेहुल्लाखाना बरोबर जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

मरहूमखान जहानबहादुर याचा मुलगा नसीरीखान याची मन्सब काढून घेण्यात आली होती. आपण निरपराध आहोत अशी त्याने विनंती केली. बादशहाच्या आज्ञेने तो त्यांना भेटला. त्याला एक हजार जात व चारशे स्वार अशी मन्सब देण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की 'हमीदुद्दीन खानबहादुर याजसाठी एक घोडा, मुहंमद अमीनखान याजसाठी एक खंजीर व राजा जयसिंग याजसाठी कलगीव-तुरा शिरपेचही देण्यात यावी.' मोर्चे लावण्यासाठी मी त्यांना उद्या खेळण्याकडे

पाठवीत आहे असे बादशहा म्हणाले. जयसिंग (भावी सवाई जयसिंग, जयपूर) याला हमीदुद्दीनखान बहादुर याजबरोबर तैनात करण्यात आले.

हमीदुद्दीनखान याच्याकडे दिवाणेखासची दारोगागिरी (व्यवस्था) होती. त्या जागेवर नायब म्हणून खानाजादखान याला नेमण्यात आले.

बादशहांना कळविण्यात आले की फतेहुल्लाखानाच्या पथकांतील माणसे औरंगाबादेहून बंदुकीची दारु व सरब घेऊन येत आहेत. संरक्षक पथक पाठवून त्यांना छावणीत आणावे अशी आज्ञा झाली.

छावणीतील व्यापारी, सराफ इत्यादींनी मोर्चे तयार करण्यासाठी प्रत्येकी एकेक मजूर (कामगार) पुरवावा अशी आज्ञा झाली होती. ती मजूर माणसे निष्कांचन असल्यामुळे त्रस्त आहेत असे कळविण्यात आले. बादशहांनी आज्ञा केली की वरील मजूरांना मजूरीचे पैसे खजिन्यांतील जिझियाच्या रकमेतून देण्यात यावे. मजूरांना कोणीही त्रास देऊ नये.

अजीजखान रोहिला हा अटक (सिंधुनदीवर) होता. त्याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले– 'मी विपन्न स्थितीत आहे. आज्ञा होत असेल तर हुजुरात येईन.' बादशहांनी आज्ञा केली की 'यावे व बरोबर एक हजार स्वार आणावे.' अजीजखानासाठी आज्ञापत्रे व खिलतीची वस्त्रे रवाना करण्यात आली.

तेवीस डिसेंबर– हमीदुद्दीनखान बहादुर यास आज खेळणा (विशाळगड जिंकण्या-साठी निरोप देण्यात आला. काही सांगण्यासारखे असल्यास त्याने हुजुरात येत जात राहावे अशा अर्थाची त्याला परवानगी देण्यात आली. राजाजयसिंग याला दोन हजार रुपये किमतीचा भाला, फत्तेहुल्लाखान याचा पुतण्या याला एक खंजीर, सिद्दी याकूत याला एक तलवार, दक्षिणच्या हशमाचा जमादार हिंदाल याला एक कट्यार अशी बक्षीसे देण्यात आली. हिंदालला मुनीमखानाच्या मोर्च्यात तैनात करण्यात आले.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'नरकवासी संताजी (घोरपडे) यांचा मुलगा राणू (राणोजी) हा कऱ्हाडच्या भागात धामधूम करीत आहे. छावणीसाठी धान्याची रसद येत होती तिला त्याने घेरले आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की 'कऱ्हाडचा ठाणेदार यासीनखान याला हुजुरात येण्याचा हुकुम देण्यात आला होता. तो हुकुम स्थगित करा' बादशहांनी गनिमांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी मुहंमद अमीनखान याला (कऱ्हाड-कडे) रवाना केले. त्याच्याबरोबर इखलासखान मियाना, त्याचा पुतण्या मियाना-खान, जफरखानाचा मुलगा मामूरखान यांना देण्यात आले.

मुहंमद आकिल कंबू याला पाईने विलायत (वाई प्रांत) चा दिवाण म्हणून नेमण्यात आले होते. तो हुकुम रद्द करून त्याला फतेहुल्लखानाच्या विनंतीवरून त्याच्या मोर्च्यांत तैनात करण्यात आले.

मफतूहगड (चंदनवंदन) चा किल्लेदार फिरंगोजी (फलटणकर) याने पुढीलप्रमाणे विनंती केली.

१) मला स्वारीसाठी घोडा नाही. दोन घोडे देण्यात यावेत. चौकशी करून कळवावे अशी बादशहाची आज्ञा झाली.

२) माझ्या सनदा दुरुस्त करून देण्याची आज्ञा देण्यात यावी. विनंती मान्य करण्यात आली.

चोवीस डिसेंबर – बक्षीउलमुल्क बहरामंदखान हा आजारातून बरा होऊन बादशहाना भेटला.

शहाजादा बेदारबख्त, व जुल्फिकारखान यांच्या नांवे आज्ञापत्रे रवाना झाली.

पाईने विलायत (वाई प्रांत) चा ठाणेदार इस्माईलखान मका याच्या नांवे बादशहाच्या आज्ञेने व फतेहुल्लाखान याच्या शिफारसीने आज्ञापत्र (हस्बल् हुकुम) रवाना झाले. तुमच्या भागांत चोर (मराठे) पसरले तर तुम्ही त्यांचे पारिपत्य करावे, अशी आज्ञा त्याला करण्यात आली. हे आज्ञापत्र अब्दुल्लाबेग गुर्जबर्दाराच्या हस्ते पाठविण्यात आले.

मुहंमदाबाद बीदर येथील सुभेदार खुदाबंदाखान याला दोन हजार जात व चवदाशे स्वार अशी मन्सब होती. त्यापैकी पांचशे जात व पांचशे स्वार यांना कांही अटी लागू होत्या त्या अटी काढून घेण्यात आल्या.

औरंगाबाद सुभ्याचा सुभेदार लत्फुल्लाखान (भावी निजामुल्मुल्काचा मामा आणि शहाजहानकालीन वजीर सादुल्लाखान याचा मुलगा) याचा मुलगा मुहंमद खलील याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. व त्याला इनायतखान ही पदवी देण्यात आली.

छावणीतील गंजाचा (बाजार) करोडी इमामुद्दीनखान याची पदवी काढून घेण्यात आली. शेख हिदायत केश याला तरबियत खानाच्या फौजेचा वाकनीस म्हणून नेमण्यात आले. चीन कुलीजखानाची आजी (भावी निजामुल्मुल्काच्या बापाची सावत्र आई) वारली म्हणून त्याच्याकडे शोकवस्त्रे पाठविण्यात आली.'

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली.

नरकवासी संता (संताजी घोरपडे) याचा मुलगा राणोजी हा बादशाही छावणीपासून चार कोसावर मलकापूरच्या दिशेने चालून आला. मलकापूरचा

ठाणेदार जमशीदखान याने त्याच्याशी युध्द केले. शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. बादशाही फौजेतील कांही माणसे कामी आली. जमशीदखानाचे निकटचे आप्तहि जखमी झाले. युद्ध अद्याप चालू आहे. जमशीदखानाजवळ सैन्य फार थोडे आहे. व चोराचे (मराठ्यांचे) सैन्य मोठे आहे. जमशीदखानाला कुमक पाठविण्यात आली तर बरे होईल. नाहीतर जमशीदखान मारला जाईल. बादशहांनी आज्ञा केली की जमशीदखानाच्या कुमकेला मुहंमद अमीनखान, राजा जयसिंग व राजा अवधूतसिंग यांनी ताबडतोब जावे. त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली. याच वेळी बादशहांना कळविण्यात आले की जमशीदखानाला कुमक पोहोचण्यापूर्वीच शत्रू पळून गेले होते.

पंचवीस डिसेंबर– काल बादशहा हे जुम्लतुल्मुल्क असदखान यास म्हणाले. 'तयार रहा. मी तुम्हाला खेळणा (विशाळगड) गडच्या पलीकडच्या बाजूकडे पाठवीत आहे.

नांदगिरीचा किल्लेदार अंकोजी (वणगोजी निंबाळकर फलटणकर ?) याला एक घोडा देण्यात आला. व त्याला फतेउल्लाखानाच्या मोर्च्यावर पाठविण्यात आले.

बादशहांनी आज्ञा केली कीं बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान व बक्षी उल्मुल्क बहरामंदखान यांनी पाळी पाळीने कही आणण्यासाठी जावे.

काल बादशहाच्या आज्ञेप्रमाणे इनायतुल्लाखान हा खेळणा (विशाळगड) किल्ल्याचे मोर्चे पाहून आला.

सव्वीस डिसेंबर– आज बादशहांनी पंतप्रधान जुम्लतुल्मुल्क असदखान यास अमीरुलउमरा ही पदवी दिली, आणि फातेहाखैर पढून त्याला खेळणागड जिंकून घेण्यासाठी म्हणून जाण्यास निरोप दिला. त्याच्या पाठीवर हात ठेवून बादशहा म्हणाले 'आजची मजल पहिली समजा. उद्या शुक्रवार आहे. परवा शनिवारी किल्ला घेण्यासाठी जाण्यास निघा.' जुम्लतुल्मुल्क असदखान याने नम्र अभिवादन केले.

काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे– 'राणोजी (घोरपडे) याने बादशहाच्या छावणीपासून एक कोसावर बंजाऱ्यांचे बैल लुटून नेले' बादशहांनी आज्ञा केली की 'सियादतखान, बक्षी उल्मुल्क, रुहुल्लाखान व मन्सूर खान यांनी तातडीने जावे आणि शत्रूचे पारिपत्य करावे.' त्याप्रमाणे वरील सरदार गेले. पण ते पोहोचण्यापूर्वीच शत्रू पळून गेला होता. सरदार मंडळी मध्य रात्रीच्या सुमारास आपापल्या तंबूत परतली ही गोष्ट बादशहांना कळविण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की, 'मुहंमद अमीनखान हा चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी गेला आहे. त्याला परत बोलावून घ्या. छावणीतील घोडे ब्रह्मपुरीच्या तळावर पोहोचवायचे आहेत.

मुखलिसखानाच्या सैनिकांची पगारबाकी पाच हजार रुपये आहे असे रुहुल्लाखान याने कळविले. बादशहांनी आज्ञा केली की यासंबंधीचा तपशील त्या सैनिकांचा दारोगा मतलबखान याने सादर करावा.

सत्तावीस डिसेंबर– काल फतेहुल्लाखान बहादुर व हमीदुद्दीनखान बहादुर यांनी अजीजबेग वगैरे दोन मन्सबदार यांच्याद्वारे पुढील हकीकत कळविली–

'मराठ्यांनी खेळणागड (विशाळगड) च्या अलिकडे एका टेकडीवर भिंती उभारल्या व तेथे त्यांनी तळ दिला होता. आम्ही स्वार होऊन जवळ पोहोचलो. युद्ध झाले. शत्रूपैकी सुमारे दिडशे माणसे ठार अगर जखमी झाली. शत्रू पळून किल्ल्याच्या पायथ्यापाशी गेले. आमचे पन्नास सैनिक ठार अगर जखमी झाले. मुनीमखानाचा स्वारीचा घोडा मारला गेला.' बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली. मजूरा झाला.' खंजीर व फर्मान फतेहुल्लाखानाला, व जमदाड व फर्मान हमीदुद्दीन खान बहादुर याला शंभर मोहरांच्या किमतीचा घोडा मुनीमखानाला, व जवाहिरे राजा जयसिंग याला अशा वस्तू पाठविण्याची आज्ञा झाली.

अठ्ठावीस डिसेंबर– काल बादशहांना कळविण्यात आले की तिसरा बक्षी अब्दु-र्रहमानखान वारला. त्याचा पुतण्या कजलुल्लाखान, दुसरा पुतण्या मीरमूसा. अब्दुर्रहमानचा नातू व अब्दुसुभानचा मुलगा मुहंमद इब्राहीम इत्यादींचे बादशहांनी सांत्वन केले.

फतेहुल्लाखानाकडे मुदपाकखान्यांतून खास भोजनाची ताटे पाठविली जावीं अशी आज्ञा झाली.

बादशहांना कळविण्यात आले की बक्षीउल्मुल्क बहरामंदखान मतलबखान मतलबखान वगैरे सरदार व सैनिक काही आणण्यासाठी सायसी (?) या गावाकडे गेले आहेत. बादशहानी आज्ञा केली की अमानुल्लाखानाने पण त्यांच्या बरोबर जावे, तो परत हुजुरांत आला की छावणीतील घोडे तळावर (ब्रम्हपुरी) पाठविण्याचे काम त्याला देण्यात येईल.

मन्सूरखान मल्कापूरची गढी तयार करण्यासाठी गेला होता. त्याने बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याजबरोबर जावे अशी आज्ञा झाली.

बादशहाना कळविण्यात आले की आज्ञेप्रमाणे बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान हा खेळणागडाचे (विशाळगड) मोर्चे पाहण्यासाठी गेला आहे

माहुलीचा किल्लेदार जैनुद्दीन अलीखान याची मन्सब वाढविण्यात आली.

एकोणतीस डिसेंबर– रुहुल्लाखान हा किल्ल्याचे मोर्चे पाहून आला. रात्री येऊन त्याने बादशहांना पुढील माहिती दिली–

फतेउल्लाखान हा किल्ल्याच्या दरवाजापासून तीन साखळी अंतरापर्यंत पोहोचला आहे. त्याची विनंती आहे की माझ्या पथकांतील लोकांवर कृपा व्हावी. मी थोडक्याच काळात किल्ला जिंकून घेईन.' त्याची विनंती मान्य करुन बादशहांनी पुढील इसमांच्या मन्सबीत वाढ केली. बसालतखान, नेमतुल्लाखान, अब्दुल्गफार हाशमबेगचा मुलगा मिर्जाबेग, मुहंमद रजा, साबरबेग, मुहंमद जमान, दौलतबेग. बादशहा म्हणाले 'फतेहुल्ला खानाच्या पथकांतील एकशे आठ इसमांना मन्सबीची योग्य बढती देण्यात यावी.'

मुहंमद अमीन हा राणोजी (घोरपडे) च्या पारिपत्यासाठी गेला होता त्याने मुहंमद यूसफ आदी आठ मोगलांबरोबर सहा मराठ्यांची कापलेली डोकी पाठविली. आपल्या वृत्तांतात त्याने लिहिले की 'मी आणले बाजार बुणगे कऱ्हाड-जवळ राजा अवधूत सिंग याजपाशी ठेवले व मी स्वत: राणोजीच्या पाठलागावर निघालो कासेगाव जवळ युध्द झाले. राणोजी बरोबर असलेले सहा सरदार यांची डोकी कापली. शत्रूपैकी अनेकांना जखमी केले. शत्रूचा पराजय झाला चारहजार गुरेढोरे व उंटही शत्रूच्या तावडीतून सोडवून घेण्यात आले. पन्नास घोडे, छत्र भाले वगैरे शस्त्रे ही लूट गाजीना मिळाली.

बादशहा म्हणाले 'कापलेली डोकी नायब कोतवालाच्या हवाली करा' डोकी आणणारा मुहंमद यूसफ यांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

फतेहुल्लाखानाच्या पथकात पगार वाटप म्हणून रहीमुन्रहमान याने दीड लाख रुपये फतेहुल्लाखानाच्या मोर्च्यात नेऊन पोहचवावे अशी आज्ञा झाली.

तीस डिसेंबर – मुहंमद अमीनखान याने विनंती लिहून पाठविली की ' राणोजी (घोरपडे) याशी झालेल्या युध्दात माझ्या पथकांतील लोकांनी फार मेहनत घेतली कृपा व्हावी ' यावर बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान याने चौकशी करुन प्रत्येकाचा हुद्दा कळवावा अशी आज्ञा झाली.

बादशहाना कळविण्यात आले की काल जुम्लतुलमुल्क अमीरुल उमरा असदखान हे खेळण्याच्या (विशाळगड) मोर्च्यावर गेले होते. त्यानी फतेहुल्लाखान वगैरेना अधिक झटण्यासाठी सूचना दिल्या आहेत. बादशहा म्हणाले 'असेच व्हायला हवे '

तळावर (ब्रम्हपुरी) तैनात असलेल्या हरकाऱ्याकडून कळले की गाजिउद्दीन बहादुर फीरोजजंग याने धान्याने लादलेले साठ हजार बैल बादशाही छावणीसाठी रवाना केले आहेत. त्याना संरक्षक पथक (बदर्का) देण्यासाठी शहाजादा बेदारबख्त याला लिहावे अशी आज्ञा झाली.

उंट व बैल यांना चारण्यासाठी मुर्तजाबादे (मिरज)कडे पाठवावे अशी आज्ञा झाली.

एकतीस डिसेंबर– बादशहाजादा मुहंमद कामबक्ष हा आजारी होता. तो बरा होऊन बादशहांना भेटला. कही आणण्यासाठी गेलेली पुढील मंडळी बादशहाना भेटली– बहरामंदखान, मन्सूरखान, सय्यदखान, अमानुल्लाखान व मतलबखान.

कऱ्हाडचा ठाणेदार यासीनखान याने कळविले की 'राणोजी (घोरपडे) याने दहा हजार सैन्यासहित चाल करून येऊन बादशहापूर जाळून फस्त केले. यानंतर त्याने दोन किल्ल्यामधील गढीला वेढा घातला. तेथील किल्लेदार सत्रपाल (सत्रसाल) हा तोफांचा मारा करीत आहे.' बादशहांनी आज्ञा केली की, 'मुहंमद अमीनखान तिकडे गेला आहे. तुम्ही पण कऱ्हाडहून शत्रूचे पारिपत्य करण्यासाठी जा.'

काल हमीदुद्दीनखान बहादूर हा आज्ञेप्रमाणे मोर्चे पाहून आला. त्याने फतेहुल्लाखानाच्या कामाची तारीफ केली. त्याला आज खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

दादप्रभु हा खान नुसरतजंग याच्या फौजेत तैनात होता तो बादशहांना भेटला. त्याने एक मोहोर व नऊ रुपये निसार व नजर पेश केली. रुहुल्लाखानाने विनंती केली की 'हे (दादप्रभू) येथील इलाख्याचे उत्कृष्ट माहीतगार आहेत.' बादशहा म्हणाले 'यांना घोडा व खिलतीची वस्त्रे द्या. यांना आमच्या छावणीतच राहू द्या.'

विशाळगडच्या समोर : ६

जानेवारी १७०२

एक जानेवारी - फतेहुल्लाखान बहादुर याला अडीच हजार जात व आठशे स्वार अशी मन्सब होती. तीत दोनशे स्वारांची वाढ करण्यात येऊन त्याला एक ध्वज देण्यात आला.

मुहंमद अमीनखान (निजामुल्मुल्काचा चुलत चुलता, गजिउद्दीन फीरोज जंग याचा चुलत भाऊ, मोगल साम्राज्याचा भावी पंतप्रधान) याने राणोजी (घोरपडे) वर जय मिळविला होता. त्याला तीन हजारी जात व आठशे स्वार अशी मन्सब होती. तीत दोनशे स्वारांची वाढ करण्यात येऊन फतेहुल्लाला ध्वज देण्यात आला.

इस्माईलखान हा पाईने विलायत (वाई प्रांत) चा ठाणेदार होता. त्याने पुढीलप्रमाणे लिहून कळविले-'मी कोलगड (गोलगड ?) चा किल्ला जिंकून घेतला आहे. तेथे कुणाची तरी किल्लेदार म्हणून नेमणूक व्हावी.' बादशहांनी आज्ञा केली की किल्लेदारी इस्माईलखानाच्या अधिकारातच राहू द्या.'

उस्मानखान करावल याने बादशहांना कळविले की 'येथून (हुजुरातून) खेळणागड (विशाळगड) च्या मोर्च्यापर्यंत अंतर तीन कोस दहा जरीब (साखळी) इतके आहे,'

खानजहान (दिवंगत) च्या पथकाचे मुख्यपद (दारोगा) मतलबखानाच्या ऐवजी मुनीमखान (मोगल साम्राज्याचा भावी पंतप्रधान) याला देण्यात आले.

असदखान जुम्लतुलमुल्क अमीरुल उमरा (मुख्यप्रधान) याने कळविले की 'मी फतेहुल्लाखानाला एक घोडा व खंजीर, राजा जयसिंग याला तलवार व मुनीमखान याला खिलतीची वस्त्रे देऊ इच्छितो.' परवानगी देण्यात आली.

कऱ्हाडचा ठाणेदार यामीनखान याने पुढीलप्रमाणे लिहून कळविले–

'राणोजी (घोरपडे) याच्या पारिपत्यासाठी मी यापूर्वी अब्दुर्रसूलखान मरहूम याचा मुलगा अब्दुलमजीद याला दोनशे स्वार व तीनशे पायदळ बरोबर देऊन आजमतारागड (सातारा) याच्या पायथ्यापाशी पाठविले होते. अब्दुलमजीद हा गढीत पोहोचला असून तेथे ठाण मांडून आहे. यानंतर मीही आपली पथके घेऊन येथून निघालो. जबलुल्इस्लाम (महादेवाचा डोंगर) येथे माझा नायब ठाणेदार कादरदादखान हा होता व फलटण येथे माझा नायब ठाणेदार नेमत हा होता. हे दोघेही आपापली पथके घेऊन मला वाटेत मिळाले. आमचे राणोजीशी युद्ध झाले. अनेक (शत्रूंना) जणांना ठार करण्यात आले. राणोजी हा पराभव पावून पळाला व पाईने विलायतच्या दिशेने (वाई प्रांत) निघून गेला.'

बादशहांनी आज्ञा केली की 'एक गुर्जबर्दार नेमा. त्याने मुहंमद अमीनखान याला रातोरात राणोजीच्या पाठलागावर रवाना करावे.'

दोन जानेवारी– फतेहुल्लाखान बहादुर याने मोर्च्यातून पुढीलप्रमाणे लिहून कळविले–

'आमचे मोर्चे खेळणा किल्ल्याच्या दरवाज्याजवळ पोहोचले आहेत. किल्ल्यातून मराठे सपाटून गोळीबार करीत आहेत. कातडी (पिशव्यासाठी), कजावे (पाळणवजा), जवाला (?) वगैरे सामग्री मोर्च्यासाठी हवी आहे. ती पाठवावी.' बादशहांनी आज्ञा केली की, 'दारु गोळ्याचा प्रमुख तर्बियतखान व नायब कोतवाल मुहंमद अमीन यांनी सामग्री पुरवावी'

इनायतुल्लाखान याने कळविले की– 'खालसा शरीफा (बादशहाचे खाजगी प्रदेश) चा कारभारी चतुर्भुज हा कोतवाली चबुत्र्यात कैदेत आहे. सरकारात तो एक लाख रुपायांची पेशकश (खंडणी) भरण्यास तयार आहे. आपल्याला कैदेतून मुक्तता मिळेल अशी तो आशा करून आहे.'

बादशहांनी त्याची विनंती मान्य केली आणि आज्ञा केली की 'त्याने पंचवीस हजार रुपये ताबडतोब भरावे, दोन महिन्यांनी वीस हजार रुपये भरावे. त्यानंतर महिन्या महिन्याच्या हप्त्याने त्याने उरलेल्या रकमेचा भरणा करावा. त्याला कैदेतून सोडण्यात यावे. त्याची मालमत्ता सरकारात जप्त झाली असेल तर ती त्याला परत करण्यात यावी.'

तोफा आणण्यासाठी बादशहांनी तुर्कताजखान याला कोल्हापुरला जाण्यासाठी निरोप दिला. तुर्कताज खानाबरोबर दोन हत्ती आणि दोनशे स्वार देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की 'मतलबखानाने मोर्च्यांवर जावे आणि साखळीने मोजमाप करून परत यावे.'

तीन जानेवारी – आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

चार जानेवारी – काल शबेबरातचा सण होता. बादशहांनी संबंध रात्र जागरण केले, त्यामुळे आज त्यांनी कचेरीचे काम केले नाही.

पाच जानेवारी – मतलबखान हा खेळणा (विशाळगड) किल्ल्याचे मोर्चे पाहून आला. त्याने सांगितले की 'हुजुरांपासून मोर्च्यापर्यंत अंतर साखळीच्या हिशेबाने साडेतीन कोस होते. तिकडे चलण्याविषयी काय आज्ञा?'.

बादशहा म्हणाले 'तुम्ही हमीउद्दीनखान बहादुर, खानाजादखान, रुहुल्लाखान व हकीम हाजिकखान यांनी मोर्चे पहावे व आमच्या रहाण्यायोग्य जागा पाहून यावे.'

जैसलमीरच्या राजाचा भाऊ केसरीसिंग हा चारशे जात व शंभर स्वार अशी मन्सब बाळगून होता. तो खान फीरोजजंग याच्या फौजेत तैनात होता. तो दोन वर्षांपासून आपल्या जहागिरीत बसून आहे असे बादशहाला कळविण्यात आले. फरारी म्हणून त्याची नोंद करण्यात यावी अशी आज्ञा झाली.

विजापूर सुभ्यात तैनात असलेल्या हरकाऱ्याने पुढीलप्रमाणे वृत्तांत पाठविला– 'मराठ्यांचे सैन्य तेरदळच्या भागात पसरले होते. ते चौथाई वसूल करीत होते. खान फिरोजजंग याचा नायब सरअंदाजखान याने एकोजी घोरपडे याला सैन्य देऊन तिकडे पाठविले. एकोजी सैन्यासहित तेरदळ जवळ पोहोचला. मराठ्यांशी त्याचे युद्ध झाले. हातघाईची लढाई झाली. बाण व बंदुकी यांचा वापर झाला. शत्रूपैकी अनेकांना ठार करण्यात आले. शत्रूचा पराजय झाला. अडीचशे घोडे व शस्त्रे हाती लागली.' बादशहा म्हणाले 'मजुरा झाला. सेवा मान्य झाली.'

मलकापूरचा ठाणेदार जमशीदखान हा चार हजारी मन्सबदार होता. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

रामगीर (आता करीमनगर जिल्हा, आंध्र प्रदेश) च्या किल्लेदारीवर अब्दुर्रहमानच्या ऐवजी सय्यदजीवन याची नेमणूक करण्यात आली.

सहा जानेवारी– आज कचेऱ्या बंद होत्या. दिवसाच्या शेवटी मुहंमद अमीनखान हा राणोजीचे पारिपत्य करून हुजुरात आला आणि बादशहांना भेटला.

सात जानेवारी– दंडराजपुरीचा फौजदार व किल्लेदार सिद्दी याकूतखान याने रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) याचे पारिपत्य केले म्हणून याकूतखानाचा वकील बनारसीदास याला एक शाल बक्षीस देण्यात आली.

बादशहांनी काल सूर्यास्ताच्या सुमारास अमानुल्लाखान याला शेरदहान (व्याघ्रमुख) तोफ घेऊन येण्यासाठी कोल्हापूर व बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) या स्थळाकडे जाण्यासाठी निरोप दिला.

बुऱ्हाणपूर सुभ्याच्या बातम्यांवरुन कळले की 'बुऱ्हाणपूरचा दिवंगत सुभेदार नजाबतखान याचा दिवाण अनूपराम हा पांचशे स्वार व चारशे पायदळ बरोबर बाळगून येथे सावधगिरीने बंदोबस्त राखीत आहे.'

काल रात्री बादशहांनी रुहुल्लाखान व मुहंमद अमीनखान यांना बोलावून त्यांच्याशी खलबते केली. यानंतर बादशहांनी मुहंमद अमीनखान यास साडेतीनशे रुपये किंमतीच्या दोन रत्नखचित अंगठ्या दिल्या व राणोजी (घोरपडे) याच्या पारिपत्यासाठी पाईने विलायत (वाई प्रांत) च्या दिशेने जाण्यासाठी त्याला निरोप दिला. मुहंमद अमीन खान याजपाशी पूर्वीपासून चार हजार स्वारांचे सैन्य होते. बादशहांनी प्रतापजी, राजा नेकनाम, शाकिरखान विजापुरी यांना त्यांच्या पथकासहित अमीनखानाबरोबर तैनात केले. याशिवाय बक्षी उलमुल्क बहर मंद खान याच्या पथकांतील चारशे स्वार अमीनखानाकडे देण्यात आले. यामुळे पूर्वीचे चार हजार स्वार यांना जोडून एक हजार एकशे चौऱ्याण्णव स्वार अमीनखानाकडे तैनात झाले. त्यांना मुद्दाम अधिकाऱ्यांच्या द्वारे अमीनखानाकडे पोहोचवावे अशी तरबियत खानाला आज्ञा करण्यात आली.

तळावरील (ब्रह्मपुरी) हरकाऱ्याने पुढीलप्रमाणे बातमी पाठविली.

'खान फीरोजजंग याचा भाऊ हामिदखान हा गनिमांचे (मराठ्यांचे) पारिपत्य करण्यासाठी औरंगाबादच्या दिशेने रवाना झाला. भूम व चौसाळा या स्थळाजवळ मराठ्यांशी युद्ध झाले. शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. शत्रूचा पराजय झाला. त्याची शस्त्रे, नौबती नगारे, ध्वज वगैरे लूट हाती लागली. या युद्धात नजीरखानाचा मुलगा व खान फीरोजजंग याचे शंभर स्वार जखमी झाले.

बादशहा म्हणाले "मजुरा झाला. सेवा मान्य झाली.' बादशहांनी आज्ञा केली की अमानुल्लाखान याजबरोबर चारशे स्वार व पन्नास बर्कंदाज (बंदुकची) तैनात करण्यात यावेत.

यार अलीबेग याने विनंती केली की तिसरे बक्षी वारल्या तारखेपासून त्या खात्याचे कागद तसेच पडून आहेत. बादशहा म्हणाले 'पूर्वी दोनच बक्षी होते. काम बंद पडले नव्हते. आताहि काम चालू राहावे.'

गदगचा फौजदार शेरखान याने श्रीरंगपट्टणचा जमीनदार याच्याकडून आलेली पेशकश (खंडणी) हुजुरात आणावी म्हणून त्याला लिहिण्यात यावे अशी रुहुल्लाखान याला आज्ञा करण्यात आली.

आठ जानेवारी – काल हमीदुद्दीनखान बहादूर व मतलबखान हे बादशहांना रहाण्यायोग्य जागा निवडण्यासाठी म्हणून खेळणा (विशाळगड) किल्ल्याजवळ गेले होते. त्यांनी येऊन सांगितले की 'शहाजादा बेदार बख्त याचा तंबू ज्या ठिकाणी होता तीच जागा आम्ही निवडली आहे. साबर जशी आज्ञा.'

बादशहा म्हणाले 'सहा शामियाने व कनाती व एक राहुटी उद्या येथून घेऊन जाऊन तेथे लावा.' फराशखान्याचा अधिकारी मुहंमद जमान याने आज्ञेप्रमाणे पेशखाना (पुढील मुक्कामासाठी पाठवायचे तंबू) पुढे पाठविला.

फतेह दौलत कोल हा खेळण्याच्या मोर्च्यांवरुन आला. त्याने सांगितले 'की फतेहुल्लाखान बहादूर याचे मोर्चे किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ पोहचले आहेत.'

बादशहा म्हणाले 'आफरीन बाद धन्य, धन्य, लवकरच किल्ला फत्ते होईल. (किल्ला हाती येण्यास सहा महिने लागले)

बादशहा हे बक्षीउलमुल्क बहरामंदखान याला म्हणाले 'आमच्यापाशी छावणीत किती सैन्य आहे याचा तपशील (तूमार) मला दाखवा.'

तरबियतखानाला आज्ञा झाली की 'उद्या वाटेवर बंदुकच्यांचे पहारे बसवा,

हरकारा हा खान नुस्रतजंग यांच्या नावे बादशहाचे फर्मान घेऊन गेला होता. ते पोहचवून तो परत आला. त्याने सांगितले की 'मी फर्मान पोहोचविले खान नुस्रतजंग (जुल्फिकारखान) याचा मी गुलबर्ग्यात निरोप घेतला. धनाजी जाधव हा उदगीर भागात होता.

तिसरा मीर तुजक (शिष्टाचाराचा अधिकारी) यक्का ताजखान याला ढाल तलवार व खंजीर ही बक्षीस म्हणून देण्यात आली.

सतरा जानेवारी – बादशहांना कळविण्यात आले की 'दौलत खान्याची (निवास स्थानाची) जागा फार लहान व अडचणीची आहे दौलत खान्याच्या पुढील जल्लखान्यासाठी जागा नाही. बादशहांनी रुहुल्लाखानाला निवासस्थानासाठी आणखी एखादी जागा पाहून येण्यास सांगितले. रुहुल्लाखान, बादशहाजादा मुहंमद कामबक्ष व बहरामंदखान यांनी जागा पाहून विनंती केली की 'जेथे खाशाचे (खासगी) तंबू आहेत ती जागा दौलतखान्याला योग्य आहे. पण ती येथून दहा साखळी अंतरावर आहे. बादशहा म्हणाले 'ठीक आहे मागे राहिलेले तंबू बोलावून घेऊन उभे करा.'

एकोणीस जानेवारी– आज रमजान महिन्याला सुरुवात झाली. बादशहाच्या कारकिर्दीचे सेहचाळिसावे वर्ष सुरु झाले. बादशहाजादा कामबक्ष

सुल्तान बुलंद अख्तर, खानाजादखान व हमीदुद्दीनखान बहादुर यांनी बादशहाकडे येऊन त्यांचे नम्रपणे अभिनंदन केले.

बीस जानेवारी– मीर अजीमुल्ला यसावल (लष्करातील कनिष्ठ अधिकारी) हा तळावरून (ब्रह्मपुरी) चारशे पंचाण्णव बेलदार व सक्का यांना घेऊन आला. त्याने बादशहाची भेट घेतली. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली– 'मुहंमद अमीनखान हा सैन्य घेऊन (तो अंबाघाटावरून कोकणात उतरला होता।) मराठ्यांवर चालून गेला. त्याने मराठ्यांच्या पायदळ सैन्याला मार देत माचाळच्या टेकडीवरून ढकलीत कोकणी दरवाज्याच्या दिशेने एक बाण अंतरावर नेऊन घातले. शत्रूपैकी अनेक जण जखमी झाले. मोगलांनी दोन मराठ्यांची डोकी कापली. पन्नास मराठ्यांना पकडले व दोनशे गुरेढोरे हस्तगत केली. मुहंमद अमीनखान तेथे ठाण मांडून आहे. मराठ्यांचे पायदळ सैन्य काही अंतरावर असून युध्द चालू आहे.'

बादशहा म्हणाले 'मजुरा झाला. सेवा मान्य झाली.'

एकवीस जानेवारी– मुहंमद अमीनखान याने पुढील वृत्तांत पाठविला–

'खेळणागड (विशाळगड) च्या कोकणी दरवाज्याच्या दिशेने चोरांच्या (मराठ्यांच्या) सैन्याबरोबर युद्ध चालू आहे. माझ्याशी थोडे सैन्य आहे. मराठ्यांचे पायदळ सैन्य मोठे आहे. मला कुमक पाठविण्यात येईल व तोफांचा सरंजाम देण्यात येईल अशी आशा आहे.'

बादशहांनी पुढील प्रमाणे आज्ञा केली.'

'मतलबखानाने लवकर निघावे.' बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर व मन्सूरखान यांना बोलाविले. मुहंमद अमीनखानासाठी एक ध्वज देण्यात आला. बादशहा हमीदुद्दीन खानाला म्हणाले 'हा ध्वज तुम्ही मतलबखानाच्या तंबूवर पाठवा. मतलबखान तो ध्वज बरोबर नेऊन मुहंमद अमीनखानाला देईल. मतलब खानाबरोबर पांच रेहकले (लहान तोफा) बाण, सरब बारुत (बंदुकीची दारु), बेलदार, तबरदार, सक्का इत्यादी देण्यात यावेत. ते मुहंमद अमीन खानाच्या मोर्चात देण्यात यावेत. मतलबखानाने अंबाघाटाची पाहणी करावी. तोफा तिकडून नेण्याचे पाहावे. कारण शेरदहान (व्याघ्रमुख) तोफ मुहंमद अमीनखानाकडे पाठवायची आहे.'

दंडराजपुरीचा फौजदार सिद्दी याकूतखान याने मुहंमद अमीनखानाला लवकर मदत पाठवावी अशा अर्थाची आज्ञा पाठविण्यास बक्षी उलमुल्क बहरामंद-खानः याला हुकूम देण्यात आला.

उस्मानखान करावल व मुहेल नाझर हे बादशहाच्या हुजुरातून मोर्च्यां-पर्यन्तचे अंतर मोजण्यास गेले होते. त्यानी येऊन सांगितले की 'बादशहाच्या निवासस्थानापासून जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा असदखान (मुख्यप्रधान) यांचा तंबू एक कोस वीस साखळी अंतरावर आहे. तेथून आपले मोर्चे पाव कोसाच्या अंतरावर आहेत.

श्रीरंगपट्टणच्या अमीनदाराकडून आलेली खंडणी घेऊन पादगचा फौजदार शेरखान जमशीद याला हुजूरात घेऊन यावे म्हणून एक गुर्जबर्दार (अंमलबजाव-णीचा अधिकारी) पाठवावा अशी आज्ञा झाली.

दोन जऱ्राह (सर्जन, जखमा बरे करणारे) व हाडे बसविणारे यांना मुहंमद अमीनखान याजकडे पाठवावे अशी आज्ञा झाली.

बेडर (बेरड?) जमातीचा प्रमुख धर्मा हा चाकरीच्या आशेने पाईने विला-यत (वाई प्रांत)चा ठाणेदार इस्माईलखान मका याच्या मध्यस्थीने बादशहाकडे येऊ पहात होता. त्याला देण्यासाठी म्हणून खिलतीची वस्त्रे इस्माईलखानाकडे पाठविण्यात आली.

इंद्रसिंग व बहादुरसिंग हे बादशहाजादा मुहंमद आज्जम याजपाशी तैनात होते. त्यांना हुजूरात बोलावून घेण्यात यावे अशी आज्ञा झाली.

बावीस जानेवारी – रमजानचा महिना. आज कचेऱ्या बंद होत्या.

तेवीस जानेवारी – आज कचेऱ्या बंद. हर ा यांच्या तोंडून पुढील बातमी कळली– 'फतेहुल्लाखानाचे मोर्चे आता किल्ल्याच्या खंदकाला लागून असलेल्या रेवणी बुरुजापर्यंत पोहचले असून किल्ला थोडयाच काळात फत्ते होईल.

चोवीस जानेवारी – आज हमीदुद्दीनखान बहादुर याने पंधरा लावे पक्षी व बारा दुऱ्राज (चित्रपक्षी) यांची शिकार करुन, केलेली शिकार बादशहाला दाखविली.

बादशहांनी खालशाचा दिवाण इनायतुल्लाखान याला विचारले 'बंगालच्या या पुर्वीच्या सुभेदारांपाशी किती शिबंदी (पायदळ) असे आणि आताचा सुभेदार शहाजादा अज़ीमुश्शान याच्याकडे किती आहे?'

बादशहाजादा मुहंमद मुअज्जम बहादुरशहा याचा मीरबख्शी अब्दुलकयूम-खान याला बदलण्यात येऊन त्याला हुजुरात बोलवावे अशी आज्ञा झाली.

तळावर (ब्रम्हपुरी) असलेला हरकारा केशोराम याने काल पुढीलप्रमाणे लिहून पाठविले– 'गाजिउद्दीनखान बहादुर फीरोजजंग याने येथील गंजाच्या (बाजाराच्या) दारोग्याला (प्रमुख अधिकाऱ्याला) बोलावून त्याला सांगितले

धान्याची रसद हुजुरात (बादशाही छावणीत) पाठवा' यावर तो अधिकारी म्हणाला 'धान्य थोडेसेच गोळा झाले आहे. शेवटी चहूकडून रसदीसाठी धान्य गोळा करावे म्हणून खान फिरोज जंग याने अधिकारी नेमले.'

तळावर (ब्रह्मपुरी) असलेला हरकारा केशोराम याने पुढीलप्रमाणे कळविले–

'दिलेरखान याने धान्याची रसद मुर्तजाबाद (मिरज) पर्यंत पोहोचविली असून तो फीरोजजंगच्या छावणीकडे आपल्या तैनातीच्या जागेकडे येत आहे. ही बातमी ऐकून खान फीरोजजंग याने त्याला लिहिले की 'चोरांचे (मराठ्यांचे) पारिपत्य करून या.'

गोविंदराव हरकारा हा मुहंमद अमीनखान याजपाशी तैनात होता. त्याने पुढीलप्रमाणे लिहिले– 'किल्ले खेळणा (विशाळगड) च्या कोकणी दरवाज्याच्या दिशेने माचाळची टेकडी आहे. तेथे पाणी नाही. विहिरी खणण्यासाठी बेलदार व तबरदार लागतील.' बादशहा म्हणाले 'आम्ही आमचे बेलदार व तबरदार यांना या कामासाठी नेमतो.'

मीर आतिश (दारुगोळ्याचा अधिकारी) तरबियतखान हा आज्ञेप्रमाणे अंबाघाटावरून आला आणि बादशहांना भेटला. बादशहांनी त्याला परत अंबाघाटकडे जाण्यास निरोप दिला.

पंचवीस जानेवारी– मुहंमद अमीनखान याजपाशी तैनात असलेला हरकारा गोविंदराव याचा गुमाश्ता याने पुढील हकीकत कळविली–

'हरजैतपरी (जैतापूर तर नव्हे) या कोकण किनाऱ्यावरील बंदरातील दादहसन वगैरे सहा जमीनदार हे मुहंमद अमीनखानाला भेटले. ते म्हणाले 'आम्ही बादशहाची प्रजा आहोत. कौल करार करून द्यावे व अभय मिळावे. आम्ही पूर्वीप्रमाणे नांदू आणि हुजुरात धान्याची रसद पोहोचती करू.' मुहंमद अमीनखान याने त्यांचे समाधान केले. त्यांना कौल दिला, त्यांना एकेक शाल आणि इतर वस्तू भेट म्हणून दिल्या आणि त्यांना म्हटले 'तुम्ही खुशालीने नांदा. ही बातमी ऐकून बादशहांना आनंद झाला. त्यांनी मुहंमद अमीनखानाचे कौतुक करण्यासाठी त्याच्याकडे पत्र पाठविण्यात यावे अशी यार अलीबेग यास आज्ञा केली.

ख्वाजा मुहंमद अमीन हा काबुलचा सुभेदार बादशहाजादा मुहंमद मुअज्जम बहादुरशहा याचे पत्र घेऊन आला. तो बादशहांना भेटला. तो म्हणाला बहादुर शहांनी पांचशे उत्कृष्ट स्वार भरती करुन त्यांना बादशहाकडे पाठविले. त्यापैकी दिडशे स्वार हुजुरात आणले आहेत. बाकीचे वाटेत उपासमारीमुळे पांगले.'

बादशहांनी मुहंमद अमीनला खिलतीची वस्त्रे दिली.

वेंकटराव हरकारा हा खेळण्याच्या (विशाळगड) मोर्चात फतेउल्लाखाना-पाशी तैनात होता. त्याने खालप्रमाणे हकीकत लिहून कळविली.

फतेउल्लाखानाचे म्हणणे असे आहे की 'मोर्च्यातील पायदळ शिपाई यांना मी खंदकावर पोहचविले आहे. मी आणखी मेहनत घेईन. आमच्या सैन्यातील फिरंगी गोलंदाज हे किल्ल्यावर तोफांचे गोळे टाकतात. पण गोळे वाऱ्यात उडाल्या सारखे उडतात (निकामी ठरतात). मोर्च्यातील बारुत (बंदुकीची दारु) व सरब हा अगदी निकृष्ट आहेत.'

बादशहांनी आज्ञा केली की मुनीमखान याने फिरंग्यांच्या बद्दल चौकशी करुन अहवाल सादर करावा.

सव्वीस जानेवारी – आज कचेऱ्या बंद होत्या. काल हमीदुद्दीनखान बहादुर ह बादशहाच्या आज्ञेने मोर्चे पाहण्यास गेला होता. ते पाहून परत आला आणि त्याने बादशहास तेथील वस्तुस्थिती निवेदन केली.

पाईन घाट (वाई प्रांत)चा ठाणेदार इस्माईलखान मका याने पाठविलेले विनंतीपत्र बादशहांनी नजरेखालून घातले.

तळावरील (ब्रम्हपुरी) हरकाऱ्याने पुढील हकीकत कळविली–

'राणोजी (घोरपडे) हा परंडा भागात हालचाल करीत होता. ही बातमी ऐकून त्याचे पारिपत्य करण्यासाठी खान फीरोजजंग याने नाहरखानाबरोबर सैन्य देऊन पाठविले. नाहरखान हा राणोजीवर चालून गेला. युद्ध झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रूपैकी अनेकजण ठार झाले. चोरांचा (मराठ्यांचा) पराजय झाला. ते पळून गेले. नाहरखान हा खान फीरोजजंग याजकडे परतला. फीरोजजंगाने त्याचे कौतुक केले. आफरीन बाद (धन्य धन्य) म्हटले आणि त्याला पानाचा विडा दिला.'

बादशहा म्हणाले 'खान फीरोजजंग याचा मजुरा झाला. सेवा मान्य झाली.'

दंडराजपुरीचा किल्लेदार व फौजदार सिद्दी याकूत याच्या नावाने फजाईल-खानाच्या शिक्क्याचे असलेले आज्ञापत्र रवाना झाले.

रुस्तमखान विजापुरी याचा मुलगा गालिबखान हा तीन हजारी मन्सबदार असून खान फीरोजजंग याजपाशी तैनात होता. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

सत्तावीस जानेवारी– काल शहाजादा मुहंमद बेदारबख्त याला आज्ञापत्र पाठविण्यात आले.

मन्सूरखानाचा मुलगा मुहंमद्द काजम यास खास चौकीचा मुश्रफ म्हणून नमण्यात आले. मन्सूरखान हा दक्षिणच्या तोफखान्याचा दारोगा असून त्याला एक हजार जात व पाचशे स्वार अशी मन्सब होती.

तरबियतखानाबरोबर दोन जजाइल (जेजाले, लहान तोफा) देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

अठ्ठावीस जानेवारी– शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

एकोणतीस जानेवारी– पंचेचाळीस हजार रुपये किमतीचा एक बाजूबंद बादशहा जादा मुअज्जम बहादुरशहा याजकडे पाठविण्याची आज्ञा झाली.

मोर्च्यात असलेला व्यंकटराव हरकारा याने कळविले की–

फतेहुल्लाखान बहादुर याचे मोर्चे खंदकापर्यंत सरकले असून त्याने कनकी (?) व धावे (बुरुजावर चढण्यासाठी पाळगेवजा वहाने) तयार करविले आहेत. इतर बाबतीतही तो कामगिरी बजावत आहे चोरांबरोबर (मराठे) युध्द चालू आहे.

मुहंमद गुल याने बादशाही छावणीतील घोडे बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) येथे शहजादा बेदारबख्त याजकडे पोचवावे. तेथून शहाजाद्याने बदर्का (संरक्षण पथक) देऊन मुर्तजाबाद मिरजेपर्यंत पोहोचवावे. तेथून खान फिरोजजंग याच्या पथकांनी तळावर (ब्रम्हपुरी) न्यावे अशी आज्ञा झाली.

मुहंमद अमीनखान याजपाशी (कोकणी दरवाज्याजवळ) तैनात असलेल्या हरकाऱ्याने पुढीलप्रमाणे हकीकत लिहून कळविली–

'मुहंमद अमीनखान याजबरोबर युध्द करावे म्हणून चोरांचे (मराठ्यांचे) पायदळ सैन्य खेळणा (विशाळगड) गडच्या कोकणी दरवाज्याच्या दिशेने ठाण मांडून होते. मुहंमद अमीनखान हा मतलबखान, ख्वाजाखान कामयाबखान, मामूरखान वगैरेना घेऊन त्यांच्यावर चालून गेला. युध्द झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रूपैकी अनेकांना ठार अगर जखमी करण्यात आले. दरवाज्याजवळ मोर्चे कायम करण्यात आले असून युध्द चालू आहे. तेथे आसऱ्या आडोशाला जागा नाही. मोगलांपैकी चार माणसे ठार झाली व त्रेपन्न माणसे जखमी झाली.

बादशहा म्हणाले 'मुजरा झाला' सेवा मान्य झाली.

तीस जानेवारी – मुहंमद अमीनखान याच्या मोर्च्यात तैनात असलेला हरकारा गोविंद याचा गुमाश्ता याने पुढील हकीकत लिहून पाठविली –

'मुहंमद अमीनखान व जमशीदखान यांनी कोकणी दरवाज्याकडे मोर्चे कायम केले असून चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी रेहकले (लहान

तोफा) मांडले आहेत. चोरांची (मराठ्यांची) संख्या मोठी आहे– युद्ध चालू आहे.'

फतेहुल्लाखानाच्या मोर्च्यात तैनात असलेला हरकारा व्यंकटराव याने पुढीलप्रमाणे कळविले– 'चोरांनी (मराठ्यांनी) किल्ल्यावरून तोफ डागली. तोफेतून एक दगडी गोळा उडाला. तो खंदकात धावे व कंकी हे होते, त्यावर जाऊन पडला. कंकी व धाव हे काहीसे जळाले आहेत. यावेळी मुनीमखान वगैरे लढण्यासाठी म्हणून पुढे झाले. ऐनवेळी तोफचा गोळा खंदकात पडला. पडताक्षणी गोळ्याचे तुकडे तुकडे झाले. ते तुकडे लागून अनेक माणसे जखमी झाली.'

एकतीस जानेवारी– अमानुल्ला याने बादशहाच्या आज्ञेप्रमाणे कोल्हापुराहून शेरदहान (व्याघ्रमुख) तोफ आणली. तो बादशहाला भेटला. बादशहा मिर्जाबेग गुर्जबर्दार याला म्हणाले 'ती तोफ खेळणा (विशाळगड) किल्ल्याच्या मोर्च्यावर पोहोचवा.'

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'राजा जयसिंग (भावी सवाई जयसिंग) हा जुम्लतुल्मुल्क अमीरुल् उमरा (असदखान मुख्य प्रधान) याजपाशी तैनात आहे. त्याला तेथून हलवा. तो आमच्या हुजुरात गंजाच्या (बाजार) मागे, अख्तरखानाचा नातू शमशेरबेग याच्या डेऱ्याच्या दिशेने तळ देऊन राहील.'

खानाजादखान याने बादशहांना पुढील हकीकत सांगितली– 'मीरघासी याला दोनशे जात व पन्नास स्वार अशी मन्सब होती. तो बादशाही चाकरी सोडून चोराना (मराठ्यांना) मिळाला होता. आता त्याने मराठ्यांची सोबत सोडली असून तो चाकरीच्या आशेने येथे आला आहे.' बादशहा म्हणाले 'त्याला भेटीसाठी घेऊन या.' खानाजादखान (रुहुल्लाखान) याने मीरघासीचे हात रुमालाने बांधून त्याला बादशहासमोर आणले. बादशहांनी त्याच्याकडे पाहिले. ते म्हणाले 'याचे हात मोकळे करा. आम्ही याचे अपराध माफ केले आहेत.' त्याप्रमाणे त्याचे हात मोकळे करण्यात आले. त्याची पूर्वीची मन्सब पुन्हा बहाल करण्यात आली.

गोविंद हरकारा हा सळावर (ब्रह्मपुरी) तैनात होता. त्याचा गुमाश्ता केशोराम याने (ब्रह्मपुरीहून) खालीलप्रमाणे कळविले–

'यमाजी निंबाळकर हा सैन्य घेऊन या भागात हालचाल करीत होता. हे ऐकून गाजिउद्दीन फीरोजजंग याने चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी आपला भाऊ हामिदखान बहादुर याला बरोबर सैन्य देऊन पाठविले. हामिदखान

शत्रूवर चालून गेला. चोरांबरोबर (मराठे) युद्ध झाले बादशहाच्या भाग्याने शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले शत्रूचा पराजय होऊन तो पळून गेला. शत्रूचे घोडे आणि इतर जिनसा (आपल्या) वीरांच्या हाती पडल्या.

बादशहानी खान फीरोजजंग याच्याकडे त्याला बक्षीस म्हणून तलवार, जमदाड व खिलतीची वस्त्रे पाठविली. फीरोजजंगाच्या सहकाऱ्यांपैकी प्रत्येकाला बक्षिसे पाठविण्यात आली याच सुमारास फीरोजजंगाने युद्धात विजय मिळविल्याचे पत्र मीर वफाबेग आणि इतर एक मनसबदार यांच्या हस्ते पाठविले होते ते बादशहाच्या नजरेखालून गेले. बादशहा म्हणाले 'फीरोजजंग व हामिदखान बहादुर यांचा मजुरा झाला. त्यांची सेवा मान्य झाली.'

तळावरील (ब्रह्मपुरी) हरकारा केशोराम याने खालीलप्रमाणे हकीकत कळविली–

'चोरांचे (मराठ्यांचे) सैन्य विजापूर सुभ्याच्या दिशेने हालचाल करीत होते. ही बातमी हेरांनी खान फीरोजजंग याला कळविली. यावर खान फीरोजजंग याने आपला सहकारी सिराजुद्दीन खान याला शिरपाव दिला आणि त्याच्या बरोबर सैन्य देऊन चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी त्यांची नेमणूक केली. मोर्च्यांसाठी बांबू (वेळू) ची आवश्यकता होती. बांबू कापून मोर्च्यांवर पोहोचविण्यासाठी पन्नास गुर्जबर्दार नेमण्यात यावे अशी आज्ञा झाली.

एक फेब्रुवारी– बक्षी उल्मुल्क बहरामंदखान हा मार्ग अंबाघाटच्या दिशेने तळ देऊन होता, तो आणि त्याचे पुढील सहकारी हे येऊन बादशहाला भेटले–

बहरामंदखानाच्या मुलीचा मुलगा मुहंमद तकी, मरहूम (दिवंगत) अमीर खान याचा मुलगा, बहरामदखानाच्या फौजेचा बक्षी व वाकनीस मीर इनायतुल्ला मरहूम (दिवंगत) खानजहान बहादुर याची मुले नुस्रतखान व अबुल्फतहखान, अमीरखान मरहूम याची मुले मुहंमद काजम व मुहंमद हादी.

मतलबखान वगैरेना मुहंमद अमीनखान याची मदत करण्यांसाठी कोकणी. दरवाज्याकडे पाठविण्यात आले होते. मतलबखान व कामयाबखान हे येऊन बादशहाना भेटले. त्यांनी मुहंमद अमीनखान याच्या मोर्च्यांचा नकाशा बादशहाना दाखविला, बादशहानी नकाशात नोंदलेली स्थळे पाहिली. ज्या ज्या स्थळासंबंधी त्यानी माहिती विचारली ती मतलबखान व कामयाबखान यानी सांगितली.

मीरकुलीज सुहबत यसावल हा बादशहाच्या आज्ञेप्रमाणे राजा जयसिंग याला घेऊन आला होता. राजा जयसिंग हा बादशहाना भेटला. त्याने पांच

मोहरा निसार (भेट, ओवाळणी) म्हणून पुढे ठेवल्या. बादशहांनी त्याला शंभर मोहरांच्या किंमतीचा एक घोडा बक्षीस दिला. राजा जयसिंग याला मुहंमद अमीनखान याजपाशी (कोकणी दरवाज्यासमोर) तैनात करण्यात आले. जयसिंगाला अमीनखानाकडे पोहोचवून परत यावे अशी मीरकुलीज याला आज्ञा करण्यात आली.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली–'खेळणा (विशाळगड) किल्ल्यातील मराठ्यांची ये जा खंदकांतून होती त्याच वाटेने खंदक चढून जावे असे फतेहुल्लाखान वगैरेंनी ठरविले यावर चोर (मराठे) तिकडे चाल करून आले. त्यांनी तिकडील मोर्चे उध्वस्त केले. मोर्च्यातील सैनिकांनी चोरांना (मराठ्यांना) मार दिला मार सहन न होऊन मराठ्यांनी पळ काढला. फतेहुल्लाखान बहादुर वगैरेंनी कबकी व धाबे हे खंदकावर व्यवस्थित बसविले.

अकरा फेब्रुवारी– खानजहान (दिवंगत) याच्या पथकांतील मुहंमद फारुक याला मलकापूरचा ठाणेदार म्हणून नेमण्यात आले. त्याला चारशे जात व साठ स्वार अशी मन्सब होती. तीत शंभर स्वारांची वाढ करण्यात आली व मुहंमद फारुक यास खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

संगमनेरचा फौजदार अमानतखान (हाच पुढे हैद्राबादचा सुभेदार मुबारजखान म्हणून १७२४ मध्ये प्रसिद्धीस आला) याने पुढीलप्रमाणे पत्र पाठविले– यावर्षी पाऊस कमी पडला. त्यामुळे सरकारचे शेतसाऱ्याचे उत्पन्न कमी झाले. अनेक खेडी उठून गेली. महसुलीचे उत्पन्न व पूर्वीचा फौजदार रजातलबखान याच्या कारकिर्दीची चौकशी यासाठी शेख सादुल्ला याला पाठविण्यात आले आहे. त्याला माझा सहकारी म्हणून नेमण्यात यावे.' बादशहांनी त्याची विनंती मान्य केली

'आमच्या हुजुरापासून मुहंमद अमीनखान याच्या मोर्च्यापर्यंत (कोकणी दरवाज्याजवळ) अंतर किती आहे हे साखळीने मोजून या अशी बादशहांनी असदुल्ला खुशमंजिल व अब्दुल्कादर करावल यांना आज्ञा केली.

पृथ्वीसिंगाचा मुलगा केशरसिंग याला तीनशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब होती. तीत दोनशे जात व शंभर स्वार अशी वाढ करण्यात आली

बारा फेब्रुवारी–खान फिरोजंग याने डाळिंबे, सफरचंद, द्राक्षे यांच्या दहा करंड्या पाठविल्या. त्या बादशहांनी नजरेखालून घातल्या.

तेरा फेब्रुवारी – आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

चौदा फेब्रुवारी – बादशहांना कळविण्यात आले की शहाजादे बेदारबख्त हे नजीक पोहोचले आहेत. बादशहांनी आज्ञा केली की 'बक्षी उल्मुल्क बहरामंदखान व नेकनामखान यांनी पुढे जाऊन त्यांचे स्वागत करावे.' त्याप्रमाणे ते शमशेरबेगच्या तळावर पोहचले आणि बेदारबख्ताला भेटले. बहरामंदखान, त्याच्या मुलीचा मुलगा मुहंमद तकी, आणि नेकनामखान यांनी मोहरा नजर म्हणून दिल्या. त्यानंतर ते सगळे दिवाणे खास पर्यंत आले. बरोबर बेदारबख्ताचे स्वार होते. बक्षी उल्मुल्काने बादशहांना कळविले की 'शहाजादे बेदारबख्त हे आले आहेत.' बादशहा म्हणाले 'येऊ द्या.'

शहाजादे बेदारबख्त व त्याचा मुलगा सुल्तान बेदार दिल हे बादशहांना भेटले आणि त्यांच्या पाया पडले. बादशहांनी त्यांच्या पाठीवरुन हात फिरविला. दिवस एक प्रहर चार घटका झाल्या असता बादशहा बेदारबख्ताला घेऊन दिवाणे खास मधून दिवाणे आममध्ये आले त्यांनी बेदारबख्ताला खेळणा (विशाळगड) किल्ल्याचा नकाशा दाखविला. दिवाणे आममधील काम संपण्यापूर्वीच बादशहांनी बेदारबख्ताला आपल्या तळावर जाण्यासाठी निरोप दिला

बेदारबख्ताचे पुढील अधिकारी बादशहांना भेटले– रजातलबखान दिवाण, मुहंमद बाकरचा मुलगा मुहंमद अली व त्याचा मुलगा हसनखान मीरतुजक, एतिमादखान बक्षी व वाकनीस, हुसेनखान बक्षी व वाकनीस.

रजातलबखान हा बेदारबख्ताच्या फौजेत दिवाण होता. त्याला त्या फौजेतील बक्षीगिरी पण देण्यात आली. बादशहाजादा आज्जम याचा नोकर हाजीबेग हा बेदारबख्ताच्या बरोबर आला होता. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

अमीरुल् उमरा जुम्लतुल्मुल्क असदखान (मुख्यप्रधान, हा मोर्च्यावर होता) याला सवड मिळेपर्यंत खालशाचा दिवाण इनायतुल्लाखान याने त्याच्या कागद पत्रावर सह्या करीत जाव्या अशी आज्ञा झाली.

देवीसिंग हा बीड येथे तैनात होता, तो येऊन बादशहाला भेटला.

दंडराजपुरीचा किल्लेदार व फौजदार सिद्दी याकूतखान याने कलिंगडाच्या बत्तीस करंड्या पाठविल्या. त्या बादशहांच्या नजरेखालून गेल्या. सिद्दी याकूतखानाने बादशहांना खालीलप्रमाणे पत्र पाठविले–

'आपण मला हुजुरात येण्याविषयी बोलाविले आहे. या भागात गनिमांची (मराठ्यांची) वर्दळ आहे. मी चोरांचे (मराठ्यांचे) येण्याजाण्याचे मार्ग बंद केले आहेत. मी माझी पथके येथे सोडून हुजुरांत आलो तर चोर (मराठे) धामधूम

उडवितील. यामुळे माझे हुजुरात येणे स्थगित करावे.' बादशहांनी विनंती मान्य केली.

खेळणागड (विशाळगड) च्या मोर्च्यात तैनात असलेला हरकारा वेंकटराव याने पुढीलप्रमाणे हकीकत लिहून कळविली–

'मीर असदुल्ला खुशमंजिल याने खेळणा किल्ल्याचा नकाशा राजा जयसिंग याजकडे पाठविला. राजा जयसिंग हा कोंकणी दरवाज्याच्या दिशेने तैनात होता. नकाशाप्रमाणे तो किल्ल्यापासून एक कोसावर होता. तो तेथून खेळणा किल्ल्याकडे निघाला. चोरांनी (मराठ्यांनी) खिडकी (किल्ल्याचा लहान दरवाजा) च्या बाहेर चौकी पाहारे कायम केले होते. जयसिंगाचा प्रधान व सैनिक रस्ता नीट करुन शत्रूवर चाल करुन गेले. युद्ध झाले. जयसिंगाचे अनेक सैनिक ठार अगर जखमी झाले. पण चौकी उधळून लावण्यात आली. शत्रूपैकी अनेक जण जखमी झाले. पायदळ सैन्यात युद्ध चालू आहे.' याच सुमारास असदुल्ला हा हुजुरात आला. त्याने सांगितले की, 'राजा जयसिंग हा लढाईपासून पंधरा साखळी अंतरावर उभा आहे.' बादशहा म्हणाले, 'मजुरा झाला. सेवा मान्य झाली.'

पंधरा फेब्रुवारी – शहाजादा बेदारबख्त याला एक रत्नखचित शिरपेच बक्षीस म्हणून देण्यात आला. हाजी अब्दुल्ला याचा मुलगा मुहंमद ऐवज याला सुरत बंदरचा फौजदार व कोतवाल म्हणून नेमण्यात आले. त्यापूर्वीचा अधिकारी दियानतखान याला हुजुरात बोलावून घ्यावे अशी आज्ञा झाली.

इनायतुल्लाचा मुलगा जियाउल्ला हा गंजाचा (बाजार) अमीन (व्यवस्था पाहाणारा) होता. त्याने विनंती केली की, 'आज्ञा होत असल्यास गंजांतील रोजच्या बाजार भावाच्या चिठ्ठ्या (तक्ते) आपल्याकडे पाठवीत जाईन.' विनंती मान्य करण्यात आली.

चौलचा फौजदार शेख मुहंमद याने विनंती लिहून पाठविली की, 'आज्ञा होत असल्यास मी येथे आपल्यातर्फे एक नायब नेमून स्वतः हुजुरांच्या सेवेत येईन.' विनंती मान्य करण्यात आली.

वेंकटराव हरकारा हा खेळणा किल्ल्याच्या मोर्चात फत्तेहुल्लाखानापाशी तैनात होता. त्याने पुढील प्रमाणे लिहिले– 'फत्तेहुल्लाखान हा मोर्चाच्या पुढे गेला होता. चोरांनी (मराठ्यांनी) किल्ल्यावरून तोफांचा मारा केला. फत्तेहुल्लाखानाच्या पायाला थोडी जखम झाली. तोफामुळे दोन बेलदार मारले गेले.'

तळावर (ब्रह्मपुरी) केशोराम हरकारा तैनात होता. त्याने पुढील हकीकत कळविली–

'गनिमांचे पारिपत्य करून हामिदखान हा परत आला. खान फीरोजजंग याने मुजाहिदखानाबरोबर मानोजी मांडे (पांढरे?) वगैरे सरदाराना दिले आणि त्याला गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी पाठविले. राणोजी (घोरपडे) हा विजापूर प्रांतात हालचाली करीत होता. मुजाहिदखान हा त्याच्यावर चालून गेला. युद्ध झाले. शत्रूपैकी अनेक जण ठार अगर जखमी झाले. शत्रू पळून गेला. गनिमांचे पारिपत्य करुन मुजाहिदखान हा खान फीरोजजंगला म्हणाला ' तुमच्या पैकी प्रत्ये-काला बढती मिळावी असे मी हुजुरांत लिहिणार आहे.'

गोविंदराव हरकारा हा खेळणा (विशाळगड) किल्ल्याच्या मोर्च्यांत मुहंमद अमीनखान याजपाशी (कोंकणी दरवाज्याकडे) तैनात होता. त्याच्या गुमाश्त्याने पुढील वृत्त लिहून कळविले–

खेळणा (विशाळगड) किल्ल्यात सुमारे चारशे चोर (मराठे) बाहेर पडले. ते ख्वाजाखान याच्या मोर्च्यावर चालून आले. त्यानी मोर्च्याला आग लावून दिली. त्यांनी गोळयांचा भडीमार केला. युद्ध झाले. ख्वाजाखान हा गनिमांचे पारिपत्य करुन परतला. त्याला दगडाच्या माराने जखम झाली. त्याच्या पांच सहकाऱ्यांना तल्वारीच्या व बंदुकीच्या गोळयांच्या जखमा झाल्या. या सुमारास मुहंमद अमीनखान व कामयाबखान हे ख्वाजाखानाच्या मदतीस पोहोचले. गनिमां-पैकी सुमारे पंधरा जणांना नरकात पाठविण्यात आले (ठार मारण्यात आले). शत्रूपैकी अनेक जणांना जखमी करण्यात आले. गनिम पळून गेले. मोर्चे पूर्वीप्रमाणे कायम करण्यात आले.'

बादशहा म्हणाले ' मजुरा झाली.' सेवा मान्य झाली. गोविंद हरकारा याच्या गुमाश्त्याने पुढील प्रमाणे कळविले–

'गनिमांचा सरदार नेबा (नेमाजी तर नव्हे) हा संग मनेर भागात हाल-चाली करीत होता. त्याने तेथील गुरेढोरे लुटून नेली. ही बातमी ऐकून तेथील (संगमनेर) फौजदार अमानतखान हा धावून गेला. त्याने गनिमांशी युद्ध केले. आणि गुरेढोरे सोडवून ती मालकांच्या हवाली केली.'

धारुरच्या बातम्यांवरुन कळले ते हे 'गनिमांचा सरदार राणोजी हा या भागांत आला. त्याने पेठ रहुल्लापूर हे गांव लुटून फस्त केले. येथील ऊजबेकखान औरंगखान फौजदार याने कांही कामगिरी केली नाही.' औरंगखानाला सातशे जात व सातशे स्वार अशी मन्सब होती. त्यांत चारशे स्वार दुघोडी होते. बाद-शहांनी त्याची मन्सब शंभर स्वारांनी कमी केली.

सुरत बंदरचा अधिकारी मुहंमद ऐवज याला इतिबारखान ही पदवी देण्यात आली.

सोळा फेब्रुवारी– खान फीरोजजंगच्या सैन्याचा दिवाण याच्याकडे त्याच सैन्यांतील घोडयांना डाग देण्याचे व तपासून घेण्याचे काम पण सोपविण्यात आले मलकापूरचा ठाणेदार मुहंमद सईद याला यावल (खानदेश) च्या फौजदारीवर नेमण्यात आले. त्याच्या पूर्वी गुलाम मुहियुद्दीन खान हा फौजदार होता. त्याची नेमणूक बुऱ्हाणपूरवर करण्यात आली.

पंचवीस फेब्रुवारी– बादशहाच्या हुजुरापासून मुहंमद अमीन खानाच्या मोर्च्याचे (कोंकणी दरवाज्याकडे) अंतर किती हे साखळीने मोजण्यासाठी उस्मानखान करावल हा गेला होता. त्याने परत येऊन पुढील माहिती दिली.

'अंबाघाटच्या वाटेने अंतर नऊ कोसाचे आहे. साखरण्याच्या वाटेने आठ कोसाचे आहे. पण तरबियत खानाने जी वाट तयार केली आहे तिची लांबी साडे चार कोस भरते.'

हे ऐकून बादशहा गप्प बसले.

बादशहांना कळविण्यात आले की शमशेर बेग हा करावली (टेहेळणी) साठी जात असतो. चोरांचे (मराठयांचे) सैनिक येऊन आक्रमणे करतात. शमशेर बेगच्या पथकांत बहेलिये (पायदळ) नाहीत.' शंभर माणसे तैनात करण्यात यावी अशी आज्ञा झाली.

खान फीरोजजंग याने लिहिले की 'नजरबेची मुले मुहंमद अमीन, मुहंमद याकूब व कलंदरबेग ही आज्ञेप्रमाणे आपल्या बापाची शव ही (ताबूत) औरंगाबादेस पोहोचवून आली आहेत. त्यांना माझ्या पथकांत सामील करण्यात यावे' विनंती मान्य करण्यात आली.

दुर्जनसिंहाच्या मुलगा नानूसिंह हा दोनशे जात व पन्नास स्वार असा मन्सबदार होता. पदमसिंग हा दीडशे जात व वीस स्वार असा मन्सबदार होता. जसवंत सिंग, बहारसिंग, लोमकर्णसिंग ही मंडळी राजा जयसिंग, याच्या निकटवर्तीयांपैकी होती. त्यांच्यावर कृपा करण्यात आली.

राजापूर तालुके विशाळगड येथे शेख बैतुल्ला हा ठाणेदार होता. त्याला तेथून बदलण्यात आले. त्याच्या जागेवर मलकापूरचा ठाणेदार मुहंमद बाकर याची नेमणूक करण्यात आली. मुहंमद बाकर बरोबर सिद्दी याकूतखान याच्या पथकांतील पांचशे माणसे तैनात करण्यात आली.

मंडनगडचा (वंदनगड) चा हवालदार (किल्लेदार) वणगोजी (फलटणकर निंबाळकरांपैकी) याने विनंती लिहून पाठविली की ' मला जहागीर नाही. माझी दुर्दशा आहे. मला खर्चाला काही रक्कम मिळेल व जहागीर देण्यात येईल अशी आशा करतो.' विनंती मान्य करण्यात आली. आज्ञा झाली की दख्खनचा दिवाण मोतिमदखान याने चौकशी करुन वणगोजीला काय व कोठे द्यावे याचा वृत्तांत द्यावा.

इनायतुल्ला याला अब्दुलकादरच्या ऐवजी कोतला (?) ची किल्लेदारी देण्यात आली.

सव्वीस फेब्रुवारी– बादशहांनी काल रात्री रुहुल्लाखानाला हुजुरात बोलावून त्याच्याशी खलबते केली. जुम्मतुल्मुल्क असदखान अमीरुल् उमरा (मुख्य प्रधान) हा खेळण्याच्या (विशाळगड) मोर्च्यावरुन येऊन बादशहांना भेटला. भेटीनंतर बादशहांनी त्याला आपल्या तंबूकडे परत जाण्यास निरोप दिला.

बादशहा उस्मानखान करावल याला म्हणाले ' राजा अवधूतसिंग (ओछर्चाचा राजा) याचा तळ, किल्ल्याच्या पायथ्याशी, कोंकणी दरवाज्याच्या दिशेने, मुहंमद अमीनखान याच्या मोर्च्यात आहे. तो तळ येथून किती लांब आहे हे सांखळीने मोजून या.'

सकर (गुलबर्गा जिल्ह्यातील सागर ?) चा किल्लेदार व फौजदार बुऱ्हाणुल्लाखान याची मन्सब शंभर जात व पन्नास स्वार यांनी कमी करण्यात आली.

खटावचा ठाणेदार किशनराव याचा भाऊ रघुनाथ याला मन्सब देण्यात आली.

अठ्ठावीस फेब्रुवारी– राजापुरचा ठाणेदार मुहंमद बाकर याला जाबिताखान ही पदवी देण्यात आली.

शहाजादा बेदारबख्त हा येऊन बादशहांना भेटला. त्यापूर्वी त्याने राजा जयसिंग व मुहंमद अमीनखान यांच्या मोर्च्यांना भेट दिली होती. त्याने बादशहांना मोर्च्यांचा तपशील सांगितला. त्याचे सहकारी रजातलबखान दिवाण आणि त्याच्या फौजेचा बक्षी व वाकनीस एतिमादखान हेही बादशहांना भेटले.

बादशहांनी आज्ञा केली की ' मुहंमदशरीफ याला एक हजार रुपये द्या. नादरजी (नारोजी ?) जमीनदार व देशपांडे मोजे धानोल (?) याला इनाम (बक्षीस) द्या. त्यांच्या बरोबर दोन हेर (जासूस) द्या. त्या सर्वांना फत्तेहुल्लाखान याजकडे पाठवून द्या.

शेख गुलाम अहमद हा नुकताच मुसलमान झाला होता. चतुर्भूजच्या प्रकरणात त्याने करून चौकशी केली होती. तिचा वृतांत ऐकून बादशहा खुश झाले. ते म्हणाले ' वाहवा आफरीन वाद छान. चौकशी केली.' इनायतुल्लाने सांगितले 'गुलाम अहमदचे म्हणणे आहे की अशीच चौकशी इतरांच्या बद्दलही सादर करुन आपल्यासमोर ठेवीत जाईन. बादशहा म्हणाले ' अवश्य, अवश्य.'

मार्च १७०२

एक मार्च– राजापूरचा ठाणेदार जाबिताखान याला एक घोडा बक्षीस म्हणून देण्यात आला.

ख्वाजा मुहरमखान याला काबुलचा माजी सुभेदार अमीरखान याच्या मालमत्तेची चौकशी करण्यासाठी पाठविण्यात आले होते. तो हुजुरात येत आहे असे कळले. त्याच्याकडे फतेहाबाद (धारुर, मराठवाडा) वगैरे स्थळांच्या सरकारी बागांची व्यवस्था होती. त्या जागेवरून त्याला बदलण्यात आले. त्याला पांचशे जात व नब्बद स्वार अशी मन्सब होती. ती चाळीस स्वारांनी कमी करण्यात आली. बादशहांनी आज्ञा केली की रुहुल्लाखानाने मुहरमखानाला पुढील अर्थाचे पत्र पाठवावे ' तुम्ही खजिना घेऊन बऱ्हाणपुराहून लवकर या.' अशाच अर्थाचे पत्र पाठविण्यासंबंधी फजाईलखान यालाही आज्ञा झाली.

बऱ्हाणपूर (खानदेश)चा सुभेदार बहरोजखान व औरंगाबादचा सुभेदार लुत्फुल्लाखान यांना आज्ञापत्रे गेली की ' हिंदुस्थानातून (उत्तर भारतातून) खजिना येत आहे. तुमच्या हद्दीतून तुम्ही तो सुरक्षितपणे पुढे पोहोचवा.'

अब्दुल्लतीफ, खवास याचा मुलगा ख्वाजा गजनफर याने विनंती केली की ' माझी आई शहाजहानाबादेत (दिल्ली) आहे. परवानगी मिळत असेल तर तिला भेटण्यास जाईन.' बादशहांनी त्याला एक वर्षाची रजा दिली.

राहिरी (रायगड)चा किल्लेदार व फौजदार शिवसिंग याच्या शिफारसीवरुन झुंजारसिंगाचा भाऊ चेतसिंग याला शंभर जात व पन्नास स्वार अशी मन्सब देण्यात येऊन त्याला शिवसिंगपाशी तैनात करण्यात आले.

दोन मार्च १७०२ – काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली– (कोतरी) कातर (शिपोशी जवळ, लांजे तालुका, रत्नागिरी जिल्हा) हे गांव म्हणजे खेळणा (विशाळगड) किल्ल्याचा सरकूब (जागल्या, टेहळणी करणारा, निगा राखणारा) होय मुहंमद, अमीनखान, ख्वाजाखान, राव मानसिंग (जाधव शिंदे खेडकर), तुर्कताजखान

वगैरे सरदारांनी कातर या गावावर हल्ला चढविला शंभर चोर (मराठे) ठार अगर जखमी झाले. आपल्याकडेही बरेच जण ठार अगर जखमी झाले. शत्रू पळून खेळणा किल्ल्यांत निघून गेले. बादशाही अधिकाऱ्यांनी कांतरगाव ताब्यात घेतले आणि तेथे ठाण मांडले आहे.'

याच सुमारास वरील विजयाची हकीकत सांगणारे मुहंमद अमीनखान यांचे पत्र घेऊन एक जल्लूदार (निकटवर्ती सेवक) आला. ते पत्र त्याने बादशहांना दिले बादशहा खुश झाले. त्यांनी जल्लूदारला पांच मोहरा व पांच हांन बक्षीस म्हणून दिले.

मुहंमद मीर हा मुहंमद अमीनखान याच्या फौजेचा बक्षी व वाकनीस होता. त्याचे फौजेतील घोडयांना डाग दिले किंवा नाही हे पाहाण्याचे कामही देण्यात आले.

तीन मार्च– कातरगांव जिंकून घेतल्याबद्दल मुहंमद अमीन खान यास बहादुर ही पदवी देण्यात आली. फर्मान व खास खिलतीची वस्त्रे त्याच्याकडे पाठविण्यात यावीत अशी आज्ञा झाली.

मुहंमद अमीनखानाने पत्र लिहून कळविले की ' कातर गांव जिंकून घेण्याच्या कामात पुढील मंडळीनी फार मेहनत केली.

१) जमशीदखान (?) २) ख्वाजाखान ३) कामयाबखान ४) मोर खान (?), ५) तुर्कताजखान ६) अब्दुस्समदखान व पायदळाकडील राव मानसिंग (जाधव) यांच्यावर कृपा झाली पाहिजे.'

बादशहांनी आज्ञा केली की ' रुहुल्लाखानाने वरील पैकी प्रत्येकाचा हुद्दा काय याची चौकशी करुन कळवावे अब्दुस्समदखान, कबचाकखान, तुर्कताजखान व ख्वाजाकुलीखान या पैकी प्रत्येकाकडे एक खंजीर बक्षीस म्हणून पाठवावा अशी आज्ञा झाली.

बादशहा बेदारबख्ताला म्हणाले 'तुम्ही मुहंमद अमीनखान याचे मोर्चे पाहून या.'

इनायतुल्लाखान याने विनंती केली की ' मरहूम (दिवंगत) शरीफखान याची मुले इमामुद्दीन व जैनुद्दीन अहमद ही आपल्या बापाकडे निघालेली सरकारी देणी देण्यात अडथळे आणीत आहेत' बादशहांनी आज्ञा केली की छावणीचा नायब कोतवाल व गंज (बाजार) चा अमीन जियाउल्ला यानी जाऊन इमामुद्दीन

वगैरेची घरे सरकारात जप्त करावी. दोन्ही मुलांच्या मन्सबी काढून घेण्यात याव्या.

तळावर (ब्रह्मपुरी) तैनात असलेला हरकारा केशोराम याने तिकडचे पुढील वृत्त लिहून पाठविले.

जुम्लतुलमुल्क खान फीरोजजंग याने या महिन्याच्या (शव्वाल) चार तारखेस (एकवीस फेब्रुवारी १७०२) हामिदखान बहादुर, दिलेरखान, राजा इंदरसिंग वगैरेना तळावर (ब्रह्मपुरी) सोडले. तो स्वतः गनिमांचे पारिपत्य व शिकार यासाठी स्वार होऊन निघाला

बिदनूर (शिमोगा जिल्हा, कर्नाटक) राज्याचे वकील खान फीरोजजंग याजपाशी आले. त्याने दोन घोडे त्याला नजर देऊ केले. फीरोजजंगाने घोडे घेतले नाहीत. पण त्याने वकील याला खिलतीची वस्त्रे व त्याच्या सहकाऱ्यांना शाली दिल्या. बिदनूरकडून खंडणी येणार होती. तिच्याबद्दल त्याने तगादा केला व ताकीद दिली.

चार मार्च– कातरचे गांव जिंकून घेतल्याबद्दल बादशहांनी पुढील मंडळींवर कृपा केली. मीर महमूद, खुशहाल बेग, ख्वाजाखान तुर्कताजखान, कवचाकखान, राव मानसिंग, ख्वाजाखानी यांच्या मन्सबीत वाढ.

जमशीदखानाच्या मन्सबीत वाढ झाली. जमशीद खानाचा मोठा मुलगा मुहंमद इब्राहीम याची मन्सब वाढविण्दात येऊन त्याला फरीदनखान ही पदवी देण्यात आली. त्याचा भाऊ अहमद याचीही मन्सब वाढविण्यात आली. कामयाबखान याला धनुष्यबाण, बाकीबेग हिंमतखानी याला एक ढाल या वस्तू देण्यात आल्या.

शहाजादा बेदारबख्त याने बादशहांना पत्र लिहून पुढील हकीकत कळविली.

'हाफिज अंबर व ख्वाजा अंबर हे हत्तीवर बसून माझ्या तंबूपर्यंत येतात आणि याच वाटेने चार पाच कोस शिकारीला जातात.' बादशहानी हाफिज अंबर-व ख्वाजा मसूद यांच्या मन्सबी कमी केल्या.

मलकापूरचा ठाणेदार मुहंमद फारुख याला बदलण्यात येऊन त्याला हुजुरात बोलावून घेण्यात आले. त्याच्या जागी मलकापूरच्या ठाणेदारीवर मुहंमद रफीच्या आश्रितांपैकी गुलाम मुहंमद याला नेमण्यात आले.

दौलताबादेचा किल्लेदार सय्यद मुबारकखान याने पुढील हकीकत लिहून कळविली–

अबुल्हसन तानाशाह (गोवळकोंड्याचा माजी बादशहा) हा वारला त्याच्या बायकोकडे शोक निदर्शक वस्त्रे (खिलते मातमी) द्यावी म्हणून औरंगाबादेचा सुभेदार लुत्फुल्लाखान याने एका माणसाच्याबरोबर माझ्याकडे वस्त्रे पाठविली. याबाबतीत आपली आज्ञा नसल्यामुळे मी वस्त्रे परत केली.'

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले, 'तुम्ही लुत्फुल्लाखानाला लिहा, 'वस्त्रे मुबारकखानाकडे पाठवा. तो ती अबुल्हसनच्या पत्नीकडे पाठविल.'

इनायतुल्लाने विनंती लिहून पाठविली की, 'यार अलीबेगच्या अफरातफरीमुळे परवाने देण्यात दिरंगाई होत आहे.' बादशहा म्हणाले, 'यार अलीबेग अफरातफर करणारा नाही.'

आज बादशहांनी दरबारचे कामकाज केले नाही. मुहंमद अमीनखान बहादूर काजर गाव जिंकून घेतले होते. त्याच्या सैन्यांतील पुढील अधिकाऱ्यांना पुढील प्रमाणे बक्षिसे देण्यात आली.

जमशीदखान (मार्जा विजापूर राज्यातला. पुढे १७०५ मधे वाकिण खेड्याच्या वेढ्यात मारला गेला) याला चारशेची मन्सब होती. ती एक हजार (जात) एक हजार स्वार अशी करण्यात आली. ख्वाजाखान याला एक घोडा देण्यात आला. त्याच्या मन्सबीत पन्नासनी वाढ करण्यात आली. त्याला पूर्वी दीड हजार जात व तीनशे स्वार अशी मन्सब होती.

तुर्कताजखान याला नऊशेची मन्सब होती, ती जातची होती. त्याला एक हजार स्वारांची मन्सब होती तीत साठ स्वारांची भर घालण्यात आली.

राव मानसिंग जाधव (शिंदखेडकर जगदेवराव जाधवाचा मुलगा) याला एक हजार जात व एक हजार स्वार अशी मन्सब होती. तित शंभर स्वारांची भर घालण्यात आली. कामयाबखान (तरबियतखानाचा भाऊ. औरंगजेबाची बायको दिलरसबानू हिच्या मावस भावाचा मुलगा. याचीच मुलगी पुढे दक्षिणचा सुभेदार आणि सय्यद बंधू पैकी एक सय्यद हुसेन अलीखान याची बायको) याला बाणांचा भाता, बाकीबेग हिंमतकानी याला ढाल. ख्वाजाखानी व मीर महमूद यांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. जमशीदखान याचा मुलगा मुहंमद इब्राहीम याला फरीदखान ही पदवी देण्यात आली. त्याचा भाऊ अहमद याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. खुशहालबेग याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

पाच मार्च– शहाजादा मुहंमद बेदारबख्त हा बादशहाच्या आज्ञेप्रमाणे मुहंमद अमीन खान बहादुर याचे कतार गावाजवळील मोर्चे (विशाळगडच्या कोंकणी दरवाज्याच्या समोर) पाहाण्यास गेला होता. मोर्चे पाहून

तो परत आला. त्याने बादशहांना तेथील परिस्थिती सांगितली. ती ऐकून घेतल्यावर बादशहांना त्याला आपल्या डेऱ्याकडे जाण्याची परवानगी दिली. फळफळावळीची चार ताटे त्याच्याकडे पाठविण्यात आली.

न्यायदानाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी जुम्लतुल्मुल्क अमीरुलउमरा असद खान (पंतप्रधान) हा मोर्च्यावरून येऊन बादशहांना भेटला. त्यानंतर त्याला स्वत:च्या डेऱ्याकडे जाण्यास निरोप देण्यात आला.

मसूर ठाण्याचा बक्षी व वाकनीस मुहंमद अश्रफ हा बोलावणे पाठविल्यावरही हुजरांत आला नाही. फरारी म्हणून त्याची नोंद करावी अशी आज्ञा झाली.

मुहंमद अमीन नायब कोतवाल याने पुढील प्रमाणे विनंती केली 'मरहूम सैफखान यांच्या इमामुद्दीन वगैरे मुलांची मालमत्ता मी आज्ञेप्रमाणे जप्तीत घेतली आहे.' या सुमारास इमामुद्दीनने पुढीलप्रमाणे विनंती केली 'माझे वडिलांकडे सरकारचे अठरा हजार रुपये देणे आहे. ती रक्कम मी देतो व जप्ती उठविण्यात यावी.' विनंती मान्य करण्यात आली आणि सैफखानाच्या मुलांना पूर्वीच्या मन्सबीवर बहाल करण्यांत आले.

पुरदिलचा मुलगा बीर हा फीरोजजंगापाशी तैनात होता. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

ख्वाजा फैजुल्ला हा मध्य आशियातून आला होता. त्याला तीनशे जात व वीस स्वार अशी मन्सब देण्यात आली. बादशहा म्हणाले 'हा इसम या पूर्वीही आला होता किंवा नाही, याची चौकशी सियादतखान व फतेउल्लाखान बहादुर यांनी करून कळवावे.

बादशहा इनायतुल्लाखानाला (खालशाचा दिवाण) म्हणाले 'शिपाई सैनिकांच्या पगाराची थकबाकी फार वाढली आहे. हुजुरात तर खजिना नाही. बाहेरुन खजिना येईपर्यंत सावकारांकडून पाच लाख रुपये कर्ज म्हणून घ्या.'

इनायतुल्लाने म्हटले 'सावकारांचे काही आक्षेप नाहीत पण सरकारने त्यांच्या कडून कर्ज उकळले तर सगळे सावकार छावणीतून बाहेर पडतील. बादशाही खजिना लवकरच छावणीत येईल.' तो येईपर्यंत पगार वाटप स्थगित करण्यात यावे, अशी बादशहांनी आज्ञा केली.

सहा मार्च– आज शुक्रवार त्यामुळे दिवाणात (कचेऱ्या) कामकाज बंद होते.

सात मार्च– सरफराजखान हा शहाजादा बेदारबख्त याच्या सैन्यात तैनात होता. तो येऊन बादशहांना भेटला.

ब्रह्मपुरीच्या तळावरील बातम्यांवरुन कळले की 'खान फीरोजजंग हा गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी गेला होता. तो सात शव्वाल रोजी (चोवीस फेब्रुवारी १७०२) तळावर परत आला.

धारवाडच्या किल्लेदारीवर व फौजदारीवर अलफखान याची नेमणूक करण्यात आली. तशा अर्थाचे फर्मान सादर झाले.

मुहंमद अमीन बहादुर याने विनंती लिहून पाठविली की 'मला एक तोफ मिळावी म्हणजे मी ती कातर येथील तळावर ठेवतो. तेथून खेळणा (विशाळ गड) किल्ल्यात गोळे टाकता येतील.'

बादशहांनी आज्ञा केली केली की 'फत्तेउल्लाखानाच्या मोर्च्यातून एक तोफ काढा आणि ती मुहंमद अमीन खानाकडे पाठवा.

मुहंमद अमीनखान याच्यापाशी तैनात असलेल्या पुढील अधिकाऱ्याना पुढील प्रमाणे बक्षिसे देण्यात आली– कामयाबखान व मामूरखान, प्रत्येकी एक– शिरपेच, तुर्कताजखान, एक घोडा.

अंकोला (अहमदनगर जिल्हा) येथील हरकाऱ्याच्याकडून पुढील बातमी कळली–

'काकानायक, (कल्याणचा ठाणेदार मातबरखान याचा अधिकारी), मुहंमद शफी व सय्यद मझली यांची गनिमांचा सरदार अकलू (?) यांच्या बरोबर लढाई झाली. शत्रूपैकी अनेक जण ठार झाले. त्यांचे घोडे व शस्त्रे ही आपल्या हाती आली. गनिमांचा सरदार हा पळून कान्सा (?) गांवाकडे गेला.

बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.'

आठ मार्च – काल बादशहांनी विशागळडचा किल्ला कोकणी दरवाज्याच्या बाजूने जिंकून घेण्यासाठी म्हणून तिकडे शहाजादा मुहंमद बेदारबख्त याची खानगी केली. निरोपाच्या वेळी बादशहांनी त्याला एक शिरपेच दिला.

मलिक जब्त व फतेहमुबारक या तोफा कोल्हापूरला होत्या. अमानुल्लाखान याने त्या तेथून आणाव्या अशी बादशहांनी आज्ञा केली.

बादशहांनी काल रात्री बक्षी उलमुक रुहुल्लाखान याला बोलावू पाठविले आणि त्याच्याशी खलबते केली.

सामानगड किल्ल्यावर नेमत हा किल्लेदार होता. त्याला बदलून शहामीर याला तेथील किल्लेदारी देण्यात आली शहामीरला दोनशे जात व पांच स्वार अशी मन्सब होती, तीत पन्नास स्वार अशी भर घालण्यात आली.

अब्दुलहफीज याचा मुलगा अब्दुलअजीज हा सुल्तानपूर नंदुरबार येथे सवानेहनिगार (बातमी पत्रे लिहून पाठविणारा) होता. बादशहानी त्याला तेथून काढले आणि आज्ञा केली की 'एक गुर्जबर्दार पाठवा. त्याने जाऊन अब्दुल अजीज आणि सुल्तानपूर नंदुरबारचा देशमुख यांना हुजुरात घेऊन यावे.'

हसन बेगचा मुलगा फकीर मुहंमद हा मुहंमद अमीनखान बहादुर याच्या फौजेत तैनात होता. त्याला दोनशे पन्नासची मन्सब होती. तीत पन्नासांनी वाढ करण्यात आली.

मुहंमद अमीनखान बहादुर याने आपल्या पथकासहित आपल्या (कोकणी दरवाजाच्या समोरच्या मोर्च्यातून हुजुरात यावे अशी आज्ञा झाली.

नऊ मार्च– औसा (उस्मानाबाद जिल्हा, मराठवाडा) येथील किल्लेदार याने पुढीलप्रमाणे विनंत्या लिहून पाठविल्या –

१) जर गनीम (मराठे) या भागात चालून आले तर त्यांचे पारिपत्य करण्यासाठी मी किल्ल्या बाहेर पडेन. परवानगी असावी. विनंती मान्य करण्यात आली नाही.

२) माझ्या विनंत्या (छावणीत असलेले) फजलुल्लाखान हे हुजुरात मांडतील. परवानगी असावी. विनंती मान्य झाली.

३) घोड्यांना डाग देण्याबाबत जे निर्बंध आहेत त्याची माफी मिळावी. विनंती मान्य करण्यात आली.

४) माझा भाचा अबू तालिब याला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे. यावर आज्ञा: त्याला माझ्या समोर आणण्यात यावे,

दहा मार्च– मामुरखान हा कोकणी दरवाज्यासमोरील मोर्च्यात तैनात होता. त्याने बादशहांना एक विनंतीपत्र (अर्जदाश्त) पाठविले ते त्याच्यांसमोर ठेवण्यात आले.

आज्ञेप्रमाणे मुहंमद अमीन खान बहादुर हा आपले सहकारी ख्वाजाखान व तुर्कताजखान यांच्या सहित येऊन बादशहाना भेटला. बादशहा मुहंमद अमीन खान याला म्हणाले. 'आफरीन बाद, खूब तरद्दुद नमूने, धन्य धन्य, तुम्ही खूप झटलात, खूप मेहेनत घेतली.'

शेख गुलाम अहमद याने पुढीलप्रमाणे विनंती केली– 'छावणीतील अनेक इसमांची प्रकरणे मी हुजुरांत आणतो. त्यामुळे ते लोक माझा द्वेष करतात. माझ्या विरूद्ध कोणी गाऱ्हाणे आणले तर त्याची चौकशी केल्यावाचून ते खरे समजण्यात येऊ नये. माझी काळजी घेण्यासाठी कुणाला तरी आज्ञा व्हावी.' बादशहा म्हणाले 'हमीदुद्दीन खान बहादुर हे तुमच्या प्रकरणावर लक्ष ठेवीत जातील'

तरबियतखान मीर आतिश (दारुगोळ्याचा प्रमुख) याचा कारभारी शेख मिहरुल्ला हा होता. त्याला बदलण्यात येऊन त्याच्या जागी भवानीदास याची नेमणूक करण्यात आली. त्याला एक शाल देण्यात येऊन त्याच्या मन्सबीत पन्नासची वाढ करण्यात आली.

उज्जैनचा काजी मुहंमद वारस याला सुभे बुऱ्हाणपूरच्या जिझीया खात्याचा अमीन म्हणून नेमण्यात आले.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'पंतप्रधान जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा असदखान यांच्या पथकातील सैनिक हे पगाराची थकबाकी वसूल करण्यासाठी पंतप्रधानांच्या अधिकाऱ्यांना अद्वातद्वा बोलत आहेत.'

बादशहा म्हणाले 'हमीदुद्दीनखान बहादूर व मुहंमद अमीन नायब कोतवाल यांनी जाऊन सैनिकांचा बंदोबस्त करावा.' त्याप्रमाणे ते गेले. नंतर त्यांनी येऊन बादशहांना कळविले की, 'असदखान पंतप्रधान यांनी आम्हाला बोलावून सांगितले की, 'तुम्ही माझ्या सैनिकांना काही बोलू नका. मी स्वतः त्यांची समजूत घालीन.'

मुहंमद अमीनखान बहादूर याची प्रकृती अशक्त झाली होती. त्याला एक तलवार बक्षीस देण्यात येऊन त्याला स्वतःच्या तंबूकडे जाण्यास निरोप देण्यात आला.

अकरा मार्च– आज दिवाण (कचेरी)चे काम बंद होते.

बारा मार्च– कोंकणी दरवाजाच्या मोर्च्यावरुन शहाजादा मुहंमद बेदारबख्त हा येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी तिकडील परिस्थिती संबंधी त्याच्याकडे चौकशी केली. बादशहा बेदारबख्ताला म्हणाले 'आठवड्यातून एकदा येऊन मला भेटा चला.'

जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा असदखान हा मोर्च्यावरुन येऊन बादशहांना भेटला. त्याने आपल्या तंबूत जाऊन विश्रांती घ्यावी आणि मग आपल्या मोर्च्याकडे जावे अशी आज्ञा झाली.

सिद्दी याकूतखान याने कलिंगडाचे पेटारे पाठविले होते ते बादशहाच्या नजरे खालून गेले.

मीर आतिश तरबियतखान याचा नायब मन्सूरखान याला बादशहांनी बेदारबख्ताच्या मोर्च्याकडे जाण्यास निरोप दिला. मन्सूर खानाचा मुलगा मुहंमद काजम याने गुलालबार (बादशहाचे निवासस्थान) वर सावधगिरी बाळगावी. आणि तरबियतखानाचा भाऊ कामयाबखान हा बेदारबख्ताच्या मोर्च्यात तैनात होता, त्याने हुजूरांत यावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

तसेच कोकणी दरवाजाच्या मोर्च्यावर राजा जयसिंग व जमशीदखान हे तैनात होते. त्यांनी आपली पथके घेऊन हुजुरात यावे अशी आज्ञा झाली.

जमशीदखान विजापुरी (वर उल्लेखिलेला, जमशीदखान) याने विनंती केली की 'मी विपन्नस्थितीत आहे. खर्चास काही रक्कम मिळावी.' अंत:पुरातील खजिन्यांतून त्याला एक हजार अश्रफया देण्यात याव्या अशी आज्ञा करण्यात आली.

मलिक जव्त व फतेहमुबारक या दोन तोफा बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) व कोल्हापूर येथून मागवून घेण्यात याव्या असे ठरले होते. पण ती आज्ञा रद्द करण्यात आली. बादशहांनी आज्ञा केली की 'त्या ऐवजी फतेहुल्लाखान बहादुर याच्या मोर्च्यात (घाटावर, गजापूर जवळ) कडक बिजली तोफ आहे ती अमानुल्लाखानाने बेदारबख्ताच्या मोर्च्यात (घाटाखाली, कोंकणी दरवाज्या समोर) पोहचवावी.

तेरा मार्च– आज कचेऱ्या बंद होत्या.

चौदा मार्च– आज एक प्रहर चार घटिका दिवस आला असता बादशहांनी न्यायदानाचे काम सुरु केले.

मुहंमद अमीनखान बहादुर याचा भाऊ नजाबतखान हा गनिमांचे (मराठ्यांचे) पारिपत्य करण्यासाठी कोकणात गेला होता. तो येऊन भेटला. त्याने पुढील प्रमाणे माहिती दिली– 'मी गनिमांचे पारिपत्य केले. त्यांचा एक झेंडा, दोन कर्णे आणि त्यांचे दोन सरदार यांची डोकी कापून घेऊन आलो आहे. काय आज्ञा' बादशहा म्हणाले 'झेंडे वगैरे खानेसामानकडे द्या आणि कापून आणलेली डोकी फेकून द्या.'

शहाजहानाबाद दिल्लीचा सुभेदार मुहंमद यारखान (शाबिस्ताखानाचा पुतण्या, एतिकादखानाचा मुलगा) हा आजारामुळे सेवानिवृत्त झाला. त्याच्या जागी मुखतरखान (शहाजादा बेदारबख्त याचा सासरा) याची नेमणूक करण्यात आली. त्याची मुले इफ्तिखार खान व सय्यद मुहंमदजान यांना मन्सबी देण्यात अगर वाढविण्यात आल्या.

कडक बिजली तोफ बेदारबख्ताच्या मोर्च्यात पाठवावी असे पूर्वी ठरले होते पण त्याऐवजी फत्तेहुल्लाखानाच्या मोर्च्यात असलेली शेर दहान (व्याघ्रमुख) तोफ बेदारबख्ताच्या मोर्च्यात पोहोचवावी अशी आज्ञा झाली.

दिवंगत बहादुरखान (रणमस्तखान पन्नी) याचा मुलगा रणमस्तखान याला दीड हजार जात व तीनशे स्वार अशी मन्सब होती. तीत शंभर स्वारांची भर घालण्यात आली.

खान फीरोजजंग व चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) यांना बादशहांनी पत्रे पाठविली.

फजाईलखान हा आज्ञेप्रमाणे शहाजादा बेदारबख्त याजबरोबर गेला होता तो परत येऊन बादशहांना भेटला. ख.नाने कोकणी दरवाजाच्या मोर्चाची परिस्थिती कळविली. शाकिरखान याला मुहंमद अमीनखानाच्या तैनातीतून काढून बेदारबख्तकडे देण्यात आले. बादशहांनी आज्ञा केली की, 'मुहंमद अमीनखान बहादूर यांच्याबरोबर देण्यासाठी सहा हजार स्वारांची यादी (तूमार) सिद्ध करा मी गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी मुहंमद अमीनखानाला मोहिमेवर रवाना करणार आहे.

पंधरा मार्च– मीर आतिश तरबियतखान हा अंबा घाटावरून येऊन बादशहांना भेटला. तुमचा भाऊ कामयाबखान हा तुमच्याजवळच राहू द्या अशी बादशहांनी त्याला आज्ञा केली.

मरहूम वजीरखान याचा मुलगा जैनुल आबिदीन याने पुढील प्रमाणे विनंती केली–' बादशाही नोकरी चांगली बजावू शकतील असे चाळीस पन्नास तरुण आहेत. त्यांना मन्सबी मिळाव्या.' बादशहा म्हणाले, 'त्यापैकी वीस जणांना रुहुल्लाखान यांनी माझ्यासमोर आणावे.'

सोळा मार्च– काल रात्री बादशहांनी बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याला बोलावून दिल्ली, आग्रा, अवध इत्यादींच्या सुभेदाऱ्या व इतर जागा यांजवरील नेमणुकीसंबंधी खलबते केली.

बादशहांनी आज्ञा केली की, हमीदुद्दीनखान बहादुर यांनी जरीब (अंतर मोजण्याची साखळी) घेऊन हुजुरापासून फत्तेहुल्लाखानाच्या मोर्च्यापर्यंत अंतर मोजावे आणि मोर्चा पाहून परत यावे.

मीर तुजुक (शिष्टाचार पालन खात्याचा अधिकारी) यक्काताजखान याने मुद्दाम माणूस नेमून रामाजी व इतर एक इसम यांना बेदारबख्ताकडे तैनात म्हणून तातडीने पाठवावे अशी आज्ञा झाली.

सतरा मार्च– आज शहाजादा मुइजुद्दीन (मुलतान सुभ्यावर) याच्या नावाने आज्ञापत्रे रवाना झाली. बादशहांनी सुभे दिल्ली (फिदाईखान), जम्मूची फौजदारी, (लाहोरचा नायब सुभेदार जबरदस्तखान) सुभे अवध (मिर्जाखान), जौनपूरची फौजदारी (मिर्जासद्रुद्दीन मुहंमदखान) अशा अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या.

बादशहाच्या आज्ञेप्रमाणे हमीदुद्दीनखान बहादुर याने खेळणा (विशाळगड)

किल्ल्याच्या पायथ्याशी दरीमध्ये राजा अवधूतसिंग (ओछर्चाचा राजा) याचे ठाणे बसविले. हमीदुद्दीनखान हा मोर्चावरून परत आल्यावर राजा अवधूतसिंग याच्या नावे आज्ञा पत्रे रवाना झाली.

बादशहा मुहंमद अमीनखान बहादुर याला म्हणाले, 'तयार रहा, मार्गाचे रक्षण करण्यासाठी मी तुम्हाला मुहंमद बेदारबख्त याजपाशी तैनात करून खेळण्याकडे पाठवीत आहे.'

अठरा मार्च– मुहंमद अमीनखान बहादूर याचे मामूरखान वगैरे सहकारी हे आज्ञे-प्रमाणे कोकणी दरवाजाच्या मोर्चावरून येऊन बादशहाला भेटले. त्यांनी पुढील प्रमाणे नजरा दिल्या १) मामूरखान दोन मोहरा २) अब्दुस्समदखान, (हा पुढे पंजाबचा सुभेदार झाला) एक मोहोर ३) गुलाम मुहंमद दोन मोहोरा ४) बाकीबेग हिंमतखानी. दोन मोहोरा. ५) कबचाकखान दोन मोहोरा. ख्वाजाखानी, दोन मोहोरा तरबियतखानाचा मुलगा सय्यद मुहंमद इसहाक हा अंबाघाटावरून आला. तो बादहशहांना भेटला. त्याने दोन मोहोरा नजर दिल्या.

बादशहांनी आज्ञा केली की शेरदहान तोफ (व्याघ्रमुख) ही शहाजादा मुहंमद बेदारबख्त याच्या मोर्चात पोहोचविण्यात यावी.

मरहूम सैफुल्लाखान याचा मुलगा मिर्जा असदुल्ला याला बादशहांनी काही सूचना दिल्या. त्याने शहाजादा बेदारबख्त याच्या सेवेत हजर व्हावे, अशी त्याला आज्ञा करण्यात आली.

दिवाण (न्यायालय) संपल्यावर बादशहांनी फजाइलखान याला काही सूचना दिल्या. त्या सूचना त्याने शहाजादा बेदारबख्त याजपाशी पोहोचवून परत यावे अशी त्याला आज्ञा करण्यात आली.

रुहुल्लाखान हा आजारी होता. तो बरा झाला. तो येऊन बादशहांना भेटला. तो अद्याप अशक्त असल्यामुळे बादशहांनी त्याला आपल्या तंबूत परत जाण्यास निरोप दिला

बादशहाना कळविण्यात आले की मुहमद अमीनखान बहादुर हा आजारी आहे. हकिम सादिक खान याने जाऊन त्याचा उपचार करावा अशी आज्ञा झाली.

अहमदाबाद सुभ्यातील ईडर, सोरठ वगैरे परगणे बादशहाजादा आज्जम याच्या सरंजाम जहागिरीत होते. ईडरचा फौजदार कमालखान आणि सोरठचा फौजदार मुहंमद बेगखान यांचे हुद्दे कळविण्यात यावेत अशी आज्ञा करण्यात आली. बिहार सुभ्याच्या सुभेदारीवर शमशीरखान याची नेमणूक करण्यात आली.

मन्सूरखान (दक्षिणच्या तोफखान्याचा दारोगा) याचा मुलगा मुहंमद काजम याची मन्सब शंभरने कमी करण्यात आली.

दंडराजपुरीचा फौजदार सिद्दी याकूतखान याने बादशहांना कळविले की-

'खेळण्याच्या (विशाळगड) वेढ्यासाठी मी चार हजार पायदळ सैन्य पाठविले होते ते मुहंमद अमीन खान बहादुर याजपाशी तैनात आहे. ते माझे सैन्य इकडे तिकडे पांगले जाऊ नये अशी विनंती आहे.'

विनंती मान्य करण्यात आली.

एकोणीस मार्च- फजाइलखान हा बादशहांचा काही निरोप घेऊन शहाजादा बेदार बख्त याजकडे गेला होता. शहाजाद्याचे उत्तर घेऊन तो बादशहाकडे आला.

बादशहांना कळविण्यात आले की जुम्लतुल्मुल्क अमीरुल् उमरा असदखान (पंतप्रधान) हे मोर्च्यावरुन आले असून मुजऱ्यासाठी हजर झाले आहेत. परवानगी मिळाली. बादशहांनी त्याना केवडा देऊन आपल्या तंबूकडे परत जाण्यास निरोप दिला.

शहाजादा बेदारबख्त याच्या पत्रावरुन कळले की शेरदहान तोफ अद्याप मोर्च्यात पोहोचली नाही.' यावर बादशहा हे मन्सूरखानाचा मुलगा मुहंमद कजिम याच्यावर रागावले. त्यांनी आज्ञा केली की मीर आतिश तरबियतखान व हमीदुद्दीन-खान बहादुर यांनी ती तोफ कातळापर्यंत पोहोचवून परत यावे. त्यांना रवाना करण्याचे काम फतेह दौलत कौल याच्याकडे देण्यात आले.

बीस मार्च- बादशहाजादा मुहंमद कामबक्ष हा आजारी होता तो बरा झाला. तो येऊन बादशहांना भेटला.

तरबियतखान मीर आतिश याला तीन हजार जात आणि सतराशे स्वार अशी मन्सब होती. बादशहा त्याच्यावर नाराज झाले. त्यांनी त्याची मन्सब पांच-शेनीं कमी केली. तरबियतखानाचा मुलगा मुहंमद इसहाक याला अडीचशे जात व वीस स्वार अशी मन्सब होती. ती पन्नासने कमी करण्यात आली.

एकवीस मार्च- शहाजादा बेदारबख्त हा मोर्च्यावरुन येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी त्याच्याकडून वेढ्याच्या परिस्थितीची चौकशी केली. यानंतर शहाजाद्याला मोर्च्याकडे परत जाण्यास निरोप देण्यात आला.

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली- 'तनख्याचे बक्षी फजलुल्लाखान (अहदी म्हणजे बादशाहांचे निजी सैनिक, त्यांच्या पगार वाटपाचे अधिकारी) याने बादशाही छावणीपासून (विशाळ गडासमोर) औरंगाबादेपर्यंत ठाणी

बसवून यावे.

फजलुल्लाखान याने विनंती केली की 'माझ्याबरोबर तोफा आदींचा सरंजाम देण्यात यावा.' बादशहांनी पुढीलप्रमाणे सरंजाम पुरविण्याची आज्ञा केली –

१) शंभर सैनिक (अहदी, शिलेदार) २) शंभर बर्कंदाज (बंदूकची), ३) शंभर बहेलिये ४) सरब व दारु (बंदुकीची) पंधरा मण ५) शंभर बाण (राकेटवजा) ६) पन्नास बाणदार ७) दहा सक्का (पाणी वाहणारे), ८) दहा गुर्जबर्दार (दंडधारी निरोप्ये)

खेळण्याच्या (विशाळगड) वेढयात कामगिरी बजाविल्याबद्दल शाकिरखान विजापुरी व त्याचा पुतण्या अब्दुलगनी यांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

भास्करराव हरकारा याला बादशहांनी विचारले 'येथून इस्लामगड उर्फ रायरी (रायगड) व दंडराजपुरी हे अंतर किती आहे?'

त्याने उत्तर दिले 'खेळण्याहून एका मार्गाने हे अंतर बासष्ट कोसाचे आहे.'

बादशहांनी विचारले 'सुरत बंदराहून बऱ्हाणपूरचे अंतर किती?' त्याने उत्तर दिले 'एकशे चाळीस कोस.'

राणोजी घोरपडे याचा मृत्यु

हरकाऱ्यांच्या तोंडून खालील बातमी कळली

'संताजीचा मुलगा राणोजी याने वाकिण खेडयाच्या (तालुके सुरपूर जिल्हा गुलबर्गा, कर्नाटक) तालुक्यातील चंदनगढीला वेढा घातला होता. तो स्वार होऊन निघाला. बेडरांशी त्याचे युद्ध झाले. युद्धात त्याला बंदुकीची गोळी लागली आणि तो नरकाला गेला.

बावीस मार्च– आज्ञेप्रमाणे तरबियतखान हा शेरदहान (व्याघ्रमुख) तोफ बेदारबख्त याच्या मोर्च्यात पोहोचवून आला. त्याची कमी केलेली मन्सब बहाल करण्यात आली. त्याचा मुलगा मुहंमद इसहाक याची मन्सब वाढविण्यात आली.

हमीदुद्दीन खान बहादूर व फजायलखान हे फतेहुल्ला खानाचे मोर्चे पहाण्यास गेले होते. मोर्चे पाहून ते परत आले. त्यांनी तेथील हकीकत बादशहांना सांगितली.

खाशांच्या बंदुकींचा दारोगा (अधिकारी) मस्त अली याला बादशहांनी आज्ञा केली की शहाजादा मुइजुद्दीन सुभेदार मुल्तान (हा पुढे जहांदारशहा या

नावाने इ. स. १७११ मध्ये गादीवर आला) याला एक, दोन नळ्याची बंदूक द्यावयाची आहे ती मला दाखविण्यासाठी घेऊन या.

राव मानसिग (जाधव), मरहूम अर्शदखान याचा जावई मीर महमूद हे आज बादशहांना येऊन भेटले.

अहदीचा पगार वाटप करणारा बक्षी फजलुल्लाखान याला बादशहाजादा मुहंमद मुअज्जम बहादुरशहा (काबुलचा सुभेदार) याचा मीर बक्षी म्हणून नेमण्यात आले.

बुऱ्हाणपुरच्या बातम्यांवरुन पुढील हकीकत कळली-

'चोरांचे (मराठ्यांचे) बारा हजार स्वारांचे सैन्य सुल्तानपूर नंदूरबार भागांत हालचाली करीत होते. ही बातमी तेथील फौजदार हसन अलीखान याला लागली. तो त्वरेने त्यांच्यावर चालून गेला. युध्द झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रूचे अनेक सैनिक ठार अगर जखमी झाले. स्वतः हसन अलीखान यास असंख्य जखमा होऊन तो मैदानात कोसळला. चोरांनी (मराठ्यांनी) त्याचे प्रेत उचलून नेले. हसन अलीखान याचा हत्ती घोडे इत्यादी सारा सरंजाम लुटला गेला.'

वरील माहिती मिळाल्यानंतर बादशहांनी सुल्तानपूर नंदुरबारच्या फौजदारीवर मामूरखान याची नेमणूक केली. त्याला एक हजार जात व तीनशे स्वार अशी मन्सब होती. तीत सहाशे स्वारांची भर घालण्यात आली. मामूर खानाला खिलतीची वस्त्रे देण्यात येऊन त्याला (नंदुरबारकडे जाण्यास) निरोप देण्यात आला.

संगमनेरच्या बातम्यांवरुन पुढील हकीकत कळली- 'हलकट' गनिमांचे (मराठ्यांचे) सरदार रामा(जी) व माणको(जी) हे तीन हजार स्वार घेऊन या जिल्ह्यात हालचाली करीत होते. ही बातमी लागताच तेथील फौजदार अमानतखान (हाच पुढे १७२४ मध्ये मुबरिजखान या नावाने हैद्राबादचा सुभेदार असताना साखरखेडयाच्या लढाईत मारला गेला.) हा त्वरेने त्यांच्यावर चालून गेला. युद्ध झाले. शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रूचा सरदार माणको (जी) हा नरकाला गेला. बादशाही सैन्यातील अनेक माणसे कामी आली. शत्रू पराभव पावून पळून गेले.'

बादशहा म्हणाले ' सेवेचा मजुरा झाला. सेवा मान्य झाली.'

काजीउल्कुजात (मुख्यकाजी) अकरमखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली-

' सुभे मुहंमदाबाद (नांदेड बीदर)मधील सोन (गोदावरीच्या कांठावरील सोन असावे, निर्मल तालुका, जिल्हे आदिलाबाद, आंध्र प्रदेश) येथील पाटील याने नवस केला होता की ' आपल्याला मुलगा झाला तर मी तो बादशहाला

जयसिंग याजकडे एक तलवार आणि दहा तोळे गुलाबाचे अत्तर पाठवा. खेळणा किल्ला फत्ते झाल्यावर त्याच्यावर कृपा (बढती वगैरे) करण्यात येईल.

बादशहा म्हणाले ' चांदीच्या नाण्यांचा संच तयार करून ठेवा. फत्ते झाल्यावर आम्ही खेळण्याचा किल्ला पाहाण्यास जाऊ, तेव्हा खैरात (दान धर्म) करण्यात येईल.

बादशहांना कळविण्यात आले की चिकोडीचा जमीनदार(देसाई)देवण्णा(?) हा तरबियतखानाला भेटला. त्याने देवण्णाला घेऊन हुजुरात यावे अशी आज्ञा झाली.

आज्जमतारागड सातारा) येथे गोविंद हरकारा याचा गुमास्ता होता. त्याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले–' धना (जी) जाधव व दादो मल्हार या सरदारांनी सुपे (?) लुटले या नंतर ते कोंडाण्याकडे गेले. खान नुस्रतजंग (जुल्फिकारखान) हा त्यांच्या पाठलागावर बहादुरगड (पेडगाव) ला गेला आहे.

तेरा मे–शहाजादा मुहंमद बेदारबख्त याने आपला वकील सुल्तान नजर याच्या द्वारे बादशहाकडे पत्र पाठविले ते बादशहानी नजरेखालून घातले.

बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान हा मोर्च्यातून हुजुरात आला आहे असे ख्वाजा मंजूर याने कळविले. बादशहांनी त्याला बोलविले आणि त्याच्यापाशी किल्ल्या संबंधी चौकशी केली. रुहुल्लाखान याने सांगितले ' हल्याच्या दिवशी राजा जयसिंग वगैरेंनी उत्कृष्ट कामगिरी केली. शहाजाद्यांचा नोकर मलिक रसशी हा तल्वार व खंजीर वगैरे घेऊन निकराने लढत असता मारला गेला. ही मंडळी कृपेची आशा करून आहेत. बादशहांनी विनंती मान्य केली. राजा जयसिंग, जमशीदखान विजापुरी, तोफखान्याचा दारोगा मन्सूरखान व त्याचा मुलगा मुहंमद काजम, इत्यादींच्या मन्सबी वाढविण्यात आल्या.

चवदा मे– शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादुर हा आज मोर्च्याहून येऊन बादशहाना भेटला. बादशहा त्याला म्हणाले 'शाब्बास, आफरीन बाद,खूप कामगिरी केली. खूप मेहनत केली. सेवेचा मजुरा झाला.' बादशहांनी त्याला वीस हजार रुपयेचा शिरपेच आणि एक खंजीर देऊन मोर्च्याकडे परत जाण्यास त्याला निरोप दिला.

बुऱ्हाणपूरच्या बातम्यावरून कळले की तेथील मन्सबदार फाजिलखान अडीच हजार जात व एक हजार स्वार अशी मन्सब असलेला, मरण पावला. त्याचा मुलगा अब्दुर्रहीम याला हुजुरात बोलावण्यात येऊन मन्सब देण्यात आली.

पंधरा मे– आज शहाजादा बेदारबख्त व मन्सूरखान यांच्या नावाने आज्ञापत्रे रवाना झाली.

सोळा मे– आज शहाजादा बेदारबख्त याचे पत्र आले. पत्रात लिहिले होते– ' मी किल्ल्यावर हल्ला करून शत्रूंचा निःपात करू इच्छितो. बादशहांनी बेदारबख्ताचे म्हणणे मान्य केले. बादशहा बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याला म्हणाले ' तुम्ही उद्या सकाळी शहाजाद्याकडे जा.

फतेहुल्लाखान बहादुर (हा घाटावरील मोर्च्यावर होता) यांच्यासाठी पाचशे रुपये किमतीचा एक शिरपेच व एक मेणा तयार ठेवण्याची आज्ञा करण्यात आली.

शमशीरबेग हा सरब व बारुद (बंदुकीची दारु) आणण्यासाठी बनीशहा दुर्गाला (पन्हाळगड) गेला होता तो अद्याप आला नाही असे कळले. पण अकबराबाद आग्रा येथून आणविलेले दोनश पचाऐंशी मण बारुद व दहा मण सरब हुजुरात आहे.

मुर्तुजाबाद मिरजेचा किल्लेदार अश्रफखान याचा मुलगा पीर मुहंमद हा आज येऊन बादशहांना भेटला. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात येऊन त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

अमानुल्लाखान हा घाटाखाली होता. तो येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी त्याला एक अंगठी बक्षीस म्हणून दिली. अंगठीवर अमान ही अक्षरे कोरली होती. बादशहा म्हणाले कागद पत्रात ती उमटवीत जा.'

(अमानल्ला हा पुढे शहाजादे मुअज्जम व आज्जम यांच्यातील आठ जून १७०७ च्या जाजाऊच्या युध्दात मारला गेला.)

बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान हा आज्ञेप्रमाणे शहाजादा मुहंमद बेदारबख्त याच्या मोर्च्यावर गेला आहे असे बादशहांना कळविण्यात आले. खानदेशचा सुभेदार बहरोजखान याच्या नावे बादशहांचे पत्र रवाना झाले.

जमशीदखान विजापुरी याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

फतेहुल्लाखान बहादुर याला खेळणा (विशाळगड) किल्ल्याच्या मोर्च्यात दगडांचा मार बसला होता. तो बरा झाला. तो येऊन बादशहांना भेटला. बादशहा म्हणाले 'आफरीन बाद, धन्य धन्य, तुम्ही खुप मेहनत घेतली, उत्कृष्ट कामगिरी केली. तुमच्या सेवेचा मुजरा झाला. बादशहांनी त्याला सातश रुपयांचा शिरपेच दिला. बादशहा त्याला म्हणाले 'शहाजादा मुहंमद बेदारबख्त हे खेळणा

किल्ल्यावर हल्ला करणार आहेत. तुम्ही पण (घाटावरील स्वत:च्या मोर्च्यावरून) हल्ला चढवावा. बादशहा हे फतेहदौलत कौल याला म्हणाले 'फतेहुल्लाखान यांच्यासाठी मेणा त्यांच्या डेऱ्यावर पोहोचवा. त्याच मेण्यातून ते मोर्च्यावर जातील. हमीदुद्दीनखान बहादूर हे हुजुरात परत येतील.

शेख नूरुल्हक हा मुहतसिब (सार्वजनिक नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारा अधिकारी) होता. मुहरमच्या दिवसांसाठी आदिकखान, नेकनामखान व तहव्वुर खान यांच्या पथकांतील शंभर स्वार हे नूरुल्हकच्या दिमतीत देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

सतरा मे– पावसामुळे आज कचेरीचे काम बंद ठेवण्यात आले होते. बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान याने बादशहाकडे पत्र पाठविले. बादशहानी पत्र नजरेखालून घातले. पत्रात पुढील मजकूर होता 'यमाजी वगैरे दोन माणसे किल्लेदार परशुराम (परशुरामपंत प्रतिनिधी) यांच्याकडून आली. परशुरामचे म्हणणे आहे की 'आमच्या अपराधांची क्षमा करावी, जिवाचे अभयदान द्यावे. आणि काही रक्कम द्यावी म्हणजे किल्ला हवाली करून निघून जातो.' बादशहानी ते पत्र वाचून त्याचे तुकडे केले. याच बाबतीत बक्षी उल्मुल्क याने मीर जियाउल्ला याच्याद्वारे बादशहाकडे जे पत्र पाठविले ते बादशहानी नजरेखालून घातले.

बादशहाजादा मुहंमद कामबक्ष, शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादुर व बक्षी उल्मुल्क बहरामंदखान यापैकी प्रत्येकाकडे बादशहांनी अर्गुजाचे पेय पाठविले.

अठरा मे–बादशहानी आज्ञा केली की फतेहुल्लाखान बहादुर याच्या मोर्च्यातून लोखंडी गोळे आणवून घ्यावे आणि गुलालबारेत सुरक्षित ठेवावे.

बादशहानी आज्ञा केली की ' आमचे वास्तव्यस्थान (दौलतखाना) खोलगट जागेत आहे. मतलबखान व हमीदुद्दीनखान बहादुर यानी उंचावर आमच्या निवासासाठी एखादी जागा पाहून यावे.

शहाजादा मुहंमद बेदारबख्त याने पुढीलप्रमाणे विनंती पत्र पाठविले ' जमशीदखान, मन्सूरखान वगैरेना बक्षीस द्यावे अशी माझी इच्छा आहे. दहा घोडे प्रत्येकी पन्नास मोहरांच्या किंमतीचे आणि आठ घोडे प्रत्येकी दोनशे मोहोरांच्या किंमतीचे त्याना द्यावे, विनंती मान्य करण्यात आली.

मुहंमद आकिल कंबू व दादप्रभू हे कोकणचा जमीनदार खेम सावंत याला बोलावून आणण्यासाठी फर्मान व खिलतीची वस्त्रे घेऊन गेले होते. पण खेम सावं-

ताची इच्छा बादशाही चाकरीत येण्याची दिसली नाही. त्यामुळे त्यांनी फर्मान व वस्त्रे परत आणली. फर्मान ख्वाजा मंजूर याच्या हवाली करावे अशी आज्ञा झाली.

एकोणीस मे – फतेहुल्ला खानाच्या मोर्च्याचा तोफची अबदालखान याने बादशहाची आज्ञा नसताना तोफांतून लोखंडी गोळे वापरले. त्यांची किंमत त्याच्या पगारातून कापून घेण्यात यावी अशी आज्ञा झाली. त्याने विनंती केली की मी मीर मोर्चेल (मोर्च्या प्रमुखाच्या) आज्ञेने केले त्याने बादशहा म्हणाले 'हा तोफची कुणाचा नोकर आहे, आमचा की मीर मोर्चेलचा?' मिरजेचा किल्लेदार शेरीफखान व त्याचा मुलगा अहमदसर याची मन्सब वाढविण्यात आली.

तळावरून (ब्रम्हपुरीच्या) बातमी आली की हिंदुस्थानहून (उत्तर भारतांतून) खजिना येथे चोवीस जिल्हज रोजी दाखल झाला. अकरा मे १७०२ बरोबर हत्ती खान्याचे हत्तीही आले आहेत.

वीस मे– ख्वाजा महरमखान याने विनंती केली की जुल्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (पंतप्रधान असदखान) हे मुजऱ्यासाठी हजर आहेत. आज्ञा झाली की मजुरा झाला. त्यांच्याकडे फळफळावळे पाठवून स्वतःच्या तंबूकडे परतण्यास निरोप देण्यात आला.

फजाइलखान हा आज्ञेप्रमाणे बादशहाचा निरोप घेऊन शहाजादा बेदारबख्त याजकडे गेला होता निरोप पोहोचवून तो परत आला. तो म्हणाला ' शहाजाद्यांनी रेवणीच्या बुरुजावर रेहेकले व जेजाले हे स्थापन केले आहेत. ते गनिमाचे पारिपत्य करीत आहेत. त्यांची विनंती आहे की ' मला एक मोठी तोफ देण्यात यावी म्हणजे ती बुरुजावर (रेवणीच्या) ठेवून गनिमांचे व्यवस्थित पारिपत्य करीन.'

बादशहांनी विनंती मान्य करून आज्ञा केली की अबदाल मिगदाशी याने शेरदहान तोफ अमीरुल उमरा (असदखान पंतप्रधान) च्या मोर्च्यातून काढून पूर्ण सामुग्रीसहित शहाजाद्यांच्या मोर्च्यावर पोहोचवावी.

संध्याकाळच्या समयी बादशहांनी फजाइलखान याला बोलाविले. त्याला काही सूचना देऊन त्यांनी त्याला शहाजादा बेदारबख्त याजकडे पाठविले.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले–

मीर आतिश तरबियतखान हा चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी गेला होता. त्याने चिकोडीचा जमीनदार (देसाई) देवमना (देवण्णा ?) याला

हसलअलीखान याचा वकील हुजुरात होता. त्याने पुढीलप्रमाणे विनंती केली– 'हसन अलीखान यांची नेमणूक शहाजहानाबाद (दिल्ली) सुभ्यात झाली आहे. त्यांच्यापाशी त्यांचेच नातेवाईक असे वीस मन्सबदार आहेत. त्यांनाही हसन अलीखानाबरोबर शहाजहानाबाद सुभ्यात नेमण्यात यावे.' विनंती मान्य करण्यात आली.

मरहूम फ लदारखान याची मुले व नातवंडे औरंगाबादेहून आली. त्यांना मन्सबी व बक्षिसे देण्यात आली.

रुहुल्लाखान मीरसामान याने विनंती केली की 'भाडधाने वाहने चालविणाऱ्यांचे पन्नास साठ हजार रुपये देणे राहिले आहे. तूर्त दहा हजार रुपये देणे राहिले आहे. तूर्त दहा हजार रुपये खाजगी महालांच्या खजिन्यातून देण्यात यावे' विनंती मान्य करण्यात आली.

पाच मे– काल रात्री रुहुल्लाखान याने बेदारबख्ताच्या मोर्च्यातून पत्र पाठविले होते. ते बादशहांनी नजरेखालून घातले.

सहा मे – यार अलीबेगने कळविले की 'सिद्दी याकूतखान याने माझ्यासाठी एक घोडा पाठविला आहे. तो मी सरकारात देऊ इच्छितो बादशहा घोडा पाहून खुश झाले.

बादशहांना कळविण्यात आले की 'यमाजी हा सरदार परशुराम (परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी) याचा आप्त आहे. तो परशुरामाचा वकील म्हणून बेदारबख्ताकडे आला. बेदारबख्ताने त्याला काही निरोप देवून किल्ल्यात पाठविले.

बादशहा हे खानाजादखानाला म्हणाले 'गढ नमुने (करडे नमुने) चा ठाणेदार अबुल्खैरखान याच्याकडे कोंडाणा रायगड इत्यादी किल्ल्यासंबंधीची माहिती मिळवून मला कळवा तो उद्या येथून जाईल तेव्हा त्याला निरोप देताना मी त्याला खिलतीची वस्त्रे देईन. वस्त्रे काढून ठेवा.'

बादशहांनी आज्ञा केली की चोरांच्या (मराठ्यांच्या) परिपत्यासाठी म्हणून दोन तोफा व ते ओढण्यासाठी हत्ती हे तरबियतखानाच्या फौजेत पोहचते करा.

सात मे – काल रात्री शहाजादा बेदारबख्त याने ख्वाजा अन्वरच्या हस्ते पत्र पाठविले ते बादशहांनी नजरे खालून घातले. शहाजाद्याने पत्रात म्हटले होते 'खेळणा किल्ल्याचा सरदार परशुराम हा सगळ्या उपद्रवाचा गड्डा (मायाये फसाप) आहे. आपण आज्ञा कराल तर मी किल्ल्यावर हल्ला करुन उपद्रवी लोकांची कत्तल करीन. मला सरब बारुद (दारु बंदुकीची), वगैरे तोफखान्याचा सरंजाम पुरविण्यात

यावा.' बादशहांनी विनंती मान्य करून आज्ञा केली की 'उपद्रवी लोक तुम्हाला येऊन भेटतील तर ठीक, नाहीतर त्यांचा वध करा.'

बादशहांनी रात्री करकराफीखान्याचा दारोगा हाजिकखान, छावणीचा कोतवाल मुहंमद अमीन व फतेह दौलत कौल यांना बोलविले. त्यांना पुढील प्रमाणे आज्ञा करण्यात आली– हल्ल्यासाठी म्हणून हाजिकखान याने चारशे कातड्याचे जामेनिमे, मुहंमद अमीनने ठठहरी, गंजचा दारोगा मस्तअली याने जबाले (चक्रासारखे फिरणारे अग्निबाण) व फतेह दौलत याने सरब व बारुद बंदुकीची दारू) पन्नास मण, हे हल्ल्याचे सामान शहाजादा बेदारबख्त याजकडे पोहोचते करावे.

काल बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान याने मोर्च्यावरून लिहून विनंती केली की 'आज्ञा होत असेल तर मी हुजुरात येतो.' बादशहांनी आज्ञा केली की 'तेथेच रहा.'

बाहशहांनी मीरतुजुक नुस्रतखान याला सजावली (अंमलबजावणीचा अधिकारी) म्हणून नेमले. त्याचे काम म्हणजे 'बादशहाच्या खास चौकीचे व निकटचे अधिकारी व सैनिक यांना खेळण्यावरील हल्ल्याच्या वेळी, शहाजादा बेदारबख्त याच्या मोर्च्यात पोहोचविणे.'

बादशहांनी पुढील मंडळींना खाशातून आंबे पाठविले– १) शहाजादा मुहंमद बेदारबख्त २) जुम्लतुलमुल्क अमीरुल उमरा (असदखान रतप्रधान), बक्षीउलमुल्क बहरामंदखान ४) हमीदुद्दीनखान बहादुर ५) अबुल्खैरखान वगैरे.

जुम्लतुलमुल्क अमीरुल उमरा (असदखान) हा खेळण्याच्या मोर्च्यावरून आला होता. तो बादशहांना भेटला. त्याला मोर्च्याकडे परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले. 'जुन्नरच्या जवळ जोधनचा किल्ला आहे. चोरांनी (मराठ्यांनी) तेथील किल्लेदाराला कैद केले आणि किल्ल्याचा ताबा घेतला आहे. बादशहांनी आज्ञा केली की या बाबतीत जुन्नरचा (शिवनेरी) चा किल्लेदार व फौजदार नसुल्लाखान व पट्ट्याचा फौजदार लोदीखान यांना लिहिण्यात यावे.

हिदायतकेश वाकियानिगार घासीराम याला आज्ञा झाली की 'पेडगावहून पुणे व चाकण ही किती लांब आहेत आणि गनिमांच्या मुलुखांतील कोंडाणा व राजगड ही किती लांब आहेत.'

त्याने कळविले की 'पेडगावपासून पुणे चाकण हीं गावे वीस कोसावर आहेत. राजगड हे चाळीस कोसावर आहे आणि कोंडाणा छत्तीस कोसावर आहे.

आठ मे– शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादुर याने आपला वकील सुल्तान नजर याच्याद्वारे बादशहांना पत्र पाठविले. ते बादशहांनी नजरेखालून घातले. पत्रात पुढील मजकूर होता– 'मी उद्या खेळण्याच्या किल्ल्यावर हल्ला करून शत्रूची कत्तल करणार आहे (मुफसिद म्हणजे भांडणारे, उपद्रवी).'

बादशहांनी या गोष्टीला मान्यता दिली. बेदारबख्ताकडे हल्ल्याच्या वेळी म्हणून शिरस्त्राण व सुगंधी अंगरखा ही पाठवावी अशी आज्ञा झाली.

नऊ मे– हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली–

शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादुर याने आज खेळणा किल्ल्याच्या रेवणीवर (प्रवेशद्वाराचे संरक्षण करणारा आणि त्याला झाकणारा बुरुज व तट) हल्ला चढविला. त्याच्याबरोबर पुढील सरदार आणि त्यांची पथके होती– खाने आलम, मुनव्वरखान, सर्फराजखान, राजा जयसिंग, जमशीदखान व रुहुल्लाखान. मराठे सरदारांबरोबर युद्ध झाले. शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. बादशाही सैन्यातील अनेक माणसे आणि राजा जयसिंग व जमशीदखान याचे अनेक सहकारी कामी आले अगर जखमी झाले. शहाजादा बेदारबख्त हा बादशाही सैनिकांना घेऊन रेवणीपाशी तळ देवून आहे. रेवणीवर हल्ला करण्याचा त्याचा बेत आहे. किल्ल्यातून मराठे हे हुक्का अतिशी (अग्नीबाण, रॉकेट) यांचा मारा करीत आहेत.'

बादशहांनी आज्ञा केली की 'शहाजाद्यांनी उपद्रवी लोकांची (मराठ्यांची) कत्तल करावी.

दहा मे – फजायल खान हा आजारातून बरा होऊन बादशहांना भेटला.. हिदायत केश (वाकियानिगार) हा आज्ञेप्रमाणे फौजेतून येऊन बादशहांना भेटला.

उस्मानखान करावल याच्या बरोबर जाण्यासाठी इज्जतबेग खुशमंजिल याला नेमले होते. तो आजारी आहे असे कळले. त्याच्या ऐवजी मरहूम संजरखान याचा मुलगा बहरोज याची नेमणूक करण्यात आली. बादशहा म्हणाले 'येथील छावणीपासून पेडगाव पर्यंत साखळीने अंतर मोजा, मजला निश्चित करा आणि परत या.' बहरोजने विनंती केली की 'माझा पुतण्या मुहंमद जाफर याला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे.' विनंती मान्य करण्यात आली. बादशहांनी बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याला पुढील प्रमाणे आज्ञा केली 'तुम्ही आज्जमताराागड (सातारा) चा फौजदार यासीनखान याला लिहा, उस्मानखान करावल याच्याबरोबर त्याने एक पथक द्यावे. ते पथक जाताना आणि येताना त्याच्याबरोबर राहील.

अकरा मे – हेर व हरकारा वेंकट यांच्या तोंडून पुढील बातमी कळली. 'शहाजादा मुहमद बेदारबख्त याने खेळणा किल्ल्याच्या रेवणीवर सैन्य जमविले आणि खाने आलम, मुनव्वरखान, राजा जयसिंग, सर्फराजखान, रुहुल्लाखान इत्यादींना बरोबर घेऊन रेवणीच्या बुरुजावर हल्ला केला. तेथे पोहोचल्यावर युध्द झाले. शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. शहाजाद्याचे निशाण तेथे लावण्यात आले. आता लढाई करीत प्रवेशद्वारापाशी पोहचत आहेत. बादशाही सैन्यापैकी अनेक जण कामी आले.

बादशहांनी शहाजादा व राजा जयसिंग वगैरेंच्याबद्दल धन्योद्गार काढले. त्यांनी हेरांना आठ होन व दोन दोन रुपये बक्षीस म्हणून दिले.

याच सुमारास अजीजुल्लाबेग मीर तुजुक हा आला. त्याने शहाजादा बेदारबख्त आणि इतर यांच्या कामगिरीची हकीकत सांगितली. बादशहांनी त्याला पंधरा अश्रफ्या बक्षीस दिल्या. शहाजादा बेदारबख्त याजकडे अर्गजाचे पेय व फळफळावळे फत्तेमुहंमद कौल याने घेऊन जावी अशी बादशहांनी आज्ञा केली.

राजपुत्र अकबर याचा मुलगा सुलतान बलंदअख्तर याला मुलगा झाला बादशहांनी त्याचे नांव फतेहकबरुल् मोमिनीन (मुसलमानांचा मोठा विजय) असे ठेवले.

बारा मे– बादशहा खानजादखानाला म्हणाले, 'तुम्ही रुहुल्लाखानाला (मोर्च्यातून) हुजुरात येण्याविषयी लिहा.

शहाजाद्याच्या मोर्च्याचा वाकिया निगार मीर असदुल्ला हा हुजुरात आला. त्याने सांगितले की रेवणीवरील हल्ल्यात शहाजादा, राजा जयसिंग आणि इतर अधिकारी यांनी खूप कामगिरी बजाविली. बादशहानी असदुल्लाला खिलतीची वस्त्रे दिली.

बादशहाना कळविण्यात आले की 'शहाजादा बेदारबख्त याने चोराच्या (मराठ्यांच्या) परिपत्यासाठी रेवणीच्या बुरुजावर रेहेकले (लहान तोफा) वगैरे कायम केले आहेत.' बादशहानी तिकडे दोन जेजाले पाठवावे अशी आज्ञा केली.

बादशहानी बक्षी उलमुल्क बहरामंदखान याजपाशी राजा जयसिंग याच्या मन्सबीची चौकशी केली. कळविण्यात आले की राजा जयसिंग यास दीड हजार जात व एक हजार स्वार (दोघोडी) अशी मन्सब व पन्नास लाख दाम (चाळीस-दाम म्हणजे एक रुपया) रोख इनाम त्याला मिळते. बादशहा म्हणाले, 'राजा

अर्पण करीन.' परमेश्वर कृपेने आणि बादशहाच्या आशिर्वादाने त्याला मुलगा झाला. बादशहांना अर्पण करण्यासाठी तो मुलाला घेऊन आला आहे.'

बादशहानी आज्ञा केली की, 'मुलाला अंतःपुरात पाठवा, त्याचे पालन पोषण होईल.'

काजी अकरम म्हणाला 'मुलाचे आई बाप म्हणतात आम्ही बादशहाच्या हुजुरात येऊन मुलाला अर्पण करू.' बादशहा म्हणाले त्याना घेऊन या. त्याप्रमाणे मुलाच्या आई वडिलांना आणण्यात आले. आई वडिलांनी मुलाला बादशहाच्या हवाली केले बादशहांनी मुलाला ख्वाजा मंजूर याजपाशी दिले आणि म्हटले 'मुलाला अंत.पुरात माहबंगा (?) हिच्यापाशी पोहोचता करा, म्हणजे त्याचे पालनपोषण होईल.'

बादशहांनी विचारले 'मुलाचे वय काय' आई वडील म्हणाले 'दोन वर्षे पाच महिने'

बादशहांनी विचारले 'मुलाचे आई वडील मुसलमान होतील काय?' ते या गोष्टीला कबूल नाहीत असे बादशहांना कळविण्यात आले.

तेवीस मार्च- बादशहांनी मरहूम सैफुल्लाखान याचा मुलगा मीर असदुल्ला याला शहाजादा मुहंमद बेदारबख्त याचे मोर्चे पाहून येण्याची आज्ञा केली.

सुल्तानपूर नंदुरबारचा माजी फौजदार हसन अलीखान याची मन्सब काढून घेण्यात आली.

आज्ञा झाली की मीरतुजुक (दरबारातील शिस्तीचा निरीक्षक) नेकनाम खान याला सजावली (अंमल बजावणीचा अधिकारी) लावून तरबियतखानाच्या फौजेत पाठवून देण्यात यावे.

सुभे माळव्याच्या बातम्यांवरून पुढील हकीकत कळली.–

'या सुभ्याचा दिवाण मीरकलान हा घरी बसूनच सरकारी कामकाज पाहात असतो.' कचेरीत येण्याची त्याला शक्ति राहिली नाही.' रुहुल्लाखानाने या बाबतीत तेथील माळव्याच्या) सुभेदाराला लिहावे अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की 'या राज्यात मुसलमानांच्याकडून किती कर घेण्यात येतो व हिंदूंच्याकडून किती याची माहिती अकरमखान (मुख्य काजी) याला देण्यात यावी.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'काल रात्री चोर (मराठे) किल्ल्यातून बाहेर पडले आणि फतेहुल्लाखानाच्या मोर्च्यावर चालून आले. ही बातमी मिळताच फतेहुल्लाखान, मुनीमखान (हा पुढे बहादुरशहा बादशहाचा

पंतप्रधान झाला) वगैरे अधिकारी सावध झाले. युध्द झाले. बाण बंदुकांचा वापर झाला. अनेक चोर (मराठे) मृत अगर जखमी झाले. बादशाही सैन्यातही अनेकजण जखमी झाले. चोर (मराठे) पळून किल्ल्यात परतले.

चोवीस मार्च - रुहुल्लाखान याने जाऊन शहाजादा बेदारबख्त याचे मोर्चे पाहून यावे अशी आज्ञा झाली.

मुहंमद अमीनखान बहादूर याचा भाऊ नजाबतखान (हा पुढे १७२४ मधे साखर खेड्याच्या लढाईत मारला गेला. याने पुढील प्रमाणे विनंती केली–

'माझे बंधू मुहंमद अमीनखान बहादूर हे अतिशय आजारी आहेत. कुणातरी हकीमाला त्यांचा उपचार करण्याची आज्ञा व्हावी.'

बादशहांनी प्रार्थना केली. त्यांनी जमजम (मक्केतील पवित्र विहिरीचे, आपल्याकडील गंगाजळा सारखे) चे पाणी दिले आणि खानाजादखान याजपाशी दोन हजार रुपये देऊन त्याला म्हटले ' तुम्ही महंमद अमीन खान बहादूर याला पाहून या व त्याला हे जमजमचे पाणी पाजा व मी प्रार्थना लिहिलेला कागद त्याच्या हाताला बांधा. दोन हजार रुपये मुहंमद अमीनखीन बहादूरच्या नावे खैरातीत खर्च करा.'

बादशहांनी उपचारार्थ हकीम मुहंमद मिहदी याला पाठविला. त्याने मुहंमद अमीन खानला पाहून येऊन सांगितले की ' ते फार आजारी आहेत. मी पाण्यात औषध कालवून त्यांना दिले. ते उलटून पडले.'

बादशहांनी आज्ञा केली की ' हमीदुद्दीनखान बहादुर व काजी अकरमखान यांनी जाऊन मुहंमद अमीन खान याला पाहून यावे.'

बादशहांनी आज्ञा केली की ' तरबियत खानापाशी जे सैन्य आहे ते त्यांचा भाऊ कामयाबखान याजपाशी तैनात करण्यात यावे.'

काल मीर आतिश तरबियतखान हा फतेहुल्लाखानाचे मोर्चे पाहून आला आणि त्याने बादशहांना तेथील हकीकत सांगितली. बादशहांनी आज्ञा केली की, 'हसन अलीखान हा चोरांच्या (मराठयांच्या) कैदेत गेला आहे. त्याची जहागीर बहाल ठेवण्यात यावी. त्याचा दिवाण (कारभारी) हुजुरात आहे. त्याने नंदुरबार सुल्तानपूरला जाऊन आपल्या धन्याच्या जहागिरीची काळजी घ्यावी.

बादशहाजादा मुहंमद आज्जमशहा याचा बदललेला बक्षी जलालुद्दीन खान याला हुजुरात बोलावण्यात आले होते. पण तो आला नाही. आपल्या जहागिरीतच बसून आहे असे बादशहांना कळविण्यात आले. त्याची जहागीर काढून घेण्यात यावी अशी आज्ञा झाली. (यानंतर एक मे १७०२ पर्यंतचे अखबार उपलब्ध नाहीत.)

मे १७०२

एक मे– आज बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले–

यमाजी हा साठ माणसे बरोबर घेऊन खेळणा (विशाळगड) किल्ल्याच्या बाहेर आला. तो राजा जयसिंग, सर्फराजखान व जमशीदखान याजपाशी आला. त्या मंडळीना शहाजादा मुहंमद बेदारबख्त याजकडे नेण्यात आले. इतर सरदार जिवाच्या भीतीमुळे किल्ल्यांतून बाहेर येऊ शकत नाही असे समजले.

बादशहांनी आज्ञा केली की तोफखान्याचा अधिकारी मन्सूरखान याने किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर बसावे आणि आतून बाहेर कोणी येत असेल तर त्याला त्रास देऊ नये त्यांनी हवे तिकडे जावे. त्यांना अडविण्यात येऊ नये.

काल रात्री शहाजादा बेदारबख्त याने एक पत्र लिहून मरहूम सैफुल्लाखान याचा मुलगा मीर असदुल्ला याजबरोबर ते बादशहाकडे रवाना केले. ते पत्र बादशहांनी नजरेखालून घातले.

दोन मे– बादशाही छावणीपासून पेडगावपर्यंतचा रस्ता पाहावा आणि मजला ठरवाव्या यासाठी बादशहांनी आज मतलबखान करावल, अरबबेग खुशमंजिल (मजला निरीक्षण करणारा अधिकारी) व ख्वाजा नेमतखान यांना मोजणीच्या साखळ्या बरोबर देवून रवाना केले.

नेमतखान याने विनंती केली की आमची व आमच्या पथकाची पगारबाकी फार थकलेली आहे. आमची स्थिती अतिशय त्रासाची झाली आहे.' बादशहांनी 'आज्ञा केली की 'तीन महिन्याचा पगार देण्यात यावा.'

मन्सूरबेग करावलबेगी हा आज्ञेप्रमाणे बादशहाच्या निवासस्थानापासून अमीरुल उमरा (असदखान पंतप्रधान) याच्या मोर्च्यापर्यंतचे अंतर साखळीने मोजून आला. त्याने कळविले की अंतर एक कोस आणि काही साखळ्या इतके आहे.

छावणीचा मुख्य वाकेनवीस शेख हिदायत हा होता. त्याचा नायब (दुय्यम अधिकारी) घासीराम हा होता. त्याने बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान याच्याद्वारे बाद-शहांना कळविले की ' बादशाही छावणीपासून (पेडगावचे) अंतर एका वाटेने

सव्वीस मजला आहे तर पाचगावच्या वाटेने बावीस मजला होतात. एकंदरीत अंतर पंच्याऐंशी कोस होईल.

किल्ले खेळणा यांचे नाव सखर अलना असे ठेवावे असे बादशहांनी ठरविले. हा अरबी भाषेतील शब्द असून याचा अर्थ होतो 'आमच्या साठी हा किल्ला ताब्यात आला'

तीन मे – उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग (भावी निजामुल्मुल्काचा बाप) याने ब्रम्हपुरीच्या तळावरुन पुढीलप्रमाणे विनंती पत्र पाठविले–'हमीदखान बहादुर (खान फीरोजजंगाचा भाऊ) याने चोरांच्या (मराठ्यांच्या) युध्दात मोठी कामगिरी बजाविली तो गनिमांचे पारिपत्य करील. बादशहाने विनंती मान्य केली नाही.

बुऱ्हाणपुराहून तीनशे स्वार नव्याने भरती होऊन आले होते. त्याना पगार म्हणून दहा हजार रुपये खासगी खजिन्यातून, (खजाना अंदरुन महल) देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

तरबियतखान याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले– 'माझ्यापाशी तैनात करण्यात आलेले अनेक सैनिक आणि अधिकारी अद्याप माझ्या येथे आलेले नाहीत तर सजावली (अंमलबजावणीचे अधिकारी) पाठवून ती माणसे माझ्याकडे पाठविण्याची व्यवस्था व्हावी. बादशहांनी विनंती मान्य केली नाही.

चार मे– काल रात्री बादशहांनी बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान याला बोलावून त्याच्याशी खलबते केली. बादशहा त्याला म्हणाले 'तुम्ही शहाजादा मुहंमद बेदारबख्त याजपाशी जा आणि तेथे रहा. शहाजादे सांगतील त्याप्रमाणे वागा.' त्याप्रमाणे रुहुल्लाखान हा आज शहाजाद्याकडे गेला.

गंज (बाजार) चा दारोगा (अधिकारी) याने पुढीलप्रमाणे कळविले– 'किल्ल्याच्या मोर्च्यासाठी एक हजार सहाशे जवाले (एक अस्त्र) तयार आहेत.' बादशहा म्हणाले 'आता त्यांची आवश्यकता नाही.'

बादशहांनी शमशेरबेग याला अमानुल्लाखानाच्या फौजेत तैनात करून पाठविले. त्याला निरोप देतेवेळी बादशहा फातेहा खैर (कुशलतेची) प्रार्थना पढले.

बाकीबेग हिंमतखानी हा तरबियतखानाच्या फौजेत होता. बादशहांनी त्याला हुजुरात बोलाविले.

छावणीत आणले आहे.' तरबियतखान हा येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी आज्ञा केली की तरबियतखान याने रेहकलाबार (शस्त्रे ठेवण्याचे आवार) मधे आपल्या तंबूशेजारी एक तंबू उभा करावा आणि त्यात चिकोडीच्या जमीनदाराला आपल्या देखरेखीखाली ठेवावे.

एकतीस मे– हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली– ' शहाजादा बेदारबख्त याने राजा जयसिंग, मन्सूरखान व जमशीदखान यांना रेवणीवर ठेवले. तो स्वत: बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान व खाने आल्म हे खाली उतरून आले आहेत. शहाजाद्याने रेवणी फत्ते झाल्याबद्दल आपल्या सहकाऱ्यांना प्रत्येकी एक घोडा बक्षीस दिला आहे.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की धनाजी जाधव हा कोंडाण्याकडे गेला असून खान बहादुर नुस्रतजंग (जुल्फिकारखान) हा त्याचा पाठलाग करीत शिरवळला पोहोचला आहे.

बऱ्हाणपूरच्या बातम्यांवरुन पुढील हकीकत कळली, –' गनिमांचा सरदार केशव (केसोचिमल?) हा दहा हजार स्वारांचे सैन्य घेऊन सुल्तानपूर नंदुरबारच्या परिसरात चालून गेला. त्याने खेडी उध्वस्त केली.'

बादशहांनी आज्ञा केली की 'गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी खानदेशचा सुभेदार बहरोजखान याला लिहिण्यात यावे.'

बावीस मे – शहाजादा मुहंमद रफीउल्कदर आणि मेवातचा फौजदार सय्यद वजीहुद्दीखान यांची विनंती पत्रे आली. ती बादशहांनी नजरेखालून घातली.

तेवीस मे – काल बादशहांनी फजाइलखानाबरोबर आपला कौल, पंजा (स्वत:च्या हाताचा ठसा उमटवलेले अभयपत्र) व निरोप देवून त्याला शहाजादा बेदारबख्त याजकडे पाठविले. त्या वस्तू पोहचवून फजाइल खान परत आला. त्याने पुढीलप्रमाणे कळविले–

खेळणा किल्ल्याचा हवालदार परशुराम याचे यमाजी (?) व इतर असे दोन वकील आले होते. शहाजाद्याने कौल व पंजा हे त्यांना दिले. ते घेऊन ते किल्ल्यात गेले.

बादशहांनी काही निरोप देऊन फजाइलखानाला शहाजाद्याकडे पाठविले.

चिकोडीचा जमीनदार देवमण्णा याला मीर आतिश तरबियतखान याने बादशहा समोर आणले, त्याचे हातपाय बांधले होते. त्याने तोंडात गवताची काडी

धरली होती. बादशहांनी त्याच्याकडे पाहिले आणि म्हटले 'अपराध माफ केले आहेत. हात मोकळे करा.' त्याने एक हजार रुपये निसार (ओवाळणी) म्हणून दिले. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

जुम्लतुल्मुल्क अमीरुल् उमरा (असदखान पंतप्रधान) हा मोर्च्याहून येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी त्याला चमेलीची फुले दिली. राव (दाद?) प्रभू या चार हजारी मन्सबदाराची मन्सब एक हजारांनी कमी करण्यात आली.

चोवीस मे– आज बादशहांनी दिवाणचे (कचेरी) काम बंद ठेवले. दिवसाचे एक प्रहर आणि सहा घटिका झाल्या असता बादशहांना कळविण्यात आले का बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान हा शहाजादा बेदारबख्त याच्या तळावरून आला आहे. त्याला काही विनंती करणे आहे. बादशहांनी त्याच्याकडून शहाजादा बेदारबख्त याचे पत्र मागविले. ते वाचून पाहिल्यावर बादशहांनी आज्ञा केली की रुहुल्लाखान आणि फजाइल-खान यांनी शहाजाद्याकडे जावे. संध्याकाळी रुहुल्लाखान याने बादशहाकडे एक पत्र पाठविले त्यात पुढील मजकूर होता– 'शहाजाद्यांच्या तैनातीत असलेला शुकूरखान विजापुरी याने परशुराम (परशुरामपंत प्रतिनिधी) याचा निरोप माझ्याकडे आणला आहे. आज्ञा झाली तर हुजुरांत येऊन मी तो निरोप कळवीन. बादशहांनी आज्ञा केली की इशाच्या नमाजानंतर (रात्री) यावे. त्याप्रमाणे रुहुल्लाखान हा बादशहांना भेटला आणि त्याने तो निरोप कळविला बादशहा म्हणाले ' उद्या तुम्ही शहाजाद्याकडे जा.'

पंचवीस मे – दुपारी बादशहांनी आज्ञा केली की 'तूर्त रुहुल्लाखान यांनी हुजूरात रहावे. फजाईलखान याने शहाजाद्यापाशी जावे. बादशहा हे हमीदु-द्दीनखान याला म्हणाले 'भाम्क हरकारा व चितू चिमणा यांना विचारा. याच्यापैकी कोणी (परशुराम पताला) याला ओळखतो काय ?'

चिकोडीचा जमीनदार दीना (?) याला खीलतीची वस्त्रे देण्यात आली. राणा अमरसिंग याचा नोकर गजसिंग याला पाचशे जात व शंभर स्वार अशी मन्सब देण्यात आली. बादशहा म्हणाले 'दौलत मंदखान उर्फ नथू (नेतू?) याचा मुलगा बख्तावरखान हा रेहेकलाबार (तोफा ठेवण्याची जागा) मध्ये आहे. तो परशुराम (परशुरामपंत) ला ओळखतो. सय्यद आरिफ कौल याने बख्तावर-खानाला शहाजादा बेदारबख्त याजकडे न्यावे.

तरबियतखानाच्या आणि सैन्याच्यामध्ये फतेहुल्लाखान, इस्लामबंदरचा (फोंडा किंवा राजापूर ?) ठाणेदार जाबिताखान याची खेळण्याचा किल्लेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याला हुजुरात बोलावण्यात आले. फजाइल खानाने विनंती केली की मला मदत म्हणून तीन घोडे देण्यात यावे. आज्ञा झाली की दीडशे मोहरा किंमतीचा एक घोडा बक्षीस व दोन घोडे वापरासाठी म्हणून देण्यात यावे.

सहा जून– रात्रीच्या दोन घटका राहिल्या असता बार अलीबेग याने खान मुहंमदच्या हस्ते पुढील अर्जी पाठविली. अर्जीत पुढील मजकूर होता– 'परशुराम वगैरे शत्रू हे निवाच्या भीतीने किल्ला सोडून गेले. शहाजादा मुहंमद बेदारबख्त याने किल्ला ताब्यात घेतला आहे. दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा (अधिकारी) व आपले इतर अधिकारी हे किल्ल्यात दाखल झाले आहेत.' बादशहा खुश झाले. त्यांनी नगारखान्याचा दारोगा मुहंमद अमीनखान याला म्हटले 'आज उत्सवाचा दिवस आहे (इम्रोज जश्न अस्त) उत्सवाच्या नौबती दोन घटकांपर्यंत वाजू द्या.' त्याप्रमाणे करण्यात आले.

एक प्रहर आणि सहा घटका दिवस आला असता सुल्तान नजर हा शहाजादा बेदारबख्त याजकडून पत्र व खेळणा किल्ला जिंकल्याचे प्रतीक म्हणून वीस तोळे वजनाची सोन्याची किल्ली घेऊन आला. याचवेळी सैफुल्लाखान हा मोर्च्यावरुन आला. त्याने विजयाची हकीकत सांगितली. रुहुल्लाखानाने पत्र पाठविले ते बादशहांनी पाहिले.

बादशहाजादा मुहंमद कामबक्ष, जुम्लतुल्मुल्क अमीरुल् उमरा (असदखान पंतप्रधान) बक्षी उल्मुल्क बहरामंदखान, खानाजादखान, हमीदुद्दीनखान बहादुर, काजी अकरमखान, मतलबखान, तहव्वुरखान वगैरे अमीर उमरावांनी किल्ला फत्ते झाल्याबद्दल बादशहाला अभिवादन करुन निसार नजरा म्हणून रकमा दिल्या.

बादशहांनी आज्ञा केली की 'खान सामानच्या कचेरीतील अलीरजा वगैरेंनी सामान जप्त करण्यासाठी किल्ल्यात जावे.'

बादशहा म्हणाले 'आम्ही किल्ला पहाण्यास जाऊ. हमीदुद्दीन खानबहादुर' व मतलबखान यांनी अमीरुल उमराच्या मोर्च्याकडून किल्ल्यात जाणारा मार्ग नीट करावा'

बादशहांनी फराशखान्याचा मुशरफ मुहंमद जमान याला सांगितले 'मंगळवारी पेशखाना (आघाडीचे तंबू) रवाना करा. गुरुवारी आम्ही येथून रवाना होणार.

बख्शी उल्मुल्क बहरामंदखान याने बादशहाच्या परतीच्या वेळी त्यांच्याबरोबर राहणाऱ्या सैन्याचा व सेनाधिकाऱ्यांचा पुढील तपशील बादशहासमोर ठेवला–

सैन्याचा तूमार (मस्टररोल, तपशील), चाळीस हजार स्वार.

आघाडीला शहाजादा बेदारबख्त, उजव्या फळीला बादशहाजादा कामबक्ष जुम्लतुल्मुल्क असदखान (मुख्यप्रधान) डाव्या फळीला, बक्षी उल्मुल्क बहरामंद खान मध्यात, रुहुल्लाखान तरबियतखान चंदावल (पिछाडी) ला.

विशाळगडाहून परत : ७

जून १७०२

सात जून– बादशहाजादा कामबक्श याला एक तुर्की घोडा (खोगीर व सोनेरी साज या सहित) बक्षीस म्हणून देण्यात आला. बक्षी उल्मुल्क बहरामंदखान याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. तुम्ही घाटाच्या पलीकडे जा आणि लष्कराचे संरक्षण करा अशी त्याला आज्ञा करण्यात आली. सुलतान नजर वकील, नगार खान्याचा मुश्रफ मुहंमद हाजम, तरबियतखान, मतलबखान, यानी खेळण्याच्या विजयाबद्दल निसार (ओवाळण्या) दिल्या.

इस्लामबंदरचा ठाणेदार जाबिताखान याची खेळण्याच्या किल्लेदारीवर नेमणूक झाली होती. तो येऊन बादशहाला भेटला.

बाकरखान हा आपला भाऊ रुहुल्लाखान याजबरोबर येऊन बादशहाला भेटला. बादशहांनी आज्ञा केली सैन्याच्या बाजार बुणग्याच्या रक्षणासाठी अमानुल्लाखान याने उजवी फळी व मुहंमद काजम याने डावी फळी सांभाळावी.

काल संध्याकाळी शहाजादा बेदारबख्त व रुहुल्लाखान हे खेळणा किल्यावरुन हुजुरात आले. बादशहा हे शहाजाद्याला म्हणाले 'शाबास, आफरीन बाद, किल्ला घेण्यात तुम्ही उत्कृष्ट कामगिरी केली. तुमच्या सेवेचा मजुरा झाला.'

राजा अवधूतसिग (ओर्घ्याचा राजा) याला मुहंमद अमीनखान बहादुर याच्या फौजेत तैनात करण्यात यावे अशी आज्ञा झाली.

बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'राजा जयसिंग हा शहाजादा बेदारबख्त बहादुर याच्या फौजेत तैनात आहे. त्याला म्हणावे 'तुमच्या मन्सबीत पाचशेची

वाढ करण्याबद्दलची तजवीज झाली आहे. त्याबद्दल अभिवादन (तसलीमात) करावे. हरावली (आघाडी)ला शहाजादे रहातील. त्यांच्या आणि पेशखान्याच्या (पुढील मुक्कामावर पाठवायचा सरंजाम) मध्ये तुम्ही आपला तळ द्यावा.

करावलांची (टेहेळे) नेमणूक करण्यात आली– त्यांच्या पथकांची रचना पुढील प्रमाणे करण्यात आली–उजव्या फळीला यक्काताजखान (तुकंताजखानाचा बाप आणि अहमदनगरचा शेवटचा निजामी किल्लेदार कवीजंग याचा आजा), डाव्या फळीला शमशेरबेग, पिछाडीला खुस्रौखान.

हिदायत केश याने कळविले की अंतर मोजण्यासाठी उस्मानखान करावल हा पेडगांवला गेला होता. त्याने पुढीलप्रमाणे लिहिले आहे– 'मी घाटरावी पर्यंत पोहोचलो आहे. हुजुरांच्या छावणीपासून कऱ्हाडाबादच्या वाटेने तेरा मजला होतात.'

बादशहांनी विचारले 'येथून कऱ्हाडाबाद (कऱ्हाड) किती लांब आहे? विनंती करण्यात आली की 'नऊ मजला होतील.' यादी मजलांच्या अधिकाऱ्याकडे देण्याची आज्ञा झाली.

आठ जून– आज एक प्रहर दिवस आला असता बादशहा हे खेळणा किल्ला पाहण्यासाठी तख्तेखावर बसून निघाले. ते किल्ल्याच्या जवळ आले. त्यांनी फतेहुल्लाखानाचे व मुनीमखानांचे मोर्चे पाहिले. मग ते किल्ल्यात गेले. फतेहुल्लाखान बहादुर त्यांना भेटला. त्याने बादशहांना चार घोडे, एक कटयार व एक बांक (बाकपट्टा) या वस्तू नजर केल्या. यानंतर मुनीमखान हा बादशहांना भेटला. त्याने माशांच्या दातांची मूठ असलेला खंजीर त्यांना नजर केला.

बादशहा मलिक रीहानच्या दर्ग्यावर गेले. तेथे ते फातेहा पढले. त्यानंतर ते खपरेल (कौलार, खापर)च्या मशिदीत गेले. तेथे प्रार्थना पढले. त्यानंतर ते तख्तेखांवर बसून शहाजादा बेदारबख्त याचे मोर्चे पाहण्यासाठी कोंकणी दरवाज्याकडे गेले. याच सुमारास शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादूर हा त्यांच्यापाशी आला. त्याने बादशहाला मुजरा केला आणि नजर दिली. यानंतर राजा जयसिंग याने शंभर मोहरा नजर दिली. बादशहा त्याला म्हणाले, 'आफरीन बाद, वाहवा धन्यधन्य, शाबास,' त्यानंतर त्यांनी बुधसिंग (जयसिंग याचा प्रमुख अधिकारी) याबद्दल विचारले. राजा जयसिंग (सवाई जयसिंग) त्याना भेटला. त्याला बादशहा म्हणाले 'तुमचा दिवाण, बुधसिंग कुठे आहे ? राजा जयसिंग याने बुधसिंगाला उभे करुन म्हटले 'हाच तो बुधसिंग दिवाण.' बादशहांनी त्याची तारीफ केली आणि म्हणाले 'आफरीन बाद.' यानंतर बादशहा मशिदीत जोहर

(दुपारची) नमाज पढून किल्ल्यातून परतले आणि जाण्यायेण्यात एकंदरीत सव्वाचार कोसाचा प्रवास करुन दिवस मावळण्यास पाच घटिका राहिल्या असताना आपल्या मुक्कामावर आले.

वाटेत जुम्दतुल्मुल्क अमीरुल उमरा (पंतप्रधान असदखान) याने बादशहांना रत्नजडित वस्तू भेटी म्हणून दिल्या.

सकाळी फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद जमान याने विचारले 'आघाडीचे तंबू व सरंजाम (पेशखाना) हे वाहनांवर भरून पाठविण्यासंबंधी काय आज्ञा?' बादशहांनी आज्ञा केली की 'पुढच्या मजलेवर पेशखाना पाठवावा. नेकनामखान, व गुलाम मुहंमद यांनी हैदराबादी सैनिक (कौलार) घेऊन पेशखान्याबरोबर जावे.'

मरहूम अब्दुर्रजाकखान याची मुहंमद शरीफ व इतर दोन मुले आणि सिद्दी बलालखान हे बादशहाला भेटले.

मतलबखान करावल बेगी याने विनंती केली की 'उद्या येथून कूच करण्यासंबंधी काय आज्ञा?' बादशहा म्हणाले 'सुर्योदयाबरोबर आम्ही येथून कूच करणार.'

रात्री बादशहांना कळविण्यात आले की लष्करचे सामान वाहून नेण्याची वाहनांची वगैरे (बारबरदार) अद्याप व्यवस्था झाली नाही. काय आज्ञा?' बादशहा म्हणाले 'उद्या आम्ही येथेच मुक्काम करु'

जमाल कौल याला सरकारी रथ आणि गाड्या यांचा दारोगा (अधिकारी) म्हणून नेमण्यात आले. तक्तेखांचा दारोगा फतेह दौलत कौल याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

पुढील मंडळींनी वाटेत बादशहांना नजरा दिल्या–

१) बख्शी उल्मुल्क बहरामंदखान– पाचूच्या खड्याची आंगठी
२) बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान– तलवार
३) फजाइलखान– तलवार
४) मियानाखान धनुष्यबाण–
५) कल्बेअली–यमनी–लाल माणिक
६) ख्वाजामुसा–ग्रंथ
७) ख्वाजा जफरुल्ला–कट्यार
८) मतलबखानाचा मुलगा असदुल्ला–नीमचा तल्वार
९) मन्सूरखान–धूप (तल्वार)

१०) नुसरतखान–तल्वार

११) रणमस्तखान–तल्वार

(वरील नावावरून विशाळगड येथे औरंगजेबाच्या बरोबर असलेल्या अधिकाऱ्यात कोण कोण होते हे समजेल.)

नऊ जून – आज सकाळी एक प्रहर व चार घटका दिवस आला असता बादशहांनी न्यायदानाचे काम चालू केले पण पाऊस पडू लागल्यामुळे अदालत (न्यायदानाचे काम) थांबवून बादशहांनी दिवाणेखास (खलबतखाना) मध्ये काम केले.

बादशहांनी आज्ञा केली की एक घोडा, उधम नावाचा, चार हजार रुपये किमतीचा व एक घोडा तीनशे मोहरा किमतीचा, हे शहाजादा बेदारबख्त याला देण्यासाठी वेगळे काढून ठेवण्यात यावे.

बादशहांनी आज्ञा केली की–

'अमानुल्लाखान व मन्सूरखान यांनी सैन्याच्या उजव्या फळीची आणि मुनीमखान व त्याचा मुलगा मुहंमद काजम यांनी डाव्या फळीची व्यवस्था बरोबर आहे की नाही हे पाहात जावे.'

दंडराजपुरीचा किल्लेदार व फौजदार सिद्दी याकूतखान याचा मुलगा सिद्दी अजीज याला एक घोडा बक्षीस देण्यात येऊन त्याला आपल्या बापाकडे परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

नेकनामखान व तळाचा (ब्रम्हपुरी) किल्लेदार जाहिदखान यांच्या काय मन्सबी आहेत त्या चौकशी करून कळविण्याची आज्ञा झाली.

फत्तेहुल्लाखान बहादुर याला खिलतीची वस्त्रे, एक हत्ती, शिरपेच व आलमगीरशाही ही पदवी देण्यात आली. हमीदुद्दीनखान बहादुर यास खिलतीची वस्त्रे, एक हत्ती, एक शिरपेच (किमत तीनशे एक रुपये) या वस्तू देण्यात येऊन त्याच्या मन्सबीत (तीन हजार जात व दीड हजार स्वार) दोनशे स्वारांची वाढ करण्यात आली. ख्वाशांचा दारोगा खानाजादखान व तरबियतखान मीर आतिश यांना खास खिलतीची वस्त्रे देण्यात आली. बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान, मुनीमखान, मतलबखान मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम, यांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

बख्शी उलमुल्क बहरामंदखान याच्याकडे बादशहांनी फळफळावळाचे ताट पाठविले.

काल हैदराबादचा कानूनगो (देशपांडे बाबू (बापू) पंडित) याने बादशहांना नऊ मोहरा व दोन पिशव्या नागदूणच्या तरबियतखानाच्या मध्यस्थीने नजर

केल्या. बादशहांनी विचारले, 'नागदूणचे काय गुण आहेत'? त्याने सांगितले 'सर्पदंशावर गुणकारी आहे. विषाची बाधा होत नाही.'

बादशहांनी विचारले 'या किल्ल्याचे पूर्वी काय नाव होते?' सांगण्यात आले की किल्ल्याला विशाळगड म्हणत. मकहूर शिवा (परमेश्वर किंवा बादशहा यांच्या कोपाला बळी पडलेले मकहूर म्हणजे शिवाजी महाराज)ने किल्ला घेतला आणि त्याचे नाव खेळणा ठेवले.' बापू पंडितांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादूर याने विनंती केली की 'राजा जयसिंग हा उत्कृष्ट असा कामाचा माणूस आहे. आपल्याला नगारे नौबतीचा मान मिळेल अशी अपेक्षा बाळगून आहे.'

बादशहांनी म्हटले 'जयसिंगाचा बाप किशनसिंग (बिशनसिंग पाहिजे. बिशनसिंग बाप आणि किशनसिंग आजा) याला नगाऱ्याचा मान होता की नाही कळवा.'

रुहुल्लाखानाने यासंबंधीचे प्रकरण मांडावे अशी आज्ञा झाली.

दहा जून – आज दिवसाचा एक प्रहर झाला असता बादशहा तख्तेखांवर बसून खेळण्याहून कऱ्हाडकडे जाण्यास निघाले. तरबियतखान मीर आतिश याने येऊन मुजरा केला. चंदावली (पिछाडी)चे रक्षण करण्यासाठी त्याला निरोप देण्यात आला.

बादशहा त्याला म्हणाले 'सर्व लष्कर आमच्याजवळ येऊन पोहोचल्यावर तुम्ही पिछाडी वरून निघून या.'

बादशहा हे बेदारबख्ताला म्हणाले 'तयार रहा. तुम्हाला मी बेनीशहादुर्ग-कडे (पन्हाळगड) पाठवीत आहे.'

खेळणा किल्ल्याच्या विजयाबद्दल खालील मंडळींनी बादशहांना भेटी (नजरा) दिल्या–

१) कामयाबखान २) राजा अवधूतसिंग (उदितसिंग) ३) दिवाणेखासचा दारोगा मीर फतेहुल्ला ४) मुकरबखानाचा मुलगा खाने आलम ५) त्याचा भाऊ मुनव्वरखान ६) आणखी एक भाऊ अमीनखान (हा पुढे निजामाविरुध्द लढताना १७२४ मध्ये फत्तेखडर्याच्या लढाईत मारला गेला.)

खावशांचा दारोगा ख्वानाजादखान याला दोन हजार जात व चारशे स्वार अशी मन्सब होती. तीत पाचशेची वाढ करण्यात आली.

सव्वातीन कोसाची मजल मारुन बादशहा दुपारी तीन प्रहर दिवस आला असता अंबाघाट जवळील आपल्या मुक्कामावर घाटाच्या अलीकडे दाखल झाले. आज कचेरी बंद होती.

अंबाघाटचा ठाणेदार कामयाबखान (तरबियतखानाचा भाऊ), मरहमत खान, एतिमादखान, राजा जयसिंग, मुहंमद कामबख्श याच्या दिवाणखान्याचा दारोगा फतेहुल्लाबेग, अमानुल्लाखान इत्यादींनी बादशहाना नजरा दिल्या.

बादशहांनी आज्ञा केली की बेदारबख्तासाठी पंधरा हजार रुपये किमतीचा हत्ती व नऊ हजार रुपये किमतीचा हत्ती, एक घोडा व एक शिरपेच या वस्तू व जुम्दतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्य प्रधान असदखान) याच्यासाठी अलग काढून ठेवण्यात याव्या. फतेहुल्लाखान बहादुर आलमगिरीशाही बहादूर याला एक हत्ती बक्षीस म्हणून देण्यात आला. खानाजादखानाच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

फराशखान्याचा मुश्रफ मुहंमदजमान याने विचारले 'पुढच्या मजलेला आघाडीचे तंबू पाठविण्या संबंधी काय आज्ञा' बादशहा म्हणाले 'उद्या येथच मुक्काम आहे. मागचा सरंजाम आला की पेशखाना रवाना करा.'

अकरा जून– आज शुक्रवार कचेऱ्या बंद होत्या बादशहांनी बेदारबख्ताला एक ग्रंथ (कुराण) भेट म्हणून दिला.

बारा जून– आज बादशहांनी एक प्रहर पाच घटका दिवस आला असता न्यायदानाच्या कामाला सुरुवात केली. पुढील मंडळीना पावसाळ्यांत वापरण्यायोग्य अशी खिलतीची वस्त्रे देण्यात आली.) मतलबखान २) हकीम हाजकखान ३) फजाइलखान ४) महरमखान

शहाजादा बेदारबख्त याला हत्ती, दोन घोडे, सात हजार रुपये इत्यादी वस्तू देऊन बादशहांनी त्याला मुर्तजाबाद मिरजेकडे जाण्यास निरोप दिला. निरोपाच्या वेळी बादशहा फातेहा (प्रार्थना) पढले. त्याचे सहकारी जयसिंग, बख्शी एतिमाद खान मुनीमखान, काजम यांच्या मन्सबी वाढविण्यात आल्या. जाबिताखान याची खेळण्याचा किल्लेदार व फौजदार म्हणून नेमणूक झाली होती. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. त्याला एक तल्वार आणि खिलतीची पावसाळी वस्त्रे देण्यात येऊन त्याला निरोप देण्यात आला. शुकूरखान विजापुरी व बेदारबख्ताचा दुय्यम-बख्शी एतिमादखान यांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद नाजमान याने कळविले की, 'पेशखानद (आघाडीवर पाठविण्याचे तंबू) मागे राहिला आहे. तो अद्याप आला नाही.'

जमशीदखानाचा मुलगा सय्यद अहमद हा मोर्च्यात जखमी झाला, होता. तो वारला. नवाब जीनतुन्निसा बेगम हिने तळावरून (ब्रम्हपुरीच्या) पत्र पाठविले होते, ते बादशहांनी नजरेखालून घातले.

अबदालखान तोफचीबाशी याने विनंती केली की ज्यांच्यांनी शेरदहान तोफ शहाजादा बेदारबख्त यांच्या मोर्च्यात पोहोचवावी अशी आज्ञा झाली आहे, तर तोफा ओढणारे बैल व इतर सामग्री पुरविण्यात यावी. बादशहांना राग आला. ते म्हणाले 'अमानुल्लाखान याने कोल्हापुराहून सामान (तोफा वगैरे) आणले.'

बादशहांनी अबदालची मन्सब कमी केली आणि त्याची खान ही पदवी काढून घेतली.

सव्वीस मे– आज मुहूरमचा दहावा दिवस. आज नौबती बंद होत्या.

सर्फेखास (क्राउनल्यांड, खासगीचा प्रदेश) चा दारोगा हा पाच अनाथ पोरांना घेऊन बादशहाकडे आला. बादशहांनी पोरांना जवळ बोलाविले. त्यांच्या मस्तकावर हात ठेवला, त्यांना प्रत्येकी फळांच्या रिकाबी, रुपये, पावल्या, चवल्या दिल्या आणि त्यांना निरोप दिला.

कर्नूलचा किल्लेदार व फौजदार यूसफखान याने बेचाळीस मासे वजनाचा हिरा पाठविला, तो बादशहाच्या नजरेखालून गेला.

फजाइलखान हा शहाजाद्यांकडे बादशहांनी दिलेला निरोप पोहोचवून परत आला. शहाजादा बेदारबख्त हा मोर्च्यावरून येऊन बादशहांना भेटला. त्याने बादशहांना परशुराम (परशुरामपंत प्रतिनिधी) याच्या संबंधीची वस्तुस्थिती कळविली.

सत्तावीस मे– तरबियतखान मीर आतिश याला मुलगी झाली. त्याने बादशहांना नऊ मोहोरा नजर दिल्या. हिदायतुल्ला (इनायतुल्लाचा मुलगा, हिदायतुल्लाचा पुढे फर्रुखसीर बादशहाने वध केला) हा डोळ्याच्या दुखण्याने आजारी होता. तो बरा होऊन बादशहाला भेटला.

मरहूम दौलतमंदखान याचा मुलगा बख्तावरखान हा परसा (परशुरामपंत प्रतिनिधि) सरदार याला पाहाण्यासाठी म्हणून बेदारबख्ताकडे गेला होता. त्याने येऊन सांगितले की 'शहाजादे मला म्हणाले, तो सरदार बाहेर आला की त्याला बघून घे.'

अलीरजा या खानसामानच्या कचेरीच्या दारोग्याने विनंती केली की 'बारबरदारी (ओझी वाहाण्याच्या गाड्या वगैरे) चे सामान बेनीशहादुर्ग

(पन्हाळगड) येथे आहे. ते मागवून घेण्याविषयी काय आज्ञा?' आज्ञा झाली की गुर्जबर्दारांनी जाऊन सामान सामुग्री आणावी.

बादशहांनी आज्ञा केली की अमानुल्लाखान हा घाटाच्या पलीकडे होता. त्याच्या ऐवजी कामयाबखान (तरबियतखानाचा भाऊ) याने शमशेरबेग याला बरोबर घेऊन घाटाच्या पलीकडे तळ द्यावा.

जमशीदखान (विजापुरी) हा शहाजादा बेदारबख्त याजपाशी तैनात होता, त्याचा मुलगा मेला. त्याबद्दल जमशीदखानाकडे शोक वस्त्रे पाठवावी अशी आज्ञा झाली.

बादशहांना कळविण्यात आले की कृष्णा नदीत पूर आला असून एक पुरुषभर पाणी वाहात आहे. बादशहांनी नावांचा अधिकारी मुहंमद तकी याला पुढील प्रमाणे आज्ञा केली.–

'सध्या आपल्याकडे एकंदरीत किती नावा आहेत ते कळवा. तळ (ब्रम्हपुरी) व मुर्तजाबाद मिरजेहून नावा मुद्दाम गूर्जबर्दार पाठवून मागवून घ्याव्या. नावांच्या दुरुस्तीसाठी एक हजार रुपये देण्यात यावेत.'

परंड्याहून (जिल्हा उस्मानाबाद, मराठवाडा) खालील बातमी कळली–

'उम्दतुलमुल्कखान फीरोजजंग याने उत्तर भारतात जाणाऱ्या माणसांच्या थव्यासाठी (काफिला) म्हणून संरक्षक पथकं दिली होती. पथकांचे अधिकारी नाहरखान (याला तीन हजार जात व दोन हजार स्वार अशी मन्सब होती.) व संग्रामखान हे होते. संग्रामखान याला दिड हजार जात व सातशे स्वार अशी मन्सब होती. या अधिकाऱ्यांनी दारु पिऊन येथे दंगामस्ती केली आणि येथील लोकांचा छळ केला.' त्यांच्या मन्सबीत कमी करण्यात यावी अशी आज्ञा झाली. नाहरखानाची मन्सब पांचशे जात व दोनशे स्वार, संग्रामखान याची मन्सब पाचशे जात व दोनशे स्वार अशी कमी करण्यात आली.

अठ्ठावीस मे – बादशहाना पुढील प्रमाणे कळविण्यात आले– किल्ले खेळण्याचा सरदार परसा (परशुराम पंत प्रतिनिधी) याच्या अपराधांची क्षमा केल्याचे शाही फर्मान शहाजादा बेदारबख्त याने मुहंमद शुजा व घनःश्याम यांच्या बरोबर किल्यात पाठविले. परशुरामने ते फर्मान घेतले.

याच बाबतीत शहाजादा बेदारबख्त हा आपल्या दिवाणखान्याचा दारोगा लुत्फुल्ला याला म्हणाला 'तुम्ही किल्ल्याच्या बुरुजावर निशाण (झेंडा) लावा. चोर (मराठे) हे किल्ल्यातून बाहेर पडून निघून जातील.'

त्याप्रमाणे लुत्फुल्ला हा रेवणीच्या बुरुजापर्यंत पोहोचला. बंडखोरांनी (मराठ्यांनी) निनंती केली की, 'आता पाऊस पडत आहे. आमची बायका मुले आमच्या बरोबर आहेत. पावसाने जरा मोकळीक दिली तर आम्ही किल्ल्यातून बाहेर पडून निघून जाऊ.

बादशहाच्या भाग्याने मराठे आज उद्या निघून जातील.

रुहुल्लाखान याने लिहिले (मोर्च्यावरुन) की माझी मुले मुहमंद खलील व मुहंमद हसन ही हुजुरात आहेत, त्यांना माझ्याकडे येऊ द्यावे. त्यांनी रुहुल्ला-खानाकडे जावे अशी आज्ञा झाली.

एकोणतीस मे – बादशहांनी शेख हिदायत केश याला विचारले 'परळी जिंकून घेतल्यावर आम्ही कृष्णा नदी कोणत्या महिन्यात कोणत्या दिवशी ओलांडली ? त्याने उत्तर दिले 'आपल्या कारकिर्दीच्या चव्वेचाळीसव्या वर्षी मुहरम महिन्याच्या एकोणीस तारखेस आपण नावेत बसून कृष्णा ओलांडली. (पंचवीस जून १७००)

बादशहा हे मतलबखानाला म्हणाले ' तुम्ही कऱ्हाडचा ठाणेदार यासीनखान याला लिहा– 'टोकऱ्या (गोल नावा) तयार करवून कृष्णेत आणा. या कामासाठी मुद्दाम गुर्जबर्दार (दंडधारी) येथून पाठवा. बादशहांनी नौकादलाचा प्रमुख नुस्रतखान याला रवाना केले त्याला आज्ञा झाली की 'नावा मुर्तजाबाद (मिरज) व कऱ्हाड येथे आहेत. त्या दुरुस्त करवून कृष्णा नदीत आणाव्या. या कामासाठी पाच गुर्जबर्दार (दंडधारी) तैनात करा.'

पाईने बिलायत (पुणे प्रांत) हून पुढीलप्रमाणे लिहून आले–

धनाजी जाधव व रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) हे रंभाजी निंबाळकराला बरोबर घेऊन आहेत. त्यांच्यापाशी तरबेज असे सैन्य आहे. त्यांनी रंभाजी निंबाळकरला व पुरंदर भागात त्याच्याबरोबर दादो मल्हार याला पाठविले. ते स्वतः प्रतापगडला नरकवासी रामा (राजाराम) याच्या पत्नीपाशी (ताराबाई) आले आहेत. दादो मल्हारचा पाठलाग करीत जूल्फिकारखान हा जेजूरीकडे गेला आहे.

दंडराजपुरीचा किल्लेदार व फौजदार सिद्दीयाकूतखान याने बादशहाकड पुढील विनंती पत्र पाठविले–

' खेळण्याचा किल्ला आता फत्ते होत आहे. मला आदिलखानी कोकण (दाभोळ ते गोवे) व निजामुलमुल्की कोंकण (कल्याण भिवंडी ते दाभोळ) यांची देशमुखी मिळावी.

विनंती मान्य झाली नाही.

तीस मे – हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली–

शहाजादा बेदारबख्त याने परशुरामाकडे (परशुरामपंत प्रतिनिधी), बादशहाचा कौल, अभयपत्र, फर्मान इत्यादी पाठविले. ते घेऊन जाणारे म्हणजे लुत्फुल्ला व राजा जयसिंग याचा एक अधिकारी (घनःश्याम) हे होते. फर्मान घेण्यासाठी परशुराम हा आपल्या वाड्यातून किल्ल्याच्या दरवाजापाशी अनवाणी आला. त्याने फर्मान, कौल अभयपत्र व बादशहाच्या पंजाचा (हाताचा ठसा) कागद ही आपल्या मस्तकावर धारण केली.

लुत्फुल्ला वगैरेना आपणही खिलतीची वस्त्रे देवू असे तो म्हणाला. यावर लुत्फुल्ला त्याला म्हणाला 'आम्हाला तशी आज्ञा नाही. यापेक्षा तुम्ही किल्ल्यातून बाहेर पडून निघून जाणे बरे.' परशुरामने म्हटले 'पावसामुळे किल्ल्याच्या बाहेर पडणे शक्य होत नाही. मला दोन दिवसांचा अवकाश देण्यात यावा.' शहाजाद्यांनी विनंती मान्य केली.

जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (असदखान पंतप्रधान) हा मोर्च्यावरून आला. त्याने मुजरा केला. त्याला मोर्च्याकडे परत जाण्यास निरोप देण्यात आला.

माहुली (?) चा किल्लेदार व फौजदार मुरादुल्लाखान याने पुढील प्रमाणे कळविले–

'गनिमांचा सरदार खंडेराव हा किल्ल्याच्या जवळ आला. मी गनिमांच्या पारिपत्यासाठी माझा मुलगा गुलाम मुहियुद्दीन व इतर यांना पाठविले. तोफा व बाण यांचा मारा केला. शत्रूचे बहिर्जी, शिवाजी व इतर पन्नास चोर (मराठे) हे मारले गेले. आमच्या हातात शस्त्रे व घोडे ही लूट आली. शत्रूचे उरलेले लोक पळाले नाहीत. ते जमीनदारांना म्हणू लागले 'तुम्ही चौथाई द्या' मी जमीनदारांना मना केले. त्यामुळे चोरांबरोबर मराठ्यांबरोबर) पुन्हा युध्द झाले. माधवरावही ठार झाला. शत्रू (मराठे) तोफेच्या गोळ्याच्या अंतरावर उभे आहेत रात्रंदिवस युध्द चालू आहे. मला कुमक पाठविण्यात येईल अशी आशा आहे. याशिवाय सुरब (शिसे) बारुद (बंदुकीची दारु) इत्यादी तोफांचा सरंजाम मिळावा.'

बादशहांनी विनंती मान्य केली. मन्सूरखान याने तिकडील किल्ल्यांतून मुरादुल्लाखानाला सरंजाम द्यावा अशी त्याला आज्ञा झाली.

औसा (जिल्हा उस्मानाबाद, मराठवाडा) येथे असलेल्या हरकाऱ्याने लहून पाठविले की 'शत्रूचा सरदार कृष्णा मल्हार हा पांच हजार स्वारांचे सैन्य

घेऊन मौजे रामपूरच्या परिसरात चालून आला. बादशाही छावणीसाठी बंजारी लोक धान्याची रसद बैलावर लादून चालले होते. शत्रूंनी रसद लुटली.' या बाबतीत उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याला लिहिण्यात यावे अशी आज्ञा झाली.

मुहंमदाबाद बीदरचा सुभेदार खुदाबंदाखान (शायस्ताखानाचा मुलगा) याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. त्याला एक ध्वज देण्यात आला.

एकतीस मे – शहाजादा मुहंमद बेदारबख्त याने काल रात्री एक पत्र पाठविले होते, बादशहांनी ते पत्र पाहिले पण त्याचे उत्तर दिले नाही. त्यांनी फजाइलखान यास हुजुरात बोलावून सांगितले की 'तुम्ही जाऊन शहाजादा बेदारबख्ताला हा निरोप द्या– 'तो उपद्रवी भांडखोर (मुफसद) परशुराम हा अद्याप किल्ल्यातून बाहेर पडला नाही. हा सगळा संघर्ष त्यांच्यात एकवटला आहे. तो या भांडणाचा गड्डा आहे (मायायेफसाद) तो किल्ल्यातून बाहेर पडला तर ठीक, नाही तर किल्ल्यावर हल्ला करा.'

तरबियत खानाला आज्ञा झाली की एका रात्रीत लाकडाच्या पन्नास ठरे- ह्न्या (हल्ल्यात वापरण्यासाठी लाकडी फळ्या) तयार करा आणि मला कळवा. वजीरखान मरहूमचा मुलगा सय्यद मुहंमद वाकनीस याने मोर्च्यावरुन पत्र पाठ- विले होते, ते बादशहांनी नजरेखालून घातले.

जून १७०२

एक जून – बादशहाजादा कामबख्श याने विनंती केली की ' माझ्या पागेतील मुख्य घोडा जाया झाला आहे. खाशाच्या घोड्यांपैकी एक मला देण्यात यावा. या शिवाय मला आठ अरबी व कच्छी घोडे देण्यात यावे आणि त्यांची किंमत माझ्या रकमेतून वळती करुन घेण्यात यावी.

हमीदुद्दीनखान याने घोडे आपल्याला दाखवायला आणावे अशी आज्ञा झाली.

बादशहांनी काल रात्री खानाजादखान याला बोलावून सांगितले, 'तुम्ही अमी- रुल् उमराच्या मोर्च्यावर (असदखान पंतप्रधान याच्या मोर्च्यावर) जा. फतेहुल्ला खान बहादूर याला पुढील निरोप द्या–'सरदार परसा (परशुरामपंत प्रतिनिधि) हा अद्याप किल्ल्याच्या बाहेर पडला नाही. तुम्ही पण किल्ल्यावर हल्ला करा,'

खानाजादखान हा आज्ञेप्रमाणे निरोप घेऊन गेला. त्याने परत येऊन सांगितले की 'फतेहुल्लाखान म्हणतो 'मी प्रयत्नांची शिकस्त करीन आणि आपल्या आज्ञेप्रमाणे वागेन.'

बादशहांनी खेळणा किल्ल्याचा नकाशा मागविला. तो आल्यावर त्यांनी तो नकाशा बादशहाजादा कामबक्ष याला दाखविला.

शहांजादा मुहंमद बेदारबख्त याच्या फौजेतील वाकनीस एतिमादखान याने पुढील तपशील लिहून पाठविला–

'शहाजाद्याचे अधिकारी हे झेंडा घेऊन खेळणा किल्ल्याच्या दरवाज्यावर गेले. परमेश्वराच्या कृपेने आणि बादशहांच्या व्यवस्थेमुळे किल्ल्याचा सरदार (परशुरामपंत) हा आज बाहेर येत आहे. आज किल्ल्यावर झेंडा लागेल.

दोन जून– फतेह दौलत कौल हा बादशहाचा निरोप घेऊन शहाजादा बेदारबख्त याजकडे गेला होता. परत येऊन त्याने पुढील हकीकत सांगितली– 'शहाजाद्याने परशुरामाला बादशाही हुकूम कळविला. हुकूमात म्हटले होते की 'परशुराम किल्ल्यातून बाहेर पडला तर ठीक नाहीतर किल्ल्यावर हल्ला करून त्याला ठार मारा.' परशुरामने विनंती केली की 'पावसामुळे बाहेर पडणे शक्य होत नाही. पावसाने थोडा अवकाश दिला तर मी बाहेर पडून निघून जाईन.'

हे ऐकून बादशहा भयंकर चिडले. त्यांनी स्वतःच्या सहीचे पत्र लिहून फतेह दौलत कौल याजकडे दिले आणि त्याला म्हटले 'हे पत्र नेऊन तुम्ही शहाजाद्यांना द्या. त्यांना म्हणावे 'बादशाही कोप म्हणजे परमेश्वरी प्रकोपा-प्रमाणे आहे. परशुरामाला त्याची भीति वाटत नाही. शहाजाद्यांना म्हणावे 'परशुरामाला लवकर किल्ल्यातून बाहेर काढा, नाहीतर किल्ल्यावर हल्ला करा.'

सैफुल्लाखान याने शहाजादा बेदारबख्त याचे पत्र आणले होते. बादशहांनी त्याचे उत्तर स्वतः हातानी लिहिले आणि हमीदुद्दीनखान बहादुर यांनी मुद्दाम डाकेने ते पाठवावे अशी आज्ञा केली.

हमीदुद्दीनखान बहादूर यांनी (कामबख्शासाठी) नीलूफर नावाचा पाचशे मोहरा किमतीचा घोडा बादशहांना दाखविण्यासाठी आणला. बादशहांनी सांगितले 'बादशहाजादा कामबख्श यांच्यासाठी एक ढाल पण काढून ठेवा. किल्ल्यावर हल्ला होईल त्यावेळी ती ढाल त्यांना देऊ.'

बादशहांनी स्वतः लिहिलेले पत्र, फजाइलखानापाशी पाठविण्यात यावे म्हणून मुहंमद आरिफ कौल याला आज्ञा केली.

तीन जून– सकाळी मुहंमद आरिफ कौल याने फजाइलखानापाशी (मोर्च्यात). पत्र नेऊन दिले. परत येऊन त्याने पुढील माहिती दिली– शहाजादा

मुहंमद बेदारबख्त याने सरदार परशुराम (परशुरामपंत प्रतिनिधी) यांना सांगून पाठविले की ' तुम्ही किल्ल्यातून बाहेर पडून निघून जाणे बरे नाहीतर किल्ल्यावर हल्ला करून ठार मारीन.'

मीर अतिश तरबियतखान याला बादशहा म्हणाले, हल्ल्याचा सरंजाम शहाजादा बेदारबख्त यांच्याकडे पाठवा. मी हल्ल्यासाठी बादशहाजादा मुहंमद कामबख्श यांना पण पाठवीत आहे.

बादशहाजादा कामबख्श यांना हत्तीवरून गुलाल बारेत (बादशहाचे निवास स्थान) ये जा करण्याची परवानगी देण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की ' फतेहुल्लाखान बहादुर (हा घाटावरील दरवाज्यासमोरचे मोर्चे लढवीत होता.) याने शहाजादा बेदारबख्ताच्या मोर्च्यावर (कोकणी दरवाजा समोर) जाऊन शहाजाद्यांना पुढीलप्रमाणे सांगावे की ज्या वेळी आज्ञा होईल त्यावेळी परस्परांच्या सहकार्याने आपण किल्ल्यावर हल्ला करु.

चार जून– काल सूर्यास्ताच्या वेळी फतेहुल्लाखानाचे पत्र आले. पत्रात पुढील मजकूर होता–' हल्ल्याच्या बाबतीत तरबियतखान माझ्याकडे आला होता. मला (आपली) आज्ञा झाली आहे की मी बेदारबख्ताच्या मोर्च्याकडे जावे. मी हल्ल्यासाठी चारपांचशे मावळे तयार केले हल्ल्याच्या जागाही त्यांना नेमून दिल्या. उद्या हल्ला चढवावा असा मी बेत केला.'

पण परशुराम (परशुरामपंत प्रतिनिधि) हा किल्ल्याच्या तटावर आला. तो म्हणाला मला अभयदान मिळावे. मी किल्ला ताब्यात देतो. तुम्ही काय म्हणून हल्ला चढवीत आहात. किल्ल्यावर झेंडा (मोंगलांचा) लावण्याबद्दल शहाजाद्यां बरोबर बोलणे झाले आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की ' तरबियतखानाने फतेहुल्लाखानाकडून निघून हुजुरात यावे.'

काल रात्री शहाजादा बेदारबख्त याची अर्जी सैफुल्लाखान व सुल्तान नजर यांच्या हस्ते बादशहा पुढे ठेवण्यात आली. पत्रात पुढील मजकूर होता–

' किल्ल्यावर हल्ला करून शत्रूंना ठार मारावे असे मी ठरविले होते. या सुमारास सरदार परशुराम याने सांगितले की ' मी किल्ला देतो. तुम्ही काय म्हणून हल्ला करता.' यावर मी आपले बुधसिंग इत्यादी पन्नास सैनिक व अधिकारी यांना

त्यांच्याबरोबर दहा झेंडे देऊन पाठविले. किल्ल्यावर झेंडे लावण्यात आले आहेत शत्रू (मराठे) किल्ल्यातून बाहेर पडून निघून जात आहेत.'

बादशहा खूश झाले. हरकाऱ्यांच्या तोंडून पण वरील प्रमाणे बातमी समजली. बादशहांनी स्वतः पत्र लिहून आरिफ कौलच्या हस्ते शहाजादा बेदारबख्त याजकडे पाठविले.

पाच जून–काल रात्री फज इलखान हा शहाजादा बेदारबख्त याच्या मोर्च्यातून आला. त्याने पुढील हकीकत सांगितली–

'सरदार परशुराम याची एक विनंती आहे. 'ओझी वाहून नेण्यासाठी बरबर्दारी (वाहने जनावरे) माझ्यापाशी नाहीत. मला मिळावी. मी किल्ल्यातून बाहेर पडून निघून जाईल.'–

बादशहांनी पुढील प्रमाणे आज्ञा केली 'मस्त अली याने दीडशे बैल फतेह-दौलत कौल याजकडे द्यावे. ते तो शहाजाद्याकडे पोहोचवील. त्यांतून सरदार परशुराम याला लागेल तो सरंजाम देण्यात यावा आणि त्याला किल्ल्यातून बाहेर काढावे.'

काल रात्री रुहूल्लाखान याचे पत्र (मोर्च्यावरून) आले ते बादशहांनी नजरे खालून घातले.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– 'राजा अवधूतसिंग हा माझ्या वाटेवर येऊन बसला आहे. जीवाच्या भीतीने मी किल्ल्याच्या बाहेर पडू शकत नाही. आम्ही बाहेर पडताना आम्हाला अडविण्यात येऊ नये. अशा अर्थाची आज्ञा राजा अवधूतसिंग याला देण्यात यावी.'

बादशहांनी विनंती मान्य केली. ते खानाजादखानाला म्हणाले 'तुम्ही राजा अवधूतसिंगाला लिहा. सुहराब कौल याने पत्र घेऊन जावे परशुराम आणि त्याची माणसे यांना कोणी त्रास देऊ नये. त्रास देत असेल तर मना करावे.'

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

(परतीसाठी) आमच्या छावणीत असलेल्या सैन्याची रचना पुढील पद्धतीने करण्यात यावी. सैन्य चालत असता अधिकारी पुढील जागांवर राहतील.

हरावल– आघाडीला शहाजादा बेदारबख्त

उजव्या फळीला– बादशहाजादा कामबख्श

डाव्या फळीला– जुम्लतुल्मुल्क अमीरुल् उमरा (असदखान)

चंदावल पिछाडीला– तरबियतखान

यल्तमश (हरावलच्या मागे) रुहुल्लाखान

बादशहा म्हणाले 'आज आला तर पुढे रवाना करा नाहीतर आम्ही सोमवारी येथून कूच करू.

राजा जयसिंग याला शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेत तैनात करण्यात आले. त्याला खिलतीची वस्त्रे देऊन त्याला निरोप देताना बादशहा म्हणाले 'तुम्ही येथून निघून बत्तीस शिराळे येथे तळ द्या. मुहंमद अमीनखान माझ्याजवळ जेव्हा येईल तेव्हा तुम्ही बेदारबख्ताच्या तैनातीला जा. सरकारखानाचा मुलगा अब्दुल्कादर याला सरकारखान ही पदवी देण्यात आली. शेरखान मुहंमद हा सिद्दीयाकूतखान (जंजिरा) याजकडून घोडे, नजराणे वगैरे घेऊन आला होता. त्याला वस्त्रे देण्यात येऊन याकूतखानाकडे परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला. राजा अवधूतसिंग याने पाच महिनेपर्यंत खेळण्याच्या पायथ्याशी राहावे अशी आज्ञा झाली.

खानाजादखान मुनीमखान व त्याचा मुलगा मुहंमद काजम हे आज बादशहांना भेटले.

तेरा जून- जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्यप्रधान असदखान) याला पाच हजार रुपयांचा रत्नजडित शिरपेच व दोन हजार रुपये किमतीचा एक घोडा बक्षीस देण्यात आला.

खालशाचा दिवाण इनायतुल्लाखान याचा मुख्य कारभारी व शेख अब्दुल्हादी याचा मुलगा रहमतुल्ला याला मन्सब देण्यात आली.

खाने आलम (संभाजी राजांना धरणारा, मुकर्रबखानाचा मुलगा) व मन्सूरखान यांना पावसाळी वस्त्रे देण्यात येऊन त्यांना बेदारबख्ताच्या तैनातीत जाण्यासाठी निरोप देण्यात आला. शहाजादा बेदारबख्त याचा दिवाण रजातलबखान मरण पावला असे कळले.

चौदा जून- अजीजुल्ला कोरबेगी व सियादतखान (हा पुढे अहमदनगरचा शेवटचा मोगल किल्लेदार झाला) यांना वस्त्रे देण्यात आली.

जुन्नरचा फौजदार नसुल्लाखान याने आंब्याच्या चार करंड्या पाठविल्या होत्या. त्या बादशहांनी नजरेखालून घातल्या.

पंधरा जून- आज एक प्रहरपर्यंत कामकाज पाहून बादशहा अंतःपुरात गेले. पुढील मंडळींना पावसाळी वस्त्रे देण्यात आली–१) ख्वाजा मंजूर २) हाफिज अंबर ३) ख्वाजा अंबर, ४) ख्वाजा बख्तावर महली. मुहंमदबेग यास सखरलना (विशाळगड) किल्ल्यातील सामग्रीचा तहवीलदार (संरक्षक) म्हणून नेमण्यात आले.

खासगी जवाहिरखान्याचा मुश्रफ शेखजान मुहंमद याने विनंती केली की 'भाडयाचे उंट अद्याप आले नाहीत. बहुतेक सरंजाम घाटाच्या पलीकडे पडून राहिला आहे.' बादशहा म्हणाले 'काय करावे ? चे बायद कर्द.'

बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान याने विनंती केली की 'खेळणागडबद्दल सावधगिरी बाळगली पाहिजे.'

काल रात्री बादशहांनी शाम कौल याला विचारले 'घाटाच्या पलीकडे सरकारी सरंजाम पडला आहे तो इकडे हुजुरात आला की नाही ?' त्याने सांगितले की 'सर्व सरंजाम (कारखाने) आला आहे.' याच सुमारास कळले की बादशहांचा पेशखाना अद्याप आला नाही. बादशहा म्हणाले– 'दोन राहुटया व शामियाना पुढच्या मजलेवर पाठवून उभे करा. तेवढे पुरे.' रुहुल्लाखान याने आघाडीवरून मागे यावे अशी आज्ञा झाली. ख्वाजा मुहंमदखान याने विजापूरच्या बागेतून आलेले तीस आंबे बादशहासमोर ठेवले. बादशहांना कळविण्यात आले की या आंब्यांची झाडे बादशहांनीच लावलेली होती. बादशहांनी एक आंबा खाल्ला, पाच आंबे अमीरुल उमरा (असदखान मुख्य प्रधान) व काही आंबे रुहुल्लाखान व बेदारबख्त यांना देण्यात आले.

बादशहांनी आज्ञा केली की फतेउल्लाखान बहादुर याच्या पथकातील दोनशे स्वार त्याच्या जवळ ठेवावे. बाकीचे स्वार करावलांच्या (टेहेळणीस्वार) पथकात नेमावे.

जुन्नर (शिवनेरी) चा किल्लेदार व फौजदार मुईजुद्दीनखान याने आंब्याची करंडी पाठविली होती. ती बादशहाच्या समोर आणण्यात आली. (ओछर्याचा) राजा अवधूतसिंग (बुंदेलखंडात हे नांव उदितसिंग असे प्रचलित आहे.) याने आपल्या वकिलाच्या द्वारे पुढील प्रमाणे विनंती केली–

'मी सखरलना (विशाळगड)च्या पायथ्याशी आपला तळ द्यावा अशी मला आज्ञा झाली आहे. त्याबद्दल माझे काहीच म्हणणे नाही. पण माझी पथके मुहंमद अमीनखान बहादुर याजपाशी तैनात आहेत.'

बादशहा बहारामंदखानाला म्हणाले 'अवधूत सिंग (उदितसिंग) च्या वकीलाला सांगा-' अवधूतसिंगाने आमची आज्ञा नसताना आपली पथके मुहंमद अमीनखान याजकडे काय म्हणून पाठविली ? अवधूतसिंग हा किल्ल्याच्या (विशाळगड) पायथ्याशी तळ देऊन राहील तर ठीक, नाहीतर त्याची ओछर्याची जमीनदारी (राज्य) त्याच्याकडून काढून घेण्यात येईल.

सोळा जून – आज एक प्रहर दिवस आला असता बादशहा तख्तेखांवर स्वार होऊन खेळण्याच्या पायथ्याशी असलेल्या (अंबाघाट) घाटावरुन निघाले. त्यांनी हमीदुद्दीनखान बहादूर याला अंबाघाट येथे ठेवले. बादशहा त्याला म्हणाले 'तरबियतखान हा चंदावली (पिछाडी) चे नेतृत्व करीत आहे. तो येऊन पोहचल्यावर तुम्ही हुजुरात या.' यानंतर दीड कोसाची मजल मारुन बादशहा आपल्या मुक्कामावर पोहोचले.

मतलबखान याने चार चित्र पक्षी (हिंदीत तीतर म्हणतात.) व मुहंमद हयात याने (पाच लावे पक्षी) बादशहांना सादर केले. मुहंमद हयातच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

ख्वाजा बख्तावर महली याने अर्ज केला की 'फतेहुल्लाखान बहादुर यांनी एका नीलगाईची शिकार केली असून ती शिकार पाठविली आहे' त्याचे मांस बादशहाजादा कामबक्ष, अमीरुल उमरा (असदखान) आसारे शरीफ (पैगंबराचे काही अवशेष जेथे ठेवले होते ते छावणीतील स्थळ) चे कर्मचारी आणि ख्वाजा सरा यांच्यामधे वाटून देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

सतरा जून – आज अमीरुल् उमरा असदखान याजकडे फळफळावळ पाठविण्यात आले. बादशहाजादा मुहंमद आज्जमशहा (गुजरातचा सुभेदार) याच्या तैनातीत असलेला हर नारायण हा मुसलमान झाला. त्याला खिलतीची वस्त्रे व मन्सबही देण्यात आली. इनायतुल्लाखान याला पावसाळी पोशाख देण्यात आला.

मुहंमद अमीनखान बहादुर हा गनिमांचे (मराठ्यांचे) पारिपत्य करण्यासाठी गेला होता. तो परत येऊन आपल्या सहकाऱ्यांसहित बादशहांना भेटला. बादशहांना भेटलेली मंडळी अशी– हमीदुद्दीनखानाचा भाऊ नजाबतखान, सिद्दीकखान, अब्दुस्समदखान, ख्वाजाखान, खुशहालबेग, फौजेचा वाकनीस मुहंमद याहया फकीर बेग.

बादशहांनी आज्ञा केली की 'मुहंमद अमीनखान बहादूर हे चंदावल (पिछाडी) आणि लष्कर याच्या मध्ये तळ देतील आणि फत्तेहुल्लाखान बहादुर आलमगीरशाही हे सादतखानातर्फे करावल (आघाडीचे टेहेळे) म्हणून काम कर-तील.' लष्कराचे कूच चालू असताना करावलांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत लष्कराबरोबर चालावे अशी आज्ञा करण्यात आली.

इखलासखान मियाना यास बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) भागाचा फौजदार आणि कोल्हापूरचा ठाणेदार म्हणून नेमण्यात आले. त्याला पाच हजार जात व अठराशे स्वार अशी मन्सब होती. तीत पाचशे स्वारांची वाढ करण्यात आली.

आज्जमतारागड (सातारा) प्रदेशाचा फौजदार यासीनखान याच्याकडे पाईने विलायत (पुणे भाग) ची पण ठाणेदारी सोपविण्यात आली. तेथे पूर्वी इस्माईलखान ठाणेदार होता. त्याला बदलण्यात आले. यासीनखानाला दोन हजार जात व दीड हजार स्वार अशी मन्सब होती. तीत पाचशे स्वारांची वाढ करण्यात आली.

इस्लामपुरी (ब्रह्मपुरी) चा किल्लेदार मुरीदखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

इनायतुल्ला यास सखरलना (विशाळगड) चा बक्षी व वाकिया निगार म्हणून नेमण्यात आले. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली, 'सखरलना (विशाळगड) च्या शिबंदीची पगार बाकी आहे. ती रक्कम फतेह दौलत कौल याने किल्ल्यात पोहोचवून यावे.'

राजा अवधूतसिंग (उदितसिंग) याने किल्ल्यात (विशाळगड) रहावे म्हणून त्याला लिहिण्याची आज्ञा रुहुल्लाखान याला करण्यात आली.

बादशहा खानाजादखानाला म्हणाले 'फतेहुल्लाखान बहादुर याला निरोप पोहोचवा. त्याला म्हणावे 'तयार व्हा. मी तुम्हाला कोंडाणा (सिंहगड) आदी किल्ले जिंकून घेण्यासाठी पाठवीत आहे.'

खानाजादखान म्हणाला 'फतेहुल्लाखानची विनंती (पुढीलप्रमाणे) आहे– तो म्हणतो 'या सेवकाला आता नोकरी बजावण्याची शक्ती राहिली नाही. बंदा ताकते नोकरी न दारद.'

यावर बादशहा म्हणाले 'तुम्ही सेवक आहात म्हणून तुम्हाला काम सांगतो. नाहीतर दुसऱ्यांना आज्ञा करीन.'

ब्रह्मपुरीच्या तळावरून हरकाऱ्याने लिहून कळविले की उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग (भावी निजामुल्मुल्काचा बाप) याने (आपला भाऊ) हामिदखान बहादुर याजबरोबर हत्ती खाना आणि रसद ही हुजुरात पाठविली आहेत.'

बादशहांना कळविण्यात आले की फजाइलखानाचा तंबू न आल्यामुळे त्याला गुलालबारच्या ग्रंथालयात (किताबखान्यात) रात्र काढावी लागली.

हमीदुद्दीनखान बहादुर याने बादशहांना दोन हजार अश्रफ्या नजर (पेशकश) दिली.

रुहुल्लाखान याच्या पथकातील मुहंमद मासूम याच्या मन्सबीत वाढ करण्यात येऊन त्याला आज्ञा करण्यात आली की 'बऱ्हाणपूर व खुजस्ता बुनियाद औरंगाबाद) येथून एक हजार बेलदार आणि परशुधारी घेऊन या.'

मुहंमद फारुख खानजहानी याला आज्ञा झाली की ' औरंगाबाद व संगमनेर यथून बैल विकत घेऊन या.'

अठरा जून– फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद जमान याने विनंती केली की पेशखाना आला आहे पुढे रवाना करण्याविषयी काय आज्ञा ?' बादशहा म्हणाले ' रवाना करा.'

काल बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले– बादशहाजादा कामबक्ष यांच्या दोन राहुट्या व कनाती व अमीरुल उमरा असदखान याचे तंबू वगैरे सामान हे मागच्या टप्प्यावरून आणण्याची व्यवस्था केली होती. पण हमालीचे व भाड्याच्या जनावरांचे दर फार वाढले आहेत. दोन तीन रुपये देऊनही मिळत नाहीत. छावणीतील लोकांचे फार हाल चालले आहेत.

बादशहा म्हणाले ' काय करावे?'

एकोणीस जून– उस्मानखान करावल याने आज्ञेप्रमाणे छावणीपासून बहादुरगड (पेडगाव) पर्यंतच्या मजला निश्चित केल्या. त्याने येऊन सांगितले की ' दोन मार्ग आहेत. एका मार्गाने एकतीस मजला होतात. दुसऱ्या मार्गाने पंचवीस.'

बादशहांना कळविण्यात आले की 'पेशखाना मलकापूरच्या दिशेने रवाना झाला. पण नद्यांना पूर आल्यामुळे पेशखाना नदीपार होऊ शकला नाही' बादशहा म्हणाले ' मतलबखानाने पुढे जावे आणि पेशखाना बेनीशहादुर्ग (पन्हाळगडच्या) च्या दिशने उभा करावा.' ते उस्मानखानाला म्हणाले ' कृष्णेच्या (वारणा पाहिजे) अलीकडे छावणी योग्य जागा कोणती ?' तो म्हणाला बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) च्या पलीकडे अर्ध्या कोसावर वाठार (?) या गावाजवळ छावणी योग्य जागा आहे.' बादशहा म्हणाले 'आम्ही तेथे छावणी करू. रुहुल्लाखान, भास्करराव हरकारा, विजापूरचा देशपांडे रुद्राजी, हैद्राबादचा देशपांडे बापू पंडित याना बोलावून सांगा की बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) च्या भोवती चांगली जागा पाहून कळवा.' वेदारबख्त, मन्सूरखान व सखरलना (विशाळगड) चा किल्लेदार जावताखान याच्या नांवे आज्ञापत्रे रवाना झाली.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले ' पाईणघाट (पुणे प्रांत) चा बदललेला ठाणेदार हा पैसे खाऊन बसला आहे.' त्याला (इस्माईलखान मका) पांच हजार जात व पांच हजार स्वार अशी मन्सब होती. एक हजाराने त्याची मन्सब कमी करण्यात आली. त्याला तळाबर (ब्रम्हपुरी) खान फीरोजजंग याच्या सैन्यात तैनात करण्यात यावे अशी आज्ञा झाली.

फतेहुल्लाखान बहादुर आलमगीरशाही याने पूर्वीप्रमाणे मुख्य सैन्य व पिछाडी यामध्ये राहावे व मुहंमद अमीनखान बहादुर याने करावल (आघाडी, टेहेळणी) सांभाळावे अशी आज्ञा झाली.

सखरलना (विशाळगड) चा बख्शी इनायतुल्ला याला शाल देण्यात आली. त्याला जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

यार अलीबेगने विचारले 'सखरलना (विशाळगड) वर सवानेहनिगार (बातम्या पाठविणारा) याच्या नेमणुकी संबंधी काय आज्ञा.' बादशहा म्हणाले, 'जरुर नाहीत. हरकारा (जासूद, बातम्यांची ने आण करणारा) पुरे.'

बादशहांना कळविण्यात आले की 'मागच्या मुक्कामावरुन कारखाने (छावणीचे सर्व प्रकारचा सामान सरंजाम) अद्याप आले नाहीत.' बादशहा म्हणाले 'खालशाचे दप्तर आणण्यासाठी मुनीमखानाने हत्ती द्यावे. हमीदुद्दीनखान बहादुर याने कारखाने बरोबर आणावे.'

वीस जून – बादशहाचा मुक्काम मलकापूर गढीच्या अलीकडे होता. आज बादशहांनी न्यायदानाचे काम केले नाही.

दिवाणेखासचा दारोगा (अधिकारी) हमीदुद्दीन खान बहादुर हा मागील मजलेवर राहिला होता. तो म्हणाला 'ओझी वाहणारी वाहने जनावरे (बार-बर्दारी) नाहीत. त्यामुळे बहुतेक बादशाही (सरकारी) सरंजाम आला नाही. बादशहा म्हणाले 'उद्या हत्ती घेऊन जा आणि मागे राहिलेला सरंजाम घेऊन या.' हमीदुद्दीन खानाने आज्ञेप्रमाणे आज सकाळी अंमलबजावणी केली.

बादशहांनी काल रात्री बख्तावर महली याला आज्ञा केली की 'मरहूम इज्जतुल्लाखानाचा मुलगा रहमत याला बोलावून विचारा 'बादशहाजादा कामबख्श व अमीरुल उमरा (असदखान) यांनी खेळणा विजयाबद्दल प्रत्येकी एक हजार अश्रफ्या निसार (ओवाळणी) म्हणून दिल्या होत्या. त्या रकमा वसूल झाल्या काय.? बख्तावर महलीने सांगितले की रहमतचे म्हणणे आहे की 'वसूल झाले नाहीत. (अखबारमध्ये चुकून वसूल नशुदा ऐवजी वसुलशुदा म्हणजे वसूल झाले असे पडले आहे). बादशहांनी आज्ञा केली की बादशहाजादा कामबख्श याच्या बाबतची एक हजार अश्रफ्यांची रक्कम माझ्या खाजगी खजिन्यांतून घ्या. आणि अमीरुल उमरा (असदखान) यांची रक्कम त्यांच्याकडून वसूल करा.' मलकापूरचा ठाणेदार शेख गुलाम मुहंमद हा येऊन भेटला.

काल सूर्यास्ताच्या वेळी बादशहा मतलब खानाला म्हणाले ' मौजे बारा (वाडा) हे बेनीशहादुर्गापासून पाच कोसावर आहे. आम्ही तिकडे जाऊ तुम्ही

ओढयाच्या अलिकडचा मार्ग पहा. अंतर मोजा, रस्त्याची नीट पाहाणी करा आणि मुक्काम ठरवा. सरकारखान हाही तुमच्या बरोबर राहील. पाहाणी करुन या'

बादशहाजादा मुहंमद कामबख्श हा बादशहांच्या विश्रांती गृहात आला. मुजरा केल्यानंतर त्याला आपल्या तंबूत परत जाण्यास निरोप देण्यात आला.

शिकारखान करावल हा मतलबखानाच्या बरोबर पुढील मजला ठरविण्या-साठी गेला होता. तो परत आला. तो म्हणाला 'पुढची मजल दोन कोसावर राहील. दुसरी मजल अडीच कोसाची राहील. मतलबखान हा रस्ता मजल आणि तळासाठी जागा पाहाण्यास गेला आहे. तो संध्याकाळपर्यन्त परत येईल.'

हरकऱ्यांनी बातमी आणली की 'धनाजी जाधव हा सैन्य घेऊन कोंडाण्यातून बाहेर पडला. खान नुस्रतजंग (जुल्फिकारखान) याच्याशी युध्द झाले. धनाजी जाधवचे अनेक सैनिक मारले गेले. त्याचा पराजय झाला. दीडशे घोडे व शस्त्रे ही लुटीत मिळाली. जुल्फिकारखानाने किल्ल्याखालील गावे उध्वस्त केली. बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.'

उस्मान करावल म्हणाला बहादुरगडला गेलो त्यावेळी राम नावाचा सरदार सातशे स्वार घेऊन धामधूम करीत होता तो पळून गेला. मी एक घोडा व झेंडा आणला आहे.

एकवीस जून – सारी रात्र आणि दिवस पाऊस पडत होता. त्यामुळे बादशहाचे न्यायदानाचे काम बंद होते.

मतलबखानाने दोन मजला ठरविल्या होत्या. एक मजल पावणे दोन कोसाची व दुसरी अडीच कोसाची. बादशहा मुहंमद आरिफला म्हणाले 'या पूर्वी आमच्या निवासस्थानाचे तंबू ओढयाच्या अलीकडे उभे केले आहेत. तो रस्ता बंद आहे. हत्ती घेऊन जा आणि आमचा पेशखाना (आघाडीचे तंबू) तिकडून काढून ओढयाकडे आणा आणि मतलबखानाने निवडलेल्या जागेवर उभे करा.'

बादशहांना पुढील प्रमाणे कळविण्यात आले 'पेशखाना मलकापूरच्या दिशेने पाठविण्यात आला. तो नदी पार झाला आणि नदीच्या कुरोही (कुऱ्हाआब) (ओढा-पाण्याचा) पार पलीकडे उभा करण्यात आला आहे.'

बादशहा म्हणाले 'पेशखाना नदीच्या अलीकडे बेनीशहादूर्ग (पन्हाळगड) च्या दिशेने उभा करा.'

नदीच्या पुरामुळे पेशखाना परत आणता आला नाही. बादशहा म्हणाले 'पेशखाना नदीच्या पलीकडे उभा करीपर्यंत आम्ही येथेच काम करु.'

विजापुर कर्नाटकचा फौजदार चीन कुलीजखान बहादूर (भावी निजामुल्मुल्क) आणि हामिदखान बहादूर (चीन कुलीजखानाचा मुलगा) यांच्या नावे आज्ञापत्रे पाठविण्यात आली.

मतलबखान हा पुढची मजल पाहण्यास गेला होता. त्याने येऊन सांगितले की पुढची मजल सव्वादोन कोसाच्या अंतरावर आहे. पेशखाना मलकापूरकडे पाठविला होता. करोही नदी (?) ला पूर आल्यामुळे तो परत नदीच्या अलीकडे येऊ शकला नाही.'

बादशहांनी आज्ञा केली की 'मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम याने हत्ती घेऊन जावे आणि पेशखाना आणून नेमलेल्या मजलेवर उभा करावा.'

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली.

'नरकवासी रामा (राजाराम महाराज) याची बायको (ताराबाई) हिने धनाजी जाधवला पुढीलप्रमाणे पत्र पाठविले–

'जासुदांना त्यांच्या पगार बाकीचे दोनशे होन द्यावे व आमच्याकडे एक लाख रुपये पाठवावे.' धनाजी जाधवने उत्तरात लिहिले की 'रामचंद्र (रामचंद्र पंत) येताच रक्कम पाठवून देईन.'

हरकऱ्यांनी कळविले की 'गनिमांनी हसन अलीखानाचा पाडाव केला. त्याचे तीन हत्ती पकडले ते त्यांनी कोंडाण्यात आणले आहेत. बादशहा म्हणाले 'तरबियत खानाला लिहा की तयार रहा. (कोंडाण्याच्या) वेढ्यासाठी मी तुम्हाला पाठवीत आहे. काय हवे आहे कळवा, देण्यात येईल.'

हमीदुद्दीनखान बहादुर हा मागे राहिलेला सरंजाम आणण्यासाठी गेला होता. तो सूर्यास्तापर्यंत सरंजाम घेऊन आला. त्याची तपशीलवार यादी त्याने बादशहाकडे रात्री दिली.

बादशहाजादा कामबख्श हा बादशहांना मुजरा करण्यासाठी विश्रांतीगृहात आला. त्याला परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

बावीस जून– मुक्काम (वडवळ) गढी मल्कापूरच्या अलीकडे पावसामुळे दिवाण (कचेरी) चे काम बंद ठेवण्यात आले. काल रात्री मतलबखानाकडून आलेले पत्र बादशहांनी नजरेखालून घातले. मुहंमद आरिफने पेशखाना हत्तीवर लादून ओढ्यावर नेला. पण ओढ्याला पूर आला होता. पुराचे पाणी हत्तीपेक्षाही उंच वाहात होते. त्यामुळे ओढ्याच्या अलीकडे हत्तीवरील सामान उतरविण्यात आले आहे.

पुराचे पाणी कमी झाले की पेशखाना हत्तीवर चढवून ओढयाच्या पलीकडे नेण्यात येईल. (पेशखाना पूर्वी ओढयाच्या पलीकडे नेला होता. तो परत इकडच्या काठावर आणावा अशी आज्ञा होती.)

तेवीस जून– गढी मलकापूर–पाऊस पडत असल्यामुळे दिवाण (कचेरी) बंद ठेवण्यात आले. नुस्रतखान उर्फ नसीरुद्दीन हा नौकांचा अधिकारी होता. त्याच्याकडे मीर तुजक (शिष्टाचाराचा अधिकारी, प्रोटोकॉल) चेही काम होते. त्याला तीनशे जात व पाचशे स्वार अशी मन्सब होती. त्याने नावा आणल्या नाहीत म्हणून त्याची मन्सब शंभरनी कमी करण्यात आली.

बादशहाजादा मुहंमद कामबख्श हा मुजऱ्यासाठी विश्रांतिगृहात आला होता. दोन घटकानंतर त्याला निरोप देण्यात आला. दिवसाचे एक प्रहर व पाच घटका झाल्या असता बादशहा बाहेर आले. त्यांनी हमीदुद्दीनखान बहादुर याला विचारले 'मुहंमद आरिफ कौल हा पेशखाना आणण्यासाठी हत्ती घेऊन ओढयाच्या पलीकडे गेला होता. त्याने पेशखाना ओढयाच्या अलिकडच्या काठावर आणला की नाही ?'

हमीदुद्दीनखान बहादुर याने विनंती केली की–

'ओढयाला पूर आला आहे. तो अद्याप ओसरला नाही, पेशखाना (ओढयाच्या अलीकडे) आल्याची बातमी अजून आली नाही. बातमी आणण्यासाठी माणूस पाठविला आहे.'

मुनीमखानाचा मुलगा काजम, फराशखान्याचा मुहंमद जमान व अरिफ कौल यांनी दुपारच्या (जहर) च्या नमाजानंतर बातमी दिली की पेशखाना ओढयाच्या पलीकडे पन्हाळच्या दिशेने उभा करण्यात आला आहे.

बावीस जूनच्या बातमीपत्रात खालील नोंद आहे.–

'बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर याला बोलावून सांगितले 'नोकर लोकांनी माझ्या शय्यागृहाच्या तणावा मजबूत बांधल्या नाहीत. आमच्या अंगावर पाऊस पडतो (बाराने रहमत बर माबदौलत मी उफ्तद) नोकरांना (फराश) ताकीद करा.' हमीदुद्दीनखान बहादुर आणि ख्वाजासरा यांनी शय्यागृहाच्या तणावा ओढून मजबूत बांधल्या.

बादशहाची आज्ञापत्रे आज गाजिउद्दीनखान बहादुर (खान फिरोजजंग) व व त्याचा भाऊ हामिदखान बहादुर यांच्या नावे पाठविण्यात आली. (बादशहा स्वतः पाठवीत त्या आज्ञांना फर्मान म्हणत. बादशहांनी सांगितलेला मजकूर त्यांच्या

आज्ञेने जेव्हा त्यांचे अधिकारी पाठवीत तेव्हा त्याला हस्बुल्हुकूम– सध्या बाय ऑर्डर ॲण्ड इन द नेम ऑफ गव्हर्नर म्हणतात, तसे म्हणत.)

सुभे हैद्राबादचा कानूनगो (देशपांडे) बापू पंडित याने बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) जवळील छावणीसाठी जागा (वाठार व वडगाव नजीक) निवडली होती. तिचा नकाशा तयार केला आणि रुहुल्लाखानाच्या द्वारे बादशहासमोर ठेवला.

चोवीस जून – ओढया जवळील मुक्कामा करून (वडवाळ जवळ) आज बादशहा निघाले. त्यांनी सव्वादोन कोसाचा प्रवास करुन एक प्रहर व सात घटका दिवस आला असता मलकापूर जवळ तळ दिला. आज दिवाण (कचेरी) बंद ठेवण्यात आली. दिवंगत रामसिंग याचा मुलगा केसरीसिंग याने बादशहांना वाटेवर एक जमदाड (कट्यार) नजर केली. बादशहांनी नजर माफ करुन त्याला परत दिली.

बादशहा खानाजादखान यास म्हणाले 'तुम्ही दक्षिणच्या तोफखान्याचा दारोगा मन्सूरखान याला लिहा. त्याने सखरलनाचा किल्ला (विशाळगड) जाबताखानाच्या हवाली करावा आणि स्वतः हुजुरात यावे.

वऱ्हाडचा जिजियाचा अधिकारी सिराजुद्दीन अमीन याला सय्यद अहमदच्या जागेवर वऱ्हाडचा दिवाण म्हणूनही नेमण्यात आले. बादशहांनी आज्ञा केली की 'तरबियतखानाला लिहा. सखरलना (विशाळगड) च्या पायथ्याशी सरंजाम राहिला आहे तो त्याने किल्लेदार जाबताखान याच्या हवाली करावा आणि स्वतः हुजुरात निघून यावे.

बादशहांनी वाटेत भास्कर हरकारा यास म्हटले 'मी बख्शी उलमुल्क रुहुल्ला-खान याला आज्ञा केली होती की कृष्णेच्या अलीकडे कोठे मुक्काम व्हावयाचा अशी स्थळे तपासा' भास्करने म्हटले 'छावणीसाठी मी औकानी (अदवाडी) बाड (वाडा) व तिसरे बेदगाव (नांदगाव) ही स्थळे सुचविली होती. काही आज्ञा झाली नाही.

मुर्तजाबाद मिरजेचा हरकारा याने पुढील माहिती कळविली 'हामिदखान बहादूर याने बादशहाजादा मुहंमद कामबक्ष याचा खजिना (सुमारे एक लाख रुपये) व पागा ही कामबख्शाकडे पोहोचती केली आहेत.

बादशहांना विचारण्यात आले 'उद्या येथून रवाना होण्यासंबंधी काय आज्ञा ? ' बादशहा म्हणाले 'उद्या आमचा मुक्काम येथे राहील.'

पंचवीस जून– आज ओढयाच्या काठी मुक्काम. बादशहांनी कचेरीचे (दिवाण) काम केले. सकाळी बादशहांना कळविण्यात आले की 'पावसामुळे पेशखाना व इतर कारखाने (सरंजाम) हे मागील मुक्कामावरून अद्याप आले नाहीत. ओझीही (बार) फार आहेत.

बादशहा म्हणाले 'हत्ती घेऊन जा. पेशखाना व कारखाने मागच्या मुक्कामावरून आणा. अर्धे तंबू (संख्येने) हत्तीवर ठेवा.'

रात्रीच्या वेळी बादशहांना कळविण्यात आले की पेशखाना हा मागील मुक्कामावरुन आला आहे. बादशहा म्हणाले उद्या ओढयाची पाहणी करा.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील प्रमाणे कळले

'पावसामुळे आणि सामान भरण्याच्या कामामुळे लष्करची माणसे व सामान मागे राहिली आहेत. गवत व लाकूड फाटाही आला नाहीत.'

सव्वीस जून–बादशहाचा मुक्काम ओढयाच्या काठी. पावसामुळे कचेरी (दिवाण) चे काम बंद होते. दिवस चार प्रहरवर आला असता बादशहा हे फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद जमान याला म्हणाले 'पेशखाना पुढे पाठवून द्या.' त्याने विनंती केली 'ओढयाला पूर आला आहे. पाठीवर ओझी घेऊन हत्ती ओढा ओलांडणे कठीण आहे.'

बादशहा म्हणाले 'आजही ओढा पेशखान्याला अडविणारच.' बादशहाजादा कामबख्श हा मुजऱ्यासाठी विश्रांतीगृहात (आरामगाह) आला होता. मुजऱ्यानंतर त्याला आपल्या तंबूत परत जाण्यास बादशहांनी निरोप दिला.

सत्तावीस जून– बादशहाचा मुक्काम ओढयाच्या काठी आज एक प्रहर व पंच घटका दिवस आला असता बादशहा न्याय कचेरीत (अदालत, दिवाण) आले. बादशहाजादा कामबख्श, हमीदुद्दीनखान बहादुर, मुअज्जमखान व ख्वाजा मंजूर हे दिवाणे खासमध्ये हजर होते.

पाऊस सारखा पडत होता. त्यामुळे बादशहांनी एक घटिका बसून नंतर कचेरी संपविली. ते फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद जमान याला म्हणाले 'पेशखाना पुढील मुक्कामावर पाठवा' त्याने विनंती केली की–

'ओढया ला विलक्षण पूर आला आहे. हत्ती अशा स्थितीत ओढा ओलांडू शकत नाहीत. पेशखाना कसा पाठवावा?' यावर बादशहांनी काहीच आज्ञा केली नाही.

काल रात्री बादशहांनी विचारले 'आमच्या अधिकाऱ्यांपैकी चौकी (बादशहाच्या निवासस्थानाभोवती) पहाऱ्यावर कोणी हजर आहेत की नाहीत?

बादशहांना कळविण्यात आले की फक्त काही शिपाई पहाऱ्यावर आहेत. कोणीही अधिकारी हजर नाही. उम्दतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्य प्रधान असदखान) व बख्शी उल्मुल्क बहरामंदखान हे ओढयाच्या पलीकडे गेले आहेत. काही अधिकारी मागच्या मुक्कामावर राहिले आहेत.'

बादशहा म्हणाले 'आम्ही ओढयाच्या अलीकडे आणि आमचे अधिकारी ओढयाच्या पलीकडे !'

बादशहा रागावले (बददिमागी नमूदे). त्यांनी आज्ञा केली की 'गुर्जबर्दारांचा दारोगा सियादतखान व हफ्त (सप्त) चौकीचा अमीन सय्यदखान याना बोलवा. त्यांनी दिवाणेखासच्या जाळीत (परिसर, कँपस) रात्रभर हजर राहिले पाहिजे.' त्याप्रमाणे करण्यात आले. बादशहांनी फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद जमान याला म्हटले 'पेशखाना पुढच्या मुक्कामावर पाठविला की नाही ?' त्याने विनंती केली की 'ओढयाला पूर आहे. हत्तीच्याने ओढा पार करवत नाही. पेशखाना कसा रवाना करावा ?' बादशहा हमीदुद्दीनखान बहादुर याला म्हणाले 'नौकांचा मुश्रफ मुहंमदतकी याला विचारा. 'पुरांतून हत्ती पार करू शकतात की नाही त्याने चौकशी करून सांगितले' मुहंमद तकी म्हणतो 'मला नदीबद्दल (तो नौकांचा अधिकारी होता) माहिती आहे. येथे ओढयाबद्दल विचारणा होत आहे.' बादशहांनी आज्ञा केली, 'ओढा व नदी (वारणा, कृष्णा, पंचगंगा) या संबंधीची परिस्थिती कळवा.'

बादशहा हमीदुद्दीनखान बहादुर याला म्हणाले 'तुम्ही मुद्दाम माणसे नेमा. बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान, सियादतखान (गुर्जबर्दारांचा दारोगा), मन्सूरखानाचा मुलगा आणि खास चौकीचा अधिकारी मुहंमद काजम यांना मुद्दाम माणसे पाठवून यथील चौकी पहाऱ्यासाठी बोलावून आणा. त्यांना रेहेकलाबार (बंदुकी व तोफा ठेवण्याची जागा) मध्ये येऊन थांबू द्या.'

बादशहा पुढे म्हणाले 'छावणीचा कोतवाल सरबराहखान याचा नायब मुहंमद अमीन याला म्हणावे की 'लष्करच्या माणसांना ओढा पार करण्यासाठी चामड्याचे मशक (पखाली अगर टांकरे– मशकेचिरम) पुरवा.' त्याप्रमाणे मशक तयार करण्यात येऊन सैनिकांना देण्यात आले.

बादशहानी आज्ञा केली की मुहंमद अमीन याने रसदेची व्यवस्था करण्यासाठी (नांदगावला, जावे' आमच्या निवासस्थाना भोवती खंदक खणण्यात यावा अशी बेलदारांना आज्ञा झाली.

अठ्ठावीस जून – ओढ्याच्या जवळ मुक्काम पावसामुळे आज दिवाण (कचेरी) बंद काल सूर्यास्ताच्या वेळी बादशहांना पुढील प्रमाणे कळविण्यात आले. 'आज्ञा झाली होती की रेहेललेबार मध्ये पुढील मंडळींनी येऊन थांबावे १) बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान जलद (बादशहाच्या पेन हुजुरांतील क्षा पथकासहित २) सियादतखान- आपल्या गुर्जबर्दा- रांना (दंडधारी) घेऊन आणि ३) मन्सूरखानाचा मुलगा मुहंमद काजम खास चौकीच्या माणसांसहित. तंबू उभे करण्यात येऊन चौक्या कायम करण्यात आल्या आहेत. काय आज्ञा?'

बादशहांनी आज्ञा केली की, 'बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान यांनी आमच्या वास्तव्यस्थानापाशी तंबू देवून रहावे'

सियादतखान याने वास्तव्यस्थानाच्या (दौलतखाना उजव्या बाजूस असावे. मुहंमद काजम याने डाव्या बाजूस तंबू देऊन राहावे आणि चौकी पहाऱ्याचे काम करावे.

काल बादशहांनी मीर आतिश तरबियतखान याचा भाऊ कामयाबखान (पुढे याची मुलगी म्हणजे सय्यद बंधूपैकी सय्यद हुसेन अलीखान याची बायको) याला आज्ञा केली होती की ' तुम्ही दौलतखान्या (बादशहाचे वास्तव्यस्थान) भोवती गस्त घालीत रहा' त्याप्रमाणे त्याने केले.

हरकाऱ्यांच्या कडून कळले की ओढ्याला फार पूर आहे. सध्यातरी ओढा पार करणे शक्य नाही. लष्करांत महागाई अतिशय आहे. धान्य मिळत नाही. धान्याचा भाव रुपयाला दीड शेर व सरपणाचा भाव रुपयाला चार शेर आहे. हे सुद्धा खटपट करूनही मिळत नाही. लष्करातील घोडे व गुरेढोरे मरत आहेत.

बादशहांनी आज रुद्राजी कानूनगो याचा भाऊ जीवन याची आठवण केली. तो ओढ्याच्या पलीकडे आहे असे बादशहांना कळविण्यात आले.

एकोणतीस जून– ओढ्या नजीक मुक्काम. पावसामुळे बादशहांनी आज न्यायदा- नाच (कचेरीचे) काम बंद ठेवले. बख्शीउन्मुल्क रुहुल्लाखान, हमी- दुद्दीनखान बहादुर, सियादतखान व रुनीमखान यांनी दरबा- राला लागून काल रात्री चौकी पहारे दिले होते. बादशहांनी त्याच्या- कडे भोजनाचे पाठविले.

काल रात्री फकीर लोकांनी बादशहाच्या निवासस्थानाजवळ खैरात द्या, खैरात द्या म्हणून ओरड केली. बादशहांनी ते ऐकले. ते म्हणाले ' हा कामयाबखान

असली कसली गस्त घालीत आहे.' त्याची मन्सब पन्नास स्वारांनी कमी करण्यात आली.

एका कर्मचाऱ्याने न्यायकचेरीजवळ पुढील फिर्याद मांडली. 'माझी उपास-मार चालली आहे. मला फाके (उपास) पडत आहेत. माझ्या घरांतील एक माणूस मरून पडले आहे. माझ्यापाशी पैसा अडका नाही. सरकारकडून मला पांच महिन्याचा पगार येणे आहे. मला कांही रक्कम मिळावी म्हणजे मी (घरांतील) मृत माणसासाठी कफन (प्रेत वस्त्रे) घेईन.'

बदामीचा किल्लेदार व फौजदार मीरनुरुद्दीन याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले.

'गनिमांचा सरदार आबाजी सूरामानी ? (अंबाजी सुरोत्तर नव्हे) हा रोहणगड परिसरात आला. त्याचे पारिपत्य करण्यासाठी मी माझ्या मुलाला पाठ-विले. त्याने गनिमांशी युद्ध केले. गनिमांची अनेक माणसे ठार अगर जखमी झाली गनिम पळून गेले.

बादशहा म्हणाले ' मजुरा झाला. सेवा मान्य झाली.' हे ऐकून बादशहांनी त्याला दहा बारा होन दिले.

हत्तीखान्याचा दारोगा (अधिकारी) आणि बादशहाजादा मुहंमद मुअज्जम बहादुरशहा (काबुलचा सुभेदार) याचा वकील मुनीमखान याने पुढीलप्रमाणे कळविले 'हामिदखान बहादुर हा तळावर (ब्रह्मपुरीच्या) असलेले बंगालचे हत्ती घेऊन रवाना झाला. तो ओढयाच्या पलीकडच्या काठावर पोहोचला आहे.'

पत्र वाचून बादशहांनी मुनीमखानाला बोलावू पाठविले. तो आल्यावर बादशहांनी त्याला विचारले 'हामिदखान बहादुर आला आहे काय ?' मुनीम खानाने म्हटले.

'हामिदखान हा मुर्तजाबाद (मिरज) येथे थांबला आहे. त्याने हत्ती हुजु-रात पाठविले आहेत.'

नौकांचा मुश्रफ (अधिकारी) मुहंमदतकी याला बादशहांनी विचारले 'पुराची काय परिस्थिती आहे ?' त्याने विनंती केली 'पुराचे पाणी अद्याप दोन हात (दरआ) कमी वाहते आहे' बादशहा म्हणाले 'हा ओढा पुढे कोणत्या नदीला जाऊन मिळतो चौकशी करुन कळवा.'

बादशाहाजादा कामबख्श हा मुजऱ्यासाठी विश्रांतीगृहात आला होता. दुपा-रच्या नंतर त्याला निरोप देण्यात आला.

तीस जून– ओढ्या नजीक मुक्काम, आज सकाळी बादशहांना कळविण्यात आले की 'पुराचे पाणी अडीच पुरुष (दरआ) बाहात होते ते आता पावणे दोन पुरुष झाले आहे.'

फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद जमान याला बादशहा म्हणाले 'उद्या आम्ही येथून कूच करणार. पेशखाना पुढील मुक्कामावर रवाना करा.

खास खिलतीच्या खात्याचा अधिकारी आणि असदुल्लाखानाचा मुलगा सैफुल्लाखान याला नुसतखान उर्फ नसीरुद्दीन खान याच्या जागेवर मीरबहर (जलाधिपति, नौकांचा प्रमुख) म्हणून नेमण्यात आले. नसीरुद्दीनखान याची मन्सब प्रथम शंभर आणि नंतर त्याला जोडून वीस स्वार अशी कमी करण्यात येऊन त्याची खान ही पदवी काढून घेण्यात आली. तरबियतखान याचा भाऊ कामयाबखान याचीही मन्सब पूर्वी पन्नास स्वारांनी कमी केली होती. आता ती आणखी शंभर (जात) ने कमी करण्यात आली. कारण तो चौकीवर हजर नव्हता.

बादशहांना कळविण्यात आले की 'बादशहाजादा कामबख्श याचा सरंजाम (कारखाने) मागील मुक्कामावरुन आला नाही.' बादशहांनी रुहुल्लाखान याला म्हटले 'कामबख्शाच्या कारखान्याचा (सरंजाम) मीरसामान (अधिकारी) मुहंमंदबाकर याचा हुद्दा (मन्सब वगैरे) काय आहे कळवा.'

उस्मानखान कराबल याने विनंती केली की माझ्यापाशी ओझी वाहाण्यासाठी वाहने (बारबरदारी) नाहीत. मला एक हत्ती देण्यात येईल अशी आशा आहे.' त्याला एक हत्ती देण्यात यावा अशी आज्ञा झाली.

बादशहाजादा कामबख्श हा न्याय कचेरीत (दिवाण) आला. कचेरी संपल्यावर त्याला आपल्या तंबूकडे जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

जुम्दतुल्मुल्क अमीरुल्‌उमरा (मुख्यप्रधान असदखान) व मुहंमद अमीनखान बहादुर हे ओढ्याच्या पलीकडे होते. ते दिवाण (कचेरी, दरबार) मध्ये आले. त्यांनी बादशहांना मुजरे केले. दरबार (दिवाण) बरखास्त झाल्यानंतर त्यांना आपापल्या तंबूकडे जाण्यास निरोप देण्यात आला.

जुलै १७०२

एक जुलै– नुसरतजंग (जुल्फिकारखान) याच्याकडे फर्मान व पावसाळी वस्त्रांची खिलत ही पाठविण्यात आली.

गुर्जबर्दारांच्या पगारबाकीपैकी दोन महिन्याचा पगार द्यावा अशी आज्ञा करण्यात आली.

तरबियतखान हा पिछाडीला होता. त्याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले 'सरंजाम सामग्री घेऊन मी सखरलना (विशाळगड) च्या पायथ्याच्या घाटाखाली आलो आहे. ओझी वाहण्यासाठी वीस हत्ती देण्यात देण्यात यावेत. मी तीनशे प्यादे व चाळीस बर्कंदाज (बंदूकची) नोकरीत घेतले आहेत. काही रक्कम देण्यात यावी.' दहा हजार रुपये देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

बाणदारांनी म्हटले 'पगार नसल्याने उपासमार होत आहे' प्रत्येकी पांच रुपये देण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

हकीम हाजकखान याने म्हटले 'मी आपले व सरकाराचे सामान गहरनाई (खाटा ओढयांत तरंगत ठेवून पार करण्याचा प्रकार) च्या द्वारे ओढयाच्या पलीकडे नेले. मुहंमद आरिफ कौल आला. त्याने माझ्या माणसांशी तक्रार केली तो मला म्हणाला 'बादशहा तुम्हाला बोलावीत आहेत.' बादशहा म्हणाले 'मी कांठे बोलावले ?' आरिफ कौलची मन्सब पन्नासने कमी करण्यात आली.

दोन जुलै– आज शुक्रवारमुळे कचेऱ्या बंद होत्या. मलकापूरचा ठाणेदार गुलाम मुहंमद याला हुजुरात बोलवावे अशी आज्ञा झाली.

तीन जुलै– ओढयाच्या जवळ मुक्काम. ओढयाला अद्याप पूर आहे असे कळले. बादशहा म्हणाले 'तीन प्रहर पर्यंत आमचे वाहन तयार ठेवा. पाणी उतरले तर आम्ही ओढा पार करु.' बादशहाचा वस्त्रांचा सरंजाम मागच्या मजलेवरुन अद्याप आला नाही असे कळले. हत्ती घेऊन जा आणि सामान घेऊन या अशी मुनीखानाचा मुलगा काजम याला आज्ञा करण्यात आली.

कचेरीचे काम संपल्यावर बादशहांना कळविण्यात आले की 'मुहंमद अमीन खान बहादुर व नजाबतखान (त्याचा भाऊ) हे ओढयाच्या पलीकडून हत्तीवरुन आले आहेत. ते मुजऱ्यासाठी आले आहेत.' बादशहांनी परवानगी दिली. ते येऊन भेटले.

बादशहांनी उस्मानखान करावल याला विचारले,

'पुढील मजलेवर चिखल माती किती असेल'

तो म्हणाला, 'खूपच आहे.'

बादशहांना कळविण्यात आले की 'सरकारी खजिन्यातून आठराशे रुपयांची चोरी झाली आहे'

बादशहांनी आज्ञा केली 'खजिन्याचा दारोगा (अधिकारी) व मरहूम

फजले अलीखानाचा मुलगा फैज अली याजकडून व तितकीच रक्कम खजिन्याचे बंदूकची यांच्या पगारातून काढून घेण्यात यावी.

फजाईलखान याने विनंती केली की मलकापूरचा ठाणेदार शेख गुलाम मुहंमद याची पुढील प्रमाणे विनंती आहे. मलकापूर ठाण्याचा बंदोबस्त करण्यासाठी माझ्याजवळ पथक, दारु गोळा, व शिसे ही नाहीत. माझ्याकडून ही नोकरी होणार नाही. इतर कुणाचो तरी नेमणूक करण्यात यावी.' बादशहा म्हणाले रुहुल्लाखान याने नेमणूक करावी.

मरहूम फजले अलीखान याचा मुलगा फैज अली याने विनंती केली की 'मी दुर्दशेत आहे. मला एक वर्षाची रजा देऊन शहाजहानाबादेस (दिल्ली) जाण्याची परवानगी द्यावी.' विनंती मान्य करण्यात आली.

हत्तीखान्याचा दारोगा मुनीमखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली. 'बंगालचे सुभेदार शहाजादा अजीमुश्शान यांनी तेथील जमीनदारांकडून खंडणी दाखल हत्ती घेतले. आहेत. ते पाठविले आहेत.' बादशहांनी आज्ञा केली की हत्ती दाखविण्यात यावेत.' त्याप्रमाणी बादशहांनी चार हत्ती डोळ्याखालून घातले.

पाईन विलायत (पुणे प्रांत)चा फौजदार यासीनखान बहादुर याच्या नावाने आज्ञापत्र पाठविण्यात आले.

चार जुलै– बादशहांनी आज हत्तीवरून ओढा ओलांडला. जुम्दतुल्मुल्क अमीरूल-उमरा (असदखान) व इनायतुल्लाखान यांनी मुजरे केले. बादशहांनी त्यांना आपल्या तंबूत जाण्यास निरोप दिला. फराशखान्याचा मुश्रफ याला ताकीद करण्यात आली की, 'मागच्या मुक्कामावर राहिलेला पेशखाना ओढा पार करून आणावा.'

बऱ्हाणपूर (खान देश) चा सुभेदार बहरावरखान याच्या नावे आज्ञापत्र रवाना झाले.

बादशहांना कळविल्यात आले की 'पावसामुळे, आणि मागचे मुक्कामाचे तंबू न आल्यामुळे, व धान्याच्या महर्गतेमुळे लोकांचे हाल होत आहेत. पालखीचा दारोगा फत्तेह दौलत कौल याने विनंती केली 'की पालखीखान्याचा कंदेला (सरंजाम) अद्याप मागाहून आला नाही. त्यामुळे तख्ते खां व छप्पर (?) वगैरे तशीच पडून आहेत. पाऊसही पडत आहे.' बादशहांना कळविण्यात आले की 'घोड्यांचे सामान (कंदला) हि आले नाही. घोडे रिकामे उभे आहेत.'

बादशहांनी आज्ञा केली की 'दिवाण (कचेरीसाठी) साठी मनलवखानाने तूर्त जे कांही (तंबू) उभे उभे केले आहेत, त्यांतच तख्ते खां व पालख्यांचा तंबू

वगैरे सरंजाम ठेवण्यात यावा.'

मतलबखान करावल बेगी हा बादशहाचे वास्तव्य स्थान निवडण्यासाठी बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) च्या पलीकडे बेदगांव (वडगांव) येथे गेला होता. रस्ता आणि वास्तव्यस्थान यासंबंधीचे पत्र त्याने पाठविले. हमीदुद्दीनखान बहादुर याने ते पत्र बादशहासमोर ठेवले. बादशहांनी ते नजरे खालून घातले.

बादशहाचा खाशा स्वारीचा हत्ती दिवाणे खास जवळ आला. बादशहांना हत्तीवरुन उतरुन घेण्यासाठी अधिकाऱ्यांनी मेणा हत्तीच्या जवळ नेला. हत्तीवरुन उतरुन मेण्यांत बसावे अशी बादशहाची इच्छा होती. त्याच वेळी पूर्वीचे हत्ती ओझे उतरविण्यासाठी बसविण्यात येत होते. बादशहा हे हत्तीवरुन उतरुन मेण्यात स्वार झाले. त्याच वेळी हत्तीवरील सामान मेण्यावर येऊन आदळले. मेणा मोडला. पण बादशहा सुखरुप राहिले (खैर गुजश्त- सुखरुप निभावले.)

(चार जुलैच्या आणखीं कांही नोंदी) बादशहांनी ओढा ओलांडला त्याची हकीकत पुढील प्रमाणे देण्यात आली आहे.

काल संध्याकाळी नौकांचा प्रमुख (मीर बहर) सैफुल्लाखान याने सांगितले की 'आपले वाहन सज्ज आहे. पण ओढयाचा पूर कमी झाला नाही.' बादशहा म्हणाले आज (म्हणजे कालची हकीकत) आमचे जाणे रहित.' आज सकाळी ओढयाचे पाणी कमी झाले होते. बादशहांनी मेणा मागविला. दिवसाचा एक प्रहर झाला असता ते मेण्यात बसले आणि आपल्या निवास स्थानांतून बाहेर आले. त्यानंतर ते हत्तीवर बसले आणि निघाले. त्यांनी ओढयाचे पाणी पाहिले. ते म्हणाले 'आमच्या नगारे नौबती पलीकडच्या कांठावर उभ्या करा. आम्ही ओढा पार करु त्यावेळी डंके नगारे नौबती झडू द्या. ओढयाचा पूर कमी झाला की आम्ही तो पार करु. नगाऱ्याचा हत्ती आमच्या स्वारीबरोबरच ओढा पार करील.'

यानंतर बादशहांनी ओढा ओलांडला. जुम्लतुलमल्क, अमीरुल उमरा, (मुख्यप्रधान असदखान) बहरामंदखान, मुहंमद अमीन खान बहादुर वगैरे मंडळी ओढा उतरुन आली होती. त्यांनी मुजरे केले. बादशहा एकंदीत एक कोसाचा प्रवास करुन आपल्या निवास स्थानी पोहोचले. तेथे हत्तीवरुन उतरुन मेण्यात बसले आणि निवास स्थानांत दाखल झाले.

पाच जुलै- पावसामुळे कचेऱ्या बंद होत्या. काल रात्री बादशहांना कळविण्यात आले की बहरामंदखान याच्याकडे चौकी पहाऱ्याचे काम होते. तो आजारी असल्यामुळे येऊ शकला नाही. पण त्याची पथके घेऊन

त्याच्या मुलीचा मुलगा मुहंमद हा हजर राहिला व पन्हाळयापर्यंत तीन व तेथून वडगाव पर्यंत तीन अशी सहा मजला ठरविण्यात आल्या.

सहा जुलै– दुसऱ्या ओढयाच्या कांठी मुक्काम. पावसामुळे कचेरीचे (दिवाण) काम बंद ठेवण्याची आज्ञा झाली. बादशहाच्या पुढील मुक्कामासाठी जागा निवडावी म्हणून मतलबखान करावलबेगी हा बेनीशहादुर्ग (पन्हाळा) च्या दिशेने मौजे असार (वांठार) व बडगाव (वडगाव) या गावाकडे गेला होता. काल तो परत आला. त्याने एक यादी (फर्द) लिहून बादशहाकडे पाठविली तींत त्याने वडगाव हे मुक्कामास योग्य असे कळविले होते. हमीदुद्दीन खान बहादुर याने ती यादी बादशहा समोर ठेवली ती त्यांनी नजरे खालून घातली.

सैफुल्लाखानाने कळविले की, मागील मुक्कामावरील ओढयाला अद्याप पूर आहे. ओढयात साडेतीन हात (दरआ) पाणी आहे.

बादशहांना कळविण्यात आले की 'गलूरखाना (सदावर्त, अन्नछत्र)चा सरंजाम मागच्या मुक्कामावरून अद्याप आला नाही. लष्करांत फकीर लोक पडून आहेत. ते आरडा ओरडा करीत आहेत.'

बादशहांनी आज्ञा केली की 'दिवाण (कचेरी) च्या नगारखान्याचा तंबू आहे. त्यात एकीकडे नगार खाना व दुसरीकडे गलूरखाना लावा.'

बादशहांना कळविण्यात आले की बख्शीउल्मुल्क बहरामंदखान हा आजारामुळे रात्री चौकी पहाऱ्यासाठी आला नाही.

सात जुलै– आज दिवाण (कचेरी) बंद बादशहानी पुढीलप्रमाणे आज्ञा केली 'मुहंमद अमीन हा लष्करचा कोतवाल सरबराहखान याचा नायब (सहायक प्रतिनिधि, दुय्यम) आहे. त्याला म्हणावे 'जे कांही धान्य (रसद) पाठवायचे ते दुपारी वडगावला पाठवून द्या.' हाकिमबेग गुर्जबर्दार याला आज्ञा करण्यात आली की' नावा कन्हाडा बादेहुन मुर्तजाबाद मिरजेला पोहोचवा आणि या.'

आठ जुलै– पावसामुळे आज कचेऱ्या बंद होत्या. बादशहांनी आपले निवासस्थान पाहिले. ते चिडले. ते फराशखान्याचा मुशरफ मुहंमद जमान याला म्हणाले, 'फराश खान्याच्या माणसांनी आमच्या निवासाच्या तंबूचे तणावे कसून बांधले नाहीत. पावसाचे पाणी निवासस्थानाच्या आत पडत असते.' मुहंमद जमान याने विनंति केली की तंबू फारच जुने

झाले आहेत. फराशखान्याचीमाणसे तणावे कसू लागली की तंबूच्या चिध्या होतात, बादशहा म्हणाले 'हामिदखान बहादुर (गाजिउद्दीन फीरोज जंग' याचा भाऊ) याला लिहा 'तळावरून (ब्रह्मपुरी) आमचे निकासाचे तंबू मुर्तजाबाद (मिरज) ला मागवून घ्या. आणि इकडे लवकर पाठवून द्या.'

बादशहा हे हमीदुद्दीन खान बहादुर व उस्मानखान कराबल यांना म्हणाले 'आमची अशी इच्छा आहे की आमचे छावणीचे सगळे कारखाने (खाती, सरंजाम) मागच्या मुक्कामावरुन इकडे यावे. तो पर्यंत येथे मुक्काम करावा. येथून दोन-कोसावर मुक्काम करण्यालायक जागा पाहून या'

बादशहा सैफुल्लाखानाला म्हणाले 'पाण्यास पूर किती आहे' तो म्हणाला. 'अद्याप दीड (दरआ) हात आहे.'

फळफळावळ भांडाराचा (मेवा खाना) व अधिकारी ख्वाजा मुहरमखान, व सुगंध भांडाराचा (खुशबूखाना) मुख्यख्वाजा मंजूर यांनी सांगितले की, 'सरकार कारखाने अद्याप ओढ्याच्या पलीकडे आहेत.' 'बादशहांनी आज्ञा केली की सैफुल्लाखान याने नावा तयार करून सरंजाम ओढ्याच्या अलीकडे आणावा' पिछांडी (चंदावल) वरून तरबियतखान व फतेहुल्लाखान यांनी लिहून पाठविलेकी, 'पावसामुळे आमचे घोडे व स्वारांचे सर्व घोडे जाया झाले आहेत. महागाई भयंकर आहे' खानबहादुराकडे दोनशे अश्रफ्या पाठवाव्या अशी आज्ञा. झाली हमीदुद्दीनखान बहादुर व उस्मान कराबल यांनी येऊन सांगितले की पुढील मुक्का माचे येथून अंतर सव्वादोन कोस आहे. पण वाटेत चिखल फार आहे. पण दुसऱ्या वाटेने तीन कोस अंतर आहे. रस्ता चांगला आहे.'

पेशखाना पुढे पाठवावा अशी बादशहांनी आज्ञा केली.

नऊ जुलै– दुसऱ्या ओढ्याच्याकाठी मुक्काम. आज दिवाण (अदालत, कचेरी) बंद. सकाळी बादशहांनी आज्ञा केली की 'पेशखाना पुढील मुक्कामावर रवाना करा.' हत्तीवर सामान लादण्याचे काम मेवा खाना (बागांचा प्रमुख) महूरमखान याच्याकडे देण्यात आले. माझ्या समोर हे काम झाले पाहिजे असे बादशहांनी सांगितले. हमीदुद्दीखान बहादुर यांनी पेशखान्याबरोबर राहावे अशी आज्ञा झाली.

बादशहा म्हणाले 'बेलदार व तबरदार (कुऱ्हाडी बाळगणारे, लाकूड तोडणारे) यांना पुढील मुक्कामावर पाठवा. आमच्या निवास स्थानाचा ओटा वगैरे तयार करतील. मुर्तजाबादेहून (मिरज) आमचे तंबू येईपर्यंत आणि सगळे कारखाने एकत्र येईपर्यंत आम्ही कांही दिवस मुक्काम करणार आहोत.'

शहाजादा बेदारबख्त याने बादशहांना लिहिलेले पत्र सुल्तान नजर वकील याने बादशहासमोर ठेवले. बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले ' बादशहांच्या खाजगी खजिन्यांतील (अंदरुन महल), ओवाळणीच्या (निसार) म्हणून तीन हजार एक अश्रफया हत्तीच्या अंबारीतून ठेवण्यात आले होते. हत्ती ओढा ओलांडीत असता अश्रफया अंबारींतून खाली पाण्यात पडल्या. पाणबुडी करणाऱ्यांनी पुष्कळ प्रयत्न केला. पण अश्रफया कांही हाती लागल्या नाहींत. अंदरुन महल (खासगी) च्या खजिन्यावर फतेह दौलत कौल हा अधिकारी (तहवीलदार, कस्टोडियन, रक्षक) होता. बादशहा त्याच्यावर रागावले. त्यांनी खालसा व तनखा याचा दिवाण याचा आज्ञा केली की ' तिकडच्या फौजदारांना कसून चौकशी करण्याची ताकीद द्या.'

रात्री बादशहांनी आज्ञा केली की ' उद्या आम्ही येथेच मुक्काम करणार आहोत. आमच्या पुढील निवास स्थानाचे रक्षण करण्यासाठी सकाळी मुहंमद अमीनखान याने पुढील मुक्कामावर जावे.)

दहा जुलै– बादशहाचा मुक्काम दुसऱ्या ओढयाच्या काठीच दिवाण, अदालत इत्यादि कचेऱ्या बंद होत्या.

बादशहांना कळविण्यात आले की ' सरकारी कारखाने अद्याप ओढयाच्या पलीकडून आले नाहीत. बादशहा हे ख्वाजा मुहरमखान व कालालखान यांना म्हणाले ' जा आणि कारखाने घेऊन या. त्यांनी कारखाने आणण्याच्या कामावर सजावली (अंमल बजावणीचा अधिकारी) म्हणून त्यांची नेमणूक केली आणि म्हटले ' सैन्याच्या कुचाच्या वेळी कारखाने पुढील मुक्कामावर पाठविण्याचे काम तुम्ही करीत जावे.

बादशहांना कळविण्यात आले की ' तख्तेखां (बादशहा प्रवासात त्याच्यांवर बसत आणि माणसे वाहून नेत) अद्याप ओढयाच्या पलीकडून आला नाही.' बादशहांनी सेजखान्याचा अधिकारी मुहंमद अतहरखान याला म्हटले

' खजीना आणला काय ' तो म्हणाला सरकारच्या कारभाऱ्यांनी ओझी वाहाण्याची साधने दिली नाहीत. आता त्यांनी एक हत्ती दिला आहे. मी खजिना घेऊन येतो.'

बादशहांनी विचारले ' मागील मुक्कामापर्यंत तख्तेखां कसे आणीत होते,,

अतहर अली म्हणाला ' मजूरांच्या करवी तख्तेखां आणपिण्यात येत होता,

बादशहा म्हणाले मग आताही असेच करायला हवे होते.'

बादशहा चिडले. त्यानी अतहरखानाला त्याच्या नोकरीकरुन बदलले. त्याच्या जागेवर खोजा अंबर याची नेमणूक करण्यात येऊन त्याला एक बालाबंद (अलंकार) बक्षीस म्हणून देण्यात आला.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले 'गुर्जबर्दारांचा अधिकारी सियादतखान याच्या घरी चोरी झाली. त्याच्यापाशी असलेला सगळा माल चोरानी नेला.'

सियादतखानाने बादशहांना पुढीलप्रमाणे कळविले- 'नावा आणण्यासाठी गुर्जबर्दार मुर्तजाबाद मिरजेस गेला होता. त्याने लिहिले आहे की 'नावा घेऊन मी मुर्तजाबादे (मिरज) हून वडगावला पोहोचलो आहे.' यावर काय आज्ञा?' बादशहांनी आज्ञा केली की 'नावा वडगावात राहू द्या. मी वडगावला मुक्कामाला जाईन.'

अकरा जुलै- आज दिवस एक प्रहर एक घटिका वर आला असता बादशहा बाहेर आले. तख्तेखांवर बसून ओढयाच्या काठी असलेल्या आपल्या मुक्कामावरून निघाले. सव्वा दोन कोसाची मजल मारून दिवस एक प्रहर सहा घटका आला असता ते आपल्या मुक्कामावर दाखल झाले.

मन्सूरखान दक्षिणच्या तोफखान्याचा दारोगा (अधिकारी) हा सखरलना (विशाळगड) किल्ल्यावर होता. तो येऊन बादशहांना भेटला. हत्तीखान्याचा अधिकारी मिर्जाबेग हा पेशखाने नव्याने तयार करवून घेऊन आणण्यासाठी गेला होता. त्याने दोन पेशखाने तयार करून आणले. तो बादशहांना भेटला.

सय्यद अब्दुल्लाखान (सुप्रसिध्द सय्यद बंधूचा बाप) हा आजमेरचा सुभेदार होता (त्यापूर्वी तो महाराष्ट्रात नांदेड सुभ्याचा सुभेदार होता.)तो मरण पावला. त्याचा मुलगा हसन अलीखान (हाच पुढे सय्यद अब्दुल्ला या नावाने मोगल साम्रातज्याचा मुख्य प्रधान झाला.) अजमेरची सुभेदारी व जालोरची फौजदारी हे हुद्दे देण्यात आले.

हसन अलीखान याचा भाऊ हुसेन अलीखान याची मन्सब वाढविण्यात आली. रणथंबोरचा किल्लेदार व फौजदार हातमखान होता. त्याला बदलण्यात येऊन त्याच्या जागेवर हुसेन अलीखान याची नेमणूक करण्यात आली. हुसन अलीखान याचा तिसरा भाऊ नुरुद्दीन अली याच्या मन्सबीतही वाढ करण्यात आली.

सय्यद अब्दुल्लाखान याला आणखी तीन लहान मुले आहेत असे रुहुल्ला-खानाने सांगितले. त्यांना काही मन्सब आहे काय आणि इतर कुटुंबीय कोण कोण आहेत हे चौकशी करुन कळवावे अशी आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की 'आम्ही येथे पाच दिवस मुक्काम करु. आमची छावणी बाठार व वडगाव येथे ठरली आहे. खानसामानच्या खात्याचा दारोगा

(अधिकारी) सय्यद अलीरजा याने जाऊन मागील मुक्कामावरुन सर्व कारखाने (सरंजाम) आणावा अशी आज्ञा झाली.

बारा जुलै – मरहूम मरहमतखान याचा मुलगा मुहंमद आशूर हा स्वतःच्या लग्नासाठी उत्तर भारतात गेला होता. तो येऊन बादशहांना भेटला. (बादशहांनी अनेक लहानमोठ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या.) अमरसिंग याला कोल्हापूर व बेनीशहा दुर्ग (पन्हाळगड) या भागाचा अमीन (महसूल अधिकारी) म्हणून नेमण्यात आले.

सय्यद अब्दुल्लाचा धाकटा मुलगा हुसेन अलीखान याला रणथंबोरची फौजदारी देण्यात आली. आणखी एक मुलगा सय्यद नूरुद्दीन याची मन्सब वाढविण्यात आली.

फतेह दौलत कौल याने सांगितले की, 'मी हत्तीवरून खजिना ओढयाच्या अलीकडे आणला, पण पुरामुळे तीन हजार अश्रफया पाण्यात बुडाल्या. आज तीन दिवसापासून मी अश्रफया शोधीत आहे. पण पत्ता लागत नाही.' बादशहा म्हणाले 'त्या जागेवर दहा बंदुकऱ्याची चौकी बसवा. पाण्याचा पूर ओसरला की अश्रफया शोधून आणा. यापुढे ओढा येईल त्या ठिकाणी यार अलीबेग याने स्वतः आपल्यासमोर खजिना पार करवीत जावा.'

कोल्हापूरचा ठाणेदार अब्दुलहमीदखान याला मलकापूरच्या ठाणदारीवर गुलाम मुहंमद याच्या जागी नेमण्यात आले. त्याला मलकापूरवर एका गुर्जबर्दाराच्या हस्ते पोहोचविण्यात यावे अशी आज्ञा झाली. ओझी वाहणारे वाहन नष्ट झाले असे कळले. एक हजार रुपये मुनीमखानाला देऊन एक हत्तीण घ्यावी व बादशाही खाजगी सरंजाम पार करवावा अशी आज्ञा झाली.

बुधवारच्या घटना लिहिण्याच्या कामावर असलेला वाकनीस मुहंमद अमीन याने विनंती केली की 'मी दुर्दशेत आहे.' त्याला शंभरची मन्सब होती. तीत पन्नासनी वाढ करण्यात आली. त्याला एक घोडा देण्यात आला. बख्शी नेकनामखान अहदीयान (शिलेदार, बादशहाचे निकटवर्ती स्वार) चा पगार वाटप करणारा अधिकारी बाकरखान यांच्या मन्सबी कमी करण्यात आल्या. ते पेशखान्याबरोबर आले नव्हते. काकरोनचा किल्लेदार व रतनपूरचा फौजदार (सुभे माळवा) खुदायारखान याची बदली सुल्तानपूर (नंदुरबार जवळ) चा फौजदार म्हणून करण्यात आली.

सोलापूरच्या किल्लेदारीवर मुईनखान होता. तो वारला. त्याच्या जागेवर सैफुद्दीनखान याची नेमणूक करण्यात आली.

तेरा जुलै - बादशहाचा मुक्काम पन्हाळगडच्या अलीकडे चार कोसावर (सुमारे-दहा मैल) बादशहांनी मतलबखान करावल बेगी याला आज्ञा केली की 'पुढील मुक्कामापर्यन्तचे अंतर साखळीने मोजून या.' त्याने तसे करुन परत येऊन सांगितले की पुढचा मुक्काम येथून सव्वादोन कोसावर राहील.

खानाजादखानाचा मुलगा अबुल्खैर याची मन्सब वाढविण्यात आली. त्याला रत्नशाळेचा अधिकारी म्हणून नेमण्यात आले.

मतलबखान करावल बेगी याने विनंती केली की आपली आज्ञा झाली तर माझ्या पथकांतील मुहंमद फजिल याला तंबू तयार करवून घेण्यासाठी तळावर (ब्रम्हपुरी) पाठवीन.' बादशहांनी विनंती मान्य केली.

उम्दतुल्मुल्क खान फिरोजजंग याजकडून आलेल्या पत्रावरुन कळले ते असे '(माझ्यापाशी) तैनात असलेला रुस्तमखान विजापुरी याला हुजुरांनी बोलाविले आहे. पण पर्जन्यकाळ आहे. त्याला बोलावण्याचे थांबविण्यात यावे अशी विनंती आहे' विनंती मान्य करण्यात आली.

बादशहा मुनीमखानाला म्हणाले 'मुर्तजाबाद मिरजेहून आस्पक (मोठा तंबू) आला आहे. बारा दरआ (हात) चा आहे. मुर्तजाबादेत अठरा दरआचा तंबू आहे. दहा हत्ती मुर्तजाबाद मिरजेला पाठवा. ते तंबू आणि इतर सामान घेऊन येतील.'

शहाजादा अजीम याने पाठविलेले हत्ती बादशहांनी नजरेखालून घातले. मुनीमखान याने ते बादशहासमोर आणले होते. बादशहांनी अजीजुल्लाखान कोरबेगी याची आठवण केली. तो हजर नाही असे कळले. बादशहांनी आज्ञा केली की मन्सूरखान (दक्षिणच्या तोफखान्याचा प्रमुख) याने बर्छी घेऊन आपल्या समोर उभे राहात जावे.'

जुन्नर भागातील किल्ल्यांतील पगार वाटप करण्यासाठी मन्सूरखानाचा मुलगा मुहंमद काजम याला पाठविण्यात आले. बख्शी रुहुल्लाखानाच्या विनंतीवरुन त्याचे खानसामानीचे पद फजाईलखान (बयूतात-सरकारी मालमत्तेचा अधिकारी) याजकडे देण्यात आले.

मरहूम जाफरखान याचा मुलगा कामगारखान याला हुजुरात बोलावण्यात येऊन त्याला रुहुल्लाखानाच्या ऐवजी खानेसामान म्हणून नेमण्यात आले. तो

येऊन हजर होईपर्यन्त बयूतात (सरकारी मालमत्ता)चा अधिकारी फजले अलीखान याने काम पहावे अशी आज्ञा झाली.

अब्दुल्हमीदखान हा कोल्हापूरला ठाणेदार होता. त्याला तेथून बदलण्यात आले. त्याला मलकापूरच्या ठाणेदारीवर नेमण्यात आले. तो जाऊन रुजू होईपर्यंत तेथील ठाणेदार गुलाम मुहंमद रसूल याने घाटातून (अंबाघाट) काम पाहावे अशी आज्ञा झाली.

राव दलपत बुंदेला हा जुल्फिकारखानापाशी तैनात होता. खेळणा फत्ते झाल्याबद्दल त्याने पन्नास अश्रफ्या निसार (ओवाळणी) म्हणून पाठविल्या.

राव मानसिंग (शिंदखेडकर जाधव) याला अंबाघाटच्या ठाणेदारीवर नेमण्यात आले.

चौदा जुलै– आज स्नान केल्यामुळे बादशहानी कचेरीचे काम केले नाही. काल रात्री बादशहांनी सय्यद अब्दुल्लाखान नांवाच्या फकीराला (दरवेश) पाच अश्रफ्या व दहा होन हे द्रव्य दिले.

पंधरा जुलै– मुहतशमखान याने बख्शी उलमुल्क रुहुल्लाखानाच्या द्वारे पुढील विनंत्या केल्या. (मुहतशमखानाचा बाप शेख मीर याने दाराशी झालेल्या युद्धात जाणूनबुजून हत्तीवर औरंगजेबाची जागा घेतली. शत्रूंनी त्याला औरंगजेब समजून ठार मारले. या निष्ठेबद्दल औरंगजेबाला या कुटुंबाबद्दल ममत्व असे)

१) माझे घोडे निकामी झाले आहेत. मला मदत म्हणून दोन घोडे देण्यात यावेत. विनंती मान्य करण्यात आली.

२) काही रोख रक्कम मदत म्हणून देण्यात यावी. खाजगी खजिन्यातून दोन हजार रुपये द्यावे अशी आज्ञा झाली.

३) हसन अलीखान याला सुल्तानपूर नंदुरबार येथे सरंजाम (तनखा) जहागीर होती. (तो अजमेरच्या सुभेदारीवर गेल्यामुळे) ती मला तनखा जहागीर म्हणून मिळावी. विनंती मान्य करण्यात आली.

मीरसामानच्या खात्याचा दारोगा (अधिकारी) अली रजा हा मागे राहिला होता. तो येऊन बादशहांना भेटला.

हुजुरात असलेला आणि जिजियाचा अमीन (अधिकारी) मुहंमद गौस याची मन्सब वाढविण्यात आली. उम्दतुलमुल्क फीरोजजंग याच्या भाऊबंदांपैकी अब्दुल्है हा स्वदेशांतून येऊन बादशहांना भेटला. त्याला नव्याने मन्सब देण्यात

आली. अशीरगडचा किल्लेदार शहामतखान याच्या पथकातील मुहंमद साने याची मन्सब वाढविण्यात आली व त्याला शहामत खानाकडे तैनात करण्यात आले.

बादशहा रुहल्लाखानाला म्हणाले 'तुम्ही खान फीरोजजंग याला लिहा. तीस हत्ती विकत घेऊन हुजुरात पाठवा म्हणून त्याच्याकडे आज्ञा पत्र पाठवा.'

मुहंमदाबाद बीदरचा सुभेदार खुदाबंदाखान याने विशाळगड विजयानिमित्त ओवाळणी म्हणून एक हजार रुपये पाठविले. त्याला एक ध्वज देण्यात आला.

गंजीकोटचा किल्लेदार मुहंमद जाफर याने स्वतःच्या बसण्यासाठी उंच आसन तयार करविले होते. बादशहा रुहुल्लाखानाला म्हणाले 'त्याला ताकीद करा. पुन्हा त्याने असे केले तर त्याच्यावर आमचा क्षोभ होईल हे लक्षात राहू द्या असे त्याला कळवा.'

सेजखान्याचा बदललेला दारोगा अतहरखान याला त्याच्या विनंतीवरुन लाहोरकडे तैनात करण्यात आले. त्याचा भाऊ मुहंमद मन्नू यालाही त्याजबरोबर पाठविण्यात आले.

इस्लामगड उर्फ रायरी (रायगड) चा किल्लेदार शिवसिंग याने खेळणा विजयाबद्दल ओवाळणी म्हणून पन्नास मोहरा पाठविल्या. त्या बादशहांच्या नजरेखालून गेल्या.

राजा जयसिंग हा शहाजादा बेदारबख्त याजपाशी तैनात होता. त्याला आज्ञापत्र (हस्बुल्हुकूम) पाठविण्यात आले. पेशखाना पुढे रवाना करावा अशी आज्ञा झाली.

अवुल्वफाचा मुलगा मीर फैजुल्ला हा नोकरीच्या आशेने बादशहांना भेटला. त्याला मन्सब देण्यात आली.

भाड्याच्या गाड्यांची भाडी वाटणारा दारोगा सय्यद गजनफर याला हजर करण्यात यावे अशी आज्ञा झाली. मरहूम रजातलबखान यांची मुले मुहंमद अली व मुहंमद बाकर यांना त्यांचे आजे (आईचे वडील) व दिल्लीचे सुभेदार फिदाईखान यांजपाशी तैनात करण्यात आले. सय्यद शहामतखान याच्या भावां-पैकी मुहंमद सालेह यास एक वर्षाची रजा देण्यात आली.

बादशहांना कळविण्यात आले, बादशाही लष्कराचा सरंजाम सामग्री ही मागच्या मुक्कामावर राहिली होती. ती चोरांनी (मराठ्यांनी) लुटून नेली.

सोळा जुलै– आज बादशहांनी दिवाणा (न्यायदान) चे काम केले. खासगी खजान्याचा फतेह दौलत कौल याने बादशहांना पुढीलप्रमाणे

कळविले– ' तीन हजार अश्रफ्या ओढयाच्या पुरात वाहून गेल्या होत्या. मुहंमद वगैरे पाच फकीरांनी ओढयांतून अश्रफ्या शोधून काढल्या. त्यांनी तीनशे अश्रफ्या सरकारच्या मशालचीकडे अमानत (ठेव) म्हणून ठेवल्या आहेत. मशालचीने ही हकीकत आपल्याला सांगितली. यावर मी माणसे पाठवून फकीरांना पकडून आणले. मशालचीकडून तीनशे अश्रफ्या व फकीरांकडून पाचशे बत्तीस अश्रफ्या आणि दोनशे रुपये काढण्यात आले. मी त्यांना विचारले. फकीर म्हणाले ' हे पाहता इतक्याच अश्रफ्या सापडल्या. याशिवाय काही नाही.' मी त्यांना म्हटले ' मग हे रुपये तुम्ही कोठून मिळविले.' ते म्हणाले ' अश्रफ्यांच्या मोबदल्यांत आम्ही घेतले आहेत.'

बादशहांनी आज्ञा केली की ' त्यांना कैद करा, त्यांनी अश्रफ्या बाहेर काढाव्या.'

कौलारे तुजक (दरबारचे शिपाई सैनिक) मुहंमद तकी याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

रुहुल्लाखानाने विनंती केली की मुहतशमखान याने मला पुढील पत्र पाठविले आहे– ' मला जहागीर नाही. मी दुर्दशेत आहे. वाहने नसल्यामुळे मागे राहिलो आहे. मला दोन हत्ती, दोन घोडे, तीन हजार रुपये व जहागीरही देण्यात यावी.'

बादशहांनी आज्ञा केली की ' जहागीर, घोडे व दोन हजार रुपये देण्यात यावे.

मरहूम शरीफखान याचा जावई लुत्फ अली याला बीड येथे जिजियाचा अमीन (वसुली अधिकारी) म्हणून नेमण्यात आले.

फराशखान्याचा मुश्रफ अब्दुल्हादी याला पेशखाना पुढील मुक्कामावर पाठविण्याची आज्ञा झाली.

बादशहांनी आज्ञा केली की भाडी वाटण्याच्या खात्याचा दारोगा सय्यद गजनफर याने बेनीशहादुर्गावरुन (पन्हाळगड) भाडयाचे उंट आणावे. त्याप्रमाणे करण्यात आले.

फजाइलखानाने पुढीलप्रमाणे विनंती केली–

' मलकापूरचा माजी ठाणेदार गुलाम मुहंमद याने मला पुढील पत्र लिहिले आहे–' मला जहागिरीतून काही उत्पन्न नाही. माझी दुर्दशा झाली आहे.

उपासमारीमुळे माझी पथके मला सोडून चालली आहेत. मदत करण्यात यावी.'

खासगी खजिन्यातून त्याला एक हजार देणे (पांचशे स्वतःसाठी व पाचशे पथकासाठी) अशी बादशहांनी आज्ञा केली. नंतरची आज्ञा–अब्दुल्हमीदखान हा ठाणदार म्हणून मलकापूरला जात आहे. त्याने गुलाम मुहंमदला पांचशे रुपये आणि त्याच्या पथकातील लोकांना पांचशे द्यावे.'

आज खालसाचा दिवाण इनायतुल्लाखान याजबरोबर बादशहांनी दिवाण (कचेरी) मध्ये हळू आवाजात खलबते (सरगोशी–कानात कुजबुजणे केली.

सालीपूर (?) च्या हरकाऱ्याने पुढीलप्रमाणे लिहून कळविले–

'पिड नाईक बेडर याचा अधिकारी भागू (नाईक) याने कोकटनूरच्या परगण्यात येऊन एक गढी बांधली होती. ही बातमी कळल्यावर इंडीचा फौजदार व अमीन लतीफबेग हा उम्दतुलमुल्कखान फीरोजजंग यांची पथके घेऊन गढीवर चालून गेला. त्याने गढीला वेढा घातला. लढाई झाली. शत्रुपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. शत्रू पळून गेले. घोडया, शस्त्रे वगैरे लूट हाती लागली.' बादशहा म्हणाले 'सेवेचा मजुरा (मान्य) झाला.'

अजमेरचा माजी सुभेदार मरहूम सय्यद अब्दुल्लाखान याच्या पुढील आप्तांना मन्सबी अगर बढत्या देण्यात आल्या–१) हसन अलीखान (मोगल साम्राज्याचा भावी मुख्यप्रधान सय्यद अब्दुल्ला या नांवाने) याचा मावसभाऊ किंवा मामेभाऊ रुस्तमअली २) मरहूम अब्दुल्लाखान याच्या मुलीचा मुलगा हिफजुल्ला ३) अब्दुल्लाखानचा मुलगा शर्फूद्दीन अली व ४) त्याचा भाऊ नज्मुद्दीन अली ५) आणखी एक भाऊ सिराजुद्दीन अली ६) मरहूम अब्दुल्लाखानाच्या मुलीचा मुलगा सय्यद हुसेन.

(याच तारखेची सोळा जुलैची आणखी बातमी पुढीलप्रमाणे आहे.)

आज सकाळी फराशखान्याचा मुश्रफ मीर दमामी याने पेशखाना वाहनावर भरला. तो पुढे पाठविण्यासंबंधी त्याने आज्ञा विचारली. बादशहा पुढे म्हणाले पाठवा.'

रुहुल्लाखान याच्या विनंतीवरुन बादशहांनी रावतमल झाला याची बेनी-शहादुर्ग (पन्हाळगड) चा फौजदार म्हणून व इखलासखान याला कोल्हापूरचा ठाणेदार म्हणून नेमणूका केल्या.

दंडराजपुरीचा फौजदार सिद्दी याकूतखान याने खेळण्याच्या विजयाबद्दल शंभर अश्रफ्या निसार (ओवाळणी) म्हणून पाठविल्या.

मरहमखान याने पुढील प्रमाणे विनंती केली.

'तीन हजार अश्रफ्या पाण्यात बुडाल्या होत्या. सरकारच्या नोकरांपैकी एका मशालचीने तीनशे अश्रफ्या आपल्यापाशी आणून दिल्या आहेत. तो म्हणाला 'आठ फकिरांनी पाण्यातून मला बाहेर काढला. त्यापैकी त्यांनी तीनशे अश्रफ्या मला दिल्या. त्या मी घेऊन आलो आहे. हा सरकारी माल आहे.' मी त्या मशालचीला बरोबर घेऊन आठ फकिरांना पकडले. त्यांच्याकडून पाचशे पंचाहत्तर अश्रफ्या संपल्या. बाकीच्याबद्दल ते लोक काही बोलत नाहीत.'

बादशहांनी आज्ञा केली की 'त्या लोकांना नायब कोतवालाच्या हवाली करा आणि सगळा माल काढा.' महरमखानाने विनंती केली की मशालचीला काही मिळावे' त्याला महिन्याला पाच रुपये पगार होता. तो एक रुपायाने वाढविण्यात येऊन त्याला दोन होन बक्षिस म्हणून देण्यात आले.

कर्नूल (कमरनगर) चा किल्लेदार व फौजदार यूसफखान याला मुलगा झाला. त्याने अठरा अश्रफ्या पाठविल्या. बादशहांनी मुलाचे नाव मुहंमद यूनूस ठेवले. बादशहांनी आज्ञा केली की सियादतखानाची मालमत्ता चोरीला गेली. नायब कोतवालाला ताकीद करण्यात यावी की त्याने चोर व माल हजर करावे. मुहंमद अजीम (बादशहाचा नातू) ने एक हत्ती पाठविला. मुनीमखानाने सौदागराकडून एक हत्ती आणला. तो पाच हजारला विकत घ्यावा अशी आज्ञा झाली.

सतरा जुलै– आज बादशहा वडगावच्या दिशेने सव्वादोन कोसाची मजल मारुन पन्हाळगडा अलीकडील दीड कोस मुक्कामावर आले. आज न्यायदानाचे (दिवाण) काम बंद ठेवण्यात आले.

शर्फुद्दीनखान याला पूर्वीप्रमाणे सोलापूरचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले होते– (सैफुद्दीनच्या ऐवजी चुकून शर्फुद्दीन तर पडले नसेल?) तो येऊन बादशहांना भेटला.

उस्मानखान करावल याने हुजुरांच्या निवासस्थानापासून पन्हाळगडच्या प्रवेशद्वारापर्यंतचे अंतर मोजून यावे अशी आज्ञा झाली. बादशहांनी मतलबखान करावल बेगी याला आज्ञा केली की पन्हाळगडच्या किल्ल्यात योग्य अशी जागा पाहून या. लष्करचे जास्तीचे सामान सामुग्री किल्ल्यात ठेवता येईल.

बादशहा प्रवास करीत असताना दोन करावल सैनिक यांनी त्यांना विनंती केली की 'आमच्या जहागिरीकडून काही मिळत नाही. आम्ही अनवाणी चाललो आहोत. आम्हाला स्वारीसाठी घोडे नाहीत.' बादशहांनी आज्ञा केली की सरकारी

तबेल्याचा (पागा) मुश्रफ याने त्याना सूट म्हणून (आरियती याचना केली म्हणून) घोडे द्यावे.

मुश्रफ अब्दुस्सलाम जागेवर हजर नव्हता. तो हजर झाल्यावर त्याने (घोडे देण्याची) व्यवस्था करावी अशी आज्ञा झाली. मुश्रफचा हुद्दा (मन्सब इत्यादी) मला कळवावा अशी बादशहांनी आज्ञा केली.

बादशहाजादा कामबख्श याचा मुलगा सुल्तान मुही युस्सुन्नत याने बादशहांना (आपल्या) तंबूसमोर शंभर अश्रफ्या निसार (ओवाळणी) म्हणून दिल्या. त्याने म्हटले 'माझ्या वडिलांना आजार आहे. परवानगी असल्यास ते स्वार होऊन नंतर (पाठीमागे) येतील.' बादशहांनी विनंती मान्य केली.

मुहंमद अस्लम मन्सबदार याला मदत म्हणून एक घोडा देण्यात आला होता. तो बक्षीस म्हणून द्यावा अशी त्याने विनंती केली. विनंती मान्य करण्यात आली.

खालसाचा कारकून चतुर्भुज हा (अफरातफरीमुळे) कैदेत होता. त्याची मालमत्ता जप्त करण्यात आली. त्याला सोडून देण्याची आज्ञा देण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की 'फतेह दौलत कौल याचा मुलगा फतेहदोस्त याने खजिन्यातून वीस हजार रुपये घ्यावे आणि वेनीशाहदुर्ग (पन्हाळगड) मध्ये जाऊन तेथील हशमांत (पायदळ शिबंदी) पगाराचे वाटप करुन यावे

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली, शहागंज (सरकारी बाजार) याचा बदललेला दारोगा (व्यवस्थापक) इमामुद्दीन हा होता. प्रवासासाठी त्याच्या पाशी वाहन राहीले नाही. त्यामुळे तो अंबाघाटात अडकून राहिला होता. चोरांनी (मराठे) त्याच्यावर हल्ला करुन बहुधा त्याला ठार मारले आणि त्याची मालमत्ता लुटून नेली. इमामुद्दीन बेपत्ता आहे तो कुठे आहे कळत नाही.

पावसामुळे आज कचेरीचे काम झाले नाही. बाहशहांनी आज्ञा केली की पुरंदर किल्ल्याच्या शिबंदीसाठी खजिन्यातून दोन हजार रुपये पाठविण्यात यावे.

उस्मानखान करावल याने कळविले की हुजुरांच्या निवासस्थानापासून पन्हाळगडचा कोकणी दरवाजा अडीच कोसावर आहे.

बादशहांना काल रात्री पुढीलप्रमाणे कळविण्यात आले–

शरीफखान मरहूम याचा मुलगा सय्यद इमामुद्दीन याच्यापाशी वाहतुकीची साधन सामुग्री नसल्यामुळे, तो छावणीत मागे राहीला, खेळणा किल्ल्याच्या घाटाच्या अलीकडे चोरांनी (मराठ्यांनी) त्याच्यावर हल्ला केला. उभय पक्षांची

काही माणसे मारली गेली. चोरांनी (मराठ्यांनी) सर्व काही लुटून नेले. सय्यद इमामुद्दीनची बहीण ही पायी चालत लष्करात आली आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की 'तिला डोलीतून महालात आणा.' तो (सय्यद इमामुद्दीन) तिला घरातून येऊ देत नाही असे बादशहांना कळविण्यात आले.

अठरा जुलै– तळावरील (ब्रम्हपुरीच्या) हरकाऱ्याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले–

'भीमा नदीला मोठा पूर आला. नदीचे पाणी मरहूम मुखलिसखान याच्या हवेली (वाडा) पर्यन्त पोहोचले. फार मोठी मालमत्ता पाण्यात वाहून गेली. उम्दतुल्मुल्कखान फीरोजजंग याने स्वतःचे हत्ती पाठविले व बऱ्याच लोकांचा माल नदीतून बाहेर काढला.' हे ऐकून बदशहा म्हणाले 'कुद्रते इलाही अस्त, परमेश्वरी महिमा आहे.'

रुहुल्लाखान याच्या फौजेचा वाकनीस गुलाम मुहंमद याने पुढीलप्रमाणे लिहून कळविले–

काल रुहुल्लाखान हा मागे राहिला होता. त्याला दोन हजार पर्यन्त सैन्य बाळगण्याची परवानगी आहे. रुहुल्लाखानाच्या हाताखालील अधिकाऱ्यांपैकी कोणीच हजर नव्हते. एकदातर तो स्वतः डोके फोडून घेण्यास (जीव देण्यास, जान दादन बगर) निघाला. रुहुल्लाखान म्हणाला 'माझ्या फौजेत ज्यांना म्हणून तैनात करण्यात आले आहे त्यापैकी कोणीही हजर नाही.'

बादशहांनी आज्ञा केली की 'त्या फौजेत कुणाकुणाला तैनात केले होते, त्यांची नांवे लिहून बख्शीना द्या. ते ती नावे माझ्या समोर ठेवतील.'

एकोणीस जुलै– पावसामुळे कचेरीचे काम झाले नाही. बादशहाच्या निवासस्थानापासून बेनीशहादुर्ग (पन्हाळ गड) च्या प्रवेशद्वारपर्यंतचे अंतर मोजणे आणि लष्करचे जास्तीचे सामान किल्ल्यांत ठेवून देण यासाठी जागा पाहावी म्हणून मतलबखान करावलबेगी हा गेला होता. त्याने परत येऊन पुढीलप्रमाणे सांगितले–

'हुजुरांपासून किल्ल्याचे प्रवेशद्वार दीड कोसावर. वाटेत चिखलमाती फार आहे. येथून अडाच कोस व अर्धापाव या अंतरावर पुढील मुक्काम राहील. हुजूरांपासून मुक्कामाच्या गांवापर्यन्त तीन मजला ठरविल्या आहेत. मुक्कामाची जागा चांगली आहे.' बादशहा त्याला म्हणाले 'लष्करचे जास्तीचे सामान किल्ल्यांत ठेवून या.' जुल्फिकारखानाचा नायब दाऊदखान याला कर्नाटकातील जमीनदारांकडून खंडणी म्हणून पन्नास हत्ती पाठवावे अशी आज्ञा झाली. हत्तीचे सौदागर

ब्रम्हपुरीला आले आहेत. त्यांच्याकडून तीस हत्ती विकत घेऊन पाठवावे अशी गाजीउद्दीन फीरोजजंग यास आज्ञा झाली. तसेच बंगालहून येणारे खंडणीचे हत्ती इकडे पाठवावे अशी आज्ञा आग्र्याकडे पाठविण्यात आली.

संगमनेरचा माजी फौजदार मरहूम (दिवंगत) रजातलबखान याच्या अफरातफरीची चौकशी करण्यासाठी शेख सादुल्ला हा संगमनेरला गेला होता. तो परत येऊन बादशहांना भेटला.

तरबियतखान हा चंदावल पिछाडीला होता. त्याने लिहून पाठविले की 'लष्करचा सैनिक व लष्करचा सगळा सरंजाम, वाहने व वाहतुकीची साधने नसल्यामुळे मागे पडून आहेत. चोरांनी (मराठ्यांनी) उच्छाद मांडला आहे. (फसाद बरपा कर्द) आणि बादशहा (हजरत) तर कूच दर कूच (मजल दर मजल) करीत पुढे चालले आहेत. काय आज्ञा?'

बादशहांनी आज्ञा केली की. 'पेशखाना पुढे पाठविला आहे. ते तंबू पुढील मुक्कामावर तसेच उभे राहू द्या. आम्ही येथे तीन दिवस मुक्काम करणार आहोत.' खान फीरोजजंग याच्या नांवे आज्ञापत्र पाठविण्यात आले.

बीस जुलै– पन्हाळगडच्या अलीकडे दीड कोसावरील मुक्कामात आज बादशहांनी कचेरी केली.

बादशहांना कळविण्यात आले की 'सरकारी सरंजाम मागेच राहिला आहे. अद्याप आला नाही. चिखलामुळे हत्तीही मागे राहिले आहेत.'

बादशहा म्हणाले ' आमचे दोन तीन मुक्काम येथेच राहतील. सरंजाम मागवून घ्या.'

आज्ञा करण्यात आली की मिर्जा बेग याने औरंगाबादेहून हत्ती आणावे.

अहमदाबादच्या बातमीपत्रावरून पुढील हकीकत कळली– राणा अमरसिंग (उदयपूर) याचे काका इंद्रसिंग व बहादुरसिंग यांनी बादशहाजादा आज्जमशहा यांची भेट घेतली. ते त्याला म्हणाले 'आमचा भाऊ सूरतसिंग हा बादशहाच्या चाकरीत येऊ इच्छीत होता. राणा अमरसिंगाने त्याला ठार मारले. राणाचे अनेक सेवक सूरतसिंगाला मिळाले होते. ते राणा अमरसिंगावर नाराज झाले. ते आमच्याकडे येऊन म्हणत आहेत की ' बादशहाजादा आज्जमशहा हे राण्याच्या मुलुखावर स्वारी करणार असतील तर आम्ही त्यांच्या आज्ञेप्रमाणे काम करण्यास तयार आहोत.' यावर आज्जमशहा म्हणाला 'तुम्ही मागे काही सांगितले होते ते काही घडून आले नाही. तुम्ही बादशहाकडे जाऊन हे सर्व त्यांना सांगा.'

बादशहांनी आज्ञा केली की 'बक्षीनी त्यांना हुजुरात येण्याविषयी लिहावे.'

हामिदखान बहादूर आणि किलीदे फतह (वसंतगड) चा किल्लेदार लालराम यांच्या नावे आज्ञापत्रे सादर झाली.

उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याने (ब्रम्हपुरीच्या तळावरुन) खालील पत्र लिहिले–

१) चोरांनी (मराठयांनी–) बेत केला की भीमेच्या पलीकडे या प्रदेशात छावणी करावी, त्यांचे पारिपत्य करण्यासाठी मी मुजाहिदखान याच्याबरोबर कसलेली पथके दिली आहेत.

२) हंबीरराव वगैरे मराठे सरदार माझ्यापाशी तैनात आहेत. ते म्हणतात 'आमचा काही अपराध नसता आमच्या जहागिरी काढून घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे आमची पथके परागंदा होतील. आमच्या जहागिरी बहाल करण्यात येतील अशी आशा आहे.'

यावर मोतिमदखान याने चौकशी करून कळवावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

ख्वाजा महरमखान याने पुढीलप्रमाणे माहिती सांगितली–

'निसार (ओवाळणी) च्या अश्रफ्या पाण्यात बुडाल्या त्या प्रकरणात फकीर धरले होते, त्यापैकी कमाल नावाचा फकीर अटकेत आहे. त्याच्या बायकोपाशी सत्तर मोहोरा आणि तिच्याबरोबर असलेल्या एका फकीरापाशी सहा मोहोरा निघाल्या. याशिवाय आपल्यापाशी आणखी काही आहे हे ती माणसे कबूल करीत नाहीत. यावर काय आज्ञा?' बादशहांनी आज्ञा केली की 'त्यांना तंबी देऊन माल बाहेर काढावा.'

गंगापूर (आज औरंगाबाद जिल्ह्यात) येथे तैनात असलेल्या हरकऱ्याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले–

'लोणजी (सोनजी) नावाचा सरदार हा (आपल्या सैन्यासहित) या प्रदेशात हालचाली करीत होता. ही बातमी कळल्यावर येथील फौजदार व अमीन अमानतखान याने चोरांचे (मराठ्यांचे) पारिपत्य करण्यासाठी आपली पथके पाठविली. लढाई झाली. लोणजी (सोनजी) सरदार आणि इतर दोघे यांना जिवंत पकडण्यात आले. शत्रूपैकी अनेक जणांना ठार करण्यात आले. घोडे शस्त्रे वगैरे लूट मिळाली आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की 'अमीरुल उमरा (मुख्य प्रधान असदखान) याने अमानतखानाला लिहावे की 'शत्रूचा सरदार आणि इतर जी माणसे पकडण्यात आली आहेत त्यांना ठार मारण्यात यावे.'

कोल्हापूरच्या हरकाऱ्याच्या लिहिण्यावरून कळले की 'कावंजा (?) तालुक्यात नादरा (?) हा किल्ला आहे. तो घेण्यासाठी बेदारबख्ताने शंभर सैनिक पाठविले. भुवंदगड (भुवनगड, भुदरगड) मधून चोर (मराठे) बाहेर पडले. त्यांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला.'

बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) चा किल्लेदार रावतमल झाला हा येऊन बादशहांना भेटला. त्याने नऊ रुपये निसार (ओवाळणी) म्हणून बादशहासमोर ठेवले. त्याला पावसाळ्यात वापरावयाची वस्त्रे (जामाबारानी) देण्यात आली.

सैफुद्दीनखान यास नळदुर्गचा फौजदार म्हणून नेमण्यात आले त्यापूर्वीचा अब्बासखान याला सोलापूरचा किल्लेदार व फौजदार म्हणून नेमण्यात आले.

एकवीस जुलै– बादशहाना कळविण्यात आले की 'खान फीरोजजंग याचा भाऊ हमिदखान बहादुर हा तळावरुन (ब्रह्मपुरी) काफिला (येजा करणारी लष्करांतील माणसे, व्यापारी इत्यादी) व धान्याची रसद घेऊन छावणीपाशी आला आहे.' बादशहा म्हणाले 'येऊ द्या.' हमीदखानाने येऊन बादशहाची भेट घेतली. खेळणाच्या विजयाबाबत शंभर अश्रफ्या व स्वतःकडून निसार (ओवाळणी) म्हणून अठरा मोहोरा त्याने बादशहासमोर ठेवल्या. खान फीरोजजंग याने लिहिलेले पत्रही त्याने बादशहासमोर ठेवले. त्याच्या तंबूवर भोजन व फळफळावळ पाठविण्यात यावीत अशी आज्ञा झाली. हामिदखानाने तळावरुन खजिनापण वडगावला नेला. बादशहांनी आज्ञा केली की 'जुम्दतुल्मुल्क अमीरुल उमरा (असदखान), बख्शी उल्मुल्क बहरामंदखान, रुहुल्लाखान व खानाजादखान यांनीच तेवढे आपल्या कुटुंबियांना बरोबर ठेवावे. छावणीतील इतर तमाम लोकांनी आपापल्या कुटुंबियांना हामिदखानाबरोबर तळावर (ब्रह्मपुरी) पाठवून द्यावे.'

बादशहा हमीदुद्दीनखान बहादुरला म्हणाले–

'पूर्वी पन्हाळगडच्या वेढ्याच्या वेळी फतेहुल्लाखानाचे मोर्चे होते तिकडे एक झरा वाहात होता. तेथे एक हौद व ओटा बांधावा अशी मी आज्ञा केली होती. तुम्ही व मतलबखानाचा मुलगा आणि बेलदारांचा दारोगा यांनी जाऊन

ती जागा पाहावी आणि ओटा दुरुस्त करुन यावे. मी तो ओटा आणि हौद पाहणार आहे.'

तरबियतखानाने चंदावल (पिछाडी) हून लिहून पाठविले की 'मुहतशम खानाची फार हालअपेष्टा होत आहे. त्याला काही मदत व्हावी.' त्याला एक हजार रुपये देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

बावीस जुलै– आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या. मतलबखान करावल बेगी याने हरिणाची शिकार करुन ती बादशहाकडे पाठविली. बादशहांनी ते हामिदखानाकडे बक्षीस म्हणून पाठविले.

गाजिउद्दीन फीरोजजंग याच्या लष्करातील बातम्यांवरून कळले की नाहरखान नावाचा तीन हजारी मन्सबदार त्याच्यापाशी तैनात होता. तो मरण पावला.

बादशहांना कळविण्यात आले की 'शरीफखान मरहूम याचा मुलगा सय्यद इमामुद्दीन याचे सर्वस्व चोरांनी (मराठ्यांनी) लुटले. तरबियतखानाने त्याला एक घोडा देऊन त्याला मलकापुरापर्यंत पोहोचविले.'

तेवीस जुलै– आज दिवसाचा एक प्रहर आला असता बादशहा तख्तेखांवर बसून निघाले. पावणे तीन कोसाची मजल मारून ते बालसगाव (पारगाव(?) हातकणंगले तालुका) येथे मुक्कामावर येऊन दाखल झाले. आज त्यांनी दिवाण (कचेरी) चे काम केले नाही. वाटेत हामिदखान बहादुर (भावी निजामुल्मुल्काचा चुलता, गाजिउद्दीन फीरोजजंग याचा भाऊ) व त्याचे पुढील सहकारी बादशहांना भेटले आणि त्यांनी बादशहांना निसार व पेशकश दिले–

१) सिराजुद्दीनखान २) फकीर मुहंमदखान ३) मिर्झाबेगखान ४) (ब्रम्हपुरी) तळाचा फौजदार जैनुल आबिदीन ५) अलीखान ६) हंबीरराव ७) खंजरखान

जमशीदखान विजापुरी याला मलकापूर व तोरगलचा (?) जिल्हेदार म्हणून नेमण्यात आले.

पुढील मुक्कामावर जाताना बादशहा जेव्हा पन्हाळगडच्या खालून जाऊ लागले तेव्हा पन्हाळगडचा किल्लेदार रावतमल झाला याने तोफांना सरबत्ती दिली. किल्लेदाराने मुजरा केला. नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार अब्बासखान याला सोलापूरचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.

इस्माइलखान मका हा पाईने विलायत (पुणे प्रांत) चा ठाणेदार होता. त्याला तेथून बदलण्यात आले. तो येऊन बादशहांना भेटला.

नळदुर्गचा किल्लेदार सैफुद्दीन यासाठी खिलतीची वस्त्रे काढून ठेवण्यात यावीत अशी आज्ञा झाली.

नरकवासी संता (संताजी घोरपडे) याचा भाऊ बहिर्जी घोरपडे याचे विनंतीपत्र आले, त्यात आपण बादशहाची चाकरी करु इच्छितो असे लिहिले होते.

मरहूम खानजहान बहादुर बहादुरखान याचा मुलगा अबुल्बका उर्फ नुस्रतखान याने वाटेत बादशहांना विनंती केली होती की 'माझ्यापाशी स्वारीसाठी घोडा नाही.' बादशहांनी आज्ञा केली होती की 'एक घोडा देण्यात यावा.' बादशहांनी आज्ञा केली की 'या मुक्कामात घोडा देण्यात येईल.'

चोवीस जुलै – मुक्काम बालसगाव (पारगाव असावे). पन्हाळगडपासून दोन कोसावर (सुमारे पांच मैल) बादशहाचा मुक्काम होता.

मुहंमद इखलास उर्फ इखलास केश हा मन्सबीवरुन बडतर्फ झाल्यापासून औरंगाबादेस होता. तो येऊन बादशहाना भेटला. फजाइलखानाचा भाऊ मीर जैनुल आबिदीन हा लष्करात मागे राहिला होता. तो येऊन बादशहांना भेटला.

फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद हादी याने विचारले 'पेशखाना वडगांवकडे नेण्यासंबंधी काय आज्ञा ?' बादशहा म्हणाले 'घेऊन जा. हमीदुद्दीनखान बहादुर व मतलबखान यांनी पेशखान्याबरोबर जावे आणि आमच्या वास्तव्यासाठी योग्य जागा निवडून यावे.'

रुहुल्लाखान याने विनंती केली की 'परवानगी असेल तर हामिदखान याजकडे जाऊन त्याच्या आईच्या मृत्युबद्दल दुखवटा व्यक्त करून येतो.' परवानगी देण्यात आली. अब्बासखान याची सोलापूरचा किल्लेदार व फौजदार म्हणून नेमणूक करण्यात आली.

नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार शर्फुद्दीनखान याने बादशहाचा निरोप घेतला. बेनीशहा दुर्ग (पन्हाळगड) चा किल्लेदार रावतमल झाला यानेही निरोप घेतला. बादशहा रुहुल्लाखान याला म्हणाले 'मलकापूरचा ठाणेदार गुलाम मुहंमद याला लिहा. नवीन ठाणेदार अब्दुल्हमीदखान हा येऊन पोहोचेपर्यंत ठाण्याबद्दल त्याने सावधगिरी बाळगावी.'

शेख गुलाम मुहंमद उर्फ बालीराम याने विनंती केली की एक माणूस वीस दिवसाचे मूल टाकून गेला आहे. ते मी सांभाळू इच्छितो. त्याला नांव द्यावे.' बादशहानी त्याचे नाव फजलेअली असे ठेवले.

पंचवीस जुलै – बादशहाना कळविण्यात आले की नवीन तंबू तळावरुन (ब्रम्हपुरीच्या) पाठविला होता. तो वडगावला आणण्यात आला आहे. तो तेथेच उभा करण्यात यावा अशी आज्ञा झाली.

अमानुल्लाखानाचा भाऊ व इंडीचा ठाणेदार हिदायतुल्ला हा इंडी येथे नायब ठेवून बादशहांच्या भेटीस आला. त्याला अताउल्ला हा किताब देण्यात आला.

मुहंमदबका (खानजहान बहादुरखान याचा मुलगा) उर्फ नुस्रतखान याला त्याच्या विनंतीवरुन एक घोडा देण्यात आला.

नमाजखान्याच्या कनाती आणण्यासाठी ऐवजबेगकडे एक हत्तीण देण्यात यावी अशी आज्ञा झाली.

बादशहांनी हिदायत केशला विचारले 'मुर्तजाबादेहून तळ (ब्रम्हपुरी) किती अंतरावर आहे? त्याने सांगितले 'चाळीस कोस.' बादशहा म्हणाले 'मग हामिद-खानाला विचारुन या' 'तुम्ही किती दिवसात तळावरुन मुर्तजाबादला पोहोचलात?'

सव्वीस जुलै– आज बादशहा आसारे शरीफला भेट देऊन आले. बादशहाचा मुक्काम बालन (? पारगांव अगर मानपडाळे) जवळ. बादशहांनी छावणीत पैगंबराचे स्मृतिअवशेष (आसार मुबारक, रेलिक्स) उभे केले. त्यांनी स्वत: जाऊन दर्शन घेतले. त्यांच्या बरोबर हमीदुद्दीन खान, खानजादखान, महरमखान, ख्वाजामंजूर व ख्वाजा अंबर हे होते.

काल बादशहांनी हिदायत केशला विचारले वडगांवहून विजापूर, तळ (ब्रम्हपुरी) आणि नुस्रताबाद (सगर, गुलबर्गा जिल्हा) ही किती अंतरावर आहेत ? त्याने दिलेली माहिती बादशहासमोर ठेवण्यात आली. मुफख्खरखान मर-हुम याचा मुलगा आजीजुल्ला हा बुऱ्हाणपुराहून येऊन बादशहांना भेटला.

सत्तावीस जुलै –आज बादशहा तख्तेखांवर बसून निघाले, नाले गांवाहून अडीच कोसाचा प्रवास करून ते वडगांवच्या अलिकडे दिड कोसावर पाठा-रच्या मुक्कामाला आले. ते म्हणाले, 'आम्ही येथे दोन मुक्काम करू.'

शेखसादतमंद सियादतखानी याच्यावर कृपा व्हावी अशी रुहुल्लाखान याने विनंती केली. बादशहा सियादतखानाला म्हणाले की 'हा तुमचा मनुष्य आहे का तुमच्या वडिलांचा?' त्याने म्हटले 'उम्दतुलमुल्कखान फिरोजजंग याच्या आश्र-यांत त्याला दिले आहे.' त्याला दोनशे जात व पन्नास स्वार अशी मन्सब होती. तींत पन्नासची वाढ करण्यात आली. बादशहा म्हणाले 'त्याला काही नोकरी द्या.'

गोविंद हरकारा याने कळविले की, 'मलकापूरच्या ठाण्याजवळ एक हत्ती माहुतापासून वेगळा झाला आणि हरवला. मी व माहूत असे डोंगराडोंगरांतून फिरलो. तो हत्ती सांपडला. त्याला मलकापूरचा ठाणेदार गुलाम मुहंमद याच्या हवाली करून आलो.'

लोहगडचा बदललेला किल्लेदार अटलसिंग याने बादशहांना एक ढाल नजर केली. बादशहांनी ती त्याला परत देऊन म्हटले आमच्या दाग तसीह (घोड्यांना खुणेसाठी डाग देत ते खाते) चा दारोगा मीरसईदखान याला दाखवा.

बादशहांनी उस्मान करावलला निरोप दिला. ते त्याला म्हणाले, 'तुम्ही मिरज मुर्तजाबादेला जा. तेथे जवळपास अगर भाळोनी किंवा ह्मापूरपाशी आम्ही मुक्काम करण्यायोग्य स्थळ पाहून या.' उस्मानखानाच्या बरोबर बुरहाण राहील. ते आणि त्यांचे पथक यांची तीन महिन्याची पगारबाकी देण्यात यावी. मतलबखान याने मिरजेजवळ नदी ओलांडण्यास काय व्यवस्था करायची ती करावी.

' खालील मंडळी बादशहांना भेटली–

मुनव्वमखान मरहूम याचा मुलगा मुहंमद अक्रम, हामिदखानाच्याबरोबर आलेला शेख सिराजुद्दीन, लोहगडचा बदललेला किल्लेदार अटलसिंग, बादशहाजादा आज्जम, त्याची बायको जहांजेब बानूबेगम, मुलगा बालाजाह यांनी खेळणा जिंकल्याबद्दल अभिनंदनपर पत्रे व नजरा पाठविल्या.

पुढील मंडळींनी बादशहांना भेटून भेटी दिल्या – १) मतलबखान २) इनायतखानाचा मुलगा हिदायतुल्ला ३) बाकरखान ४) शमशेरबेग ५) महंमूदबेग ६) मीर फतेहुल्ला ७) नीलकंठ हजारी.

अठ्ठावीस जुलै– बादशहा हे फराशखान्याचा मुश्रफ अब्दुलहादी याला म्हणाले 'आमच्या निवासापासून आसार मुबारक (प्रेषितांचे स्मृति अवशेष ठेवले ती जागा) पर्यंत कनातीच्या भिंती उभ्या करा. यापुढे दर गुरुवारी असेच करीत चला. मी प्रदक्षिणेसाठी जात जाईन.'

सय्यद जैन दरवेश (फकीर) याने मलकापुराहून अननस पाठविले. त्याच्याकडे पाचशे रुपये बक्षीस व इतर वस्तू पाठविण्यात आल्या.

एकोणतीस जुलै– बादशहा काल आसारे शरीफच्या दर्शनाला गेले. ते रात्रभर तेथेच होते. कुराण पठण करून आणि सकाळची नमाज पढून ते मुक्कामाला परतले.

तीस जुलै– आज दिवसाचा एक प्रहर झाला असता बादशहा तख्तेखांवर बसून निघाले. पावणे दोन कोसाची मजल मारून ते वडगांव (हातकणंगले तालुका, जिल्हा कोल्हापूर) येथे आपल्या निवासस्थानी दाखल झाले.

पुढील मंडळींनी पाठविलेल्या पुढील भेटी बादशहापुढे आणण्यात आल्या–

१) बादशहाजादा मुअज्जम–दोनशे घोडे

२) अहमद नगर येथील बागेसूफी या बागेचा दारोगा (बदललेला) शेख अजमतुल्ला–अननसाची करंडी

३) उम्दतुल्मुल्कखान फीरोजजंग–एक हजार रुपये व खेळणा विजयासंबंधी पत्र.

४) रुस्तमखान–दोनशे मोहरा व पत्र

५) बादशहाजादा मुअज्जम याजकडून घोडे आणणारा रहमान बख्श–एक धनुष्य.

पुढील मंडळी बादशहाच्या प्रवासात त्यांना भेटली आणि त्यांनी बादशहांना विविध भेटी दिल्या–

१) मुहंमद हाशम–नोकरीचा उमेदवार

२) मीर फतेहुल्ला ३) अमानुल्लाखानाचा भाऊ अताउर्रहमान ४) अब्दुलकादर ५) शरीफखानाचा मुलगा सय्यद इमामुद्दीन हा प्रवासाची साधने नसल्यामुळे मागे राहिला होता. तो आता हुजुरात आला. ६) मरहमतखान आजारी होता, तो बरा होऊन भेटण्यास आला. ७) फतेहुल्लाखान बहादुर.

अहमदनगर येथील बागेसूफी या बागेचा दारोगा (व्यवस्थापक) अज्मतुल्ला हा होता. त्याच्या जागी ख्वाजा मुहरमखान यांची नेमणूक करण्यात आली. प्रत्यक्षात अहमदनगरच्या बागेवर महरमखानाचा नायब (प्रतिनिधि) म्हणून हाजी मुहंमद इब्राहीम याची नेमणूक करण्यात आली.

ख्वाजा बहबल याने विनंती केली की, ' माझी विपन्नावस्था आहे. स्वारीला घोडा नाही! घोडा देण्यात यावा.' बादशहांनी आज्ञा केली की ' तुर्त वापरण्यासाठी म्हणून एक घोडा देण्यात येईल. नंतर बक्षीस म्हणून देण्यात येईल.'

खान नुस्रतजंग याच्या नावे आज्ञापत्र (हस्बुल हुकूम) पाठविण्यात आले.

सखरलना (विशाळगड) चा किल्लेदार जाबताखान याने पुढील प्रमाणे लिहून पाठविले–

'या प्रांतात चोरांचे (मराठ्यांचे) सैन्य पसरले होते. माझा नायब आणि राजापूरचा ठाणेदार हाजी हा त्यांच्यावर त्वरेने चालून गेला. युध्द झाले, शत्रूचे अनेकजण ठार अगर जखमी झाले. कांही पकडले गेले व मारले गेले. बादशहा म्हणाले ' सेवा मान्य झाली.' जाबताखानाच्या मन्सबीत योग्य तो बदल करण्यात आला.

ऑगस्ट १७०२

तीन ऑगस्ट– आज कचेरीचे काम बंद होते.

चार ऑगस्ट– दिवाणेखासच्या शामियान्याच्या ऐवजी लाकडी वास्तू उभी करण्यात आली होती. बादशहांनी तेथे दिवाणे खासचे काम केले. तेथेच रुहुल्लाखान, खानाजादखान, हमीदुद्दीनखान बहादुर, मुहंमद अमीनखान बहादुर, मतलबखान वगैरे श्रेष्ठ अमीर–उमराव यांनी बादशहांना मुजरे केले. हमीदुद्दीनखान याने विनंती केली की दिवाणे खासच्या जागी न्याय कचेरीच्या शामियान्यांत लाकडी राहुटी उभी केली आहे. जागा लहान पडते. मुजऱ्यासाठी म्हणून ज्याला आज्ञा होईल तोच येईल. आज्ञा झाली की शंभर पर्यन्त कर्मचारी व मन्सब दार यांनी येत जावे.

शहाजादा मुहंमद बेदारबख्त याने रोख रकमेची मागणी केली होती. त्याच्या ऐवजी त्याला पंचवीस हजार रुपयाचे जवाहीर देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

मरहूम अमीरखान (काबुलचा सुभेदार) याची मुले मीरखान व मरहमतखान वगैरेना दिवाणेखासमधे येऊ देण्यासंबंधी काय आज्ञा म्हणून विनंती करण्यात आली. आज्ञा झाली की फक्त मीरखान याने येत जात असावे.

गुलबर्ग्याहून सय्यद मझली याने विशाळगड विजयाबद्दल कुराणाची एक प्रत, दोन धनुष्ये, बाणाचे दोन भाते या वस्तू पाठविल्या. बादशहांनी त्या नजरेखालून घातल्या.

फतेह अमीरखान बहादुर याने विनंती केली की मला एक घोडा बक्षीस देण्यात आला आहे. तो निकामी, मरतुकडा आहे. त्याच्या ऐवजी शंभर मोहरा किंमतीचा एक घोडा देण्यात यावा.

बादशहाजादा कामबख्श याजकडे चार तुरंज (ईडलिंबू) पाठविण्यात आले. उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याच्याकडे अननसाची करंडी पाठविण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की हामिदखान बहादुर (खान फीरोजजंग याचा सावत्र भाऊ, भावी निजामुल्मुल्काचा काका) याने चिकोडीच्या दिशेने गस्त घालावी. मुहंमद अमीनखान बहादुर याचा भाऊ नजाबतखान याने छावणीतून निघणारा काफिला मुर्तजाबाद मिरजेपर्यंत पोहोचवावा. तेथून खान फिरोजजंग याच्या पथकाने काफिला तळाबर (ब्रम्हपुरी) पोहोचवावा अशी आज्ञा झाली.

पाच ऑगस्ट - आज शुक्रवार, कचेऱ्या बंद होत्या.

सहा ऑगस्ट – जफरखान आजारी होता. तो बरा होऊन बादशहांना भेटला. मोधा वगैरे चार वंजाऱ्यांना खिलतीची वस्त्रे व रुमा वगैरे सहा वंजाऱ्यांना शाली देण्यात आल्या. मलकापूरचा किल्लेदार व फौजदार शर्फुद्दीन याने विनंतीपत्र व बाणांचा भाता या वस्तू पाठविल्या. फतेह दौलत कौल यानें महालातील खजिन्याची रक्कम घ्यावी आणि हामिदखानाच्या फौजेतील इसमांचा थकलेला पगार वाटून यावा अशी आज्ञा झाली.

शेख हिदायत केश याने आज्ञेप्रमाणे कोंडाणा व राजगड या किल्ल्याचे नकाशे काढून बादशहांना सादर केले.

बादशहांनी आज्ञा केली की मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम याने हत्ती बरोबर घेऊन जावे आणि अंबाघाट येथे पडून राहिलेला सरंजाम घेऊन यावा तरबियतखान चंदावलला (पिछाडी) होता. त्याने (अंबाघाटाकडून) हुजुरात यावे अशी आज्ञा झाली.

बहिर्जी पांढरे याला जवळा (?) वगैरेची ठाणेदारी देण्यात आली होती. त्याला पूर्वी दीड हजार जात व अकराशे स्वार अशी मन्सब होती, तीत पांचशे जात व दोनशे स्वार अशी भर घालण्यात आली होती. पण ठाणेदारीचा व मन्सबवाढीचा हुकूम रद्द करण्यात आला.

इंदापूरचा ठाणेदार मुगलखान हा बादशहांना भेटण्यासाठी आला आहे असे त्याच्या वकीलाकडून कळले. त्याला छावणीत येण्यासाठी दस्तक (परवानगी पत्र) देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

शागीर्द पेशा इसमांची पगारबाकी राहिली होती. त्यासाठी एक लाख रुपये देण्यात यावे अशी आज्ञा झाली. त्याचप्रमाणे फतेहुल्लाखान बहादुरकडे पन्नास हजार रुपये देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

छावणीतील माजी वाकियाख्वान (घटना सांगणारा) सय्यद मुहंमद याने विनंती केली की, 'मी आजारी आहे. मला उपचारासाठी सुभे बुऱ्हाणपुरला जायचे आहे. सहा महिन्याची रजा द्यावी.' विनंती मान्य करण्यात आली.

शेख मिहरुल्ला (पूर्वाश्रमीचा मिहिरचंद) याचा मुलगा बागमल याने न्याय कचेरीत येऊ नये अशी आज्ञा करण्यात आली.

हामिदखान बहादुर याचे सहकारी शेख अलमान व सिराजुद्दीनखान यांची पथके माझ्या पाहाण्यासाठी आणण्यात यावी अशी दागवतसीह खात्याचा दारोगा मीर सईदखान याला आज्ञा करण्यात आली.

सात ऑगस्ट- इंदापूरचा ठाणेदार अलीकुलीखान हा आज्ञेप्रमाणे येऊन भेटला.

सियादतखान याचा काका मुहंमद अमीनबेग हा शहाजहानाबादेहून (दिल्ली) येऊन बादशहांना भेटला.

उस्मानखान करावल हा कृष्णेच्या अलीकडे छावणी योग्य जागा पाहण्यासाठी गेला होता. त्याने येऊन विनंती केली की–

'येथून (वडगावहून) कृष्णा आठ कोस आहे. त्याच्या चार मजला होतील.'

हे ऐकून बादशहा गप्प बसले. बादशहा म्हणाले 'कनाती लावा. आज आम्ही आसारे शरीफला प्रदक्षिणा घालण्यासाठी जाणार आहोत.'

हामिदखान याने विनंती केली की 'परवानगी असल्यास शहाजादा बेदार बख्त यांना भेटेन.' परवानगी देण्यात आली.

बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान याने पुढीलप्रमाणे कळविले– 'राजा जयसिंग (सवाई जयसिंग) हा शहाजादा बेदारबख्त याजपाशी तैनात आहे. छावणीत पूर्वी त्याच्यातर्फे महावीर नांवाचा वकील होता. त्याला बदलून जयसिंग याने केशवराम या जुन्या सेवकाची वकील म्हणून नेमणूक केली आहे.

बादशहा म्हणाले 'छान केले, खूब कर्द.' तळावर (ब्रम्हपुरी) असलेला हरकारा केशोराम याने पुढीलप्रमाणे कळविले–

१) उम्दतुलमुल्कखान फीरोजजंग याने मुजाहदखान याला खालीलप्रमाणे लिहिले आहे–

'अमीर उमरावांचे तंबू व काफिला हे मुर्तजाबाद मिरजेला पोहोचविल्यानंतर तुम्ही भूषणगड भागात गनिमांनी छावणी घातली आहे ती उठवून लावावी.

२) सय्यद नियाजखान व खुशखबरखान हे गनिमांच्या पारिपत्यासाठी धाराशिव (सध्याचा उस्मानाबाद जिल्हा) भागात गेले आहेत. खान फीरोजजंग याने त्यांना लिहिले की 'गनिमांच्या छावण्या काढून लावा आणि धान्याची रसद गोळा करून बरोबर घेऊन या.'

मुहंमदाबाद बीदरचा सुभेदार खुदाबंदाखान याने लिहून विनंती केली की 'मुहंमदीबेग याने चोरांच्या (मराठ्यांच्या) युध्दात अनेक वेळा कामगिरी बजावली आहे. मन्सब मिळावी.' त्याला दोनशे जात व वीस स्वार अशी मन्सब देण्यात आली.

आठ ऑगस्ट– काल बादशहा आसार शरीफ (प्रेषितांचे स्मृति अवशेष ठेवलेली जागा)ला गेले. तेथे ते फातेहा पढले. त्यानी प्रदक्षिणा केली रात्रभर तेथेच होते, तेथे त्यानी कुराणाचे पठण केले. नंतर ते आपल्या वास्तव्यस्थानाकडे परतले.

पुढील जणांकडे आज्ञापत्रे रवाना झाली– १) बादशहाजादा मुअज्जम २) शहाजादा बेदारबख्त ३) अलीमर्दानखान ४) खान फीरोजजंग ५) शरीफुल्लाखान ६) खान आलम.

नऊ ऑगस्ट– शिवाजी डफळे याने विनंती लिहून पाठविली की आपला मुलगा खामाजी याला पदवी देण्यात यावी. त्याला 'बायाजी' हा किताब देण्यात आला

अब्दुर्रहमान हरकारा याने लिहून पाठविली की 'मिहदीआबादचा फौजदार अब्दुलरसूलखान याच्यापाशी स्वतःचे असे पथक नाही' खान फीरोजजंग याने वस्तूस्थितीची चौकशी करून कळवावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

बांधकाम खात्याचा शुक्रुल्ला याने तळावरचा न्यायालयाचा तंबू दुरुस्त करावा अशी आज्ञा झाली.

अंबाघाटावर राहिलेला सरंजाम आणण्यासाठी मुहंमद काजम याला नेमण्यात आले होते. आता राव मानसिंग (जाधव) याला त्याचा नायब (प्रतिनिधी) म्हणून नेमण्यात आले.

शहाजादा मुहंमद मुइजुद्दीन (बादशहाचा नातू, मुअज्जमचा मुलगा) याने ऐंशी घोडे पाठविले होते. त्यापैकी हमीदुद्दीन खान बहादुर याने आठ घोडे बादशहाच्या समोर आणले. तीन घोडे बादशहाजादा कामबख्श याच्यासाठी वेगळे काढून ठेवण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

तरबियतखान हा पिछाडीला (अंबाघाट भागात) होता. तो येऊन बादशहांना भेटला. त्याचा मुलगा मुहंमद इसहाक, मुनीमखान फतेहुल्लाखान बहादुर व कोल्हापूरचा बदललेला ठाणेदार अब्दुलमजीदखान ही मंडळी बादशहांना भेटली

मरहूम होशदारखान याचा नातू मुहंमद सादिक याला त्याच्या जहागिरीच्या व्यवस्थेसाठी बुऱ्हाणपूरला जाण्यासाठी म्हणून चार महिन्याची रजा देण्यात आली.

मुनीमखान याच्या विनंतीप्रमाणे रामजी (मराठा सरदार) याचे अपराध माफ करण्यात आले.

बादशहा तरबियतखानाला म्हणाले 'तुम्ही रावतमल झाला (पन्हाळगडचा किल्लेदार) याला लिहा की, अंबाघाट वरुन मुहंमद काजम हा छावणीचा (मागे राहिलेला) सरंजाम घेऊन येत आहे. त्या कामासाठी तुम्ही आपली पथके पाठवा.'

दहा ऑगस्ट – काल रात्री बादशहांनी आज्ञा केली की 'फक्त पुढील मंडळींना पालखीत बसून गुलालबार (बादशहाचे निवासस्थान) मध्ये येण्याची परवानगी राहील– १) बादशहाजादा कामबख्श २) बहरामंदखान ३) रुहुल्लाखान ४) तरबियतखान ५) खानाजादखान ६) फजाईल खान ७) काजी आक्रमखान ८) मुहंमद अमीनखान बहादुर ९) सियादतखान १०) हमीदुद्दीनखान बहादुर

वन्हाडचा दिवाण मुहंमद नसीर याची दुय्यम वाकनीस म्हणून नेमणूक झाली.

बादशहाजादा मुअज्जम याने दोनशे घोडे पाठविले होते. त्यापैकी वीस घोडे हमीदुद्दीनखान बहादुर याने बादशहाच्या समोर आणले. ते पाहून बादशहा खुश झाले.

तरबियतखान हा पिछाडीला होता. त्याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले–

'अंबाघाटचे ठाणे काढून घ्यावे अशी आज्ञा झाली आहे. पण इकडे चोरांची (मराठ्यांची) वर्दळ फार आहे. ठाणे कायम ठेवण्यात येईल अशी आशा आहे.'

सय्यद नासाज याचा नातू सय्यद अबुल्फरह याला जाफरखान ही पदवी देण्यात येऊन त्याची मन्सब वाढविण्यात आली.

खेळणा किल्ला जिंकून घेण्याच्या खुशीबद्दल बादशहांनी नगारे नौबतीच्या इसमांस बक्षीस म्हणून पंधरा हजार रुपये दिले.

हमीदुद्दीनखान बहादुर याने पुढीलप्रमाणे विनंती केली –

'मला कळले आहे की विजापूरचे कानूनगो (देशपांडे) रामजी व रुद्राजी यानी चिकोडीचा जमीनदार दारमय्या (?) याच्याशी संगनमत केले आहे. तू आम्हाला चांगली रक्कम देशील तर आम्ही तुझी कैदेतून मुक्तता करवू असे आश्वासन त्यानी दिले आहे.' बादशदा म्हणाले 'त्यांना पक्की तंबी द्या आणि कैदेत ठेवा.' त्याप्रमाणे हमीदुद्दीनखान बहादुर याने त्याना तंबी दिली. याच सुमारास बादशहांना कळविण्यात आले की ते निरपराधी आहेत आणि सुटकेची आशा करीत आहेत. बादशहांनी आज्ञा केली की 'जामीन घेऊन त्याना सोडण्यात यावे.'

बादशहांनी नावांचा मुख्य सैफुल्लाखान याला म्हटले 'नावा कृष्णेत सोडा आणि नदीचे पाणी किती कमी जास्त होत आहे याची माहिती देत चला.'

पवनारचा फौजदार मुहंमद मुरादखान (इतिहासकार खाफीखान याला आश्रय देणारा) याने विनंती लिहून पाठविली की 'मी मकमन सरब (?) येथील मन्सबदारांना काढून बादशाही ठाणी बसविली आहेत. आमनेरचा परगणा माझ्या इलाख्यापासून जवळ आहे. तेथील फौजदारीपण मला देण्यात यावी.' बादशहांनी विनंती मान्य केली व तेथील फौजदार अहमद प्यारी याला हुजुरात बोलाविले.

कंधार (नांदेड जिल्हा) चा बदललेला किल्लेदार व फौजदार इश्रतखान उर्फ मुहंमद दाराब याची खान ही पदवी काढून घेण्यात आली. (याच रोजनिशीत दुसऱ्या ठिकाणी इश्रतखान याला खरगोणचा फौजदार म्हटले आहे.)

विजापूरचा कानूनगो (देशपांडे) रुद्राजी याला न्याय कचेरीत (अदालत) येण्याची मनाई करण्यात आली.

संगमनेरचा बख्शी व वाकनीस मुहंमद नईम याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

आज्ञा झाली की फतेहदौलत याने खजिन्यातून रक्कम काढून मुनीमखानाच्या सल्ल्याने मरहूम खान जहान याच्या पथकांत व हैद्राबादी सैनिकांत (मर्दुम कौलदार हैदराबादी) पगारबाकी वाटावी.

अधोनीचा किल्लेदार मलिक हमीखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली– 'तीन वर्षानंतर मला तनखा जहागीर मिळाली. सरकारी कारभारी खुराक व व दुआब (सरकारी देणी) द्या म्हणून माझ्या वकीलाच्या मागे लागले आहेत. त्याची माफी मिळावी.' विनंती मान्य झाली नाही.

विजापूरच्या हरकाऱ्याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले – 'अखोजी घोरपडे (मुधोळचे) हा स्वतःच्या जहागिरीच्या बंदोबस्तासाठी वीस दिवसाची रजा घेऊन गेला होता. तो सात महिन्यांनी आला. पुढील सहा इसम त्याच्या बरोबर असायला हवे होते. ते आले नाहीत १) बाबाजी–तीनशे जात व तीनशे स्वार २) भोजी–पाचशे जात व दोनशे स्वार ३) इसरी राव (?)–पांचशे जात व शंभर स्वार ४) सयाजी (?)–तीनशे जात व साठ स्वार ५) अंबाजी–दोनशे जात व वीस स्वार ६) हंबीरराव–दोनशे जात व वीस स्वार.

फरारी म्हणून त्यांची नोंद व्हावी अशी आज्ञा झाली.

सप्टेंबर १७०२

पंधरा सप्टेंबर – बादशहाजादा मुहंमद आज्जमशहा याने पाठविलेले पत्र बादशहांनी नजरेखालून घातले.

खाने आलम (संभाजी राजांना धरणारा मुकर्रब खान याचा मुलगा) याला गनिमांच्या पारिपत्यासाठी आणि चिकोडीच्या बंदोबस्तासाठी पाठविण्यात आले होते. त्याचे पत्र घेऊन त्याचा आघाडीचा आधिकारी ऐवजबेगखान हा आला. ते वाचून बादशहा म्हणाले 'सियादत खानाने खानेआलमला पुढीलप्रमाणे लिहावे– 'तेथे फौजदार म्हणून नेमलेला इखलासखान हा तेथे येऊन पोहोचेपर्यंत तेथील व्यवस्था तुम्ही सावधगिरीने बाळगावी.

सोळा सप्टेंबर – आज शुक्रवार, दोन्ही दिवाण कचेऱ्या बंद होत्या.

सतरा सप्टेंबर – नबाब जीनतुन्निसाबेगम (औरंगजेबाची मुलगी) हिचे तळावरुन (ब्रम्हपुरीच्या) पत्र आले.

काल रात्री बादशहांना खालील हकीकत कळविण्यात आली.–

'हणमंतराव व इतर मराठे सरदार हे बारामती व शिरवळ भागात हालचाली करीत होते मुहंमद अमीनखान बहादुर हा खटाव मधून बाहेर पडला आणि त्यांच्यावर तातडीने चालून गेला. बाण बंदुकांची लढाई झाली. बादशहाच्या भाग्याने शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. मोठा विजय मिळाला. तीनशे घोडे व उंट अशी लूट मिळाली.'

बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली.' उदगीरच्या किल्लेदारीवर जुहूरअल्लाहच्या ऐवजी हुसामुद्दीन याला कायम करण्यात आले. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की 'इस्लामपुरी (ब्रम्हपूरी) चा किल्लेदार सरअफराजखान हा तेथं पोहोचल्यावर, तेथील माजी किल्लेदार मुरीदखान याने नबाब जीनतुन्निसाबेगम यांच्या बरोबर हुजुरात यावे.'

बादशहा बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान याला म्हणाले, 'मिहदीखान, पुरदिलखान व मुजफ्फरखान यांचे हुद्दे व मरातब काय आहेत ते कळवा.'

बादशहांना कळविण्यात आले की हणमंतराव याच्यावर विजय मिळविल्या बद्दलचे पत्र व निसार (ओवाळणी) ही घेऊन मुहंमद अमीनखान बहादुर याचा मुलगा मुहंमद फाजल व फकर मुहंमदबेग अघरखानी हे आले आहेत.

बादशहा म्हणाले 'उद्या त्यांना घेऊन या.' बादशहांनी आज्ञा केली की, कृष्णेवर आमचा तंबू उभा कराल तो बादशहाजादा कामबख्श याच्या तंबूसमोर उभा करा.

अठरा सप्टेंबर - गाजिउद्दीनखान बहादुर फीरोजजंग हा विजापूरचा सुभेदार होता त्याला विजापूर कर्नाटकची फौजदारी पण देण्यात आली. त्या जागे-वर .चीनकुलीजखान (फीरोजजंगाचा मुलगा आणि भावी निजामुल्मुल्क) हा होता. त्याला तेथून बदलण्यात आले.

नावांचा प्रमुख सैफुल्लाखान याला बादशहा म्हणाले 'नावा तयार ठेवा. आम्ही उद्या येथून कूच करणार.'

मुहंमद अमीनखान बहादुर याचा मुलगा आणि फकीर मुहंमदबेग हे बाद-शहांना भेटले. त्यांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

बादशहांनी उस्मानखान करावल आणि मिर्जा गुल यांना आज्ञा केली की 'तुम्ही येथून पेडगावपर्यंतचे अंतर साखळीने मोजून या.' या मार्गावर मागे ज्या मजला ठरल्या होत्या त्यांचा तपशील त्यांना देण्यात यावा अशी आज्ञा झाली.

मीर तुजक (शिष्टाचाराचा अधिकारी, प्रोटोकॉल,) मन्सूरखान याला आज्ञा झाली की 'कंद (?) चा फौजदार रणमस्तखान याच्यामागे माणसे लावून कृष्णेच्या पार करण्यास लावा आणि त्याला पुढे रवाना करा.

रेहकले (लहान तोफा) यांना कृष्णापार करविण्या संबंधी काय आज्ञा म्हणून विचारता बादशहा म्हणाले, 'सैफुल्लाखानाने पार करवावे.'

एकोणीस सप्टेंबर – बादशहा हे फराशखान्याचा मुशरफ अब्दुल्हादी याला म्हणाले 'आमच्या वास्तव्य स्थानापासून कृष्णेच्या काठापर्यंत कनाती उभ्या करा. त्या वाटेने आम्ही जाऊ' त्याप्रमाणे करण्यात आले. दिवसाच्या सात घटका झाल्या असता बादशहा मेण्यातून त्या वाटेने कृष्णेपर्यंत आले आणि नावेत बसले. बादशहा म्हणाले 'बादशहाजादा कामबख्श व त्यांची मुले यांनी बसावे. जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्य प्रधान असदखान) यांनी नावेत येऊन मागे बसावे. त्याप्रमाणे करण्यात आले. नावांचा प्रमुख सैफुल्लाखान याने एक तल्वार बादशहांना नजर केली.

दिवसाचा एक प्रहर झाला असता बादशहांनी नदी ओलांडली आणि ते आपल्या निवासस्थानात दाखल झाले.

बादशहांनी रुहुल्लाखानास आज्ञा केली की 'सगळे लष्कर नदी पार करीपर्यंत तुम्ही नदीच्या पलीकडे रहा.' बादशहाजादा कामबक्ष याने आपल्या तंबूच्या समोर बादशहांना निसार (ओवाळणी) म्हणून शंभर मोहरा नजर केल्या. त्या माफ करण्यात आल्या.

काल जवाहरखान्याचा मुश्रफ गुलाम मुहंमद याने विनंती केली की, 'मी जवाहरखाना व इतर कारखाने कृष्णापार करविले आहेत त्यांची काळजी घेण्यासाठी बख्शी उलमुल्क बहरामंदखान यांना आज्ञा व्हावी.' विनंती मान्य करण्यात आली. काल रात्री गुलाम मुहंमद याने कळविले की 'बख्शी उलमुल्क बहरामंदखान यांनी जवाहरखान्याभोवती शंभर स्वार व दोनशे प्यादे यांचा पहरा बसविला आहे.

बादशहाच्या आज्ञेप्रमाणे बहरामंदखान हा आज त्यांना भेटला.

मुहंमद अमीनखान बहादूर याने विनंती लिहून पाठविली की लहान मन्सबीच्या इसमांना शिरपेच देण्यात आले आहेत. हणमंतरावावर विजय मिळविला याबद्दल मलाही शिरपेच मिळावा.' बादशहांनी विनंती मान्य केली. तीस रुपये किंमतीचा एक शिरपेच होता. बादशहांनी त्यांत शंभर रुपयांची भर घातली आणि मुहंमद अमीनखान बहादूर याजकडे पाठवावे अशी आज्ञा केली.

मुर्तजाबाद मिरजेचा किल्लेदार व फौजदार शरीफखान हा आज्ञेप्रमाणे येऊन बादशहास भेटला. त्याने विनंती केली की 'येथील हवापाणी मला मानवत नाही. माझी ही जागा इतर कुणाला तरी देण्यात यावी.' विनंती मान्य करण्यात आली.

वीस सप्टेंबर– कृष्णेकाठी मुक्काम मुर्तजाबाद मिरजेच्या जवळ, राहाण्या योग्य जागा पाहण्यासाठी बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर व मतलबखान यांना पाठविले होते. ते परत आले आणि म्हणाले 'येथून दिड कोसावर राहाण्या योग्य जागा आहे.'

मुर्तजाबाद मिरजेचा किल्लेदार व फौजदार शरीफखान याचा मुलगा मीर अहमद व मिरजेच्या तोफखान्याचा दारोगा मुहंमदअली हे येऊन बादशहांना भेटले.

चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) याला वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमण्यात आले होते पण तो हुकूम रद्द करण्यात आला. वऱ्हाडवर अलीमर्दानखान हा सुभेदार होता. त्याच्या जागी उम्दतुलमुल्कखान फीरोजजंग (भावी निजामुल्मुल्काचा बाप) याची वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमणूक करण्यात आली.

मुहंमद अमीनखान बहादुर (निजामुल्मुल्काचा चुलत चुलता) याला हुजुरात बोलावून घेण्यात आले.

मुहंमद आलम याला गाळणा किल्ल्याचा (मालेगाव तालुका, नाशिक जिल्हा) बक्षी व वाकनीस म्हणून नेमण्यात आले.

नौकांचा प्रमुख मीरसैफुल्ला याने विनंती केली की, 'नावाड्यांच्यावर एक हजार रुपये खर्च करावे लागले. ते मी स्वत: देईन. मान्यता मिळावी.' बादशहांनी विनंती मान्य केली.

मरहूम नजाबतखान (खानदेशचा माजी सुभेदार) याचा नातू मुहंमद वारस याला खानदेशचा सुभेदार बहरोजखान (वारसचा काका) याच्यापाशी बऱ्हाणपुर येथे तैनात करण्यात आले.

एकवीस सप्टेंबर – फराशखान्याचा मुश्रफ अब्दुल्हादी याने विनंती केली की 'पुढे पाठवायचे पेशखान्याचे तंबू कृष्णापार झाले आहेत. ते पुढील मुक्कामावर पाठविण्यासंबधी काय आज्ञा ?' बादशहा म्हणाले 'पाठवा'

बादशहांना कळविण्यात आले की 'छावणींतील कित्येक माणसे अद्याप कृष्णेच्या पलीकडच्या काठावर अडकून पडली आहेत.' बादशहा म्हणाले 'उद्या आमचा मुक्काम येथे राहील. आम्ही गुरुवारी येथून कूच करू.'

फराशखान्याचा मुश्रफ अब्दुल्हादी याला बादशहा म्हणाले, 'न्याय कचेरी (अदालत) पासून आसारे शरीफ पर्यंत कनाती उभ्या करा. आम्ही प्रदक्षिणेसाठी जाऊ.'

बादशहा फजाईलखानाला म्हणाले. 'तुम्ही उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याच्या नांवे फर्मान तयार करा. त्याला म्हणावे 'तुमची नेमणूक बऱ्हाडचा सुभेदार म्हणून केली आहे. तुम्ही हे फर्मान मिळताच तळावर (ब्रम्हपुरीच्या) आपला एक नायब ठेवा आणि गनीम सापडतील तेथे त्यांचे पारिपत्य करीत फिरा.'

अलसखान (अतिशखान ?) हा जुन्नरच्या परिसरात होता. त्याला हुजुरात बोलावून घेण्यात आले.

बख्शी उल्मुल्क बहरामंदखान याच्या विनंतीवरून सिद्दी बलालखान याला शंभर मोहरा किंमतीचा एक घोडा देण्यात आला.

मुहंमद अमीनखान बहादुर हा चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी गेला होता. तो आपल्या सहकाऱ्यांसहित येऊन बादशहांना भेटला. बादशहा त्याला म्हणाले 'बंडखोरांचे (मराठ्यांचे) छान पारिपत्य केलेत. सेवा मान्य झाली.' अमीनखानाने लुटीत आणलेले घोडे, निशान, भाले, छत्र, इत्यादी शस्त्रास्त्रे बादशहांना दाखविली. ती पाहून बादशहा म्हणाले, 'गाझींना (सैनिकांना) घोडे ठेवून घेऊ द्या. बाकीचा माल कोठार घराच्या अधिकाऱ्याकडे (नायब मीर सामान) द्या.' मुहंमद अमीनखान बहादूर याला दोन मोहरा व शिरपेच, मुघल

खान याला दोन मोहरा व एक हत्ती, ख्वाजाखान याला दोन मोहरा एक हत्ती अशी बक्षिसे देण्यात आली. नजाबतखान याला दोन मोहरा देण्यात आल्या.

तळावरच्या (ब्रम्हपुरी) हरकाऱ्याने पुढील हकीकत लिहून पाठविली–

उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याने खुशखबरखान याला पुढीलप्रमाणे लिहिले आहे–दहा हजार बंडखोर (मराठे) हे मुहंमदाबाद (बीदर) च्या परिसरात भालकीजवळ छावणी घालून आहेत. तुम्ही त्यांचे पारिपत्य करून तेथील त्यांची छावणी काढून लावा.'

तेवीस सप्टेंबर– काल संध्याकाळी बादशहा आसारे शरीफच्या दर्शनाला गेले, ते रात्रभर तेथेच होते. आज दिवस तीन घटिका वर आला असता ते परत आले. ते म्हणाले, 'कनाती तशाच राहु द्या, आज संध्याकाळी मी पुन्हा जाईन.'

बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान हा आज्ञेप्रमाणे कृष्णेच्या पलीकडच्या काठावर राहिला होता. तो येऊन बादशहांना भेटला.

काल रात्री बादशहांना खालीलप्रमाणे कळविण्यात आले–

'छावणीतील तोफखान्याचे बैल व काही वंजारी यांना चोरांनी (मराठ्यांनी) मुर्तजबाद मिरजेच्या जवळून पळवून नेले.'

बादशहांनी आज्ञा केली की मीरकखान याने त्यांना सोडवून आणावे' त्याप्रमाणे मीरकखान याने काही गुरेढोरे व माणसे सोडवून आणली. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

मुघलखान व जफरखान यांनी मुजऱ्यासाठी न्याय कचेरीत येत जात असावे अशी आज्ञा करण्यात आली.

हैद्राबाद कर्नाटकचा फौजदार जुल्फिकारखान नुस्रतजंग याने वेलोर किल्ला जिंकल्याचे निदर्शक म्हणून सोन्याच्या किल्ल्या पाठविल्या, त्या बादशहांनी नजरे खालून घातल्या. (तमीळनाडमधील शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या राज्याचा हा शेवटचा किल्ला).

बादशहांना कळविण्यात आले की, 'पेशखान्याबरोबर (आघाडीचे तंबू) म्हणून ज्या अधिकाऱ्यांना तैनात करण्यात आले होते त्यापैकी जागेवर कोणीही हजर नाही.' 'बादशहा म्हणाले ' हमीदुद्दीनखान बहादुर यांनी चौकशी करून कळवावे.'

फजाइलखान बयूतात (सरकारी मालमत्तेच्या खात्याचा) हा सरंजाम कृष्णा पार करण्यासाठी पलीकडच्या काठावर राहिला होता. तो घेऊन बादशहांना भेटला.

चोवीस सप्टेंबर – मरहूम खानजहान बहादुर (बहादुरखान) याचा मुलगा नुस्रतखान उर्फ मुहंमद बका हा मरण पावला असे कळले. त्याला एक हजार जात व दोनशे स्वार अशी मन्सब होती.

पंचवीस सप्टेंबर – दिवसाचा एक प्रहर झाला असता बादशहा तख्तेखांवर स्वार झाले आणि रवाना झाले. ते मुर्तजाबाद मिरजेवरुन गेले, तशी किल्लेदार शरीफखान याने तोफांना सरबत्ती दिली. दीड कोसाचा प्रवास करुन बादशहांनी मुर्तजाबाद मिरजेच्या दरयाजवळच्या आपल्या निवासस्थानी पोहोचून मुक्काम केला.

तरबियतखान हा पिछाडीला राहिला होता. फतेहुल्लाखान बहादुर हा चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी सखरलना (विशाळगडला) गेला होता. ते दोघे येऊन बादशहांना भेटले.

मतलबखान करावल बेगी, बादशहाजादा मुहंमद कामबख्श, मुनीमखानाचा मुलगा मुहंमद अकरम, मुहंमद अमीनखान बहादुर याला उजव्या फळीच्या आघाडीच्या टेहेळणीवर नेमण्यात आले.

मतलबखानाने विचारले 'पुढील स्वारीबद्दल काय आज्ञा?' बादशहा म्हणाले, 'आम्ही उद्या येथून कूच करु. तुम्ही पुढे जाऊन आमच्या निवासस्थानासाठी जागा पाहून या.'

बादशहांनी पुढील नेमणूका केल्या–(१) औरंगाबादचा सुभेदार लुत्फुल्लाखान नांदेड मुहंमदाबाद बीदरच्या सुभेदारीवर.

२) नांदेड मुहंमदाबाद बीदरचा सुभेदार खुदाबंदाखान याला विजापुरी कर्नाटकच्या फौजदारीवर,

३) विजापुरी कर्नाटकचा फौजदार चीन कुलीजखान याला विजापूरच्या सुभेदारीवर.

बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान याला बादशहांनी आज्ञा केली की 'तुम्ही आघाडीची पथके घेऊन बुणग्याचे व मार्गाचे रक्षण करावे.'

सव्वीस सप्टेंबर– फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद हादी याने विनंती केली की 'पेशखाना पुढे पाठविण्यासंबंधी काय आज्ञा?' बादशहा म्हणाले. 'पाठवून द्या.'

औरंगाबादचा सुभेदार लुत्फुल्ला याला आज्ञा झाली की, 'शहाजादा बेदार-बख्त हा औरंगाबादेस आल्यावर तुम्ही नांदेडला रवाना व्हा.'

कोहीर व गोवळकोंडा येथील फौजदार मुजफ्फरखान यास मुहंमदाबाद बीदरची किल्लेदारी व फौजदारी देण्यात (खुदाबंदाखानाच्या जागी) आली

जमशेदखान विजापुरी यास रायबाग हुक्केरी व चिकोडी या स्थळांची फौजदारी देण्यात आली. त्याला पाच हजार जात व चार हजार स्वार अशी मन्सब होती

सत्तावीस सप्टेंबर– आज बादशहा तख्तेखांवर स्वार झाले. पावणे दोन कोसाची मजल मारून ते मालेगांव नजीकच्या आपल्या निवासस्थानात दाखल झाले.

मुर्तजाबाद मिरजेच्या किल्लेदारी व फौजदारीवर शरीफखान हा होता. त्याची बदली कंधार (नांदेड जिल्हा) चा किल्लेदार म्हणून करण्यात आली. मुर्तजाबाद मिरजेचा किल्लेदार म्हणून निहालबेग याचा मुलगा मुहंमद मुहासिन याची नेमणूक करण्यात आली.

मरहूम खानजहान बहादुरखान याचा मुलगा अबूबका उर्फ नुस्रतखान हा मरण पावला होता. त्याचा भाऊ अबुल्फतह हा सुतकात होता. त्याला सुतकातून काढून त्याचे समाधान करण्यात येऊन त्याला एक बाजूबंद देण्यात आला.

खैरुल्ला याची पन्हाळगडचा बख्शी व वाकनीस म्हणून नेमणूक करण्यात आली. जमशीदखान विजापुरी याच्यासाठी एक घोडा काढून ठवण्यात यावा' अशी आज्ञा करण्यात आली.

श्रीरंगपट्टण यथे असलेला हरकारा अब्दुर्रहमान याने (म्हैसूरची) पेशकश (खंडणी) म्हणून एक हत्ती पाठविला. त्याची किंमत दहा हजार रुपये ठरविण्यात आली.

चीन कुलीजखान याजकडे विजापूरची सुभेदारी देण्यात आली होती. आता त्याच्या जोडीला अधोनीची फौजदारी पण देण्यात आली

उम्दतुलमुल्क गाजिउद्दीनखान बहादुर फीरोजजंग याला वऱ्हाडच्या सुभेदारी बरोबर तळाचे (ब्रम्हपुरी) रक्षणाचेही काम देण्यात आले.

गनिमांच्या पाठलागाचे कामही त्याच्याकडे देण्यात आले. चीन कुलीजखान येऊन पोहोचल्यानंतर फीरोजजंगाने सर अंदाजखान किंवा इतर कुणातरी सहकाऱ्याला आपला नायब म्हणून सुभेदारीवर ठेवावा असे ठरविण्यात आले.

एकोणतीस सप्टेंबर– आज बादशहा मालेगावहून निघाले. वाटेत ते एका ओढ्यावर थांबले. छावणीतील काही गाड्या तेथे पडल्या होत्या. त्या त्यांनी माणसांकडून काढविल्या. यानंतर ते पुढे रवाना झाले. एकंदरीत साडेतीन कोसाची मजल मारून ते खेळणा परनाळा (धुळगाव ?) येथे पोहोचले.

बादशहांनी काल रात्रीचा एक प्रहर व चार घटका झाल्या असता बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान याला बोलावून घेतले. एक घटका (बोलणी झाल्या) नंतर त्याला निरोप देण्यात आला.

आज बादशहा हमीदुद्दीन खान बहादुर याला म्हणाले तुम्ही छावणीचा कोतवाल सरबराहखान याचा नायब मुहंमद अमीनला पुढीलप्रमाणे सांगा– त्याने आपल्या भावाला हे लिहावे की 'नवाब जीनतुन्निसाबेगम, बादशहाजादा मुहंमद कामबख्श याची मुलगी हयातुन्निसा बेगम, उदयपुरी बेगम (बादशहाची बायको) याना तळावरून ब्रह्मपुरी हुजुरात बोलाविले आहे. पण त्यांच्या बरोबर इतर कोणाही सबंधिताला येऊ देऊ नका.'

बादशहांना विनंती करण्यात आली की 'पेशखाना (पुढे पाठविण्याचे तंबू इत्यादी) मागच्या मुक्कामावरून आला आहे. पुढे पाठविण्यासंबंधी काय आज्ञा?' बादशहा म्हणाले, 'उद्या आम्ही येथेच मुक्काम करू.'

तीस सप्टेंबर – मुक्काम परनाळा खिळणा, (परनाळा म्हणजे ओढा, ओढ्याच्या काठचे धुळगाव असावे ? किंवा कुकटोळी)

शहाजादा मुहंमद बेदारबख्त याची औरंगाबादचा सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याला पंधरा हजार जात आणि बारा हजार स्वार अशी मन्सब होती.

मुहंमद हादीने पेशखाना पुढे पाठवावा, मतलबखानाने पेशखान्याबरोबर जावे अशी आज्ञा करण्यात आली.

बादशहांना कळविण्यात आले की औरंगाबादचा सुभेदार लुत्फुल्लाखान (भावी निजामुल्मुल्काचा मामा, याचीच बदली नांदेडच्या सुभेदारीवर करण्यात आली होती. , हा जमादिलावल महिन्याच्या दहा तारखेस (एक वीस सप्टेंबर १७०२) मरण पावला. त्याचा मुलगा इनायतखान याजकडे सैनिकानी पगारबाकी-साठी मोठीच कटकट केली. लुत्फुल्लाची मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी नायब-दिवाण आला होता. त्याला सैनिकांनी ताबा घेऊ दिला नाही.

जमशीदखान विजापुरी याची बंकापूर व चिकोडीचा फौजदार म्हणून नेमणूक झाली होती. त्याला खिलतीची वस्त्रे व एक हत्ती या वस्तू देण्यात आल्या. बादशहांनी फातेहा पढून त्याला निरोप दिला.

ब्रह्मदेव शिसोदिया याचा मुलगा देवसिंग याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

पुढील मंडळींना खालीलप्रमाणे पदव्या देण्यात आल्या–

१) खानदेशचा सुभेदार बहरखान–नजाबतखान २) मुहंमद अमीनखान याचा भाऊ नजाबतखान–नजीबखान ३) हमीद (?) चा मुलगा व आजमनगर बेळगांवचा किल्लेदार. . मुहंमद इब्राहीम–हमीदखान (वाचन जुनैदखान जमशीद-खान असेही होऊ शकते.)

रणमस्तखान याला खेड (?) कन्नड वगैरचा फौजदार नेमण्यात आले होते त्याची मन्सब पांचशेनी कमी करण्यात आली.

बादशहांनी मागे आज्ञा केली होती को तळावर (ब्रम्हपुरी) असलेला कोतवाल सरबराहखान याला लिहिण्यात यावे की नबाब जीनतुन्निसाबेगम उदयपुरी महल व हयातुन्निसाबेगम यांना हुजुरांत बोलावून घेण्यात यावे. पण इतर संबंधितांना आणू नये. पण आता बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर याला पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

'तुम्ही जा (ब्रम्हपुरीला) आणि बेगमा, अंतःपुरातील सेवक सेविका, सगळा सरंजाम आणि तळावरची माणसे यांना तळावरून हुजुरात घेऊन या.'

हमीदुद्दीनखान बहादुर याच्या बरोबर अमानतुल्लाखान, व मुनीमखानाचा मुलगा मुहंमद काजम यांनी जावे अशी आज्ञा देण्यात आली.

पेडगांवच्या छावणीकडे : ८

ऑक्टोबर १७०२

एक ऑक्टोबर – नवाब जीनतुन्निसाबेगम वगैरे बेगमांना तळावरुन बोलावून घेण्यात यावे असे ठरले होते. तो बेत स्थगित करण्यात आला.

दोन ऑक्टोबर – आज बादशहा परनाळा खिळणा येथून निघाले. ते तख्तेखांवर स्वार होते. तीन कोस व बारा सांखळया असा प्रवास करुन ते मौजे खेंडगाव (कन्हेरगाव?) येथे पोहोचले

सटवाजी डफळे हा औषधोपचारासाठी तळावर (ब्रम्हपुरी) गेला होता. तो येऊन बादशहांना भेटला.

बादशहांना कळविण्यात आले ते असे– 'आपल्या लष्कराची माणसे आपले सामान सुमान घेऊन पाठीमागून यत होती. रात्र संपता संपता चोरांनी (मराठ्यांनी) वाटेत या माणसांवर छापा घातला आणि काही जणांना जखमी केले. त्यांचे सर्वस्व लुटून मराठे निघून गेले.'

पुढील मंडळींच्या नावे आज्ञापत्रे पाठविण्यात आली–

१) नवाब जीनतुन्निसाबेगम २) कोल्हापूरचा फौजदार इखलासखान ३) राजा उदितसिंग (ओछर्याचा राजा), ४) जाबताखान किल्लेदार सखरलना विशाळगड.

तीन ऑक्टोबर – आज बादशहा कन्हेर गांवाहून तख्तेखांवर स्वार होऊन निघाले. दोन कोसाला दीड पाव कमी असे अंतर कापून ते मौजे बबूलीगांव (भोलीगांव?) येथे पोहोचले. बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान याने आपल्या तंबूच्या समोर पाच मोहरा बादशहांना अर्पण केल्या.

सैफुद्दीनखान (सोलापूरचा किल्लेदार) याचा भाऊ नसीरुद्दीन याची पूर्वीची नुस्रतखान ही पदवी चालू ठेवण्यात आली. बादशहांनी त्याला पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'जमशीदखान विजापुरी याची नेमणूक रायबाग हुक्केरी येथील फौजदार म्हणून करण्यात आली आहे. तुम्ही त्याला त्याच्या नोकरीच्या जागेवर पोहोचवा आणि तुम्ही स्वतः कृष्णेच्या वाटेने हुजुरांत या.'

गंजाचा (छावणीतील बाजाराचा) करोडी (कारभारी) व खाशांच्या बंदूकांवर देखरेख ठेवणारा अधिकारी मस्तअली याला खान ही पदवी देण्यात आली. विजापूरचा बख्शी व वाकनीस अमानुल्ला याला खान फीरोजजंग याच्या फौजेत तैनात करण्यात आले.

उम्दतुलमुल्क खान फीरोजजंग हा वऱ्हाडचा सुभेदार होता. त्याला आता वऱ्हाडला जोडून मुहंमदाबाद बीदरची सुभेदारीपण देण्यात आली. लुत्फुल्लाखानाच्या मृत्यूमुळे ही योजना करावी लागली. खान फीरोजजंग (भावी निजामुल्मुल्काचा बाप) याला सात हजार जात व सात हजार स्वार अशी मन्सब होती.

फराशखान्याचा मुश्रफ अब्दुल्हादी याने विनंती केली की 'पेशखाना (आघाडीचे तंबू) मागच्या मुक्कामावरुन आला आहे. पुढच्या मुक्कामावर पाठविण्यासंबंधी काय आज्ञा?' बादशहा म्हणाला 'उभा राहू द्या. आम्ही येथे उद्या मुक्काम करणार आहोत.'

जवळचाचा ठाणेदार शुजाअतबेग वारला असे बादशहांना कळविण्यात आले.

चार ऑक्टोबर– मुक्काम भोरगाव (?).

सिराकी (गुलबर्गा प्रांतात, सिंदगी ?) चा अधिकारी अब्दुल्ला हा होता. त्या ठाण्याची व्यवस्था अहसनाबाद गुलबर्गा येथील किल्लेदार इरादतखान याजकडे देण्यात आली.

कन्नड (औरंगाबाद जिल्हा) येथील फौजदार रणमस्तखान याने विनंती करून काही मागण्या केल्या. त्या व त्यावरील बादशहाच्या आज्ञा पुढीलप्रमाणे–

१) वर्षातून पाच महिन्याचा माहवार मिळतो तो सहा महिन्याचा करावा– आज्ञा हुकुमाची आशा करीत राहा.

२) दुआबचा खुराक (शाही हत्ती, उंट इत्यादींचा) द्यावा लागतो माफी मिळावी–आज्ञा–एक वर्षासाठी माफी.

३) घोड्यांना डाग देण्याच्या अटीतून मुक्तता– आज्ञा मंजूर.

४) ध्वज मिळावा–आज्ञा इन्शाल्ला, परमेश्वर इच्छील तर.

५) परगणा रायगांव (?) जहागीर म्हणून मिळावा–आज्ञा–मंजूर

६) पाच मन्सबदार तैनात करण्यात यावेत–आज्ञा–मंजूर

पाच ऑक्टोबर– आज बादशहा भोलेगावहून (?) निघाले. ते तख्तेखांवर स्वार होते. दोन कोसाला अर्धापाव कमी असे अंतर पार करुन ते डफळापूर (जत तालुका, सांगली जिल्हा) जवळ मुक्कामाला आले.

बादशहांना कळविण्यात आले की प्रतापपूर पासून नाझण्या पर्यंतचा रस्ता अडचणीचा व खाच खळग्याचा आहे बादशहांनी अघरखानाचा नातू शमशेरबेग आणि इतर नोकर यांना पुढे जाऊन रस्ता नीट करण्यासाठी पाठविले.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले–

'पहाट होण्यापूर्वी आपल्या छावणींतील काही माणसे मागच्या मुक्कामावर गेली होती. चोरांनी (मराठ्यांनी) चाल करून त्यांच्यावर हल्ला केला. ही बातमी कळताच अमानुल्लाखान हा तातडीने गेला. शत्रूशी त्याची लढाई झाली याचवेळी फतेहुल्लाखान हाही कुमक घेऊन अमानुल्लाखानाच्या मदतीला पोहोचला. शत्रू (मुफसद–दंगेखोर) पळून गेले.'

यक्कताजखानाचा भाऊ अताहुल्ला याने एक तलवार बादशहांना अर्पण केली.

सहा ऑक्टोबर– आज बादशहा डफळापूरहून निघाले ते तख्तेखांवर बसले होते. अडीच कोसाचा प्रवास करुन ते मौजे प्रतापपूर येथे पोहोचले.

ख्वाजाखान याच्या भाऊबंदांपैकी ख्वाजा मुहंमदशहा याने नऊ मोहोरा, चार घोडे व कुराणाची एक प्रत या वस्तू बादशहांना अर्पण केल्या. तो चाकरीच्या आशेने आला होता.

ख्वाजा एतिबार महली याने विनंती केली की 'मला तळावर (ब्रम्हपुरी) जाऊन येण्याची परवानगी असावी. तेथे खिदमतगारखान नाजिर यांना भेटून यावे म्हणतो.' बादशहा म्हणाले 'याकूतपुऱ्याजवळ छावणी होईल तेव्हा तुम्हाला जाण्याची परवानगी देण्यात येईल.'

सात ऑक्टोबर– आज बादशहा प्रतापपुराहून निघाले. अडीच कोसाची मजल मारून ते जूझारपूर (सांगोला तालुका, जिल्हा सोलापूर) येथे मुक्कामावर पोहोचले.

खुदाबंदाखान (शायस्ताखानाचा मुलगा व नांदेडचा माजी सुभेदार) याला विजापुर कर्नाटकचा फौजदार म्हणून नेमण्यात आले होते. ती फर्माने त्याच्याकडे घेऊन जाण्यासाठी गुर्जबर्दारांना देण्यात आली.

खान फीरोजजंग हा पूर्वी विजापूरचा सुभेदार होता. त्याला तेथून बदलण्यात येऊन (त्याचा मुलगा) चीन कुलीजखान बहादुर (भावी निजामुल्मुल्क) याला त्याच्या जागी विजापूरचा सुभेदार म्हणून नेमण्यात आले.

फर्माने सियादतखान याजकडे देण्यात येऊन ते चिन कुलिजखानाकडे पाठवावे असे त्याला सांगण्यात आले–

मतलबखान करावल बेगी याने विनंती केली की 'उद्या येथून निघण्यासंबंधी काय आज्ञा ?'

बादशहा म्हणाले 'उद्या येथे मुक्काम राहील.' रात्रीचा एक प्रहर व चार घटका झाल्या असता बादशहांनी बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान याला बोलावू पाठविले. दोन घटका झाल्यानंतर त्याला आपल्या तंबूकडे परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

इनायतुल्ला (औरंगजेबाचा चिटणीस व त्याच्या पत्रांचा लेखक व संग्राहक) याचा मुलगा जियाउल्ला हा तळावरून (ब्रम्हपुरी) आला. त्याने बादशहांना एक बंदूक अर्पण केली. छावणीतील अधिकारी फतेहुल्ला, मतलबखान, नेमतखान मुहंमद फाजिल यांनी चित्रपक्षी, हरीण इत्यादींची शिकार करुन आणली होती. ती बादशहांनी नजरेखालून घातली.

आठ ऑक्टोबर – आज बादशहाचा मुक्काम मौजे जूझारपूर (सांगोला तालुका, सोलापूर जिल्हा) येथे झाला. कचेऱ्यांचे कामकाज झाले नाही.

नऊ ऑक्टोबर – आज बादशहा प्रवासाला निघाले. वाटेत त्याना कळविण्यात आले की पाऊस पडल्यामुळे ओढयाला पूर आला आहे. माणसाच्या छातीएवढे पाणी वाहात आहे. नाव व मेघ डंबर हत्ती तयार आहेत. पण हत्ती नवीन आहे व स्वारीच्या लायक नाही. यावर बादशहा चिडले. ते मतलबखान करावल बेगी व नावांचा प्रमुख सैफुल्लाखान याला म्हणाले 'जर ओढयाचे पाणी माणसाच्या छातीबरोबर होते तर मला आधी का कळविण्यात आले नाही ?' त्या दोघांनी सांगितले की 'पूर्वी पूर नव्हता. पावसामुळे पूर आला आहे' बादशहा हमीदुद्दीनखान बहादुर याला म्हणाले 'पाण्याची स्थिती काय आहे तुम्ही चौकशी करुन कळवा.' त्याने सांगितले 'पाणी आता छातीपेक्षा कमी आहे आणि घटकोघटकी कमी होत आहे.'

यानंतर बादशहांनी नक्तेखांवर ओढा ओलांडला व पावणे दोन कोसाची मजल मारुन मुक्कामाला आले.

उस्मानखान व मुहंमद गुल पुढील मजला ठरविण्यासाठी गेले होते. त्यांनी येऊन सांगितले की जूझारपूरापासून असदनगर अकलूजपर्यंत सात मजला होतात. येथून सहावी मजल म्हणजे असदनगर.

शहाजादा बेदारबख्त याचे पत्र बादशहांनी नजरेखालून घातले. उद्या येथेच मुक्काम राहील. पेशखाना उभा राहू द्या अशी बादशहांनी आज्ञा केली.

दहा ऑक्टोबर– आढचाच्या अलीकडे बादशहाचा मुक्काम.

सकाळी बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर याला बोलावू पाठविले. त्याला त्यांनी काही सूचना दिल्या आणि त्याला तळाकडे (ब्रह्मपुरी) जाण्यास निरोप दिला. आपली मुलगी जीनतुन्निसा बेगम हिला देण्यासाठी बादशहांनी दोन रत्नखचित अंगठ्या हमीदुद्दीनखानाच्या हवाली केल्या. ख्वाजा इख्तियार, ख्वाजा मतलब व ख्वाजा तौफीक महली याना हमीदुद्दीन खानाच्याबरोबर तळावर जाण्याची आज्ञा देण्यात आली.

काल उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याजकडे फर्मान व शिरपेच पाठविण्यात आली.

तरबियतखान हा पिछाडीला होता. त्याने हरिणाची शिकार करुन शिकार पाठविली.

पैठणचा फौजदार इमामबख्श याने नऊ चिरे कापड पाठविले, ते बादशहांनी नजरेखालून घातले.

जलालुद्दीनखान याला मुहंमदाबाद बीदरचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.

बारा ऑक्टोबर– आज बादशहा निघाले. अडीच कोसाची मजल मारुन ते याकूतपूर गावाजवळील मुक्कामाला आले. आज्जमशहाच्या नावे फर्मान पाठविण्यात आले. वाटेत बादशहांनी वाकनीस हिदायत केश याला विचारले 'येथून तळ (ब्रह्मपुरी) किती लांब आहे? त्याने सांगितले 'बारा कोस.' बादशहा हिदायत केशला म्हणाले 'तुम्ही तळावर (ब्रह्मपुरी) जा. हमीदुद्दीनखान बहादुर याला म्हणावे 'मी तुम्हाला जे हुकुम दिले आहेत त्यांची अंमलबजावणी करावी आणि खजिना वगैरे घेऊन हुजुरात यावे.'

छावणीतील अधिकाऱ्यांनी हरीण इत्यादींची शिकार करून आणली होती. ती बादशहाच्या नजरेखालून घालण्यात आली.

काल आज्ञा झाली की मिहृदीखान (?) याने सैन्याचे कूच चालू असताना एल्तमश (आघाडी) ला राहावे. ख्वाजा नेमतखान बहादुर हा शंभर जात आणि एकशे स्वार असा मन्सबदार होता. मीर बुन्हाणुद्दीन हा दोनशे जात व दहा स्वारांचा मन्सबदार होता. त्यांनी एक्कातालखान याच्या बरोबरीने टेहेळणी (करावली च्या पथकात राहावे अशी आज्ञा झाली.

सांगोल्याचा किल्लेदार व फौजदार अल्लाह कुली हा येऊन बादशहांना भेटला.

बादशहांनी शेख हिदायत केश याला विचारले, 'येथून पेडगावपर्यंत किती मजला होतील ?' त्याने सांगितले 'चौदा.'

मुहंमद रजा तुगरानवी (वंशावळी लिहिणारा व कोरणारा) याने पुढील प्रमाणे विनंती केली–

'मंगळवेढे येथे माझ्या वडिलांची कबर आहे. आज्ञा (परवानगी) झाली तर तेथे जाऊन कबरीवर फातेहा (प्रार्थना) पढून येईन म्हणतो.'

बादशहांनी परवानगी दिली. त्यानी आज्ञा केली की बहिर्जी पाढरे याने मुहंमद रजाच्या सोबतीला एक संरक्षक पथक (बदर्का) द्यावे.

फराशखान्याचा अधिकारी अब्दुल्हादी याने विनंती केली की 'उद्या येथून कूच करण्यासंबंधी काय आज्ञा ?' बादशहा म्हणाले 'कूच आहे. मागे असलेला पेशखाना (आघाडीचे तंबू) आला की पुढे पाठवून द्या. मेवाखाना (फळफळावळाचे खाते) खात्याचा अधिकारी मुहरमखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

चाकाकोळ (आंध्रप्रदेश) चा बदललेला फौजदार मिहृदीखान याने आपले चारशे बारा स्वार व सातशे पस्तीस असे पायदळ, दोन हत्ती व इतर सरंजामही बादशहाच्या सेवेत आणली. बादशहा म्हणाले 'खानाने चांगले पथक आपल्या बरोबर आणले आहे. सेवा मान्य झाली.' पथकाची मोजणी करून आपल्याला कळविण्यात यावे अशी आज्ञा करण्यात आली.

तेरा ऑक्टोबर– आज बादशहा मौजे याकूतपूर येथील आपल्या मुक्कामावरुन निघाले. ते तख्तेखांवर स्वार होते. सव्वादोन कोसाची मजल मारुन ते मौजे वांगीजवळ मुक्कामाला आले.

सय्यद अबदालचा मुलगा सय्यद हुसेन हा कळंबचा फौजदार होता. त्याला कंधार (नांदेड जिल्हा, मराठवाडा) चा किल्लेदार व फौजदार म्हणून नेमण्यात आले.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे–

'आज्ञेप्रमाणे जुल्फिकारखान याने कोंडाण्याच्या पायथ्याला असलेल्या वाड्या उध्वस्त केल्या. नंतर त्याने किल्ल्याला वेढा घातला मराठ्यांच्या किल्लेदाराने जुल्फिकारखानाशी बोलणे लावले की 'मला जिवाचे अभय व योग्य अशी मन्सब मिळाली तर मी हा किल्ला बादशहाच्या हवाली करीन.' जुल्फिकारखानाने बोलणे कबूल केले आहे.

बागांचा व्यवस्थापक मुहरमखान याचा नायब फतेहुल्ला याने दौलताबादेहून संत्र्यांची करंडी पाठविली

पुढील मुक्कामावर आपल्यासाठी हम्माम (स्नानगृह) तयार करण्यात यावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

चौदा ऑक्टोबर– दारोगा तसीह (सैन्याची नोंद ठेवणारा व दुरुस्ती करणारा) रशीदखान याला आज्ञा झाली की उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याच्या सैन्याची पाहणी करुन ती किती आहे ते कळवा फीरोजजंगाच्या सैन्यांतील पुढील मंडळी येऊन बादशहांना भेटली– १) आब्दुर्रहीमखान २) ख्वाजा दनिश किल्लेखानी, ३) मरहूम दियानत खान याचा मुलगा फरजामखान

आज एक प्रहर दिवस आला असता बादशहा आपल्या ओढ्याकाठच्या मुक्कामावरुन निघाले. दोन कोसाचा प्रवास करुन त्यांनी माण नदी ओलांडली आणि ते माझ्या–जवळ (नाझरे ?) मुक्कामाला आले

मुहरमखान याने विनंती केली की 'बारामती व पायीने 'वलायतचा ठाणेदार यासीनखान याने संत्र्यांच्या करंड्या पाठविल्या आहेत.' त्या फळफळावळ खात्यात पाठवाव्या अशी आज्ञा झाली. अकलूज असदनगरचा किल्लेदार मुहंमद यूसफ याने विनंती पाठविली की आज्ञा झाल्यास येथे नायब ठेवून हुजुरांत येईन. विनंती मान्य करण्यात आली. अजीजुल्लाखान हा बादशहाजादा मुउज्जम याजपाशी तैनात होता, त्याला हुजुरांत बोलावण्यात आले. त्याने कळविले की 'माझी विपन्नावस्था आहे. माझ्या कुटुंबियांना ठेवण्यासाठी एक वाडा व खर्चासाठी एक पाच हजार रुपये देण्यात यावे.'

औरंगाबादेहून ही सोय करुन देण्यात यावी अशी आज्ञा करण्यात आली.

सतरा ऑक्टोबर– माळवणीच्या अलीकडे दोन कोसावर मुक्काम.

उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याने पाठविलेले घोडे, हत्ती, पथके व पेशकश बादशहांनी नजरेखालून घातली. जिन्सी (तोफखाना आदि सरंजाम) पैकी

बादशहांनी दोन तलवारी व इतर थोड्या वस्तू घेऊन बाकीच्या फीरोजजंगाला माफ केल्या (परत केल्या.) खान फीरोजजंग याला सात हजारी मन्सब होती. ती एक हजार स्वारांनी वाढविण्यात आली. फीरोजजंगाच्या सैन्यातील पुढील मंडळींना बक्षिसे देण्यात येऊन निरोप देण्यात आला– १) फीरोजजंगाचा भाऊ हामिदखान २) मुजाहदखान ३) फरजामखान ४) मुहंमद अमीनखानाचा भाऊ नजीबखान ५) अब्दुर्रहीमखान ६) मीरकखान ७) ऐवजखान ८) ख्वाजा इलियास.

खान फीरोजजंगाने अठरा घोडे आणि नऊ हत्ती बादशहांना पेशकश म्हणून अर्पण केले. बादशहांनी एक घोडा व हत्ती घेऊन बाकीचे परत केले. बादशहांनी फीरोजजंगाला खिलतीची वस्त्रे व हत्ती या वस्तू दिल्या.

दलदलन नावाचा हत्ती खुजस्ताबुनियाद औरंगाबाद येथून आणण्यात आला होता. हत्तीखान्याचा दारोगा मुनीमखान याने नगारे नौबती वाजवीत तो हत्ती बादशहासमोर आणला.

मुहंमद मिहिदी हा मध्य आशियातून आला होता. त्याला खिलतीची वस्त्र देण्यात आली.

केशवदासचा मुलगा पुरणमल हा तळावरुन (ब्रह्मपुरी) येऊन बादशहांना भेटला.

अठरा ऑक्टोबर– आज दोन कोसाची (अर्धापाव कोस कमी) मजल मारून बादशहा भाळवणी (तालुके पंढरपूर) येथे पोहोचले. शेख नुरुल्हक वगैरेना बक्षिसे देण्यात येऊन त्यांना मक्के जाण्यासाठी निरोप देण्यात आला. शेख नुरुल्हक मुहतसिब, अब्दुर्रहमान मुफती, शेखुलबकरा, ख्वाजा रऊफुल्ला अरब इत्यादींना खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

बादशहा आज भाळवणीला आले तसे बादशहाजादा कामबक्ष याने त्यांना पिवळी फुले नजर केली. ती त्यांनी बख्शी उलमुल्क बहरामंदखान याला दिली.

मीरसामान (सरकारी मालमत्तेच्या खात्याचा प्रमुख) याचा नायब फाजलखान याने कळविले की मरहूम लुत्फुल्लाखान याच्याकडे सरकारची बाकी एक लक्ष सत्तर हजार रुपये निघते. लुत्फुल्लाखानाची मालमत्ता इनायतखान याजकडे देऊन टाकण्यात आली आहे. काय आज्ञा ? केली की 'लुत्फुल्लाखान याचे हत्ती व घोडे सरकारात घ्या व बाकीची मालमत्ता त्याच्या मुलासाठी सोडून द्या.'

तरबियतखानाचा नायब हुजूर खान याने खान फीरोजजंग याच्याकडून पेशकश म्हणून आलेल्या पुढील जिनसा बादशहासमोर ठेवल्या– १) दोन लहान

तोफा २) दोन हत्ती गजनाळ ३) दोन रेहेकले. ते सरकारात घ्यावे व दोन हत्ती व चार घोडे परत द्यावे अशी आज्ञा झाली.

अमीरुल उमराच्या कचेरीतील आमिल (अधिकारी) मुहंमद खलील याला काढून टाकण्यात आले होते, त्याचे कबिले धरण्यात आले होते. ती सोडून द्यावी आणि त्याला हुजुरात आणावे अशी आज्ञा करण्यात आली आणि मालमत्ता जप्त करण्यात आली होती.

वऱ्हाडचा सुभेदार खान फीरोजजंग याचा नायब सरअंदाजखान याच्या मन्सबीत वाढ करण्यासाठी म्हणून बहरामंदखानाने त्याचा हुद्दा कळविला होता (दीड हजार जात, सातशे स्वार–त्यापैकी दोनशे दुघोडी). बादशहा म्हणाले 'परमेश्वर त्याला बरकत देवो.'

वीस ऑक्टोबर – आज बादशहा तख्तेखांवर स्वार होऊन भाळवणीहून निघाले. अडीच कोस व अर्धा पाव अशी मजल मारुन ते वेळापुराजवळील (माळशिरस तालुका, सोलापूर जिल्हा) मुक्कामावर आले.

गाजिउद्दीनखान फीरोजजंग याच्या सैन्यातील सरदार रुस्तमखान याच्या पथकातील मीरहुसेन, भाळवणीचा जहागिरदार दाऊदखान याचा गुमास्ता रशीद हे बादशहांना भेटले. तसेच गाजिउद्दीनच्या सैन्यात तैनात असलेला हाजी दानिश याच्या भाऊबंदापैकी बरखतमंद हाही येऊन बादशहांना भेटला.

यार अलीबेग याने विनंती केली की 'दुष्टांच्या (अशकिया–मराठे) वर्दळीमुळे खुजिस्ताबुनियाद (औरंगाबाद) व बुऱ्हाणपूरची बातमीपत्रे येत नाहीत. गोविंदराव (हरकारा) यांचा मुलगा केशवराव हा तळावर (ब्रह्मपुरी) आहे. त्याला बापातर्फे नायब म्हणून नेमण्यात यावे म्हणजे बातम्या (वेळेवर) येत जातील.'

विनंती मान्य करण्यात आली

एकवीस ऑक्टोबर– उम्दतुलमुल्क गाजिउद्दीनखान बहादुर फीरोजजंग (हा ब्रह्मपुरीच्या तळावर होता) याच्या नावे आज्ञापत्र (फर्मान) पाठविण्यात आले.

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'गुर्जबर्दार (अंमलबजावणीचे अधिकारी) नेमण्यात यावेत. त्यांनी ब्रह्मपुरी उर्फ इस्लामपुरीहून वीस नावा पंढरपूरला भीमेत आणाव्या. शहाजादे बेदारबख्त तेथून भीमा ओलांडतील.

वेलोर (तमीळनाड) जिंकून घेतल्याबद्दलच्या सोन्याच्या किल्ल्या, दोनशे अश्रफ्या, एक हजार रुपये व अर्जदाश्त ही हैद्राबादी कर्नाटकचा फौजदार

जुल्फिकारखान याचा नायब दाऊदखान याने पाठविली. ती बादशहांनी नजरेखालून घातली.

बादशहांना कळविण्यात आले की सैफुद्दीनखान हा नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार म्हणून नेमला गेला होता. तो मरण पावला त्याला जात दोन हजार आणि स्वार हजार अशी मन्सब होती. त्यापैकी चारशे स्वार दुघोडी होते.

शरीफखान याची नेमणूक बहादुरगडचा (पेडगाव) किल्लेदार व फौजदार म्हणून करण्यात आली, त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

सांगोल्याचा फौजदार अल्लाहकुली हा बादशहाच्या हुजुरात आला होता. त्याला तातारखान ही पदवी देण्यात आली. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात येऊन त्याला (सांगोल्याकडे) परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

सय्यद बुरहाणुद्दीन याला माहूरच्या किल्लेदारीवर नेमण्यात येऊन त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

खान फीरोजजंग याचा वकील शेखसादतमंद याने निसार (ओवाळणी) दिली. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

मरहुम सैफुद्दीनखान (नळदुर्गचा माजी किल्लेदार) याचा भाऊ नुस्रतखान हा आपल्या भावाच्या सुतकात होता. त्याला सुतकातून उठविण्यात येऊन त्याचे समाधान करण्यात आले. त्याला एक बालाबंद देण्यात आला.

जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग याच्या नावे एक फर्मान व अलंकार ही गुर्जबर्दार ऐवजखान याच्या हस्ते पाठविण्यात आली.

काल मुहंमद अमीनखान बहादुर व सियादतखान यांच्या विनंतीवरुन त्यांना तळावर (ब्रम्हपुरी) जाऊन उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग यांची भेट घेऊन येण्याची परवानगी मिळाली.

बावीस ऑक्टोबर – बादशहाचा मुक्काम वेळापूर येथे.

जीनतुन्निसा बेगम यांच्या खात्याचा व्यवस्थापक रोज अफजू याचे मुहंमद आबिद वगैरे सहकारी तळावरुन (ब्रम्हपुरी) येऊन बादशहांना भेटले. नसरुल्लाच्या जागेवर पेडगावचा किल्लेदार फखरुद्दीन याला शिवनेरी हरसूल येथील किल्लेदार व जुन्नरचा फौजदार म्हणून नेमण्यात आले.

मरहूम बहादुरखान (रणमस्तखान पन्नी) याचा मुलगा व कन्नड वगैरे (जिल्हे औरंगाबाद) चा फौजदार रणमस्तखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. शहाजादा बेदारबख्त पंढरपुरापाशी नदी ओलांडतील, त्यासाठी त्यांना ब्रम्हपुरीहून दहा नावा द्याव्या अशी आज्ञा झाली.

तळाचा (ब्रम्हपुरी) कोतवाल सरबराहखान हा बादशहाच्या हुजुरात आला. त्याने हुजुरात राहावे व आपला नायब तळावर ठेवावा अशी आज्ञा झाली.

बादशहांनी खानसामानचा नायब फाजलखान याला खालीलप्रमाणे आज्ञा केली.–

तुम्ही खुजिस्ताबुनियाद (औरंगाबाद) च्या बयूतात (सरकारी मालमत्तेचा अधिकारी) ला पत्र लिहा. जीनतुन्निसाबेगम व उदयपुरी महल यांच्या वास्तव्या-साठी तेथे (औरंगाबाद) वाडे दुरुस्त करा. आम्ही बहादुरगड (पेडगांव) ला पोहोचल्यावर ब्रम्हपुरीच्या तळावरून बेगमा (जीनतुन्निसाबेगम व उदयपुरी महल इत्यादी) व बुणगे यांना खुजिस्ताबुनियाद (औरंगाबाद) ला पाठविणार आहोत.

तेवीस ऑक्टोबर– मुक्काम वेळापूर, बादशहांनी आज्ञा केली वीस नावा इस्लामपुरी उर्फ ब्रम्हपुरी येथील उतारावरून हुजुरात आणाव्या.

चोवीस ऑक्टोबर– आज बादशहा वेळापुराहून निघाले. ते तख्तेखांवर स्वार होते. सव्वादोन कोसाचा प्रवास करून ते असदनगर उर्फ अकलूज जवळच्या आपल्या मुक्कामावर दाखल झाले. किल्लेदार यूसफ याने तोफांना सरबत्ती दिली.

वाटेत त्यांनी उस्मान करावल याला विचारले 'नीरेला पाणी किती आहे ?' तो म्हणाला 'काल रात्रीपासून पाणी कमी झाले आहे. दोन हात (दरआ) वर आहे.' बादशहांनी आज्ञा केली की 'मागील मुक्कामाहून आमचा पेशखाना आला की तो नदीच्या (नीरा) च्या पलीकडे पाठवून द्या. वाटेत पुढील मंडळी बादशहांना भेटली–

१) मुहंमद अमीनखान बहादुर २) मोहनपूर (मनोहरपूर) चा जमीनदार जगतसिंग ३) असदनगर अकलूजचा ठाणेदार मुहंमद यूसफ ४) वेळापूरचा ठाणेदार सोमानजी (याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.)

पंचवीस ऑक्टोबर– नीरेच्या पलीकडे पेशखाना पाठवावा अशी बादशहांनी आज्ञा केली होती. पण नीरेला अद्याप सव्वादोन दरआ (हात) पाणी असल्यामुळे, पेशखाना नदीच्या अलीकडे उभा करावा अशी आज्ञा झाली.

बुऱ्हाणपूर सुभ्यातून खालील बातमी कळली–

'अल्लाहयार बेगहा येथे कोतवाल होता. त्याची बदली झाली. आता आपले शत्रू आपल्या विरुद्ध उठतील आणि कर्जदार तगादा करतील असे त्याला

वाटले. तो येथून पळून गेला आहे.'

गाजिउद्दीनखान बहादुर फीरोजजंग याच्या सैन्यातील पुढील माणसे येऊन बादशहांना भेटली. त्यांना बढत्या देण्यात आल्या.

१) रिआयतखान २) मीरकखान.

सांगोल्याचा ठाणेदार तातारखान याची सय्यद नूरखान याच्या बदलीमुळे दहिवडी वगैरे नीरेचे महाल यावर नेमणूक करण्यात आली.

मरहूम दिलावरखान याचा मुलगा निजामुद्दीन हा जखमांवर उपचार करून घेण्यासाठी आठ महिन्याच्या रजेवर दिल्लीला गेला होता. मुदत संपली पण जखमा बऱ्या झाल्या नाहीत. जखमा बऱ्या होईपर्यंत त्याने दिल्लीत राहावे अशी आज्ञा झाली.

सव्वीस ऑक्टोबर– मुक्काम असदनगर अकलूज, मीर अजीमुल्ला हा तळावरून (ब्रह्मपुरी) खान फीरोजजंग याच्या सैन्यातील सरफराजखान याला घेऊन येण्यासाठी गेला होता. तो सरफराजखान आणि त्याची मुले यांना हुजुरात घेऊन आला. ते बादशहांना भेटले

बादशहा हे फराशखान्याचा अधिकारी मुहंमद हादी याला म्हणाले, 'बादशहाजादा कामबक्श यांनी कळविले होते की नीरेचे पाणी दीड पावणे दोन दरआ (हात) कमी झाले आहे तर तुम्ही बादशहाजाद्यापाशी जा. कुठेही पाणी कमी झाले की चौकशी करा आणि हत्तीवर पेशखाना लादून नदीपार करा.'

गुलबर्ग्याचा किल्लेदार व फौजदार कासिमखान हा येऊन बादशहांना भेटला. त्याची नेमणूक नळदुर्गच्या किल्लेदारीवर झाली. मरहूम अश्रफखान याच्या मुलीचा मुलगा जियाउद्दीन खान हा तळावर (ब्रम्हपुरी) बक्षी व वाकनीस होता तोही येऊन बादशहांना भेटला. हत्तीखान्याचा अमीन मिर्जाबेग आणि मुहंमद जान यांच्या मन्सबी वाढविण्यात आल्या.

उदाजीराम याला माहूरच्या फौजदारीवरून बदलण्यात आले. त्याला बारशे जात व तीनशे स्वार (दुघोडी) अशी मन्सब होती. दुघोडी तीनशे स्वारांची मशरुत (नोकरीच्या अटीवर) मन्सब कमी करण्यात आली. माहूरचा किल्लेदार आणि फकरुल्लाचा मुलगा शुक्रुल्ला याला तीनशे जात व ऐंशी स्वार अशी मन्सब होती. त्यापैकी शंभर जात व साठ स्वार ही कमी करण्यात आली.

मीर सामानचा नायब फाजलखान याला बादशहा म्हणाले 'तुम्ही खुजिस्ताबुनियाद (औरंगाबाद) च्या कारभाऱ्याना (मुत्सद्दी) आज्ञापत्र लिहा 'नबाब जीनतुन्निसा बेगम व अंत:पुरातील इतर मंडळी (खुदमाए महल खादिमा, सेविका, खुदमा अनेकवचन, महालांतील सर्वच स्त्रियांना अंत:पुरातील सेविका म्हणण्याची वहिवाट होती) या तेथे (औरंगाबादेत) येऊन राहतील. त्यांच्यासाठी वाडे (महल) तयार करुन ठेवा.'

मरहूम नाहरखान (घोरी) याची संग्रामखान आदी मुले तळावरुन (ब्रम्ह-पुरी) येऊन सुतकांत बसली होती. बादशहाच्या आज्ञेने हमीदुद्दीनखान, बहादुर याने त्यांना सुतकातून उठवून बादशहाकडे आणले. पुढील जणांना खिलती देण्यात आल्या– १) संग्रामखान २) जंगजूईखान

सत्तावीस ऑक्टोबर – मुक्काम अकलूज. मतलबखानाने कळविले की 'काल रात्री हत्तीवरुन पेशखाना लादून तो नदीपार करण्यात आला आहे. पेश-खान्याचे तंबू उभे करण्यात आले आहेत. बादशहा म्हणाले 'आम्ही उद्या येथून कूच करणार.' खुजिस्ताबुनियाद औरंगबादच्या किल्ले-अर्कच्या किल्लेदारीवर सय्यद मन्सूर हा होता. त्याच्याजागी जफर खान याची नेमणूक करण्यात आली. सय्यद मन्सूर याला शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेत तैनात करण्यात आले.

मुहंमद खलील हा चाकरीच्या आशेने मध्य आशियातून आला होता. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

बादशहा हे फतेह दौलत कौल याला म्हणाले 'नदीची वाट दुरुस्त करुन घ्या.'

सय्यद अलीचा मुलगा मीर अब्दुस्सलाम याला परनार (पारनेर ?) चा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले. जुन्नर (शिवनेरीचा) चा बदललेला किल्लेदार नसरुल्लाखान याला हुजुरात बोलावण्यात आले.

माहूरच्या किल्लेदारीवर उदाराम होता. त्याला बदलून त्याच्या जागेवर अब्दुल्बाकी याची नेमणूक करण्यात आली. अब्दुलबाकीची मन्सब वाढविण्यात आली. बादशहाच्या आज्ञेप्रमाणे खोजा मुहरामखान हा अकलूज असदनगरचा किल्ला पाहून आला.

सगर (गुलबर्गा जिल्हा, कर्नाटक) चा किल्लेदार बुऱ्हाणुल्लाखान हा मरण पावला असे बादशहांना कळविण्यात आले.

अठ्ठावीस ऑक्टोबर – आज बादशहा सकाळी असदनगर उर्फ अकलूज येथील आपल्या मुक्कामावरुन निघाले. ते तख्तेखांवर स्वार होते. ते नीरा

नदीच्या काठावर आले. ते आपल्या खास नौकेत बसले. त्याच नौकेत त्यांनी बादशहाजादा कामबक्ष, जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (असदखान, मुख्य प्रधान) व बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान यांनाही बसण्यास सांगितले.'

बादशहांनी नदी ओलांडली. यानंतर ते तख्तेखांवर स्वार झाले. एकंदर पाऊण कोसाचा प्रवास करुन ते आपल्या मुक्कामावर दाखल झाले. (नदीकांठावर).

बादशहांनी सांगोल्याचा किल्लेदार अल्लाहकुली याला तातारखान ही पदवी दिली होती. ती पदवी असदनगर अकलूजचा किल्लेदार मुहंमद यूसफ याला देण्यात आली. अल्लाहकुली याला नजरबेगखान ही पदवी देण्यात आली.

असदनगर अकलूजचा किल्लेदार यूसफ तातारखान याने ख्वाजा मुहरम खान याच्या द्वारे विनंती केली की 'बावडा हे गाव माझ्या जहागिरीत आहे. लष्करातील माणसे शेतीची नासाडी करतात. तर तिच्या रक्षणासाठी शंभर बाणदार नेमण्यात यावेत.' एकोणतीस माणसे नेमण्यात यावी अशी आज्ञा झाली.

एकोणतीस ऑक्टोबर– तळावरील (ब्रम्हपुरी) हरकाऱ्याकडून पुढीलप्रमाणे कळले–
'खंजरखान याने उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग यास पुढील प्रमाणे लिहिले आहे.

'मी परंडा येथे काफिला (उत्तर भारताकडे जाणारा प्रवाशांचा थवा) ठेवला. मी यमाजी निंबाळकर, मल्हारराव वगैरेना व बर घेऊन बार्शी परगण्यावरुन गनिमांचा सरदार राघो याच्यावर चालून गेलो. शत्रूपैकी अनेकजण ठार अगर जखमी झाले. शत्रूचे उंट, घोडया, शस्त्रे इत्यादी लूट हस्तगत झाली.'

बादशहा आज नीरेकाठच्या मुक्कामावरुन निघाले. पावणे दोन कोसाचा प्रवास करुन ते बावडया नजीक मुक्कामाला आले. आमच्या निवासस्थाना भोवती पाच साखळया अंतरापर्यंत कुणाला उतरु देऊ नये असे नेकनामखान याला बजविण्यात आले.

सर अफराजखान हा तळावरुन येऊन बादशहांना भेटला. त्याचे भाऊ सरबलंदखान व मखसूसखान आणि मुले अब्दुल्ला व असदुल्ला ही मंडळीही बादशहांना भेटली.

बादशहांना कळविण्यात आले की काल रात्री मुगलखान हा पथके घेऊन बंडखोरांच्या पारिपत्यासाठी तातडीने रवाना झाला आहे.

तीस ऑक्टोबर– बादशहाचा मुक्काम बावडा (इंदापूर तालुका) गावा जवळ.
पेशखाना पुढे पाठवावा अशी आज्ञा झाली. काल शहाजादा बेदार-

बख्त याचे पत्र– त्याचा वकील सुल्तान नजर याने बादशहापुढे ठेवले.

एकतीस ऑक्टोबर– आज बादशहा सकाळी तख्तेखांवर स्वार होऊन मौज बावडा (?) येथून निघाले. तीन कोसाचा प्रवास करुन ते बाबुळगाव येथे मुक्कामाला आले.

अर्जी मांडण्याच्या खात्याचा अधिकारी सियादतखान हा खान फीरोजजंग यास भेटण्यासाठी तळावर (ब्रम्हपुरी) गेला होता. तो येऊन बादशहांना भेटला. उद्याचा प्रवास पावणे दोन कोसाला अर्धापाव कमी असा राहील असे मतलबखानाने सांगितले. बादशहा म्हणाले 'उद्या कूच आहे.'

किल्ल्याकिल्ल्यांतून जे कैदी असत त्यांची माहिती देणारा अधिकारी शेख नूरुल्हक हा होता, त्याच्या जागी हाजी अकरमखान याची नेमणूक करण्यात आली.

मरहूम शम्सुद्दीन मुहंमदखान (कंधार, जिल्हे नांदेडचा माजी किल्लेदार) याचा भाचा मीरमुहंमद कासम याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

तुर्कताजखान हा आपल्या आईला भेटण्यासाठी तळावर (ब्रम्हपुरी) गेला होता. तो परत येऊन बादशहांना भेटला.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली– 'शत्रू (मराठे) छावणीपासून बारा कोसावर असलेल्या एका खेड्यात तेथील जमीनदाराशी संगनमत करून तळ देऊन होते. तेथून मुगल लष्करच्या पिछाडीकडून हल्ला करावा असा त्यांचा बेत होता.' बादशहांनी आज्ञा केली की मुहंमद अमीनखानाच्या पथकांपैकी फकीर मुहंमद अघर याने जाऊन गनिमांचे पारिपत्य करावे.' त्याप्रमाणे तो त्या खेड्यावर पोहोचला. शत्रू पळून गेले. शत्रूची दोन निशाणे व इतर वस्तू हस्तगत झाल्या. ते खेडे उध्वस्त करण्यात आले. माणसे व गुरेढोरे पकडण्यात येऊन त्यांना आणण्यात आले आहे.

तुर्कताजखान याची मन्सब दोनशेनी कमी करण्यात आली.

नोव्हेंबर १७०२

एक नोव्हेंबर– आज बादशहा आपल्या बाबुल (बाबुलगाव) या मुक्कामावरून तख्तेखांवर स्वार होऊन निघाले. दीड कोस आणि वर अर्धा पाव कोस असे अंतर पार करून ते ठाणे इंदापूर जवळील आपल्या पूर(?) या मुक्कामावर आले. इंदापूरचा ठाणेदार मुगलखान हा

मोहिमेवरून हुजुरात आला होता. त्याने घोडा, ढाल, बाण इत्यादी वस्तू बादशहांना अर्पण केल्या.

बादशहांनी आज्ञा केली की दूरवदराज नावाची तोफ तळावर आहे. ती हुजुरात आणण्यात यावी.

उम्दतुल्मुल्क खान बहादुर फीरोजजंग याच्याकडे वऱ्हाडची सुभेदारी, बीडची फौजदारी व तळाचे (ब्रम्हपुरी) संरक्षण ही कामे होती. त्याला मुहंमदाबाद उर्फ नांदेडची सुभेदारीपण देण्यात आली. मुहंमदाबाद नांदेडचा सुभेदार खुदाबंदाखान (शायस्ताखानाचा मुलगा) याला विजापूर कर्नाटकचा फौजदार म्हणून नेमण्यात आलें. जलालुद्दीनखान यास मुहंमदाबाद उर्फ बीदर येथील किल्लेदार व फौजदार म्हणून पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्यात आले.

काजिउल्कजात (मुख्य काजी) अकरमखान याला बादशहांनी म्हटले 'आमची इच्छा आहे की (आपल्या) धर्माचे महत्व वाढावे.' यावर काजी उल्कजात यांनी सांगितले की हिंदूनी मुसलमान नोकर बाळगू नयेत.

बादशहांनी आज्ञा केली की जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्य प्रधान असदखान) यांनी राज्यांतील सुभेदार आणि फौजदार यांना पत्रे लिहावीत की हिंदुनी मुसलमान नोकर म्हणून बाळगू नयेत.

बादशहांनी आज्ञा केली की शेतीची नासाडी ज्यांच्याकडून झाली असेल त्या पथकांच्या प्रमुखांकडून मोबदला घेऊन देण्यात (रयतेला) यावा.

पेशखाना पुढे पाठविण्याविषयी काय आज्ञा म्हणून विचारता बादशहा म्हणाले 'उभा राहू द्या. उद्या येथेच मुक्काम राहील.'

दोन नोहेंबर – दक्षिण सुभ्याचा दिवाण मोतिमदखान, शेख मिहिरुल्ला (पूर्वाश्रमीचा मिहिरचंद), लष्करखानाचा मुलगा मुहंमद यूसफ इत्यादी मंडळी बादशहांना भेटली.

मुहंमद जलील हा मध्य आशियातून आला होता. त्याला नव्याने मन्सब देण्यात आली. खुजिस्ताबुनियाद (औरंगाबाद) येथील कोतवाल अमानी कौल याला त्या जागेवरुन बदलून हुजुरात बोलावून घेण्यात आले.

बहरामंदखान आजारी आहे असे कळविण्यात आले. हकीम हाजकखान याने औषधोपचार करावा अशी आज्ञा करण्यात आली.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले ते असे 'धनाजी जाधव आणि इतर मराठे (कोंडाणा भागाचे) हे पसरले असून ते बहादुरगड किल्ल्याजवळ जमले आहेत.

बादशहांनी तरबियतखान, मुनीमखान, कोतवाल व पेशखान्याबरोबर असणाऱ्या असणाऱ्या टेहेळणीच्या पथकांना (कराबल) आज्ञा केली की सावधगिरी बाळगा. चोरांना (मराठ्यांना) आक्रमण करु देवू नका.'

तरबियतखान हा लष्करच्या चंदावलीवर म्हणजे पिछाडीवर असे. त्याच्या जागी फतेहुल्लाखान बहादुर याची नेमणूक करण्यात आली. बादशहांनी आज्ञा केली की फतेहुल्लाखानाबरोबर राव मानसिंग (जाधव) इत्यादींचे पाच हजार स्वार तैनात करण्यासाठी तयार करावेत. फतेहुल्लाखान याची तैनाती लष्कराच्या डाव्या फळीवर असे. ती जागा सांभाळण्याचे काम मुहंमद अमीनखान बहादुर याजकडे देण्यात आले.

संगमनेरचा बख्शी व वाकनीस मुहंमद नअीम याला विजापूर (वैजापूर ?) चा बख्शी व वाकनीस म्हणून नेमण्यात आले.

मुहंमद रशीद याचा मुलगा मुहंमद अर्शद हा बागेवाडीचा (विजापूर जिल्हा) ठाणेदार होता. त्याची मन्सब वाढविण्यात आली आणि त्याला ठाण्याकडे जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

तीन नोव्हेंबर– आज बादशहा तख्तेखांवर स्वार होऊन निघाले. तीन कोसाचा प्रवास करून ते कलठण (इंदापूर तालुका) गावाजवळ मुक्कामाला आले.

खान फीरोजजंग याच्या सैन्यातील खंजरखान हा काफिला (प्रवाशांचा थवा) घेऊन आला होता. तो बादशहांना स्वारीतच भेटला.

बादशहांनी मीर आतिश (दारुगोळ्याचा प्रमुख) तरबियतखान यास पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'स्वारीत वाटेत शेतीची फार नासाडी (पायमल्ली) होते. तुम्ही पुढे जाऊन बंदुकच्यांच्या चौक्या बसवाव्या आणि त्याचा बंदोबस्त करावा.'

नुस्रतजंग (जुल्फिकारखान) याने पुढीलप्रमाणे कळविले–

'कोंडाण्याला वेढा घालून तो किल्ला ताब्यात आणावा अशी मला आज्ञा झाली होती. पण धनाजी जाधव, रामचंद्र (पंत अमात्य) इत्यादी सरदार हे प्रचंड सैन्य घेऊन तयारीनिशी उभे आहेत. किल्लाही मजबूत आहे. मी आशा करतो की 'पाच हजार प्यादे, बंदूकची, बेलदार, तबरदार (कुऱ्हाडी चालविणारे) यांना माझ्यापाशी तैनात करण्यात येईल. याशिवाय तरबियतखान व फत्तेहुल्लाखान याना माझ्याणशी तैनात करण्यात यावे. खर्चासाठी एक लाख रुपये देण्यात यावेत. म्हणजे किल्ला लवकर हस्तगत करता येईल.'

बादशहांनी स्वतः ते पत्र वाचले आणि आपल्या सहीने ते तरबियतखाना-कडे पाठविले. त्याला सांगण्यात आले कि– 'किल्ला असा आहे, (तस ाआहे) अवघड आहे अशी कल्पना आहे तो तसाच राहाणार आहे, तुम्ही मात्र तयारीत असावे. पेडगांवला पोहोचल्यावर तुम्हाला (कोंडाण्याकडे जाण्यासाठी) निरोप देण्यात येईल.'

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली. शहाजादा बेदारबख्त यानं पंढरपूर येथे भीमा ओलांडली असून तो परंड्याजवळ सीना नदीजवळ पोहोचला आहे. तेथून तो मजल दर मजल करीत खुजस्ताबुनियाद (औरंगाबाद) कडे जात आहे.

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली– हैद्राबादच्या अधिकाऱ्यांना (मुत-सद्दी) लिहा की मोहोरा (अंगठ्या मुद्रिका) कोरणाऱ्यांनी हिंदूंच्या अलंकारावर (नगीन) प्रार्थना कोरु नयेत.

पायीने विलायतचा (वाई बारामती) ठाणेदार यासीनखान याने सखर-लना (विशाळगड) ला जावे. तेथून (मुगल लष्कर) निघताना तोफा तेथे ठेवण्यात आल्या होत्या. तो सगळा सरंजाम त्याने हुजुरात आणावा असे आज्ञापत्र त्याला लिहिण्यात यावे अशी तरबियतखानाला आज्ञा करण्यात आली.

चार नोव्हेंबर– बक्षी उल्मुल्क बहरामंदखान हा फार आजारी आहे. उद्या येथे बादशहांचा मुक्काम झाल्यास त्याच्यावर औषधोपचार करता येईल अशी विनंती हकीम हाजकखान याने केली. बादशहांनी विनंती मान्य केली.

पवनार (वर्धा जिल्हा) येथे मुरादखान (इतिहासकार खाफीखान याचा मित्र आणि आश्रयदाता) हा फौजदार होता. कळंब (यवतमाळ जिल्हा) येथे सय्यद हुसेन हा फौजदार होता. सय्यद हुसेनला बदलण्यात येऊन कळंबची फौज-दारीपण मुरादखान याजकडे देण्यात आली. मुरादखानाला नऊशे जात व सातशे स्वार अशी मन्सब आहे.

पाच नोव्हेंबर – आज बादशहा मनहान (?) येथील आपल्या मुक्कामावरुन निघाले. पाऊणे दोन कोसाचा प्रवास करुन ते अजोळी (इंदापूर तालुका, पुणे जिल्हा) या गावापाशी मुक्कामाला आले.

बादशहाची स्वारी आपल्या निवासस्थानापाशी पोहोचते न पोहोचते तोच मतलबखान याने पुढीलप्रमाणे कळविले– 'बख्शी उल्मुल्क बहरामंदखान याला पाच हजारी जात व तीन हजार स्वार अशी मन्सब होती. तो मरण पावला.' बादशहांनी

हे ऐकून बहुत खेद केला. त्यांनी जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्य प्रधान असदखान) याला म्हटले 'तुम्ही बहरामंदखानाच्या निवासस्थानावर जा.'

पुढील मंडळी बादशहाना भेटली व भेटी (पेशकश) दिल्या- १) मुहंमद अमीनखान बहादुर २) फतेहुल्लाखानाच्या पथकांतील मुगल ३) दियानतखास आणि त्याचा मुलगा ४) मुहंमद नसीर ५) कंधारहून बदललेला किल्लेदार (नांदेड जिल्हा) व किल्लेदारखानाचा मुलगा मुहंमद दाराब.

सहा नोव्हेंबर – काल संध्याकाळी कळले की तोफखान्याचा प्रमुख तरबियतखान, जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (असदखान), बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान, मतलबखान ही मंडळी बहरामंदखानाच्या तंबूवर केली. बहरामंदखानाचे शव (ताबूत) बहादूर गडला पाठवावे व ते तात्पुरते तेथे ठेवावे अशी त्यांची इच्छा आहे. बादशहांनी आज्ञा केली की 'पाठवा, मतलब खानाने ताबुताबरोबर बहादुरगडला जावे.'

बहरामंदखानाच्या जागेवर मीरबख्शी म्हणून जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग याची नेमणूक करण्यात आली. बादशहाच्या आज्ञेने बादशहाजादा कामबख्श व बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान यानी जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (असदखान) व बहरामंदखानाच्या मुलीचा मुलगा मुहंमद तकी यांना सुतकातून (मातम) उठवून बादशहाकडे आणले. बादशहांनी त्यांचे समाधान केले. मुहंमद तकीची मन्सब वाढविण्यात येऊन त्याला खान ही पदवी देण्यात आली. बहरामंद खानाच्या डेऱ्यावर भोजनाची वीस ताटे (काब) पाठविण्यात यावीत अशी आज्ञा झाली.

सात नोव्हेंबर– आज बादशहा अजोळी येथील मुक्कामावरुन तख्तेखांवर स्वार होऊन निघाले. ते पळसदेवपाशी भीमेच्या काठावर पोहोचले. तेथे ते नौकेत स्वार झाले. त्यांच्या आज्ञेप्रमाणे बादशहाजादा मुहंमद कामबख्श, तरबियतखान, खानाजादखान, नौकांचा प्रमुख सैफुल्लाखान हेही नौकेत स्वार झाले. नदी ओलांडण्यात आली. एकंदर प्रवास दोन पावणेदोन कोसाचा करुन बादशहा नदीच्या (भीमा) अलीकडच्या काठावर मुक्कामाला आले.

आठ नोव्हेंबर– भीमेच्या काठी मुक्काम. मतलबखान वगैरे मंडळी बहरामंदखानाचा ताबूत (शव) घेऊन बहादुरगडला गेली होती. ती परत आली. बहरामंदखानाचा जावई मीरखान (अमीरखानाचा मुलगा) याला शोकवस्त्रे (मातमी खिलत) देण्यात आली.

बादशहानी सरअफराजखान यास आज्ञा केली की 'तयारीत रहा, मी तळ कोंकणच्या बंदोबस्तासाठी तुम्हाला पाठवीत आहे.' बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान याला बादशहांनी आज्ञा केली की, सरअफराजखान याजबरोबर देण्यासाठी वीस हजार स्वारांचा तपशील (तूमार) तयार करा आणि माझ्यापाशी आणा.

फीरोजजंगाच्या पथकांतील खंजरखान याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

नऊ नोव्हेंबर– आज बादशहा भीमाकाठच्या पळसदेव जवळील मुक्कामावरून निघाले. सव्वादोन कोसाचा प्रवास करून ते जिंती करमाळा तालुका, सोलापूर जिल्हा) जवळ मुक्कामाला आले.

मुहंमदाबादचा किल्लेदार सरअफराजखान हा होता. त्याला तेथून बदलून परंड्याचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले. परंड्याचा किल्लेदार इज्जतखान याची बदली ब्रह्मपुरी उर्फ इस्लामपुरी येथे किल्लेदार म्हणून झाली. इज्जतखान याला आठशे जात व चारशे स्वार त्यापैकी तीनशे स्वार दुघोडी अशी मन्सब होती. सरअफराजखान यास एक हजार जात व सातशे स्वार अशी मन्सब होती. तीत तीनशे स्वारांची वाढ करण्यात आली.

वेल्लोर किल्ल्याच्या (तमीळनाड) किल्ल्या (सोन्याच्या). दाऊदखान (पन्नी) हा जुल्फिकारखानाचा नायब, याने पाठविल्या होत्या. त्या, मुहंमदचा मुलगा अहंमद होलबकी (?) हा घेऊन आला. किल्ल्या, दाऊदखानाचे विनंती पत्र आणि निसार (ओवाळणीची रक्कम) ही बादशहासमोर ठेवण्यात आली.

उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याचा भाऊ अब्दू-रहीमखान याला रहीमुद्दीन खान ही पदवी देण्यात आली.

दहा नोव्हेंबर–संगमनेरचा फौजदार अमानतखान याने डाळिंबाच्या करंड्या पाठविल्या, त्या बादशहाच्या नजरेखालून गेल्या. त्या शहाजादा बेदारबख्त, जीनतुन्निसाबेगम, खानफीरोजजंग, जुल्फिकारखान यांच्यात वाटण्यात आल्या.

जुल्फिकारखान हा येऊन आपले बख्शीगिरीचे काम सांभाळीपर्यंत अगर त्याचा नायब नेमला जाईपर्यंत ते काम जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्य प्रधान असदखान) याने सांभाळावे अशी आज्ञा झाली.

आज बादशहा जिंतीहून निघाले. अडीच कोसाचा प्रवास करून ते भीमेच्या काठावर मुक्कामाला आले, मौजे खेड (कर्जत तालुका, अहमदनगर जिल्हा).

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–' खास अधिकारी (गुर्जबर्दार) नेमा. सरअफराजखान याला तळकोकणात गनिमांच्या पारिपत्यासाठी पाठवावे. तेथील फौजदार हसन कलीखान याची कुमक करण्यासाठी सरअफराजखानाने जावे. गुर्जबर्दाराने त्याला हसन कलीखानाच्या मदतीसाठी पाठवावे. आणखी चार गुर्जबर्दार नेमावेत. त्यांनी १) रायबाग हुक्केरीचा फौजदार जमशीदखान २) गदगचा फौजदार शेरखान व हमीदुद्दीनखान विजापुरी फौजदार ३) कल्याण भिवंडी व गुल्शनाबाद (नाशिक) चा ठाणेदार मातबरखान याची पथके ४) दंडराजपुरीचा किल्लेदार सिद्दी याकूतखान या सर्वांना वरील गुर्जबर्दारांनी सजावारखान याजकडे नेऊन सोडावे.

छावणीच्या बाजारातील नगारखाना बादशहाच्या निवासस्थानाहून जवळ आहे असे कळविण्यात आले. यावर किती अंतर आहे ते मोजून कळविण्याची आज्ञा झाली.

बादशहा उस्मानखान करावल याला म्हणाले, 'तयार रहा. कोरेगाव फतेहाबाद व पुणे आज्जमनगरच्या दिशेने मजला ठरविणे आणि माझ्या निवासायोग्य जागा पाहणे यासाठी मी तुम्हाला पाठविणार आहे.'

इनायतुल्लाखान हा खालशाचा दिवाण होता. त्याच्या खात्याचा पेशदस्त (मुख्य कारकून) मुहंमद बाकर हा मरण पावला. त्याच्या जागी इनायतुल्लाखान याच्या भाऊबंदापैकी असलेला सय्यद नूरुल्हक याची नेमणूक करण्यात आली.

यासीनबेग वगैरे दोन गुर्जबर्दार हे बादशहाचे फर्मान घेऊन जुल्फिकारखानाकडे गेले होते. त्यांनी परत येऊन सांगितले की 'जुल्फिकारखान सध्या अहमद नगरजवळ सलाबतपूर येथे आहे.'

मरहूम नाहरखान याच्या मुलांच्या मन्सबीत वाढ करण्यात आली ती मुले अशी–

१) नाहरखान उर्फ संग्रामखान २) संग्रामखान उर्फ जंगजूईखान ३) अबू मुहंमद ४) मुहंमद अय्याम ५) बुऱ्हाण ६) मुहंमद इब्राहीम ७) यूसफअली अबु मुहंमदची मुले १) मुहंमद हैदर २) मुहंमद अन्वर ३) गुलाम मुहियुद्दीन.

अकरा नोव्हेंबर– मिर्जाबेगखान हा खान फीरोजजंग याच्या फौजेत तैनात होता तो तळावरुन (ब्रह्मपुरी) सरकारी घोडे घेऊन आला होता. तो बादशहांना भेटला.

बादशहांना कळविण्यात आले की हैद्राबादी कर्नाटकचा बख्शी व वाकनीस मीर अली हा दोन हत्ती व एक हत्तीण सौदागरांना विकत आहे. हत्ती जप्त करून

सरकारात घ्यावे अशी आज्ञा झाली. हत्तींची किंमत पुढील प्रमाणे ठरविण्यात आली. पाहिला हत्ती सात हजार रुपये, दुसरा हत्ती पाच हजार रुपये, हत्तीण तीन हजार रुपये.

इस्माइलखान मका याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. त्याला पाच हजारी मन्सब होती.

बारा नोव्हेंबर– बादशहाजादा कामबख्श याने विनंती केली की 'परवानगी असेल तर मी बहादुरगड येथे बादशहाजादा मुहंमद मुअज्जम यांची हवेली (वाडा) आहे तेथे उतरेन.' मान्यता देण्यात आली. मुहंमद आज्जमशहा (औरंगजेबाचा दुसरा मुलगा) याची हवेली काही दिवसांसाठी कामबख्श याला देण्यात यावी अशी आज्ञा झाली.

तेरा नोव्हेंबर– आज बादशहा भीमा कांठच्या आपल्या (खेड येथील) मुक्कामावरुन निघाले. पावणे तीन कोसाचा प्रवास करुन दोन प्रहरी ते बहादुरगड उर्फ पेडगांव जवळील आपल्या मुक्कामावर आले. पुढील मंडळी त्यांना भेटली–१) पेडगांवचा बदललेला किल्लेदार (बहादुरगडचा) फखरुद्दीन २) दौंडचा ठाणेदार मानसिंग.

जुल्फिकारखान याजकडे बख्शीगिरीबाबत खिलतीची वस्त्रे पाठविण्यासाठी जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा यांजकडे देण्यात आली.

बादशहा बहादुरगडाजवळ पोहोचले, त्यावेळी किल्लेदार मुहियुद्दीनखान (याचीही बदली झाली असावी. माजूल शब्द वापरला आहे.) याने तोफांना सरबत्ती दिली.

मूहतशमखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली–१) मला दोन घोडे देऊ करण्यात आले होते. एकच घोडा मिळाला आहे. दुसरा पण देण्यात यावा. बादशहांनी आज्ञा केली की शंभर रुपये देण्यात यावे.

२) माझी पालखी अगदी कामातून गेली आहे. सरकारातून दुसरी पालखी देण्यात यावी. द्यावी अशी आज्ञा झाली.

३) सहाय्य म्हणून एक डोली मिळावी. देण्याची आज्ञा झाली.

४) मरहूम बहरामंदखान याच्या जहागिरीचे एक खेडे मोकळे (पायबाकी) झाले आहे. मला मिळावे, अमीरुल उमरा (मुख्यप्रधान असदखान) यांनी चौकशी करावी अशी आज्ञा झाली.

मतलबखान करावल बेगी याला बादशहा म्हणाले 'तयार व्हा. येथून पुण्यापर्यंतच्या मजला ठरविण्यासाठी मी तुम्हाला पाठवीत आहे. उस्मानखान करावल हा पण जाईल.'

चौदा नोव्हेंबर – इब्राहीम बेग हा मध्य आशियातून नोकरीच्या आशेने आला होता. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. मीरसामानचा नायब फाजलखान हा आजारातून बरा झाला. तो बादशहांना भेटला.

तळकोकणचा फौजदार हसन कुलीखान याच्या मदतीस जावे आणि गनिमांचे पारिपत्य करावे अशी सरफराजखान यास आज्ञा झाली होती. त्याने खालीलप्रमाणे विनंती केली–

१) सटवाजी डफळे याला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे, विनंती मान्य करण्यात आली.

२) बेळगावचा किल्लेदार व फौजदार यूसफखान याला तळ कोकणची माहिती आहे. त्याला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे.

३) बहरामंदखानाच्या भाऊबंदांतील सय्यद अश्रफ याच्यावर कृपा व्हावी. विनंती मान्य झाली नाही.

४) त्या भागातील (तळ कोकण) फौजदार आणि जमीनदार यांना माझ्याशी सहकार्य करण्यासंबंधी आज्ञा करण्यात यावी.

उम्दतुल्मुल्क खान फीरोजजंग याच्या सैन्यातील बातम्यांवरुन कळले की तेथे तैनात असलेला अब्दुलकरीम मन्सबदार हा गैरहजर आहे. फरारी म्हणून त्याची नोंद करण्यात यावी आज्ञा झाली.

नाहरखान उर्फ संग्रामखान हा बादशहांना भेटला. त्याला दीड हजार जात व एक हजार स्वार अशी मन्सब होती. तीत शंभर स्वारांची वाढ करण्यात आली. त्याच्यासाठी एक अलम (निशाण ध्वज) काढून ठेवण्यात आला.

सगर (? गुलबर्गा जिल्हा) च्या किल्लेदारीवर सय्यद नूरुद्दीन याला नेमण्यासाठी त्याचा दर्जा (मन्सब वगैरे) याची चौकशी करून कळवावे अशी आज्ञा झाली.

शेख हिदायत केश याने पुणे व कोंडाणा या स्थळापर्यंतच्या मजलांचा तपशील (तूमार) दिला. बादशहाच्या छावणीपासून पुण्यापर्यंत पंचवीस कोस, तेथून कोंडाणा सात कोस. बादशहांनी यादी मतलबखानाच्या हाती देत म्हटले मजलांची चौकशी करून तपशील आणा.

बादशहांनी सरबराहखान कोतवाल याला पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

'बादशाही छावणीत दवंडी देण्यात यावी की हिंदूंनी मुसलमानांना नोकर म्हणून ठेवता कामा नये.'

सरअफराजखान याला (तळ कोकणच्या मोहिमेवर) निरोप देताना त्याला देण्यासाठी खिलतीची वस्त्रे, एक घोडा व तीनशे रुपये देण्यात आले.

पंधरा नोव्हेंबर– बादशहांनी आज्ञा केली की तळावरुन (ब्रह्मपुरी) नावा बहादुरगडच्या उतारावर आणण्यात याव्या.

तोफखान्याचा मुश्रफ कुंजमण याला बादशहांनी आज्ञा केली की 'तुम्ही अहमदनगरला जा. तेथील किल्ल्यात तोफा आहेत. त्यापैकी हुजुरात ठेवण्यायोग्य तोफा घेऊन या.'

आज्जमगड (पुरंदर) चा किल्लेदार व फौजदार खानचंद याने विनंतीपत्र पाठविले. ते बादशहासमोर ठेवण्यात आले.

नळदुर्गाचा किल्लेदार व फौजदार कासमखान याने खालील विनंत्या लिहून पाठविल्या–

१) किल्ल्याला आणखी एक जागा (कर्मचारी) देण्यात यावी. विनंती मान्य करण्यात आली.

२) माझ्या भाउबंदांपैकी मुहंमद याला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे, विनंती मान्य झाली.

३) दुआबच्या खुराकाची (लष्करातील जनावरांचा खुराक) माफी देण्यात यावी. विनंती मान्य झाली नाही.

४) मिहदी आबादच्या ठाण्यावर अब्दुलरसूल खान हा ठाणंदार आहे. त्याला बदलून त्याच्या जागेवर माझी नेमणूक करण्यात यावी. विनंती मान्य करण्यात आली.

५) मरहूम कासम याचा भाऊ मुहंमद हादी याला माझ्याकडे लावून देण्यात यावे विनंती मान्य झाली.

सादखानाचा नातू आणि अब्दुल्लाखानाचा मुलगा असदुल्ला याने पुढील प्रमाणे कळविले–मी शहा बुऱ्हाणुद्दीनच्या (खुल्दाबाद) दर्ग्यावर गेलो होतो. मला प्रेषिताचा दृष्टांत झाला की कोंडाणा व राजगड हे फत्ते होतील. माझ्यावर कृपा व्हावी. त्याची मन्सब वाढविण्यात येऊन त्याला हुजुरांत ठेवून घेण्यात आले.

संग्रामखानाचा मुलगा जंगजूईखान याची मन्सब वाढविण्यात आली.

सोळा नोव्हेंबर– आज कचेऱ्या बंद होत्या.

सतरा नोव्हेंबर– आज बादशहांनी शहाजादा बेदारबख्त याच्या सैन्यात पुढील इसमांच्या नेमणुका केल्या–१) एतिमादखान अब्दलबख्शी आणि वाकनीस २) दरायतखान मीर सामान याला बेदारबख्ताच्या सैन्याचा दिवाण म्हणून नेमण्यात आले. ३) मीर असीमा हा दुय्यम बक्षी झाला. ४) फजलुल्ला हा खुजस्ताबुनियाद (औरंगाबाद) चा बातमीदार (सवानेहनिगार) झाला ५) शेख मसूद हा सुभ्याचा मुख्य काजी झाला. (बेदारबख्ताला औरंगाबादचा सुभेदार म्हणून नेमण्यात आले होते. म्हणून या नेमणूका करण्यात आल्या.)

अब्दुलशरीफखान याला मिहदी आबाद (तुळजापूरजवळ) च्या ठाणेदारी-वरुन बदलण्यात आले होते. त्याला खान फीरोजजंगाच्या सैन्यात तैनात करण्यात आले.

दंडराजपुरीचा फौजदार सिद्दी याकूतखान याला तीन हजार जात व दीड हजार स्वार (त्यापैकी पांचशे दुघोडी) अशी मन्सब होती. दाभोळची फौजदारी जाबिताखानाकडे होती. त्याला त्या जागेवरुन बदलण्यात येऊन ती जागा पण सिद्दी याकूतखान याला देण्यात आली.

नळदुर्गच्या बातम्यांवरुन पुढील हकीकत कळली– ' गनिमांचे सुमारे पांचशे सैन्य चाल करून आले. त्यांनी पन्नास गुरेढोरे जबरीने पळवून नेली.' बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली– ' तेथील बदललेला किल्लेदार (नाव लागत नाही, अहमद किंवा गुलाम रेशखान ?) याला ताकीदपत्र पाठविण्यात यावे. कासिम गुर्जबर्दार याने जाऊन किल्लेदाराला आपल्या किल्ल्याच्या क्षेत्रात तातडीने नेऊन पोहोचवावे.'

गड नमुन्याचा ठाणेदार अबुल्खैरखान हा येऊन बादशहांना भेटला. त्याला जुन्नरची फौजदारी व शिवनेरीची किल्लेदारी देण्यात आली. शरीफखान याला गड नमून्याचा (करडेनिमोणे) ठाणेदार म्हणून नेमण्यात आले.

फखरुद्दीनखान याला पूर्वीप्रमाणेच बहादुरगड (पेडगांव) च्या किल्लेदारीवर बहाल ठेवण्यात आले. फतेहुल्लाखान बहादुर याला खिलतीची वस्त्रे व एक घोडा देण्यात आला. सखरलना (विशाळगड) वगैरे भागात गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी त्याला निरोप देण्यात आला.

फतेहुल्लाखान याला तोफखान्याचा पुढील सरंजाम देण्यात यावा अशी आज्ञा झाली–

१) दोन रेहकले (लहान तोफा), २) पाचशे पायदळ ३) दोनशे बाण ४) दहामण सरब (शिसे) ५) वीस मण बंदुकीची दारु.

फतेहुल्लाखानाबरोबर पुढील सरदार देण्यात आले–

१) नाहरखान २) संग्रामखान ३) सरबलदखान ४) सय्यद अफजल त्यांना प्रत्येकी खिलतीसाठी म्हणून वस्त्रे वेगळी काढून ठेवण्यात आली.

फतेहुल्लाखानाबरोबर जे सैन्य देण्याचे ठरविले त्याचे तपशील *(तुमार) दोन हजार सातशे बत्तीस स्वार असा होता.

ख्वाजा रहमतुल्ला याला आवळ (?) परगण्याची अमीनी देण्यात आली.

पुढील माणसांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला–१) पायीने विलायत (वाई प्रांत) चा देशमुख सूर्याराव (सूर्याजी पिसाळ), २) सरहिंद (पंजाब) चा दयाराम चौधरी. त्यांना प्रत्येकी खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

जुल्फिकारखानाच्या सैन्यात जुधोरीपत (नांव नीट लागत नाही. उद्योपत, जुधवाइपति असेही वाचन होऊ शकते) हा तैनात होता. आज्ञेप्रमाणे तो येऊन बादशहांना भेटला. बादशहांनी त्याला म्हटले 'दक्षिणेतील जे किल्ले गनिमांच्या प्रांतात आहेत त्यांचा तपशील तुम्ही जुल्फिकारखानाकडे द्या.'

छावणीतून हत्ती, उंट, वगैरे तळावर पोहोचवायचे होते. बादशहांनी आज्ञा केली की त्यासाठी मी ख्वाजाखान याला तळाकडे (ब्रम्हपुरी) पाठवीन. त्याच्या बरोबर देण्यासाठी दोन हजार नऊशे साठ स्वार यांचा तूमार (तपशील, यादी) तयार करण्यात यावा.'

इंदापूरचा ठाणेदार मुगलखान याला बादशहांनी आज्ञा केली की 'तयार रहा. खुजस्ताबुनियाद (औरंगाबाद)हून (छावणीपर्यंत) मी रहदारी (मार्ग रक्षणाचे) काम तुमच्याकडे सोपवीत आहे. तुमच्या बरोबर राव मानसिंग (शिंदखेडकर जाधव) वगैरे देण्यात येतील. सैन्याचा तूमार (तपशील) दोन हजार आणि काही स्वार असा ठरविण्यात आला.

रात्रीं कर्णे (करनाई) वाजविण्यासंबंधी काय आज्ञा असे नगारखान्याचा दारोगा (अधिकारी) याने विचारले ' बादशहांनी आज्ञा केली की रात्री कर्णे वाजविणे बंद करण्यात यावे.'

खुजस्ताबुनियाद औरंगाबाद येथे तैनात असलेल्या केशव हरकारा याच्या लिहिण्यावरून कळले की 'या महिन्याच्या (रजब) तीन तारखेस (बारा नोव्हेंबर १७०२) शहाजादा बेदारबख्त हा औरंगाबादेहून तीन कोसावर पोहोचला आहे.'

गांडापूर (गंगापूर, औरंगाबाद जिल्हा) च्या हरकाऱ्याच्या लिहिण्यावरून पुढीलप्रमाणे कळले– 'जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग हा हणमंतराव या सरदाराचा पाठलाग करीत जमादिमानी एकोणतीस तारखेस (नऊ नोव्हेंबर १७०२) या ठिकाणी (गंगापूर) आला.

अठरा नोव्हेंबर– मरहूम बहरामंदखान याच्या तैनातीतील पुढील मंडळींवर बादशहांनी मन्सबी वगैरे देऊन कृपा केली– अरसलान बहादुर, मुहंमद आरिफ, मुहंमद हुसेन.

अर्जीचा दारोगा ख्वाजा मंजूर हा आजारी होता. त्याला तीन हजार रुपये किमतीचा एक हत्ती व खिलतीची वस्त्रे देण्यात आली आणि औरंगाबादेस जाऊन औषधोपचार करण्यासाठी त्याला निरोप देण्यात आला.

नाहरखान यास खिलतीची वस्त्रे, अलम (निशाण) इत्यादी देण्यात येऊन त्याला हुसेन कुलीखान याच्या सैन्यात तैनात होण्यासाठी निरोप देण्यात आला.

मुहंमद इब्राहीम कोका याला एक घोडा बक्षीस देण्यात आला. फतेहुल्लाखानाबरोबर त्याला तैनात करण्यात आले.

ख्वाजाखान याजबरोबर (ब्रह्मपुरीच्या) तळावर हत्ती व घोडे पोहोचविण्यासाठी दोन हजार तीनशे स्वार द्यावे. त्यांचा तपशील (तूमार) तयार करावा अशी आज्ञा रुहुल्लाखान बख्शी याला देण्यात आली.

इंदापूर ठाणेदार व मीरतुजक दुय्यम (शिष्टाचाराचा अधिकारी) मुगलखान याला बहादुरगडपासून औरंगाबाद पर्यन्तच्या मार्गाचे रक्षण करण्याचे काम देण्यात आले. त्यांच्या बरोबर पाच हजार स्वार देण्यात यावेत आणि त्यांचा तूमार (तपशील) तयार करण्यात यावा अशी आज्ञा बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान यास देण्यात आली..

इनायतुल्लाखान याने सखरलना (विशाळगड) चा किल्लेदार जाबिताखान याचे विनंतीपत्र बादशहासमोर ठेवले. जाबिताखानाने पुढीलप्रमाणे लिहिले होते–

'मला (खर्चासाठी) इतके दिवस झाले तरीही जहागीर मिळाली नाही. हशमाचा (पायदळ शिबंदी) पगारही मिळाला नाही. सामग्री सरंजामाचाही पुरवठाही होत नाही. संतत युध्दाचा प्रसंग. किल्लेदारी इतर कुणाला तरी देण्यात यावी.'

बादशहांनी आज्ञा केली की सिद्दी याकूतखान (दंडराजपुरीचा किल्लेदार व फौजदार) आणि राजा अवधूतसिंग (उदितसिंग, ओछर्याचा राजा) यांचा मानमरातब व दर्जा काय आहेत हे कळविण्यात यावे.'

शेख गुलाम मुहंमद उर्फ बळीराम याला जहागिरीचा हिशेब तपासनीस म्हणून नेमण्यात आले.

मुगलखान, इब्राहीम कोक, नाहरखान इत्यादींना आपापल्या कामगिरीवर जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

एकोणीस नोव्हेंबर– बादशहांनी छावणीचा कोतवाल सरबराहखान याला खालील प्रमाणे आज्ञा केली–

'छावणीत दवंडी द्या. छावणीतील कुणाही इसमाने आपले कबिले (बायका-मुले) बरोबर बाळगता कामा नये. कबिले एकतर औरंगाबादेस पाठवावे किंवा बहादुरगडात सुरक्षित ठेवावे.

वीस नोव्हेंबर – चांभार गोंद्याचा ठाणेदार ख्वाजा इबादुल्लाखान चोरपाशी हा आज्ञेप्रमाणे बादशाहांना भेटला.

जगदेवराव याचा मुलगा राव मानसिंग (शिंदखेडकर जाधव) याला एक घोडा बक्षीस देण्यात आला. त्याला मुगलखानाबरोबर जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

सरबलंदखान उर्फ मीर मुहंमद याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. त्याला फतेहुल्लाखानाबरोबर कामगिरीवर जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

मरहूम अब्दुलअजीजखान याचा मुलगा अबुल्खैरखान याला शिवनेरी, हरसूलची किल्लेदारी व जुन्नरची फौजदारी हे हुद्दे देण्यात आले होते. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात येऊन त्याला जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

सय्यद नूरुद्दीन हा बगालोनी (नाव नीट लागत नाही.)चा किल्लेदार होता. त्याला अबुल्खैरखानाच्या जागेवर गढ नमूना (करडेनिमोणे) च्या ठाणेदारीवर नेमण्यात आले.

मंजूरखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली, 'मुगलखानाच्या सैन्यात ख्वाजा कुलीखान हा तैनात आहे. त्याच्या पथकांतील लोकांना सतरा महिन्यापासून पगार मिळाला नाही. काय आज्ञा?'

बादशहांनी आज्ञा केली की त्यांना तूर्त (अलल् हिसाब, ऑन अकौंट) तीन महिन्याचा पगार द्या.'

फतेहुल्लाखान बहादुर याने विनंती केली की सिद्दीबलालखान हा एक हजार जात व पांचशे स्वार अशी मन्सब बाळगून आहे. त्याला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे. विनंती मान्य करण्यात आली.

बख्शी उलमुल्करुहुल्लाखान याने बादशहांना पुढीलप्रमाणे कळविले– 'छावणीचा कोतवाल सरबराहखान याने आपली आज्ञा कळविली आहे की मीरघासी याला छावणीत ठेवणे योग्य नाही. त्याला जुल्फिकारखान अगर खान फीरोजजंग यांच्या सैन्यात तैनात करण्यात यावे. काय आज्ञा ?' बादशहांनी आज्ञा केली की 'खान नुस्रतजंग (जुल्फिकारखान) याच्या फौजेत तैनात करा.'

छावणीपासून पुण्यापर्यंत मजला ठरविण्यासाठी मी जावे अशी आज्ञा झाली आहे असे मतलबखान याने कळविले. बादशहा म्हणाले 'उस्मानखान याने या कामावर जावे'

फराशखान्याचा अधिकारी मीरहादी याला बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

तुमचा भाऊ नस्रुल्लाखान हा ख्वाजाखानाच्या बरोबर तळावर (ब्रह्मपुरी) जाईल. तेथून तो नवाब जीनतुन्निसा बेगम (औरंगजेबाची मुलगी) यांच्याबरोबर राहील. औरंगाबादच्या वाटेवर तंबू उभे करण्याचे काम तो करील.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली– धनाजी जाधव याने रामचंद्र (पंत अमात्य) याला कोंडाणा किल्ल्यावर ठेवले असून तो स्वतः गड (बहादुर गड) च्या जवळ आला आहे.

एकवीस नोव्हेंबर– मुहिब अली यास जोधनची किल्लेदारी देण्यात आली.

इम्तियाजगड उर्फ अधोनी (कर्नूल जिल्हा, आंध्रप्रदेश) येथील बातम्यांवरून कळले की तेथील किल्लेदार बेगमुहंमदखान हा वारला. बादशहांनी पुढीलप्रमाणे नेमणुका केल्या–

बहादुरगडचा किल्लेदार फखरुद्दीनखान याची नेमणूक अधोनीच्या किल्लेदारीवर.

शरीफखान याला बहादुरगडचा किल्लेदार व फौजदार म्हणून नेमण्यात आले.

बहादुरगडच्या तोफखान्याचा दारोगा व बागांचा अधिकारी मुहरमखान याचा नायब अब्दुल्लाबेग याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

उस्मानखान करावल याने पुढीलप्रमाणे विनंती केली 'आज्ञेप्रमाणे पुण्यापर्यंतच्या मजला ठरविण्यासाठी मी जात आहे. माझ्याबरोबर मरहूम नाहरखान याचा नातू घोरीखान याला तैनात करण्यात यावे.' विनंती मान्य करण्यात आली.

खानाजादखान याचा धाकटा मुलगा अबुलखैर याचे लग्न पचगानी बेगम हिच्याशी ठरले. विवाहासाठी चवदा हजार रुपये किंमतीचे अलंकार द्यावे असे ठरविण्यात आले.

बावीस नोव्हेंबर– काल रात्री खानाजादखान याने आपला मुलगा अबुल्खैरखान याच्या लग्नानिमित्त निसार (ओवाळणी म्हणून रक्कम) बादशहाकडे पाठविली. बादशहांनी अबुल्खैरला खिलतीची वस्त्रे दिली.

बेलदार व गवंडी (संगतराश, दगड तासणारे) यांना सखरलना (विशाळगड) कडे पाठविण्याची आज्ञा झाली होती. पण ते गेले नाही. आता मात्र फतेहुल्लाखान याजबरोबर दोनशे माणसे (बेलदार व गवंडी) पाठविण्यात यावी अशी आज्ञा झाली.

हत्तीखान्याचा प्रमुख मुनीमखान (हा बहादुरशहाच्या काळात पंतप्रधान झाला.) याने पुढीलप्रमाणे विनंती केली–

'मला दख्खनच्या सुभ्यात जहागीर आहे. बहरामंदखानाच्या मृत्यूमुळे शहाजहानबाद (दिल्ली) च्या सुभ्यांतील जलालपूर परगणा हा रिकामा (पायबाकी) झाला आहे. माझ्या दक्षिणच्या जहागिरीच्या मोबदल्यात तो परगणा मला देण्यात यावा.' इनायतुल्लाखान याने चौकशी करुन कळवावे अशी आज्ञा झाली.

बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान याच्या शिक्क्यांनी पुढील इसमांच्या नांवे बादशहाची आज्ञापत्रे रवाना झाली–

१) खान फीरोजजंग उम्दतुल्मुल्क २) रायबाग हुक्केरीचा फौजदार जमशीदखान विजापूरी ३) दाऊदखानापाशी तैनात असलेला सुलेमान खान.

तेवीस नोव्हेंबर– पुण्यापर्यंतच्या मजला ठरविण्यासाठी जाण्यास उस्मानखान करावल यास निरोप देण्यात आला.

मुहिब विहिशी (?) याची जोधन (जोंध ?) च्या किल्लेदारीवर नेमणूक झाली होती. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात येऊन त्याला निरोप देण्यात आला.

कळंब (यवतमाळ जिल्हा) चा बदललेला फौजदार अबुल्हसन हा येऊन बादशहाला भेटला.

ताळीकोटचा फौजदार आणि मरहूम फतेहजंगखान याचा भाऊ अब्दुर्रहीम हा मरण पावला असे कळले.

खानाजादखान याचा मुलगा अबुल्खैर याचे लग्न गुरुवारी ठरले आहे. नौबती वाजविण्यासंबंधी काय आज्ञा म्हणून विनंती करता बादशहांनी नौबती वाजविण्याची परवानगी दिली (दोन दिवसांसाठी).

औरंगाबाद येथील हरकाऱ्याच्या लिहिण्यावरून पुढीलप्रमाणे कळले–

या महिन्याच्या (रजब) च्या सहा तारखेस (पंधरा नोव्हेंबर १७०२) शहाजादा मुहंमद बेदारबख्त बहादुर हा औरंगाबाद येथे जसवंत पुऱ्याच्या तलावाजवळ उतरला. त्याने तेथे तळ दिला.

त्याने चाळीस कोसाच्या परिसरातील फौजदारांना पुढील अर्थाची ताकीद पत्रे पाठविली आहेत.

'गनीम तुमच्या भागात पसरले की त्याचे पारिपत्य करा. आमची सैन्ये जवळपास असली की त्वरित कळवा म्हणजे ती मदतीसाठी पाठविता येतील.'

दुसऱ्या दिवशी शहाजादा बेदारबख्त हा बेगम साहेबाच्या मकबऱ्यावर (बीबीचा मकबरा, बेदारबख्ताची आजी दिलरसबानू) गेला. तेथे तो फातेहा पढला. त्याने सोने चांदीची फुले व द्रव्यही गरिबांत वाटली. परत येऊन तो डेरेदाखल झाला.

देऊळघाट (वऱ्हाड) चा फौजदार नसीरुद्दीनखान याला मेलगाव (?) मलकापूरची फौजदारी देण्यात आली. त्याला तीनशे जात व चारशे स्वार (पैकी शंभर दुघोडी) अशी मन्सब आहे.

चोवीस नोव्हेंबर – काल रात्री आदिलबेग गुर्जबर्दार याने खान नुस्रतजंग (जुल्फिकारखान) याचे पत्र व मीरबख्शीगिरीची मोहर (शिक्का आणली. नुस्रतजंगचा नायब म्हणून मतलबखान याची नेमणूक करण्यात आली. त्याला आपला नायब म्हणून नेमावे. शिक्का (मोहोर) यार अली पाशी असावा अशी विनंती जुल्फिकारखानाने केली होती. ती मान्य करण्यात आली.

फराशखान्याचा अधिकारी मुहंमद हादी याचा भाऊ नसुल्ला याला काल रात्री तळाकडे (ब्रम्हपुरी) जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार कासिमखान याने आपल्या अर्जात पुढील विनंत्या मांडल्या– त्या पैकी काही अशा (इतर ठिकाणी मुगलखान म्हटले आहे.)

१) सैफुद्दीनखान (माजी किल्लेदार) याच्या काळात स्वारांना सहामाही पगार असे. तसे चालू रहावे. विनंती मान्य करण्यात आली.

२) शहाजहानाबाद (दिल्ली) सुभ्यांतील परगणा नहमा (?) खुराक दुआब व कुटुंबाचा खर्च यासाठी तनखा म्हणून देण्यात यावा.

यावर इनायतुल्लाखान याने चौकशी करुन कळवावे अशी आज्ञा झाली.

औरंगाबादेत बहादूर या मार्गाचा रक्षक मुगलखान याच्या मन्सबीत सूट देण्यात आली.

पंचवीस नोहेंबर – पुढील मंडळींच्या मन्सबीत बहाली व बढत्या करण्यात आल्या–

१) अहदींचा बख्शी नेकनामखान २) बाकरखान तनबख्शी म्हणजे तनखा वाटणारा बख्शी ३) नेमतखान ४) तुर्कताजखान ५) मीर बुरहाण.

मुगलखानाच्या फौजेतील बख्शी व वाकनीस बहाउद्दीन याने पुढील विनंत्या लिहून पाठविल्या–

१) गनिमांची (मराठ्यांची) बातमी आणण्यासाठी जासूदांच्या दोन जोड्या लागतील.

यावर आज्ञा 'की इतर फौजांतून जी पध्दत आहे ती पाळण्यात यावी'

२) मुगलखानाच्या फौजेत तोफखान्याचा दारोगा (अधिकारी) नेमण्यात यावा. यावर बादशहाची आज्ञा 'मीर आतिश (तोफखान्याचे प्रमुख)' ही नेमणूक करतील.

३) बहसर(?) ची जहागीर बहाल ठेवावी. यावर आज्ञा की इनायतुल्लाखान याने चौकशी करुन कळवावे.

४) डाकचौकी दस्तक इत्यादींची व्यवस्था व्हावी म्हणजे फौजेच्या बातम्या हुजुरांत कळविणे सोयीचे होईल. विनंती मान्य करण्यात आली.

अहमदनगरचा किल्लेदार व फौजदार अब्दुलगफूरखान याने विनंती केली की–

'आज्ञा असेल तर येथे आपला नायब ठेऊन हुजुरांत येईन. यावर बादशहांनी पुढील प्रमाणे आज्ञा केली –' मुगलखान हा बुणगे वगैरे औरंगबादेस पोहोचवून अहमदनगरला येईल त्यावेळी तुम्ही येऊन भेटावे'

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले–' गवत व चारा आणण्यासाठी लष्करातील हत्ती, बैल वगैरे जंगलांत पाठविण्यात आले होते. चोरांचे (मराठ्यांचे) सैन्य चालून आले. शमशीरबेग करावल हा त्या स्थळी पोहोचला असून त्यांच्याशी लढत आहे. पण त्याच्यापाशी फार थोडे सैन्य आहे.'

बादशहांनी आज्ञा केली 'गनिमांच्या पारिपत्यासाठी मुनीमखान, मुहंमद काजम, कामयाबखान, हैद्राबादी पायदळ व हमीदुद्दीनखान बहादुर यांची पथके यांनी जावे. बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान यानेही तयार रहावे त्याला ही पाठविण्यात येईल.

शेख नूर मुहंमद करोडा याने आपला तोफखान्याचा सरंजाम दाखविला. वीस स्वार, पाचशे पायदळ, रेहेकले दोनशे, बाण दोनशे, शिसे पाच मण, दारु (बंदुकीची) दहा मण, बाणदार दोन. तरबियतखान मीर आतिश याच्याबरोबर तोफांचा पुढील सरंजाम देण्याची आज्ञा झाली. बर्कंदाज अडीचशे स्वार, पायदळ पाचशे दहा, रेहेकले दोनशे, बाण, सरब (शिसे) पाच मण, दारु (बंदुकीची) दहा मण, बाणदार दोन.

अधिक तपशील

बादशाही छावणीतील हत्ती, चाऱ्यासाठी म्हणून छावणीपासून दोन तीन कोसावर गेले आहेत. काफरांचे (मराठ्यांचे) सैन्य चालून आले असून त्याने कोंडी केली आहे आणि हत्तींच्यावर आक्रमण करून त्याना वळवून नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही बातमी ऐकून हत्तीखान्याचा दारोगा (अधिकारी) हा त्वरेने धावून गेला आहे.

बादशहांनी आज्ञा केली की 'बख्शी उल्मुल्क महुल्लाखान याने हैद्राबादी पायदळ सैनिक व खान जहानची पथके याना गनिमांच्या पारिपत्यासाठी रवाना करावे.'

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'बुणग्याचे सामग्री सामान ब्रह्मपुरी (इस्लामपुरी) हून औरंगाबादकडे हलविण्यात येईल. ते हलविण्यासाठी तीनशे उंट व शंभर हत्ती पाठविण्यात यावेत.'

बादशहांनी महुल्लाखान यास पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'मीर आतिश तरबियतखान याच्याबरोबर देण्यासाठी सहा हजार स्वारांच्या सैन्याचा तूमार (तपशील) तयार करावा.

गस्त घालण्यासाठी म्हणून मुहंमद अमीनखान बहादुर याच्याबरोबर देण्यासाठी पाच हजार स्वारांची व्यवस्था करावी. तूमार तयार करावा.

गुर्जबर्दारांचा दारोगा मतलबखान याला जुल्फिकारखान नुस्रतजंग याचा नायब म्हणून नेमण्यात आले. त्याने तसलीमात (मुजरे, नम्र अभिवादन) केले.

आज रात्री खानाजादखान याचा मुलगा अबुलखैर याचे लग्न पांचकानी बेगम हिच्याशी होणार आहे. बादशहांनी अबुल्खैरला शंभर मोहरा, एक घोडा व खिलतीची वस्त्र दिली.

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–'जीनतुन्निसा बेगम यांच्यासाठी तळावर (ब्रम्हपुरी) ओझी वाहणारी वाहने व चार जनावरे (बारबरदारी) पाठवा म्हणजे तेथून ती औरंगाबादेस रवाना होतील.

सव्वीस नोव्हेंबर – काल रात्री हमीदुद्दीनखान बहादुर याने खालीलप्रमाणे विनंती केली–

मुनीमखानाची दोन माणसे हलकट गनिमांच्या (मराठ्यांच्या) मागे गेली होती. त्यांनी येऊन वस्तुस्थिती सांगितली ती पुढीलप्रमाणे–

चोरांनी (मराठ्यांनी) आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक सैन्य मुनीम खानाशी लढण्यात गुंतले, दुसरे सैन्य हत्ती व ऊंट व लष्करातील बैल घेऊन गेले, मुनीमखानाबरोबर फार थोडे सैन्य आहे.' बादशहांनी आज्ञा केली की 'मुहमंद अमीनखान बहादूर याला (गनिमांच्या पारिपत्यासाठी) नेमण्यात आले आहे.'

बादशहांनी मुहंमद अमीनखान बहादूर याला गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी जाण्यास निरोप दिला तरबियतखानाला ससैन्य गस्त घालण्यासाठी पाठविण्यात आले. तो गस्त घालून परत आला.

काल रात्री खानाजादखानाचा मुलगा अबुल्खैर हा हुजुरात आला. बादशहांनी आपल्या हातांनी त्याला मोत्याची मुंडावळ बांधली. काजी मुहंमद अकरमखान, बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान, हमीदुद्दीनखान बहादुर, मुहरमखान वगैरेना बोलावण्यात आले बलवांग (गुलबांग?) बानू हिचे पालन पोषण अंतःपुरात झाले होते. मुख्य काजींनी तिच्याशी अबुल्खैरचा निका पढविला. ऐंशी हजार रुपये मिहर म्हणून ठरविण्यात आला. अबुल्खैरला अेक कलगी तूरा बक्षीस देण्यात आला.

सत्तावीस नोव्हेंबर– बादशहांनी नायब खानसामान फाजलखान आणि नायब नाझर ख्वाजा सुहेल याला पुढीलप्रमाणे आज्ञा केली– 'तुम्ही बहादुरगडच्या किल्ल्यात जा. बादशहाजादा कामबख्श याचे अंतःपूर व इतर खाती (कारखाने) यांच्यासाठी जागा पाहून या. आम्ही त्यांना (अंतःपुर वगैरे) येथेच ठेवणार आहोत.'

फाजलखान व ख्वाजा सुहेल हे किल्ल्यात जातील तेव्हा त्यांना अडथळा होऊ नये अशी ताकीदपत्रे (परवानगी) किल्लेदाराला देण्यात यावी अशी आज्ञा बक्षी उलमुल्क रुहुल्लाखान यांस देण्यात आली.

मावळ्यांचा प्रमुख सकसा (नांव नीट लागत नाही) याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. बुखाऱ्याचा वकील मीर हबीब याला तीनशे रुपये देण्यात आले. मुहंमद नूरबासी याला मुगलखानाच्या तोफखान्याचा दारोगा (अधिकारी) म्हणून नेमण्यात आले.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील हकीकत कळली– 'चोरांनी (मराठ्यांनी) हत्ती पळविले होते. त्यापैकी दोन हत्ती गडनमुन्याहून बदललेला ठाणेदार व शिवनेरीवर नेमण्यात आलेला किल्लेदार अबुल्खैरखान याने सोडविले आहेत.' बादशहा म्हणाले 'मजुरा झाला. किल्लेदाराचा दर्जा व हुद्दा (मरातब) कळवा.'

सिरसाळ्याचा ठाणेदार अमानुल्ला यास धारुरचा (बीड जिल्हा, मराठवाडा) किल्लेदार व फौजदार म्हणून नेमण्यात आले. तेथील पूर्वीचा किल्लेदार

औरंगखान याला हुजुरात बोलावण्यात आले. इज्जतखान याची बदली करण्यात आली होती, ती स्थगित करण्यात आली.

पेशखाना (आघाडीचे तंबू) पुढे रवाना करण्यासंबंधी काय आज्ञा म्हणून फराशखान्याचा मुश्रफ (अधिकारी) मीर मुहंमद हादी याने विचारले. 'बादशहा म्हणाले 'उद्या पुण्याच्या दिशेने पहिली मजल आहे, तेथे उभे करा. आम्ही सोमवारी निघणार.'

छावणीचा कोतवाल सरबराहखान याला बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा आज्ञा केली –

'एक उमदतुल उमरा (मुख्य प्रधान), बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान, खानजादखान व हमीदुद्दीनखान बहादुर यांचे कबिले सोडून (तिही दोनच माणसे) इतर कोणत्याही सरदारांच्या कबिल्यांना लष्करात राहू देऊ नका.'

पाईनघाट (वाई प्रांत) चा दिवाण मुहंमद आकिल याला फतेहुल्लाखान बहादुर याच्या फौजेची दिवाणीपण देण्यात आली.

अठ्ठावीस नोव्हेंबर – हैद्राबादच्या कानूनगोच्या हुद्यावर बापू पंडित हा होता. त्याला तेथून बदलण्यात येऊन त्या जागेवर खालसा शरीफ खात्याचा कारकून (पेशदस्त) याची नेमणूक करण्यात आली.

मुहंमद मुहसिन हा मध्य आशियातून आला होता. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

काल रात्रीच्या दोन घटका झाल्या असता हरकाऱ्यांच्या तोंडून खालील बातमी कळली–

मुहंमद अमीनखान बहादुर हा चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी रवाना झाला होता. शत्रूंनी बादशाही छावणीचे हत्ती, उंट, व गुरेढोरे पळविली होती. छावणीपासून सोळा कोसावर तो पोहोचला आणि शत्रूशी त्याने युध्द केले. शत्रूपैकी काही ठार व काही जखमी झाले. दोन हत्ती सोडविण्यात आले. नंतर त्याने गनिमांचा पाठलाग सुरु केला. तो लेसरी (?) या गावी पोहोचला. तोच गनिमांचे प्रचंड सैन्य चालून आले. त्याने मुहंमद अमीनखानाला घेरले असून युध्द चालू आहे. बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली 'मीर आतिश तोफखान्याचा (प्रमुख) तरबियतखान, सरफराजखान वगैरेंनी मुहंमद अमीनखानाच्या साहाय्यार्थ त्वरित जावे. त्यांना नेऊन पोहोचविण्याचे काम हमीदुद्दीनखान बहादुर याने करावे.'

फराशखान्याचा अधिकारी मुहंमद हादी याला आज्ञा झाली की 'पेशखाना पाठविण्याचे स्थगित करा.'

फतेहुल्लाखानाच्या पथकांतील बसालतखान वगैरेंना बक्षीसे देऊन (घाड) त्यांना जाण्यासाठी निरोप देण्यात आला. फतेहुल्लाखानाच्या विनंतीप्रमाणे पाच जोड जासूद (?) याना त्याजपाशी तैनात करण्यात आले. त्याने दहा मागितले होते.

सखरलना (विशाळगड) च्या वेढ्यात वापरलेल्या तोफा विशाळगडावर राहिल्या होत्या. अबदालखान याने त्या तोफा फतेहुल्लाखानाबरोबर यासीन खानाच्या इलाख्यात आणाव्या. तेथून यासीनखानाने हुजुरात आणाव्या अशी आज्ञा झाली.

अलीमर्दानखान या माजी सुभेदाराच्या कुटुंबियांना राहाण्यासाठी बुऱ्हाण पुरात एक वाडा देण्यात यावा अशी आज्ञा झाली.

सुरत बंदरचा फौजदार दियानतखान याला बदलला होता. खानाज द खानाच्या शिफारसीवरून त्याची मन्सब वाढविण्यात आली.

फतेहुल्लाखान बहादुर याने विनंती केली की जरुर लागेल त्यावेळी माझ्याशी सहकार्य करण्याबाबत त्या भागातील फौजदारांना आज्ञा व्हावी.

बादशहांनी विनंती मान्य केली. ते म्हणाले 'दंडराजपुरीचा फौजदार व किल्लेदार सिद्दी याकूत हा येत नसेल तर त्याच्या मानलेल्या मुलाने यावे. या बाबतीत त्याला लिहिण्यात यावे.'

आज्जमनगर उर्फ बेळगांव येथील तैनात असलेल्या बातम्यांवरुन पुढील हकीकत कळली–

तळ कोंकणचा फौजदार हसन कुलीखान याचे हिंदुराव (घोरपडे) याच्याशी युध्द झाले. गनिमांनी त्याला फोंड्याच्या किल्ल्यातून कैद केला आणि एक हत्ती घोडे वगैरे मालमत्ता लुटून नेली.

नळदुर्गवरुन पुढील मजकूर लिहून आला– 'मराठे सरदार पांच हजार सैन्यासहित या भागात संचार करीत आहेत. त्यांचे पारिपत्य करण्यासाठी खान नुस्रतजंग जुल्फिकारखान हा बारा कोसावर पोहोचला.'

मतलबखानाने विनंती केली की 'सरकारखान करावल याचे म्हणणे आहे की गवत–चारा यासाठी योग्य जागा पाहून येतो. काय आज्ञा?' बादशहा म्हणाले 'रात्र मध्ये आहे. तुम्ही त्याच दिवशी परत या.' त्याने म्हटले 'त्याच दिवशी गवतचारा, लाकूडफाटा ही येणार आहेत.

एकोणतीस नोव्हेंबर– बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले. मुहंमद अमीन खान बहादुर, ख्वाजाखान, तुर्कताजखान, नजीबखान वगैरे गनिमांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी गेले होते. मुहंमद अमीनखान बहादुर बरोबर सैन्य थोडे होते. गनिमांचे सैन्य मोठे. त्यामुळे बादशाही छावणीपासून सात आठ कोसावर जुन्नर भागात गनिमांनी मुहंमद अमीनखान बहादुरच्या सैन्यावर विजय मिळवून त्याला घेरले. ख्वाजाखान हा शत्रूच्या हाती सापडला. मुहंमद अमीनखान बहादुर व काही माणसे युध्दातून बाहेर पडली. मुनीमखान, कामयाबखान वगैरे आपली पथके घेऊन होते. ते गढनमुन्यात (करडेनिमोणे) बसून राहिले. मुहंमद अमीनखानाच्या मदतीला गेले नाहीत.'

बादशहाने आज्ञा केली की 'शमशेर बेग याने आठ घोडे व दोन उंट घेऊन मुहंमद अमीनखान याजकडे जावे.'

बादशहांनी खालील प्रमाणे आज्ञा केली–

'दोन गुर्जबर्दार नेमा. त्यांनी जाऊन विजापुरी कर्नाटकातून (सिराप्रांत) चीन कुलीजखान (भावी निजामुल्मुल्क) याला विजापूर सुभ्यात आणावे व गनिमांच्या पारिपत्यासाठी त्याला बेळगांवकडे पोहोचवावे. गदगचा फौजदार बशीरखान, बंकापूरचा फौजदार जमशीदखान, कोल्हापूरचा ठाणेदार इखलासखान यांना मुद्दाम माणसे पाठवून चीन कुलीजखानाकडे नेऊन मिळवावे.'

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

'खान फीरोजजंग याला आज्ञापत्र लिहिण्यात यावे. त्याचा एक अधिकारी उत्कृष्ट पथकानिशी येथे येईल. तो तेथील बुणगे व इतर सामग्री सळावर (ब्रह्मपुरी) घेऊन जाईल.'

सुभे मुल्तानचा बदललेला बख्शी व वाकनीस यादगार हुसेनखान याची खान ही पदवी काढून घेण्यात आली. त्याची मन्सब कमी करण्यात आली.

तीस नोव्हेंबर– मुनीमखानाला (मुहंमद अमीनखान याला मदत न केल्याबद्दल) फीलखाना (हत्तीखाना) च्या दारोगागिरी (अधिकारपद) वरून काढून टाकण्यात आले. त्याच्या ऐवजी दिवाणेखासचा दारोगा व आख्ताबेगी हमीदुद्दीन खान बहादुर याला नेमण्यात आले. बादशहाजादा कामबख्श याच्या अव्वल बख्शीच्या जागेवरुनही मुनीमखानाला काढून टाकण्यात आले.

बादशहांनी आज्ञा केली की 'फतेहदौलत कौल याने दोन हजार अश्रफ्या मुहंमद अमीनखान बहादुर याजकडे नेऊन पोहोचवाव्या. जुल्फिकारखान याला

मीरबक्षीगिरी मिळाली होती. त्याला पत्रे लिहितांना त्याला कोणकोणत्या अलकाब (पदव्या, विशेषणे, गौरवाचे शब्द) याबद्दल बादशहांनी पुढील शब्द वापरण्याची आज्ञा केली–(आपल्याकडील लक्ष्मी अलंकृत, राजमान्य, राजश्री प्रमाणे)–

सियादत पनाह (श्रेष्ठ), नजाबत दस्तगाह (प्रतिष्ठितांचा आधार,) उम्दा-फिदवियाने अकीदत बुनियाद (स्वामिनिष्ठ), मुखलिसान बा इतिकाद (विश्वासू व निर्मळ) मंजूरे नजर बादशाही (बादशहांचा आवडता) मोरदे अल्ताफे नामनाई (बादशहाची कृपा असलेला) खानाजाद (घराण्याचा जन्मापासून सेवक) शुजाअत निशान (शौर्यनिधि), बाकरबेग बख्शी उलमुल्क जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग.

पुढील इसमांना आज्ञापत्रे पाठविण्यात आली. १) फतेहुल्लाखान बहादुर आलमगीरशाही २) बहादुरगड ते खुजस्ताबुनियाद (औरंगाबाद) या मार्गाचा रक्षक (राहदार).

काल बादशहाना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले–'मुकाहीर (ज्यांच्यावर कोप झाला आहे असे म्हणजे मराठे) यांनी मुहंमद अमीनखान बहादुर याज-बरोबर युद्ध केले. तरबियतखान, सरफराजखान वगैरे माणसे अमीनखानाच्या मदतीला गेली. मराठ्यांनी मुहंमद अमीनखानाला सोडले. तेथून जवळच ख्वाजा-खान, ऐमनबेग वगैरे माणसे जखमी होऊन पडली होती. मराठे त्याना उचलून घेऊन गेले. मुहंमद अमीनखानाच्या बरोबर जखमी झालेली अनेक माणसे आहेत. ती सर्व पायी चालत हुजुरात येत आहेत.

बादशहांनी शमशेरबेग व फतेह दौलत कौल यांना आज्ञा केली की 'दोन हजार अश्रफ्या, वीस घोडे, दोन सांडणीस्वार, दोन उंट, खिलतीची वस्त्रे आणि तीन वैद्य (जर्राह, शल्य चिकित्सक) हे सर्व मुहंमद अमीनखान याजपाशी पोहोचवावे.'

याच सुमारास बादशहांना कळविण्यात आले की 'मुनीमखान हा पथका-सहित वाटेत होता. पण तो मुहंमद अमीनखान याच्या मदतीस गेला नाही.' त्याला एक हजार जात व चारशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी त्याची दोनशे जात व पन्नास स्वार अशी मन्सब कमी केली. त्याची पदवी काढून घेण्यात आली.

मुहतशमखान याला कौरबेगीचा हुद्दा देण्यात आला. कामयाबखानाच्या ऐवजी अमानुल्लाखान याला मीरतुजक (शिष्टाचाराचा, प्रोटोकॉलचा अधिकारी) करण्यात आले.

मुअज्जम कुली यास जमखिडी व मुधोळ येथे फौजदार म्हणून नेमण्यात आले. जमशीदखान यास तेथील किल्ल्याची किल्लेदारी देण्यात आली.

बादशहांना कळविण्यात आले की मुहंमद अमीनखानाच्या मदतीसाठी तरबियतखान गेला. पण कामयाबखान (तरबियतखानाचा भाऊ) हा गेला नाही. त्याला सातशे जात व दोनशे पन्नास स्वार अशी मन्सब होती. त्यापैकी दोनशे जात व पन्नास स्वार हे कमी करण्यात आले. कामयाबखान याची खान ही पदवी काढून घेण्यात आली.

लोहगडच्या किल्लेदारी व फौजदारीवरुन अटलसिंग याला बदलला होता. त्याला गढनमुना (करडे निमोणे) व नऊलखा येथील ठाणेदारी देण्यात आली.

फराशखान्याचा मुश्रफ (अधिकारी) याला बादशहा म्हणाले 'गुरुवारी पेशखाना पुढे पाठवून द्या.'

सिंहगडच्या वाटेवर : ९

डिसेंबर १७०२

एक डिसेंबर– सकाळी बादशहांना कळविण्यात आले की ' चोरांचे (मराठ्यांचे) चार पांच हजार स्वारांचे सैन्य हे बादशाही छावणीपासून चार पांच कोसावर जमले आहे. बादशहांनी आज्ञा केली की 'पेशखाना (आघाडीचे तंबू) कोंडाण्याच्या दिशेने रवाना करावा. मतलबखान याने पेशखान्याच्या बरोबर जावे.'

बादशहांनी मुहंमद अमीनखान बहादुर याचा मुलगा मुहंमद फाजल याला आपल्या शय्यागृहात बोलाविले. मुहंमद अमीनखान बहादुरसाठी म्हणून बादशहानी त्यांच्या मुलाकडे एक रत्नखचित अंगठी व फळांची करंडी दिली. त्याला काही सूचना देऊन त्याला आपल्या बापाकडे जाण्यास निरोप दिला.

सदारत (न्यायखाते) चा मुख्य कारकून ख्वाजा मुसा याला बादशहानी पुढीलप्रमाणे आज्ञा केली – 'तुम्ही मुहंमद अमीनखान बहादूर याजकडे जाऊन हा निरोप द्या. त्यांना म्हणावे ' हत्ती, घोडे, पोशाख, तंबू वगैरे जो काही सरंजाम तुम्हाला हवा असेल तो त्याची यादी तुमच्या मोहरेनिशी तयार करून पाठवा. सरंजाम तुम्हाला देण्यात येईल.'

ख्वाजा खानाचा मुलगा ख्वाजाखान याला बादशहांनी आपल्या शय्यागृहांत बोलावून त्याला दोन अंगठ्या बक्षीस दिल्या आणि त्याला म्हटले ' तुम्ही खात्री बाळगा. तुमच्या वडिलांना मी (मराठ्यांच्या कैदेतून) सोडवीन. त्याने मुजरा करून निरोप घेतला.

दुपारच्या वेळी हमीदुद्दीनखान बहादुर याने बादशहांना कळविले की, 'मुहंमद अमीनखान बहादुर हे चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी गेले

होते. ते भेटीसाठी हजर झाले आहेत.' बादशहा म्हणाले 'येऊ द्या' मुहंमद अमीनखान बहादुर हा बादशहांना भेटला. बादशहा म्हणाले, 'आमच्याबरोबर दुपारची नमाज पढा.' नमाजानंतर बादशहा त्याला म्हणाले 'चोरांचे (मराठ्यांचे) छान पारिपत्य केलेत.' अमीनखान बहादुर म्हणाला, 'आमचे सैन्य बंडखोरांवर (मराठे) चालून गेले. युध्द झाले. शत्रूपैकी अनेकजण जखमी झाले. आमच्या जवळील युध्द सामग्री संपली. चोरांचे (मराठ्यांचे) सैन्य संख्येने अधिक होते. त्यात कोणीही आमच्या साहाय्यास आले नाही. यामुळे आम्ही गडीत आलो. चहूकडून शत्रूने बाण, बंदुकी, दगड यांचा मारा केला. खानाजाद वगैरे बादशाही सेवक मारले गेले अगर जखमी झाले. अब्दुस्समदखान हा दगडाच्या माऱ्याने जखमी झाला'

बादशहा म्हणाले 'धन्य धन्य. तुमची आणि तुमच्या सहकाऱ्यांची सेवा मान्य झाली.'

बादशहांनी मुहंमद अमीनखान बहादुर याला खास खिलतीची वस्त्रे व फळांची करंडी दिली आणि त्याला आपल्या तंबूकडे परत जाण्यास निरोप दिला. बादशहांनी आज्ञा केली की 'फळांच्या करंड्या अमीनखानाच्या तंबूवर पाठवा आणि त्याला देण्यासाठी म्हणून दोन हत्ती आणि दोन घोडे काढून ठेवा.'

नळदुर्ग येथील जिजियाचा अमीन जहानखान (?) याला तेथेच बक्षी व वाकनीस म्हणून पण नेमण्यात आले.

दोन डिसेंबर– आज बादशहा तख्तेखांवर स्वार झाले बहादुरगडजवळील आपल्या मुक्कामावरुन ते निघाले. सव्वा कोसाचा प्रवास करून ते दिलेरखान गढपाशी मुक्कामाला आले. (नकाशात हे नाव नाही. बहुतेक कवठे असावे ?)

मीर आतिश (तोफखान्याचा प्रमुख) तरबियतखान, मुनीमखान, मुहंमद कामयाब व मुहंमद काजम हे हलकट गनिमांच्या (गनीम लईम) पारिपत्यासाठी गेले होते. ते येऊन बादशहांना भेटले. तरबियतखानाला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. मुनीमखानाची पदवी त्याला परत देण्यात येऊन त्याला त्याच्या मुलाच्या जागी दखनी सैनिकांच्या खात्याचा व्यवस्थापक म्हणून नेमण्यात आले.

बादशहांनी आज्ञा केली की 'सैन्याच्या कुचेच्या वेळी अर्ध्या मजलेपर्यंत हमीदुद्दीनखान बहादुर यांनी बादशहाच्या हुजुरात असावे आणि नंतर सैन्यात व सैन्याच्या पिछाडीत सावधगिरी बाळगावी. रुहुल्लाखान याने हमीदुद्दीनखान बहादुर, दियानतखान, फायारखान (?) वगैरे बरोबर देण्याच्या फौजेचा तपशील (तूमार) तयार करुन आणावा.'

रुहुल्लाखान याने बादशहांना कळविले की 'मुहंमद अमीनखान बहादुरची विनंती आहे की त्याचे व ख्वाजाखान याचे कबिले यांना बहादुरगडच्या किल्ल्यात ठेवण्याची परवानगी असावी. कबिल्यांच्या वास्तव्यासाठी किल्ल्यात एक वाडा (हवेली) देण्यासंबंधी किल्लेदार फखरुद्दीनखान याला आज्ञा करण्यात यावी.

विनंती मान्य करण्यात आली.

छावणीचा कोतवाल सरबराहखान याने कळविले की, 'छावणीतील माणसे आपापल्या कुटुंबियांना (बरोबर) आणण्यासाठी गर्दी आणि धांदल करीत आहेत. त्यांना आवरण्यास किंवा निर्बंधात ठेवण्यास जागा नाही. काय आज्ञा?' बादशहांनी आज्ञा केली की 'त्यांना (छावणीतील माणसांना) अडथळा करु नका.'

बादशहांनी आज्ञा केली की 'हमीदुद्दीनखान बहादुर व सरबराहखान यांनी छावणीभोवती फिरुन वस्तुस्थिती पाहून वृत्तांत कळवावा.'

तीन डिसेंबर – मुगलखान याजकडे बादशाही छावणीपासून औरंगाबाद पर्यंतच्या मार्गाच्या रक्षणाचे काम सोपविले होते. त्याने पुढीलप्रमाणे विनंती पत्र पाठविले–

'माझ्यापाशी सिद्दीमिफताहखान व अहमदबेग यांना त्यांच्या पथकांसहित तैनात करण्यात आले होते. त्यांची वागणूक अतिशय विचित्र आहे सिद्दीमिफताहखानाला ताबडतोब हुजुरात बोलावून घेण्यात यावे.'

बादशहांनी विनंती मान्य केली. सिद्दीमिफताहखान याला एक हजार जात व चारशे स्वार अशी मन्सब होती. त्याला हुजुरात आणण्यासाठी मीर मुहंमद बेग गुर्जबर्दार याची नेमणूक करण्यात आली.

चार डिसेंबर– बहादुरगडचा किल्लेदार व फौजदार फखरुद्दीनखान याला बहादुरगडकडे परत जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

भास्करराव हरकारा याला अडीचशे जात अशी मन्सब होती. ती पन्नासने कमी करण्यात आली. हरकारे हे मराठ्यांच्या हालचालीच्या नीट खबरा देत नाहीत अशी त्यांच्या विरुध्द तक्रार करण्यात आली होती

बादशहाना कळविण्यात आले की चोरांच्या (मराठ्यांच्या) फौजा छावणी भोवती घिरट्या घालीत आहेत. बादशहांनी सरफराजखान यास आज्ञा केली की 'तयारीत रहा. चोरांच्या (मराठ्यांच्या) पारिपत्यासाठी मी तुम्हास पाठवीत आहे.' नुस्रतजंग (जुल्फिकारखान मीरबख्शी) याचा नायब मतलबखान याला बादशहांनी आज्ञा केली की 'शेख मिनहाज वगैरे सरदारांची पथके एकत्र करा. एकंदर सैन्य चार हजार तीनशे बहात्तर स्वारांचे राहील असा तपशील (तूमार)

तयार करा. हे सैन्य सरफराजखाना बरोबर राहील. दोनशे प्यादे, पाच शुतरनाळ दोनशे गरनाळ (लहान तोफा अगर मोठ्या बंदुका), वीस मण सरब (शिसे). दहा मण बारुद (बंदुकीची दारु) इतका सरंजाम सरफराजखाना बरोबर दिला जावा.

मरहूम अमीरखान (काबुलचा माजी सुभेदार) याचा मुलगा मीरखान मरहूम बहरामंदखान याच्या मुलीशी लग्न ठरले. त्याला औरंगाबादेस जाण्यास निरोप देण्यात आला. मुहंमद तकीखान यालाही बहरामंद खानाच्या पत्नीबरोबर औरंगाबादेस जाण्यास निरोप देण्यात आला.

बादशहांनी आज्ञा केली की छावणी भोवती गस्त घालून रात्रीच्या वेळी खबरदारी बाळगण्याची व्यवस्था पुढीलप्रमाणे व्हावी–

१) ख्वाजा अब्दुल्लतीफ व त्याच्याबरोबर सिवादतखान व ऐवजबेग इत्यादींची पथके, पाच गुर्जबर्दार हे त्यांच्यापाशी तैनात राहतील.

२) उजवी फळी सांभाळण्यासाठी शहाजादा कामबख्श याची पथके, फकीर मुहंमद अईजखाजी, फखरुद्दीन वगैरे पांच गुर्जबर्दार तैनात राहतील.

बादशहांनी बांकरखान याची सरबराहखान याच्या फौजेचा बख्शी व वाकनीस म्हणून नेमणूक केली. त्याच्या बरोबर हैद्राबादचे शंभर स्वार तैनात करण्यात यावेत अशी आज्ञा झाली.

खाने आलम हा शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेत तैनात होता. तो बादशहांना भेटण्यास येत आहे असे कळले.' बादशहा म्हणाले 'तो औरंगाबादेस जायला निघाला नसेल तर येऊ द्या.'

आलमसिंग वारला. त्याचा मुलगा पदमसिंग याला आनंदगडची (?) किल्लेदारी देण्यात आली.

बादशहांनी जुल्फिकारखान बहादुर व मुगलखान यांनी हुजुरात आपापल्या फौजांसहित यावे अशी आज्ञा केली.

पाच डिसेंबर– जलालुद्दीनखान याची नेमणूक मुहंमदाबाद बीदरचा किल्लेदार व फौजदार म्हणून झाली होती. त्याने बादशहाला पुढीलप्रमाणे बिनंती पत्र लिहिले–

'माझा मोठा भाऊ सय्यद नूरखान हा दहीवाडी (सातारा जिल्हा) चा ठाणेदार होता. त्याला तेथून बदलण्यात आले आहे. तो आजारी असून औषधोपचारासाठी तो सध्या बीड येथे गेला आहे. त्याची तैनाती बुऱ्हाणपूरचा सुभेदार नजाबत.

खान याजपाशी करण्यात यावी म्हणजे तो आपल्या आजारावर इलाज करुन घेऊ शकेल.'

त्याला (सय्यद नूरखान) सहाशे जात व दोनशे स्वार अशी मन्सब होती. बादशहांनी नूरखानाला मन्सबीवरुन बडतर्फ केले

बादशहांनी आज्ञा केली की मीर आतिश दारूगोळयाचा व तोफखान्याचा प्रमुख) तरबियतखान याने पांचशे बर्कंदाज (बंदुकची) भरती करावे. त्यांना सरकारातून दरमहा पस्तीस रुपये पगार देण्यात यावा. तरबियतखानाने यादी प्रमाणित (सर्टिफाय) करून देत जावी अशी आज्ञा देण्यात आली.

तुर्कताजखानाच्या पथकाला सहा महिने पगार बाकीची रक्कम आणि मदत म्हणून दहा घोडेही देण्यात यावे अशी आज्ञा झाली.

अमानुल्लाखान व मुनीमखान याना, बादशाही छावणीपासून बहादुरगडापर्यंतच्या भागात सावधगिरी बाळगावी अशी आज्ञा करण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की मरहमतखान, जवाहरखान व मुहंमदनूर अमीरखानी यांनी जनाना स्वारीच्याबरोबर राहावे मुहंमद दाराब व मीर नुरुद्दीन हे लष्करच्या इल्तमश (मध्यापुढची आघाडी) मध्ये राहावे.

मुनीमखान याने कचेरीत यावे अशी आज्ञा करण्यात आली. तो सशस्त्र असा येऊन बादशहांना भेटला. त्याला नुस्रतखानाच्या वर उजवीकडे उभे करण्यात आले.

बादशहांना कळविण्यात आले ते असे 'चिकोडीचा जमीनदार आणि देवमना (?) चा मुलगा माना (?) हा बहिर्जी (हिंदुराव घोरपडे) याला मिळाला असून दोघांनी पाच हजार सैन्यासहित हुक्केरीला वेढा घातला आहे.' बादशहांनी आज्ञा केली की बंडखोरांचे पारिपत्य करावे म्हणून रुहुल्लाखानाने पुढील इसमांना आज्ञापत्रे पाठवावी-

१) चीनकुलीजखान बहादुर-सुभेदार विजापूर
२) तेथील फौजदार-जमशीदखान
३) शमशेरखान, फौजदार-गदग
४) कोल्हापूरचा फौजदार-इखलासखान
५) फतेहुल्लाखान बहादुर
६) बेळगावचा फौजदार-सैफखान

मुगलखान याने काफिला (प्रवाशांचा समूह) व खजिना लवकर आणावा म्हणून एक गुर्जबर्दार नेमण्यात यावा अशी आज्ञा झाली.

सय्यद नूरखान (दहीवाडीचा ठाणेदार) याची मन्सब काढून घेण्यात आली. त्याला पाच हजार रुपयांचे वर्षासन देण्याचे बादशहांनी ठरविले.

शिष्टाचार खात्याचा प्रमुख (मीर तुजक) अमानुल्लाखान याला मुनीमखानाच्या ऐवजी खानजहानच्या पथकांचा अधिकारी (दारोगा) म्हणून नेमण्यात आले

चाळीसगाव (खानदेश) वर सय्यद अबू मुहंमद याचा मुलगा सय्यद अली हा फौजदार होता. त्याला तेथून बदलण्यात येऊन त्याच्या जागी सय्यद अलीचा मुलगा सय्यद लुत्फअली याची नेमणूक करण्यात आली.

सरबलंदखान याला अद्याप जहागीर मिळाली नव्हती. त्याला फतेहुल्लाखानाच्या फौजेत तैनात करण्यात आले होते. जहागीर मिळेपर्यंत त्याने हुजुरात रहावे अशी आज्ञा करण्यात आली.

अली आलम याला सरफराजखानापाशी तैनात करण्यात आले. त्याला एक हजार जात व चारशे स्वार अशी मन्सब होती.

सावळदासचा मुलगा व अटलसिंग (?) याचा भाऊ रुपसिंग याला बारा मावळची ठाणेदारी देण्यात आली. त्याला दिडशे जात व पाचशे स्वार अशी मन्सब होती. तीत पन्नास जात व पंचाहत्तर स्वार अशी वाढ करण्यात आली.

बहादुरगडचा बख्शी व वाकनीस मुहंमद हुसेन याला तेथील बागांचा व्यवस्थापक म्हणून नेमण्यात येऊन त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. त्याला बहादुरकडे जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

पिछाडी (चंदावल) चा अधिकारी तरबियतखान हा येऊन बादशहांना भेटला. बादशहा त्याला म्हणाले की 'आमचा मुक्काम होईल त्या दिवशी चौकी पहारा तुमचा राहील. आम्ही कूच करू त्यावेळी तुम्ही चंदावल (पिछाडी) सांभाळावे.'

सखरलना (विशाळगड) चा किल्लेदार व फौजदार जाबताखान याच्याकडे पूर्वी दाभोळची ठाणेदारी व फौजदारी होती. तेथून बदलल्यामुळे त्याची मन्सब त्या प्रमाणात कमी करण्यात आली.

सहा डिसेंबर– बादशहांनी सरफराजखानाला पुढीलप्रमाणे आज्ञा केली – 'बादशाही खजिना औरंगाबादेहून येत आहे. तुम्ही पथके (फौज) बरोबर घेऊन जा आणि खजिना खबरदारीने हुजुरात घेऊन या.' मार्गातील फौजदार व ठाणेदार यांनी आपापल्या इलाख्यातून

खजिना सुरक्षितपणे पार करावा अशा अर्थाची आज्ञापत्रे त्यना पाठविण्यात यावी म्हणून बादशहांनी फर्माविले.

पुढील मंडळींना डाळिंबाच्या करंड्या पाठविण्यात आल्या- १) शहाजादा बेदारबख्त (औरंगाबाद येथे), २) जीनतुन्निसाबेगम ३, उदेपूरी महल ४) उम्द-तुल्मुल्कखान फीरोजजंग ५) खान बहादुर नुस्रतजंग (जुल्फिकारखान)

खजिना आणण्यासाठी म्हणून बादशहांनी सरफराजखानाला ससैन्य अहमदा नगरच्या दिशेने जाण्यासाठी निरोप दिला. मुद्दाम अधिकारी (सजावली) नेमून सरफराजखानाला रवाना करावे अशी आज्ञा मीरतुजक (शिष्टाचार, प्रोटो-कॉल, प्रमुख) मतलबखान याला देण्यात आली.

सात डिसेंबर– सकाळी फराशखान्याचा मुश्रफ (अधिकारी) मुहंमद हादी याला बादशहांनी आज्ञा केली की, 'पेशखाना (पुढील मुक्कामासाठी पाठवायचे तंबू इत्यादी) पुढे रवाना करा' पूर्वी हैद्राबादचे सैनिक (कौलार) पेशखान्याबरोबर जात पण त्यांना सरफराजखानापाशी तैनात करण्यात आले आहे असे रुहुल्लाखानाने कळविले. यावर बादशहांनी आज्ञा केली की जल्लू (बादशहाच्या हुजुरातील) च्या नोकरांनी पेशखान्याबरोबर मतलबखानाच्या तैनातीत म्हणून जावे.

बहादुरगडच्या बागांचा व्यवस्थापक म्हणून अब्दुल्लाबेग याची नेमणूक करण्यात आली. बादशाही छावणीपासून आज्जमगड पुणे येथेपर्यन्तच्या मजला ठरविण्यासाठी उस्मानखान करावल व मुहंमद गुल खुशमंजिल (मजला ठरविणारा अधिकारी) हे गेले होते. त्यांनी येऊन कळविले की– 'बादशाही छावणीपासून आज्जमगड (पुणे) पर्यंतचे अंतर एकवीस कोसांचे असून त्याच्या आठ मजला होतील.'

मीरतुजक नुस्रतखान याने कळविले की 'आज्ञेप्रमाणे मी सरफराज खानाला चाभार गोंद्याच्या ठाण्यापर्यंत पोहोचवून आलो.'

छावणीतील अरबांनी दरबारात मुद्दा मांडला की प्रत्येक वर्षी बाद शहाच्या भाग्यासाठी (ओवाळून टाकणे. तसद्दुक) आम्हाला खैरात मिळत असे. यंदाही मिळावी. बादशहांनी आज्ञा केली ' की त्यांनी हाजीकडे जावे.'

बऱ्हाणपूर (खानदेश) चा सुभेदार नजाबतखान उर्फ बहखरखान याने पुढीलप्रमाणे विनंती लिहून पाठविली– ' सुल्तानपूर नंदुरबार येथील बख्शी व वाकनीस अब्दुल अजीज याला तेथून बदलण्यात आले आहे. त्याला माझ्यापाशी

तैनात करण्यात यावे.' बादशहांनी विनंती मान्य केली आणि आज्ञा केली की 'अब्दुल् अजीजला हुजुरात आणण्यासाठी गुर्जबर्दार गेला आहे. त्याने परत यावे.'

पवनार (वर्धा जिल्हा) वगैरेचा फौजदार मुहमद मुरादखान याला कळंब (यवतमाळ जिल्हा) ची (पण) फौजदारी देण्यात आली. त्याला नऊशे जात व आठशे स्वार अशी मन्सब होती. तीत दोनशे स्वार दुअोडी होते. त्याच्या मन्सबीत शंभर स्वारांची वाढ करण्यात आली.

(मुरादखान हा सुप्रसिद्ध इतिहासकार खाफीखान याचा जीवश्च कंठश्च मित्र आणि आश्रयदाता.)

मरहूम बख्शी बहरामंदखान याच्या मुलीचा मुलगा मुहंमद तकी हा (आपल्या मा.शीच्या लग्नासाठी) औरंगाबादेस चालला होता. त्याने विनंतीपत्र पाठविले ते मतलबखानाने बादशहासमोर ठेवले. त्यांतील विनंती अशी–

१) तेथील सुभेदार शहाजादा बेदारबख्त याना मी भेटू काय ? परवानगी आहे काय ? बादशहाची आज्ञा भेटावे.

२) माझ्या वडिलाचा अधिकारी अरसलानखान याला माझ्या तैनातीत देण्यात यावे. विनंती मान्य झाली. मिफताहुलफुतूह (कोथळ?)चा किल्लेदार व फौजदार व मरहूम लोधीखान याचा नातू जमाल याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

आठ डिसेंबर – आज बादशहा गढोदिलेरखान या मुक्कामावरुन निघाले. ते तख्तेखा-वर स्वार होते. त्यांनी घांड नदी ओलांडली आणि एकंदर अडीच कोसाचा प्रवास करुन ते कांडली (तांदळी, शिरुर तालुका, पुणे जिल्हा) येथे मुक्कामाला आले.

बादशहांनी काल रात्री आज्ञा केली की 'सरकारातील हत्ती तळावर (ब्रम्ह-पुरी) पाठवायचे होते. तसे न करता त्यांना तूर्त बहादुरगडावर ठेवण्यात यावे. उम्द-तुल्मुल्क खान फीरोजजंग याचे पथक बहादुरगडला येईल ते हत्तीना घेऊन तळावर (ब्रम्हपुरी) जाईल.'

मतलबखानाने बादशहांना विनंती केली की 'उद्या कूच करण्यासंबंधी काय आज्ञा?' बादशहा म्हणाले 'येथे दोन मुक्काम करु.' पेशखाना मागच्या मुक्कामा-वरुन आला आहे. पुढे पाठविण्यासंबंधी काय आज्ञा म्हणून विचारता बादशहा म्हणाले 'उद्या मुक्काम आहे. पेशखाना उभा राहू द्या.'

सखरलना उर्फ खेळणा (विशाळगड) येथील किल्लेदार व फौजदार जाबताखान याला बदलल्यामुळे त्याची मन्सब तीस स्वारांनी कमी करण्यात आली.

शेख अब्दुल्कादर मुस्ताफी (हिशेब खात्याचा अधिकारी) हा सुभे दख्खनच्या हिशेब खात्याचा, सुभ्याच्या उत्पन्नाचा, बाकीचा हिशेब ठेवणारा बादशहांना येऊन भेटला.

बादशाही हत्ती व बारबरदारीचा सरंजाम पोहोचविण्यासाठी खान फीरोज जंग याने खंजरखान याजबरोबर चार हजार स्वार, पायदळ व दोन तोफा पाठविल्या असून ते दोन तीन दिवसात येऊन पोहोचतील असे हरकाऱ्यांकडून कळले

नबाब जीनतुन्निसा बेगम हिने (ब्रम्हपुरीहून) विनंती लिहून पाठविली की 'आम्ही येथून औरंगाबादेस जाण्यास निघू, त्यावेळी येथील तळावरील प्रमुख खान फीरोजजंग याला एखादे बक्षीस द्यावे असा माझा विचार आहे, तर पांच हजार रुपये किंमतीचा एक रत्नखचित खंजीर पाठवावा.' बादशहांनी विनंती मान्य केली. त्यांनी आज्ञा केली की मागविलेला खंजीर, जीनतुन्निसाबेगमचा मीरसामान (कारभारी) मीर हिदायतुल्ला याजपाशी देण्यात यावा. जीनतुन्निसाबेगम आणि उदेपुरी महल यांना देण्यासाठी म्हणून अलंकार हे इनायतुल्लाचा (औरंगजेबाचा मुख्य लेखक व अहकामे आलमगीरी या औरंगजेब पत्रांचा संग्राहक) मुलगा हिदायतुल्ला याजपाशी देण्यात आले

बादशहा हे हमीदुद्दीनखान बहादुर याला म्हणाले 'तुम्ही स्वतःचा बख्शी मीर अब्दुस्सलाम याच्याबरोबर तुमची पथके देऊन पेशखान्याच्या संरक्षणासाठी पाठवा.

हैद्राबादी कौलार (सैनिक) यांचा मुश्रफ मुहंमद बाकर याला सरफराजखानाच्या फौजेचा बख्शी व वाकनीस म्हणून नेमण्यात आले.

ख्वाजाखान हा मराठयांच्या कैदेत सापडला होता. तरीही त्याची जहागीर चालू राहील अशी बादशहांनी आज्ञा केली.

कबचाकखान याने पुढीलप्रमाणे विनंती केली– १) माझ्या पथकातील अनेक मन्सबदारांपाशी घोडे नाहीत २) सरकारातून पगार येण्याची बाकी बरीच आहे त्यामुळे ते (मन्सबदार) फार त्रस्त आहेत.

बादशहांनी आज्ञा केली की 'दहा घोडे देण्यात यावेत आणि तूर्त (अलल्-हिसाब, ऑन अकौंट) तीन महिन्याचा पगार देण्यात यावा.

जीनतुन्निसाबेगमचा मीरसामान मीर हिदायतुल्ला याच्या मन्सबीत वाढ करण्यात येऊन त्याला तळाकडे (ब्रम्हपुरी) जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली– ' जुल्फिकारखान बहादूर हा काल बारामतीला पोहोचला. तेथून गनिमांच्या पारिपत्यासाठी राजगड वगैरे किल्ल्यांकडे जाण्याचा त्याचा बेत दिसतो.'

मुहंमद सईद गुर्जबर्दार हा दिल्लीचा सुभेदार मुहंमद यारखान व माळव्याचा सुभेदार शायस्ता खान यांच्याकडे देण्यासाठी म्हणून नगारे व खिलतीची वस्त्रे घेऊन चालला होता. आग्र्याच्या किल्ल्यात नऊशे बर्कंदाज होते. त्यांना हुजुरात येताना गुर्जबर्दाराने बरोबर आणावे यासाठी आग्र्याचा किल्लेदार बाकीखान याला तरबियतखानाच्या शिक्क्याने आज्ञापत्र जावे अशी आज्ञा करण्यात आली.

दहा डिसेंबर– मतलबखानाचा भाऊ मुहंमद अहसन याला आपल्या आईला औरंगाबादेस पोहोचविण्याची परवानगी देण्यात आली.

जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग याला आज्ञा पाठविण्यात आली की ' जुल्फिकारखान याने बादशाही सैन्याच्या पुढे पाच कोसावर कूच करीत राहावे

अकरा डिसेंबर– घोडनदीच्या काठावर मुक्काम. पेशखाना पुढे पाठविण्यात यावा अशी आज्ञा झाली.

बहरामंदखानाच्या विधवेने विनंती लिहून पाठविली की 'मी वृध्द आहे माझ्या बरोबर संरक्षक पथक देण्यात यावे.' बादशहांनी आज्ञा केली की ' हत्तीखाना तळावर (ब्रम्हपुरीच्या) पाठविण्यात येत आहे त्याबरोबर तिने ब्रम्हपुरीला जावे तेथून तिने जीनतुन्निसा बेगमच्या सोबतीने औरंगाबादेस जावे.'

बारा डिसेंबर– मरहूम बहरामंदखान याच्या पुढील चाकरांना मन्सबी देण्यात आल्या– १) ख्वाजा मातबर २) ख्वाजा मुबारक ३) मदार.

बादशहाजादा मुहंमद आज्जम शहा व मुल्तानचा सुभेदार मुहंमद मुइजुद्दीन बहादुर यांची पत्रे बादशहाकडे आली.

उम्दतुल्मूल्क गाजिउद्दीन खान बहादुर फीरोजजंग याने बादशहाकडे मुहंमद अफजल नावाचा दरवेश (साधु) पाठविला होता. त्याने येऊन बादशहाची भेट घेतली. काल रात्री निरोप घेण्यासाठी म्हणून तो मशिदीत बादशहाकडे आला. बादशहांनी त्याला दोनशे बिघ जमीन, दहा अश्रफ्या, दहा होन व आठ चरन (वस्त्रे ?) देऊन त्याला निरोप दिला.

मरहूम वजीरखान याचा मुलगा सय्यद अली याला उम्दतुल्मुल्क गाजिउद्दीनखान बहादुर फीरोजजंग याच्या सैन्याचा बख्शी व वाकनीस म्हणून नेमण्यात आले.

गुलाबसिंगाचा मुलगा आणि दौंडचा ठाणेदार मानसिंग याला खिलतीची वस्त्रे देण्यात येऊन त्याला दौंडच्या ठाण्याकडे जाण्यासाठी निरोप देण्यात आला. कानकगाव (?) चा ठाणेदार लखमाजी हा बादशहांना भेटला. त्याला एक घोडा देण्यात आला. वजीरबेगचा मुलगा रहबरबेग याला कर्नाटकात सैनिकांच्या खात्याचा प्रमुख (दारोगा) म्हणून नेमण्यात आले.

शेखमिखाचा मुलगा मुहंमद जफर याला बहादुरगडचा किल्लेदार व फौजदार फखरुद्दीनखान याचा नायब म्हणून नेमण्यात आले.

तळ कोंकणचा रहिवासी काजी महमूद हा एक हजार जात व नऊशे स्वार अशी मन्सब बाळगून होता. तो मरण पावला. त्याचा मुलगा मीर अहसन व नातेवाईक हुसेनचा मुलगा सय्यद अहमद, मुहंमद इब्राहीम, मुहंमद अफजल, सय्यद अलीखान याचा भाऊ मदार, ख्वाजा नदीम इत्यादींच्या मन्सबी वाढविण्यात आल्या.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले–

'बख्शी उल्मुल्क जुल्फिकारखान बहादुर नुस्रतजंग हा आज्ञेप्रमाणे काल बहादुरगडला आला. त्याची बहीण ही बहरामंदखानाची विधवा. ती बहादुरगडला होती. जुल्फिकारखान तिला भेटला यानंतर तो सुप्याकडे रवाना झाला.

गाजिउद्दीनखान बहादुर फीरोजजंग याने बादशहांना पुढीलप्रमाणे लिहिले– 'माहोल (मोहोळ, सोलापूर जिल्हा) वर मरहूम शम्सुद्दीनखान याचा भाचा आणि मुहंमद इब्राहीमचा मुलगा मुहंमद मीर हा फौजदार असून तो शिपाई गडी व कामाचा माणूस आहे. त्याने बंदोबस्तही चांगला राखला आहे. इस्लामपुरी उर्फ ब्रह्मपुरी येथील किल्लेदार मुरीदखान याची तेथून बदली झाली आहे. तेथे मुहंमद मीरची नेमणूक झाली तर तो काम चांगले करील त्याचा मुलगा मोहोळचे काम पाहील. त्याला हुजुरात पाठवीत आहे. विनंती मान्य होईल अशी आशा आहे.'

बादशहांनी आज्ञा केली की रुहुल्लाखान याने मुहंमद मीरला माझ्यासमोर आणावे.

तेरा डिसेंबर– आज दिवसाच्या दोन घटका झाल्या असता बादशहा तख्तेखांवर स्वार झाले. मौजे कांडली (तांदळी) येथून ते रवाना झाले. तीन कोसाला अर्धा पाव कोस कमी असा प्रवास करून ते शिरसगाव (तालुका शिरुर, जिल्हा पुणे) येथे मुक्कामाला आले. मतलबखानाने विचारल्यावर उद्या येथून कूच करु असे ते म्हणाले-

खान फीरोजजंग याने पाठविलेल्या तोफा बरोबर घेऊन संजरखान व रिआयतखान हे तळावरुन (ब्रह्मपुरी) आले होते. ते बादशहांना भेटले

शहाजादा बेदारबख्त याच्या मजकुरावरून पुढीलप्रमाणे विनंती करण्यात आली– 'रामराय हरकारा याचा नातू गेवराय (केशवराय ?) हा आपल्या बापाचा नायब म्हणून औरंगाबादेत तैनात आहे. आणखी एक हरकारा ठाकुररावचा गुमास्ता हा पण शहाजाद्यापाशी तैनात आहे दोन दोन हरकारे असल्यामुळे काम नासते.' ही विनंती यारअलीबेग याने केली यावर शहाजाद्याचा बक्षी एतिमादखान याला लिहून ठाकुररावच्या गुमाश्त्याला काढून टाकावे अशी आज्ञा झाली.

बहादुरगडचा किल्लेदार व फौजदार फखरुद्दीनखान याचा नायब शेख मुहंमद मुजफ्फर याला दीडशे जात व वीस स्वार अशी मन्सब देण्यात आली.

मरहूम अब्दुर्रहीमखान याचा मुलगा मुहंमद याह्या याने विनंती लिहून पाठविली की 'मी आजारी आहे. मला रजा मिळाली तर मी औरंगाबादेस जाऊन उपचार करुन घेईन.' परवानगी देण्यात आली.

हत्तीखान्याचा करोडी (अधिकारी) मिर्जाबेग याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. त्याला बरोबर हत्तीखाना देऊन औरंगाबादेस पाठविण्यात आले.

मरहूम खाने आलम याचा मुलगा व मलकापूरहून बदललेला फौजदार मुहंमद ताहिर याची मन्सब वाढविण्यात आली.

कल्याण भिवंडी येथे तैनात असलेल्या हरकाऱ्याने लिहून कळविले की, 'येथे अतिशय पाऊस पडला. वारा वादळी होता. समुद्र अमर्याद खवळला होता. फिरंग्यांची व इंग्रजांची साठ जहाजे बुडाली. बागांबागांतून नारळी पोफळींची अनेक झाडे उखडून पडली.'

बादशहा म्हणाले 'ईश्वराचा प्रताप आहे, कुद्रते इलाहीअस.'

जुल्फिकारखानाकडे बादशहांचे फर्मान घेऊन गेलेले दोन जासूद फर्मान पोहचवून जुल्फिकारखानाचे पत्र घेऊन आले. त्याच्याच फौजेत तैनात असलेला इस्माईलखान याचेही पत्र बादशहांच्या नजरेखालून गेले.

अहसनाबाद उर्फ गुलबर्गा येथील किल्लेदार व फौजदार इरादतखा (याचे आत्मचरित्र प्रसिध्द आहे) हा आज्ञेप्रमाणे गुलबर्ग्याच्या किल्ल्यात आपला नायब ठेवून हुजुरात आला होता. तो येऊन बादशहांना भेटला. गुलबर्ग्याचा सुप्रसिध्द साधु सय्यद मुहंमद गेसूदराज (ख्वाजा बंदेनवाज) याच्या समाधीचा प्रसाद म्हणून त्याने एक धनुष्य आणले होते ते बादशहांना दिले.

मरहूम अमीरखान याचा मुलगा मीरखान याने स्वतःच्या लग्नासाठी म्हणून औरंगाबादेस जाण्यास निरोप घेतला होता त्याने बहादुरगडाहून एक हत्ती बादशहास नजर (पेशकश) म्हणून पाठविला. तो बादशहांनी नजरेखालून घातला. बादशहांनी नजर माफ केली. (हत्ती परत केला.)

जुल्फिकारखान याच्या नावे आज्ञापत्र रवाना करण्यात आले.

चौदा डिसेंबर – आज बादशहा सकाळी तख्तेखांवर बसून सरसगावच्या मुक्कामाहून निघाले. तीन कोसाचा प्रवास करुन ते नाव्हेर (तालुके शिरुर, पुणे जिल्हा) या गावाजवळ मुक्कामाला आले (आणखी एके ठिकाणी 'धाहर' असे लिहिले आहे)

सखरलना (विशाळगड) चा किल्लेदार जाबताखान याने किल्लेदारीचा राजीनामा दिला होता. त्यावेळी बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा दिली होती – 'जाबताखान जर कबूल असेल तर अवधूतसिंग बुंदेला (ओच्छर्याचा राजा उदितसिंग) हा किल्ल्यात आहे त्याला जाबताखानाच्या जागी किल्ल्यावर ठेवावे आणि फतेहुल्लाखानाने जाबताखानाला हुजरात आणावे' पण आता बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली 'इनायतुल्लाखान याने जाबताखानाला पुढील प्रमाणे पत्र लिहावे –

'सखरलना (विशाळगड) चे किल्लेदार व फौजदार म्हणून जाबताखानानेच राहावे. त्याने खात्री बाळगावी, त्याने किल्ल्याच्या बंदोबस्ताविषयी सावधगिरी बाळगावी. फतेहुल्लाखान याला लिहिण्यात यावे की 'तुम्ही एक हजार अश्वपया बरोबर नेल्या आहेत. त्या तुम्ही खर्चासाठी मदत म्हणून जाबताखानाला द्या.'

काल बादशहांना कळविण्यात आले ते असे–

'बंडखोरांचे (मराठ्यांचे) वीस हजार स्वार सुप्याच्या (पुणे असेहि वाचन होऊ शकेल.) भागात जमले आहेत' दिवसाचे चार घटिका राहिल्या असता बादशहांनी आज्ञा केली की हमीदुद्दीनखान बहादुर यांनी आघाडीवर रहावे. मुहंमद अमीनखान बहादूर यांनी चंदावल म्हणजे पिछाडीला रहावे. पूर्ण सावधतेने सैन्य तयार असावे अशी आज्ञा करण्यात आली.

मतलबखानाने विनंती केली की उद्याच्या प्रवासात वाटेत घाट आहे. बादशहा 'म्हणाले आम्ही उद्या येथेच मुक्काम करु. घाटाची वाट नीट करण्यात यावी.'

शिवनेरीचा किल्लेदार अबुल्खैरखान याने पुढीलप्रमाणे विनंती अर्ज लिहून पाठविला.

घोड्यांना डाग देणे व स्वारांच्या यादीची तपासणी व दुरुस्ती (तसीह) या अटीची माफी मिळावी. मान्यता देण्यात आली. अबुल्खैरखान याला एक हजार जात, तीनशे स्वार, दुघोडी पन्नास, अटीवर मश्रुत तीनशे अशी मन्सब होती.

दुसरी विनंती अशी की सहकारी हुसेन अली आणि मुले नज्मुद्दीन व अब्दु-सतार यांच्यावर कृपा व्हावी. त्यांना मन्सबी देण्यात अगर वाढविण्यात आल्या.

मुगलखान याच्याकडे बहादुरगड ते औरंगाबाद या मार्गाचे रक्षण करण्याचे काम होते. चांभार गोंद्याच्या ठाण्यावर इबादुल्लाखान हा ठाणेदार होता. त्याला बदलण्यात आले. ते ठाणेपण मुगलखानाला देण्यात आले.. मुगलखानाला दीड हजार जात व सहाशे स्वार अशी मन्सब होती. तीत दोनशे स्वारांची वाढ करण्यात आली.

पंधरा डिसेंबर– नाव्हरे गावाजवळ मुक्काम बादशहांनी सकाळी फराशखान्याचा मुश्रफ मुहंमद हादी याला आज्ञा केली की ' पेशखाना पुढील मजलेवर धाडावा.'

खान फीरोजजंग याच्या फौजेत तैनात असलेले खुशखबरखान, रिआयतखान मिर्जाबेग इत्यादी माणसे पथके घेऊन बादशाही हत्ती तळावर ब्रम्हपुरी) घेऊन जाण्यासाठी म्हणून आली होती. त्यांना निरोप देण्यात आला. त्यांना बक्षिसे देण्यात आली.

पुढील मंडळी खजिना घेऊन आली होती. ती बादशहांना भेटली.– १) सरफराजखान विजापूरी व त्याची मुले २) चांभार गोंद्याचा ठाणेदार व बहादुर गड ते औरंगाबाद या मार्गाचा रक्षक ३) अहमदनगरचा माजी रक्षक (हारिस, किल्लेदार नव्हे) सिद्दी मिफताहखान, ४) मन्सूरखानाचा मुलगा मुहंमद मुजफ्फर

खानदेशचा माजी सुभेदार सद्रुद्दीन मुहंमदखान हा येऊन बादशहांना भेटला. अब्दुर्रहमानखानाच्या मृत्यूने तिसऱ्या बख्शीची जागा रिकामी झाली होती. तिच्यावर सद्रुद्दीनची नेमणूक करण्यात आली. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली. त्याला एक हजार जात व तीनशे स्वार अशी मन्सब आहे.

मुफख्खरखान मरहूम याचा मुलगा व नुस्रतजंग जुल्फिकारखान याच्या फौजेचा बख्शी व वाकनीस मीर जैनुद्दीन याला त्या जागेवरून बदलण्यात आले होते. त्याला हुजुरात बोलावण्यात आले.

सुभे वऱ्हाडचा सवानेहनिगार (घटनांच्या बातम्या कळविणारा) मुहंमद इब्राहीम हा मरण पावला असे बादशहांना कळविण्यात आले. तो बरेच दिवसांपासून आजारी होती.

रामगीर (करीमनगर जिल्हा, आंध्र) चा परगणा अलीमर्दानखानाच्या जहागिरीत व फौजदारीत देण्यात आला होता. त्यामुळे रामगीर परगण्याचा अमीन व फौजदार शेख गुलाम अहंमद याला इंदूर (आंध्र प्रदेश) व बेमकल येथे अमीन व फौजदार म्हणून नेमण्यात आले ही नेमणूक तेथील पूर्वीचा अधिकारी इनायतुल्ला याच्या मृत्युमुळे रिकामी झाली होती.

गढनमून्याचा ठाणेदार अटलसिंग आणि त्याचा मुलगा हे खजिन्याबरोबर आले होते, ते बादशहांना भेटले.

तिसरा (सियम) बख्शी मिर्जा सद्रुद्दीन मुहंमदखान याचा पेशदस्त (सचिव. पर्सनल कारकून) शेख अलीम हा होता. त्याला बदलण्यात आले. त्याच्या जागी शेख मिहरुल्ला उर्फ मिहरचंद (अफरातफरीच्या व भ्रष्टाचाराच्या आरोपातून वाचण्यासाठी हा मुसलमान झाला होता) याची नेमणूक करण्यात आली. त्याला दोनशे जात अशी मन्सब होती. तीत पाच स्वारांची भर घालण्यात आली. मिहरचंद उर्फ मिहरुल्ला यास एक शाल बक्षीस म्हणून देण्यात आली.

सोळा डिसेंबर– आज नाव्हरे येथील मुक्कामावरुन बादशहा निघाले. दोन कोस आणि अर्धापाव असा प्रवास करून ते घाटाच्या पलीकडे मुक्कामाला पोहोचले.

छावणीतून निघून बादशहा ओढयापाशी पोहोचले. तेथे ते नावेतून ओढा-पार झाले. ते ज्या गावाजवळ मुक्कामाला पोहोचले ते गाव म्हणजे दहिवाडी. (शिरुर तालुका, पुणे जिल्हा)

ख्वाजाखान याचा मुलगा खान ख्वाजा याला मन्सब देण्यात आली.

उद्या कूच करण्यासंबंधी काय आज्ञा म्हणून मतलबखानाने विचारता बादशहा म्हणाले ' आम्ही उद्या मुक्काम करणार. पेशखाना उभा राहू द्या.'

यापूर्वी बादशाही निवास्थानाभोवती चौक्या होत्या त्यावर पुढीलप्रमाणे इसम असत–१) पहिली चौकी जुम्लतुल्मुल्क अमीरुल उमरा (मुख्यप्रधान असद खान) २) दुसरी चौकी बख्शी उल्मुल्क रुहुल्लाखान ३) तिसरी चौकी तरबियत खान ४) चौथी चौकी हमीदुद्दीनखान बहादुर ५) पाचवी चौकी सियादत खान. बादशहांनी आज्ञा केली की तिसऱ्या चौकीवर सियादतखानाच्या ऐवजी मिर्जा सद्रुद्दीन मुहंमदखान बख्शी याने असावे. सियादतखानाचा समावेश रुहुल्ला-खानाच्या चौकीत व्हावा अशी आज्ञा झाली.

फतेहाबाद धारुर (बीड जिल्हा, मराठवाडा) चा किल्लेदार व फौजदार औरंगखान (उजबेगखान असे वाचन असावे) याने विनंती अर्ज पाठविला की

बादशाह काफरांविरुध्द (मराठ्यांविरुध्द) मोहीम करीत आहेत. हजरत व दौलत बरकुफार सवारी नमूदे. आज्ञा होत असल्यास मी माझ्या भावाला आपला नायब (प्रतिनिधी) म्हणून किल्ल्यात ठेवीन आणि अर्ध्या पथकासहित हुजुरात येऊन सेवा बजावीन. बादशहांनी विनंती मान्य केली आणि त्याचा किल्लेदारीचा हुद्दा त्याच्याकडे पूर्ववत बहाल ठेवला.

औरंगखान यास पूर्वीप्रमाणेच धारुर फतेहाबाद (मराठवाडा) चा किल्लेदार व फौजदार म्हणून बहाल ठेवण्यात आले. पन्हाळ्याचा ठाणेदार (किल्लेदार नव्हे) अमानुल्लाखान याला त्या जागेवर पूर्ववत बहाल ठेवण्यात आले.

बहादुरखान रोहिला याचा मुलगा अजीजखान रोहिला हा बादशहाजादा मुअज्जम (काबुलचा सुभेदार) याजकडून आला. चित्त्याच्या द्वारे शिकार करणारे चीताखान यांनी हरिणाची शिकार केली होती ती बादशहांना दाखविण्यात आली.

ख्वाजाखान (हा मराठ्यांच्या कैदेत होता) याचा मुलगा जान ख्वाजा याला मन्सब देण्यात आली

अहमदनगरहून सिद्दी मिफताहखान हा येऊन बादशहांना भेटला.

शिवनेरीचा किल्लेदार व फौजदार अबुल्खैर याने पुढीलप्रमाणे विनंती अर्ज पाठविला– 'बादशहाची आज्ञा होताच मी मौजे पीतळकुंड (पिंपरखेड, शिरुर तालुका येथे ?) पोहोचलो. मराठ्यांनी त्या ठिकाणी मुहंमद अमीनखान बहादुर यांना वेढा घातला होता. युद्ध झाले. शत्रूंपैकी काहीजण मारले गेले आणि काहींना जीवंत पकडण्यात आले. मी आता माझ्या तालुक्याकडे (जुन्नर) जात आहे.' त्याच्यासाठी एक तल्वार बक्षीस म्हणून देण्याची बादशहांनी आज्ञा केली.

सतरा डिसेंबर– घाटाच्या (कतल) पायथ्याशी मुक्काम. बहरामंदखानाची कबर बहादुरगड (पेडगाव) येथे होती. तिच्या आवश्यक देखरेखीसाठी औरंगाबाद सुभ्याच्या परगणे कठरा (?) येथील एक हजार वार्षिक उत्पन्नाचे एक खेडे लावून देण्यात आले.

गोविंदराव हरकाऱ्याचा मुलगा केशव हा औरंगाबादेस होता. त्याच्या त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

अमीरुल उमरा (असदखान, मुख्यमंत्री) याच्या पथकातील दोनशे माणसे खजिन्याकडे तैनात करण्यात यावीत अशी आज्ञा यार अलीबेग याला देण्यात आली.

खान फीरोजजंगाचा बख्शी मुहंमद जाफर याला शहाजादा बेदारबख्त याजकडे तैनात करण्यात आले. सुलेमानखान (पन्नी) याला दाऊदखान पन्नी याच्या तैनातीतून हुजुरात बोलावून घेण्यात आले. त्याला दीड हजार जात व आठशे स्वार अशी मन्सब होती.

अठरा डिसेंबर – बादशहांनी यापूर्वी आज्ञा केली होती की जीनतुन्निसाबेगम उदेपुरी महल वगैरेंचा तळ इस्लामपुरी उर्फ ब्रम्हपुरीहून औरंगाबादेस हलवावा. पण आता आज्ञा झाली की ती आज्ञा तूर्त समजली जावी. त्यांनी ब्रम्हपुरीलाच रहावे.

एकोणीस डिसेंबर – आज सकाळी बादशहा तख्तेखांवर बसून घाटाजवळच्या मुक्कामावरुन निघाले. पावणेतीन कोसाचा प्रवास करुन ते दुपार नंतर दोन घटका झाल्या असता ते नंदगाव (निमगाव, महाळुंगी) येथे मुक्कामाला आले.

बंगालचा सुभेदार मुहंमद अजीम याने काही सरंजाम पाठविला होता. तो घेऊन त्याचा अधिकारी मुहमद मिहदी हा आला होता. तो येऊन बादशहाला भेटला पुण्याचा ठाणेदार दर्लसिंग हा बादशहांना भेटला.

बादशहांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले – 'मुफाहीर (धामधूम उड विणारे म्हणजे मराठे) यांचे सैन्य धामधूम उडविण्यासाठी खटाव प्रांतात आणि बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) च्या परिसरात पसरले आहे. फतेहुल्लाखान बहादुर आलमगीरशाही हा खटाव प्रांतात पोहोचला आहे.'

हर्सुलच्या (?) किल्ल्यावर अबुल्खैरखान (शिवनेरीचा किल्लेदार) याचा नायब म्हणून सिकंदर चकत (?) याची नेमणूक करण्यात आली त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

बादशहांनी आज्ञा केली की किल्ले जगड (नाव नीट लागत नाही) प्रथम मराठयांच्या ताब्यातून सोडवून घेण्यात यावे.

गनिमांचे पारिपत्य करावे व सखरलना (विशाळगड) किल्ल्यातून तोफा आणाव्या यासाठी फतेहुल्लाखान बहादुर हा चालला आहे. वाटेत मराठयांशी त्याची युध्दे होत आहेत. फतेहुल्लाखानापाशी थोडे सैन्य आहे.

बादशहांनी आज्ञा केली की 'जुल्फिकारखान बहादूर व हामिदखान बहादुर (भावी निजामुल्मुल्काचा चुलता) यांनी फतेहुल्लाखानाच्या मदतीला जावे'

फाजिलखानाने विनंती केली की 'ब्न्हाणपूरचा सुभेदार नजाबतखान याने पुढीलप्रमाणे लिहून कळविले–

'मराठ्यांचे पंधरा हजार स्वारांचे सैन्य या भागात पसरले होते. त्याच्या पैकी दोन हजार स्वार बागलाणकडे गेले होते. मी माझ्या नायबाला पथके देवून त्यांच्या परिपत्यासाठी पाठविले माझ्या नायबाच्या पथकाबरोबर तिकडील तीन हजार भिल्ल होते. माझा नायब बागलाणात पोहोचला. त्याने शत्रुचा पराजय केला, शत्रु पळून गेले. यानंतर मी शत्रूच्या पंधरा हजार सैन्यावर चालून गेलो. बादशहाच्या भाग्याने शत्रूचे अनेक लोक मारले गेले. शत्रुचा पराजय झाला.'

बादशहा म्हणाले ' सेवा मान्य झाली. मजुरा झाला '

बादशहांनी उम्दतुलमुल्क खान फीरोजजंग बहादुर याला फर्मान पाठविले. त्याच्याकडे पोहोचविण्यासाठी म्हणून फर्मान मीर आज्जमुल्ला यसावल याजकडे देण्यात आले. (खान उम्दतुलमुल्क फीरोजजंग याचा भाऊ) हामिदखान बहादुर याने काफरांच्या पारिपत्यासाठी खटाव प्रांताकडे जावे आणि आजमुल्ला यसावल याने त्याल स्वत: खटाव प्रांताकडे पोहोचवावे अशी आज्ञा बादशहांनी केली.

पेशखाना मागच्या मुक्कामावरुन आला की पुढे पाठवावा अशी बादशहाची आज्ञा होती. पेशखाना आला बादशहा म्हणाले ' उभा राहू द्या. आम्ही उद्या येथेच मुक्काम करणार आहोत '

बीस डिसेंबर– निमगावजवळ मुक्काम. आज सकाळी आज्ञा झाली की पेशखाना पुढे पाठवावा. मरहूम बहादूरखान याचा मुलगा अजीजखान हा शहाजादा अजीम (अजीमुश्शान, बंगालचा सुभेदार) याजकडून आला होता. बादशहांनी चौकशी करता त्याचे वय साठ वर्षांचे असल्याचे कळले. त्याची मन्सब वाढवून बादशहांनी त्याला अडीच हजार जात व सतराशे स्वार अशी एकंदरीत मन्सब केली.

बादशहांनी जुल्फिकारखान मीरबक्षी याचा नायब मतलबखान याला निरोप देताना पुढीलप्रमाणे त्याला आज्ञा केली–

'तुम्ही आणि सैफुल्लाखान यांनी मोजणीच्या साखळ्या बरोबर घेऊन कोंडाणा किल्ल्याकडे जावे सैफुल्लाखानाच्या सहकार्याने तुम्ही मोर्च्यासाठी आणि आमच्या निवासस्थानासाठी जागा निवडाव्या तुम्ही जुल्फिकारखान बहादुर यास बेनीशहादुर्ग उर्फ पन्हाळगडकडे रवाना करावे आणि मग तुम्ही हुजुरात यावे.'

अजीजखान रोहिला (सुप्रसिद्ध सेनापती दिलेरखान याचा पुतण्या) हा मुहंमद मुअज्जम बहादुरशहा याच्या तैनातीतून आला त्याची मन्सब वाढविण्यात आली. सटवाजी डफळे हा मुगलखानाबरोबर होता. तो येऊन बादशहांना भेटला.

खान फीरोजजंग याला पुढील मजकुराचे फर्मान पाठविण्यात आले– 'तुम्ही आपले निम्मे सैन्य हामिदखान (भाऊ) याच्याबरोबर देऊन गनिमांच्या पारिपत्यासाठी बेनीशहादुर्ग (पन्हाळगड) च्या भागात पाठवावे.'

फर्मान नेणाऱ्या अजीमुल्लाला, फकीर मुहंमदने खंजरखान (खान फीरोजजंगाचा अधिकारी) याजकडे पोहोचविले.

गनिमांचे पारिपत्य करावे या अर्थाचे फर्मान जुल्फिकारखानासाठी तयार करण्यात आले. ते त्याच्याकडे पाठवावे अशी आज्ञा झाली.

धारुर फतेहाबाद (मराठवाडा, बीड जिल्हा) चा किल्लेदार व फौजदार औरंगखान (का उजबेगखान) याच्या मन्सबीत बदल करण्यात आला.

खान फीरोजजंग याच्या सैन्याचा बक्षी व वाकनीस फाजलखान याचा भाऊ सय्यदअली याने विनंती लिहून पाठविली की खान फीरोजजंगाच्या सैन्याच्या सद्यःस्थितीची व सामग्रीची पाहणी करण्यास बंधी काय आज्ञा ? आज्ञा झाली की पाहणी करावी.

नौकादळाचा प्रमुख (मीरेबहर) व खिलतखान्याचा अधिकारी सैफुल्लाखान याला निरोप देताना बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

'नुस्रतजंग (जुल्फिकारखान) याच्या सैन्याची काय परिस्थिती आहे ती तुम्ही पहावी नुस्रतजंगच्या फौजेचा दिवाण याने सैफुल्लाखानाच्या सहकार्याने नुस्रतजंगच्या फौजेची पगारबाकी द्यावी.'

बादशहांनी आज्ञा केली की नुस्रतजंग जुल्फिकारखान याच्या फौजेच्या पगारासाठी खजिन्यातून चार लाख रुपये मतलबखानाबरोबर पाठविण्यात यावेत.

एकवीस डिसेंबर– आज सकाळी एक प्रहर दोन घटिका दिवस आला असता बादशहा निमगावजवळील आपल्या मुक्कामावरून तख्तेखावर स्वार होऊन निघाले. सव्वा दोन कोसाचा प्रवास करुन ते कोरेगांव (शिरुर तालुका, पुणे जिल्हा, पुण्याच्या उत्तरेस चौदा मैलावर) येथे मुक्कामाला आले.

उद्या येथून कूच करण्यासाठी काय आज्ञा म्हणून विचारता उद्या आम्ही येथून कूच करू अशी बादशहांनी आज्ञा केली. हमीदुद्दीनखान बहादुर याने पेशखान्या बरोबर जावे आणि आमच्या पुढील मुक्कामासाठी लोहगांव (पुण्याजवळ) जागा पाहून यावे अशी आज्ञा झाली.

मन्सूरखान याची मुले मुहंमद गजनफर व मुहंमद नासर ही औरंगाबादेहून येऊन बादशहांना भेटली. कडूसचा ठाणेदार निजामराव हा येऊन बादशहाला भेटला.

मरहूम अईजखान याचा नातू शमशेरबेग हा मध्यरात्री शिवगावा (?) वर हल्ला करण्यास निघाला. शिवगाव हे निमगांवाहून सात कोसावर आहे त्याने गावावर हल्ला करून ते उध्वस्त केले. मराठयांचे अधिकारी बाळाजी व नरसोजी यांचे कबिले, माणसे, गुरेढोरे वगैरे धरली आणि तो त्यांना घेऊन आला. (हा बाळाजी कोण ? बाळाजी विश्वनाथ तर नव्हे ?)

अहसनाबाद उर्फ गुलबर्गा येथील किल्लेदार व फौजदार हा गुलबर्ग्याच्या किल्ल्यातर्फे नायब ठेवून हुजुरांत आला आणि बादशहांना भेटला. (इरादत खानाचा आजा आज्जमखान उर्फ इरादतखान हा शहाजहानचा सेनापती, १६३० च्या नोव्हेंबरमध्ये शहाजीराजे त्याला मिळाले होते. इरादतखान याचा काका मुल्तफतखान हा १६५६ मध्ये अहमदनगरजवळ शिवाजी महाराजांशी लढला. दुसरा काका खानजमान हा वऱ्हाडचा सुभेदार, इरादतखानाचे उत्कृष्ट आत्म चरित्र समकालीन साधन म्हणून महत्वाचे आहे.)

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली-' जुल्फिकारखानाच्या सैन्यात पन्नास घोडे पाठविण्यात यावेत अशी आज्ञा झाली होती. त्यापैकीच चार घोडे हे जुल्फि-कारखान यास स्वत:साठी म्हणून देण्यात यावे.

मरहूम बहादुरखान याचा मुलगा अजीजखान याने आपल्याबरोबर चारशे स्वार आणले होते. ते सर्व हुजुरात (तैनात) घ्यावे अशी आज्ञा झाली. अजीज खान याने ते स्वार बादशहांच्या समोर हजर केले. याशिवाय त्याने आपल्यातर्फे दोन घोडे नजर (पेशकश) केले. बादशहांच्या आज्ञेने अब्दुर्रहीम याने स्वारांची मोजणी केली, ते साडेतीनशे भरले.

बावीस डिसेंबर– आज बादशहा कोरेगावजवळील आपल्या मुक्कामावरून तख्तेरवां-वर बसून निघाले. तीन कोसाला थोडे कमी असे अंतर पार करून ते लोहगावजवळच्या मुक्कामावर आले.

बादशहाजादा कामबख्श याला एक इराकी घोडा देण्यात आला. मदत म्हणून फाजलखान यास पाच घोडे व ख्वाजाखान (हा मराठयांच्या कैदेत होता) याचा मुलगा खानख्वाजा याला दोन घोडे देण्यात आले.

बादशहा सकाळी आपल्या मुक्कामाहून निघून लष्करापाशी आले तसे उस्मानखान करावल व हिदायत केश वाकियानिगार (वाकनीस) यांनी त्यांना सांगितले की ' येथून पुण्याचा किल्ला (पुरंदर) दिसतो. बादशहांनी तो पाहिला.

बादशहा म्हणाले ' हाच तो किल्ला (पुरंदर) तर.' बादशहांना कळविण्यात आले की ' डावीकडे दिसतो तो पुरंदर. समोर दिसतो तो कोंडाणा.' बादशहांनी विचारले ' येथून किती लांब आहे.' सांगण्यात आले ' वीस कोस.'

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'शमशेरबेग याने शिवागाव लुटले आणि माणसे, गुरेढोरे पकडून आणली.'

बादशहा म्हणाले 'मुहंमद अमीनखान बहादुर याने शमशेरबेग याला विचारावे की 'तू माणसे व गुरेढोरे पकडून का आणली, असे करण्यात येऊ नये. माणसाना मोगलांनी लुटून जे काही घेतले असेल ते त्यांचे त्यांना परत करण्यात यावे.

बादशहांना खालीलप्रमाणे कळविण्यात आले–

'दौलतमंदखानाच्या जहागिरीत हिंदन (?) हे गाव आहे. तेथील लोकांची काफरांशी (मराठ्यांशी) अंतस्थ हातमिळवणी होती. म्हणून मरहूम अईजखान याचा नातू शमशेरबेग याने ते गांव लुटले. माणसे व गुरेढोरे पकडून आणली आहेत. यावर काय आज्ञा?'

पकडून आणलेल्यांना सोडून देण्यात यावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

फतेहुल्लाखान बहादुर आलमगीरशाही हा सखरलना (विशाळगड) किल्ल्याच्या दिशेने गेला होता त्याने बादशहाला खालीलप्रमाणे लिहून पाठविले–

'मी खटावला पोहोचलो. येथून मी सखरलना (विशाळगडकडे) रवाना होईन. धनाजी जाधवचा मुलगा आणि बहिर्जी मोठे सैन्य घेऊन ठाण मांडून आहेत. माझ्या जवळ थोडे सैन्य आहे. हुजुराकडून कुमक पाठविण्याची व्यवस्था होईल अशी आशा करतो.'

बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली–

'फतेहुल्लाखान यास युध्दसामुग्री पाठविण्यात यावी.'

विजापूरचा सुभेदार चीनकुलीजखान याला लिहीण्यात यावे की त्याने बेनी-शहादुर्ग (पन्हाळगड) पाशी येऊन तळ द्यावा.

तेवीस डिसेंबर – लोहगाव (पुण्याजवळील) जवळ मुक्काम. काजी अकरमखान याचा मुलगा निजामुद्दीन याला (ब्रम्हपुरीच्या) तळाचा काजी म्हणून नेमण्यात आले. त्याची मन्सब वाढविण्यात आली.

हरकाऱ्यांच्या तोंडून काल रात्री कळले की 'खान नुस्रतजंग याने आज्ञे-प्रमाणे कोंडाण्याच्या वाडचा जाळल्या.'

काल रात्री हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'धान्याच्या गोण्या लादलेले एक हजार बैल छावणीकडे येत होते. मौजे बिलनगांव (?) नजीक गनिमांनी ते ते सर्व लुटून नेले आणि अनेक लोकांना ठार मारले.'

बादशहांनी आज्ञा केली की 'फौजदारांना लिहा. त्यांनी आपापल्या हद्दीतून रसद सुरक्षितपणे पार करावी.' आम्ही येथे (लोहगावला) तीन मुक्काम करणार आहोत. करावलीच्या (टेहेळणी) सैनिकांनी छावणी भोवती रात्री गस्त देत रहावे. अशी बादशहांनी आज्ञा केली

चोवीस डिसेंबर– शवेकद्रसणामुळे बादशहांनी रात्रीचे आग्रण केले. सियादतखान याने अर्ज केला. त्यांत म्हटले होते. ' माझ्या पथकातील लोकांना घोडे नाहीत. शिवाय त्यांना पंचवीस महिन्याचा पगार सरकारातून येणे आहे' आज्ञा झाली की ' दोन तीन घोडे द्या आणि तीन महिन्याचा पगार द्या.'

किल्ले असदनगर (अकलूज) च्या हरकाऱ्याच्या लिहिण्यावरुन कळले की 'येथील बख्शी व बाकनीस मुहंमद सियाह याने अमलापुरचा ठाणेदार सोमाजी याच्याकडून सातशे रुपये घेतले असून त्याने तसा करारनामाही लिहून सोमाजीला दिला आहे.' याबाबतीत रुहूल्लाखानाने लिहून चौकशी करावी अशी आज्ञा झाली.

फरीदखान याला इस्लामपुरी (ब्रम्हपुरी) च्या किल्लेदारीवर पूर्वतत बहाल ठेवण्यात आले. इज्जतखान यास खान फीरोजजंग याजपाशी तैनात करण्यात आले.

मरहूम दौलतमंदखान याचा नातू फकीरुल्ला, पृथ्वीसिंह याचा मुलगा बहादुरसिंग, काजी अकरमखान याचा मुलगा निजामुद्दीन (ब्रम्हपुरी तळाचा काजी, आज्जमपूरचा पुरंदर नव्हे) नायब किल्लेदार मुहंमद अकरम, इत्यादींना मन्सबी देण्यात आल्या अगर वाढविण्यात आल्या.

यक्काताजखान याचा मुलगा नुरुल्ला वारला असे कळले. त्याचे शव बऱ्हाणपुरला नेऊन तेथे दफन करावे अशी आज्ञा झाली.

आज्जमगड (पुरंदर) चा किल्लेदार याने विनंती लिहून पाठविली की, आज्ञा असल्यास हुजुरात येईन' परवानगी देण्यात आली. खानचंद हा पुरंदरचा किल्लेदार होता.

इंदूर (सध्या आंध्रांतील निजामाबाद) व बेमकल येथील फौजदार व अमीन ख्वाजा इनायतुल्ला हा वारला. त्याची जागा रामगीर (करीमनगरजिल्हा, आंध्र) चा फौजदार व अमीन गुलाम मुहंमद याला देण्यात आली.

खुजस्ताबुनियाद औरंगाबाद येथील बागांचा अमीन (देखरेख अधिकारी) शख दौलतमंद याच्याकडे दौलताबाद किल्यातील देखरेखीचे कामही लावून देण्यात आले.

पंचवीस डिसेंबर– लोहगांव जवळ मुक्काम. सकाळी बादशहांनी फराशखान्याचा मुश्रफ मुहंमदहादी याला आज्ञा केली की 'पेशखाना पुढील मुक्कामावर पाठवून द्या. मुहंमद अमीनखान बहादुर यांनी पेशखान्याबरोबर जावे.'

बादशहांनी आज्ञा केली की 'मीर आतिश तरबियत खान, हमीदुद्दीनखान बहादुर, आणि मुहरनखान यांनी कोंडाण्याच्या पायथ्याशी जाऊन बादशहाच्या निवासस्थानासाठी व मोर्च्यासाठी योग्य जागा पाहून याव्या. शिवापूरजवळ जागा पाहावी.

बादशहांना कळविण्यात आले की 'जुल्फिकारखान बहादुर याने कोंडाणा किल्ल्याच्या आसपासची खेडी उस्वस्त केली. आता तो बादशहाच्या आज्ञेप्रमाणे बेनीशहादुर्ग उर्फ पन्हाळगड किल्ल्याच्या दिशेने रवाना झाला आहे.'

सव्वीस डिसेंबर– आज सकाळी बादशहा तख्तेखावर बसून लोहगांवाहून निघाले वाटेत सर्फराजखान याने बादशहांना आपली पथके दाखविली बादशहा त्याला म्हणाले 'मीर आतिश तरबियतखान हा चंदावली (पिछाडीचा) अधिकारी आहे तो येऊन पोहोचेपर्यंत तुम्ही येथे पिछाडीला रहा.' बादशहांनी आज सव्वादोन कोसाचा प्रवास केला आणि ते दुपारच्यावेळी आज्जमगड पुण्याजवळील मुक्कामावर आले.

उद्या येथेच मुक्काम राहील. पेशखाना तसाच राहू द्या अशी बादशहांनी आज्ञा केली.

मतलबखान व सैफुल्लाखान हे बादशहांच्या राहण्यासाठी योग्य अशी जागा आणि मोर्च्यासाठी योग्य अशी स्थळे पाहाण्यासाठी गेले होते. त्यांनी परत येऊन विनंती केली की 'कोंडाण्याच्या अलीकडे आम्ही आपल्या निवासासाठी जागा पाहून आलो आहोत. येथून घाटाच्या वाटेने दोन मजला होतील आणि दुसऱ्या वाटेने तीन मजला. एका वाटेने सहा कोस व दुसऱ्या वाटेने नऊ कोस–'

त्यांनी मोर्च्याचा नकाशा आणला होता तो, बादशहा समोर ठेवला.

बंगालचा सुभेदार मुहंमद अजीम (अजीमुश्शान, औरंगजेबाचा नातू मुअज्जम शहाआलम बहादुरशहा याचा मुलगा) याने बादशहाकडे अनेक वस्तू पाठविल्या. त्याची यादी बख्शी उलमुल्क रुहुल्लाखान याने पाठविली. तंबू (साध्या रेशमाचा अस्मक अतलस), नमाजाची आसने, आणि इतर वस्तू यादीत होत्या. अजीमुश्शानने यापूर्वी चाळीस हत्ती पाठविले होते. त्याने आता आणखी पंधरा हत्ती पाठविले. एकुण पंचावन्न हत्ती बंगालमधून आले.

जुल्फिकारखान याजकडे तीन लाख रुपये व पन्नास घोडे पोहोचविण्याचे काम मतलबखान याला सांगण्यांत आले होते. जुल्फिकारखानाच्या सल्ल्याने मोर्च्याच्या जागा निवडाव्या हेही काम त्याला सांगण्यात आले होते. ही दोन्ही कामे त्याने पार पाडली.

बादशहांनी नकाशा (कोंडाण्याच्या परिसराचा) पाहिला. ते विचारीत गेले त्या सर्व जागा मतलबखानाने नकाशावर दाखविल्या. मतलबखान म्हणाला 'शिवापूरचा देशमुख शंकराजी हा आला आहे.' तो बादशहांना भेटला. त्याने पांच मोहोरा निसार म्हणून दिल्या. बादशहांनी शंकराजीला खिलतीची वस्त्रे दिली.

होबळी (?) चा किल्लेदार अमीरबेगचा मुलगा अलीकुलीबेग हा होता' त्याला माहुली (?) चा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले. माहुलीचा किल्लेदार मुरादुल्लाखान याला तेथून बदलण्यात आले.

मतलबखानाने कळविले की 'आपल्या आज्ञेप्रमाणे मी जुल्फिकारखानास गनिमांचे पारिपत्य करण्यासाठी बेनीशहा दुर्ग (पन्हाळगड) भागाकडे रवाना केले.

सत्तावीस डिसेंबर – मुक्काम पुण्यानजीक. रुस्तमबेग मीरबाशी याला जुल्फिकारखानाच्या तोफखान्याचा दारोगा (अधिकारी) नेमण्यात आले. त्याला खान अशी पदवी देण्यात येऊन त्याला निरोप देण्यात आला.

भीमरावचा मुलगा व्यंकटराव याला बादशहांनी विशेष काम सांगून पाठविले. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.

पुरंदरचा वाकनीस आणि अब्दुलनबीचा गुलाम मुहियुद्दीन हा येऊन बादशहांना भेटला.

शिवापूरचा जमीनदार (देशमुख) नागोजी (एकेठिकाणी शंकराजी म्हटले आहे), हा मतलबखानाबरोबर आला. होता त्याला खिलतीची वस्त्रं देऊन निरोप देण्यात आला.

सखरलना (विशाळगड) चा किल्लेदार जाबताखान याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले–

चोरांचे (मराठ्यांचे) एकोणीस हजार स्वारांचे सैन्य या (विशाळगड) भागात पसरले आहे. राजा उदितसिंग याला किल्ल्यात रहाण्याची आज्ञा झाली आहे. किल्ल्यात रसद, सामग्री व तोफखान्याचा सरंजाम नाही.'

रुहुल्लाखान याने चौकशी करुन कळवावे अशी बादशहांनी आज्ञा केली.

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की 'हमीदुद्दीनखान बहादुर व तरबियतखान हे कोंडाणा व तोरणा या किल्ल्याची पाहणी करण्यास गेले होते. तेथे मराठ्यांशी त्यांचे युध्द चालू आहे.

अठ्ठावीस डिसेंबर– काल रात्री हमीदुद्दीनखान बहादुर व तरबियतखान यांचे पुढील मजकुराचे पत्र आले–

'आम्ही कोंडाणा किल्ल्याला जाणारी घाटाकडची वाट पाहाण्यास गेलो होतो मराठ्यांनी ती वाट अडविली आहे. येण्यासाठी दुसरी वाट नाही आपण येथून पुण्याहून) कूच करुन पुढे निघाल अशी आशा आहे. किल्ल्याबाहेर मराठे होते. आम्ही त्यांचे पारिपत्य केले, ते किल्ल्यात गेले.'

रात्रीचा एक प्रहर झाला असता बादशहांनी फराशखान्याचा मुश्रफ मीर हादी यास आज्ञा केली की 'पेशखाना (आघाडीचे तंबू) पुढे पाठवा. मुहंमद अमीन खान बहादुर यांनी पेशखान्याबरोबर जावे.'

काल रात्री बादशहांना कळविण्यात आले की, बादशहाजादा कामबख्श याचा मुलगा सुल्तान मुहियुसुन्नत हा वारला बादशहांनी आज्ञा केली की–

'हाफिज अंबर याने जाऊन बादशहाजाद्याचे समाधान करावे. त्याला म्हणावे, सर्वांची शेवटी तीच गत (मृत्यु) आहे.' फाजलखान व दाराबखान यांना आज्ञा करण्यांत आली की 'सुल्तान मुहियुसुन्नत याचे शव पुण्यात शेख जलाल याच्या दर्ग्यापाशी दफन करण्यात यावे.'

एक प्रहर आणि दोन घटका दिवस आला असता बादशहा तख्तेखावर बसून निघाले. नगारखान्याच्या दारोग्याला सांगण्यात आले की 'नगारे नौबता वाजवू नका बादशहा हे अमीरुलउमरा (मुख्यप्रधान असदखान), रुहुल्लाखान व खानजादखान वगैरेना बरोबर घेऊन बादशहाजादा मुहंमद कामबख्श याच्या तळावर गेले. तेथे ते फातेहा पढले. त्यानी कामबख्शाचे समाधान केले कामबख्शाने रीतीप्रमाणे ओवाळणी व नजर म्हणून दोन हत्ती, तीन घोड, कापड, धनुष्यबाण व रत्ने ही पेशकश आणली. ती सर्व माफ करण्यात आली. (बादशहांनी ती घेतली नाही.)

यानंतर बादशहा तख्तेखांवर स्वार झाले. त्यानंतर त्यांनी नौबती नगारे वाजविण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे करण्यात आले. तीन कोसाचा प्रवास करुन दुपारी दिवसाच्या दोन घटका झाल्या असता, ते वडगांवजवळ मुक्कामाला आले.

पुण्याचा ठाणेदार हा खानचंदचा मुलगा दलसिंग होता, त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली. त्याला तीनशे जात व तीनशे स्वार अशी मन्सब होती. ती शंभरने वाढविण्यात आली.

हमीदुद्दीनखान बहादुर आणि तरबियतखान हे वाटेतच बादशहांना भेटले. त्यांनी सांगितले की 'कोंडाण्याच्या पायथ्याशी आपले वास्तव्यस्थान आणि मोर्चे या जागा आम्ही पाहून आलो आहोत.' बादशहा म्हणाले 'सेवा मान्य झाली. मजुरा झाला.'

कोंडाण्याच्या किल्ल्यावरुन तोफेचा गोळा मतलबखानाच्या दिशेने उडवि-ण्यात आला होता. उस्मानखान करावल याने तोफेचा तो गोळा बादशहांना दाखविला. गोळ्याचे वजन पावणेचार शेर भरले. बादशहा म्हणाले सुरक्षित ठेवा.'

बादशहांना कळविण्यात आले की पेशख'ना मागच्या मुक्कामावरुन आला आहे. बादशहा म्हणाले पुढे पाठवून द्या.'

एकोणतीस डिसेंबर – आज दिवसाच्या सहा घटका झाल्या असता बादशहांनी तरबियतखान व हमीदुद्दीनखान गहादुर यांना आज्ञा केली की 'तुम्ही बेलदार वगैरेंना बरोबर घेऊन जा. आणि समोरची चढणीची वाट नीट करा.'

त्यानंतर दिवसाचा एक प्रहर व तीन घटका झाल्या असता बादशहा स्वार होऊन निघाले. सव्वा कोसाचा प्रवास करुन ते कोरगाव (कोंढवे असावे?) जवळ मुक्कामाला आले.

उद्या येथून कूच करण्यासंबंधी काय आज्ञा ? असे मतलबखानाने विचारले बादशहा म्हणाले ' आम्ही कूच करणार पेशखाना पुढे पाठवा.'

बादशहाजादा कामबख्श याला त्याच्या पुत्राच्या मृत्युबद्दल मातमी वस्त्रे (शोक वस्त्रे) म्हणून खिलत, शिरपेच, नीमाखीनही पाठविण्यात आली.

ओरिसाचा सुभेदार अस्करीखान हैद्राबादी हा मरण पावला. शहाजादा मुहंमद अजीमुश्शान (बादशहाचा नातू, मोठा मुलगा मुअज्जम बहादुरशहा याचा मुलगा) हा बंगालचा सुभेदार होता. त्याच्या सुभ्याला ओरिसाचा सुभा जोडण्यात आला. ओरिसाच्या सुभेदारीचे काम पण अजीमुश्शानला सांगण्यात आले.

रायबाग हुक्केरीच्या फौजदारीवर जमशीदखान (बिजापुरी) याला नेमण्यात आले. हा पाच हजारी मन्सबदार होता. त्याच्या मन्सबीत वाढ करण्यात आली.

बादशहा कोरगांवच्या मुक्कामाजवळ आले. तेथून त्यांनी कोंडाण्याचा किल्ला पाहिला. ते म्हणाले 'येथून कोंडाणा दूर आहे.' त्यांनी तरबियतखान हमीदुद्दीनखान बहादुर यांना सांगितले ' तुम्ही या घाटाच्या पलीकडे जा व योग्य जागा पाहून या. उस्मानखान याने तुमच्याबरोबर राहावे.'

मरहूम शरीफखान याचा मुलगा आणि वऱ्हाडच्या जिजियाच्या अमिनी वरुन बदललेला अब्दुर्रहीम हा येऊन बादशहांना भेटला.

बादशहांनी हमीदुद्दीनखान बहादुर यास सांगितले, 'बादशहाजादा कामबख्श यास देण्यासाठी एक हत्ती काढून ठेवा.'

तीस डिसेंबर– आज बादशहा कोरगांव जवळील मुक्कामावरून निघाले. त्यांनी घाट ओलांडला. दोन कोसाचा प्रवास करून ते कोंडाण्याच्या जवळ मुक्कामाला आले. बादशहा घाटाजवळ पोहोचले तेव्हा म्हणाले 'कोंडाणा हा डोंगराळ आहे. सखरलना (विशाळगड) प्रमाणेच येथे दरीखोरी आहेत.'

भास्करराव हरकारा याला बादशहा म्हणाले 'कोंडाणा किल्ल्याच्या पायथ्यापासून वरच्या टोकापर्यंत काय अंतर आहे चौकशी करून कळवा'

हकीम नसीरुद्दीन यास घेऊन येण्यासाठी मीर अफजल गुर्जबर्दार हा औरंगाबादेस गेला होता. तो तसाच परत आला. ख्वाजा मंजूर याने आपल्या स्वत:च्या उपचारासाठी त्याला ठेवून घेतले आहे असे कळले.

जमशीदखान याजकडे शिरोळ, चिकोडी व जमखिंडी असे किल्ले होते. त्याला जोडून जमशीदखानाला रायबाग हुक्केरी या स्थळांची फौजदारी देण्यात आली, पूर्वीचा फौजदार मुहंमद अश्रफ याला बदलण्यात आले.

बादशहांनी बादशहाजादा कामबख्श याला आज्ञा केली की 'कोंडाणा किल्ल्याला इकडून मोर्चे लावण्याचे काम चालू करा.'

एकतीस डिसेंबर – बादशहांनी बक्षी उल्मुल्क रुहुल्लाखान व हमीदुद्दीनखान बहादुर यांना आज्ञा केली की 'तुम्ही कोंडाण्याच्या भोवती पाहणी करा. ठाणी कायम करण्यासाठी योग्य जागा पहा, तेथे अधिकाऱ्यांना कायम करा आणि मग परत या.'

अजीजखान रोहिला याच्या मन्सबीत (रुहुल्लाखानाच्या विनंतीवरून) वाढ करण्यात आली.